मा ९३०

२१५ ६१७

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.

(जिल्हा वाचनालय)

मासिकाचे नांव — मराठी [illegible]

संपादक —

मासिक क्रमांक —

सन — १९२४

अंक —

(महिने) १ ते १२

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

REGISTERED B NO. 179




पुस्तक ३५. जानेवारी सन १९२४. अंक १.

**विषय.** **पृष्ठ.**

| | |
|---|---|
| चंदन-वंदन. | १ |
| दीनोद्धार. | ५ |
| म्हणी व इतिहास. | १० |
| कावळ्याची युक्ति. | १३ |
| राहूची तारांबळ ( कविता. ) | १४ |
| इंग्लंडांतील ठिकठिकाणचे फोटो. | १५ |
| जादूचा खेळ, <br> डुकर, कोंबडी व कुत्रा ( चित्र. ) | १७ |
| दोघे चिकू. | १८ |
| शालापत्रकाची चढाओढ. | १९ |
| चुटके, | २० |

मुद्रक व प्रकाशक—रा. रा. शंकर नरहर जोशी, चित्रशाळा प्रेस, १०२६ सदाशिव पेठ, पुणें सिटी.

# रंगीत इसाप-नीति.

बाल एकंदर इसापनीतींतील आठ अगदीं सोप्या गोष्टी मोठ्या व जाड टाइपांत दिलेल्या असून प्रत्येक गोष्टीसमोर त्यांतील रहस्य दाखविणारें रंगीत सुंदर चित्र दिलेलें आहे. चित्रें पाहूनच मुलांना गोष्टींतील तात्पर्य कळतें. किं० ८६. ट. ह. ८८६

# सचित्र इसाप-नीति.

[ उत्तरार्ध. ]

[ नवीन भाषांतर भाग २ रा. ]

वरीलप्रमाणेंच हा दुसरा भाग विक्रीस तयार आहे. याचीं सुमारें ३०० पानें आहेत असून यांत ३५० गोष्टी आहेत. चित्रांची संख्या १५० पर्यंत आहे. किं. १८१

दोन्ही भाग एके ठिकाणीं बांधलेलें सुंदर पुस्तक किं० रु. २

# विद्यार्थ्यांकरितां नाटिका.

शीलं परं भूषणम्.

ही नाटिका प्रसिद्ध कवि-शिरोमणि नारायण वामन टिळक यांनीं केवळ लहान मुलांकरितांच लिहिलेली आहे. यांत शृंगाररस मुळींच नाहीं एवढेंच नव्हे, तर स्त्रीची भूमिका या नाटकांत आलेलीच नाहीं. शिवाय नाटकाचा विषय नैतिक विचारानें पूर्ण भरलेला असल्यामुळें शाळांतून वार्षिक संमेलनाचे वेळीं मुलांकडून हा नाटकाचा प्रयोग करविण्यास तें योग्य आहे. नाटकाचा विषय मनाची योग्यता जास्त किंवा ज्ञानाची योग्यता जास्त हा आहे. पुस्तकांत त्या सुंदर चित्रें कथानकास अनुसरून दिलेलीं आहेत; किं० ८४.

म्यानेजर--चित्रशाळा प्रेस, पुणें.

---

# चिमुकलें भारत व रामायण.

महाभारत व रामायण हे आपले राष्ट्रीय ग्रंथ आहेत. यांत आपला प्राचीन इतिहास असून प्रपंच साधून परमार्थ कसा जोडावा हें उत्तम दाखविलें आहे. व्यावहारिक बोधाच्या ह्या केवळ खाणी आहेत. आबालवृद्ध स्त्री-पुरुषांना या ग्रंथांचें ज्ञान होणें अगत्याचें आहे. प्रौढांकरितां आमचीं लोकप्रिय ' भारती युद्ध ' व ' रामचरित्र ' हीं पुस्तकें आहेत. आतां बारातेरा वर्षांच्या मुलांमुलींकरितां ' चिमुकलें भारत ' व ' चिमुकलें रामायण ' हीं दोन पुस्तकें अनुक्रमें आम्हीं रामकृष्णवाक्सुधेचे प्रसिद्ध लेखक रा. कृष्णाजी गोविंद किनरे व रा. विद्याधर वामन भिडे बी. ए. यांजकडून मुद्दाम लिहविलीं आहेत. पुस्तकाची भाषा फारच मोहक व सोपी आहे. वाचतांवाचतांच मुलांच्या मनावर त्यांतील रहस्य ठसावें म्हणून उपदेशपर वाक्यें जाड टाइपांत घातलीं आहेत, आणि कथानकांच्या अनुरोधानें हाफटोन प्रोसेसनें तयार केलेलीं भारतांत आठ व रामायणांत सात अशीं सुंदर चित्रें घातलीं आहेत. भारताचीं पृष्ठें १७३ व रामायणाचीं पृष्ठें ८२. छपाई बांधणी सुबक. किं० ८६, व रामायण किं० ८४.

म्यानेजर—चित्रशाळा प्रेस, पुणें शहर.

ग्रं·मा·३५३५

मराठी
# बालपत्रक

येथें शब्द नाहीं शिष्यासीं । हें अवघें सद्गुरूपाशीं ।
सद्गुरु पालटी अवगुणांसी । नाना यत्नें करोनी ॥
जें कांहीं आपणास ठावें । तें हळु हळु शिकवावें ।
शहाणें करून सोडावें । सकळा जनां ॥ १ ॥

—रामदास.

पुस्तक ३५. जानेवारी सन १९२४. अंक १

१२ २/२
३/२१/२

## चंदन-वंदन.

( लेखकः—आनंदीरमण—लिंब सातारा )

हा किल्ला चंदन-वंदन अशा संयुक्त नांवानें संबोधण्याचा जरी प्रघात पडलेला आहे तरी हे दोन्ही किल्ले अगदीं निरनिराळे आहेत हें प्रथम सांगणें अवश्य आहे. एवढेंच नव्हे तर राज्यव्यवस्थेच्या दृष्टीनेंही ते अगदीं निरनिराळें आहेत. म्हणजे चंदन वाई तालुक्यांत व वंदन कोरेगांव तालुक्यांत गणला गेला आहे. आम्ही बरेच जण लिंबहून सकाळीं सहा वाजतां निघालों. लिंब हा गांव सातारा शहरापासून पूर्वेस सुमारें नऊ मैलांवर आहे. पूर्वकालीं ते भार्गवक्षेत्र म्हणून पुराण प्रसिद्ध आहे. येथून श्रीकृष्णानदी ओलांडून उत्तरेकडे चार मैल गेल्यावर काळंगवाडी हा गांव लागतो. हा गांव सरासरी पन्नास घरांचें खेडे असून डोंगराच्या पायथ्याशीं आहे. येथें दूध वगैरे पुष्कळ मिळतें. तेथून पूर्वेकडे डोंगरावर ( चंदनवर ) जाण्यास रस्ता आहे. हा बराच खडकाळ व चढण्यास अवघड आहे. दुसरा एक रस्ता राऊतवाडीवरून थेट उत्तरेस चंदनवर जातो. शिवाय एक बनवडीवरून थेट उत्तरेकडे प्रथम वंदनवर जाऊन, नंतर चंदनवर येणारा व दुसरा बेलमाचीवरून थेट दक्षिणेकडे वंदनवर प्रथम जाणारा असेही रस्ते आहेत. सर्वच बाजूंनीं डोंगर चढण्यास बिकट आहे. आम्ही काळंगवाडीकडून चढावयास आरंभ केला. पूर्वेकडे सुमारें अर्धा मैल गेल्यानंतर चंदनगडाचा पायथा चढण्यास सुरवात झाली. जागोजाग पडलेले प्रचंड दगड दृष्टीस पडतात. त्यांत एकतर सुमारें १३।१४ फूट उंच व शंभर मनुष्यें वर सहज बसूं शकतील

एवढा प्रचंड धोंडा आम्हाला दिसला. हा काळ्य पाषाणाचा आहे. सुमारें अर्धा मैल पायथा चढू गेल्यावर एक दगडी दिंडी लागते. हेंच किल्ल्याव जाण्याचें दार. येथून वर किल्ला आहे, या दिंडी नजीक सुमारें ५०।७५ फूट उंचीचा दगडी कड्याच भाग तोडून सारखा केलेला आहे. पाळण्यांत बस हा किल्ल्याचा सर्वांत मोठा असलेला सुमारें दोन फूट लांबीचा कडा तोडला अशी दंतकथा आहे. जे कडा उंचीला कमी असेल तेथें दगडी बांधून काढ् चौफेर तटच केलेला आहे असें म्हणण्यास हरक नाहीं. हा दिंडीजवळचा भाग फारच प्रेक्षणीय आ एका बाजूस तट व दुसरे बाजूस शंभर दीडशें फू खोल, सारखी डोंगरी कड्याची रचना, अशा ध फक्त पांच सहा फूट रुंदीचा एकच रस्ता वर गेले असून चढण्यास बिकट आहे. या दिंडीशिवाय बाजूस वर जाण्यास दुसरा रस्ता नाहीं. व या दिंडी ठिकाणीं चांगला लढाऊ बंदोबस्त ठेवण्याची मुद्द सोय केलेली आहे. या दिंडीचें दार फक्त एक मनुष्यास आंत जाता येईल एवढेंच आहे. येथून गेल्यावर उजवे बाजूस एक दगडी खोली आहे तीं दारूगोळा ठेवीत असत. तेथेंच डोंगराचें एक टों बरेंच पुढें आलेलें आहे त्यांवर एक उंचसा बुरू बांधलेला आहे. याला टेहेळणीचा बुरूज म्हणता याच ठिकाणीं सभोंवार चौरस चौरस दोन मैल ल रुंद असे पठार ( सपाट मैदान ) आहे. तेथें झा वगैरे बिलकूल नाहीं. हीच पूर्वीची सैन्य उतरण्या जागा असावी, कारण येथें एक दोन हजार राहुट सहज राहू शकतील. शिवाय येथून सभोंवारचा फ लाब पर्यंतचा भाग सहज दिसूं शकतो पश्चिमेक जांब, किकली, पाचवड, बावधन, प्रतापगड वगै वाईपर्यंतचा भाग दिसूं शकतो. दक्षिणेकडे लिं गोवें, यवतेश्वर, अजिंक्यतारा वगैरे साताऱ्यापर्यंत भाग स्पष्ट दृष्टीस पडतो. पूर्वेस उंच कडे व उत्तरे बाले किल्ल्याची चढण याशिवाय कांहीं दिस नाहीं. या पठारावरून वर बाले किल्ल्यावर जाण्याचा रस्ता साधारण बरा असून जागोजाग बांधून काढलेला दिसतो. ही चढण सुमारें तीन फर्लांग आहे. वर चढून जातांच प्रथम एक पडीक स्थितींत असलेला दरवाजा लागतो, पुढें उजवे हातास एक पडकी मशीद आहे, तेथेंच एक नादुरुस्त स्थितींत असलेलें भुयार आहे, तेथून पूर्वेकडे गेल्यावर एक लहानशी दगडी धर्मशाळा लागते. तेथें हल्लीं गुरें बांधतात. तेथून पुढें उत्तरेकडे २।३ मशीदीच आहेत. त्यांतली एक चांगल्या स्थितींत दुरुस्त आहे. तिला बुवासाहेबाची मशीद म्हणतात. या शिवाय जागोजागीं मुसलमानांची थडगी तर असंख्य आहेत. सदरहु किल्ला कित्येक दिवस हिंदूंचे ताब्यांत असून मुसलमानांची स्मारकें यत्किंचितही उध्वस्त करण्याचा प्रयत्न कोणी केलेला दिसत नाहीं. ही मोठी हिंदूंच्या परधर्म सहिष्णुतेची गोष्ट स्मरल्याशिवाय रहात नाहीं. येथेंच जवळ ओळीनें दगडी तीन खोल्या प्रत्येकी १२×१० एवढ्या असून खालीं खोल आहेत. त्यांना दारूचीं कोठारें म्हणतात. परंतु त्या अगदीं एकेका लगत असून मध्यें फक्त २।२॥ फूट रुंदीची दगडी भिंतच तेवढी आहे. यावरून पूर्वीच्या युद्धनैपुण्य धारणी मुत्सद्यांनीं इतक्या नजीक दारूचीं कोठारें ठेवलीं असतील असें वाटत नाहीं. तीं धान्याचीं कोठारें असावीं. आंत अंधार आहे. परंतु या खोल्या चांगल्या दुरुस्त आहेत. याशिवाय चंदनवर विशेष पहाण्यासारखें नाहीं. वर पाण्याची गैरसोय आहे. दोन तीन तळीं आहेत. परंतु त्यांतून विशेष चांगलें पाणी नाहीं. एका तळ्याचे वरच्या बाजूस पांच चार धोंड्यांना शेंदूर लावलेला दृष्टीस पडल्यावरून हे कांहीं तरी हिंदूंचे देव असावे अशी कल्पना करण्यास जागा आहे. पाहिलेल्या दगडावरून कोणत्याही मूर्तींचा बोध होत नाहीं. मुसलमानांचीं अनेक कबरस्थानें व मशीदी असतांना चंदनवर एकही हिंदूंचें देवालय नाहीं. हें मात्र थोडे आश्चर्य वाटतें एकंदर किल्ल्याची रचना,

सौंदर्य व अभेद्यता हीं अवर्णनीय आहेत यांत शंका नाहीं. येथून चंदन किल्ला अगदीं नजीक दिसतो. परंतु पूर्वेकडे असलेल्या एका दरवाज्याशिवाय खालीं उतरण्यास अगर वंदनवर जाण्यास मुळींच मार्ग नाहीं. हा पूर्वेकडील दरवाजाही पश्चिमेकडील दिंडी प्रमाणेंच अगदीं मोर्चावर असून चोहोंकडे मोठे भयंकर दरडी व कडे असलेल्या योग्य ठिकाणीं आहे. हल्लीं तो फार पडीक स्थितींत असून फक्त चौकट उभी आहे. आसपास खालील लष्करावर मारा करतां येण्यासारख्या जागाही बांधलेल्या असाव्या. या दरवाज्यावर मात्र एका बाजूस गणपती व दुसऱ्या बाजूस कमळ कोरलेलें आहे. गणपती छिन्नविच्छिन्न केलेला आहे. दरवाज्याखालीं उतरल्यावर एक मोठें पठार लागतें, याची ही बहुतेक रचना पश्चिमेकडील पठाराप्रमाणेंच आहे. येथून आम्ही वंदनवर जाण्यास निघालों.

चंदनाच्या पूर्वेकडील दरवाज्यांतून बाहेर पडलें म्हणजे समोरच वंदन किल्ल्यावर जाण्याचा रस्ता आहे जातांना बोगद्यासारख्या डोंगरी झाडाच्या एक-दीड फर्लांग लांबीच्या एकदोन जाळ्या लागतात. किर्र झाडी, अरुंद रस्ता, प्रकाशाचा लवलेशही नाहीं; असला हा रस्ता आक्रमण करतांना जंगली श्वापदांची भीति वाटणें साहजीकच आहे. जाळ्यांतून बाहेर पडतांच वंदनचा किल्ला लागतो. परंतु यालाही चंदन प्रमाणेंच ५०।६० फूट उंचीचा स्वयंभू तट असल्यानें किल्ल्यावर जाण्यासाठीं सुमारें दोन अडीच मैल किल्ल्याला वळसाच घालावा लागतो. हा रस्ता मात्र अत्यंत बिकट आहे, एका बाजूस दगडी तट व दुसरे बाजूस तुटलेला कडा ह्यांमधून फक्त पाऊल वाटच आहे. ही वाट चालून गेल्यावर वंदनाचे पूर्वेकडील टोंकानें किल्ल्यावर जाण्यास अवघड रस्ता आहे. सुमारें तीन फर्लांग वर चढून गेल्यावर प्रथमच डावे बाजूस एक पंचमुखी शंकराचें देवालय आहे, देवालय जरी नादुरुस्त आहे तरी तेथील पाहिलेल्या स्थितीवरून कोणीतरी देवाची पूजा नित्य करीत असावा अशी कल्पना करण्यास जागा आहे. आणखी थोडें वर गेलें म्हणजे एके ठिकाणीं दगडावर दगड असे लगोऱ्याप्रमाणें रचलेले आहेत. याला कळवंतिणी म्हणतात. प्रत्येक दगड फार मोठा म्हणजे सुमारें ४।५ फूट उंच व तितकाच लांबरुंद असून ते एकावर एक कसे ठेविले असतील याची कल्पना व उद्देश लक्षांत येत नाहींत. दोन उतरंडी चार चार दगडांच्या व एक तीन दगडांची आहे. त्या काळीं यारीसारखें साधन उपलब्ध नसतां केवळ गमती खातर कोणी एवढा खटाटोप केला असेल असेंही वाटत नाहीं. पुढें पश्चिमेकडे गेल्यावर एक पीर साहेबाची मशीद लागते, ही बरीच मोठी असून मशीदीपुढें सुमारें ४० फूट लांब व १६ फूट रुंद असा मंडप आहे. मंडपावर अच्छादन नाहीं. त्यामुळें उतारूंना त्याचा उपयोग होत नाहीं. पीर साहेबाचे पूजेला एक मुसलमान आहे. त्याला मुजावर म्हणतात. त्याकडे तो हक्क वंशपरंपरागत असून इनामी उत्पन्न आहे. या किल्ल्यावर गुरें वगैरे असून ३।४ घरेंही आहेत. हा किल्ला चंदनाइतका रम्य नाहीं. यावरील मनुष्यवस्तीमुळें व झाडी कमी असल्यामुळें भयाणही वाटत नाहीं. यावर मशीदी अगर थडगी विशेष नाहींत; चंदनप्रमाणेंच येथेंही दगडी खोल्या एका लगत तीन आहेत. त्यालाही दारूचीं कोठारेंच म्हणतात. येथेंही पाण्याची सोय बेताची आहे. उत्तरेकडे सुमारें तीन फर्लांग खालीं उतरल्यावर एक पाण्याचें लहानसें टाकें आहे. त्याचें पाणीही विशेष चांगलें नाहीं, परंतु वर दुसरें पाणीच नसल्यामुळें हेंच पाणी सर्व लोक उपयोगांत आणतात. या किल्ल्यावर पहाण्यासारखें विशेष कांहीं नाहीं. बेलमाचींचे म्हणजे उत्तरेचे बाजूनें या किल्ल्यावर येण्यास एकदोन अवघड मार्ग आहेत. परंतु ते केवळ चपळ व सशक्त मनुष्यांना प्रयत्नानें आक्रमण्यासारखे असल्यानें पूर्वेकडील दरवाज्याचाच मार्ग विशेष प्रचारांत आहे. आम्ही इकडूनच उतरलों. येतांना खोपवली, राऊत

वाडी, धनगरवाडी, माल गांव गोवें ह्यावरून सायंकाळीं पांच वाजतां परत लिंबास आलों. आमचा एकंदर प्रवास १६।१७ मैल तरी झाला असावा.

चंदन किल्ला पाहण्यालायक असून तेथें रम्यता वाटते. दोन्ही किल्यांचेकडे पाहिलें म्हणजे खरोखरच सृष्टिसौंदर्य ईश्वर निर्मित निसर्गसिद्ध वस्तूंचा राजकारणाकडे केलेला उपयोग किती योग्य आणि अभेद्य आहे याची खरी कल्पना तो प्रत्यक्ष पहाणारालाच विशेष येईल. वंदन किल्लाही चांगला मजबूत चोहोंबाजूनीं नैसर्गिक तटबंदी असलेला असा भयंकर आहे. चंदनप्रमाणें याला बाले किल्ला निराळा व सैन्याची छावणीची सोय निराळी अशी रचना नाहीं. या किल्याचेवरील माथ्यांवरच छावणीजोगें सपाट मैदान आहे. उंचीचे मानानें चंदनपेक्षां वंदन थोडा कमी आहे. आमचे मतें चंदनची उंची श्रीकृष्णानदीचें सपाटीपासून सुमारें ६००० फूट व वंदनची ५५०० फूट भरेल. मात्र वर जाण्याचे वळणाचे रस्ते मात्र प्रत्येकी २-२॥ मैल तरी लांबीचे असतील यांत शंका नाहीं, वंदनचे किल्यावर जें पंचमुखी शंकराचें देऊळ आहे त्याला चंदनेश्वर म्हणतात. या किल्यांचे नजीकच दोन टेंकड्या आहेत त्याला आलक, पालक, म्हणतात. वेढा देऊन बसलेल्या मोंगली सैन्याला हा किल्ला घेणें अशक्य झालें होतें परंतु कांहीं लोक फितुर होऊन त्यांच्या बायकांनीं जात्यावर गाणीं म्हणतांना अगोदर आलक, पालक घेतल्याशिवाय किल्ला घेतांच येणार नाहीं असें त्यांचें वर्णन केलें तें ऐकून मुसलमानांनीं प्रथम या टेंकड्या सर करून वंदन घेऊन चंदनावर चाल केली अशी दंतकथा आहे. त्यांत सत्यांश असो वा नसो, परंतु आलक, पालक टेंकड्यावरून वंदनवर जाण्यास सोपा मार्ग आहे ही गोष्ट सत्य असल्यानें दंतकथेस पुष्टी मिळते. हल्लींच्या काळीं राज्यरक्षणाला किल्यांचे मदतीची अपेक्षा राहिली नसल्यानें, सरकारनें या व यासारख्या अनेक डोंगरी किल्यांकडे दुर्लक्ष करून त्यांचें वैभव नष्ट करण्यास मदतच केली आहे असें मानण्यास हरकत नाहीं. गतकालीं राज्यवैभवाला विशेष महत्व असल्यानें श्री शिवप्रभूच्या ताब्यांत जवळजवळ साडेतीनशें किल्ले चांगल्या दुरुस्त स्थितींत होते, श्री शिवाजीनेंच १११ एकशें अकरा नवे किल्ले बांधिले अशी माहिती उपलब्ध झालेली आहे. यावरून हल्लींच्या व्यापारी राज्यकर्त्यांचें धोरण जसें समुद्राचें स्वामित्व आपणांकडे पूर्णत्वानें राहिलें असतां हिंदुस्थानांतील लूट परदेशीं नेण्यास हरकत पडूं नये अशा विचारांचें आहे, तसें त्या कालीं नव्हतें. त्यावेळीं आमच्या भरतखंडाच्या ऐश्वर्याला ओहोटी लागलेली नव्हती, स्वराज्य असल्यामुळें स्वराज्यांतील प्रत्येक व्यक्तीचा आत्मा स्वराज्याचे ऐश्वर्यांत भर घालण्यासाठीं, हल्लींच्या राज्यकर्त्यांचा शक्य तितकी संपत्ती दूर नेण्यासाठीं जसा हर प्रयत्नानें तळमळत असतो, तसा किंबहुना त्याहूनही जास्त तळमळत होता हें निर्विवाद आहे. याला कारण तें " स्वराज्य " होतें; एवढेंच सांगितल्यानें भागणार आहे.

---


# अभिनव काव्यमाला भाग ३

या पुस्तकाची दुसरी आवृत्ति छापून विक्रीस तयार आहे. किं. १ रु. ट. ह. व व्ही. पी. खर्च निराळा.

म्यानेजर—चित्रशाळा प्रेस, पुणें.

# दीनोद्धार.

( ले० गुणवंत रामचंद्र देशपांडे, बाळापूर. )

मागील अंकावरून समाप्त.

**प्रवेश ३ रा,**

( मुरलीधर प्रवेश करतो. )

मुरलीधरः—ह्या मुरलीधराच्या आयुष्यांतला हा आजचा मोठा क्रांतीचा दिवस आहे ! इतके दिवस त्या गोकर्णाच्या नादान छोकऱ्या बरोबर चैनींत काढले. त्याची एकदमच कसर निघणारशी दिसते. काल तर अगदीं कळस झाला ! माझ्या हातीं कळसूत्री बाहुल्याप्रमाणें वागणाऱ्या बाळासाहेबांनीं काल कळशीभर दारू पिऊन मला न कळत घरांत धुडगूस घातला. आणि त्याच वेळीं आमचा शक संपून त्यांचें मैत्रीचें सूत्र तुटण्याचा योग स्पष्ट दिसूं लागला. मौजेनें जलक्रीडा करतांना मगरानें अचानक पोटांत घ्यावें त्याप्रमाणें त्यांच्या वडिलांना व्यापारांतल्या सट्ट्यानें गट्ट केलें. इटलींत एका काळीं ज्वालामुखी पर्वताच्या स्फोटाच्या तडाक्यांत सांपडून गडप झालेल्या एका रमणीय नगराप्रमाणें त्यांची अवस्था झाली. त्यांची नटवी श्रीमंती 'हार्टडिसीज' होऊन तडकाफडकी गतप्राण झाली. अर्थातच आतां बाळासाहेबाशीं दोस्ती ठेवणें शक्य नाहीं. बरोबरच आहे. मृच्छकटिक नाटकांत पद आहे:—

कुसुम समय संपतां । तरुंचा । मधुकर करि कां आश्रय त्यांचा ॥ ध्रु० ॥ प्रियजन आमुचा निर्धन झाला काय असे तो कामाचा ॥ १ ॥

जाऊं द्या. आपलें होईल सहज गाणें आणि गांवातल्या बायकांना वाटेल पिलचा पोंगा झाला. चार वाजले आणि धांवतील बिचाऱ्या नळापाशीं घागरी घेऊन, नळाला पाणी येण्याची वेळ झाली म्हणून ! थोडक्यांत सांगावयाचें म्हटलें म्हणजे बाळासाहेबांचा आतां कायमचा निरोप घेतला पाहिजे ! आमच्या बाळासाहेबांचे आम्ही जिगरजान दोस्त ! 'दे आपणांस असतां व्यसनीं त्यजीना' ह्या कव्युक्ति बरहुकूम माझीं सर्व व्यसनें त्याला बहाल करून त्याच्या प्रत्येक ऐषारामांत भाग घेतला. आमचें चरित्र तर पुसूंच नये. चांगल्या गुळगुळीत आर्टपेपरवर सोनेरी अक्षरांत तें छापावें. एखादा विद्वान् जसा एखाद्या विषयाच्या अगदीं खोल जाऊन दृढ अभ्यास करतो आणि त्यांत प्रवीण होतो, त्याचप्रमाणें आम्हीं अभ्यासाखेरीज सर्व विषयांत पारंगत झालों. 'अल्पारंभः श्रेयस्करः' या धोरणानें बिडीचा आरंभ शाळेंतल्या पाण्याच्या खोलींतच केला. त्याच वेळीं काळ्या सुगंधी तपकीरीच्या चुटक्यांचीही लज्जत घेतली बिडीचे आणि सिगारेटचे सर्व प्रकार करतलामलकवत् आणि मुखोद्गत् ! काळा, पांढरा, पिवळा, हिरवा धागा ओढला तेव्हां त्याबद्दल कोणाला धागादोरा सुद्धां लागूं दिला नाहीं. गुंडाप्पा नरसाप्पा पासून तों थेट बुड्ढा पटका इत्यादि छाप, तोंडांत छापलेले रेडलँप पाहून आमची व्यसनाची गाडी कांहीं थबकली नाहीं. रेल्वे, नैझाम, थ्री कॅसल, हॅवग्रे, ग्लाब्स नेव्हीकट आणि शेवटीं सीझर ओढून धूम्रपानांत ज्युलियस सीझर सारखा पराक्रम केला. नामर्दासारखी कात्रींत मान नाहीं कातरून घेतली ! चिरूट ओढणें रुटीन होऊन बसलें. अशींच सर्व

व्यसनांची गोष्ट. भांग म्हणूं नका, गांजा म्हणूं नका, अफू म्हणूं नका, चरस म्हणूं नका ! आपला नं. पहिला ! जास्त काय सांगावें—पण जाऊं द्या 'आपण आपण करी स्तुती तो एक मूर्ख' हींच व्यसनें बाळ साहेबांना लावून त्यांच्या बरोबर चैन केली, पैशा हात मारला. 'सन्मित्र लक्षण असें वदतात जाण पण धुम्रसृष्टींतील खरी देवता निःसंशय 'गुडगुडी' हिंदुस्थानांत जुन्या वैभवाची ती मूर्तिमंत साक्ष आहे खरा बादशाही थाट आणि मिजास आहे तींत टेलीफोनची कल्पना तर प्रथम ह्या गुडगुडीवरू सुचली असावी असा माझा होरा वहातो. ना तरी आमच्या जुन्या पुराणांत अग्निरथ, विमानें व हल्लींपेक्षां एकूण सुधारणांचा उल्लेख आहेच. आम हिंदूंना तरी नवें असें कांहींच नाहीं. तसाच हा प्रक असावा. हिमालयाच्या कैलास शिखरावर ठेवलेल गुडगुडीशीं खुशाल रामेश्वरास बसून गुजगो बोलाव्या. मी तर माझ्या पहिल्या मुलीचें नांव गु गुडीच ठेवणार आहे. ( समोर दूरवर पाहून ) बाळासाहेब येत आहेत. आतां मात्र खरा आ बाणीचा प्रसंग आहे. ह्याला निष्ठुरपणें कसा नि द्यावा हें मोठें कठीण आहे. असो. एखाद्या म त्म्याला साजेसें मनोधैर्य दाखवून हा मायेचा प तोडला पाहिजे आपण जर एकाच श्रीमंताशीं चिकटून बसलों तर त्यांच्या विपदावस्थेंत आप विनाकारण दम कोंडून प्राण उखडावयाचा. श्र राच्या स्वार्थीपणानें एकाच कमळाच्या आश्रय मग्न झालों तर भाग्याचा दिवस उजाडेपर्यंत त्यांत कोंडून रहावें लागेल !

( बाळासाहेब येतात. )

मुरलीधरः—( साष्टांग नमस्कार ) भले बहाद्द खूप केलीत, बाळासाहेब. काय म्हणावें ह्या प्रक राला ! अरे इतका गाफिलपणा तुझ्या अंगीं असे अशी कल्पना नव्हती मला. काय हें आडम वर्तन ! दारूं काय प्यालास, वरांत गोंधळ क घातलास. इतका तूं व्यसनी झाला असशील असें नव्हतें वाटलें मला. व्यसनांनीं मनुष्य असा नादान होतो. अशानें आमचें नांव मात्र तुझ्या संगतींत बदनाम व्हावयाचें. तूं तर श्रीमंतच आहेस, पण माझ्या गरिबाच्या आयुष्याचा मात्र तुझ्या सोबतींत नाश झाला. बाबारे, तुझीं व्यसनें, तुझ्या चैनी लखलाभ असोत तुला. मी आपला गरीब माणूस आहें.

बाळासाहेबः—मुरलीधर दोस्त, अशा पडत्या काळांत तूं मला सोडतोस कां रे ? तुझ्या सल्ल्याशिवाय आणि शिकवणीखेरिज मी कधीं एक पाऊल तरी टाकलें कां ?

मुरलीधरः—म्हणजे ? मी तुला व्यसनें लावलीं होय ! भले शाबास ! अरे तूंच मजवर उलटलास मी तुला व्यसनें लावलीं ? ठीक आहे बुवा. पण मी म्हणतों अंगांत तर मी तुझ्या आलों नव्हतों ना ? दारूच आली होती, असो. मी आतां तुला सोडतोंना ! आतां निर्व्यसनी हो.

बाळासाहेबः—मुरलीधर, तूं माझें काळीज आहेस ! तुला कसा सोडूं !

मुरलीधरः—मी तुला सोडतोंना, म्हणजे तूंही सुटशील,

बाळासाहेबः—नकोरे असा निष्ठूर होऊं. मी आतां कंगाल झालों आहें. आमची सर्व संपत्ति सट्ट्याच्या व्यापारांत गेली !

मुरलीधरः—जायचीच ती ! गांवाला जायला निघालेल्या मनुष्याचें मुक्कामाला पोंहोचल्याबद्दलचें पत्र आलें म्हणजे जसें मोठें आश्चर्य नाहीं, तसाच हा प्रकार. बाबारे ! पोटांत दारू सांठविणारी निर्जीव बाटली सुद्धां अखेर व्यसनापायीं रिकामी होते. मग आपली काय कथा ! मग आतां तर नकोच तुझी सोबत. लोक म्हणतील माझ्या संगतीनें तूं बिघडलास म्हणून. वास्तविक पहातां मला गरीबाला कशाला सट्टी अगर जुगार ठाऊक. मी तर असें ऐकलें कीं,

वासमा ३४३८



पोलीसांत देखील तुझें नांव गेलें म्हणून. बाळासाहेब ! हें काय ! तुझें नांव काय ! गांव काय ! तूं काय मी काय ! व्यसनें काय ! तुझा बाप कोण ! तूं त्याचा कोण ! मी तुझा कोण ! आणि पोलीसची चलाखी कोण ! छेः छेः छेः कोण आणि काय च्या ह्या वारा-वावटळींत माझें गरीबाचें घरकुंड मात्र पार आकाशांत गिरक्या घेत रहावयाचें.

बाळासाहेबः—मुरलीधर ! तुझ्यापुढें माझी मान आहे, वाटेल तर ती कापून टाक; पण असा आधार सोडूं नकोस हनुमानानें रामचंद्राला जशी मदत केली तशी मला करावयाची सोडून टाकून जातोस ! 'कठिण समय येतां कोण कामास येतो.' हेंच खरें !

मुरलीधरः—बाबारे, हा व्यसनाचा परिणाम ! आतां तरी सावध हो. मला मात्र तूं फार बुडविलेस मला वेळींच सावध होऊन तुला सोडलेंच पाहिजे.

बाळासाहेबः—शपथेवर सांग. तूं मला व्यसनें लावलींस कीं, मी तुला लावलीं? मुरलीधर ! मी जर प्रथम तुझ्या मिष्ट भाषणाला भुललों नसतों तर मी इतका खास बिघडलों नसतों. क्षमा कर. 'मधु तिष्ठति जिव्हाग्रे हृदये तु हालाहलम्' ह्या म्हणीचा प्रत्यय तूं मला उत्तम प्रकारें आणून दिलास !

मुरलीधरः—बाळासाहेब,—आतां कसचा साहेब—बाळाभाऊ किंवा गोकर्णाच्या मूर्ख पोरा बाळ्या ! सर्कशींत हिंस्र पशूंचा खेळ पाहून अरण्यांतल्या मोकळ्या श्वापदांशीं लगट करूं पहाणें किती बेअक्कल-पणाचें कृत्य आहे ! आम्हाला असतील कदाचित् व्यसनें ! पण तीं सर्कशींतल्या क्रूर पशूंप्रमाणें आमच्या पुढें दीन होऊन पाळलेल्या कुत्र्याप्रमाणें आमचे पाय चाटतात. तुझ्या सारख्या पोराला तीं फाडून खातील. बस्स. पुरें झालें. सोड आतां आमचा पिच्छा. तुम्ही आतां बाभळीचीं फुलें ! ना सुगंध ना शोभा ! आम्हाला काय फायदा आणि माझ्यासारखा सोबती तुझ्या बापाला तरी काय पसंत पडणार आहे ! त्या चढेल थेरड्यानें—तुझ्या मगरूर बापानें त्या गरीब सुमतिलाल नांवाच्या विद्यार्थ्याचा काल सकाळीं काय पण प्राणउतारा केला ! तो गेला बिचारा हें गांव सोडून दूर कोठें तरी रहायला. मास्तर बिचाऱ्याबद्दल किती हळहळत होते ! ही श्रीमंतीची एट ! ठीक आहे येतों आतां नमस्कार.

( जातो. )

बाळासाहेबः—अरेरे सर्वजण पैशाचे साथी. आतां मला पूर्ण पश्चात्ताप झाला. पण उपयोग काय? एकदां तीर सुटल्यावर परत येत नाहीं. इलाज नाहीं. सोन्यासारखी वेळ निघून गेली. मी मूर्ख राहिलों. हाय ! हाय !!

× × ×

## प्रवेश ४ था.

( सुमतिलाल प्रवेश करतो. )

सुमतिलालः—तें गांव सोडून ह्या गुजराथेंत यावयाला आज बरेच दिवस झाले. इतके दिवसांत माझ्यांत किती फरक पडला. आजच्या ह्या दीनो-द्धाराच्या मायाळू आणि गोड स्वभावामुळें दिवस किती उत्साहाचे आणि मौजेचे चालले आहेत. दिवसाच्या श्रमाचें कांहीं वाटत नाहीं. सुधा-गडाला असतांना त्या रा. ब. गोकर्णाकडे गेलों तो दिवस आठवला म्हणजे माझ्या श्वान-वृत्तिबद्दल माझी मलाच लाज वाटूं लागते. केतकीच्या दाट वनांत मस्त सुगंधानें मस्त होऊन धुंद घालेले भुजंग संचरत असतां एकाद्या थकलेल्या प्रवाशाला क्षणमा-त्रच तेथें श्रमपरिहारार्थ विश्रांती येण्याची घातकी इच्छा व्हावी, तद्वत् लक्ष्मीच्या राज्यांत याचनेच्या आशेनें मीं पाऊल टाकलें आणि तेथील एका जहरी सर्पाच्या फूत्कारानें मी करपून गेलों. परमेश्वराच्या दरबारचा न्याय पाहून मात्र मति कुंठित होते. सद्गुणी माणसाच्या भोंवतीं विपत्तीचा गराडा आणि दुर्गुणी माणसांना लोळावयास पराचा बिछाना असला प्रकार जिकडे तिकडे दिसतो हें गूढ आहे,

( दीनोद्धार प्रवेश करतो )

दीनोद्धार:—ह्याला कारण मंजुळ वाणीनें रिझविणाऱ्या पोपटासारख्या सुंदर पक्षालाच रसिक लोक पिंजऱ्यांत कोंडतात. कावळ्याकडे कोणी ढुंकूनही पहात नाहींत. ते चैनींत खुशाल फिरतात उडतात. पण सुमति, पुन्हा पुन्हां आतां गेल्या गोष्टींबद्दल विचार करीत बसण्यांत काय अर्थ ! ईश्वरानें तुला हा दिवस दाखविला त्याबद्दल त्याला धन्यवाद दे.

सुमतिलाल:— दीनोद्धार, सुधागडला त्या दिवशीं गोकर्णाच्या घरून निराशेनें बाहेर पडल्यावर मला तुम्ही जर तात्बडतोब आश्रय दिला नसता आणि त्याच दिवशीं तुमच्या बरोबर ह्या गुजराथेंत मी आलों नसतों तर आजचा हा असा दिवस मला उगवला नसता ! त्या गोष्टीला आठ महिने झाले. प्रसंग गेला. पण आठवण ताजी आहे. माझ्या कातड्याचे जोडे केले तरी तुमचे उपकार जन्मोजन्मीं फिटणार नाहींत. माझे खरे उद्धारकर्ते तुम्ही आहांत.

दीनोद्धार:—पुरे कर माझी स्तुती आतां. अरे वेड्या, ' खरें मधुर हें विषयस्तवन सेविता माजवी ' देवानेंच तें सेवावें. '

सुमतिलाल:—दीनोद्धार, जगांत दगडी कोळशासारख्या क्षुल्लक काळ्याकुट्ट वस्तूच्या धुराचे दिवे चंद्रज्योतीशीं स्पर्धा करतात हें जितकें खरें आहे, तितकेंच तुमच्या सारख्या समाजांत हलका समजला जाणाऱ्या पेशाच्या माणसांतही एखाद्या साधूस साजेसें सत्व वसत असतें, हें सत्य आहे. दीनोद्धार तुम्ही एखाद्या खानावळीचे मालक आहांत हें एखाद्याला खरें तरी वाटेल कां ?

दीनोद्धार:—सुमति, पेशावरून मनुष्याच्या शीलाची कल्पना करण्याची आपल्याकडील प्रवृत्तिच मुळीं चुकीची आहे. यःकश्चित् गारगोटी, पण तिच्यांत विद्वानाची दृष्टी साफ करण्याचें सामर्थ्य आहे. उद्योग परब्रह्म स्वरूप परमेश्वर आहे ! जगांत तेहेतीस कोटी देवांपैकीं निरनिराळ्या देवाला भजणाऱ्या भिन्न भिन्न व्यक्तींनीं एकमेकांना कमी दर्जाचे लेखणें मूर्खपणाचें नाहीं कां ? भक्ति हें मुख्य तत्त्व सर्वांच्या हृदयांत एकच आहे. रंकाचा राव किंवा नगराचें सगर होणें ही काल—करणी आहे. तुला इतके दिवसांची एक गुप्त गोष्ट सांगतों त्या दिवशीं रात्रीं सुधागडला कंदिलाजवळ तुला पोलीस शिपायाच्या वेषांत भेटलेला चोर तो मीच !

सुमतिलाल:—( आश्चर्यानें ) काय म्हणतां ! छेः कांहीं तरी सांगतां झालं.

दीनोद्धार:— नाहीं. खरोखरच तो चोर, तो मीच. चोर म्हणजे कांहीं मोठा अजब प्राणी असतो असें का तुला वाटतें. अरे, वरून तुकारामासारखा दिसणारा मनुष्य सुद्धां कधीं कधीं काळ्या घोर रात्रीं घरांच्या छपरांवरून हिंडतांना आढळतो. जें चमकतें तें नेहमीं सोनेंच नसतें. असो, त्या दिवसापासून मी तो धंदा सोडला. दुर्दैवानें मी कांहीं जास्त शिकलों सवरलों नाहीं म्हणून हा हॉटेलाचा धंदा करावा लागला. त्या दिवसापासून मी तुझ्या पाळतीवरच होतों. गोकर्णाकडे जाऊन कांहीं उपयोग होणार नाहीं हें मी तुला अगोदरच सांगितलें होतें. तुला करवेल तितकें सहाय्य करावयाचें असा मीं निश्चयच केला. सुधागड सोडून ह्या गुजराथेंत यावयाचें हेंच कारण. जेथें एकदां अप्रतिष्ठा झाली तेथें रहाण्यांत मग मौज नसते. म्हणून तुला मजबरोबर येण्याचा आग्रह केला.

( इतक्यांत रा० ब० गोकर्ण आणि बाळासाहेब गरीब वेषांत प्रवेश करतात. )

रा० ब० गोकर्ण:—( त्यांच्या जवळ येऊन. ) महाराज गरीबासाठीं एखादी चाकरी आपल्याजवळ आहे कां ? पहा दया येत असेल तर.

दिनोद्धार:—( सुमतिलालास ) अरे हे तर तुझे रा. ब. गोकर्ण दिसतात. आणि दुसरे ह्यांचे चिरंजीव! आतां गंमतच करतों. ( उघड ) हां हां हें काय रावबहादूर इकडे ह्या दूरच्या प्रदेशांत आपण कोणी-

फडे ? इकडे कांहीं कौन्सिलच्या कामकाजासाठीं आलां कीं काय ?

गोकर्णः—आपण मला ओळखलें! हाय ! हाय !! कोणी ओळखूं नये म्हणून तर इतक्या दूर आलों, शेवटीं फजीती थोडीच चुकणार ! आपण मला ओळखलें ! पण आपण माझ्या परिचयांतले दिसत नाहीं.

दीनोद्धारः—साहजीक आहे ! जॉर्ज बादशहांना त्यांच्या तसबीरींहून जग ओळखतें. पण एखादा नंदीबैल रावसाहेबांना ते थोडेच ओळखणार आहेत? थोरामोठ्यांचीं लक्षणें आहेत हीं.

बाळासाहेबः—(दीनोद्धाराचे पाय धरून) आम्हीं तुमच्या पायां पडतों. आम्हाला लाजवूं नका. आमचें सट्टयाच्या व्यापारांत दिवाळें निघालें. आम्ही कवडीस महाग झालों. जिकडे तिकडे आमची छीः थूः झाली. सर्व कुटुंबासुद्धां आम्हीं देश सोडला. आपण महाराष्ट्रीय दिसला म्हणून तांतडीनें आपल्या-जवळ आलों. मला आणि माझ्या बाबांना नौकऱ्या द्या व अन्नाला लावा. आतां आम्हीं आधींच लाजेनें मेलों आहोंत. मेलेल्यावर शस्त्र उगारण्यांत काय मौज आहे ! आमची धुंदी उतरली. आपल्यापुढें हजारदां लोंटांगणें घालण्यास आम्हीं तयार आहोंत.

दीनोद्धारः—ठीक आहे. माझ्या हॉटेलचे हिशोब ठेवण्यास मी तुम्हांस ठेवतों.

गोकर्णः—शरमेची गोष्ट. मला लिहितां वाचतां येत नाहीं.

दीनोद्धारः—वाहवा ! मग तुम्हीं सरकारांत आणि व्यापारांत कशीं आजपर्यंत कामें केलींत हो? ठीक आहे. कांहीं हरकत नाहीं, ( सुमतिलालकडे बोट दाखवून ) यांना तुम्हीं ओळखलेंत कां ? फीच्या एक रुपयासाठीं जो विद्यार्थी आपणाकडे आला होता व ज्याला आपण अमेरिकेंतल्या स्वावलंबाच्या तत्त्वाची ओळख करून देऊन हांकून दिलें तेच हे गृहस्थ, यांचें नांव सुमतिलाल तुमचा उपदेश ऐकल्या-वर यानें नंतर कोणापाशीं तोंड वेंगाडलें नाहीं. प्रथम माझ्याजवळून १५ रु. उसने घेऊन त्या पैशाच्या भांडवलावर धंदा सुरू केला. ११ ते ५ शाळेंत जावें, दोनच्या सुट्टींत चहा विकावा, शाळेंतून आल्यावर रेल्वे स्टेशनवर ६ च्या मेलवर वर्तमानपत्रें विकावींत व नंतर रात्रीं ८ वाजेपर्यंत रॉकेल तेल विकावें असा यानें आज कित्येक दिवसांपासून शिरस्ता ठेवला आहे. एवढ्या अवधींत फुरसत मिळत नाहीं एवढा याचा धंदा वाढला आहे. उद्योगाशिवाय एक क्षणही याचा फुकट जात नाहीं. शाळेंतही नंबर पहिला !

गोकर्णः—सुमतिलाल, तुझा मी अत्यंत अपराधी आहे. मला क्षमा कर,

दीनोद्धारः—तें होईल पुढें सावकाश मग आपल्याला आमच्या सुमतिच्या हाताखालीं हीं कामें करावीं लागतील, आहे कबूल ? तुमच्या सर्व कुटुंबाला पोसण्याचें सुमति कबूल करील, सांगा मग पटकन्,

गोकर्णः—मला कबूल आहे. मी गरिबांचा उपहास केल्याबद्दल मला ईश्वरानें उत्तम शासन दिलें,

बाळासाहेबः—सुमति, तुझ्यासारख्याची संगत धरून मुरलीधरासारख्या वाईट माणसाच्या चैनी-साठीं केलेला खर्च जर तुला मदत करण्याकडे केला असतां तर त्या पुण्याईच्या बळावर आज असा दिवस कदाचित् आला नसतां, आतां तरी मला सन्मार्ग दाखीव.

दीनोद्धारः—रावबहादूरसाहेब, काळ हा सर्वां-वरच असतो. विपत्ती नळ, रामचंद्रप्रभु, युधिष्ठिरा-सारख्यांना चुकवितां आली नाहीं मग आपला काय पाड ! पण त्यांत एवढेंच कीं आपल्या वैभवकाळीं गरिबांना लाथाडलें कीं दैव आपल्याला लाथाडींत असतें !

वृक्ष फार लवती फळभारें ।
लोंबती जलद घेउनी नीरें ॥

थोर गर्व न धरी विभवाचा।
हा स्वभाव उपकार पराचा ॥१॥

आतां आलेल्या प्रसंगांत धैर्य धरून व समाधान मानून समज धरा, आपण कोणत्या कां उद्देशानें म्हणा सुमतिलालाला दिलेला धडा निःसंशय श्रेष्ठ दर्जाचा आहे. स्वावलंबन हाच एक पवित्र मार्ग प्रत्येकाला उन्नतिकारक व श्रेयस्कर आहे, हें त्रिवार सत्य आहे. एका फारशी कवींच्या दारिद्र्यावस्थेंत ईश्वरानें त्याच्या भक्तीवर संतुष्ट होऊन त्याला वर माग म्हणून विचारलें, त्यानें बाणेदारवृत्तीनें उत्तर दिलें, " तूं मजवर प्रसन्न झालास तर माझ्या रात्रींच्या लेखन वाचनाकरितां मला दिव्यासाठीं फक्त तेल तेवढें दे मला दुसरें कांहीं नको." स्वावलंबनाचें तत्त्व अंगीं बाणून घेऊन ज्या महात्म्यांनीं जगाला रम्यता आणली त्यांना आमचीं शतशः वंदनें असोत, अशीं श्रेष्ठ माणसेंच स्वतःचा खरा उद्धार करून आपल्या सारख्या दीन—दुबळ्यांना हातभार लावून त्यांचाही उद्धार करतात, दीनोद्धार हाच त्यांचा नंतर आवडता विषय होऊन बसतो. रावबहादूर हेंच खरें आयुष्याचें सार्थक आहे !

जे कां रंजले गांजले ।
त्यासी म्हणे जो आपुले ॥
तोचि साधू ओळखावा ।
देव तेथेंचि जाणावा ॥

## म्हणी व इतिहास.

लें०:-श्रीपाद बालकृष्ण देशपांडे. कुरोली—सिद्धेश्वर—सातारा.

आपल्या नेहमींच्या बोलण्यांत किती तरी म्हणी येतात. त्यांतल्या त्यांत पुरुषापेक्षां बायकांच्या बोलण्यांत—अर्थात् साध्या म्हणी—जास्त असतात. या म्हणींचा जर आपण बारकाईनें विचार करूं लागलों तर आपणांस अनेक प्रकारची माहिती होईल. कांहीं म्हणींवरून तत्कालीन राजकीय स्थिति कळते व कांहीं-वरून चालीरीती समजतात. कित्येक लोक म्हणींची योजना बोलण्यांत योग्य ठिकाणीं करितात परंतु त्या म्हणींची योजना सर्व अर्थ कळून केली जाते असें मात्र फार थोड्यांचें होतें. शिक्षकांनीं विद्यार्थ्यांला लहानपणापासून म्हणींच्या अर्थाकडे लक्ष घावयास लाविलें तर त्याचें भाषाज्ञान वाढेल, इतिहासाचें बरेंच ज्ञान होईल, कांहीं शब्दांची व्युत्पत्ति लावण्याची चिकित्सक बुद्धि येईल आणि भाषेंतील अलंकारिकपणा दृष्टोत्पत्तीस येईल. शिक्षकांना उपयुक्त होईल अशा कांहीं म्हणींविषयीं लिहिण्याचें आज योजिलें आहे.

बाजिराव पेशव्यांच्या दराऱ्यावरून कांहीं म्हणी प्रचारांत आल्या आहेत. आपल्याला एखाद्यानें धाकदपटशाई दाखवून कांहीं मागण्याचा प्रयत्न केला तर त्याला आपण म्हणतों '**तूं कोण मोठा बाजिराव लागून गेला आहेस ?**' या म्हणीवरून त्या वेळच्या राजेरजवाडे वगैरेंवर बाजिरावाचा इतका दरारा बसला होता कीं, बाजिरावानें एखादी वस्तू मागितली तर

नाहीं होय म्हणावयाची सोय नव्हती. त्यानें म्हटल्याप्रमाणें होतच होतें. **बाजिराव पडलास, बाजिरावचा बेत कीं नाहीं, अशी बाजिरावी उपयोगाची नाहीं,** अशा आणखीही बाजिरावासंबंधाच्या म्हणी आहेत.

**अरे! त्याच्या वागणुकींत कांहींच धरबंद राहिला नाहीं!** या म्हणीच्या मार्गे फार मोठा इतिहास आहे. तो सविस्तर इतिहास विस्तारभयास्तव देतां येत नाहीं, तथापि अगदीं थोडक्यांत सांगतों. निजाम जेव्हां कबूल केलेली खंडणी देईना, तेव्हां पेशव्यांकडून खंडणी देण्याबद्दल खलिता गेला. पेशव्यांचा काळे नांवाचा वकील निजामाच्या दरबारीं होता. त्याच्या मार्फत निजामानें असें कळविलें कीं, यंदा दुष्काळ आहे तेव्हां पुढच्या सालीं यंदाची व पुढच्या सालची सर्व रक्कम देऊं. पुढच्या सालीं याप्रमाणेंच कळविलें. निजामाच्या मनांत गुप्त रीतीनें तयारी करून पेशव्याचा मोड करावा असें होतें. ही तयारी अर्थात् काळ्याना न समजतां करावयाची होती, निजामाच्या सरदारांनीं जेवणासाठीं म्हणून एकत्र जमून हें कारस्थान कशा रीतीनें शेवटास न्यावयाचें याचा विचार करायाचा, काळे हा ब्राह्मण असल्यामुळें जेवणाच्या वेळीं त्या ठिकाणीं कसा जाणार? पेशवे, नानाफडणवीस वगैरे मंडळींना कांहींतरी कारणानें आपल्या राज्यांत आणून त्यांच्यावर हल्ला करून त्यांना मारावयाचे असें निजाम दरबारनें ठरविलें होतें. त्याप्रमाणें त्यांनीं काळ्यांच्या मार्फत पेशव्यांस कळविलें कीं, आमचे तुम्ही मालक, प्रभु आहांत तेव्हां आपले पाय एकदां आमच्या घरास लागावेत. त्याच वेळेस आपल्या खंडणीचा हिशेब करून तीही सर्व देऊन टाकूं पेशव्यांच्या विरुद्ध येथें कोणत्याही प्रकारचें कारस्थान नाहीं असें काळे हा वरचेवर नानाफडणविसास कळवीत असे. काळे यांच्या विषयीं नानास पूर्ण खात्री होती; तेव्हां यांत काळे येरें कांहीं नसावें अशी नानांची समजूत झाली. पेशवे निजामाच्या राजधानीजवळ येऊन उतरले. ठरल्याप्रमाणें ते थोड्या मंडळींसह भेटण्याच्या ठिकाणीं निघाले. इकडे पेशव्यांच्या आदरातिथ्याप्रीत्यर्थ सैन्यांची वगैरे सर्व व्यवस्था होत आहे असें बाहेरून दाखवीत होते. आमच्या हत्तीवर तुम्ही ( काळे ) व मी बसून पेशव्यांना आडवे जावयाचें असें निजामानें कळविलें. काळ्यांची सर्व हालचालीवर फार बारकाईची नजर होती तरी पण त्यांना कांहीं कपट दिसून आलें नाहीं. अंबारींत ज्या बाजूला काळे बसले होते त्याच बाजूकडे त्यांनीं आपले कांहीं लोक ठेविले होते. सतत माझ्या डोळ्याकडे पाहावयाचें अशी त्यांना ताकीद होती. निजाम व काळे बसलेला हत्ती निघाला. नेहमीपेक्षां जेव्हां निराळ्या प्रकारचीं वाद्यें वाजूं लागलीं तेव्हां व इतर हालचालींवरून कांहींतरी दगा आहे अशी काळ्यांची पूर्ण खात्री झाली. पण आतां हें या वेळीं पेशव्यांच्याकडे कळवावें कसें? त्या वेळीं काळ्यांनीं अंगरख्याचा बंद तोडून खालीं टाकिला व चाकरांस पेशव्यांकडे नेण्यास नेत्रानें खुणावलें. चाकरानें पळत जाऊन नानापाशीं तो बंद दिला. नानांनीं कांहीं तरी दगा आहे हें ओळखून पुढील व्यवस्था केली. अशा रीतीनें पेशवे व निजाम यांचे मध्यें जो धर ( वागण्याचा ठराव ) होता तो या बंदानें राहिला नाहीं. असा इतिहास "धरबंद राहिला नाहीं" या म्हणीच्या मागें आहे.

घोडा किंवा घोड्यासंबंधीं शब्द ज्यांत आहेत अशा म्हणींसंबंधानें विचार करून हा लेख पुरा करूं.

१ घोडा मैदान जवळच आहे.
२ अगदीं घोड्यावर बसून आला आहेसरे.
३ मग घोडं पेंड खातं कुठं?
४ तुझं काय मी घोडं मारलं आहे?
५ रडतराऊ घोड्यावर बसून काय उपयोग?
६ गंगेंत घोडे न्हाले.
७ गाशा गुंडाळला.
८ काय घोड नवरी झाली आहे हो.

९ जिथं तिथं याचं घोडं पुढं.
१० उगीच खोगीर भरती कशाला.
११ टांग मारिली.
१२ खूप घोडें दामटलें.
१३ वराती मागून घोडं.
१४ लगाम आपल्या हातांत पाहिजे.
१५ लहान आहेस का घोडा—घोडी.
१६ लागला घोड्यासारखा खिदळायला.
१७ तोब्रा भरला ( एकदम तोंड भरलें म्हणजे म्हणतात. )
१८ घोडी दिली ( शिक्षा करण्याचा एक प्रकार.
१९ घोडं मेलं ओझ्यानं आणि शिंगरू मेलं हेलपाट्यानें.
२० घोडचूक केलीस.
२१ गाडीला घोडी लाव.
२२ तंगबाज अंगरखा आहे.
२३ घोडं सजलं का ?
२४ घरचं झालं थोडं आणि जावयानं धाडलं घोडं.

याशिवाय विचार केला असतां आणखी घोड्यासंबंधाच्या पुष्कळ म्हणी सांपडतील. या म्हणींवरून पूर्वी महाराष्ट्रांत घोड्यांचा किती सुळसुळाट झाला होता तसेंच महाराष्ट्रियांच्या हाडींमासीं हा प्राणी किती खिळला होता हें दिसून येईल. इंग्लंडांत जितकीं माणसें आहेत तितकींच त्या देशांत घोडीं आहेत, याचप्रमाणें पूर्वी महाराष्ट्रांत घोड्यांची स्थिति होती हें सिद्ध होत नाहीं काय ? हल्लीं घोड्यांचें प्रमाण कसें पडेल हें ज्याचें त्यानेंच ठरवावें. काठीचा घोडा करून लहान मुलें अद्याप घोडा घोडा खेळतात यावरून काय सिद्ध होतें ? पावसाळा संपल्यानंतर प्रत्येक मराठा वीर आपलें घोडें सजवीत असे व सीमोल्लंघन करीत असे; आणि खरोखरीचें द्रव्य घरीं आणीत असे. हल्लीं सीमोल्लंघन कशा प्रकारचें होतें. व कोणतें सोनें आणलें जातें हें सर्वांना माहीत आहेच. धन्य ते मराठे वीर व धन्य तो त्यांचा पराक्रम असे उद्गार कोणत्या महाराष्ट्रियाच्या तोंडून निघणार नाहींत ? जोंपर्यंत ही मराठी भाषा आहे तोंपर्यंत म्हणींच्या द्वारें मराठ्यांचें नांव कायम राहाणारें आहे.

म्हणी व इतिहास यासंबंधानें नमुन्या करितां चार शब्द लिहिले आहेत. अशा इतर म्हणींचा शिक्षकवर्ग चिकित्सक बुद्धीनें अभ्यास करून विद्यार्थीवृंदास फायदा देतील अशी आशा आहे. शिक्षकबंधूंनीं या लेखाचा अंशतः जरी उपयोग केला तरी त्याबद्दल लेखकाला धन्यता वाटेल.*

* म्हणी याचा अर्थ या लेखांत थोडा निराळा घेतला आहे. म्हणी, वचनें, वाक्प्रचार वगैरेंच्या अर्थानें म्हणी हा शब्द योजला आहे.

विद्याधर वामन भिडे यांचें

**अर्थालंकाराचें निरूपण.**

किंमत १ रुपया. म्यानेजर—चित्रशाळा प्रेस, पुणें.

# कावळ्याची युक्ति.

आपल्यांपैकीं पुष्कळ लोक हल्लीं समईच्या ऐवजीं घासलेटच्या चिमण्या वापरतात. ह्या चिमण्यांकरितां ज्या वाती लागतात त्यासुद्धां आयत्या विणाऊ बाजारांतून विकत आणाव्या लागतात. कित्येक दिवसांनंतर अशा चिमण्यांतील वात आंखुड होते, आणि त्यांतील तेल थोडेसें कमी झाल्याबरोबर तें त्या वातीस पोंचेनासें होऊन ज्योत मंद होते, आणि चिमणी जाते. आयत्या वेळीं घरांत दुसरी वात असतेच असें नाहीं. अशावेळीं फजीतीचा प्रसंग ओढवतो. हातचें काम टाकून चिमणींत पुन्हां तेल घालण्याचा तर कंटाळा येतो, मग काय करावें !!

एकदां असाच प्रसंग माझ्यावर आला. तेव्हां त्या कावळ्याच्या गोष्टीचें मला स्मरण झालें, उन्हाळ्याच्या दिवसांत एका कावळ्याला फार तहान लागली. इकडे तिकडे पाण्याच्या जागा त्यानें पाहिल्या. पण त्याला कोठेंही पाणी दिसेना. इतक्यांत एका घराच्या गच्चीवर मातीच्या एका सुरईत त्याला पाणी दिसलें. पण तें अगदीं तळाशीं खोल होतें. चोंचीनें सुरई खालीं पाडण्याचा त्यानें यत्न केला. पण ती जड होती. ती फोडण्याचासुद्धां त्यानें प्रयत्न केला, पण ती बरीच जाड असल्यामुळें त्याच्यानें फोडवेना. इतक्यांत त्याला एक नामी युक्ति सुचली असावी असें दिसलें. तो तेथून उडाला आणि लागलीच एका क्षणांत तेथें परत आला. त्यानें आपल्या चोंचींत एक लहानसा दगड आणिला होता. तो त्यानें त्या सुरईत टाकला. असें त्यानें पुष्कळदां केलें, तेव्हां पाणी हळू हळू वर वर येऊं लागलें. शेवटीं तर तें पाणी सुरईच्या तोंडावर आलें, तेव्हां तें पिऊन त्यानें आपली तहान शांत केली आणि आनंदानें एकदां काका करून उडून गेला.

मींही असेंच केलें. चिमणीला तेल घालण्यासाठीं जें तोंड केलेलें असतें त्यांतून बरेच लहान लहान दगड तींत टाकिले. तेव्हां जणूं काय चिमणीचा तळच वर भरून आल्यामुळें, ती तेलानें कांठोकांठ अगदीं भरलेली असावी असें दिसलें. अर्थात नवी वात विकत आणण्याचें काम मला आणखी कित्येक दिवस सहज लांबणीवर टाकतां आलें, हें निराळें सांगायला नकोच.


कित्येक लोक अशा वेळीं चिमणींत थोडें पाणी ओततात, तें जड असल्यामुळें तळाशीं जातें, आणि तेल वर येतें. पण यदाकदाचित् जर वातीला पाणी लागलें तर दिव्याची ज्योत तडतडते आणि त्यामुळें आपणांस जास्त त्रास होतो. अशा रीतीनें आंखुड झालेल्या वातीभोंवतीं खालच्या बाजूस दुप्पट कापडाची एक जाड पट्टी जर बांधिली तरीही काम भागतें असा अनुभव आहे.

# राहूची तारांबळ.


कवि—[ विनायक रामचंद्र सुकेणकर. ]

पूर्ण चंद्रोदय पौर्णिमेस झाला ।
त्याच रजनीला ग्रहण–योग आला ॥
ग्रहण बघण्यातें कुणी जात होते ।
कुणी सज्जावरि राहिले उभे ते ॥ १ ॥
वृंद उल्हासित ग्रहण बघायातें ।
देखुनिया नृपतिच्या मना वाटे ॥
वदे भूपति एकदां जाऊं पाहूं ।
रजनिकांता ग्रासितो कसा राहू ? ॥ २ ॥
महीपतिचे सरदार, दास, दासी, ।
राज्ञि चंद्रमुखी निघे जावयासी ॥
सर्व सौधीं येउनी बैसलीं तीं ।
गोष्टि कथुनी कुणिकुणां तोषवीती ॥ ३ ॥
सृष्टि सुंदरिचें म्लान वदन पाही ।
भूप बोले मनिं कष्टि हो न बाई ॥
लिखित भालीचें प्रत्ययास येत ।
केविं प्रभुला तूं व्यर्थ दोष देत ? ॥ ४ ॥
मुदित होऊनी युवति उभी राहे ।
राहु गिळितो चंद्रास कसा ? पाहे ! ॥
शशी गिळण्यासी राहु त्वरें येई ।
स्तब्ध राही मनीं खिन्न तदा होई ॥ ५ ॥
करी व्योमीं वास्तव्य एक चंद्र ।
दुजा राज्ञीचा रम्य वदन चंद्र ॥
चित्र राहूच्या लोचनास भासे ।
म्हणे ऐसें अघटीत घडे कैसें ? ॥ ६ ॥
ग्रासु यातें कां ग्रासु अतां त्यातें ।
व्यग्र चिंतेमधिं रजनी संपली ते ॥
निशारमणीचा सखा सदनिं गेला ।
तदा सुंदरि परतली स्वगृहाला ॥ ७ ॥
दुजे दिवशीं पंडितां निमंत्रीलें ।
भूप येतां सर्वांहि नमन केलें ॥
सभेमाजीं पंडितां प्रश्न केला ।
योग ग्रहणाचा केंवि विफल गेला ! ॥ ८ ॥
असें परिसोनी सर्व स्तब्ध होती ।
तया प्रत्युत्तर देइना कुणी ती ॥
एक कविवर बोलला ऐक राया ।
कसा गेला तो ग्रहण-योग वाया ॥ ९ ॥
राहु चंद्रा ग्रासण्या त्वरें आला ।
निरखितांची आश्चर्य-मूढ झाला ॥
भ्रांत नयनांला इन्दुयुग्म भासे ।
हास्य विरलें मुखिं , होय मात्र हांसें ॥ १० ॥
राजदारा मुख–चंद्र भूतलीं कीं ।
दुजा विलसे शशि दिव्य व्योमलोकीं ॥
भ्रांत चित्तें गोंधळुनि राहु गेला ।
रजनि संगे विन्मूख तदा ठेला ॥ ११ ॥
चंद्रकांता तव प्रिया दिव्य बाला ।
मुग्ध सौंदर्यें नित्य दे सुखाला ।
तिचा मुखचंद्रचि इन्दु साह्य झाला ।
म्हणुनि ग्रहणाचा योग मुळीं नाला ॥ १२ ॥


# इंग्लंडांतील ठिकठिकाणचे फोटो.



इंग्लंडांतील वेस्टमिनिस्टर नांवाचा सुप्रसिद्ध राजवाडा.



पार्लमेंटांतील हाऊस ऑफ लॉर्ड्स.



पार्लमेंटांतील हाऊस ऑफ कॉमन्स.



कॉमन्स सभेतील मतें मोजण्याची जागा.



लॉर्डांच्या सभेतील मतें मोजण्याची जागा.

# ❀ जादूचा खेळ. ❀

आज रविवार होता. बाबूच्या शाळेला सुट्टी होती. बाबू आणि वसंत हे दोघे मित्र होते व ते जवळ जवळ रहात होते. वसंताला पाहून बाबू म्हणतो अरे वसंत, मी तुला एक जादूचा खेळ दाखवतों पाटी पेन्सील आण पाहूं. वसंतानें पाटी आणल्यावर बाबू म्हणाला:—पाटीवर तीन आंकडे लिही.

वसंत:—( ९२१ लिहून ) बरं पुढें !

बाबू:-ते आंकडे उलट करून पहिल्यांतून वजा घाल

वसंत:—( ९२१—१२९=७९२ ) केलें.

बाबू:—जी बाकी राहिली त्याचा पहिला नाहींतर शेवटचा आंकडा सांग.

वसंत:—शेवटचा आंकडा २ आहे.

बाबू:—मग तुझी बाकी ७९२ आहे.होय कीं नाहीं.

वसंत:—तूं कशी ओळखलीस !

बाबू:—बाकीच्या मधला अंक नेहमीं ९ असतो हें ध्यानांत ठेव. आणि पहिल्या व तिसऱ्या आंकड्यांची बेरीजहि ९ च असते. तेव्हां एक आंकडा कळाला कीं, सारी बाकी सांगणें सोपें जातें. शेवटचा २ आंकडा कळाल्यामुळें पहिला आंकडा ७ आहे. हें ९ तूंन २ वजा करून काढलें.

तुला समजली कां ही जादू !

वसंत:—हो हो चांगली समजली.

बाबू:—बरं आतां दुसरी एक अशीच मजा सांगतों. तुझ्या पाटीवर वाटेल तेवढी मोठी संख्या मांड. तिला ९ नें किंवा तिच्या कोणत्याहि पटीनें गुण.

वसंत:—(९७२६४×९=८७५३७६.) हं गुणलं.

बाबू:—त्या गुणाकारांतून वाटेल तो आंकडा काढून ठेव व बाकींची संख्या सांग.

वसंत:—७५३७६ हा माझा आंकडा आहे. सांग आतां कोणता आंकडा राहिला !

बाबू:—( विचार करून ) तुझा आंकडा ८ असला पाहिजे.


वसंत:—हो तोच. पण तूं तो कसा ओळखलास !

बाबू:—सांगतों एक. हीहि नवाचीच जादू आहे. तुला ठाऊक आहे कां ! कीं, नवांनीं गुणले तर जो गुणाकार येतो त्याच्या आंकड्याच्या बेरजेला ९ नींच भाग गेलाच पाहिजे. उदाहरणार्थ आपण वरील संख्याच घेऊं.

ती संख्या ८७५३७६ आहे. त्याची बेरीज ८+७+५+३+७+६=३६ म्हणजे नवांनीं भाग-जाणारी आहे. परंतु त्यांतून तूं ८ काढून घेतल्या. मुळें बेरीज २८ सच आली. तेव्हां ९ नीं भाग जाण्यास ८ ची कमतरता आहे असें मी ओळखलें व तुला सांगितलें. समजलना तुला हें ! चला आतां उशीर झाला.पुढील खेपस आणखी जादूचें खेळ करूं.

---

## डुक्कर, कोंबडी व कुत्रा.



एकदां डुक्कर, कोंबडी व कुत्रा प्रवासाला गेले होते. इतक्यांत उत्तरेकडून सोसाट्याचा वारा आला. आणि त्या वाऱ्यानें तिघांची तिरपीट उडवून त्यांना असें मिसळून टाकलें.

# दोघे चिक्कू.

आमचे वामनराव म्हणजे मोठे चिक्कू होते. ते आपले पोट एका पैशांत दोन वेळ भरत असत. ते ज्या गांवीं रहात त्याच गांवांत केशवरावहि रहात. केशवराव वामनरावापेक्षां शेकडों पटींनीं अधिक चिक्कू होते. वामनरावांनीं केशवरावांच्या चिक्कूपणाची कीर्ति ऐकली व ते त्यांना भेटण्याकरितां गेले. केशवरावांनीं त्यांना या बसा वगैरे म्हटलें. वामनराव खालीं बसले व म्हणाले " केशवराव, ईश्वरी कृपेनें माझ्याजवळ इतका पैसा आहे कीं, मी रोज अगदीं चैनीनें राहिलों तरी तो कित्येक हजार वर्षे पुरेल. पण मी रात्र आणि दिवस एका पैशावरच काढतो. त्यांत पाऊण पैशाची कणिक घेतों व पाव पैशाचें सरपण आणि गुळ आणतों. नंतर खूप पाणी पिऊन मी रात्रभर निजून रहातों." हें ऐकून केशवराव म्हणाले "तुम्ही फार मूर्ख आहां आणि उगीच फाजील खर्च करतां. मजजवळ जरी तुमच्या इतका पैसा आहे तरी मी असा खर्च करूं म्हणेन तर माझें दिवाळें निघेल. मी रोज एक पैसा व रुमाल घेऊन बाजारांत जातों एक पैशाची कणिक विकत घेतों. थोड्या वेळांनीं ती कणिक परत टाकतों व पैसा माघारी घेतों. त्या रुमालाला जी काय थोडी बहुत कणिक चिकटली असेल ती एका कोपऱ्यांत जाऊन झाडून एकत्र करतों. नंतर दुसऱ्या दुकानांत जातों तेथेंहि असेच करतों . अशा प्रकारें ५।५० दुकानांत हिंडून आल्यावर मजजवळ बरीच कणिक जमते. नंतर मी एखाद्या वाण्याजवळ जातों व त्याला थोडें मीठ दे म्हणून म्हणतों. तें मीठ व कणिक घेऊन मी नदीच्या कांठीं रस्त्यानें लांकडें गोळा करीत करीत जातों. नदीवर गेल्यावर मी कणिक पाण्यांत बुडवून त्याचे गोळे करतों व ते लांकडावर शिजवतों. नंतर ते शिजलेले गोळे घेऊन मी गल्लोगल्लीं हिंडतों व तुपाचा वास आला कीं एकेक गोळा तोंडांत टाकतों. मला रोट खातांना किती आनंद होतो. म्हणून सांगूं. तूं बेट्या मोठ्या नबाबी थाटानें रहातोस. तूं प्रती कर्णाचा अवतारच आहेस. वामनरावांनीं आपले दांत ओठ चावले व घरचा रस्ता पकडला.

---


# फळा.

शाळेंतील फळ्याचे ऐवजीं कापड. रुंदी ३० इंच दर वारास १ रु. हें कापड खरखरीत असून त्याजवर खडूनें उत्तम प्रकारें लिहितां येतें पाण्यानें पुसलें असतां कापड ओलें होत नाहीं.

म्यानेजर--चित्रशाळा प्रेस, पुणें.

# ❀ शालापत्रकाची चढाओढ. ❀

**मागील कोड्यांचीं उत्तरें.**

१ पेशावर २ लखनौ ३ गया ४ चिकोडी ५ मोगलसराई ६ रायचुर वगैरे. कंसांत बरोबर उत्तरें दाखविलीं आहेत.

१ शांताराम पुंडलीक नाईक (६)
२ एकनाथ सोपान टिकले (६)
३ गणेश कृष्ण कुलकर्णी (६)
४ विष्णू गंगाधर चंद्रात्रे (६)
५ गणेश आण्णाजी गोडबोले (६)
६ महादेव रामचंद्र मोटे (६)
७ वामन दाजी नांदेडकर (६)
८ पुरुषोत्तम दामोदर जोशी (६)
९ रामकृष्ण गोविंद धावळे (५)
१० महादेव वासुदेव सातारकर (६)
११ यमू रामचंद्र जोशी (६)
१२ रामचंद्र गणपत कंटक (५)
१३ रामचंद्र त्र्यंबक केनेकर (५)
१४ नागेश दत्तात्रय हर्डीकर (६)
१५ सि. वि. कूरणे (६)
१६ द. बी. जहागीरदार (५)
१७ दत्तात्रेय गणेश भागवत (४)
१८ कृष्णाजी रामचंद्र देशपांडे (५)
१९ दौलतराव बाळाजी देशमुख (५)
२० शां पुं. पाठारे (५)
२१ बि. ग. पोतदार (६)
२२ मधुसूदन आनंदराव चित्रे (५)
२३ पी. बी. टिपणीस (५)
२४ मनोहर बाळाजी सरवटे (४)
२५ केशव अनंत धुर्ये (६)
२७ सेक्रेटरी दत्त वाचनालय (३)
२८ बाळकृष्ण अनंत बाळे (६)
२९ शंकर खंडेराव पुरंदरे (४)
३० रामकृष्ण लक्ष्मण तनखीवाले (५)
३१ नेमासा सोनासा जैन (५)
३२ राम यशवंत नायक (५)
३३ एन्. जी. म्हात्रे (५)
३४ राजाराम बाबाजी पोतदार (५)
३५ दत्तात्रय त्र्यंबक घाटपांडे (४)
३६ मा. भा. जोगळेकर (४)
३७ वसंत वासुदेव वाचासुंदर (५)

**मुलांकरितां**

खालील चौघांकडून समाधानकारक उत्तरें आलीं.

१ मा. भा. जोगळेकर
२ शां. पुं. नाईक
३ बा. अ. बाळे
४ वसंत वासुदेव वाचासुंदर

**बक्षिसें,**

नं. ४ रासेलस
नं. ८ सुभाषित
नं. ११ अर्वाचिन महाराष्ट्र
नं. २१ निबंध लेखन आणि अनुवाद
नं. २५ विद्वत्व, कवित्व, वक्तृत्व

| कुपन<br>सर्वांकरितां<br>जानेवारी १९२४. | कुपन<br>मुलांकरितां<br>जानेवारी १९२४. |
|---|---|

### मुलांकरितां.

१ साक्रेटिस चरित्र
२ लक्ष्मीपूजन
३ चिमुकलें रामायण
४ ध्रुव व चिलिया

---

## नवीं कोडीं.

### सर्वांकरितां.

पुढील गोंधळांत एक म्हण आहे ती ओळखा:—

| | | | |
|---|---|---|---|
| बु | ऐ | जी | जी |
| वा | धं | भ | णि |
| दा | ज्या | ट | ह |
| बा | रा | ची | आ |

### मुलांकरितां

एका मुलाला मास्तरांनीं अभ्यास कां करून आला नाहींस याचें कारण विचारलें. त्यांनीं सबबी सांगितल्या. तुम्हाला सांगता येतात कां बघूं. त्यांच्या सबबींत नवीनपणा असेल त्यालाच बक्षीस मिळेल. सबबी ५ असाव्यात.

---

## चुटके.

मास्तर:--( मुलाच्या खांद्यावर हात ठेऊन ) अरे बाबा तुला पिशाच्चानें धरलं आहे असें मला वाटतें.

" होय मास्तर मलासुद्धां तसेंच वाटतं. "

× × ×

शिक्षक--जोगळेकर ! फळ्याकडे ये आणि कोणत्याहि तिकोणाच्या कोणांची बेरीज १८०° असते हें सिद्ध कर.

जोगळेकर:--काय करायची आहे सिद्ध करून ? मला कबूल आहे १८०° असते ती !

× × ×

एका विद्वान प्रोफेसर साहेबांनीं एकदां एका खेड्यांत व्याख्यान दिलें. सुमारें दोन तास घसा कोरडा केल्यावर ते श्रोत्यांना विचारतात " आतां कोणाला कांहीं शंका असली तर विचारावी "

इतक्यांत पाठीमागें बसलेला एक म्हातारा खोकून म्हणतो. " महाराज आपण दोन तास एवढी बडबड केलीत ती कशाकरतां ? एवढें सांगा.

× × ×

# जोडाक्षर-विरहित वाचनपाठ.

हें पुस्तक नुकत्याच अक्षर ओळख झालेल्या मुलांमुलींकरितांच लिहिलेलें आहे. पुस्तकांत एकंदर १७ गोष्टी अगदीं सोप्या भाषेंत, व एकाहि जोडाक्षर न येऊं देतां लिहिल्या आहेत. प्रत्येक गोष्टीचे आरंभीं कथानकाचें मूर्तिमंत चित्र दिलें असल्यामुळें गोष्ट वाचण्याचे अगोदरच त्यांतील सारांश मुलांचे सहज लक्षांत येतो. किं. अवघी चार आणे.

# उजळणीचें पुस्तक.

ह्यांत सर्व मुळाक्षरें चित्रयुक्त दिलीं असून मोडी व बालबोध बाराखड्या तयार करण्याची समजूत थोडक्यांत करून दिली आहे. नंतर मोडी व बालबोध सोपे शब्द मुलांना सहज ओळखण्यासारखे दिले आहेत. पुढें १० अंक सचित्र दिले असून त्यांबरोबरच मुलांस बेरीज व वजाबाकीची समजूत टिंबांच्या आकृतींनी व गोट्यांच्या चौकटीच्या सहाय्यानें घालून दिली आहे. नंतर पाढ्यांची समजूत दिली असून शेवटीं उजळणी दिली आहे. एकंदरींत हें पुस्तक नवीन तऱ्हेनें मुलांना शिकविण्यास फार उपयुक्त असें झालें आहे. कागद ग्लेज किं. ०।१।०६.

## लहान मुलांकरितां उपयुक्त अशीं पुस्तकें.

# नवी आवृत्ति ] सचित्र अक्षरबोध. [ नवी आवृत्ति

या पुस्तकांत ' अ ' पासून ' ज्ञ ' पर्यंत स्वर आणि व्यंजनें हीं सर्व निरनिराळ्या भपकेदार रंगांत व तें अक्षर नांवाच्या प्रथम अक्षरानें दर्शविणाऱ्या चित्रांसह दाखविलेलीं असून १ पासून १० पर्यंत अंकहि वरील पद्धतीनें दाखविलेले आहेत. पुस्तकाचा साईज क्राऊन चतुर्थांशाइतका मोठा ७×९ इंच ठेवला असल्यामुळें अक्षरें व चित्रें फारच सुबक व मोठीं अशीं झालीं आहेत. एकंदर पुस्तक इंग्रजींतील सचित्र रंगीत ए बी सी डी शिकण्यास उपयोगी अशा पुस्तकाच्या धर्तीवर तयार केलें असल्यामुळें हें पुस्तक लहान मुलांस फारच आवडून त्यावरून तीं आपला धडा सहज शिकतात. किं. ०।८.

# भाग १ ते ६ ] चिमुकल्या गोष्टी. [ भाग १ ते ६

ह्या गोष्टींत रोज व्यवहारांत घडणाऱ्याच गोष्टी दिलेल्या आहेत, पण त्या इतक्या मोहक, मनोरंजक व मार्मिक लिहिल्या आहेत कीं, त्या गोष्टींतील तत्त्वबोध गोष्टी वाचतां वाचतांच मुलांच्या मनावर सहज ठसला जातो. पुस्तक वळीक टाइपांत सुंदर जाड व ग्लेज कागदावर छापिलेलें असून प्रत्येक गोष्टीचे प्रारंभीं कथानकाचें सुंदर चित्र दिलेलें आहे. एकंदर ह्या गोष्टींचे सहा भाग आहेत. प्रत्येक भागांत दहा गोष्टी सचित्र आहेत। प्रत्येक भागास किं. ०।४.

**मिळण्याचें ठिकाण**—म्यानेजर–चित्रशाळा प्रेस, पुणें.

॥ ॐ नमः श्रीरामचंद्राय ॥

# आर्यमहौषधालय मु० पो० आंजर्ले.

**कोंकणप्रांतांतील अगदीं ताज्या व शुद्ध वनस्पतींचीं जगत्प्रसिद्ध निर्दोष व रामबाण औषधें.**

**कंदर्पमंजरी पाक**—हा अपूर्व पाक गरिबांपासून तों अमीरउमरावांपर्यंत सर्वांसही अत्यंत उपयोगी असून किंमत माफक ठेविली आहे. यांत मौक्तिक, प्रवाळ लोह, माक्षिक, कस्तूरी, अंबर इ० अत्युच्च गुणकारक पदार्थ असून शिवाय बदाम, पिस्ते, अक्रोड चारोळी, केशर, वेलची, पंजाबी सालममिश्री, सफेतमुसळी, पत्री, गोक्षुर, शतावरी, आस्कंद, वंशलोचन वगैरे (८०) उपयुक्त वनस्पति घातलया आहेत. यानें पथ्यावांचून गुण येतो. यापासून कोणत्याही कारणांनीं होणारा व कशाही प्रकारचा शुक्रस्राव, नपूंसकत्व, मूळव्याधि, रक्तदूषणामुळें त्वग्रोग, स्त्रियांची धुपणी व गर्भाशयस्थ दोष या भावना त्यांच्या एकंदर उपविकारांसह तत्काल बऱ्या होऊन धातुवृद्धि होते, व शरीर कणखर आणि तेजस्वी बनतें. २० तो० ड० २ रुपये. एकदम ३ डबे घेणारास ५ रुपये.

**स्वर्णधात्री तेल**—हें चारोळी, बदाम, कंकोळ, एला, बहुविध वनस्पतींचीं सत्वें व उपयुक्त तेलें अशा अनेक पदार्थांनीं बनविलें असल्यानें याच्या मर्दनापासून अपस्मार, उन्माद, वेड, चक्कर इ० रोगांस जलद आराम पडतो. केंसांस चोळल्यानें केंस काळे कुळकुळीत, तजेलदार, सडक लांब व मृदु होऊन मेंदु शांत आणि रोगरहित बनतो. यानें मस्तकाचें टक्कल जातें. हें अंगास चोळून स्नान करीत गेल्यानें शरीराचा दुर्गंध जातो. खरूज गजकर्ण, शिवें, तसेंच तळपाय, तळहात, डोळे व मस्तक यांचा दाह हे विकार खास बरे होऊन निद्रा चांगली येते, आणि नेत्ररोग दुरुस्त होतात. बा० किं० १। रु०

**दंतरक्षक पूड**—ही दांत व हिरड्यां यांचे सर्व विकार तत्काल दुरुस्त करून दांत स्वच्छ व मजबूत करण्यांत प्रतिज्ञेची आहे. ड. ६ आणे.

**सुरंगी, मालती, कल्हार, गुलबहार, दणाणा, लक्ष्मीविलास** इ० बादशाही अति उंची अत्तरें व त्याचप्रमाणें गुलाब, हिना, केवडा, चमेली, जाई वगैरे सुगंधी अत्तरें आणि केंसांस लावण्याचीं हरएक प्रकारचीं सुवासिक तेलें माफक दरानें पूर्ण खात्रीचीं मिळतील.

**सूचना:**—वरील औषधें व अत्तरें वगैरे पूर्ण खात्रीचीं असल्यामुळें आज पंचवीस वर्षांत त्यांचा लक्षावधि लोकांस अप्रातिम उपयोग झाला म्हणून त्यांचा नेहमीं फारच खप होत आहे. अनुभवानंतर पूर्ण खात्री पटेलच. औषधें माहितीचे खर्चासह रोखीनें अगर व्ही. पी. नें पाठवूं. प्याकिंग व टपाल खर्च वेगळा. घाऊक घेणारास कमिशन भरपूर. सर्व औषधांच्या आणि आरोग्यरक्षणाच्या माहितीचें सचित्र मोठें पुस्तक देऊं. आमचीं औषधें वगैरे मागविणें तीं खालील बिनचूक पत्त्यावर मागवावीं

**कृष्णशास्त्री बिवलकर, वैद्य.**

REGISTERED B. NO. 1799




# अनुक्रमणिका.

विषय.

विजेसंबंधीं १०० प्रश्नोत्तरें .... .... .... .... .... ....
सत्याचा जय .... .... .... .... .... ....
लेखनाचा पाठ .... .... .... .... .... ....
कालिदासाबद्दल एक दंतकथा .... .... .... .... .... ....
लंगडा मुलगा श्रीमंत कसा झाला .... .... .... .... .... ....
खुनी बेट .... .... .... .... .... ....
कुंकवाच्या करंड्याचें रहस्य .... .... .... .... .... ....
अठरापगड व्यापार .... .... .... .... .... ....
चुटका .... .... .... .... .... ....
चित्रांची गोष्ट .... .... .... .... .... ....
शालापत्रकाची चढाओढ .... .... .... .... .... ....
बोय किंवा बोयरा .... .... .... .... .... ....

मुद्रक व प्रकाशक—रा. रा. शंकर नरहर जोशी चित्रशाळा प्रेस १०१६ सदाशिव पेठ, पुणें सिटी.

# रंगीत इसाप-नीति.

ह्यांत एकंदर इसापनीतींतील आठ अगदीं सोप्या गोष्टी मोठ्या व जाड टाइपांत दिलेल्या असून प्रत्येक गोष्टीसमोर त्यांतील रहस्य दाखविणारें रंगीत सुंदर चित्र दिलेलें आहे. चित्रें पाहूनच मुलांना गोष्टींतील तात्पर्य कळतें. किं० ८६. ट, ह. ८८६.

# सचित्र इसाप-नीति.

[ उत्तरार्ध. ]

[ नवीन भाषांतर भाग २ रा. ]

वरीलप्रमाणेंच हा दुसरा भाग विक्रीस तयार आहे. ह्याची सुमारें ३०० पानें झालीं असून ह्यांत २५० गोष्टी आहेत. चित्रांची संख्या १५० पर्यंत आहे. किं. १८४

दोन्ही भाग एके ठिकाणीं बांधलेलें सुंदर पुस्तक किं० रु. २

# विद्यार्थ्यांकरितां नाटिका.

शीलं परं भूषणम्.

ही नाटिका प्रसिद्ध कवि-शिरोमणि नारायण वामन टिळक यांनीं केवळ लहान मुलांकरतांच लिहिलेली आहे. यांत शृंगाररस मुळींच नाहीं. एवढेंच नव्हे, तर स्त्रीची भूमिका या नाटकांत आणलेलीच नाहीं शिवाय नाटकाचा विषय नैतिक विचारानें पूर्ण भरलेला असल्यामुळें शाळांतून वार्षिक संमेलनाचे वेळीं मुलांकडून ह्या नाटकाचा प्रयोग करविण्यास तें योग्य आहे. नाटकाचा विषय धनाची योग्यता जास्त किंवा ज्ञानाची योग्यता जास्त हा आहे. पुस्तकांत चार सुंदर चित्रें कथानकास अनुसरून दिलेलीं आहे. किं० ८४.

म्यानेजर--चित्रशाळा प्रेस, पुणें.

# चिमुकलें भारत व रामायण.

महाभारत व रामायण हे आपले राष्ट्रीय ग्रंथ आहेत, यांत आपला प्राचीन इतिहास असून प्रपंच साधून परमार्थ कसा जोडावा हें उत्तम दाखविलें आहे. व्यावहारिक बोधाच्या ह्या केवळ खाणी आहेत. आबालवृद्ध स्त्री-पुरुषांना या ग्रंथांचें ज्ञान होणें अगत्याचें आहे. प्रौढांकरितां आमचीं लोकप्रिय 'भारती युद्ध' व 'रामचरित्र' हीं पुस्तकें आहेत. आतां बारातेरा वर्षांच्या मुलांमुलींकरितां चिमुकलें भारत व चिमुकलें रामायण हीं दोन पुस्तकें अनुक्रमें आम्हीं रामकृष्णबाबुधेचे प्रसिद्ध लेखक रा. कृष्णाजी गोविंद किनरे व रा. विद्याधर वामन भिडे बी. ए. यांजकडून मुद्दाम लिहविलीं आहेत. पुस्तकाची भाषा फारच मोहक व सोपी आहे वाचतांक्षणीच मुलांच्या मनावर त्यांतील रहस्य ठसावें म्हणून उपदेशपर वाक्यें जाड टाइपांत घातलीं आहेत. आणि ऋग्वामकांच्या अनुरोधानें हाफटोन प्रोसेसनें तयार केलेली भारतांत आठ व रामायणांत सात अशीं सुंदर चित्रें घातलीं आहेत. भारताचीं पृष्ठें १७२ व रामायणाचीं पृष्ठें ८२. छपाई बांधणी सुबक. किं० ८६, व रामायण किं० ८४.

म्यानेजर--चित्रशाळा प्रेस, पुणें शहर.

मराठी
# बालपत्रक

येथें शब्द नाहीं शिष्यासीं । हें अवघें सद्गुरूपाशीं ।
सद्गुरु पालटी अवगुणांसी । नाना यत्नें करोनी ॥
जें कांहीं आपणास ठावें । तें हळु हळु शिकवावें ।
शहाणें करून सोडावें । सकळा जनां ॥ १ ॥

—रामदास.

पुस्तक ३५. फेब्रुवारी सन १९२४. अंक २

## विजेसंबंधीं १०० प्रश्नोत्तरें.

**विद्युत् म्हणजे काय?** निसर्गाच्या आद्य शक्तीला विद्युत् म्हणतात.

**तिचा शोध कोणी लावला?** इ. स. पूर्वी ६०० वर्षांच्या सुमारास थेल्स नांवाच्या एका माणसानें विद्युन्मय अँबर (एक समुद्रकांठीं सांपडणारी वस्तु) भेंडाचे व बुचाचे तुकडे उचलतें असें पाहिलें.

**विद्युत् सर्वत्र आहेत कीं काय?** प्रत्येक वस्तु धन व ऋण विद्युत्‌ची बनलेली आहे. आपण रासायनीक किंवा यांत्रीय शक्तीनें वीज उत्पन्न करूं शकतो.

**विज कोठून येते?** ती सर्वत्र आहे. ज्या विजेच्या योगानें गाडी चालते, किंवा दिवे लागतात ती वीज डायनेमो नांवाच्या यंत्रानें उत्पन्न होते. वीज घर्षणानेंहि उत्पन्न होते. कांचेची नळी जर रेशमावर घासली तर वीज उत्पन्न होते. हवेंत नेहमीं वीज खेळत असते.

**वीज दिसते काय?** विद्युत् ही एक अदृश्य व स्तब्ध असणारी शक्ती आहे. तिचा परिणाम दिसतो. विजेच्या ठिणग्या व कडकडाट ऐकूं येतो.

**विजेचे प्रकार किती आहेत?** वीज दोन प्रकारची आहे. एका प्रकाराला स्टॅटिक म्हणतात. ती घर्षणानें उत्पन्न होते. त्यामुळें तिला घर्षणजन्य विद्युत् म्हणतां येईल. दुसऱ्या प्रकारला व्होल्टीक म्हणतात. ही वीज डॉयनेमोपासून किंवा बॅटरीपासून तयार होते.

दोन्ही प्रकारच्या विजेचें धन व ऋण असें भाग आहेत व ते सम प्रमाणांत उत्पन्न होतात.

**या दोन विजांत फरक काय?** स्टॅटिक (घर्षणजन्य) वीज ही वहात नाहीं. ती जागच्याजागींच उत्पन्न होते. व्होल्टिक वीज प्रवाही आहे. तीचा प्रवाह वाटोळा फिरतो धन

विद्युत् एका दिशेनें जाते व ऋण विद्युत् दुसऱ्या दिशेने जातें.

**वीज वाटेल त्यांतून वाहू शकते काय ?** कांहीं पदार्थांतून ती जाऊ शकत नाहीं. पण तारा टाकल्या म्हणजे प्रवाहास हरकत होत नाहीं.

**विजेचा वेग आपल्या ताब्यांत राहू शकतो काय ?**

हवेंतून वहाणाऱ्या वीजेच्या लहरांचा वेग कमी करतां येत नाहीं. पण तारांचा आकार व इतर पुष्कळ गोष्टींनीं वीजेच्या प्रवाहांत कमी जास्तीपणा होतो.

**वीज कशी करतात ?** एक पदार्थ दुसऱ्या पदार्थावर घासला कीं वीज तयार होते. टेंबुरणीची कांडी कोटावर घासली तर ती कागदाच्या चिटोऱ्या उचलते व्होल्टीक विद्युत् धातुवर रासायनिक क्रिया केली कीं, उत्पन्न होते

**विद्युत् प्राणघातक आहे काय ?**

आपल्या शरीरांतून विजेचे मोठे प्रवाह गेले किंवा मोठे प्रवाह जात असलेल्या तारेला हात लावला तर ती प्राणघातक होते.

**आकाशांतील वीज व ही वीज एकच काय ?**

वरील वीजेचा चकचकाट म्हणजे ढगांतून पृथ्वीवर आलेली घर्षणजन्य विद्युत् होय.

**विद्युत् वाहक कशाला म्हणतात ?**

ज्यांतून वीज जातें त्याला विद्युतवाहक म्हणतात. धातु या विद्युत्‌वाहक आहेत. पाणी हें विद्युत् वाहक नाहीं. पण त्यांत मिठासारखा पदार्थ टाकला कीं, तें विद्युत् वाहक होतें. लांकूड, स्लेटपाटी हे विद्युत् वाहक नाहींत.

**आकाशांतील विद्युतवाहक कोणते ?**

एखाद्या इमारतीवर धातुची दांडी ठेवली तर ती प्रवाह नेते. म्हणजे ती हवेंतील घर्षणजन्य विद्युत् आकर्षून घेते व तिला इमारत पाडू देत नाहीं.

**वीज तयार करण्याचें साधें यंत्र कोणते ?**

या यंत्राला इलेक्ट्रोफोरस म्हणतात. या यंत्रांत राळेची किंवा टेंबुरणीची ताटली असते, धातूची एक तबकडी असते, व त्या तबकडीला दूर असा एक दांडा असतो. त्या ताटलीवर रेशमानें घासले म्हणजे ती विद्युन्मय होते व धातूच्या तबकडींत वीज सांठवली जाते.

**वीजेची ठिणगी कशामुळें होते ?**

हवेचा विरोध नष्ट केल्यामुळें प्रवाही वीजेची ठिणगी उडते.

**इन्शुलेटर कशाला म्हणतात ?** वीज निघून जाऊ नये म्हणून तिच्या गतीला अडथळा करणारी जी वस्तु तिला इन्शुलेटर म्हणतात. वीजेच्या तारेभोंवतीं जे गटापर्चाचें वेष्टन असतें तें हें काम करतें.

**विरोध कशाला म्हणतात ?**

यंत्रामध्यें घर्षणानें जशी उष्णता उत्पन्न होते तशीच वीजेंत वीरोधानें उष्णता उत्पन्न होते तारेमध्यें विरोध जितका जास्त असतो, तितका प्रवाहाच्या गतीला अडथळा येतो. या अडथळ्यामुळें उष्णता उत्पन्न होते.

**एखादी वस्तु विद्युन्मय झाली आहे हें कसें ओळखावें?**

सारख्या जातींच्या विजा एकमेकांना दूर लोटतात. इलेक्ट्रोस्कोप नांवाच्या लहान यंत्रानें विद्युन्मय वस्तु ओळखतां येते एका धातुच्या दांडीला दोन सोन्याची पानं लावतात विद्युन्मय वस्तु जर या दांडीच्यावर जवळ नेली तर तीं पानें एकमेकापासून अलग होतात, कारण त्यांच्यावर एकाच प्रकारच्या विजेचा परिणाम होतो. यावरून त्या वस्तूंत वीज आहे असें सिद्ध होतें.

**विद्युन्मय वस्तू दुसऱ्या वस्तू जवळ नेली तर काय होते ?**

विद्युन्मय वस्तू दुसऱ्या वस्तूंत विजेचा संचार करते व दोघांतहि सारखी वाटणी होते.

**दमट वस्तूचा विजेवर काय परिणाम होतो ?**

दमट पदार्थ घर्षणजन्य वीज एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं नेतो. दमट हवेंतून वहाणारा प्रवाह कमी होतो.

**विजेचा धक्का कां बसतो ?**

कारण आपले स्नायू एकदम आंखडतात.

**लेडनजार कशाला म्हणतात ?**

हें एक कांचेचें भांडें असून यांत घर्षणजन्य विद्युत् सांठविली जाते. त्याच्या आंत व बाहेर पत्र्याचें वेष्टन ईंच दोन इंचा पर्यंत असतें. त्याच्यावर एक धातुचा गोळा बसवतात व आंत पितळेची नळी सोडतात. हें भांडें लेडनसाहेबांनीं शोधून काढलें. या भांड्यांत जर वीज सोडली व जर वरच्या गोळ्याला हात लावला तर विजेचा धक्का बसतो.

**लोहचुंबक कशाला म्हणतात ?**

लोहचुंबक हा लोखंडाचा तुकडा असून त्याच्या अंगीं इतर लोखंडी पदार्थ ओढून घेण्याची शक्ती असते.

**लोडस्टोन कशाला म्हणतात ?**

आशियामायनरमध्यें एक लोखंडाचा अशुद्ध तुकडा सांपडला. त्या लोखंडांत लोहचुंबकाचे धर्म होते. या अशुद्ध तुकड्याला लोडस्टोन म्हणतात. हा शुद्ध स्वरूपाचा लोहचुंबक होता. याची माहिती १२०० वर्षांनंतर चिनी लोकांना झाली

**या लोडस्टोनमध्यें ही शक्ती कोठून आली ?**

पृथ्वी थंड होतांना ही शक्ती त्यांत आली.

**विजेनें लोहचुंबक कसा तयार होतो ?**

विजेचा प्रवाह एखाद्या तारेंतून गेला तरी त्या तारेभोंवतीं लोहचुंबकाचें क्षेत्र तयार होतें.

**विजेचा लोहचुंबक कशाला म्हणतात ?**

एका लोखंडाच्या दांडीभोंवतीं पुष्कळ तारा गुंडाळल्या व त्यांतून विजेचा प्रवाह घालविला कीं, विजेचा लोहचुंबक तयार होतो.

**पृथ्वी लोहचुंबक आहे काय ?**

पृथ्वी हा एक मोठा लोहचुंबक आहे. त्याला उत्तर व दक्षिण अशीं दोनदोन टोकें आहेत. हा फार प्रचंड लोहचुंबक आहे.

**लोहचुंबकाची शक्ती पृथ्वीच्या टोंकावर सांठवलेली असते कीं नाहीं ?**

लोहचुंबकाच्या टोंकावर लोहचुंबक फार मोठ्या प्रमाणावर असते. नालाच्या लोहचुंबकाच्या टोंकांवर शक्ती असते. मध्यें नसते. पृथ्वीच्या साऱ्याभागाभोंवतीं ही शक्ती फिरत असते.

**लोहचुंबक आपणाला करतां येतो काय ?**

होय. एका लोहचुंबकानें पुष्कळ लोहचुंबक बनतात. लोहचुंबकावरून सुई फिरवली तर ही शक्ती त्यांत येते. पोलाद एकदा लोहचुंबकमय झालें म्हणजे तें तसेंच कायम रहातें. पण लोखंडांतील शक्ती थोड्या वेळानीं जाते. लोखंडाखेरीज इतर धातु फारशा लोहचुंबकमय होत नाहींत.

**लोहचुंबकांना नालाचा आकार कां देतात ?**

नालाच्या आकारामुळें दोनही टोंकें जवळ येतात, आणि लोहचुंबकाच्या शक्तीमुळें त्यांच्यामध्यें अंतर रहात नाहीं.

**आर्मेचरमुळें लोहचुंबकाची शक्ती कायम कशी राहते ?**

आर्मेचर हा लोहचुंबकांच्या टोंकांजवळ ठेवलेला लोखंडाचा लहान तुकडा होय. या तुकड्यामुळें लोहचुंबक उपयोगांत नसतां त्याची शक्ती नष्ट होत नाहीं.

**होकायंत्राचें तत्त्व काय?** एका लोहचुंकाचे उत्तर टोंक दुसऱ्या लोहचुंबकाचें दक्षीण टोंक आकर्षून घेतें. सुईचा लोहचुंबक जर आपण केला आणि ती सुई मध्यभागीं दोरा बांधून जर आपण अधांतरीं ठेवली तर तिचीं टोंकें पृथ्वीच्या लोहचुंबकमय टोंकाकडे आकर्षिलीं जातील. हेंच लोहचुंबकाचें तत्त्व

होय. पोलादाची लोहचुंबकमय सुई एका दांड्यावर ठेवतात व ती दक्षिणोत्तर फिरत राहते.

**विजेचा प्रवाह कशाला म्हणतात ?**

एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं जी धन विद्युत् जाते त्याला प्रवाह म्हणतात तारेच्या एका टोंकांत जर जास्त धन विद्युत् सांठली तर ती तेथेंच न थांबतां पुढें जाऊं लागते, त्या गतीला प्रवाह म्हणतात.

**बॅटरी कशाला म्हणतात ?**

विद्युत्प्रवाह ज्या रासायनिक योजनेनें सुरू होतो त्याला बॅटरी म्हणतात. मिठाच्या पाण्यांत एक जस्ताचा तुकडा व एक तांब्याचा तुकडा बुडवला म्हणजे सगळ्यांत सोपी बॅटरी तयार होते. तांबें जस्तापेक्षां अधिक विद्युन्मय होतें. म्हणून त्यांत धन द्रव्य असतें व जस्तांत ऋण द्रव्य असतें. जस्त व तांबें एका तारेनें जोडलें तर प्रवाह सुरू होतो

**सेल कशाला म्हणतात ?**

सेल म्हणजे बॅटरीसारखी योजना होय. बॅटरी मध्यें पुष्कळ सेल्स असतात व ती अधिक वीज उत्पन्न करतात.

**सेलमध्यें काय होतें ?**

पाण्यामधील रासायनिक द्रव्यानें दोनही धातुचे तुकडे हळू हळू झीजतात. वीज जी उत्पन्न होते, ती या झीजण्यामुळें उत्पन्न होते.

**वीज सेलसमधून जाते काय ?**

जेव्हां दोन्ही धातू तारांनी जोडण्यांत येतात तेव्हांच वीज उत्पन्न होते. सारी सेल्स झिजतात व नवे धातुचे तुकडे त्यांत घालावे लागतात.

**डॅनिअल्स सेल कशाला म्हणतात ?**

हे सेल तारायंत्राकरितां उपयोगांत आणतात. यांतील तांबें सल्फेट ऑफ कॉपरमध्यें बुडवतात. जस्ताची दांडी ज्यांतून पाणी निघून जाईल अशा छिद्राच्या भांड्यांत सल्फ्युरिक ॲसिडमध्यें असते.

**बायक्रोमेट सेल कशाला म्हणतात ?**

एका भांड्यांत सल्फ्युरिक ॲसिड व बायक्रोमेट ऑफ पोटॅश घालून त्यांत जस्ताच्या व कारबनच्या तबकड्या बुडविल्या म्हणजे वरील सेल तयार होतें.

**लेकान्शी सेल कशाला म्हणतात ?**

ह्या सेलचा उपयोग सर्वत्र करतात. कार्बन, जस्त व सॅलमोनाईक द्रव असलें कीं, हें सेल तयार होते.

**बन्सेन सेल कशाला म्हणतात ?**

नायट्रीक ॲसिडमध्यें कार्बनचा तुकडा बुडवतात व जस्ताचा तुकडा सल्फ्युरिक ॲसिडमध्यें बुडवतात व हें सेल तयार करतात.

**कोरडें सेल कशाला म्हणतात ?**

लेकान्शी सेलमध्यें असलेल्या द्रवांत भुसा मिसळला म्हणजे हें सेल तयार होतें. यांतलि पातळ पदार्थ या कृतीनें सांडत नाहीं. म्हणून याला कोरडें सेल म्हणतात.

[ अपूर्ण ]

विद्याधर वामन भिडे यांचें

# अर्थालंकारांचें निरूपण.

किंमत १ रुपया. म्यानेजर--चित्रशाळा प्रेस, पुणें.

# सत्याचा जय.



फार प्राचीन काळची गोष्ट. आपल्या या देशांत श्वेतपूर म्हणून एक गांव होतें. त्या गांवांत एकदां एक जादूगार आला. त्यानें गांवाबाहेर एक जादूचा किल्ला हवेंत उभा केला होता. तो किल्ला पहाण्यांस दूर दूरचे लोक येत असत. त्या जादुगाराची कीर्ति चहूंकडे फैलावली. एकदां राजकन्या स्वतः तो किल्ला पहाण्यास आली. ती एका सुंदर घोड्यावर स्वार होऊन आली. तो किल्ला पाहून तिला फार आश्चर्य वाटलें. राजकन्येच्या स्वरूपाकडे पाहून तो जादूगार मोहीत झाला व त्यानें तिला पकडून त्या किल्ल्यांत नेले. तो किल्ला खालीं वर होत असे व हवेंत थांबत असे. राजकन्येला नेत असतां पुष्कळ लोकांनीं पाहिलें, पण त्या जादुगाराची भीती वाटल्यामुळें कोणी पुढें गेला नाहीं. राजाला ही बातमी समजली त्याबरोबर तो तेथें आला. पण राजकन्येला त्या दुष्टाच्या हांतून कशी सोडवावी हें त्याला कळेना. त्यांनीं आपलें लष्कर तेथें आणलें, व त्या किल्ल्यावर हल्ला करण्यास सांगितलें. तथापि लष्करांतील सैनिकांपैकीं, कोणाचीच गती तेथपर्यंत होईना. अखेरीस कंटाळून राजा म्हणाला "जो माझ्या मुलीला खालीं आणील त्याच्या बरोबर तिचा विवाह करून देईन" हें ऐकून पुष्कळ तरुण मंडळींनीं प्रयत्न करून पाहिले; पण त्यांचीही तीच अवस्था झाली.

त्या तरुणांमध्यें एक हुशार माणूस होता. तो रात्रीच्या वेळीं तेथें आला. त्यांनीं वर पाहिले व आपले बाण तेथपर्यंत जातील कां नाहीं याचा विचार केला. दहा पांच बाण फेंकल्यावर आपला बाण वर गेला असे त्याच्या लक्षांत आले. त्या बाणाच्या मागच्या टोंकाला त्यांनीं रेशीम व एक पत्र बांधलें होतें.

तो दुष्ट माणूस रात्रीच्या वेळीं झोपीं गेला होता. राजकन्या आपली यांतून कशी सुटका होईल याचा विचार करीत होती. इतक्यांत तिला कांहीं वर येऊन पडलें असा भास झाला. जवळ जाऊन पहातें तों तें पत्र व रेशीम. तीनें तें रेशीम लगबग खालीं सोडलें. त्या तरुणांनीं त्या रेशमाला अधिक बळकट दोरा बांधला व तिला वर ओढून घेण्यास सांगितला. असें करतां करतां राजकन्येच्या हातांत मोठा दोर लागला. त्या दोराला धरून राजकन्या खालीं उतरली. पण एवढ्यानें त्या तरुणाचें समाधान झालें नाहीं. त्याला त्या राक्षसाला ठार मारावयाचें होते म्हणून त्यांनीं राजकन्येला खालीं उभी करून वर चढण्यास सुरवात केली. दरम्यान एक दुसरा तरुण त्या ठिकाणीं आला व राजकन्येकडून सारी हकीगत समजून घेऊन त्या दोरीला आग लाऊन राजाकडे घेऊन गेला. पहिला तरुण वर आल्यावर तो त्या जादुगाराच्या अंगावर चालून गेला तो जादुगार झोपेंतून उठून त्याच्याबरोबर लढूं लागला. थोडावेळ झटापट झाल्यावर या तरुणानें त्याच्या अंगावर एक अचुक बाण सोडून त्याला ठार मारले. त्याला दोराला आग लागलेली दिसल्यामुळें खालीं कसें उतरावें हें समजेना. तथापि तो बुद्धिमान असल्यामुळें निराश झाला नाहीं. त्यानीं त्या किल्ल्याची चाकें फिरवून पाहिलीं व त्याची गती समजावून घेतली. अशा प्रकारें त्या किल्ल्याला त्यानीं खालची गती देऊन जमिनीवर पाय टेकलें. या कृत्याला दोन चार दिवस लागले. इकडे राजानें आपल्या मुलीचें म्हणणें न ऐकतां ज्यानीं तिला सोडवून आणले, त्यालाच देण्याचें ठरविलें, ताबडतोब मंडप उभारण्यांत आले व लग्नाची तयारी करण्यांत आली. लग्न लागण्याचा दिवस व वेळ जवळ येऊन ठेपली. इतक्यांत हा तरुण तेथें आला, त्याला पहातांच राजकन्येनीं त्याला ओळखलें. तोतया तरुण घाबरून पळून जाऊ लागला. अशाप्रकारें ज्यानें तिला खरोखर संकटांतून सोडविले होते त्याच्या बरोबर तिचा विवाह होऊन जिकडे तिकडे आनंदी आनंद झाला.

# लेखनाचा पाठ

आमचा केशव म्हणजे मोठा वात्रट मुलगा. मास्तरनीं एखादी गोष्ट सांगितली आणि त्यानीं केली असें कधींच व्हावयाचें नाहीं. आज शनवार होता. शाळा सकाळची. त्यामुळें मास्तरनाही एक प्रकारें वेळ घालवावयाला मोकळीक. पहिल्या तासाला उजळणी काढून झाल्यावर मास्तरनीं मुलांना आपलीं दप्तरें सोडावयाला सांगितली. थोडा वेळ खर्डे गिरवणें झाल्यावर पुस्त्या काढण्याची वेळ आली.

दोन चार पुस्त्या पाहिल्यावर मास्तर केशवाकडे आले आणि म्हणाले:—

" केश्या ! कायरे हे कुत्र्याचे पाय काढले आहेस आज वर्षभर सारखे अक्षर गिरवतोस तरी तुला धड एक अक्षरहि काढतां येऊं नये !"

" मास्तर ? मला कुठें कारकुनी करायची आहे ? मला काय करायचे आहे चांगलें अक्षर ? परवा आमच्या इतिहासाच्या सरनीं सांगितलें कीं, एवढे मोठे शिवाजी राजे पण त्यांना मुळीं लिहीतांच येत नसे. मग शिवाजीपेक्षां मी मोठा आहे कीं नाहीं ? मला लिहीतां तरी येते ; मास्तर ! परवा आमचे बाबा म्हणत होते कीं, यंदाच्या कॉंग्रेसचे अध्यक्ष-कुठलेसे मद्रासचे रहाणारे आहेत, पण त्यांचे अक्षर त्यांनाच वाचतां येत नाहीं. ' आप लिखे खुदा बाचे ' अशी त्यांची स्थिति तेव्हां मास्तर उगाच रागावूं नकाइं ! नाहीं आलं आम्हाला चांगलं लिहीतां म्हणून काय झालें ? "

मास्तर— " तूं फार वात्रट मुलगा आहेस. कुठें शेंबडा तूं आणि कुठें शिवाजी महाराज. फारच शहाणा झाला आहेस. म्हणे कॉंग्रेसच्या अध्यक्षाचें अक्षर वाईट आहे. तूं हो तसा मोठा म्हणजे मग तुझें अक्षर वाईट असलें तर चालेल. हं तो पहा चे चा फाटा चुकला. आतां जपून काढ. नाहींतर मानेवर छडाच ठेवतों पहा. "

इतक्यांत मास्तर गोविंदाकडे गेले, गोविंदा, म्हणजे सरळ मुलगा. तो म्हणाला " मास्तर, माझें अक्षर चांगलें नाहीं मी काय करूं "

मास्तर—" गोविंदा असं पहा. तुम्ही गणीत शिकतां. एखादें गणीत चुकलें म्हणजे ज्याप्रमाणें तुम्ही गणीत करायला नालायक ठरत नाहीं, किंवा शब्दाचें स्पेलिंग चुकलें म्हणून कुचकामीं होत नाहीं, तसें लेखनाचे नाहीं. एकदां लेखनाकडे दुर्लक्ष केलें आणि हाताला वाईट वळण मिळालें म्हणजे लेखन कधींच सुधारत नाहीं. तेव्हां लेखनाकडे लक्ष देणें हें पहिलें कर्तव्य आहे. "

केशव—" त्यांत काय मोठें सांगीतलेत मास्तर ! मी तर मान मोडून लिहीतों; पण कुत्र्याच्या शेपटी-प्रमाणें माझें अक्षर आपले वाकडें तें वाकडेंच. मास्तर हें लेखन आतां सोडून दिलें तर नाहीं कां चालणार ? आतां छापण्याची आणि टायपिंगची कला निघाली आहे. काय करायचे अक्षर चांगलें असून ? पुर्वीं ह्या कला नव्हत्या म्हणून चालते बोलते छापखाने लागत, आतां या कारकुनशाहीला विचारतो कोण ? कुठें नौकरीला गेलों तर टायपिंग येतें कां म्हणून विचारतात. तेव्हां मास्तर हेडमास्तरना सांगून ही लिहिण्याची ब्याद काढून टाका बुवा ? "

" छे छे ! मास्तर, हा केशव कांहीं तरीच सांगतो.

उद्यांपासून हेडमास्तरना सांगून सहाहि तास लेखनाचे ठेवायला सांगा, आणि असा नियम करा कीं, प्रत्येकानें येतांना बरोबर दोन दस्ते कागद, बारा लेखण्या, दोन चाकू, एक शाईची बाटली व टीप कागदाचें एक बंडल घेऊन यावें व जातांना हें सारें सामान खपलें आहे असें दाखवून घरीं जावें. म्हणे लेखनाचें तास नकोत. वहावारे शहाणा ? अरे उद्यां कोठेंच जमले नाहीं तर आपल्या मास्तर सारखा लेखणी बहाद्दर होऊन खर्डे तरी घासशील. ”

मास्तर खुप संतापले पण करतात काय. हेडमास्तरनीं त्यांनीं दोन दिवसापूर्वीं एका मुलाला बेदम मारल्याबद्दल ताकीद दिली होती. तेव्हां ते तोंडानीं काय तो पट्टा सोडीत होते.

इतक्यांत जोगळेकर म्हणतो “ वहावारे ? शहाणा ! तुझ्या लेखनाला विचारतो कोण ? मी या इंग्रजी तिसरींत कोणत्याहि लेखनाच्या परिक्षेंत पास न होता आलो आहे. म्हणे सहा तास लेखन शिकवावे. अरे ! या सगळ्या मुंबई शहरांत हिंड आणि कोणा श्रीमंत मनुष्याचें अक्षरावांचून अडले आहे तें दाखीव. आपण लिहिलेले आपल्याला वाचतां आलें म्हणजे झालें. ”

मास्तर म्हणाले “ मुलांनो ! तुमची थट्टा पुरी झाली. मी सांगतो तेवढें लक्षांत ठेवा. हें पहा चांगलें नसणें हें जरी श्रीमंतीच्या किंवा विद्वत्तेच्याआड येत नसलें तरी तें एक भूषण आहे. चांगलें अक्षर पाहून मनाला आनंद वाटतो व त्या मनुष्याविषयीं प्रेम उत्पन्न होतें. जगांत सार्‍या सुस्वरुपी स्त्रीया नाहींत म्हणून जगाचें अडलें आहे असे थोडेंच आहे. परंतु त्यांच्या दर्शनानें जसा आल्हाद वाटतो तसा अक्षरानें हि वाटतो. तेव्हां कित्त्याकडे लक्ष देऊन, अक्षराविषयीं काळजी बाळगून, जर आपण लिहींत गेलों तर आपलें नांव कायम राहील. तेव्हां लेखनाकडे लक्ष देत जा व मोठेपणाच्या अनुषंगिक ती गोष्ट आहे हें ध्यानांत बाळगून चांगलें अक्षर काढा.

---

# कालीदासाबद्दल एक दंतकथा.

( **लेखकः**– नागेश दत्तात्रय हर्डीकर, कर्‍हाड. )

कविश्रेष्ठ कालीदास श्रीकालीमातेच्या कृपेनें इतक्या उच्च दर्ज्याच्या पायरीवर आपल्या कवित्वशक्तिमुळें चढला ह्याबद्दल एक दंतकथा आहे ती अशीः—

“ पूर्वीं एका राजाला एक अत्यंत सुंदर व अतिशय विद्वान अशी एक कन्या होती. तिला कोठेहि तिच्या तोडीचा अनुरूप वर न मिळाल्यामुळें तिचा बाप अत्यंत कंटाळला व दुसरे दिवशीं सकाळीं जो मुलगा त्याचे प्रथम दृष्टीस पडेल, त्यास आपली मुलगी देण्याचा त्यानें निश्चय केला. राजानें आपल्या मुलास राजकन्या न दिल्यामुळें त्याचा प्रधान फार रागावला होता व त्यानें दुसरे दिवशीं सकाळीं एक ब्राम्हण गाई पाळणारा मूर्ख मुलगा झाडाची फांदी धरून वर चढण्याचा प्रयत्न करीत होता त्यास राजापुढें प्रथमच उभें केले. राजानें पूर्वीं जाहीर केल्याप्रमाणें आपली कन्या त्या मूर्ख ब्राह्मणपोरास दिली. रात्रीं राजकन्या शयन गृहांत गेल्यावर त्या आपल्या नवर्‍याचा मूर्खपणा व अजागळपणा तीस दिसून आला, व तिनें कांहीं लाजलज्जा व भिडभाड न धरतां आपल्या नवर्‍याची अत्यंत कठोरपणें कानउघाडणी केली. तिच्या नवर्‍यास अत्यंत खेद झाला व तो एका गहन अरण्यांत गेला व तेथें त्यानें श्रीकालीमातेची तपश्चर्या केली. कालीमातेनें प्रसन्न होऊन त्यास अलौकिक कवित्वशक्ति दिली. नंतर तो तेथून राजधानीस परत आपल्या बायकोकडे आला. ”

---

# लंगडा मुलगा श्रीमंत कसा झाला.

१७३० मध्यें जोशिया वेजवुड नांवाचा मुलगा इंग्लंडमध्यें जन्मला. त्याला १२ भावंडें होतीं. त्यांच्या आईनें या साऱ्या मुलांचीं पुष्कळ जोपासना केली पण गरीबीमुळें त्यांना शिक्षण मिळालें नाहीं.

लहानपणीं जोशी याला देवीचा आजार झाला. व त्याच्या पायांत कांहीं दुखणें होऊन त्याचा पाय कापावा लागला. याचा बाप याच्या नवव्या वर्षींच वारला. याचा बाप कुंभाराचा धंदा करीत असे. जोशियाला बापाच्या मृत्युमुळें शाळेंतून काढून धंद्यांत गुंतविण्यांत आले. त्यांनीं वयाच्या चौदाव्या वर्षापर्यंत या धंद्यांतील साऱ्या खुब्या अवगत करून घेतल्या. दुसऱ्या मुलांप्रमाणें याला नाचतां बागडतां येत नसल्यामुळें सारखे कारखान्यांतच बसून रहावें लागे. त्यामुळें थोरल्या भावापेक्षां हाच त्या धंद्यांत वाकबगार झाला. त्याचा भाऊ त्याला चांगल्या तऱ्हेनें वागवीत असे असें नाहीं. तो त्याला खाऊपिऊ घाली पैशाचा त्याला विटाळ होत नसे. कुंभाराचें चाक सारखें फिरवावें लागल्यामुळें त्याचा पाय अधिक दुखे. वयाच्या अठराव्या वर्षीं त्याची आई वारली. त्यामुळें ह्याचें सर्वांना ओझें वाटूं लागलें.

त्या सुमारास त्याच्या वडीलाचा चुलत भाऊ आपल्या मुलीसह तेथें आला. ती मुलगी चौदा वर्षांची होती. या मुलीनें जोशियाला पाहिलें तो विद्रुप दिसे. त्याच्याकडे पाहून तिला दया आली. तुझा पाय कसा मोडला असें तिनें विचारलें. त्याला वाचतां येतें असें पाहून तिनें त्याला एक पुस्तक वाचावयास दिलें. तिनें जातांना त्याच्या पाठीवरून हात फिरविला. व लवकर बरा हो असा आशिर्वाद दिला. जोशिया यावेळीं किती दुःखांत होता याची कल्पना आपणांस करतां येणें शक्य नाहीं.

तीन महिन्यांनीं त्यांनीं तें पुस्तक त्या मुलीकडे परत पाठविलें. तिनें आपल्याला अशीच पुस्तकें वारंवार पाठवावीं अशी त्याची इच्छा होती. तिच्या बापानें त्याला दोन पुस्तकें पाठविलीं व म्हटलें कीं, इतर कुंभाराप्रमाणें आपला जन्म जुगार खेळण्यांत व दारू पिण्यांत तूं घालवीत जाऊं नकोस.

कांहीं दिवसांनीं त्याची प्रकृती सुधारली व तो पुनः आपल्या कामावर गेला. यावेळीं त्याच्या डोक्यांत धंद्यामध्यें कांहीं तरी सुधारणा करावी अशी कल्पना आली. नुसती मातीचीं भांडीं करण्या ऐवजीं आपण त्याजवर जर कांहीं चित्रें वेलबुट्ट्या वगैरे काढल्या तर त्या लोकांना अधिक आवडतील असें त्याच्या मनानें घेतलें. त्यांनीं एक लहान चौकोनी पेटी केली व त्या पेटीवर चकचकीत असे हिरवे खडे बसविले व ती पेटी त्या मुलीकडे पाठविली.

त्या दिवसांत मालाची ने आण घोड्यावरून होत असल्यामुळें रस्त्यांत त्या पेटीचे तुकडे तुकडे झाले. तथापि त्या मुलीनें या गोष्टीचा उल्लेख न करितां त्याची फार स्तुती केली. तिच्या बापानें पांच रुपये पाठवून अशा दोन पेट्या धाडण्याबद्दल त्याला लिहिलें.

महिन्याला पांच रुपये मिळण्याची जेथें मारामार तेथें हे पांच रुपये येऊन पोहोंचतांच किती आनंद झाला असेल याची कल्पना करवत नाहीं. यानें या पैशाचा उपयोग नवे नवे रंग आणून आपल्या भांड्यांना शोभा कशी आणावी याकडे खर्च करण्याचे

ठरविलें. तो आतां पळे चमचे, सुऱ्या वगैरे करूं लागला. जोशियाची कल्पकता पाहून एका मोठ्या कारखानदारानीं त्याला नोकरीस ठेवण्याची इच्छा प्रदर्शित केली. त्यानीं एक सुंदर तपकीरीची डबी केली होती. व त्यावर पानें काढलीं होतीं. हीं कलाकुसरीचीं कामें त्याच्या भावाला पसंत पडत नसत. तो म्हणे हा आपला वेळ नेहमीं फुकट कां दवडतो कोण जाणे! तथापि तो आपल्या भावाला नोकरीस धाडावयास कबूल नव्हता.

वयाच्या २१ व्या वर्षी जोशीया त्या सारा नांवाच्या मुलीकडे भेटावयास गेला. सारा आतां चांगली वाढली होती, व फारच सुंदर दिसावयास लागली होती आणि जोशिया पूर्वी इतकाच वेढप व कुरूप दिसत होता. ती इतकी सुंदर होती कीं, ती त्याच्याकडे पहात सुद्धां नसे. तिचा पोशाख पाहून हा फार वेडावून गेला. व या पुढें त्यानीं भांड्यांवर सारा सारख्या सुंदर स्त्रीया काढण्याचें ठरविलें.

थोड्याच दिवसांत त्यानीं एक भागीदार मिळवून नवा कारखाना काढला एका वर्षांत जोशियानें १५०० रुपये शिलकींत टाकले. त्यानीं ही गोष्ट साराला कळविली. व तिनेंहि त्याची वाहवा करून याला उत्तेजन दिलें. या पत्रामुळें त्याच्या मनां



जोशिया वजवूड.

नवा आशांकुर उत्पन्न झाला, व सारानें आपल्या बरोबर लग्न करावें असें त्याला वाटूं लागलें.

पण सारा तीन लाखाची मालकीण असल्यामुळें तीनें असल्या भिकारड्याबरोबर लग्न करावें ही कल्पनाहि तिच्या वडिलांना शिवली नाहीं. जोशिया हा तिला अखेरीस एकदां भेटावयास गेला, व त्यानें साराला मागणी घातली. या मागणीला काय उत्तर मिळालें असेल व त्याचा किती उपमर्द झाला असेल हें आम्ही सांगावयास नको. जोशियानें तर नदींत जाऊन आपल्या जीवाचें बरें वाईट करून घ्यावें असें या अपमानामुळें ठरविलें. तथापि थोडा विचार मनांत आल्यामुळें त्यानें तो बेत तहकूब केला. तो एका खाणावळींत गेला व तेथें जेवला. जेवून बाहेर पडतो तों त्याला सारा बोलावीत आहे असें ऐकूं आलें. ती म्हणाली, "मला बॅरिस्टर बरोबर लग्न करावें असें वाटत नाहीं. मी त्याचा तिरस्कार करतें. माझ्या पैशा इतका पैसा जो मिळवील अशा स्वावलंबी कारागीराबरोबरच लग्न करण्याची माझी इच्छा आहे तेव्हां तूं तितका पैसा मिळव" असें म्हणून ती निघून गेली.

वर्षामागून वर्षे लोटलीं. साराचा बाप जरी जोशियाला आपल्या घरांत येऊं देत नसे, तरी त्याला त्यांचा पत्रव्यवहार बंद करितां येईना. त्याला त्या दोघांची मैत्री झाली आहे असें समजलें. तेव्हां

सारानें जी अट घातली होती ती त्यानें मान्य केली.

पांच वर्षेपर्यंत जोशियानें नोकरी केली व १५००० रुपये शिलकी टाकले. नंतर त्यानें मोठ्या प्रमाणावर स्वतंत्र धंदा सुरू केला. तो वाचन अध्ययन व व्यवसाय करून मोठ्या दर्जाला चढूं लागला. शाळेंत जरी त्यानें शिक्षण घेतलें नाहीं तरी तो विद्वान गृहस्थ होता यांत शंका नाहीं. या सुमारास त्यानें साराला पत्र लिहिलें व आपण इंग्लंडांत पहिल्या प्रतिचे कारखानदार होणार असें कळविले

जोशियाच्या कारखान्यांत मोठमोठे लोक येऊं लागले व त्याची वाहवा करूं लागले. त्याला त्याचा धंदा उत्तम रीतीनें करतां येऊं लागला. नंतर त्यानें आपली विद्या देशबांधवांना शिकवावी म्हणून एक मोठा वर्ग काढला. या वर्गांत सर्वांग परिपूर्ण असें शिक्षण देण्यांत येई. जोशियाच्या कारखान्यांत तयार झालेल्या कपबशा राजेरजवाड्यांना आवडूं लागल्या. मध्यमवर्गहि जोशियाचाच माल मागवूं लागला.

असा उत्कर्ष होता होतां त्यानीं कबूल केल्याप्रमाणें तीन लक्ष रुपये संग्रहीं टाकले. यावेळीं त्याचें वय अवघें तीस वर्षांचें होतें.

तथापि साराच्या बापाची जोशियाच्या पैशाविषयीं खात्री पटेना. कारण तिनें आपल्या जवळून जावें असें त्याला बिलकूल वाटत नसे म्हणून त्यानीं जोशियाला आणखी पैसे मिळव असें सांगितलें. अखेरीस जोशीया ३४ वर्षांचा व सारा २९ वर्षांची असतां दोघांचा विवाह झाला

दिवसेंदिवस त्यांचा धंदा वाढतच गेला. त्यानीं नंतर स्वतःच्या मालकीचें असें एक खेडें बांधलें. त्यांत उत्तम रस्ते, बागबगीचे, घरें व बंगले बांधलीं. थोड्या दिवसांत जोशिया वेजवुड म्हणजे इंग्लंडांतील अत्यंत श्रीमंत गृहस्थ म्हणून समजण्यांत आला. चार्लस डार्विन नांवाचा प्रसिद्ध शास्त्रज्ञ हा त्यांचा नातू होय.

अशाप्रकारें कर्तबगार मनुष्य शारिरिक व्यंगांना व कुटुंबांतील अडचणींना न जुमानतां कसा श्रीमान होतो याचें हें उत्कृष्ट उदाहरण आहे. यापासून सध्याच्या कष्टमय दिवसांत आम्ही बराच बोध घेण्यासारखा आहे.


# फळा.

शाळेंतील फळ्याचे ऐवजीं कापड. रुंदी ३० इंच दर वारास १ रु. हें कापड खरखरीत असून त्याजवर खडूनें उत्तम प्रकारें लिहितां येतें पाण्यानें पुसलें असतां कापड ओलें होत नाहीं.

म्यानेजर--चित्रशाळा प्रेस, पुणें.

# खुनी बेट.

हें खुनी बेट कोठें आहे याची नांवावरून कोणालाच कल्पना येणार नाहीं. खुनीबेट म्हणजे अंदमान बेट होय. अंदमान बेटांत चहूंकडेच खुनी दरवडेखोर असे जन्मठेपीचे कैदी ठेवण्यांत येतात. त्यामुळें त्या बेटाला हें नांव देण्यांत येतें. या बेटांत ५० युरोपियन अधिकारी आहेत व ते दहाहजार लोकांवर देखरेख करतात. हें बेट रहाण्याला किती अयोग्य आहे याची माहिती वाचकांना आहेच तेथील पाणी व हवा विषमय असल्यामुळें कैद्याशिवाय तेथें रहाण्यास कोणी धजणार नाहीं. त्या वसाहतीची माहिती करून देण्याचा सांप्रत उद्देश नाहीं. या तुरुंगाच्या पलिकडे कोणते लोक रहातात याची अल्पशी माहिती करून देण्याचा या लेखांत प्रयत्न करणार आहों.



खुनी बेटांतील लग्न समारंभ.

अंदमान बेटाचा पुढचा भाग म्हणजे किनाऱ्या लगतचा भाग इंग्रजांनीं तुरुंगाकरितां स्थापिला आहे. या भागाच्या आंत दाट जंगल असून जंगलांत रानटी लोक रहातात. ते कधींहि बाहेर येत नाहींत. एखादा माणूस त्यांच्या शोधाकरितां गेला तर तोच बहुतेक ठार होतो. यांना ज्वारालोक असें म्हणतात. या लोकांना दया न दाखविली तरी ते वश होत नाहींत; मग बळजबरीनें ते वश होत नाहींत हें सांगावयासच नको.

हे जवारालोक मनुष्यांचे आद्य पूर्वज असावेत असें वाटतें. ते फार खुजे आहेत. त्यांची उंची ४॥ फुटापेक्षां अधिक नाहीं. प्रथम मनुष्याची उत्पत्ती दक्षिण आशियांत झाली. तेथून पुढें मनुष्यानीं वसाहती केल्या असें कांहीं जणांचें म्हणणें आहे. अंदमान बेटाखेरीज इतर ठिकाणचे लोक सुधारले. व हेच पूर्वीच्या स्थितींत राहिले. पोर्ट-ब्लेअरमध्यें या रानटी लोकांपैकीं कांहीं कुटुंबें मोठ्या कष्टानें आणून ठेवण्यांत आलीं आहेत व त्यांच्या मदतीनें या लोकांची कांहीं माहिती मिळते.

हे लोक किती लहान आहेत हें त्यांच्या जवळ जाऊन आपण उभे राहिलों म्हणजे समजतें. तेथील कांहीं स्त्रियांच्या गळ्यांत मनुष्यांचीं मुंडकीं असतात. हीं मुंडकीं पाहून मनुष्य प्रथम गोंधळतो.

व त्याला या मुंडक्यांचें रहस्य समजत नाहीं. हें मुंडकें पांढरेंशुभ्र असून या काळ्याकुट्ट स्त्रीयांच्या उरो भागावर चकाकून दिसतें.

येथील स्त्रीचा नवरा वारला म्हणजे ती त्याचें मुंडकें आपल्या गळ्यांत बांधतें. हें त्यांच्या वरील प्रेमाचें चिन्ह आहे असें त्या समजतात. मनुष्य मेला म्हणजे त्यांच्या तोंडावर फुंकर घालतात, त्याला पुरतात. व तेथून आपला तळ हलवून दुसरीकडे रहाण्यास जातात. कांहीं दिवसांनीं ते परत येतात; त्याचीं हाडें उकरतात व समुद्रांत तीं धुतात. नंतर त्या मृताच्या कवटीच्या सन्माना प्रीत्यर्थ ते नाच करतात व ती कवटी रंगवून त्याच्या बायकोला गळ्यांत घालण्याकरितां देतात.



आपल्या नवऱ्याचें मुंडकें गळ्यांत बांधणारी स्त्री

दुसरी एक स्त्री तेथें दृष्टीस पडते. ती आपल्या मुलाचा हात तपासते. त्या हातावर ती भेगा पाडते. या भेगा पुष्कळ असतात. मुलें जन्मलीं म्हणजे त्यांच्या शरिरांत भुतें असतात अशी त्यांची समजूत असते. कांहीं भुतें निघून जावीत म्हणून त्यांच्या हातावर ह्या जखमा करतात. अशाप्रकारें दर दोन तीन महिन्यांनीं भेगा पाडणे चालू असते. म्हणून सर्वांच्या अंगावर भेगा दिसतात.

येथें लग्नाची अशीच विचित्र तऱ्हा आहे. लग्नाच्यावेळीं नाच होतो. नवरा मुलगा मी रानांत पळून जातो असें म्हणतो. पण इतर मंडळी त्याच्या मागोमाग जाऊन त्याला पकडून आणतात व जे त्याची बायको बसली असते तेथें नेतात. तेथें इतरहि स्त्रीया असतात.

या घोळक्यांत त्या नवऱ्या मुलाला आणून सोडतात. त्यांचें ओरडणें आरडणें चालू असतें. त्यांच्याकडे पाहिले म्हणजे फुटबॉल पकडण्या-

करितां जमलेल्या घोळक्याची आठवण होते. या घोळक्यांत कांहीं जणी जात नाहींत. त्याचें कारण त्यांना " फुलाचें नांव " नुकतेच मिळालेलें आहे असें सांगतात. प्रत्येक मुलगी वयांत आली म्हणजे तिला " फुलाचें नांव " मिळतें. हें नांव मिळण्यापूर्वीं तीन दिवस नुसती दंगल माजून रहातें या तीन दिवसांत तिला निजूं देत नाहींत अगर खाऊं देत नाहींत. तीन दिवसानंतर जंगलांतील फुलाला आलेल्या एखाद्या झाडाचें नांव तिला देण्यांत येतें व त्या झाडाप्रमाणें तुला फुलें येवोत असें म्हणतात. नंतर तिचें लहानपणचें नांव घेत नाहींत. ती त्या वेळेपासून स्त्री होते.



बेटांतील खुजे स्त्री पुरुष.

या लोकांची मोठी गंमतीची गोष्ट म्हणजे त्यांना अद्याप काड्याच्या पेटीचा उपयोग ठाऊक नाहीं. हीं होय आपल्याकडे जसें अग्निहोत्र होतें तसें अग्निहोत्र त्यांच्याकडे सारा-दिवस पेटलेलें असतें. हा अग्नी ते प्रवासाला निघाले तरी बरोबर असतो ही एक ईश्वरी देणगी म्हणून समजतात. एकदां विस्तव विझाला म्हणजे तो पुन्हां पेटवीत नाहींत.

अशाप्रकारचे हे विचित्र लोक आहेत.

---

# कुंकवाच्या करंड्याचें रहस्य.

मुंबई म्हणजे एक अफाट शहर. त्या शहरांत किती दुकानें आणि किती प्रकारचीं दुकानें आहेत याची गणतीच नाहीं.

आमचे गोपाळराव म्हणजे अगदीं सालस मनुष्य. त्यांचें एक जुन्या सामानाचें दुकान होतें. त्या दुकानांत जुन्या काळच्या कारागिरांनीं केलेल्या व दुर्मिळ असलेल्या अशा वस्तूंचा संग्रह होता. ज्यांना जुन्या वस्तूंची गरज असे, असेच लोक गोपाळरावांच्या दुकानीं येत. त्यामुळें विचारा गोपाळराव नेहमीं गिऱ्हाइकांची वाट पहात असे. एखाद्या महिन्याला मुळींच गिऱ्हाईक न मिळाल्या-मुळें त्याला आपलें पोट भरण्याची मोठी मारामार पडे.

अशा चिंतातुर स्थितींत गोपाळराव बसले असतां एके दिवशीं संध्याकाळीं एक भरजरीचें कपडे घातलेली व अंगावर अमूल्य दागिने घातलेली स्त्री मोटारींतून त्यांच्या दुकानीं आली. गोपाळरावांना वाटलें कीं आपलें बरेंच दिवसांचें दारिद्र्य आतां फिटणार, आपण श्रीमंत होणार. ती स्त्री आंत आली, तेथील वस्तूंचें निरीक्षण केल्यावर तिनें एक करंडा हुडकून काढला. हा करंडा मोठा मौल्यवान होता असें नाहीं. परंतु तिची नजर त्यावर कां गेली हें सांगवत नाहीं. तिनें तो करंडा केवढ्यास द्यावयाचा आहे असें विचारलें.

गोपाळ:—"हा करंडा मला विकता येत नाहीं या बद्दल वाईट वाटतें"

स्त्री:—"हो! दुकानदार जास्त किंमत यावी म्हणून असेच आढेवेढे घेत असतात. तुम्ही मागाल ती किंमत देण्यास मी तयार आहे. बोला शंभर रुपयास देता कां!"

गोपाळ:—"हा करंडा मी येथें विकण्याकरितां ठेवलाच नाहीं. घरांत दुसरीकडे कोठें जागा नसल्यामुळें हा येथें पडला आहे एवढेंच."

स्त्री:—"पहा मी त्याचे दोनशे रुपये देतें. मला तो फार आवडला म्हणून म्हणतें" असें म्हणून तिनें दोनशें रुपयांच्या नोटा आपल्या पाकीटांतून काढल्या. तथापि गोपाळराव तो करंडा देण्यास कबूल होईना. गोपाळराव पैशाकरितां मागें पुढें पहात आहे असें बघून तीनें त्या करंड्याचे शेवटीं १००० रुपये देऊं केले. तरीहि गोपाळराव वळण्याचें तिला चिन्ह दिसेना. तेव्हां कंटाळून ती स्त्री मी उद्यां येईन, तोपर्यंत विचार करा असें सांगून निघून गेली.

आपल्या दुकानांत कोणी तरी गिऱ्हाईक आले असें पाहून गोपाळरावची स्त्री दार उघडून आंत आली. व तिनें आपल्या नवऱ्याला किती रुपयांची विक्री झाली असें विचारलें. गोपाळरावनें झालेली हकिगत सांगितली. हकिगत ऐकून त्यांची पत्नी फार रागावली व नवऱ्याला दोष देऊं लागली.

"आपला करंडा नसला म्हणून काय झालें. दहा वर्षें झालीं तो येथें पडला आहे. तो आपल्या येथें गणू होतांना त्याचा तो करंडा"

"हो खरंच! आतां आठवलं सारं मला तें. मघापासून कोणाचा हा करंडा याचा मी विचार करीत होतो. तो गणू एके दिवशीं घाईघाईनें आपल्या येथून निघून गेला आणि त्या गडबडींत त्याचे कांहीं कपडे व हा करंडा राहिला नव्हे?"

"हो! आतां काय त्याचें? तो केव्हांच मरून गेला असेल, नाहींतर कोठें नाहींसा झाला असेल. उद्यां सकाळीं जर ती बाई आली तर तिला टाका तो विकून कोण आज हजार रुपये देणार आहे त्याचे."

"तूं म्हणतेस ते खरें पण लोकाची वस्तू आपण कशी विकावी? समज कांहीं दिवसानीं गणू आला तर आपण कोठून देणार त्याला तो. मला तुझें म्हणणें बिलकूल पसंत नाहीं."

अशाप्रकारें बराच वेळ दोघांचें बोलणें चालू होतें. गोपाळरावांनीं आपल्या बायकोचें म्हणणें न ऐकण्याचें व करंडा न विकण्याचें ठरविलें.

दुसरें दिवशीं ठरल्याप्रमाणें ती स्त्री गोपाळरावाच्या दुकानीं आली व आणखी अधिक किंमत वाढवून करंडा विकत मागूं लागली पण गोपाळरावनीं आपल्या मनांत चलबिचल न होऊं देतां तिला साफ नकार दिला.

संध्याकाळचें वेळीं पूर्वीचा गणू गोपाळरावच्या येथें अचानक आला.

गणपतराव आलेले पाहून गोपाळरावांना फार आश्चर्य वाटलें व आपण करंडा न देण्यांत मोठा शहाणपणा केला असें ते म्हणाले.

गणपतराव आंत येतांच पूर्वीची आठवण करून देऊन आपला करंडा मागूं लागले त्याबरोबर

गोपाळरावांनीं तो त्यांच्यापुढें ठेवला व माझ्या येथें तुमचे कांहीं कपडे राहिले आहेत ते पाहिजे तर आणून देतों असेंहि सांगण्यास ते विसरले नाहींत. पण गणपतरावांना ते कपडे नको होते. ते पूर्वींचे गणपतराव राहिले नव्हते. आपल्या पडत्या काळांत त्यांनीं गोपाळरावांच्या घराचा आश्रय केला होता. आतां ते कर्मधर्मसंयोगानें लक्षाधीश बनले असून मोठ्या हुद्यावर होते. तो करंडा त्यांनीं आपल्या बायकोची स्मृति म्हणून जवळ बाळगला होता. पण त्यांना १० वर्षांपूर्वीं एकाएकी जावें लागलें त्यामुळें ते तो करंडा तसाच विसरले होते. कांहीं वेळ इकडच्या तिकडच्या गप्पा झाल्यावर रमाकाकूहि तेथें आल्या.

गणपतराव म्हणाले " मी तुमच्या प्रामाणिकपणाची कसोटी पाहावी म्हणून माझ्या बायकोला मुद्दाम आज व काल करंडा विकत घेण्याकरितां पाठविलें होतें. तुमचा प्रामाणिकपणा पाहून मला फार आनंद झाला आहे. " असें म्हणून त्यांनीं आपल्या खिशांतून पांच हजाराच्या नोटा काढल्या व त्या गोपाळरावांच्या हातावर टाकल्या. नंतर त्यांनीं त्यांना आपल्या बंगल्यावर नेलें व आपलें नवें वैभव दाखविलें.

या असंभाव्य योगायोगामुळें त्या गरीब कुटुंबाला झालेला आनंद व्यक्त करणें आमच्या आटोक्याबाहेरचें आहे.

प्रामाणिकपणाचें बक्षीस या जगांत मिळाल्याशिवाय कधींहि रहात नाहीं. मात्र मनुष्यानें उतावीळ केव्हांहि होऊं नये म्हणजे झालें.

## अव्यापारेषु व्यापार.

खंडु माळी एके दिवशीं दूरच्या बाजाराला गेला होता. त्यामुळें तो दमला आणि घरीं स्वस्थ येऊन झोपला. त्या रात्रीं खंडूच्या घरावर दरोडा घालावा म्हणून भीमा बेरड लपत छपत आला. घर फोडावें व चोरी करावी असा त्याचा बेत होता.

खंडूच्या आंगणांत एक गाढव आणि एक कुत्रा बांधला होता.



घरांत चोर शिरलेला पाहून गाढव कुत्र्याला म्हणते " वाघ्या अरे भुंक कीं ! मित्रा, आपल्या धन्याला जागा कर नाहींतर चोर चोरी करून जाईल. असा गप कां बसतोस "

वाघ्या म्हणतो " तुझें म्हणणें खरें आहे. पण वाईट धन्याचे चाकर वाईटच असतात.







बाबारे हा धनी मला पोटभर अन्नही घालीत नाहीं आणि काठीनीं मारतो. मी आतां स्वस्थ निजून राहणार "

पण हें बोलणें त्याला रुचलें नाहीं. तो मोठ्यानें खिदळूं लागला.

त्याचें खिदळणें ऐकून भीमा पळून गेला. धनीसाहेब हा आवाज ऐकून जागे झाले. आणि पुढचा मागचा विचार न करतां त्या बिचाऱ्याला मारूं लागले, तें पाहून कुत्रा म्हणतो " बाबारे उगीच दुसऱ्याच्या कामांत पडूं नये. पडले तर असा प्रसाद मिळतो. "

---

## चुटका.

लहानगा गोविंदा दहा वर्षांचा होता. त्याचा बाप व्यापारी असल्यामुळें घरांत नेहमीं आंकड्याचा गडबडगुंडा त्याच्या कानीं येई. एकदां त्यालाहि कांहीं मौज करावीशी वाटली म्हणून त्यानीं आपल्या आईच्या कुंकवाच्या पेटींत खालील याद नेऊन टाकली.

### आईचें गोविंदाला देणें.

| | |
|---|---|
| काड्याच्या पेट्या आणावयास पुष्कळ वेळां गेलों त्याबद्दल-- | २ आणे. |
| भाजी आणण्याबद्दल-- | ४ आणे. |
| पोस्टाचीं तिकीटें १० वेळां आणलीं-- | २ आणे |
| निरोप पोहोंचविले.-- | २ आणे. |
| धाकट्या मधुला सांभाळलें-- | ३ आणे. |
| किरकोळ-- | १ आणा |
| | १४ आणे. |

आईनीं ही याद पाहिली आणि तिनें कांहीं एक न बोलतां त्याच्या दप्तरांत १४ आणे व एक चिठी टाकली, त्या चिठींत खालील याद होती,

### गोविंदाचें आईला देणें.

| | |
|---|---|
| गोविंदाला दहावर्षे वाढविले त्याबद्दल-- | शून्य |
| आजारी असतांना शुश्रूषा केली-- | शून्य |
| वेळेवर जेऊं घातलें-- | शून्य |
| मस्ती केली असतांना मार वाचविला-- | शून्य |
| किरकोळ-- | शून्य |
| एकूण-- | शून्य |

ही याद वाचून पाहताच गोविंदा रडूं लागला व आईकडे धांवत जाऊन त्यानीं तिला मिठी मारली व म्हणाला " आई मी तुझें इतकें देणें लागतों कीं, तें माझ्या हातून कधींच फिटावयाचें नाहीं, "

# —❀ चित्राची गोष्ट. ❀—



## ❀ शालापत्रकाची चढाओढ. ❀

**मागील कोड्यांचीं उत्तरें.**

" धंदा भडबुंज्याचा आणि ऐट बाजीरावाची. "

**बरोबर उत्तरें पाठविणारांचीं नांवें.**

१ दिनकर वासुदेव भागवत
२ शंकर खंडेराव पुरंदरे
३ कृष्णाजी रामचंद्र केळकर
४ सिताराम विष्णु कुरणे
५ रामचंद्र गणपत कटक
६ अंबुताई गंगाधर करंबेळकर
७ मो. तु. चोबे
८ जयराम चुनिलाल वोरा
९ दत्तात्रय गणेश भागवत
१० विठ्ठलचंद सुलतानचंद व्यास
११ लक्ष्मीकांत ग. गुळगुळे

**मुलांकरितां**

बाळकृष्ण अनंत बाळे पुरोहित यांच्याकडूनच समाधानकारक उत्तर आलें

**बक्षीसें.**


५ सुभाषित
६ रासेलस
७ निबंधलेखन
८ विद्वत्व कवित्व वक्तृत्व
११ अर्वाचिन महाराष्ट्र

**मुलांकरितां**

साक्रेटीस चरित्र


**मुलांकरितां**

आमच्या ऑफीसांत हें एक विचित्र पत्र आलें आहे. तुम्ही वाचा व आम्हाला कळवा.



## नवीं कोडीं सर्वांकरितां.

सोबत तीन पत्ते दिले आहेत. ते पोस्टमनला वाचतां आले नाहींत म्हणून तुमच्याकडे पाठविले आहेत, ते वांचून आम्हास कळवा.



# बोय किंवा बोयरा.

( ले. गणेश महादेव केळकर )

जलमार्गाच्या प्रवासांत ज्या कांहीं अनेक अडचणी आहेत त्या निवारण्याची जीं कांहीं साधनें आहेत त्यांपैकीं दीपगृहाची माहिती गेल्या फेब्रुवारीच्या शालापत्रकाचे अंकांत दिली आहे. आज बोयऱ्यांची अल्प माहिती खालीं देत आहे.

आपण मुंबई बंदरास जातां येतां जर जरा बारीक नजरेनें पाहिलें तर समुद्राच्या लाटांबरोबर खालीं वर होत असलेले लाल रंगाचे शंखाकृति पाण्यावर तरंगणारे लोखंडाचे गोळे असतात. त्यासच बोय म्हणतात.

हे बोय कधीं पासून प्रचारांत आले, यांचा उपयोग काय ? असा प्रश्न चौकस मनुष्याच्या मनामध्यें साहाजिक उभा राहातो. हे बोय पूर्वीं लांकडाचे असून त्याचे मोठमोठे ओंडे समुद्रांत ठिकठिकाणीं ठेवित असत; परंतु अलिकडे जलप्रवास वाढल्यामुळें आणि दिवसे दिवस प्रत्येक बाबतींत सुधारणा होत असल्यामुळें ते लोखंडाचे करतात, निरनिराळ्या आकाराचे व रंगाचे निरनिराळ्या खुणा यर ठेऊन जलमार्ग सुकर होण्याविषयीं त्याची काळजी घेतात कित्येक बोयांवर शिट्या असतात त्यांची योजना अशी असते कीं, समुद्रावर वारा नेहमीं सोसाट्याचा असतो आणि हे बोय लाटा बरोबर नेहमीं हालत असतात. त्यामुळें त्यांच्या शिट्यांना जे पडदे असतात त्यांतून हवा खेळती राहते. म्हणजे त्या शिट्या नेहमीं वाजत राहतात. कांहीं ठिकाणीं वर घंटा ठेवितात. त्याही नेहमीं बोय हालत असल्यामुळें वाजत असतात. कांहीं ठिकाणीं बोयांवर दिवे लावितात हे दिवे लागण्यासाठीं आंत ब्याटरी ठेविलेली असते त्यांत वीज भरली म्हणजे ते आपलें काम वगैरे मुदती पावेतों करितात.

हे बोयरे दुरून जितके अंतरामुळें लहान दिसतात तीतके ते लहान नसतात. इंग्रजी पद्धति प्रमाणें सपाट बोयरे प्रवाहाच्या डाव्या बाजूस आणि शंखाकृति बोयरे उजव्या बाजूस टाकतात. निरनिराळ्या देशाच्या खुणा निरनिराळ्या असतात. बोयऱ्याच्या पत्र्याची जाडी $\frac{3}{?}$ इंचापासूस $\frac{?}{?}$ पावेतों असते. आणि मोठ्या बोयऱ्याचें आंत दुसरा त्याचे पेक्षां किंचित लहान बोयरा असतो कारण एकादवेळीं बाहेरील बोयरा कांहीं कारणानें फुटला तर आतील बोयऱ्याचे आधारें बाहेरील बोय तरता राहतो. हे बोयरे जागच्या जागीं राहण्याकरितां त्यांस जाड जाड सांखळदंड लावितात. ते आगबोटीच्या नांगराच्या सांखळदंडापेक्षां मजबूत असावे लागतात. कारण समुद्रांत कोणत्या वेळीं काय संकट येईल याचा नेम नसतो. तरी सुद्धां हे सुटून एकादे वेळीं कोणीकडच्या कोणीकडे वाहात जातात. आणि केव्हां केव्हां बेपत्ताही होतात. म्हणून हे दर तीमाहीस तपासावे लागतात आणि त्यास दर ६ माहीस रंग देतात. कांहीं बोय जागच्या जागीं रंगवितात, आणि कांहीं कारखान्यांत नेऊन रंगवितात. आणि त्यावेळीं तेथे दुसरे बोयरे आणून ठेवावे लागतात. ह्या बोयऱ्याचा मुख्य उपयोग आगबोटी, गलबतें इत्यादिकांस समुद्रांत खडपें, भोंवरे, लोहचुंबक ह्यांतून मार्ग दाखविण्यास होतो. त्यामुळें दर्यावर्दी लोकांस त्याची खरी किंमत कळते

हे बोय युद्धाचे वेळीं शत्रूस मार्ग कळूं नये म्हणून काढून ठेवितात.

गुदस्त सालीं रत्नागिरी जवळील मिऱ्या येथील बोय सरकारानें लिलांवानें विकला. त्याचें लोखंड २८ मण भरलें.

# जोडाक्षर-विरहित वाचनपाठ.

हे पुस्तक नुकत्याच अक्षर ओळख झालेल्या मुलांमुलींकरितांच लिहिलेलें आहे. पुस्तकांत एकंदर १७ गोष्टी अगदी सोप्या भाषेंत, व एकहि जोडाक्षर न येऊं देतां लिहिल्या आहेत. प्रत्येक गोष्टीचे आरंभ कथानकाचें मूर्तिमंत चित्र दिलें असल्यामुळें गोष्ट वाचण्याचे अगोदरच त्यांतील सारांश मुलांचे सहज लक्षांत येतो. किं. अवघी चार आणे.

# उजळणीचें पुस्तक.

ह्यांत सर्व मूळाक्षरें चित्रयुक्त दिलीं असून मोडी व बालबोध बाराखड्या तयार करण्याची समजूत थोडक्यांत करून दिली आहे. नंतर मोडी व बालबोध सोपे शब्द मुलांना सहज ओळखण्यासारखे दिले आहेत. पुढें १० अंक सचित्र दिले असून त्यांबरोबरच मुलांस बेरीज व वजाबाकीची समजूत टिंबाच्या आकृतींनी व गोट्यांच्या चौकटीच्या सहाय्यानें घालून दिली आहे. नंतर पाढ्यांची समजूत दिली असून शेवटीं उजळणी दिली आहे. एकंदरींत हें पुस्तक नवीन तऱ्हेनें मुलांना शिकविण्यास फार उपयुक्त असें झालें आहे. कागद ग्लेज किं. ०।१८६.

## लहान मुलांकरितां उपयुक्त अशीं पुस्तकें.

## नवी आवृत्ति ] सचित्र अक्षरबोध. [ नवी आवृत्ति

या पुस्तकांत 'अ' पासून 'ज्ञ' पर्यंत स्वर आणि व्यंजनें हीं सर्व निरनिराळ्या भपकेदार रंगांत व तें अक्षर नांवांच्या प्रथम अक्षरानें दर्शविणाऱ्या चित्रांसह दाखविलेलीं असून १ पासून १० पर्यंत अंकाहि वरील पद्धतीनें दाखविलेले आहेत. पुस्तकाचा साईज क्राऊन चतुर्थांशाइतका मोठा ७×९ इंच ठेवला असल्यामुळें अक्षरें व चित्रें फारच सुबक व मोठीं अशी झालीं आहेत. एकंदर पुस्तक इंग्रजींतील सचित्र रंगीत ए बी सी डी शिकण्यास उपयोगी अशा पुस्तकाच्या धर्तीवर तयार केलें असल्यामुळें हें पुस्तक लहान मुलांस फारच आवडून त्यावरून तीं आपला धडा सहज शिकतात. किं. ०।८.

## भाग १ ते ६ ] चिमुकल्या गोष्टी. [ भाग १ ते ६

ह्या गोष्टींत रोज व्यवहारांत घडणाऱ्याच गोष्टी दिलेल्या आहेत, पण त्या इतक्या मोहक, मनोरंजक व मार्मिक लिहिल्या आहेत कीं, त्या गोष्टींतील तत्त्वबोध गोष्टी वाचतां वाचतांच मुलांच्या मनावर सहज ठसला जातो पुस्तक बनीक टाइपांत सुंदर जाड व ग्लेज कागदावर छापिलेलें असून प्रत्येक गोष्टीचे प्रारंभीं कथानकाचें सुंदर चित्र दिलेलें आहे. एकंदर ह्या गोष्टींचे सहा भाग आहेत प्रत्येक भागांत दहा गोष्टी सचित्र आहेत; प्रत्येक भागास किं. ०।४.

मिळण्याचें ठिकाण—म्यानेजर–चित्रशाळा प्रेस, पुणें.

॥ ॐ नमः श्रीरामचंद्राय ॥

# आर्यऔषधालय मु० पो० आंजर्ले.

**कोंकणप्रांतांतील अगदीं ताज्या व शुद्ध वनस्पतींचीं जगत्प्रसिद्ध निर्दोष व रामबाण औषधें.**

**कंदर्पमंजरी पाक—** हा अपूर्व पाक गरिबांपासून तों अमीरउमरावांपर्यंत सर्वांसही अत्यंत उपयोगी असून किंमत माफक ठेविली आहे. यांत मौक्तिक प्रवाळ लोह, माक्षिक, कस्तूरी, अंबर इ० अत्युच्च गुणकारक पदार्थ असून शिवाय बदाम, पिस्ते, अक्रोड चारोळी, केशर, वेरूची पंजाबी सालममिश्री, सफेतमुसळी, पत्री गोक्षुर शतावरी अ.स्कंद वंश-लोचन वगैरे (८०) उपयुक्त वनस्पति घातल्या आहेत. यानें पथ्यावांचून गुण येतो. आपापासून कोण-त्याही कारणांनीं होणारा व कसाही प्रकारचा शुक्रस्राव, नपुंसकत्व, मूळव्याधि, रक्तदूषणामुळें त्वग्रोग, स्त्रियांची धुपणी व गर्भाशयस्थ दोष या भावना त्यांच्या एकंदर उपविकारांसह तत्काल बऱ्या होऊन धातुवृद्धि होते, व शरीर कणखर आणि तेजस्वी बनतें. २० तो० ड० २ रुपये. एकदम ३ डबे घेणारास ५ रुपये

**स्वर्णधात्री तेल—** हें चारोळी, बदाम, कंकोळ, एला, बहुविध वनस्पतींचीं सत्वें व उपयुक्त तेलें अशा अनेक पदार्थांनीं बनविलें असल्यानें याच्या मर्द-नापासून अपस्मार, उन्माद, वेड, चक्कर इ० रोगांस जलद आराम पडतो. केंसांस चोळल्यानें-केंस काळे कुळकुळीत, तजेलदार, सडक लांब व मृदु होऊन मेंदु शांत आणि रोगरहित बनतो. यानें मस्तकाचें टक्कल जातें. हें अंगास चोळून स्नान करीत गेल्यानें शरीराचा दुर्गंध जातो. खरूज गजकर्ण, शिबें, तसेंच तळपाय, तळहात, डोळे व मस्तक यांचा दाह हे विकार खास बरे होऊन निद्रा चांगली येते, आणि नेत्ररोग दुरुस्त होतात. बा० किं० १, रु०

**दंतरक्षक पूड—** ही दांत व हिरड्या यांचे सर्व विकार तत्काल दुरुस्त करून दांत स्वच्छ व मजबूत करण्यांत प्रतिज्ञेची आहे. ड ६ आणे

**सुरंगी, मालती, कल्हार, गुलबहार, दणाणा** लक्ष्मीविलास इ० बादशाही अति उंची अत्तरें व त्याचप्रमाणें गुलाब, हिना, केवडा, चमेली, जाई वगैरे सुगंधी अत्तरें आणि केंसांस लाव-ण्याचीं हरएक प्रकारचीं सुवासिक तेलें माफक दरानें पूर्ण खात्रीचीं मिळतील.

**सूचना:—**वरील औषधें व अत्तरें वगैरे पूर्ण खात्रीचीं असल्यामुळें आज पंचवीस वर्षांत त्यांचा लक्षावधि लोकांस अप्रतिम उपयोग झाला. म्हणून त्यांना नेहमीं फारच खप होत आहे. अनुभवानंतर पूर्ण खात्री पटेल. औषधें माहितीचे खर्चासह रोखीनें अगर व्ही० पी० नें पाठवूं. प्याकिंग व टपाल खर्च वेगळा. घाऊक घेणारास कमिशन मंजूर. सर्व औष-धांच्या आणि आरोग्यरक्षणाच्या माहितीचें सचित्र मोठें पुस्तक देऊं. आमचीं औषधें वगैरे मागविणें तीं खालील बिनचूक पत्त्यावर मागवावीं.

**कृष्णशास्त्री चिवलकर, वैद्य.**

REGISTERED. B. NO. 179




## अनुक्रमणिका


| विषय. | पृष्ठ. |
|---|---|
| विजेसंबंधीं १०० प्रश्नोत्तरें | ४१ |
| बळवंतरावांचा लोभीपणा. | ४४ |
| रामजी | ४५ |
| कॅलेंडर | ४७ |
| स्वराज्याचें तोरण ( नाटक. ) | ५१ |
| डोळ्यांत जादू | ५५ |
| सर जगदीशचंद्र बोस | ५६ |
| फाजील स्वामी-निष्ठा | ५८ |
| कोल्ह्याची फजिती | ५९ |
| शालापत्रकाची चढाओढ | ६० |


मुद्रक व प्रकाशक—रा. रा. शंकर नरहर जोशी. चित्रशाळा प्रेस. १०२६ सदाशिव पेठ, पुणें सिटी.

# जोडाक्षर-विरहित वाचनपाठ.

हें पुस्तक नुकत्याच अक्षर ओळख झालेल्या मुलांमुलींकरितांच लिहिलेलें आहे. पुस्तकांत एकंदर १७ गोष्टी अगदीं सोप्या भाषेंत, व एकहि जोडाक्षर न येऊं देतां लिहिल्या आहेत. प्रत्येक गोष्टींचे आरंभीं कथानकाचें मुर्तिमंत चित्र दिलें असल्यामुळें गोष्ट वाचण्याचे अगोदरच त्यांतील सारांश मुलांचे सहज लक्षांत येतो. किं. अवघी चार आणे.

# उजळणीचें पुस्तक.

ह्यांत सर्व **मुळाक्षरें चित्रयुक्त** दिलीं असून मोडी व बालबोध **बाराखड्या** तयार करण्याची समजूत थोडक्यांत करून दिली आहे. नंतर मोडी व बालबोध **सोपे** शब्द मुलांना सहज ओळखण्यासारखे दिले आहेत. पुढें १० अंक सचित्र दिले असून त्याबरोबर मुलांस बेरीज व वजाबाकीची समजूत टिंबांच्या आकृतींनी व गोट्यांच्या चौकटीच्या सहाय्यानें घालून दिली आहे. नंतर पाढ्यांची समजूत दिली असून शेवटीं उजळणी दिली आहे. एकंदरींत हें पुस्तक नवीन तऱ्हेनें मुलांना शिकविण्यास फार उपयुक्त असें झालें आहे. कागद ग्लेज किं. ८१८६.

## लहान मुलांकरितां उपयुक्त अशीं पुस्तकें

**नवी आवृत्ति ] सचित्र अक्षरबोध. [ नवी आवृत्ति**

या पुस्तकांत ' अ ' पासून ' ज्ञ ' पर्यंत स्वर आणि व्यंजनें हीं सर्व निरनिराळ्या भपकेदार रंगांत व तें अक्षर नांवाच्या प्रथम अक्षरानें दर्शविणाऱ्या चित्रांसह दाखविलेलीं असून १ पासून १० पर्यंत अंकहि वरील पद्धतीनें दाखविलेले आहेत. पुस्तकाचा साईज क्राऊन चतुर्थांशाइतका मोठा ७×९ इंच ठेवला असल्यामुळें अक्षरें व चित्रें फारच सुबक व मोठीं अशीं झालीं आहेत. एकंदर पुस्तक इंग्रजींतील सचित्र रंगीत ए बी सी डी शिकण्यांस उपयोगी अशा पुस्तकाच्या धर्तीवर तयार केलें असल्यामुळें हें पुस्तक लहान मुलांस फारच आवडून त्यावरून तीं आपला धडा सहज शिकतात. किं. ८८.

**... ६ ] चि[illegible]कल्या गो[illegible]ष्टी [ भाग १ ते ६**

ह्या गोष्टीत राज[illegible] [illegible]णाऱ्या गोष्टी दिलेल्या [illegible]त. पण त्या इतक्या मोहक, मनोरं[illegible] व मार्मिक लिहिल्या आहेत कीं, त्या गोष्टींतील तत्त्वबोध गोष्टी वाचतां [illegible]तांच मुलांच्या मनावर सहज ठसला जातो. पुस्तक वर्नाक टाइपांत सुंदर जाड व ग्लेज कागदावर छापिलें असून प्रत्येच गोष्टींच प्रारंभीं कथानकाचें सुंदर चित्र दिलेलें आहे. एकंदर ह्या गोष्टीचे सहा भाग आहेत. प्रत्येक भागांत दहा गोष्टी सचित्र आहेत, प्रत्येक भागास किं. ८४.

मिळण्याचें ठिकाण—म्यानेजर–चित्रशाळा प्रेस, पुणें.

मराठी

# बालपत्रक

येथें शब्द नाहीं शिष्यासीं । हें अवघें सद्‌गुरूपाशीं ।
सद्‌गुरु पालटी अवगुणांसी । नाना यत्नें करोनी ॥
जें कांहीं आपणास ठावें । तें हळु हळु शिकवावें ।
शहाणें करून सोडावें । सकळा जनां ॥ १ ॥

—रामदास.

पुस्तक ३५. मार्च सन १९२४. अंक ३

## विजेसंबंधीं १०० प्रश्नोत्तरें.

( मागिल अंकावरून समाप्त. )

### व्होल्ट कशाला म्हणतात ?

विजेची शक्ती मोजण्याचें हें एक प्रमाण आहे. एकाच सेलमधील दोन मूलभूत द्रव्यांच्या शक्तींत जें अंतर असतें ते व्होल्ट्सनीं मोजतात. डॅनियलचें सेल एक व्होल्टच्या वर व बायक्रोमेट सेल दोन व्होल्टच्यावर असतें.

### अँपर कशाला म्हणतात ?

तारेंतून जो प्रवाह जातो तो मोजण्याच्या प्रमाणाला अँपर म्हणतात. नळांत पाण्याचा जो दाब असतो, तो व्होल्टेज सारखा व पाण्याचा सांठा प्रवाहासारखा असतो.

### कुलुंब्स काय असतात ?

कुलुंब हें संख्येचें परिमाण आहे. ठराविक बिंदूतून एका सेकंदांत प्रवाहाचे जितके अँपर्स जातात, तितक्यांना कुलुंब्स म्हणतात.

### ओहम कशाला म्हणतात ?

विजेच्या प्रवाहाला सर्व वस्तूकडून अडथळा केला जातो आणि हा अडथळा ओहम्समध्यें मोजतात.

### वॅट कशाला म्हणतात ?

प्रवाहाला व्होल्टनीं गुणले म्हणजे वॅट होतात. २० व्होल्टच्या बॅटरीनें पेटलेला विजेचा दिवा जर दोन अँपर्स प्रवाह उपयोगांत आणित असला, तर त्याला ४० वॅटचा दिवा म्हणता येईल.

### किति वॅट्‌सची एक अश्वशक्ती होते ?

७४६ वॅट्‌स म्हणजे एक अश्वशक्ती होय.

### विजेचें परिमाण काय ?

एका तासांत १००० वॅटस हें विजेचें परिमाण होय. आपण जर १०० व्होल्टचें व १० अँपरचें एक यंत्र तासभर चालविलें, तर आपण १ विज घेतली असें म्हणतां येईल.

**जूल कशाला म्हणतात ?**

जूल हें शास्त्रज्ञाचें नांव आहे. आणि तें शक्तीचें ( Energy )परिमाण आहे. जेव्हां एक सेकंदांत एक अँपर ओहमच्या एका प्रतिरोधांतून जातो, तेव्हा त्याला जूल म्हणतात.

**व्होल्टमिटर कशाला म्हणतात ?**

जें यंत्र काय्रांच्या योगानें किति व्होल्ट झालें हें दाखवितें त्याला व्होल्टमिटर म्हणतात.

**अॅममिटर म्हणजे काय ?**

एका फेरींतून जो प्रवाह जातो तो ज्यानें मोजतात त्याला अॅममिटर म्हणतात.

**विजेनीं उष्णता उत्पन्न होतें काय ?**

विजेच्या प्रवाहाला तारेचा अडथळा होतो व वीज उत्पन्न होते. उष्णता फार झाली म्हणजे प्रकाश मिळतो.

**विजेच्या दिव्याला कांचचा गोळा कां असतो ?**

कांचेचा गोळा नसतां तर विजेचा प्रवाह हवेंतील ऑक्सिजन बरोबर मिसळून गेला असतां व प्रकाश मिळाला नसता.

**गोळ्याशिवाय प्रकाश मिळेल काय?**

आर्क नांवाचा एक दिवा गोळ्याशिवाय प्रकाश देतो. या दिव्यांत कार्बनच्या दोन तुकडयांनीं ज्योत उत्पन्न होते व ती पाहिजे तेव्हां बदलता येते.

**तंतूचा दिवा कसला ?**

विजेच्या दिव्यांतलि तंतू टंग्स्टेन किंवा टॅन्टेलमचे केलेले असतात व ते कार्बनच्या दिव्यापेक्षां तेवढ्याच विजेंत चौपट प्रकाश देतात.

**विजेचा दिवा कां मंदावतो ?**

कारण आंतील तंतू हळू हळू तुटतात व कांचेच्या गोळ्यावर बसतात. त्या योगानें तंतुतून विद्युत्प्रवाह बरोबर होत नाहीं व प्रकाश मंदावतो.

**डायनेमो कशाला म्हणतात?**

वीज उत्पन्न करण्याच्या यंत्राला डायनेमो म्हणतात

**मोटर कशाला म्हणतात ?**

मोटर डायनेमोच्या विरूद्ध असते. परंतु त्यांत तत्त्व तेंच असतें. डायनेमो कोणत्या तरी शक्तीनें चालवावा लागतो व त्यापासून वीज उत्पन्न होते आणि मोटर वीजेनें चालून शक्ती उत्पन्न करते.

**वीज सांठवितां येते काय ?**

कांहीं जातींच्या सेल्समध्यें वीजेच्या योगानें रासायनिक क्रिया घडवून आणता येते; आणि या क्रिया पूर्वावस्थेला जाऊं लागल्या म्हणजे वीज उत्पन्न होते. अशा प्रकारें रासायनीक क्रियेच्या स्वरूपांत वीज साठवितां येते.

**संग्राहक ( Accumulator ) कशाला म्हणतात ?**

लेड ऑक्झाइडच्या खळीनें दोन शिशाच्या कांबीचे जोड भरावेत एक धन व दुसरा ऋण जोड असावा. हे सल्फ्युरिक ऑसिडध्यें बुडवावेत. यांच्यांतून डायनमोमधील विद्युत्प्रवाह गेला म्हणजे यांच्या गुणधर्मांत फरक होतो आणि जरूर लागेल तेव्हां यांतून वीज मिळू शकते.

**वीज पदार्थ उचलू शकते काय ?**

विजेनें लोखंडाचें लोहचुंबक केलें म्हणजे ही शक्ती त्यांत येते. विद्युत् लोहचुंबक मोठाल्या कारखान्यांत लोखंडाच्या जिनसा एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं उचलण्याकरीतां उपयोगांत आणतात.

**इलेक्ट्रोलिसिस कशाला म्हणतात ?**

द्रव पदार्थांतील रासायानिक द्रव्यें विजेनें निरनिराळीं करणें याला वरील नांव आहे.

**गीलीट कशाला म्हणतात ?**

एखाद्या धातूवर चांदीचा किंवा निकलचा थर देणें याला गीलीट म्हणतात.

**इंडक्शन कशाला म्हणतात ?**

विद्युत्प्रवाह वाहणारी तार, दुसऱ्या प्रवाह वाहणाऱ्या तारेजवळ आणली व समांतर धरली, तर पहि-

लींतला प्रवाह दुसरींत आकर्षला जाईल,मात्र पहिलीं-तला प्रवाह एकदम थांबविला पाहिजे.

**स्वीच म्हणजे काय ?**

स्वीच हा साखळींतील दुव्या प्रमाणें आहे. ज्या दोन तारांतून वीज वहावयाची असेल त्यांना हा जोडतो.वीजेच्या दिव्याकडे जाणाऱ्या प्रत्येक तारेंत फट असते.ही फट स्वीचनें जोडली जाते व दिवा लागतो.

**तापलेली तार कशाला म्हणतात ?**

प्रत्येक प्रवाह जाणारी तार रेशीम, रबर किंवा गटापर्चानें वेष्टित असते. हें वेष्टन नसेल तर आंतील तारेला तप्त तार म्हणतात. विजेच्या रेल्वेची तार अशी असते.

**तारेंतून वीज जाते काय ?**

तारेवर वेष्टन नसेल व दुसरी तार जवळ असेल तर वीज दुसऱ्या तारेंत जाते.

**वीज किती प्रवास करते ?**

प्रवाह तारेंतून ताबडतोब सुरू होतो. तार मोठी किंवा जाड असेल तर प्रवाह पसरण्यास थोडा फार वेळ लागतो, पण हा वेळ सेकंदाच्या शतांश असतो.

**वीजेनें घंटा कशी वाजते ?**

वीद्युन्मय लोहचुंबकांनीं घंटा वाजते. लोहचुंबक घंटेचा टोला आपल्याकडे ओढतो व घंटेवर आदळतो. परंतु टोला घंटेवर आदळला कीं, प्रवाह येणाऱ्या धातूपासून तो वेगळा होतो व प्रवाह थांबून विजेच्या लोहचुंबकाची शक्ती नष्ट होते. नंतर एक स्प्रिंग तो टोला पुनः मागें ढकलते व प्रवाह पुनः सुरु होतो. अशा प्रकारें घंटा वाजत रहाते.

**विद्युत् तरंग कशाला म्हणतात ?**

हवेमध्यें जी वीजेची लाट चोहोंकडे पसरते तिला विद्युत् तरंग म्हणतात.

**ही लाट किती वेगानीं जाते ?**

ती प्रकाशाइतकीच म्हणजे सेकंदाला १८६००० मैल जाते.

**लाट किती लांब असते?**

विद्युत्जनक दर सेकंदाला जितक्या लाटा पसरवील त्यावर हें अवलंबून असतें. बिनतारेच्या लाटा ३०० पासून २७००० यार्ड लांब असतात.

**बिनतारीचा संबंध विजेशीं असतो काय ?**

बिनतारेच्या खुणा विजेच्या लाटा सुरूं झाल्या म्हणजे ऐकू येतात किंवा मोजता येतात.

**फेरी कशाला म्हणतात ?**

ज्या मार्गानें विजेच्या प्रवाहाची पूर्ण प्रदक्षिणा होते त्याला फेरी म्हणतात. जर बॅटरीचा धनदांडा विद्युत् लोहचुंबकाच्या तारेच्या एका टोंकाला लावला, व ऋण दुसऱ्या टोंकाला लावला, तर फेरी पूर्ण होते.

**डायरेक्ट प्रवाह म्हणजे काय ?**

एका दिशेनें वहाणाऱ्या प्रवाहाला डायरेक्ट करंट म्हणतात. बॅटरीज व विद्युत्संग्राहक डायरेक्ट प्रवाह देतात. डायनेमो दोन्ही प्रकारचे प्रवाह देतो.

**आल्टर्नेटींग प्रवाह कशाला म्हणतात ?**

आपल्या प्रवाहाची दिशा सारखी बदलणाऱ्या प्रवाहाला वरील नांव आहे. हा प्रवाह व्होल्टेजमध्यें जास्त कमी करतां येतो.

**ॲन्टीना कशाला म्हणतात ?**

हवेंत सोडलेल्या व बिनतारेच्या यंत्राला भिड-णाऱ्या तारेला ॲन्टीना म्हणतात. ही तार आवाज उत्पन्न करणाऱ्या चिमट्यासारखी असते. जेव्हां विजेच्या लाटा तिला येऊन भिडतात, तेव्हां त्यांत स्पंदन सुरु होतें.

**थर्मोस्टाट काय असतो ?**

पाण्याचें टाकें किंवा भट्टी एका विशिष्ट उष्णता मानांत रहावें म्हणून ही योजना असते. उष्णतामान जास्त झालें तर प्रवाह थांबतो व ठराविक प्रमाणांत आल्यावर सुरु होतो.

**पाऱ्याच्या वाफेचा दिवा काय असतो ?**

हा तेजस्वी हिरवा प्रकाश असून तो निर्वात अशा

पारा असलेल्या कांचेच्या नळींत विजेच्या योगानें उत्पन्न होतो.

**गालव्हेनोमिटर म्हणजे काय ?**

तारेच्या गुंडाळी जवळ जी लोहचुंबीत सुई असते तिला वरील नांव आहे. या सुईच्या योगानें प्रवाहाची शक्ती अजमावता येते.

**विद्युत् मापक कशाला म्हणतात ?**

विज मोजणाऱ्या यंत्राला विद्युत् मापक म्हणतात.

**वीज पोस्टांनीं पाठविता येते काय ?**

तबकडीवर वीज सांठविता येते. ह्या तबकडया पाठ वितां येतात व ॲसीडमध्यें ठेवल्या म्हणजे वीज उत्पन्न करू शकतात.

**वीजेच्या शक्तीला मर्यादा आहे काय ?**

नाहीं. वाटेल तेवढी वीज उत्पन्न होऊं शकते. तिला बंधन नाहीं.

**पुढील अंकीं आगगाडीसंबंधीं प्रश्नोत्तरें येतील.**

---

## बळवंतरावांचा लोभीपणा.

[ **लेखकः**—वासुदेव य. नायक, मडगांव, गोंवा. ]

बळवंतराव काल रोंजीं आगगाडींतून जात असतां त्यांच्या शेजारीं बसलेल्या एका लुच्या मनुष्यानें त्यांच्या तोंडाकडें अगदीं केविलवाण्या मुद्रेनें पाहून विचारलें रावसाहेब आपण ५ वर्षांपूर्वीं पणजीस होता नव्हे ?

रावसाहेब पणजीस कधींही गेले नव्हते. परंतु हा मनुष्य काय सांगतो हें पाहाण्याकरितां रावसाहेबांनीं होंय म्हटलें. त्यावर त्यानें सांगितलें कीं आपण एके दिवशीं कोणा एका कंगाल मनुष्यास द्रव्याची मदत केली होती नाहीं ? तोच मनुष्य मी. आपण दिलेल्या त्या ५० रुपयांपासूनच माझा भाग्योदय झाला. हल्लीं आपल्या कृपेनें मी १०–२० हजारांचा मालक आहें त्याबरोबर बळवंतरावांनीं त्या मनुष्याजवळ आनंद प्रदर्शित केला. नंतर तो म्हणाला आपल्यामुळेंच मी ही स्थिति पाहात आहें. आपली आज गांठ पडली ही मी ईश्वरी कृपाच समजतों. आपण दिलेले ५० रुपये सव्याज परत करून आज मी अल्पसा तरी उतराई होण्याचा प्रयत्न करणार आहे. माझ्या जवळून आपण ६० रुपये तरी परत घेऊन मला उपकार फेडण्याचें सौख्य मिळवून द्यावें, त्याशिवाय मला सौख्य वाटणार नाहीं. असें म्हणून चोरानें १०० रुपयांची नोट काढून रावसाहेबांच्या पुढें केली. रावसाहेबांनीं वरवर नको नको म्हटलें, पण लोभ सुटेना. शेवटीं तो ऐकेनासें पाहून जवळचे ४० रुपये परत देऊन ती नोट घेतली. तो मनुष्यही मोठ्या समाधानानें गाडींतून उतरला. दुसरें दिवशीं त्यांस ती नोट मोडण्याचा प्रसंग आला तेव्हां ती बनावट असल्याचें कळून आलें.

गरीब बिचारा बळवंतराव बुडींत खात्यांत ४० रुपये लिहून स्वस्थ बसला.

# रामजी.

[ लेखकः— धों० खं० कुलकर्णी. ]

**जैसी जैसी वेळ पडे । तैसे तैसे होणें घडे । तुका म्हणे जाण । सुख दुःख तें समान ॥**

पुष्कळ दिवसांपासून रामजीला आपलें स्वतःचें एक शेत असावें असें फार वाटे. पण रामजी पडला गरीब ! दुसऱ्याच्या शेतांत राबून येतील तितक्या पैशांवर आपल्या बायकापोरांचा सांभाळ करणेंच त्याला पुष्कळ होई. तरी पण रामजी मोठा मेहनती गडी होता. केव्हां ना केव्हां तरी आपण एखादें शेत घेऊंच अशी त्याला उमेद होती, व मिळविलेल्या पैशांतच काटकसरीनें वागून, त्यानें थोडे पैसे आपल्या पिशवींत सांठवून ठेविले होते. रामजी हा सालसवृत्तीचा सज्जन माणूस होता, अर्थात त्याला कर्जानें कुणीहि पैसे दिले असते, पण रामजी कर्ज काढण्याच्या भानगडींत पडला नाहीं. अंगमेहनतीनें मिळालेल्या पैशानींच शेत घ्यावयाचें मग त्याला वेळ लागला तरी चिंता नाहीं. असा त्याचा निश्चय होता. तेव्हां त्यानें गांवातल्या श्रीमंत शेटजीपुढें तोंड वेंगाडलें नाहीं व तोंड वेंगाडण्याचा प्रसंग येऊं नये अशी त्याची मनापासून इच्छा होती.

रामजी स्वतः मेहनती असल्यामुळें त्याच्या घरांतही तेंच वळण लागलें असल्यास नवल नाहीं. त्याची बायकोही मजूरी करून थोडें बहुत धान्य आणि. त्याचे दोन मुलगेही वयांत आल्यावर दुसऱ्यांच्या शेतांत मजूरीनें जाऊं लागले. आतां रामजीची इच्छा पूर्ण होण्याचा रंग दिसूं लागला. कारण त्या चौघांच्या मजूरीच्या पैशांवर त्या सर्वांचें पोट सहज भागे. पैशाची भर पडून त्याची पिशवी फुगू लागली, व एक शेत घेण्याइतके पैसे जमले. आतां फक्त पैसे मोजून शेत ताब्यांत घ्यावयाचें एवढेंच काम राहिलें.

गांवाबाहेर एक दोन मैलांवरच डोंगरपायथ्याशीं एक पडीत जमीन होती. त्या जमिनीवर बीं घालणें म्हणजे खडकावर घालण्यासारखेंच होय. अशी त्या गांवच्या साऱ्या शेतकऱ्यांची समजूत होती.

पुष्कळ दिवस त्या जमिनीचा उपयोग कुणी न केल्यामुळें त्या जागेंत बरींच झाडें वाढलीं होतीं. त्याच जमिनीवर रामजीचा फार दिवसांपासून डोळा होता, व जवळ पैसे जमतांच कुणाच्या उपदेशाची वाट न पाहतां ती जमीन विकत घ्यावयाची असा त्याचा बेत होता. ही गोष्ट त्यानें कांहीं शेतकऱ्यांजवळ बोलून दाखविली. पण त्यांनीं रामजीची थट्टा केली. व ती पडीत जमीन न घेण्याबद्दल त्याला बजाऊनही सांगितलें. पण रामजी त्यावर कांहीं बोलला नाहीं. पैसे घेऊन तो सरळ जमीनीच्या मालकाकडे गेला. व ती पडित जमीन त्यानें आपल्या ताब्यांत घेतली.

याबद्दल त्याच्यावर गांवच्या लोकांनीं टीकेचा भडिमार केला. कांहींनीं तर रामजीला मूर्खांत काढलें. तिकडे दुर्लक्ष करून रामजी आपल्या शेताच्या कामास लागला.

आपल्या दोघां मुलांच्या सहाय्यानें अगोदर त्यानें त्या जमिनींत वाढलेलीं झाडें तोडून ती साफ केली.

नंतर त्यावर दोनदां चांगला नांगर मारून ती जमीन भुसभुशीत केली. सुदैवानें त्याच वर्षीं चांगला पाऊस पडला. व त्या गांवच्या सर्व शेतांत चांगलेंच पीक आलें. त्यांत रामजीच्या शेतांतील जोंधळ्याच्या पिकासारखें पीक आलेलें आमच्या तरी आठवणींत नाहीं, असें त्या गांवचे वृद्ध शेतकरी म्हणू लागले. नारळाएवढी मोठीं कणसें वाऱ्याच्या झुळकीनें रामजीच्या शेतांत डोलूं लागलीं. त्यावेळीं रामजील किती तरी आनंद झाला! रामजीला मूर्खांत काढणाऱ्या शेतकऱ्यांनीं तोंडांत आश्चर्यानें बोट घातलें. तेच शेतकरी आतां रामजीच्या तोंडापुढें स्तुति करूं लागल. दुसऱ्याच्या स्तुतीनें फुगून जाणारा अथवा निंदेनें निराश होण्याइतका रामजी कमकुवत नव्हता. त्याल दोन्हिंचीही किंमत तितकीच वाटे.

आपल्या प्रयत्नाचें फळ आपल्या कल्पनेबाहेर आलेलें पाहून कोणत्या मेहनती माणसाला आनंद वाटणार नाहीं? त्याच्या शेताची रास झाली तेव्ह तीन खंडी जोंधळे भरले. अशा प्रकारें दरवर्षीं चांगल पाऊस पडत जाऊन रामजीच्या शेतांत उत्तम पीक येऊं लागलें. त्याच्या गोठ्यांत सोळा बैलांची दावण दिसूं लागली. दहा बारा गाई म्हशी कुरणांत चरू लागल्या व शेतांत आठ दहा गडी राबूं लागले. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे, रामजी सात आठ वर्षांत चांगला श्रीमंत शेतकरी बनला. आसपासच्या खेड्यांत त्याच्याबद्दल स्तुतिपर उद्गार निघूं लागले कीं, खरोखर रामजी मोठा भाग्यवान पुरुष आहे आज त्याला कोणत्याही प्रकारची कमतरता नाहीं प्रयत्नाचें फळ परमेश्वर दिल्यावांचून कसा राहील असो. याप्रमाणें कांहीं वर्षें लोटलीं. रामजी आतां वृद्ध झाला होता. त्याच्याकडून आतां विशेष काम होत नसे. रामजीचे दोन मुलगे आतां चैनी झाले होते. घरच्या कामाकडे त्यांचें लक्ष नसे. एक मुलगा अशा वाईट व्यसनांतच मेला व दुसरा आपल्या बापाबरोबर भांडून दूरदेशीं निघून गेला. रामजीचे सुखाचे दिवस पालटले. चार पांच वर्षें त्या प्रांतांत सारखा दुष्काळ पडत गेल्यामुळें सर्व शेतकऱ्यांबरोबर त्याचीहि दैना झाली. गोठ्यांतलीं गुरें चाऱ्यावांचून तडफडून मेलीं. धान्याचा सांठा संपला, व त्याला उपास पडण्याचे दिवस आले. याप्रमाणें प्रयत्नानें श्रीमंत झालेला रामजी पुन्हां गरीब झाला. वृद्धपणीं रामजीला असे वाईट दिवस प्राप्त झाले. दुष्काळ जाऊन चांगला पाऊस पडला तरी वृद्धपणामुळें काम करण्याची त्याच्या अंगांत ताकद नव्हती. त्या सालस वृद्ध पतिपत्नीला मदत करण्यास कोणी राहिलें नाहीं.

रामजीच्या शेजारीं असलेल्या एका शेतकऱ्यास रामजीची दया आली. व त्यानें रामजीस व त्याच्या बायकोस आपल्या घरीं ठेवून घेतलें. वृद्धपणामुळें त्याच्या हातून कांहीं काम करणें होत नाहीं हें जाणून तो शेतकरी यांना विशेष काम करण्यास लावीत नसे. तरी पण आपल्या हातून होईल तितकें काम करण्यास रामजी व त्याची बायको चुकत नसत. संध्याकाळीं रामजी आपल्या एकतारीवर तुकारामाचे अभंग गोड सुरानें म्हणत बसे.

आपली श्रीमंती गेल्याबद्दल रामजीनें आपल्या मनाला कधीं वाईट वाटून घेतलें नाहीं. 'प्राप्त झालेल्या स्थितींतच परमेश्वराचें नामस्मरण करीत सुखासमाधानानें रहाण्यांतच आयुष्याचें खरें सार्थक होय.' असें रामजी नेहमीं आपल्या बायकोजवळ म्हणे. या त्याच्या उपदेशानें त्याच्या बायकोनेंही आपल्या दारिद्र्याबद्दल कधीं कुरकुर केली नाहीं. आपल्या दारिद्र्याबद्दल वाईट न वाटतां उलट सुखांतच त्यांचा काळ जातो याबद्दल गांवच्या लोकांना आश्चर्य वाटे. असो.

एके दिवशीं संध्याकाळीं अभंग म्हणून झाल्यावर, अभंग ऐकत बसलेल्या एका गृहस्थानें रामजीस विचारलें

" काय रामजी दादा, तुम्हाला तुमच्या हलींच्या स्थितिविषयीं वाईट वाटत असेल नाहीं. ? "

रामजी स्मित करून म्हणाला,

“ खरें सांगावयाचें म्हणजे या स्थितींत आम्हांला जें सुख वाटत आहे, तसें सुख आमच्या श्रीमंतींत सुद्धां मिळालें नाहीं, आणि हेंच सुख शेवटपर्यंत टिको अशी परमेश्वराजवळ प्रार्थना आहे. आमच्या श्रीमंतींत आम्ही परमेश्वराला विसरलों होतों. परमेश्वराचें नुसतें नांव घेण्यासुद्धां आम्हाला वेळ मिळत नव्हता. या पाहुण्याची व्यवस्था कर, त्या शेताचें काम कर, अशा धांदलींत आमचे दिवस गेल्यामुळें परमेश्वराची सेवा करण्यास आम्हा पाप्यांना वेळ मिळाला नाहीं. ऐश्वर्यमदानें धुंद झाल्यामुळें श्रीमंतींत ईश्वराचें मंगलनाम मुखांतून येत नाहीं. पण विपत्कालीं ईश्वराची आठवण झाल्याशिवाय एक क्षणही वायां जात नाहीं. विपत्कालीं ईश्वरावर भक्ति जडते आणि एकदां ती भक्ति जडली कीं त्यांत कोणत्याही क्षणभंगूर सुखाची इच्छा होत नाहीं. आतां आम्हांला कोणतीही इच्छा नाहीं. परमेश्वराचें पवित्र नाम मुखांतून येत असतांनाच आम्हांला मरण येवो अशी आमची इच्छा आहे. ”

रामजीचें हें भाषण ऐकून त्या गृहस्थाला आश्चर्य वाटलें. त्याची मुद्रा गंभीर झाली.

---

# क्यालेंडर.

[ लें०-श्रीपाद बाळकृष्ण देशपांडे. कुरोली-सिद्धेश्वर सातारा. ]

आपल्या पहाण्यांत अनेक प्रकारचीं क्यालेंडरें येतात पण त्यांत आटपशीर असून उपयुक्त अशीं फारच थोडीं असतात. ही अडचण लक्षांत घेऊन प्रस्तुतचा प्रयत्न केला आहे. या लेखांत लिहिलेल्या माहितीवरून वाटेल त्या सालचें क्यालेंडर अगदीं थोड्या प्रयासानें प्रत्येकास घरच्या घरीं तयार करता येईल.

ज्या सनाला ४ नें भाग जातो त्या सनाला लीप-वर्ष म्हणतात. लीप-वर्षातील फेब्रुवारीचे दिवस २९ असतात व इतर वर्षांतील फेब्रुवारीचे २८ असतात म्हणून लीप-वर्षाचें ३६६ दिवस व इतर वर्षाचे ३६५ दिवस असतात. ३६५ दिवसांच्या म्हणजे लीप-वर्षेतर वर्षांत जानेवारीची पहिली तारीख ज्या वारीं असते त्याच वारीं डिसेंबरची ३१ तारीख असते. यामुळें लीप-वर्षेतर वर्षांत अशी गम्मत होते कीं, एका सालच्या जानेवारीची पहिली तारीख मंगळवारीं आली तर पुढच्या सालच्या तारखा बुधवार, गुरुवार अशा वारांच्या क्रमाप्रमाणें येतात. लीप-वर्षाची भानगड नसती म्हणजे सर्व फेब्रुवारीचे २८ च दिवस असते तर दर सालच्या जानेवारीच्या पहिल्या तारखा वारांच्या क्रमाप्रमाणें आल्या असत्या. पण लीप-वर्षाचे ३६६ दिवस असल्यामुळें हा वारांचा क्रम चुकतो, तरी लीप-वर्षाच्या जानेवारीची पहिली तारीख त्या क्रमाला सोडून नसते. लीप-वर्षाच्या पुढेंच येणाऱ्या जानेवारीच्या पहिल्या तारखेला त्याचें प्रायश्चित्त भोगावें लागतें, उदाहरणार्थ:—१९२१, २२, २३ व २४ या सालांच्या जानेवारीच्या पहिल्या तारखा अनुक्रमें शनिवार, रविवार, सोमवार व मंगळवार या वारीं येतात. १९२५ सालच्या जानेवारीची पहिली तारीख बुधवारीं न येतां गुरुवारीं येणार हें उघड आहे. १९२६, २७ व २८ सालच्या जानेवारीच्या पहिल्या तारखा कोणकोणत्या वारीं येतील हें सहज सांगतां येईल. या योजनेनें वाटेल त्या मागच्या व पुढच्या सालची जानेवारीची पहिली तारीख कोणत्या वारीं येईल हें काढतां येईल.

प्रत्येक वर्षांतील महिन्याच्या पहिल्या तारखेच्या वारांचा क्रम लावून पाहिला तर लीप-वर्षाचा एक क्रम व इतर वर्षांचा एक क्रम असे दोन प्रकार पडतात. त्या दोन क्रमांचीं दोन कोष्टकें खालीं दिल्याप्रमाणें आहेत.

## लीप–वर्षांतील महिन्यांचा गट.

( या कोष्टकांत वार व मराठी महिने १९२४ चे भरले आहेत. )

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| जानेवारी<br>एप्रील<br>जुलई | मंगळ | बुध | गुरु | शुक्र | शनि | रवि | सोम | मार्ग. व॥ ९ ते पौष व॥ १० अखेर<br>फा. व॥ १२ ते चै. व॥ १२<br>ज्ये. व॥ १४।३० ते आषा. व॥ ३० |
| ऑक्टोबर | बुध | गुरु | शुक्र | शनि | रवि | सोम | मंगळ | आश्विन शु॥ ३ ते का. शु॥ ४ |
| मे | गुरु | शुक्र | शनि | रवि | सोम | मंगळ | बुध | चैत्र व॥ ३ ते वैशाख ॥ १३ |
| फेब्रुवारी<br>आगस्ट | शुक्र | शनि | रवि | सोम | मंगळ | बुध | गुरु | पौष व॥ ११ ते माघ व॥ १०<br>श्रावण शु॥ १ ते भाद्र. शु॥ १ |
| मार्च<br>नवंबर | शनि | रवि | सोम | मंगळ | बुध | गुरु | शुक्र | माघ व॥ ११ ते फा. व॥ ११<br>कार्ति. शु॥ ५ ते मार्ग शु॥ ४ |
| जून | रवि | सोम | मंगळ | बुध | गुरु | शुक्र | शनि | वैशाख व॥ १४ ते ज्ये. व॥ १४ |
| सप्टेंबर<br>डिसेंबर | सोम | मंगळ | बुध | गुरु | शुक्र | शनि | रवि | भाद्र. शु॥ २ ते आश्विन शु॥ २<br>मार्ग. शु॥ ६ ते पौष शु॥ ६ |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| शके १८४५ ला रुधिरोद्गारी नाम संवत्सरें व १८४६ ला रक्ताक्षी नाम संवत्सरें | १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | १९२४ च्या एप्रीलच्या ४ तारखेपर्यंत शके १८४५ आहे. ५ तारखेपासून १८४६ शके लागणार आहे. |
| | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | |
| | १५ | १६ | १७ | १८ | १९ | २० | २१ | |
| | २२ | २३ | २४ | २५ | २६ | २७ | २८ | |
| | २९ | ३० | ३१ | | | | | |

कोणत्याही लीप वर्षास पहिलें कोष्टक लागू पडेल व कोणत्याही लीप वर्षेतर वर्षास दुसरें कोष्टक लागू पडेल. १९२४ च्या जानेवारीची पहिली तारीख मंगळवारी आहे तेव्हां कोष्टकांतील पहिल्या घरांत मंगळवार लिहून बाकीचे वार कोष्टकांत लिहिल्याप्रमाणें लिहावेत. या प्रमाणेंच बाकीच्या सालचें करावें. वरील दोन्हीं कोष्टकांत महिन्यांचा क्रम राहात नाहीं व तो राहाणारही नाहीं वारांचा क्रम साधला आहे. मराठी महिनेही कोष्टकांत लिहिल्याप्रमाणें पाहिजे असल्यास लिहावेत. शकासंबंधानें व संवत्सरासंबंधानें हीं पाहिजे असल्यास लिहावें. एकदां हीं दोन कोष्टकें तयार केलीं म्हणजे वाटेल त्या सालचें क्यालेंडर करावयाचें अवघड नाहीं. वारांचा क्रम वगैरे बदलला म्हणजे झालें.

दरसालचीं क्यालेंडरें जपून ठेवावींत. त्यांचा मागेंपुढें पुष्कळ उपयोग होतो. लीप वर्षाचीं ७ व लीपवर्षेतर वर्षांचीं ७ क्यालेंडरें अशीं जपून ठेवावींत कीं, त्यांत पहिल्या तारखेच्या ठिकाणीं सर्व वार असतील. किंवा अशा प्रकारचीं १४ ( ७+७ ) क्यालेंडरें

आधींच करून ठेविली म्हणजे पुन्हा क्यालेंडर करावयाचें कारण नाहीं. मात्र अशा क्यालेंडरांतून मराठी महिने लिहून चालणार नाहीं; कारण ते महिने पूर्वीप्रमाणें जमणार नाहींत. प्रत्येक वर्षाला त्यांतलें जें क्यालेंडर लागेल तें वर काढून ठेवावें. सनाचा व शकाचा आंकडा मात्र बदलला पाहिजे.

पहिली तारीख ज्या वारीं असते त्याच वारी ध्यानांत राहाणें कठीण नाहीं. पाहिजे तर हीं कोष्टकें ज्या ठिकाणीं आपण ठेवूं, त्याच्या जवळच कोठें तरी यंदाच्या सालची असणारी खूण करून ठेवावी. ही खूण व इसवी सन हीं जवळच लिहावींत. पहिली तारीख समजली कीं ८, १५, २२ व २९ ह्या तारखा समजतात हें वर दाखविलेंच आहे. आणि ह्या तारखा समजल्या कीं बाकीच्या कळतीलच. इतर महिन्यांच्या

## लीपवर्षेतर महिन्यांचा गट.

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| जानेवारी आक्टोबर | | | | | | | | |
| मे | | | | | | | | |
| आगस्ट | | | | | | | | |
| फेब्रुवारी मार्च नवंबर | | | | | | | | |
| जून | | | | | | | | |
| सप्टेंबर डिसंबर | | | | | | | | |
| एप्रील जुलई | | | | | | | | |

८, १५, २२ व २९ ह्याही तारखा असतात हें चांगलें ध्यानांत राहिलें म्हणजे या दोन क्यालेंडरांवरून वाटेल त्या सालची तारीख काढता येईल. प्रत्येक वाराच्यावर निराळ्या प्रकारची खूण केलेली आहे वर्षारंभ झाला म्हणजे पहिली तारीख कोणत्या वारीं आहे हें पाहून त्या वारावरची खूण लक्षांत ठेवावी. यंदाच्या सालची अमक्या प्रकारची खूण आहे हें पहिल्या तारखा त्या खुणेच्या सदरांत लिहिलेल्या वारांच्या क्रमाप्रमाणें येणार असल्यामुळें त्या कळणें अवघड नाहीं. समजा, एखाद्या लीप-वर्षाच्या जानेवारीची पहिली तारीख गुरुवारीं आहे तर – ही खूण ध्यानांत ठेवावयाची आणि त्याच खुणेच्या घरांत बाकीच्या महिन्यांच्या पहिल्या तारखा पहावयाच्या.

## कायमचें क्यालेंडर.

वरील दोन कोष्टकांवरून कायमचें क्यालेंडर करावयाचेंच झालें तर तें पुढील प्रमाणें करता येईल.

### लीप-वर्षांचें कोष्टक.

| | + | — | × | ÷ | = | ∘ | ‖ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| जानि० एप्रिल जुलई | सोम | मंगळ | बुध | गुरु | शुक्र | शनि | रवि |
| आक्टो. | मंगळ | बुध | गुरु | शुक्र | शनि | रवि | सोम |
| मे | बुध | गुरु | शुक्र | शनि | रवि | सोम | मंगळ |
| फेब्रु० आगस्ट | गुरु | शुक्र | शनि | रवि | सोम | मंगळ | बुध |
| मार्च नवंबर | शुक्र | शनि | रवि | सोम | मंगळ | बुध | गुरु |
| जून | शनि | रवि | सोम | मंगळ | बुध | गुरु | शुक्र |
| सप्टेंबर डिसेंबर | रवि | सोम | मंगळ | बुध | गुरु | शुक्र | शनि |

### लीप-वर्षेतर वर्षांचें कोष्टक.

| | △ | ⌓ | ▭ | * | ╲ | ∘∘ | ++ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| जानि० अक्टो. | सोम | मंगळ | बुध | गुरु | शुक्र | शनि | रवि |
| मे | मंगळ | बुध | गुरु | शुक्र | शनि | रवि | सोम |
| आगस्ट | बुध | गुरु | शुक्र | शनि | रवि | सोम | मंगळ |
| फेब्रु० मार्च नवंबर | गुरु | शुक्र | शनि | रवि | सोम | मंगळ | बुध |
| जून | शुक्र | शनि | रवि | सोम | मंगळ | बुध | गुरु |
| सप्टेंबर डिसेंबर | शनि | रवि | सोम | मंगळ | बुध | गुरु | शुक्र |
| एप्रील जुलई | रवि | सोम | मंगळ | बुध | गुरु | शुक्र | शनि |

---


# फळा.

शाळेंतील फळ्याचे ऐवजीं **कापड.** रुंदी ३० इंच दर वारास १ रु. हें कापड खरखरीत असून त्याज-वर खडूनें उत्तम प्रकारें लिहितां येतें पाण्यानें पुसलें असतां कापड ओलें होत नाहीं.

म्यानेजर--चित्रशाळा प्रेस, पुणें.

# स्वराज्याचें तोरण.

( मुलांकरितां संगीत नाटक. अंक १-३ )

( ले०:—ह. कृ. कुलकर्णी, शिक्षक नू. म. वि. पुणें. )

## मंगल चरण

[ देखावा:—भवानी देवीचें देऊळ. देवीची आरती चालू आहे. शिवाजी, तानाजी, येसाजी, बाजी हात जोडून उभे आहेत. ]

पद—स्तवन

( चा०—पांडवा सम्राट्० — )

**वंदना श्रीराष्ट्रदेवी ॥**
**क्षात्रतेजा प्रकटवी ॥ ध्रु० ॥**
**यवनसत्ता भार पुरता ॥**
**नष्ट करि हा सत्वरी ॥१॥**
**दीनदुबळी हिंदजनता ॥**
**त्रासली गे बहुदिनीं ॥ २ ॥**
**मुक्त करि परदास्य तोडुनी ॥**
**देई स्वातंत्र्यासि गे ॥ ३ ॥**

**शिवाजी०**—प्रथम श्रीभवानी मातेचें पुण्य दर्शन झालें. आतां असेंच विजापुरास कूच करावें असें मला वाटतें. मातोश्रीचें दर्शन करून त्यांची आज्ञा घेऊनच आपण निघालों आहोंत.

**तानाजी०**—होय सरकार. त्या तयारीनेंच आपण निघालों आहोंत. बाहेर घोडीं तयार आहेत.

शि०—चला तर. विजापुरास ज्या कामासाठीं आपण चाललों आहोंत तें काम तर फत्ते होणार यांत शंका नाहीं, चला

ता०—सरकार काम फत्ते होणारच. या भवानी मातेचा आपणांवर तसाच अनुग्रह आहे

शि०—हो, चला; अजून आपल्याला बरीच मजल मारावयाची आहे. वेळ घालवितां कामा नये.

( सर्व जातात पडदा. )

## अंक पहिला.

प्रवेश:—१ ला.

( शिवाजी, तानाजी व येसाजी प्रवेश करतात. )

शि०—या अविंधांच्या जुलमानें आमचा हा देश कसा अगदीं त्रासून गेला आहे. ज्या रयतेच्या पैशावर हे एवढें राज्ययंत्र हांकितात आणि हा एवढा सावळा गोंधळ घालतात त्या लोकांना-त्याच आमच्या प्रियदेश बांधवांना हे परके लोक केवळ सत्तेच्या जोरावर छळतात, नाहक नाडतात, क्रूरतेनें त्यांची हिंसा करितात व अधमपणानें त्यांना जातिभ्रष्ट करतात. यांच्या या जुलमी सत्तेला निरुपायानें मान तुकविणाऱ्या या आमच्या हिंदी प्रजेची कींव करावी तितकी थोडीच आहे ! काय ही सहनशीलता !! केवढा हा स्वार्थत्याग !! याला म्हणावी सुप्रजा !!

ता०—महाराज, याला सुप्रजाच काय पण साधुप्रजा म्हटल्यानें सुद्धां कांहीं वावगें होणार नाहीं. यांच्यासारखे मोठमोठ्या साधूंना तरी वागतां येईल का ? आपला घरचा पैसा ह्यांनीं त्यांना द्यायचा आणि त्याच पैशावर माजलेल्या या रेड्यांच्या पुन. यांनीं लाथा खायच्या !! खासा न्याय !!

**येसाजी०**—हा न्याय तर खासाच ! पण हें कशाच्या जोरावर, आलें कां ध्यानांत ? हा एवढा परिणाम त्यांच्या त्या शक्तीचा बरें ! तानाजी !!

**शिवा०**—कसली आली आहे शक्ती ! हा परिणाम त्यांच्या त्या शक्तीचा म्हण !! परदेशाहून भीक मागत आलेल्या या मूटभर लोकांची शक्ती, आम्हां हिंदुस्थानांत पिढ्यानुपिढ्या राहत असणाऱ्या

२५ कोटी लोकांच्या शक्तीपेक्षां जास्त असेल का? या सर्व लोकसमुदायांतले शूर लोक, बडे बडे सरदार व ताज्या दमाचे सर्व लोक जर एकाच निशाणाखालीं गोळा होतील तर हां हां म्हणतां हा जुलमी अंमल झुगारून देतां येईल, इतकेंच नव्हे तर हा अंमल असा पायाखालीं तुडवितां येईल ! !

ता०—आमचेच जातभाई, आणि ते त्यांच्यापासून मिळणारा तुकडा चघळीत त्यांच्या पायाशीं शेंपूट हालवीत लोळत आहेत ना? त्यांचा हा स्वार्थ साधूपणा जाईल तेव्हां खरा ! !

ये०—याच लोकांच्या हातांतला कारभार आपण सर्वांनीं मिळून हिसकावून घेतला तर त्यांना याही पेक्षां जास्त स्वार्थ नाहींका साधतां येणार? पण—

शि०—खरें जर पाहूं गेलें तर आपल्यावर अंमल करणारे आपलेच जातभाई ना? पण ते या परक्यांच्या हुकुमानें वागणारे! यामुळें तर आपल्याला हा त्रास भोगावा लागतो. ह्या परक्यांच्या हातांत खेळणारीं हीं आमुचीं बाहुलीं जरा स्वस्थ बसूं द्या, पहा काय गंमत होते ती. क्षणाचाही अवकाश न लागतां "नको हें तुमचें राज्य, तुमचें तुम्ही सांभाळा, आम्ही आपलें जातों." असें म्हणण्याची यांना खास पाळी येईल.

ता०—पण यांना जोंपर्यंत मलिदा चरायला मिळतो, तोंपर्यंत हीं बाहुलीं आपला खेळखंडोबा कसा पुरा करणार? आणि हें सारें कसें घडणार?

ये०—याला तर उपाय एकच दिसतो बुवा. हीं आपलीच म्हातारी मंडळी याची इमानानें चाकरी करितात यांनाच आधीं फोडिलें पाहिजे. आपलेच फितुरी याच्या बाजूला आपण राहूं देतां कामा नये.

शि०—अहो हीं म्हातारी मंडळी आम्हांला बघतील असें तुम्हाला वाटतें? ही आशाच नको त्यांना केवढी घमेंड! त्यांना आपल्या अनुभवाचा केवढा गर्व? हें उलट आम्हांलाच 'हीं उडाणटप्पू कार्टीं' म्हणून शिव्या द्यायला कांहीं कमी करणार नाहींत. त्यांच्यांत जे विचारी आहेत त्यांना हा विचार समजतो पण उमजतो कीं नाहीं याचीच मला शंका आहे. यांच्यापैकीं जे आपणांस मदत करतील ते करोत, पण आपण मात्र यांच्यावरच विसंबून राहतां कामा नये. आपण स्वराज्याच्या विचारानेंच गोळा झाले पाहिजे. आणि जर कांहीं स्वराज्यस्थापना होण्याची आशा असेल तर ती या तरुण संघाकडूनच कांहीं आहे. आपल्या या स्तुत्य कार्याला हजारों लोक मदत करितील ही गोष्ट खरी! सर्व लोक या जुलमी अंमलाला कंटाळले आहेत यांतही शंका नाहीं. यांचे हे जुलमी कायदे मोडले पाहिजेत. यांचा हा जुलमी अंमल झुगारून दिला पाहिजे, यांचे हे जुलमी हुकूम पायाखालीं तुडविले पाहिजेत—

पद ( चाल गझल. )

॥ महाराष्ट्र दीन जनता । परदास्यपंकिं
आतां ॥ ध्रु० ॥
॥ यवनीय राजनीती । सैतानशाहि होती ॥
॥ लुटती स्वकीय-वित्ता । उरली नसेचि
स्थिरता ॥ १ ॥
॥ धर्मास बाटवीती । देवास भ्रष्ट करिती ॥
जुलुमा नसेचि हर्ता । शांती धरी न वदतां ॥२॥

ता०—ज्या राज्यांत गो-ब्राह्मणांचा छळ होऊं लागतो त्या राज्याचें आयुष्य संपलें. त्यांच्या सद्दीचा जोरच कमी झाला असें खास समजावें.

ये०—यापुढें जर मी बुवा असा निश्चयच केला आहे, कोणी एकादा नरपशू गोवध करूं लागला, कीं त्याचे हात तोडायचे व त्याचा शिरच्छेद करायचा, हिंदूंना त्याच्या धर्माला पारखें करून त्यांना बाटविणाऱ्या या अविंधांना यमसदनालाच पाठवाव-

याचें असा माझा कृतनिश्चयच आहे. या सत्कार्यामध्यें मला त्रास भोगावा लागला तरी तो मी भोगेन. प्रसंगीं प्राणास मुकण्याची पाळी आली तरी मोठ्या आनंदानें मी तें मरण पत्करीन, यापुढें हीं असलीं नीच कृत्यें मी मुळींच सहन करणार नाहीं.

शि०——शाबास! मित्रा शाबास!! तुझा निश्चय पाहून मला आनंद झाला. आम्हां तरुण हिंदपुत्रांचा सर्वांचाच असा निश्चय झाला पाहिजे.

पद:—( चा. सेवि रविकरा० )

**दावूं निश्चया। देशबंधमोचनिया दावूं**
**निश्चया॥ ध्रु.॥**
**सकल स्वजन ऐक्य होत। राष्ट्रसंघजनन**
**त्यांत होवो सबल। देवो अतुल।**
**दास्यमोचना॥ १॥**

असले तरुण मित्र जर मला मदत करायला मिळाले तर माझ्या हेतुसारखं करण्याला मला मुळींच वेळ लागणार नाहीं. माझ्या सांप्रदायांत येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला येसाजीप्रमाणेंच निश्चय करायला हवा; माझी खात्री आहे कीं, या जुलूमास कंटाळलेले हजारों तरुण आहेत. त्यांचा जीव तळमळतो आहे, त्यांचें रक्त सळसळतें आहे, त्यांचे मन संतापानें बेफाम होत आहे पण काय? तर त्या सर्वांना एक नियंता-एक पुढारी पाहिजे आहे. तो मिळतांच त्यांचें तें कार्य झालेंच म्हणून समजा!

**तानाजी**——आम्हांला तोहि मिळाला! महाराज, त्या दयाघन परमेश्वरानें आमची हांक पुरी ऐकली व आमच्या उद्धारासाठीं त्यानें जन्मही पण घेतला. महाराज, आपल्या सारख्याच्या पुढारीपणाखालीं हजारों तरुण वीर—हिंदू देवींचे सत्पुत्र हां हां म्हणतां गोळा होतील, आजपासून आम्ही याच उद्योगाला लागणार. माझ्या सारख्या तरुण लोकांमध्यें आपल्या पवित्र दर्शनानें व आपल्या सत्य उपदेशानें स्वदेशाभिमान उत्पन्न झाल्यावांचून राहणार नाहीं.

ये०— आपल्या खेळगड्यांत पुष्कळ वीर आहेत व ते महाराजांच्या आज्ञेप्रमाणें वागणारेही आहेत अजून शेंकडों लोक येताहेत व या स्वराज्याच्या निशाणाखालीं गोळा होत आहेत. (दूर पाहून) अरें हें काय? हा घोळका कसला? हे लोक तर इकडेच धांवत आहेत.

ता०—( पाहून ) अहो, हे तर आपले खेळगडीच आहेत. तो बाजी, तो नेताजी, तो सूर्याजी. ( दोन तीन लोक धांवत प्र. क. )

बाजी— ( प्र. क. ) महाराज, त्या महमंद खानाच्या घरापुढें एक गाय बांधली आहे व ती तो लवकरच मारणार आहे.

शि०— ( रागानें ) काय? गाय! आणि ती तो मारणार? गड्यांनो पाहतां काय? चला! त्या दीन गोमातेला वांचविलेंच पाहिजे. ( धांवत जातात. पडद्यांत—धावा, धावा. कोणी मला वांचवा, हीं पोरें मला मारतात हो धांवा. धांवा. )

शि०— ( प्र. क. ) ती गाय नेऊन आमच्या गोठ्यांत बांधा. गोवध करतां! गोवध!! करा. गोवध करतांना तुमचाच वध होणार हें पक्कें लक्षांत ठेवा. गाईसारख्या पवित्र प्राण्याला मारतां! व पापाचे धनी होतां? ' माझ्या या समशेरीचा असा निश्चयच आहे कीं गोब्राह्मणांचा प्रतिपाळ करावयाचा व त्यांच्या हक्कांवर गदा आणणाऱ्या या नराधमाचें पारिपत्य करावयाचें! या दुष्ट राक्षसांच्या हातून या पवित्र भूमातेची सुटका करावयाची व तिला स्वातंत्र्याच्या सुप्रकाशांत तळपूं द्यावयाचें, हा दृढ निश्चय माझ्या जीवांत जीव असे तोंपर्यंत तरी मी कदापि ढळूं देणार नाहीं! या नरपशूंना आपल्या देशाच्या पार हांकलून दिल्यावांचून माझा आत्मा कधींही शांत होणार नाहीं आणि माझें मन केव्हांही स्वस्थ बसणार नाहीं!'

प्रवेश २ रा.

( बापू, विनू, सोनू खेळत येतात. )

बा०—अरे विन्या, आतां पळतोस होय ! लेका डाव हरलास म्हणून पळतोस होय ! हुर्यो, एकेका पोराची हुर्यो झाली, हुर्यो, हुर्यो. सोन्या, ऐकलेंस कां ? एकेका पोराची हुर्यो झाली, हुर्यो झाली, हुर्यो, हुर्यो, हँ हँ—( हंसतो )

सो०—अरे, झालें काय ? त्याला इतका कां चिडवितोस ? चिडविण्यासारखें काय झालें तें तर सांगशील ?

बा०—विचार त्यालाच ( पुनः हंसतो ) एकेका पोराची हुर्यो झाली. ( उड्या मारतो. )

विनू०—बाप्या तोंड आवर, लगावीन बरें कां ? कुणाची हुर्यो झाली ? अंधार पडला म्हणून डाव आंवरला त्यांत काय वावगें झालें ? म्हणे हुर्यो झाली. दाखवीन तुला उद्यां. उद्यां तुझा डाव देतोंच कीं मी. मी काय नाहीं म्हणतों ? मग असें मूर्खासारखें कां ओरडतोस ?

बा०—देशील ? उद्यां डाव देशील ? बरं उद्यां पाहूं.

सो०—उद्यां मीहि तुमच्या डावांत येईन बरें कां रे ? मला घ्यालना तुमच्या डावांत ? आज मी भोंवरा खेळत होतों. माझा भोंवरा पण भोंवरा आहे; असा कुणाजवळच नाहीं सांपडायचा.

बा. व. वि०—( एकदम ) पाहूं रे कोठें आहे तो ? मला दाखीव. ( दोघेही त्याला झोंबूं लागतात. )

सो०—दम तरी धरा. मी फिरवूनच दाखवितों. दूर व्हा. ( दोघांसही दूर लोटतो. खिशांतून भोंवरा काढतो. येसाजी ( प्र. क. )

येसा०—गड्यांनो, तुम्हांला एक बातमी सांगायची आहे. ऐकली कां तुम्ही ती ?

सर्व०—नाहीं, नाहीं, काय ? काय बातमी ? सांग, सांग लवकर.

ये०—गड्यांनो तुम्ही हीं सर्व खेळणीं दूर फेंका. तर सांगतो. खेळाडू लोकांना कसली बातमीन् कसलें काय. त्यांचा चेंडू बरा कीं ते बरें.

सो०—जा, जा. नाहीं सांगितलंस तर नाहीं जा. बापू, विनू, हा बघा भोंवरा फिरवूं कां ? फिरवूं कां ?

ये०—( स्व. ) काय हीं मुलें यांना खेळाशिवाय दुसरें कांहीं सुचतंय कां ? ( सुस्कारा ) याचमुळें आमचें राज्य गेलें, पैसा गेला, व ही झोळी हातांत आली. बरं अशाच मुलांचें मन वळविलें पाहिजे. ( उघड ) आज शिवाजी महाराजांनीं एका मुसलमानास मारून एक गाय वांचविली गाय ? माहीत आहे कां तुम्हांला ? ( सर्व आनंदतात. )

बा०—वा, वा, छान केलें. गाय वांचविली? छान, छान, आणखिन् एका मुसलमानाला मारलें कां? वाहवा! वाहवा ! बहार झाली ! ! असेंच व्हायला पाहिजे.

सो०—अरे बापू, ये बापू, हा बघ! हा चेंडू!! वा! किती छान आहे. आहे कां तुझ्याजवळ असा? आणखिन् हा बघ. हा दांडू, कसा गोकाकचा रंगीत आहे. आहे कीं नाहीं छान ?

ये० ( हंसत ) तुम्ही आपल्या चेंडू दांडूंतच कां? या बातमीनें तुमच्या मनावर कांहींच कां? परिणाम झाला नाहीं?

बा०—झाला तर! शिवाजीनें हें फार चांगलें केलें.

ये०—केलें खरें! उद्यां बादशहापुढें जावें लागेल तें.!

बा०— ( घाबरून )अरे बापरे! बादशहा मग त्याला सुळावर देईल कीं!

ये०—हो. तशी कांहीं तरी शिक्षा व्हायचीच ! !
( सर्व घाबरतात. )

सो०—वेड्यासारखें शिवबानें कांहीं तरी केलें हें. आम्हां मुलांना घेऊन काय करावयाचें?

ये०—तुम्ही मुलांनीं फक्त चेंडू दांडूच खेळावा ना?

सो०— यांत काय संशय ! लहानपण हें खेळण्यासाठींच आहे. मोठा झाल्यावर कोण खेळतो कां ?

ये०—लहान मुलांना खेळाशिवाय दुसरा उद्योगच नाहीं म्हणाना ?

सो०—मला तरी बुवा ठाऊक नाहीं. आहे कां बापू तुला ठाऊक ?

बा०—मलाही नाहीं बुवा ठाऊक.

ये०—खेळाशिवाय दुसरे अनेक उद्योग आहेत. आपण मुलें राष्ट्राचे भावी आधारस्तंभ आहोंत. आपल्या देशाला चांगल्या स्थितींत आणणें, दुसऱ्यांचा हातुन त्याला सोडविणें हे का उद्योग नव्हेत ?

सो०—वा ! छान ! हे उद्योग आम्ही केल्यावर वडील माणसांनीं काय करायचें ?

बा०—त्यांनीं चेंडूदांडू खेळायचें.

ये०—वडील माणसें काय करावयाचें तें करतातच. आपण मात्र शिवाजी सारख्या शूर, पाणीदार पुढाऱ्याच्या मागें राहून त्यांना मदत केली पाहिजे व अशा रीतीनें देशाची कामागिरी केली पाहिजे. तुम्ही हे खेळ सोडून शिवाजीच्या मागें लागा, यांतच तुमचें कल्याण आहे.

सो०—छान सांगतोस येसाजी ! हे आनंदाचे खेळ सोडून म्हणे शिवाजीच्या मागें लागा; अन् करा काय तर त्याच्या बरोबर फांसावर चढा !। छान उद्योग ! खासा उपदेश ! ! कां बापू तूं जाणारना शिवाजींकडे ? विनू तूं ही जाणारना ?

वि. व बा०—( मान हालवून ) ऊं हूं ! कोण जातोय सुखाचा जीव दुःखांत घालायला ! !

सो०—मग चला जर आपण भोंवरा' खेळूं ( जातात. )

ये०—देशाचें काय दुर्दैव आहे पहा, ज्या नवीन पिढीवर देशाचें कल्याण अवलंबून आहे त्यांतलेच हे मासले !! त्यांना तरी कां दोष द्यां !! गुलामगिरीचें हें विषच इतकें जहाल असतें कीं तें एकदां भिनलें म्हणजे पिढ्यानुपिढ्या उतरत नाहीं ( सुस्कारा ) परमेश्वराच्या मनांत असेल तर तो अशा मुलांना सुद्धा सद्बुद्धि दिल्यावांचून राहणार नाहीं.

( अपूर्ण. )

## डोळ्यांत जादू.

तुमच्या डोळ्यांत जादू आहे काय ? आहे किंवा नाहीं हें कळण्याची तुमची इच्छा असल्यास खालील प्रयोग करून पहाः—

एक पांढरा कागद घेऊन त्यावर चार इंचाचा चौरस आंखून काढा. या चौरसावर इंचाच्या खुणा करून आखणीनें एका रेघेवरून समोरच्या रेघेवर दोहीं बाजूनीं आखून काढा. अशा रीतीनें तुमच्याजवळ सोळा इंचाचा चौरस तयार झाला. असे दोन चौरस करावे. दहा खडे व गोट्या घेऊन पैकीं तीन गोट्या व दोन खडे कोणी तरी एका चौरसावर वाटतील त्या क्रमानें ठेवाव्या. खेळणाऱ्या गड्यानें फक्त पांच सेकंदें मोजून गोट्या ठेवलेल्या चौरसाकडे लक्षपूर्वक पहावें. नंतर लगेच दुसऱ्या गड्यानें त्या चौरसावर झांकण घालावें. खेळणाऱ्या गड्यानें दुसऱ्या पांच गोट्या व खडे घेऊन दुसऱ्या चौरसावर स्मरणानें गोट्या व खडे असे ठेवल्या पाहिजेत कीं त्यांचा क्रम प्रथमच्या झाकलेल्या चौरसांतील गोट्यांप्रमाणें आला पाहिजे पहिला खडा बरोबर ठेवल्यास एक मार्क व एक गोटी ठेविलीतर पांच मार्क. अशा रीतीनें मार्क्स मोजायचें. असें तीनदां प्रत्येक गड्यानें खेळून झाल्यावर सर्वांचें मार्क्स मोजावें. ज्याचें सर्वांत जास्त भरतील त्याच्या डोळ्यांत सर्वांत ज्यास्त जादू समजली जाते. या खेळानें दृष्टीचा स्थिरपणा व स्मरणशक्ति हीं दोन्हीं वाढतात.

# सर जगदीश चंद्र बोस.

जगदीश चंद्रबोस यांचें नांव साऱ्या हिंदुस्थानांत ठाऊक आहे. त्यांच्यासारखे शास्त्रज्ञ ज्या देशांत जन्मास येतात तो देश खरोखरच भाग्यशाली समजला पाहिजे. जगदीश चंद्र बोस यांच्या शोधाविषयीं थोडीशी माहिती ह्या लेखांत देण्याचें योजिलें आहे.

सुमारें ४० वर्षांपूर्वी हे केंब्रीज मधील एका कॉलेजांत शिकत होते. त्यावेळीं प्रकाश—किरण व विजेचा प्रवाह एकाच प्रकारचे आहेत आणि वीज ही प्रकाशाप्रमाणें ईथरमधून जातें या शोधानें सारें जग आश्चर्य चकित झालें होतें त्यावेळीं विद्युल्लहरी नुकत्याच माहीत होत होत्या. या बीनतारी लहरी एकत्रीं करण्याकरितां एका फ्रेंच शास्त्रज्ञानें एक यंत्र तयार केलें होतें. ऑलीव्हर लॉज हाहि



बोस.

यासंबंधीं प्रयोग करीत होता. त्यावेळीं जगदीशचंद्र पुढें सरसावले व त्यांनीं सर्वापेक्षां अधिक उपयुक्त यंत्र तयार केलें व त्यांची सर्वांकडून वहावा झाली त्या वेळेपासून यांचें लक्ष शास्त्रीय शोधाकडे अधिक लागलें. सध्यां जो बीनतारीचा सुळसुळाट चहुंकडे झाला आहे, त्याचा पाया घालणाऱ्यांमध्यें हे बंगाली शास्त्रज्ञ मुख्य होते.

प्रकाशाचीं किरणें आरशावर पडलीं म्हणजे प्रकाश जसा परतवला जातो तशींच विजेचीं किरणें परतवितां येतात हा त्यांचा एक मोठा शोध होता. ही गोष्ट सिद्ध करण्याकरितां त्यांनीं एक लहानसें नाजूक यंत्र तयार केलें. प्रकाश—लहरींचा जसा गुंताळा होतो व त्या जसा एकमेकींना अडथळा करतात, तसाच ह्याहि अडथळा करतात असें त्यांनीं दाखविलें. आपली दृष्टी अत्यंत कोती असल्यामुळें आपल्याला प्रकाश पूर्णपणें दिसत नाहीं फार स्थूल प्रकाश आपणास दिसतो. परंतु कांहीं दिवसांनीं कदाचित् आपण सूक्ष्म प्रकाशहि पाहूं शकूं असें ते म्हणत असत.

हें त्यांचें भविष्य आज खरें ठरलें असून आपणांस प्रकाश—लहरी, विद्युत्—लहरी, अदृश्य प्रकाशलहरी, क्ष—किरण व रेडीअमचें किरणहि दिसूं शकतात.

परंतु हा शोध लावणें हेंच त्यांच्या आयुष्याचें इति कर्तव्य नव्हतें. त्यांना ईथरमध्यें असणाऱ्या असंख्य लहरी ज्या एका नियमांनीं बद्ध झालेल्या आहेत, त्याच नियमांनीं जगांतील सजीव व निर्जिव वस्तु बद्ध झालेल्या आहेत व काम करीत आहेत हें दाखवावयाचें होतें. त्यांना विश्वामध्यें पदार्थाविषयीं निरनिराळे नियम नाहींत हें सिद्ध करावयाचें होतें.

पृथ्वीवर असणारे असंख्य पदार्थ,, देदिप्यमान सूर्य, प्रकाशलहरी या सर्वांच्या बुडाशीं एकच तत्त्व आहे हें दाखविण्याचा त्यांचा उद्देश होता.

या त्यांच्या प्रयत्नाकडे साऱ्या शास्त्रज्ञांचें लक्ष लागलें होतें. प्रकाशाचा व विजेचा नियम त्यांनीं एकच कसा आहे हें दाखविलें. त्याचप्रमाणें त्यांना

सजीव निर्जीव पदार्थांत हा नियम दाखवावयाचा होता.

आपल्या बोटाला सुई टोंचली तर आपण एकदम दचकतों. आपले ज्ञानतंतू टोंचण्याला प्रत्युत्तर देतात. सुईपेक्षां अगदीं सूक्ष्म स्पर्श जरी बोटांना केला तरी तीच संवेदना होते. परंतु हा सूक्ष्म स्पर्श फार वेळ चालू ठेवला, तर तितका परिणाम आपणावर होत नाहीं.

कांहीं धातु अशा आहेत कीं, त्यांना उद्दीपित केल्याबरोबर आपल्या बोटाप्रमाणें त्या धातू डचकून उठतात असें बोसनीं सिद्ध केलें. धातू ही बोटाप्रमाणेंच पुष्कळ वेळ झाल्यानंतर दमते.

ज्ञानतंतू जसें बधीर करता येतात, तसेंच धातुहि बधीर होऊं शकतात. त्यांनीं मज्जातंतू, पत्रा व झाडाचें पान या तिहींना बधीर केलें व या तिहींत त्यांना एकच परिणाम दिसून आला. पितळ, जस्त व प्लॅटिनम ह्या धातू सजीव पदार्थाप्रमाणें आहेत असें त्यांना आढळलें. यावरून त्यांनीं सजीव निर्जीव पदार्थांना एकच नियम लागूं आहे असा निष्कर्ष काढला.

याच प्रकारचे प्रयोग ते आपल्या कलकत्ता येथील प्रयोगालयांत करीत असतात.

झाडामध्यें व झुडपामध्यें प्राण आहे किंवा नाहीं याविषयीं त्यांचे प्रयोग आज बरेच दिवस चालू आहेत.


मनुष्य ज्याप्रमाणें रक्त शोषतो त्याप्रमाणें झाडें आपला रस शोषीत असतात आणि हा रस २०० फूटाच्या झाडांत २० मिनिटांत अगदीं शेंड्याला जातो असें त्यांनीं दाखविलें. मनुष्याची नाडी जशी चालते तशी झाडांची नाडी चालते व मनुष्य, जसा कोणी मारावयास आला असतां दचकतो, तशींच झाडेंहि दचकतात हें त्यांनीं सिद्ध केलें. ज्या झाडांना हात लावला असतां, त्यांचीं पानें मिटतात, अगर थरथरूं लागतात, अशीं झाडें त्यांनीं प्रथम प्रयोगाकरितां घेतलीं. त्यांचीं हीं अवस्था पाहून त्यांनीं असें ठरविलें कीं, या पानांच्या कृतींत अशी कांहीं योजना आहे कीं, त्यायोगानें तीं पानें मिटतात. ही कृती स्पष्ट दिसावी म्हणून त्यांनीं एक यंत्र तयार केलें. या यंत्रावरून माणूस जसा दमतो, जसा दचकतो, जसा विषबाधेनें मरण पावतो, त्याप्रमाणें झाडेंहि अनुकरण करतात असें त्यांनीं स्पष्टपणें दाखविलें. थोडक्यांत, त्यांनीं मनुष्यांत व झाडांत अंतर नाहीं असें सिद्ध केलें.

अशा प्रकारची निरिक्षणाचीं यंत्रें तयार करतां करतां त्यांना पूर्ण यश येऊन त्यांनीं क्रेस्कोग्राफ म्हणून यंत्र बनविलें. तें यंत्र झाडाच्या आंतील क्रिया दश लक्ष पट मोठी करून झाडें वाढतांना व थरथर कांपतांना दाखविलें.


मनुष्य ज्याप्रमाणें निजतो, त्याप्रमाणें झाड निजतें, माणसांना जशी गाढ झोंप लागते तशी झाडांनाहि लागते. झुडपांना प्रकाश पाहिजे असला तर तीं प्रकाशाकडे वळतात. झाडेंही माणसाच्या अत्यंत सूक्ष्म इंद्रियापेक्षांहि अधिक कोंवळीं व हळवी असतात अशा प्रकारें त्यांनीं निरनिराळ्या यंत्राच्या सहायानें वनस्पतीसृष्टी मनुष्यसृष्टि यांचें अद्वैत सिद्ध केलें आहे. अजून त्यांना विश्वाचें अद्वैत सिद्ध करावयाचें आहे. तें सिद्ध करणें हें पुढील शास्त्रज्ञावरच त्यांना सोपवावें लागेल. शास्त्रें अपार आहेत व जीवित अत्यल्प आहे, त्यामुळें एकाच माणसाला साऱ्या गोष्टी करतां येणें शक्य नाहीं.

## ❀ फाजील स्वामीनिष्ठा. ❀

एकदां एक सिंह एका घराजवळ कांहीं जनावर खायला मिळेल म्हणून दबा धरून बसला होता.



इतक्यांत त्याला एक मांजर सांपडलें. त्याला घेऊन सिंह आपल्या गुहेंत आला. मांजर, हा सिंह आप-



त्याला खाईल, म्हणून भिऊं लागलें. पण सिंह म्हणाला " मी तुला खात नाहीं. या माझ्या घरांत रोज उंदीर येतात आणि माझी शेंपटी कुरतडतात, आणि माझें अन्न पळवतात. ते माझ्या हातीं लागत नाहींत. तेव्हां त्यांना तूं पकड आणि मजा मार." मांजराला हें म्हणणें पटलें. त्याला दररोज उंदरांची मेजवानी मिळूं लागली. कांहीं दिवस असे गेल्यावर ते उंदीर शहाणे झाले, आणि बिळांतून बाहेर कधींच येईनात. अशाप्रकारें उंदीर नाहींसे झाल्यावर सिंहाच्या मागची कटकट गेली. पण मांजर मात्र उपाशी राहूं लागलें, आणि सिंह त्याच्या पोटाला




देईना. तेव्हां हळुहळू मांजर रोडावूं लागलें आणि आपल्या घरधनीनीकडे आलें तेव्हां तर त्याचीं हाडें-हाडेंच राहिलीं होतीं.


यावरून कोणीही आपल्या धन्याला अगदीं निर्भय करूं नये.




# कोल्ह्याची फजिती.



बदक चार पिलें घेऊन चालली; हें कोल्ह्यानें पाहिलें व तो पिलांकडे धांवला.



मध्यें एक नळ पडला होता, त्याचें तोंड तळ्याकडे होतें.



तीं छुश्शीं पिलें नळांत शिरलीं व तळ्यांत गेलीं आणि कोल्हा तोंड वासून उभा राहिला.

# शालापत्रकाची चढाओढ.

## मागील कोड्यांचीं उत्तरें.

१ ईश्वरचंद्र विद्यासागर यांसः—चांदणी चौक, घर नंबर ३२ दिल्ली.

२ रंगनाथ चिंतामण वैद्य, गणेशवाडी-रत्नागिरी.

३ दिवाकर पद्मनाभ सातघरे, मारवाडी बाजार, कलकत्ता.

### मुलांकरितां.

चि. मोरूसः—अनेक आशिर्वाद, मणीपुरास येतांना १ मण साखर आणि अर्धा पावशेर केशर आणावें.

आपला,
मारुती.

### बरोबर उत्तरें पाठविणारांचीं नांवें.

| | | |
|---|---|---|
| १ | सिताराम विष्णु कुरणे. | २ |
| २ | शंकर खंडेराव पुरंदरे | १ |
| ३ | रा. त्रि. केणेकर | ३ |
| ४ | सुशिलाबाई चंदावरकर | ३ |
| ५ | गोविंद गोपाळ पेंढरकर | १ |
| ६ | कृष्णाजी रामचंद्र केळकर | २ |

### मुलांकरितां.

| | | |
|---|---|---|
| १ | सदाशिव त्रिंबक पुरंदरे | १ |
| २ | जयवंतराव गुळगुळे | |

## बक्षीसें.

१ सुभाषित.
२ अर्वाचिन महाराष्ट्र.
३ विद्वत्त्व कवित्त्व.
४ रासेलस.
५ निबंधलेखन.
६ विनोद महदाख्यायिका.

### मुलांकरितां.

१ साक्रेटीस चरित्र.
२ ध्रुव चिलीया

## नवी कोडीं.

### मुलांकरितां.

माझें नांव काय ?

माझें नांव देवाचें आहे. तें तीन अक्षरीं आहे. पहिलें व दुसरें मिळून शरीराचा भाग होतो. व दुसरें व तिसरें मिळून निर्जिव वस्तू होते. तर मी कोण ?

### सर्वांकरितां

एक चार अक्षरीं शब्द आहे. तो देशवाचक आहे. पहिलें व चवथें अक्षर मिळून एक शरीराच्या भागानें मोजण्याचें परिमाण होतें. दुसरें व पहिलें अक्षर मिळून एक पक्षीण होते. तिसरें अक्षर यवतमाळ शहरांत सांपडतें, तर तें गांव कोणतें ?

---


# अभिनव काव्यमाला भाग ३

या पुस्तकाची दुसरी आवृत्ति छापून विक्रीस तयार आहे. किं. १ रु. ट. ह. व व्ही. पी. खर्च निराळा.

म्यानेजर—चित्रशाळा प्रेस, पुणें.

# रंगीत इसाप-नीति.

ह्यांत एकंदर इसापनीतींतील आठ अगदीं सोप्या गोष्टी मोठ्या व जाड टाइपांत दिलेल्या असून प्रत्येक गोष्टीसमोर त्यांतील रहस्य दाखविणारें रंगीत सुंदर चित्र दिलेलें आहे. चित्रें पाहूनच मुलांना गोष्टींतील तात्पर्य कळतें. किं० ॥ ट. ह. ॥.

# सचित्र इसाप--नीति.

[ उत्तरार्ध. ]

[ नवीन भाषांतर भाग २ रा. ]

वरीलप्रमाणेंच हा दुसरा भाग विक्रीस तयार आहे. ह्याची सुमारें २०० पानें झालीं असून ह्यांत २५० गोष्टी आहेत. चित्रांची संख्या १५० पर्यंत आहे. किं० १८४.

**दोन्ही भाग एके ठिकाणीं बांधलेलें सुंदर पुस्तक किं० रु० २**

# विद्यार्थ्यांकरितां नाटिका.

**शीलं परं भूषणम्.**

ही नाटिका प्रसिद्ध कवि-शिरोमणि **नारायण वामन टिळक** यांनीं केवळ लहान मुलांकरतांच लिहिलेली आहे यांत **शृंगाररस मुळींच नाहीं.** एवढेंच नव्हे, तर स्त्रीची **भूमिका** या नाटकांत **आणलेलीच नाहीं** शिवाय नाटकाचा विषय **नैतिक विचारानें** पूर्ण **भरलेला** असल्यामुळें शाळांतून **वार्षिक संमेलनाचे वेळीं** मुलांकडून ह्या **नाटकाचा प्रयोग** करविण्यास तें **योग्य** आहे. नाटकाचा विषय **धनाची योग्यता जास्त** किंवा **ज्ञानाची योग्यता जास्त** हा आहे. पुस्तकांत **चार सुंदर चित्रें** कथानकास अनुसरून दिलेलीं आहेत. किं० ८४.

म्यानेजर--चित्रशाळा प्रेस, पुणें.

# चिमुकलें भारत व रामायण.

महाभारत व रामायण हे आपले राष्ट्रीय ग्रंथ आहेत. यांत आपला प्राचीन इतिहास असून प्रपंच साधून परमार्थ कसा जोडावा हें उत्तम दाखविलें आहे. व्यावहारिक बोधाचा ह्या केवळ खाणी आहेत, आबालवृद्ध स्त्री-पुरुषांना या ग्रंथांचें ज्ञान होणें अगत्याचें आहे, प्रौढांकरितां आमचीं लोकप्रिय **' भारती युद्ध '** व **' रामचरित्र '** हीं पुस्तकें आहेत. आतां बारातेरा वर्षांच्या मुलांमुलींकरितां **' चिमुकलें भारत** व **चिमुकलें रामायण '** हीं दोन पुस्तकें अनुक्रमें आम्हीं **रामकृष्णवाक्सुधेचे** प्रसिद्ध लेखक ग. **कृष्णाजी गोविंद किनरे** व रा. **विद्याधर वामन भिडे** बी. ए. यांजकडून मुद्दाम लिहविलीं आहेत. पुस्तकाची भाषा फारच **मोहक व सोपी** आहे. वाचतां वाचतांच मुलांच्या मनावर त्यांतील रहस्य ठसावें म्हणून **उपदेशपर वाक्यें** जाड टाइपांत घातलीं आहेत, आणि कथानकांच्या अनुरोधानें हाफटोन प्रोसेसनें तयार केलेलीं **भारतांत आठ** व **रामायणांत सात** अशीं **सुंदर चित्रें** घातलीं आहेत. भारताचीं पृष्ठें १७३ व रामायणाचीं पृष्ठें ८२. छपाई बांधणी सुबक. किं० ८६, व रामायण किं० ८४.

म्यानेजर—चित्रशाळा प्रेस, पुणें शहर.

॥ ॐ नमः श्रीरामचंद्राय ॥

# आर्यमहौषधालय मु० पो० आंजर्लें.

**कोंकणप्रांतांतील अगदीं ताज्या व शुद्ध वनस्पतींचीं जगत्प्रसिद्ध निर्दोष व रामबाण औषधें.**

**कंदर्पमंजरी पाक**—हा अपूर्व पाक गरिबांपासून तों अमीरउमरावांपर्यंत सर्वांसही अत्यंत उपयोगी असून किंमत माफक ठेविली आहे. यांत मौक्तिक, प्रवाळ, लोह, माक्षिक, कस्तूरी, अंबर इ० अत्युच्च गुणकारक पदार्थ असून शिवाय बदाम, पिस्ते, अक्रोड चारोळी, केशर, वेलची, पंजाबी सालममिश्री, सफेतमुसळी, पत्री, गोक्षुर, शतावरी, आस्कंद, वंशलोचन वगैरे (८०) उपयुक्त वनस्पति घातल्या आहेत. यानें पथ्यावांचून गुण येतो. यापासून कोणत्याही कारणांनीं होणारा व कशाही प्रकारचा शुक्रस्राव, नपूंसकत्व, मूळव्याधि, रक्तदूषणामुळें त्वग्रोग, स्त्रियांची धुपणी व गर्भाशयस्थ दोष या भावना त्यांच्या एकंदर उपविकारांसह तत्काल बऱ्या होऊन धातुवृद्धि होते, व शरीर कणखर आणि तेजस्वी बनतें. २० तो० ड० २ रुपये. एकदम ३ डबे घेणारास ५ रुपये.

**स्वर्णधात्री तेल**—हें चारोळी, बदाम, कंकोळ, एला, बहुविध वनस्पतींचीं सत्त्वें व उपयुक्त तेलें अशा अनेक पदार्थांनीं बनविलें असल्यानें याच्या मर्दनापासून अपस्मार, उन्माद, वेड, चक्कर इ० रोगांस जलद आराम पडतो केंसांस चोळल्यानें केंस काळे कुळकुळीत, तजेलदार, सडक लांब व मृदु होऊन मेंदु शांत आणि रोगरहित बनतो. यानें मस्तकाचें टक्कल जातें. हें अंगास चोळून स्नान करीत गेल्यानें शरीराचा दुर्गंध जातो. खरूज, गजकर्ण, शिबें, तसेंच तळपाय, तळहात, डोळे व मस्तक यांचा दाह हे विकार खास बरे होऊन निद्रा चांगली येते, आणि नेत्ररोग दुरुस्त होतात. बा० किं० १। रु०

**दंतरक्षक पूड**—ही दांत व हिरड्या यांचे सर्व विकार तत्काल दुरुस्त करून दांत स्वच्छ व मजबूत करण्यांत प्रतिज्ञेची आहे. ड. ६ आणे.

**सुरंगी, मालती, कल्हार, गुलबहार, दणाणा, लक्ष्मीविलास** इ० बादशाही अति उंची अत्तरें व त्याचप्रमाणें गुलाब, हिना, केवडा, चमेली, जाई वगैरे सुगंधी अत्तरें आणि केंसांस लावण्याचीं हरएक प्रकारचीं सुवासिक तेलें माफक दरानें पूर्ण खात्रीचीं मिळतील.

**सूचनाः**—वरील औषधें व अत्तरें वगैरे पूर्ण खात्रीचीं असल्यामुळें आज पंचवीस वर्षांत त्यांचा लक्षावधि लोकांस अप्रातिम उपयोग झाला म्हणून त्यांचा नेहमीं फारच खप होत आहे. अनुभवानंतर पूर्ण खात्री पटेलच. औषधें माहितीचे खर्च्यासह रोखीनें अगर व्ही. पी. नें पाठवूं. प्याकिंग व टपाल खर्च वेगळा. घाऊक घेणारांस कमिशन भरपूर. सर्व औषधांच्या आणि आरोग्यरक्षणाच्या माहितीचें सचित्र मोठें पुस्तक देऊं. आमचीं औषधें वगैरे मागविणें तीं खालील बिनचूक पत्त्यावर मागवावीं.

**कृष्णशास्त्री बिवलकर, वैद्य.**

८१.

REGISTERED. B. NO. 179




## अनुक्रमणिका

विषय | पृष्ठ.


| विषय | पृष्ठ. |
|---|---|
| आगगाडीसंबंधीं प्रश्नोत्तरें. | ६१ |
| स्वराज्याचें तोरण. ( नाटक ) | ६३ |
| जादूची आंगठी. | ६८ |
| गुलाबाचीं फुलें. | ७० |
| वसुदेवाचा पेला. | ७१ |
| गांधी टोपी. | ७४ |
| काळाची करणी. | ७५ |
| डावखोरा माणूस. | ७६ |
| दोन खोडकर मुलें. | ७७ |
| शालापत्रकाची चढाओढ | ७८ |
| रशियाचा झार. | ७९ |


मुद्रक व प्रकाशक—रा. रा. शंकर नरहर जोशी चित्रशाळा प्रेस, १०२६ सदाशिव पेठ, पुणें सिटी.

# रंगीत इसाप-नीति.

ह्यांत एकंदर इसापनीतींतील आठ अगदीं सोप्या गोष्टी मोठ्या व जाड टाइपांत दिलेल्या असून प्रत्येक गोष्टीसमोर त्यांतील रहस्य दाखविणारें रंगीत सुंदर चित्र दिलेलें आहे. चित्रें पाहूनच मुलांना गोष्टींतील तात्पर्य कळतें. किं० ८६ ट. ह. ८८६.

# सचित्र ईसाप-नीति.

[ उत्तरार्ध. ]

[ नवीन भाषांतर भाग २ रा. ]

वरीलप्रमाणेंच हा दुसरा भाग विक्रीस तयार आहे. ह्याची सुमारें ३०० पानें झालीं असून ह्यांत १५० गोष्टी आहेत चित्रांची संख्या १५० पर्यंत आहे. किं० १८४.

दोन्ही भाग एके ठिकाणीं बांधलेलें सुंदर पुस्तक किं० रु० २

# विद्यार्थ्यांकरितां नाटिका.

शीलं परं भूषणम्.

ही नाटिका प्रसिद्ध कवि-शिरोमणि नारायण वामन टिळक यांनीं केवळ लहान मुलांकरतांच लिहिलेली आहे यांत शृंगाररस मुळींच नाहीं. एवढेंच नव्हे, तर स्त्रीची भूमिका या नाटकांत आणलेलींच नाहीं शिवाय नाटकाचा विषय नैतिक विचारानें पूर्ण भरलेला असल्यामुळें शाळांतून वार्षिक संमेलनाचे वेळीं मुलांकडून ह्या नाटकाचा प्रयोग करविण्यास तें योग्य आहे. नाटकाचा विषय धनाची योग्यता जास्त किंवा ज्ञानाची योग्यता जास्त हा आहे. पुस्तकांत चार सुंदर चित्रें कथानकास अनुसरून दिलेलीं आहे. किं० ८४.

म्यानेजर--चित्रशाळा प्रेस, पुणें.

# चिमुकलें भारत व रामायण.

महाभारत व रामायण हे आपले राष्ट्रीय ग्रंथ आहेत. यांत आपला प्राचीन इतिहास असून प्रपंच साधून परमार्थ कसा जोडावा हें उत्तम दाखविलें आहे. व्यावहारिक बोधाचा ह्या केवळ खाणी आहेत, आबालवृद्ध स्त्री-पुरुषांना या ग्रंथांचें ज्ञान होणें अगत्याचें आहे, प्रौढांकरितां आमचीं लोकप्रिय '. भारती युद्ध ' व ' रामचरित्र ' हीं पुस्तकें आहेत. आतां बारातेरा वर्षांच्या मुलांमुलींकरितां चिमुकलें भारत व चिमुकलें रामायण ' हीं दोन पुस्तकें अनुक्रमें आम्हीं रामकृष्णवाक्सुधेचे प्रसिद्ध लेखक रा. कृष्णाजी गोविंद किनरे व रा विद्याधर वामन भिडे बी. ए. यांजकडून मुद्दाम लिहविलीं आहेत. पुस्तकांची भाषा फारच ग्राहक व सोपी आहे. वाचतां वाचतांच मुलांच्या मनावर त्यांतील रहस्य ठसावें म्हणून उपदेशपर वाक्यें जाड टाइपांत घातलीं आहेत, आणि कथानकांच्या अनुरोधानें हापटोन प्रोसेसनें तयार केलेलीं भारतांत आठ व रामायणांत सात अशीं सुंदर चित्रें घातलीं आहेत. भारताचीं पृष्ठें १७३ व रामायणाचीं पृष्ठें ८२, छपाई बांधणी सुबक. किं० ८६, व रामायण किं० ८४

म्यानेजर--चित्रशाळा प्रेस, पुणें शहर.

मराठी
# बालपत्रक

येथें शब्द नाहीं शिष्यासीं । हें अवघें सद्गुरूपाशीं ।
सद्गुरु पालटी अवगुणांसी । नाना यत्नें करोनी ॥
जें कांहीं आपणास ठावें । तें हळु हळु शिकवावें ।
शहाणें करून सोडावें । सकळा जनां ॥ १ ॥

—रामदास.

१२ — मार्च १२

पुस्तक ३५ एप्रिल सन १९२४ अंक ४

## आगगाडीसंबंधीं प्रश्नोत्तरें.

**आगगाडी तासीं किती मैल प्रवास करूं शकते ?**

एकदां स्कॉटलंड मध्यें एका गाडीनें तासाला ७४ मैलांचा टप्पा गांठला होता. एवढी गती गाडीला क्वचितच व कांहीं ठिकाणींच मिळूं शकते. परंतु जास्तींत जास्त गती म्हणजे सरासरीनें ५५ ते ६० मैल असते.

**जमिनीवर रूळ कसे भक्कम केले जातात ?**

रस्ता सारखा केल्यावर खडी घालून त्यावर सारख्या लांबी रुंदीचे लाकडी ठोकळे टाकतात. आणि त्या ठोकळ्यावर लोखंडी कैची बसवून रूळ ठेवतात. हे रूळ जाड खिळ्यांनीं लाकडाला ठोकून टाकतात.

**फिश प्लेट्स् कशाला म्हणतात ?**

फिश प्लेट्स् सारे रूळ एकत्र जोडतात आणि दोन रुळांमध्यें थोडी जागा सोडतात.

**ही जागा कां सोडतात ?**

उन्हाळ्यामध्यें लोखंड प्रसरण पावतें आणि जर मध्यें जागा सोडली नाहीं तर मोठा अनर्थ उडेल. रूळ जे बसवतात ते हिंवाळ्यांतील परिस्थितीला अनुलक्षून बसवतात व उन्हाळ्यांत त्यांना वाढण्यास जागा ठेवतात.

**ड्रायव्हर गाडीला दिशा दाखवितो काय ?**

नाहीं. गाडी ही रुळाच्या अनुरोधानें चालते.

ड्रायव्हर फक्त गाडी सुरू करतो व थांबवतो आणि एंजीनाकडे बघतो.

**गाडी रूळावर कशी रहाते ?**

चाकें रूळावर असतात. या चाकांच्या धांवाचा कंगोरा रूळाखालीं दोही बाजूला गेलेला असतो. त्यामुळें दोन्ही चाकें रुळांमध्यें पक्की बसतात व त्यावरून घसरत नाहींत.

**एंजीनाचीं चाकें किती मोठीं असतात ?**

कांहीं चाकांचा व्यास ६ फूट ८ इंच असतो.

**गाडी कशी थांबते ?**

गाडी हवेच्या दाबानीं थांबवितात. हा दाब डब्याच्या व इंजिनाच्या चाकावर बसतो. प्रत्येक डब्याचा ब्रेक निराळा असतो व तो संबंध डब्यांना जोडणाऱ्या ब्रेकला जोडतात.

**बफर्स कशाकरितां असतात ?**

प्रत्येक डब्याच्या शेवटीं दोन वाटोळ्या तबकड्या असतात. त्यावर दुसरे डबे येऊन आदळतात. या बफर्सच्या ( वाटोळ्या तबकड्याच्या ) आंत स्प्रिंग असते. एक डबा दुसऱ्या डब्यावर जोरानें येऊन आपटतो आणि मध्यें जर असे बफर्स नसते तर डब्यांचा चुराडा झाला असता.

**एंजिनांतील सिलेंडर्स काय असतात ?**

पाण्याची वाफ झाली म्हणजे ती अत्यंत जोरानें येऊन सिलेंडर्समध्यें घुसते आणि तेथील दांडा जोरानें फिरवते. नंतर ती वाफ दुसऱ्या सिलेंडर मध्यें जाते आणि तो दांडा पुनः मागें फिरतो. ही पुढें आणि मागें जाण्याची गती दांड्याच्या योगानें चाकांना मिळते. प्रत्येक एंजिनाला असे दोन सिलेंडर्स असतात.

**टेंडर कशाला म्हणतात ?**

एंजीनाच्या जवळ कोळसा व पाणी सांठविण्याचा जो डबा असतो त्याला टेंडर म्हणतात. खालच्या भागांत पाणी असतें व वर कोळसा टाकलेला असतो. ह्या डब्यांत ५००० गॅलन पाणी व ८ टन कोळसा मावतो.

**एंजीनाचें तोंड कसें फिरवतात ?**

एक वाटोळा फिरता गोल केलेला असतो. त्यावर एंजीन गेलें म्हणजे त्याचें तोंड फिरतें.

**चाकांचे प्रकार किती ?**

एंजीनाच्या पुढें दोन लहान चाकें असतात. हीं चाकें अगदीं पुढें असतात व वळणावरून ती बाकीच्या चाकांना आपल्या मागें नेतात. याखेरीज एंजीनाची मोठीं चाकें असतात, तीं वाफेनें फिरतात. शिवाय प्रत्येक डब्याला निराळीं चाकें असतात.

**४-६-२ चें एंजीन कशाला म्हणतात ?**

ज्या एंजीनाला पुढें लहान चाकाच्या दोन जोड्या, मोठ्या चाकाच्या ३ जोड्या व त्याच्या मागें आणखी लहान चाकाची एक जोडी असते, त्या एंजिनाला ४-६-२ चें एंजिन म्हणतात.

**पफ् पफ् असा आवाज कां होतो ?**

सिलेंडर मधून वाफ जाऊं लागली म्हणजे एंजीनाच्या भट्टींत शुष्कता येते, त्या योगानें भट्टी अधिक उष्ण होते व एंजीनाला अधिक शक्ति मिळते; या वेळीं पफ् पफ् आवाज होतो.

**गाडी एकदम थांबवितां येते काय ?**

गाडीचें वजन पुष्कळ असल्यामुळें गाडी एकदम थांबत नाहीं. पूर्ण वेगांत सुटलेली गाडी पाव मैलाच्या आंत थांबणें शक्य नसतें.

**माल गाडी व पॅसेंजर गाडीला एकाच प्रकारचीं एंजीनें असतात काय ?**

पॅसेंजर गाडी ही वेगवान् असते व माल गाडी ओझें नेण्याकरितां असते. तेव्हां त्यांचीं एंजिनें निराळीं असतात. माल गाडीच्या एंजिनाला २ किंवा ३ मोठीं चाकें असतात, परंतु पॅसेंजर गाडीला इतकीं नसतात. मालगाडीचें एंजिन भक्कम असते.

**प्रत्येक रेल्वेचीं एंजीनें निरनिराळीं कां ?**

गाडी ज्या भागांतून जावयाची असते, त्या भागाला अनुसरून एंजिनाची योजना करतात. डोंगराळ मुलखांतून जाणाऱ्या गाडीचीं एंजिनें फार मजबूत असावीं लागतात त्यामुळें एंजीनें निराळीं असतात.

**गाडीला ब्रेक किती प्रकारचे असतात ?**

गाडीला तीन प्रकारचे ब्रेक्स असतात. एक वाफेचा, दुसरा हातांनीं दाबण्याचा व तिसरा अखंड. हा तिसरा ब्रेक एंजिन थांबवतो, एवढेच नव्हे, तर सारे डबे एकदम उभे करतो.

**व्हॅक्युअम ब्रेक कशाला म्हणतात ?**

गाडी थांबवावयाची असली म्हणजे एका टोंकापासून दुसऱ्या टोंकापर्यंत जाणाऱ्या पोकळ नळ्यांतून वारा सोडतात. या नळ्या ब्रेकला जोडलेल्या असतात. वारा सुटला म्हणजे दूर असलेले ब्रेकचे तुकडे चाकावर जाऊन बसतात व गाडी थांबवितात

**ड्रायव्हरच्या माहितिशिवाय गाडी उभी रहाते काय ?**

होय. गार्ड ब्रेक दाबून ड्रायव्हरच्या माहिती शिवाय गाडी थांबवितो.

**गाडी आपोआप उभी रहाते काय ?**

सध्यां गाडी थांबविण्याचे पुष्कळ निरनिराळे मार्ग आहेत. धोक्याचा सिग्नल दिलेला असला, म्हणजे पोर्टर लाईनीवरच गाडी पुढें जाऊं नये म्हणून एक योजना करून ठेवतो. त्या योगानें ड्रायव्हरचें लक्ष नसलें तरी गाडीला धोका पोंहोचत नाहीं.

**धोक्याची साखळी ओढली म्हणजे काय होतें ?**

गार्डच्या डब्यांत प्रत्येक बाजूला एक अशा दोन तांबड्या वाटोळ्या फिरक्या असतात. फिरकी जशी कमी जास्त फिरेल, तशी साखळी कोठून ओढली गेली आहे हें गार्डला समजतें. साखळी ओढली जातांच थोडीशी हवा ब्रेकवर आदळते व ब्रेक थोडेसे लागतात. नंतर गार्ड व ड्रायव्हर गाडी थांबविण्यास योग्य जागा आहे किंवा नाहीं हें पाहून गाडी पूर्णपणें थांबवितात.

( अपूर्ण )

---

# स्वराज्याचें तोरण.

**पदः**—( चा. देहाताया० )

**दे ज्ञाना, या सुहृद जना ॥ ध्रु० ॥**
**खेलना विफल नयना । दाविना देशदैन्या ।**
**करित जी कालहरणा ॥ १ ॥**
**दास्य हें जहर जनता । पिउनी टाकि**
**स्वमता । तूं करी आज सुहिता ॥ २ ॥**

**प्रवेश ३ रा**

(बादशहाचा दरबार; बादशहा, शहाजी, वजीर वगैरे.)

**भालदार**—कोणी अर्जदार आहे ?

**हुजऱ्या**—बाहेर एक महमदखान नांवाचा अर्जदार आला आहे.

**चिटणीस**—बोलीव आंत.

**महं०**—( मु. क. ) गरीब नवाज, माझा एक अर्ज आहे. हुकूम झाल्यास सांगतों.

**बा०**—सांग तुला काय सांगावयाचें असेल तें.

**महं०**—( हात जोडून ) परवरदिगर. आज माझें बरीं मी व माझा भाऊ मिळून गाय मारणार होतों; इतक्यांत १०।१५ मराठ्यांचीं पोरें आलीं

आणि त्यांतल्या एका मुलानें तर माझ्या भावाचें मुंडकेंच उडविलें ! आणि त्यांनीं ती गाय सोडून नेली ! ! माझा घात झाला ! ! सरकार ( रडतो. )

बाद०—

तो मुलगा कोण तुला ठाऊक आहे ! त्याचें नांव सांग. आतांच त्याचा समाचार घेतों. बोल त्याचें नांव बोल.

महं०—सरकार, त्याचें नांव शिवाजी म्हणे. कुणी मराठ्या सरदाराचा तो लेक आहे म्हणतात. त्यानेंच माझा घात केला सरकार.

बा०—शिवाजी, शहाजी राजांचा मुलगा तर नव्हे ? काय राजे, हा आपलाच मुलगा कीं काय ?

शहाजी०—( मु. क. ) माहीत नाहीं. सरकार तपास करून सांगतों.

बा०—ठीक. जारे, बंगषखान याच्याबरोबर जा, आणि त्या मुलाला पकडून आणा. जा, लवकर जा.

बंग०—जी सरकार, जातों. ( महमदखान व बंगष० जातात. )

बा०—प्रधानजी, आमची नमाजाची वेळ झाली. दरबार बरखास्त. त्या मुलाला तोफेच्या तोंडीं द्या. आणि गांवांत पुनः असें कोणीं करूं नये म्हणून दवंडी पिटवा. लोकांना जरब बसली पाहिजे.

प्रधानजी—जी हुजूर. ( पडदा. )

---

### प्रवेश—४ था.

**रस्ता.**

**शिवाजी**—गड्यांनों पाहतां काय ! फेंका दगड, व फोडा डोकें.

**बंगष०**—शिवाजी मुकाट्यानें चल. बादशहाचा हुकूम आहे तो मोडूं नये.

शि०—अरे जा. कुठला बादशहान् कुठलें काय, घेऊन ये तुझ्या बादशहाला. मग पाहीन जा. बादशहा म्हणे बादशहा !!

बं०—हें ठीक नव्हे. बादशहाचा हुकूम मोडणाऱ्यास फांशी देतात, ठाऊक आहेना तुला ? अजून विचार कर. गोष्ट फार वाईट थराला जाईल बरें !

शि०—अरे जा, विचार केला; पूर्ण विचार केला. तुझ्या बादशहाचा हुकूम मी मानीत नाहीं. जा, मी येत नाहीं. येत नाहीं म्हणून सांग जा.

बंग०—तुला आम्ही जबरीनें धरून नेऊं बरें ! मुकाट्यानें चल नाहींतर—

शि०—काय करणार !

पदः—( अधम किती पालका० )

**यवनखल नच विफल वल्गना या स्थलीं ॥**
**शौर्यबल दाखवील याच कालीं ॥ ध्रु० ॥**
**वृद्ध मजसी करी, नातरी पथ धरी ॥**
**श्वानसम वैखरी, योग्य नच ही ॥ १ ॥**
**खड्ग माझें तुला, बोलवी दुर्बला ॥**
**वांचवी प्राण मग, सज्ज होई ॥ २ ॥**

असेल छाती तर या, या; असे दूर कां दहा जणांना स्वर्ग दाखवीन, तेव्हांच तुमच्या स्वाधीन होईन. प्रथम या माझ्या समशेरीला तुला जाब द्यावा लागेल,

बं०—ठीक आहे ! शिपायांनों पाहतां काय ? बांधा याच्या मुसक्या आणि चला घेऊन. ( शिपाई पुढें होतात, चकमक होते, २।४ इसम पडतात, शिवाजी विजप्रमाणें नाहींसा होतो. )

बंग०—या अल्ला !! ऐसा कैसा हुवा !! कोठें आहे तो शिवाजी ! ! अं !! एकदम गेला कुठें !! बघा ! बघा !! कुठें गेला तो हरामजादा !!!

( जातात. )

---

### प्रवेश ५ वा.

( बापू, विनू, सोनू प्रवेश करतात. )

बापू—ऐकलेंस विनू ! त्या शिवाजीला म्हणे

बादशहाच्या शिपायांनीं धरून नेला, आणि त्याला आतां ते फांशी देणार!!

वि०—हो कां? मला नव्हतें बुवा ठाऊक! अरेरे वाईट झालें हें. शिवबा फार चांगला मुलगा होता.

सो०—चांगला म्हणजे? अहो त्याच्यासारखा तरवार मारणारा एक तरी आहे कां आपल्यांत?

बा०—सरकारच्या विरुद्ध कांहीं करूं नये म्हणतात तें यासाठींच! बरें चला!! आज आपण आंधळ्या कोशिंबिरीचा डाव खेळूंया, आणखीन् ४।५ गडी पाहिजेत. गोळा करा. चला. आतां त्याचें काय?

वि०—बरें चला. शिवबा गेला फार वाईट झालें! आपण मात्र असल्या भानगडींत बिलकूल पडणार नाहीं बुवा. शिपाई दिसला कीं, सुंबाल्या करायचा आणि आजीच्या मागें जाऊन दडायचें. मग तो शिपुर्डा आपल्याला काय करणार?

सोनू—वा! आजी म्हणजे एक बालेकिल्लाच म्हणेनास! ते पहा बरेच गडी इकडे आले. आपण त्यांना घेऊन खेळायला जाऊं चला. (तानाजी, येसाजी, बाजी प्रवेश करतात.)

वि०—काय तानाजी! शिवबा तुमचा पुढारी फांशी गेला कां? अहो आम्हां मुलांना हें असलें लचांड नको. आपला खेळ बरा कीं आपण बरें, कसें काय बापू?

ता०—शिवबा फांशी जायला तुमच्यासारखा भित्राभागुबाई आहे कां?

बापू—या वेळेला फांशी दिला असेल सुद्धां. तुला वेड तर नाहीं लागलें?

बाजी—वा! खूप केलीत बुवा! आतांच तर आम्ही शिवाजी महाराजांच्या घरून आलों—

पद (चाल—शांत हरि हास्य०)

बालगण करि नमन। शुभद त्या शिवपदीं॥ध्रु०॥
स्वबल दावि जना। करित मनरंजना।
रक्षी गोब्राह्मणा। यवन ने खलपदीं॥१॥
सबलसत्ता तरी। त्या करीं ना धरी।
तो खरा श्रीहरी। स्वजन ने शिवपदीं॥२॥

बा०—मग त्यांना शिक्षा नाहीं कां झाली?

ता०—बादशहाची काय छाती आहे शिक्षा करण्याची. अहो, महाराजांनीं त्या शिपुरड्यापुढें असें तेज दाखविलें कीं, ते तर दिपूनच गेले. आणि महाराज झपाट्यानें निघून आले; त्यांना अडविण्याची कोणाची छाती झाली नाहीं. खरा वीर! खरा छातीचा पुरूष!! याला म्हणावें वीरशिरोमणी!! नाहींतर हीं मुलें पहा. आपला खेळ बरा कीं आपण बरे. वा! छान!

बा०. वि०— सो०—नाहीं. नाहीं. आम्हीहि खेळ सोडला पहा. (खेळणीं फेंकून देतात.) चला आधीं शिवाजीमहाराजांना जाऊन भेटूंया, (जातात.)

---

## प्रवेश ६ वा.

(शहाजी व शिवाजी बसले आहेत.)

शहाजी—शिवबा, तुम्ही आतां वयांत आला. तुमच्या अंगीं शौर्य-धैर्यादि गुणही आपल्या कुलपरंपरेला शोभतील असे आहेत तेव्हां बादशहाकडून एकादी दहापांच हजारांची मनसबदारी तुम्हांला देववावी असा आमचा मनसुबा आहे. म्हणून म्हटलें आज आमच्याबरोबर दरबारला चला.

शिवाजी—ठीक आहे. पण माझें थोडें म्हणणें आहे तें आपल्यापुढें मांडण्याची मी परवानगी घेतों लहान तोंडीं मोठा घास घेतल्याबद्दल वडिलांना राग तर नाहींना येणार?

श०—बेलाशक सांगा, काय म्हणणें असेल तें. मला बिलकूल राग येणार नाहीं.

शि०—या अविंधाची मनसब मला नको आणि म्हणून मला त्यांचा दरबारही पण नको.

श०—(आश्चर्यानें) काय? मनसब नको? अन् दरबारही नको?

शि०–हो नको. अन् ती आजन्मात पत्करायची नाहीं असा माझा निश्चय आहे.

श०–कां बरें?असा निश्चय असण्याचें कारण काय?

शि०–कारण अगदीं उघड आहे.

श०–तें काय बुवा? मनसब नको म्हणणारे फक्त तुम्हीच मला भेटलां. जो तो ती मिळविण्यासाठींच धडपड करीत असतो.

शि०–जो तसें करतो त्याला देशाभिमानच नाहीं असें म्हणावें लागेल. मी मात्र ती मनसबदारी पत्करणार नाहीं; हें निश्चित.

श०–मनसबदारी पत्करून देशसेवा करतां येत नाहीं कां?

शि०–सर्वस्वी करतां येणार नाहीं. जो राजकर्त्यांचा फायदा तोच देशाचा तोटा असला तर या तावेदारीमुळें राज्यकर्त्यांचा फायदा व देशाचा तोटा कधीं कधीं करावा लागतो, त्याला काय इलाज?

श०–खरें आहे तुम्ही म्हणतां तें. पण अशा या बाबींखेरीज कित्येक दुसऱ्या बाबींत देशाचें कल्याणही करितां येतें.

शि०–तेवढ्यानेंच देशाचा सर्वस्वी फायदा होत नाहीं. या परक्या राज्यकर्त्यांचा जो फायदा तो आपला तोटा हें मात्र नक्की!!

श०- परमेश्वरी संकेतानें हे परके लोक राज्यकर्ते आहेत, ते आपला स्वार्थ आधीं साधणार हेंहि खरें आहे. पण त्यामुळें आपण मात्र आपला कार्यभाग मुळींच साधूं नये असें कांहीं होत नाहीं. आपण घरीं बसल्यानें त्यांचा राज्यकारभार थोडाच बंद पडणार आहे!

शि०–कां नाहीं? आपण सर्व हिंदूंनीं त्यांची सेवा करावयाची नाहीं असें ठरविलें तर त्या मूठभर लोकांना येथील कारभार पाहणें अगदींच अशक्य होईल

श०–खरें आहे, पण असें होईल तर ना? सर्व हिंदु एकदम असें करतील असें तुम्हांस वाटलें कसें? अहो, जेथें मनसबदारी अगर दुसरा एखादा अधिकार मिळविण्याकरितां आपसांत चढाओढ सुरू असते तेथें सर्वांनीं त्यांची सेवा सोडावी असा उपदेश करणें व्यर्थ आहे!

शि०–मग त्यांचें हें यवनी राज्य यावच्चंद्र दिवाकरौ असेंच चालावयाचें कीं काय?

श०–यांत काय संशय!! त्यांची सत्ता इतकी दृढमूल झाली आहे कीं, ती उखळून काढणें अगदीं अशक्य आहे.

शि०–असें मला वाटत नाहीं.

श०–तुम्हांला अजून अनुभव नाहीं. त्यांनीं आपल्या पाशांनीं आम्हां हिंदूंना अगदीं जाळ्यांत पुरें अडकवून टाकलें आहे. त्यांतून निसटणें शक्य नाहीं.

शि०–मला तर स्पष्ट दिसतें आहे कीं यांच्या सद्दीचा जोर संपला आहे. आणि म्हणूनच त्यांना प्रजेचा छळ करण्यांत सुद्धां पुरुषार्थ वाटतो. "विनाशकाले विपरीत बुद्धिः" अशी म्हण आहे ना?

श०–म्हणजे?

शि० -हिंदूंना जुलुमानें बाटविणें, त्यांच्या घरादारावर व देवस्थानावर नाहक हल्ला करणें, गाईसारख्या पवित्र व उपयुक्त प्राण्यांची हिंसा करणें व प्रजेचा नाहक छळ करणें या गोष्टीच त्यांचा विनाशकाळ जवळ आल्याची साक्ष पटवितात.

श०–हें तुमचें म्हणणें खरें दिसत नाहीं. कारण त्यांचा विनाश करण्याइतकी जबरदस्त शक्ति निर्माण झाल्याचें चिन्ह आज तरी मला दिसत नाहीं. पण पुढें काय होईल कोण जाणे!

शि०—हजारों तरुण लोक असे आहेत कीं त्यांना यांचा सूड घ्यावा असें वाटतें व आपलें राज्य असावें असें वाटतें. पण—

श०—असें असेल तर त्याचें कांहींच कां कार्य दिसत नाहीं?

शि०—खास आहे! गरीब बापड्या लोकांच्या मनाची पारख होण्यासही शहराची हवा योग्य नाहीं तर खेड्यापाड्यांतील त्यांच्या झोंपड्याच योग्य. त्या ठिकाणीं जाऊन पाहिल्यास व त्यांच्याशीं समरस होऊन वागल्यास ही स्थिती खात्रीनें दिसेल.

श०—असली तरी त्यानें काय होणार?

शि०—आंतल्या आंत धुमसणारा अग्नि केव्हां तरी भडकून आपलें खरें स्वरूप प्रगट करतो, तसें या प्रेरणांचें आंतल्या आंत धुमसणें असलें तरी तें योग्य वेळीं इतक्या जोरानें बाहेर पडेल कीं तीं आवरणें मात्र या यवनी-सत्तेला अशक्य होईल.

श०—होईल कदाचित्! मला तरी यांत कांहीं अर्थ दिसत नाहीं. असो; तुम्हांला मनसबदारी नको तर तुमचा मनसुबा तरी काय आहे तें तर कळूं द्या

शि०—माझा मनसुबा? दुसरा काय असणार! यवनांची चाकरी करावयाची नाहीं. त्यांची सत्ता नाहींशी करून आपली सत्ता स्थापण्याचा आजन्म प्रयत्न करावयाचा. दुसरें काय?

श०—मीं बरेच टक्केटोणपे खाल्ले आहेत आणि त्यावरून सांगतों कीं यांत कांहीं अर्थ नाहीं. उलट, तुमची नुकसानी मात्र होईल.

शि०—नुकसानीच काय? पण या कार्यांत मला देहत्याग करण्याची पाळी आली तरी त्यांत मला आनंदच आहे.

श०—ठीक! तुमच्या आमच्या विचारांत बरेंच अंतर आहे. तरी पण पुढें दृष्टी ठेवून मी सांगतों तसेंच वागणें तुम्हांला योग्य होईल.

शि०—नाइलाज आहे. मला या सेवक-वृत्ती-पेक्षां मरणही शतपटीनें बरें वाटतें. माझें मनच धजत नाहीं त्याला माझा इलाज नाहीं!

श०—कांहीं हरकत नाहीं. तुम्ही पुणें प्रांतीं जाऊन रहा. व आपल्या कुळाची कीर्ती कायम ठेऊन, काय करायचें तें करा. मला मात्र माझा हाच क्रम या पुढेंही चालविला पाहिजे.

शि०—आपण दिलेली ही आज्ञा शिरसामान्य करून मी आपल्या पुणें प्रांतीं जातों व आपल्या आशिर्वादानें कांहीं कार्य झाल्यास करून दाखवितों; परवानगी असावी.

पदः—( चालः—होईं विजयी तूं० )

**श०—जाई, सुरवरतुज देई यशाला ॥ बंधमो-**
**चकाला। कीर्तिमान बाळा ॥ १ ॥**
**शि०—हिंद स्वराज्या आशीर्वच हें।**
**फलद होइल पाहें। विजय झाला ॥ २ ॥**
श०—( पूर्वगत. )
**शि०—पंथ आमुचा, अती दुस्तर साचा।**
**परी जिवलग प्रभुचा!। मना आला ॥ ३ ॥**
श०—( पूर्वगत. ) ( शिवाजी नमस्कार करतो, जातो. पडदा. )

अंक पहिला समाप्त.

---


# फळा.

शाळेंतील फळ्याचे ऐवजीं **कापड.** रुंदी **३०** इंच दर वारास १ रु. हें कापड खरखरीत असून त्याजवर खडूनें उत्तम प्रकारें लिहितां येतें; पाण्यानें पुसलें असतां कापड ओलें होत नाहीं.

**म्यानेजर-चित्रशाळा प्रेस, पुणें.**

# जादूची आंगठी.

एक तरुण शेतकरी दारिद्र्यानें गांजल्यामुळें चिंतातूर असा आपल्या शेताजवळ बसला होता. दिवसभर काम करून थकल्यामुळें त्याला सुस्ती आली. त्या गुंगींतच त्याला एक लहानसें स्वप्न पडून असें दिसलें कीं, कोणी एक म्हातारा तेजःपुंज पुरुष त्याचे समोर उभा आहे. त्यानें त्यास नमस्कार केल्यावर वृद्धानें आशिर्वाद देऊन म्हटलें कीं, 'तुझे चिंतेचे दिवस गेले. येथून वीस कोसांवर नदीकांठीं एक नारळाचें मोठें झाड आहे. त्यांतील सर्वांत मोठा नारळ तूं तोडून आण. तो फोडल्यावर त्यांत तुला एक आंगठी सांपडेल. ही आंगठी तुझी कोणतीही एकच इच्छा पूर्ण करील. तेव्हां इच्छा करतांना फार विचार कर नाहींतर हलकी सलकी इच्छा करशील आणि पुढें आणखी महत्त्वाचें कारण पडल्यास त्या आंगठीचा पुढें कांहीं उपयोग होणार नाहीं' असें म्हणून तो वृद्ध पुरुष एकदम अंतर्धान पावला. हें स्वप्न पडून तो शेतकरी खडबडून जागा झाला व त्यानें तसें करण्याचें ठरविलें. दुसऱ्या दिवशीं तो रानांत गेला व त्यानें तो नारळ तोडून घरीं आणला. फोडून पाहिला तों त्यांत ती आंगठी सांपडली. त्यानें ती आंगठी आपल्या हातांत घातली. व मोठ्या आनंदानें घराकडे येण्यास निघाला.

घराकडे येत असतांना वाटेंत तो एका सोनारास भेटला. आंगठीची किंमत काय असावी म्हणून विचारतां, सोनारानें लबाडीनें ७।८ रुपये सांगितली. त्यावर तो शेतकरी हंसला व त्यानें सर्व हकीक भोळेपणानें त्या सोनाराला सांगितली. सोनाराच्या तोंडास पाणी सुटलें. त्यानें कपट मनांत योजून त्या शेतकऱ्यास म्हटलें, 'आतां तुम्ही थकलां आहांत व संध्याकाळ होऊन गेली. आतां माझ्या मतें रात्रभर तुम्ही मज गरीबाकडे विश्रांती घ्यावी. उद्यां सकाळीं आपण पुढच्या मार्गास लागलेलें बरें.' शेतकऱ्यानें नाइलाजानें कबूल करून तो त्या सोनाराच्या घरीं निजला. सोनारानें तो गाढ निद्रेंत असतां त्याची आंगठी काढून घेतली, व तिच्या जागीं तशीच दिसणारी दुसरी आंगठी घालून आपणही स्वस्थ निजला.

सकाळीं चार वाजतां उठून त्यानें शेतकऱ्यास जागें केलें. 'अद्याप तुम्हाला रस्ता बराच चालायचा आहे तेव्हां पहाटेपासून चालायला लागणें बरें, हें जाणून तुम्हास जागें केलें आहे. थोडी न्याहारी करून मग जा' शेतकऱ्यास त्याचें कपट न उमजून तो उठला. शौच मुखमार्जन करून व थोडी न्याहारी खाऊन त्यानें आपल्या गांवची वाट धरली.

इकडे सोनारानें मोठ्या आनंदानें आपल्या खुफुसी खोलींत जाऊन दाराला कडी घातली, व मला पांच लाख रुपये हवेत म्हणून त्या आंगठी जवळ आपली इच्छा सांगितली. त्याबरोबर वरून एकसारखा रुपयांचा पाऊस पडायला लागला. सोनाराचें टाळकें शेकून खोली बाहेर पळून जायलाही त्याला सवड मिळेना. रुपयांचा मारा असह्य झाला, पण ते पडायचें थांबेनात. शेवटीं त्या लाखों रुपयांच्या ढिगाखालीं चिरडून तो सोनार मरण पावला. तेव्हां रुपयांचा पाऊस थांबला. रुपयांच्या खण खण आवाजानें व सोनाराच्या किंकाळ्यांनीं घरची मंडळी धांवून आली. खोलीचें दार बंद होतें. तें फोडून मंडळी आंत घुसली. पहातात तों काय? शेटजी रुपयांच्या ढिगाऱ्याखालीं चिरडून मेलेले दृष्टीस पडले. कपटाचें प्रायश्चित्त असें मिळालें.

इकडे तो शेतकरी आपल्या घरीं पोंचला व त्यानें ती अंगठी बायकोस दाखवून सर्व हकीकत

तिला सांगून म्हटलें ‘ आतां आपले चांगले दिवस आले तेव्हां आपणांस काय हवें याचा नीट विचार करूनच या आंगठीजवळ मागितलें पाहिजे. कारण फक्त एकच इच्छा पूर्ण करण्याचा इच्यांत गुण आहे. ’ बायको म्हणाली, ‘ आपली जमीन बरीच ओसाड पडली आहे ती एकदम सुपीक व्हावी अशी प्रार्थना या आंगठीस करूं या. ’

नवऱ्यास तिचा हा विचार पसंत पडला नाहीं तो म्हणाला, ‘ अग चार पांच महिने तूं आणि मी मिळून जर कसून मेहनत केली तर ती जमीन सहज लागवडीस येईल. येवढ्यासाठीं आपण एवढी मूल्यवान आंगठी कां दवडावी? पुढें जर याहीपेक्षां मोठी अडचण आली तर मग या आंगठीचा उपयोग होणार नाहीं. तेव्हां या आंगठीचा आपण अशा वेळीं उपयोग करूं कीं पुन: तिची केव्हांही गरज पडणार नाहीं. ’

त्या वर्षीं नवरा बायकोनीं झटून काम केल्यामुळें जमीन लागवडीस येऊन त्यांना आतोनात नफा झाला आतां एकादी गाय, एक म्हैस व एक उमदें घोडें आपणांजवळ असावें असें बायकोस वाटून तसें ती नवऱ्याजवळ म्हणाली. नवऱ्यानें पुन: तिला धीर दिला कीं ‘ इतकी साधी गोष्ट आंगठीजवळ मागणें ठीक नाहीं. ’ आपण मेहनत केली तर जमीन पिकास आली तशीच मेहनत या वर्षी आणखी केल्यास घोडे, गाय सहज घेता येईल. ’

पुढच्या वर्षीं त्यांच्या मेहनतीनें उत्तम नफा झाला व त्यांत त्यांनीं घोडें, गाय व म्हैसही घेतलीं. एक दिवस नवरा अत्यंत आनंदात असतां आपल्या बायकोस म्हणाला, पहा ! आपलें कांहींसुद्धां उणें न पडतां आपले दिवस जात आहेत. शिवाय आंगठीचा उपयोग आपण अद्याप केव्हांही करूं शकतों. ’

यावर बायको म्हणाली, ‘ मग त्या आंगठीचा उपयोग करणार तरी केव्हां ? एका काळीं मी पहात होतें तों प्रत्येक गोष्टीची तुम्हास हाव होती व त्यामुळें तुम्ही नेहमीं असंतुष्ट रहात होता. आतां प्रत्येक गोष्ट मिळविण्याचें सामर्थ्य तुम्हास आलें असतांना तुम्ही अगदीं एकादया वैराग्याप्रमाणें तृप्ति दाखवितां याचा अर्थ तरी काय ? ’

नवरा म्हणाला, ‘ अग पण तुला इतकी उतावीळ कां ? आज कुठल्या गोष्टीची कमतरता आहे काय ? ही आंगठी घरांत आल्यापासून आपले दिवस चांगले आनंदांत जात आहेत. मग उगाच उतावळेपणा करून हलक्या सलक्या इच्छेखातर आंगठी निरुपयोगी कां करून घ्यावी ? ज्या दिवशीं असा प्रसंग येईल कीं आंगठीचा उपयोग केलाच पाहिजे त्यावेळीं आपण तसें करून सुखी होऊं ! ’ नवऱ्याच्या या बोलण्यानें तिची समजूत जशी पटायला पाहिजे, तशी पटली नाहीं, परंतु ती कांहीं न बोलतां स्वस्थ राहिली.

अशा रीतीनें त्या जोडप्यांचे दिवस आनंदांत जात होते. ती आंगठी घरांत आल्यापासून ते भाग्याला चढूं लागले. द्रव्यानें थैल्या व धान्यानें पेवें उत्तरोत्तर जास्त भरूं लागलीं. गांवच्या प्रमुख शेतकऱ्यांमध्यें त्याची गणना होतां होतां पुढें तो एक प्रमुख जमीनदार म्हणून नांवाजू लागला. नवरा बायको सहज बसले असतांना बायको आंगठीची आठवण देऊन अमुक करावें तमूक करावें म्हणून नवऱ्याच्या पाठीस लागे. परंतु हा म्हणे ‘ सध्यां गरज नाहीं. तशीच गरज पडल्यास ती जवळ आहेच. ’ शेवटीं तिनें आंगठीचा नाद सोडून दिला व पुढें बरींच वर्षे आंगठीचें कोणी नांवही काढलें नाहीं. या अवधींत त्यांचीं मुलें बाळें मोठीं होऊन शिकून हुषार झालीं. तेही म्हातारे झाले. परमेश्वरानें त्यांची संतोषवृत्ति पाहून त्यांच्यावर कृपा केली. पुढें मागें मृत्यु येऊन एकमेकांसाठीं दु:ख करीत बसण्यापेक्षां अशा ऐन सुखांत एकदम व एका ठिकाणीं मृत्यू यावा ही मात्र त्यांची इच्छा उत्कट होऊं लागली होती व ती देवाघरीं मान्य होऊन एक दिवस त्या दोघांना कल्पना नसतां अनायासें मरण आलें. त्यांच्या मुला

बाळांनीं मोठ्या समारंभानें त्यांचा दहनविधी केला. ती आंगठी ठेवावी असें एक मुलगा म्हणाला असतां वडील मुलगा म्हणाला, 'नको, बाबांना ती आंगठी फार प्रिय होती. ती त्यांचेच बरोबर जाऊंद्या.' असें म्हणून ती आंगठीही त्या प्रेतांबरोबर पुरण्यांत आली. वास्तविक त्या आंगठींत कांहीं अर्थ नव्हता कारण खरी आंगठी सोनारानें आधींच काढून घेतली होती परंतु संतोष व दीर्घोद्योग हीं परमेश्वराला आवडत असल्यामुळें त्यानें त्या जोडप्यास रंकाचा राव केलें.

---

## गुलाबाचीं फुलें

( ले—महादेव परशराम माने, गोरेगांव. )

कर्तव्याला श्रद्धेची जोड असेल तर कर्तव्य निश्चिततपणें सिद्धीस जाऊन कर्त्याचें नैतिक सामर्थ्य फार झपाट्यानें वाढत जातें.

कर्त्याची बुद्धि शुद्ध असली म्हणजे लहान कार्यहि कित्येकदां मोठ्या कार्याची नैतिक योग्यता पावतें.

कातड्याच्या भांड्यांतून पाणी पाझरतें, त्याप्रमाणें सर्व इंद्रियांतून एक इंद्रियविषयासक्त झालें तरी तद्द्वारां मनुष्याची बुद्धि नष्ट होते.

कुमार्गानें चढवलेली प्रयत्नाची हंडी यशाचे शिक्यावर टिकत नाहीं.

कोणतीहि गोष्ट मर्यादेच्या बाहेर गेल्यावर ती कितीही उत्तम असली तरी ती लोकांच्या तिरस्कारासच पात्र होते. गुण असतात त्याची अवगुणांत गणना होऊं लागते.

कोणत्याही सामाजिक किंवा धार्मिक सुधारणेच्या बाबतींत ज्ञानप्रसार हेंच मुख्य साधन व एकट्यानें फार पुढें न जातां लोकांना बरोबर घेऊन जाणें हेंच मुख्य धोरण असलें पाहिजे.

कोणत्याहि धंद्यांत भागिदारी म्हणजे एक प्रकारचें परावलंबन होय

कोणत्याहि बाबतींत अतिशयोक्ति करणें हें अंगीं विवेकशक्ति व सदभिरुची प्रबळ होण्यानेच टळतें.

कोणाची बुद्धि कशी आहे हें समजण्यास त्याच्या आचरणाखेरीज दुसरें साधन नसतें.

खरें सौंदर्य शरीराच्या दिखाऊपणांत नसून त्याच्या कृतीमध्यें असतें.

गुण, मग तो कोणताहि असो—ज्याच्याविषयीं मनुष्यास अहंकार वाटतो तो गुण—त्याच्या अंगीं पूर्णपणें बिंबला नाहीं असें समजावें.

घरांतील हलकेसलके खर्च कमी करून अडचण भोगणें पुरवलें, परंतु तसें न केल्यानें लोकांमध्यें जें दैन्य भोगणें पडतें तें फार अपमानास्पद असतें.

---

## अभिनव काव्यमाला भाग ३

या पुस्तकाची दुसरी आवृत्ति छापून विक्रीस तयार आहे. किं. १ रु. ट. ह. व व्ही. पी. खर्च निराळा.

म्यानेजर—चित्रशाळा प्रेस पुणें.


# वसुदेवाचा पेला.

( लें०: श्रीपाद बालकृष्ण देशपांडे, कुरोली–सिद्धेश्वर–सातारा. )


शास्त्रीय विषयाचें ज्ञान चांगलें होण्याला तें शिक्षण प्रयोगद्वारां मिळावें लागतें तसें तें न मिळेल तर शास्त्रीयज्ञान केव्हांही चांगलें होणार नाहीं. शाळानिहाय शास्त्रीय धडे शिकवावे लागतात, पण ते धडे शिकविण्यास जे प्रयोग करावे लागतात ते सर्व प्रयोग खेडेगांवीं सामानाच्या अभावीं करता येत नाहींत. अशा रीतीनें हा विषय शिकणें व शिकविणें अडचणीचें होऊन बसतें. ही अडचण लक्षांत घेऊन कांहीं लोकांना खेडेगांवीं मिळणाऱ्या सामानांत थोडक्या खर्चांत व थोडक्या श्रमांत हे प्रयोग कसे करता येतील यासंबंधानें विचार करून अशा प्रकारचे कांहीं प्रयोग लेखद्वारां शिक्षकवर्गापुढें मांडलेले आहेत. आजच्या लेखांत वसुदेवाच्या पेल्याचा प्रयोग सुलभ रीतीनें खेडेगांवींसुद्धा कसा तयार करता येईल हें लिहिण्याचें योजिलें आहे. प्रारंभीं वसुदेवाच्या पेल्याची अंतर्रचना कशी असते तें पाहूं, व मग तो कसा तयार करता येईल तें मागाहून पाहूं.

आ. नं. १ मध्यें दाखविलेल्या कृतीप्रमाणें भांड्यांतील पाणी वर चढून खालीं कसें वहातें हें क्रमिक मराठी सातव्या पुस्तकांतील ७८ वा धडा समजाऊन दिल्यानंतर विद्यार्थ्यांच्या ध्यानीं येतें. पण वसुदेवाच्या पेल्यांत हा प्रकार कसा होतो. हें पुष्कळ विद्यार्थ्यांच्या ध्यानीं येत नाहीं. शिक्षकाला साधनसामुग्रीशिवाय हा प्रकार प्रत्यक्ष करून दाखविण्याची अडचण पडते. वक्रनलिकासुद्धां पुष्कळ शाळांना नसतें यामुळें प्रयोग करून हा धडा चांगला समजावून सांगता येत नाहीं. वसुदेवाच्या पेल्यांत वक्रनलिका कोठें असते, पायाला पाणी लागेपर्यंत तें गळूं कां लागत नाहीं, नंतरच कां गळूं लागतें वगैरे ज्या शंका मुलांना येतात त्या आकृति नं. २ वरून त्यांच्या ध्यानांत येतील. आ. नं. १ मध्यें जशी वक्रनलिका असते त्याच्यापेक्षां जास्त जरा निराळ्या प्रकारची वक्रनलिका आ. नं. २ मध्यें आहे. ही

आ. नं. २




आ. नं. १




वक्रनलिका वसुदेवाच्या कमरेपासून तळ्यापर्यंत जो भाग आहे त्यांत झांकलेली असते. त्यामुळें ती

बाहेरून दिसत नाहीं. ' अ ' ही आखूड बाजू आहे व ' ब ' ही लांब बाजू आहे. ' ब ' बाजूचें टोंक पेल्याच्या भोंकाशीं पक्कें केलेलें असतें, व ' अ ' बाजूचें टोंक मोकळें ठेविलेलें असतें. पाणी चढतां चढतां ' क ' पातळीपर्यंत आलें म्हणजे तें ' ब ' बाजूस शिरूं लागतें. ' अ ' बाजूपेक्षां ' ब ' बाजू लांब आहे हें वर दर्शविलेंच आहे. ' अ ' व ' ब ' बाजू पाण्यानें भरल्यानंतर पाणी कसें वहात राहतें हें धड्यांत सांगितलेलें आहेच. 'क क' पातळीलाच चिकटून कृष्णाचे पाय असल्यामुळें कृष्णाच्या पायाला पाणी लागलें कीं, तें वाहूं लागतें ' कक ' पातळीपर्यंत पाणी आल्याशिवाय तें ' ब ' बाजूंत शिरतच नाहीं. म्हणून कृष्णाचे पायाला पाणी लागण्यापूर्वी तें वहात नाहीं. ' कक ' पातळीपर्यंत पाणी आलें म्हणजे तें वाहूं लागतें पण हा वाहण्याचा प्रकार किती वेळ राहाणार हा प्रश्न शिल्लक राहतोच. याचें उत्तर असें कीं, ' अ ' बाजूचें टोंक जोंपर्यंत पाण्यांत आहे तोंपर्यंत पाणी वाहात राहणार. तें टोंक उघडें पडलें कीं, त्या टोंकानें पाणी आंत न जातां हवा जाईल. हवेच्या दाबाचें तत्त्व ज्यांना माहित नाहीं त्यांना वरील प्रकार पाहून आश्चर्य वाटतें.

या पेल्याला वसुदेवाचा पेला असें नांव का दिलें वसुदेव व कृष्ण यांची काय कथा आहे, त्या कथेचा व सायफनच्या वक्र-नलिकेचा कसा संबंध जोडला आहे ही माहिती या ठिकाणीं सांगितली असतां अप्रासंगिक होणार नाहीं असें वाटल्यावरून ती थोडक्यांत येथें देत आहे. कंसाकडे नारदांनीं येऊन सांगितलें कीं, तुझा नाश करण्याकरितां श्रीविष्णु स्वतः अवतार घेणार आहे. देवकीच्या पोटीं आठवा जो पुत्र होईल तो श्रीविष्णूचा अवतार असेल. तो तुला मारील. सावध रहा यावर कंस बोलला, देवकीचीं सगळींच पोरें मी मारून टाकीन. देवकी ही कंसाची बहीण व वसुदेव हा देवकीचा नवरा. नंतर कंसानें वसुदेव-देवकी यांना त्यांच्या गांवाहून बोलावून आणलें, व मथुरेंत त्यांचा वाडा होता त्यांत कैदेंत ठेविलें. देवकीवर नजर ठेवण्याकरितां आपल्या वतीच्या बाया नेमल्या. देवकी बाळंत झाली म्हणजे कंस स्वतः येई व तिच्या हातचें मूल हिसकावून घेऊन तें दगडावर आपटून ठार मारी. याप्रमाणें देवकीचे सहा पुत्र मारिले. सातव्या खेपेला भीतीनेंच तिचा गर्भपात झाला. वसुदेवाची रोहिणी नांवाची दुसरी एक स्त्री होती, तिलाही या सुमारास गर्भ राहिला. कंस तिचेंही मूल कदाचित् मारील या भीतीनें वसुदेवानें तिला आपल्या नंद नांवाच्या मित्राच्या घरीं पाठवून दिलें. तो नंद मथुरेच्या शेजारींच रहात असे. पुढें देवकीला आठवा गर्भ राहिला. रीतीप्रमाणें ही बातमी कंसाला पोंचली. या वेळीं कंस अगदीं डोळ्यांत तेल घालून तत्पर होता. चमत्कार हा कीं, देवकी आठव्या महिन्यांतच बाळंत झाली. तेव्हां मध्यरात्र होती. सर्व माणसें ऐन झोपेंत होतीं, पाऊस पण अगदीं मी म्हणत होता. श्रावणाचा महिना होता. तिथी वद्य अष्टमी होती. हा जो आठवा मुलगा झाला तोच **श्रीकृष्ण**. अतिशय सुंदर असें हें बाळ कंस मारणार हें मनांत आलें तेव्हां त्या उभयतांना कांहीं सुचेनासें झालें. कांहीं तरी खटपट करून हें मूल वाचवावें असें त्यांना वाटलें. लागलेंच वसुदेवानें तें मूल घेतलें व वाड्याबाहेर पडला पहारेकरी गाढ निद्रेंत होते पावसाच्या आवाजांत दरवाजे उघडल्याचा आवाज कोणाला ऐकूं आला नाहीं. नंदाच्या घराकडे वसुदेव निघाला. वाटेंत यमुना नदी लागली, वसुदेव पाण्यांत शिरला यमुनेची इच्छा ही होती कीं, आपण कृष्णाच्या चरणाचें तीर्थ घ्यावें. तीर्थ घेण्याकरितां यमुना वरवर चढूं लागली. पाणी जसजसें वर चढूं लागलें तसतसें वसुदेव कृष्णास वर

उचलून धरूं लागला. शेवटीं हें संकट जाणून कृष्णानेंच आपला पाय पाण्याला लाविला; त्याबरोबर पाणी उतरून तें कमी झालें ही कथा वसुदेवाच्या पेल्यांतील सायफनचें तत्त्व ही फार चांगली योजना साधली आहे.

आतां हा वसुदेवाचा पेला आपणांस कसा तयार करता येईल तें पाहूं. दंड गोलाकृति आपल्या हाताच्या बोटाच्या घेरापेक्षां कमी घेराची, मेणाची किंवा लाखेची कांडी घेऊन ती आ. नं ३ ' अ ' त दाखविल्याप्रमाणें चाकवावी त्याच्यावर चिखल लावून ( अर्थात् हा चिखल चांगल्यांपैकीं पाहिजे ' त्यावर वसुदेवाची मूर्ति करावी. कांडीला चिखल लाविल्यानंतर ती आ नं. ३ ' ब ' त दाखवि-




प्रमाणें तयार होईल. या कांडीवर वसुदेवाची जी मूर्ति करावयाची ती आ. नं. २ मध्यें दाखविल्याप्रमाणें करावी. मूर्तीचे पाय नळीच्या टोंकांकडे करावयाचे. पायांच्या खालीं ' अक ' एवढा लांब नळीचा भाग राहील. कृष्णाची मूर्ति निराळी करावी पाहिजे असल्यास ओलेपणींच चिकटवून टाकावी. कृष्णाचे पाय कोणत्या पातळींत आले पाहिजेत हें आतां पुन्हां सांगण्याचें कारण नाहीं. वाळल्यानंतर तें सर्व भाजून काढावें. भाजते वेळीं नळीचीं टोकें खालीं करावींत, म्हणजे मेण किंवा लाख वितळून खालीं पडेल. भाजल्यानंतर करवंटी किंवा तसल्या आकाराचें भांडें घेऊन त्याला भोंक पाडून त्यांत लांब नळीचें टोंक पक्कें बसवावें. निराळा केलेला कृष्ण असल्यास ज्या पातळींत पाणी आल्यानंतर सांडूं लागेल त्या पातळीला लागून कृष्णाचे पाय राहतील अशा रीतीनें कृष्ण वसुदेवाच्या अंगाला बांधावा. आम्हाला कांचेची नळी नाहीं. तेव्हां हा प्रयोग कसा करावा अशी अडचण शिक्षकांना आतां पडणार नाहीं. बिन खर्चानें थोडक्या श्रमांत वरील कृति आहे. शिक्षकांनीं खटपट करून केलें मात्र पाहिजे. तांब्याच्या पत्र्याची नळी केली तर जास्त चांगलें होईल. कारण ही नळी मातीच्या नळीप्रमाणें मोडण्याची किंवा फुटण्याची भीति नाहीं. ही नळी सांगितल्याप्रमाणें तांबटास वगैरे करता येते. तांब्याच्या पत्र्याची नळी केली तर लाकडाचा किंवा चिखलाचा काढता-घालता वसुदेव करता येतो. चिखलाचा काढता-घालता केलेला वसुदेव वाळवून भाजावा, म्हणजे पाण्यांत घातला असतां विरघळण्याची भीति नाहीं. प्रयोगाचें काम संपलें कीं वसुदेव काढून ठेवावा काढत्या-घालत्या वसुदेवाच्या योजनेनें वक्रनलिका कोठें असते, कृष्णाच्या पायाला पाणी लागलें असतां कां गळूं लागतें, तत्पूर्वीं कां गळत नाहीं, वगैरे माहिती मुलांना समजावून सांगणें सोपें जातें

विद्याधरवामन भिडे यांचें
# अर्थालंकारांचें निरूपण.
किंमत १ रुपया म्यानेजर—चित्रशाळा प्रेस, पुणें.

# गांधी टोपी.

लेॅ० भा. शां. रेगे, ( मुंबई. )

मोहन व जगू असे दोघे भाऊ एका गांवीं रहात असत. मोहन हा लहानपणापासून परदेशी कापडाचे कपडे घालीत असे त्याला देशी कपडे म्हटलें कीं कपाळाला आठ्या पडत. परंतु जगू साधे कपडे घालीत असे. त्याला परदेशी कपड्यांचा मनापासून कंटाळा असे. एके दिवशीं त्यांच्या मावशीच्या घरीं तिच्या मुलीचें लग्न असल्यामुळें ते तिकडे जात होते. जातांना मोहननें ( अस्सल विलायती ) रेशमी इजार, कोट, व भरजरी मखमलीची टोपी घातली होती. पण जगूचे त्याच्या उलट असल्यामुळें. त्यानें खादीची इजार, कोट, व गांधी टोपी घातली होती. रस्त्यांतून जात असताना त्यांचा खालीलप्रमाणें संवाद चालला होता.

"काय जगू, तुझे हे जाड खादीचे कपडे व गांधी टोपी ! अरे तुला हे खादीचे कपडे व गांधी टोपी घातलेली पाहून लग्नांतील सर्व मंडळी हंसतीलना! असें मोहन जगूस म्हणाला.

"हंसेनात का, मला त्यांच्याशीं काय करावयाचें आहे. जर मला ते हंसले तर त्यांचे दांत दिसतील. बरें तें असूंदे. पण खरोखर, खरा गुण कांहीं रूपावर, नांवावर, किंवा उत्तम कपड्यावर अवलंबून नसतो. समजलंका मोहन ?" असें जगू मोहनास म्हणाला.

"अरे आतां गुणाविषयीं चाललें नव्हतें. कपड्याविषयीं बरं तुझी टोपी पहा कशी आहे ती व माझी पहा कशी आहे ती ! असें मोहन आपली भरजरी मखमलीची टोपी काढून म्हणाला.

"माझी टोपी किंवा कपडे कसेहि असूं देत. पण स्वच्छ आहेतना ? मग कांहीं हरकत नाहीं" जगू म्हणाला, "अरे कपडे स्वच्छ असले म्हणून काय झालें माझेसारखे कुठें तुझे नकतकत आहेत. ही पहा माझी मखमलीची टोपी किती तरी जरानें मढवून उत्तम केलेली आहे ती." असें मोहन म्हणाला.

असे रस्त्यांतून बोलत चालले असतां मोहनची मखमलीची जरीची टोपी रस्त्यांतून जाणाऱ्या एका मनुष्याचा धक्का लागून खालीं जवळच असलेल्या चिखलांत ती पडली.

त्याबरोबर जगू म्हणाला, पाहिलास, **तुझ्या गर्वाचा व ऐटीचा परिणाम.**


ह्या बोलण्याचा मोहनास राग येऊन त्यानें जगूची टोपी हिसकाऊन घेऊन त्याच चिखलांत टाकून दिली. झालें. दोघेही आपल्या चिखलांत भरलेल्या टोप्या घेऊन घरीं परत फिरले. त्या दिवशीं त्यांची आई लग्नाचे काम करण्याकरितां घरांतून अगोदर गेली होती. त्या दिवशीं ही घडलेली गोष्ट आईस सांगण्यास मिळाली नाहीं. नंतर घरीं आल्यावर त्यांनीं आपापल्या टोप्या धुतल्या. त्यांत जगूची फार स्वच्छ झाली, पण मोहनची भरजरी मखमलीची असल्यामुळें त्याच्यावरचा जर जाऊन उलट जास्त खराब झाली.

दुसरे दिवशीं त्यांची आई घरीं आली व त्या मुलांनीं झालेली खरी हकिगत आईस सांगितली. तेव्हां त्यांची आई त्या दोघांस आपल्या जवळ घेऊन म्हणाली, बाळांनो, आपण कधींही गर्व बाळगूं नये व ऐटी करूं नये. आपण **नेहमीं साधा पोशाख करावा. कोमल वस्तु फार थोडे दिवस टिकतात**

हा उपदेश जगू व मोहन यांस पटला व त्यांच्या तोंडांतून अखेर **गांधी टोपीनें जय मिळविला** असे उद्गार आले. तर कोणीही मनुष्याने गर्व करूं नये. व साधेपणानें वागावें.

# काळाची करणी.

एकदां एका पारध्यानें जाळें पसरलें व त्या जाळ्यांत एका माकडाला पकडलें. आपल्याला पकडलेलें पाहून तें माकड फार काकुळती आलें आणि



म्हणालें, " महाराज ! मला सोडा हो, सोडा ! मी तुमच्या उपयोगीं पडेन." "अरे, जा तूं, काय उपयोगीं पडणार ? मला नकोत तुझे उपकार. चल नीघ



चालता हो. " असें म्हणून त्या पारध्यानें त्याला हांकून लावलें.

पुढें कांहीं दिवसांनीं तो पारधी शिकार करीत असतां एक बैल आला व त्यानें शिंगांनीं त्याला फेंकून दिलें.

पारध्याला पुष्कळ जखम झाली आणि त्याला



हालचाल करतां येईना. मरण जवळ येऊं लागलें. पण इतक्यांत तें माकड जवळ आलें. तें माकड त्याला दररोज उत्तम उत्तम फळें आणून देई, त्याला पाणी



पाजी आणि त्याची शुश्रूषा करी. तेव्हां कोणत्याहि क्षुल्लक प्राण्याची उपेक्षा करूं नये. काळाची करणी चमत्कारिक असल्यामुळें कोणाचा कोणत्यावेळीं उपयोग होईल हें सांगवत नाहीं.

---


मुलांकरितां ] **पंचतंत्र** [ सचित्र !

संस्कृत पंचतंत्रांतील सर्व गोष्टींचें मराठी सुबोध भाषांतर केलें असून प्रत्येक गोष्टीस सुबक चित्र जोडलें आहे. एकंदर गोष्टी ५० असून चित्रेंही ५० आहेत. इसापनीतीप्रमाणेंच पंचतंत्रांतील गोष्टीही विशेष मनोरंजक असून बोधप्रदही आहेत. टाईप ग्रेट, कागद ग्लेझ, पृष्ठसंख्या ३५० बाईंडिंग जाड पुठ्याचें, किं. १८४ ट. ह. ८४ शिवाय. **म्यानेजर—चित्रशाळा प्रेस, पुणें.**

# डावखोरा माणूस.

कोणताहि माणूस आपल्या डाव्या हातानें एखादी गोष्ट करूं लागला, म्हणजे आपल्याला त्याचें मोठें आश्चर्य वाटतें. व आपण त्याला "अरे उजव्या हातानें कर कीं," असें म्हणतों. डाव्या हातानें काम करणाऱ्या मनुष्याच्या योग्यतेबद्दल आपल्याला एक प्रकारचा अनादर वाटत असतो.

परंतु आम्ही या लेखांत एका डावखोऱ्या माणसाचें चरित्र देणार आहों, त्यावरून त्याची योग्यता आपणांस समजून येईल. या माणसानें बरींच पुस्तकें



लिओनार्डो.

लिहिलीं व तीं सारीं डाव्या हातानें लिहिलीं. त्या पुस्तकांतील भाग अत्यंत महत्त्वाचा आहे, एवढेंच नव्हे. तर तो ज्या पद्धतीनें लिहिला आहे ती पद्धत विशेष आश्चर्यकारक आहे पुस्तकांतील अक्षरें तो उलटीं काढीत असे व उजवीकडून डावीकडे लिहीत येई. हीं अक्षरें आरशांत धरलीं म्हणजे सुलट दिसत व नीट वाचतां येत; तुम्ही ही गंमत करून पहा.

तो फार विद्वान होता. शास्त्रांतील एकादी गोष्ट त्याला ठाऊक नव्हती असें नाहीं. पुढें जे अनेक शोध लागले, त्या साऱ्या शोधांचा धागा याच्या ग्रंथांत सांपडतो. हवेंत उडण्याच्या यंत्राची रचना करण्यांत त्यानें पुष्कळ काळ घालविला. त्याला पुष्कळ कला येत असत. तो गायनकलेंत फार कुशल होता. त्याला उत्तम गातां येत असे व वाजवितां येत असे. पावा वाजविण्यांत त्याचा हातखंडा असे. तो गणितज्ञ व एंजीनिअर होता.

इटलीमध्यें कालवे कुठें कुठें काढावेत याची योजना त्यानें फार आगाऊ आंखून दिली होती. त्यानें संगमरवरी दगड कापण्याची करवत शोधून काढली.

तो शिल्पकार होता. त्यानें तटबंदीची योजना ठिकठिकाणीं केली. तो युद्धाचीं शस्त्रास्त्रें शोधून काढण्यांत आपला वेळ खर्च करी. तथापि यावरून तो रुधिरप्रिय होता असें नाहीं. त्याचा स्वभाव अत्यंत शांत व दयाळू असे

वाफेच्या शक्तीचा उपयोग करावा असें त्याला फार वाटे. आणि जरी त्याला त्यांत यश आलें नाहीं, तरी त्यानें काढलेल्या आकृत्यांवरून वाफेच्या शक्तीनें चालणारीं जहाजें त्यानें तयार केलीं होतीं असें दिसतें. ही कल्पना त्यानें ४०० वर्षांपूर्वीं काढली होती, हें लक्षांत ठेवलें म्हणजे त्याची योग्यता लक्षांत येईल.

हा माणूस ३० वर्षांचा झाला तेव्हां त्याला राजपुत्रानें भेटीस बोलावले. तो राजपुत्राच्या भेटीस गेला व त्याला त्यानीं पावा नजर केला. भेटीस जातांना त्यानीं राजपुत्राला एक पत्र लिहिलें. या पत्रावरून त्याला किती गोष्टी येत हें लक्षांत येतें. तथापि आपल्याला या पासून समाधान वाटत नाहीं असें तो पत्रांत लिहितो.

त्याला मोठमोठें पुतळे तयार करता येत व अप्रतीम चित्रें काढतां येत. इटलीच्या राजधानींत गेले असतां या चित्रांचें अवशेष अद्यापहि दृष्टीस पडतात. निरनिराळे रंग एकत्र मिसळून ते चिरकाल कसे टिकतील याचा हा गृहस्थ प्रयोग करीत होता आणि त्यांत त्याला यशहि आले. कोणतीहि नवी गोष्ट शोधून काढण्याचें त्याला वेड असे.

कोणतेंहि काम करितांना तो कधींहि घाई करीत नसे. एखादें चित्र संपविण्यास चार वर्षें लागलीं तरी हरकत नाहीं; परंतु तें उत्तम झालें पाहिजे, याकडे त्याचा कटाक्ष असे.

अशाप्रकारें मोठा संशोधक, मोठा विद्वान्, मोठा कारागीर, मोठा गवई, मोठा चितारी व मोठा शास्त्रज्ञ तो होता. त्यानें ज्या ज्या गोष्टींचा पाया घातला, त्या त्या आधुनिक काळीं पूर्ण झाल्या आहेत त्यानीं आपलें सारें काम डाव्या हातानें केलें हें सांगावयास नकोच.

हा फ्रान्समध्यें मरण पावला. फ्रान्सच्या राजाचा हा मित्र व आश्रीत होता. दारिद्र्यांत लहानपणीं जन्मलेला लिओनार्डो आपल्या गुणांनीं श्रीमंत होऊन प्रसिद्धिस आला. यावरून गुण हे अवयापेक्षां श्रेष्ठ असतात हें सिद्ध होतें.

# दोन खोडकर मुलें.



“ अवबब ! किती ह्या मुंग्या ” पहिला म्हणतो.
“चला त्यांतल्या कांहीं वरीं नेऊं ” दुसरा म्हणतो.



“ आता मी चैनीत निजणार. ”
“ आणि मला गाढ झोंप येणार. ”



आणि “ बाबांच्या बिछान्यांत टाकूं. ”
“ किती दमलों मी बाबा !” उंदीर म्हणतात.



“ हें नाकावर काय बुवा ? ”
“ अरे बापरे ! धांवा धांवा ! सोडवा. ”

# शालापत्रकाची चढाओढ.

मागील कोड्यांचीं उत्तरें.

## सर्वांकरितां.

विलायत.

व

## मुलांकरितां.

केशव.

बरोबर उत्तर पाठविणाऱ्यांचीं नांवें:—

१ कृष्णाजी रामचंद्र केळकर.
२ विष्णु रामचंद्र माटे
३ माधव व्यं. जोशी.
४ माधव भास्कर जोगळेकर.
५ गोपाळ विठ्ठलराव करवंदे.
६ महादेव वासुदेव सातारकर.
७ गजानन वामन गाडगीळ.
८ दामोदर केशव कुळकर्णी.
९ उमाकांत बाबुराव कात्रे.
१० दामोदर रामचंद्र आपटे.
११ वसंत बळवंत सुळे.
१२ मोरेश्वर तुकाराम चोबे.
१३ गोविंद गोपाळ पेंढरकर.
१४ दत्तात्रय गणेश भागवत.
१५ विठ्ठलदास सुलतानचंद व्यास.
१६ सदानंद निळकंठ सोहनी.
१७ रामचंद्र त्रिंबक केणेकर.
१८ दिगंबर दत्तात्रय बर्वे.
१९ बाळकृष्ण अनंत बाळ.
२० यशवंत विष्णु देशपांडे.
२१ गोपाळ कृष्णाजी इनामदार.
२२ शांताराम पुंडलीक नाईक.
२३ गोविंद गोपाळ पंडीत.
२४ वसंतलाल एम् शाह.
२५ कृष्णाजी वासुदेव इनामदार.
२६ पं. रा. आलेगांवकर.
२७ सिताराम विष्णु कुणे
२८ शंकर दत्तात्रय कालेलकर.
२९ एच. जी. ब्रह्मे.
३० महादेव यशवंत देऊळकर
३१ आनंदा जाकोबा घोरपडे.
३२ हणमंत कृष्ण कुळकर्णी
३३ एन्. जी शास्त्रे.
३४ राजाराम बाबाजी पोतदार.
३५ वासुदेव अर्जुन वेतुरकर.
३६ विष्णु कृष्ण दळवे.
३७ गणपती दत्तात्रय देशपांडे.
३८ रघुनाथ गोपाळ भावे.
३९ गोपाळ केशव सप्रे.
४० वामन दाजी नांदेडकर.
४१ गणेश महादेव केळकर.
४२ सौ पार्वतीबाई पुरंदरे.
४३ दे. श्री. धनेश्वर.

## मुलांकरितां.

१ विनायक दत्तात्रय अरगडे
२ शिवआप्पा एन् माळी.
३ चिं. म. गुरुजी.
४ बालदेवप्रसाद बर्मा
५ बिंद्रराज जयनारायण मारवाडी.
६ शंकर दत्तात्रय देशपांडे.
७ कु ललिताबाई देशपांडे.
८ मणीलाल गुलाबचंद गुजराथी.
९ पुंडे.
१० रमणलाल गुलाबचंद गुजराथी
११ अंबादास खंडेराव सावदे
१२ नागेश त्रिंबक गडबोले.
१३ विष्णु रामचंद्र माटे.
१४ शां. पु. नाईक.
१५ कु. सोनु चिपळुणकर.
१६ रामचंद्र अनंत बाळे.
१७ दिगांबर दत्तात्रय बर्वे.
१८ वासुदेव त्रिंबक केणेकर
१९ सदानंद निळकंठ सोहनी.
२० विठ्ठलदास सुलताचंद व्यास.
२१ दत्तात्रय गणेश भागवत.
२२ गोविंद गोपाळ पेंढरकर.
२३ मोरेश्वर तुकाराम चोबे.
२४ वसंत बळवंत सुळे.
२५ दामोधर रामचंद्र आपटे.
२६ उमाकांत बाबुराव कात्रे.
२७ दामोदर केशव कुळकर्णी.
२८ विनायक महादेव गाडगीळ.
२९ महादेव वासुदेव सातारकर.
३० गोपाळ विठ्ठलराव करवंदे.
३१ महादेव भास्कर जोगळेकर.
३२ महादेव व्यंकटेश जोशी.

## बक्षिसें.

### सर्वांकरितां.

नं. ६ विद्वत्त्व आणि कवित्व.
नं. १६ विनोद व महदाख्यायिका.
नं. २४ रासेलस.
नं. ३३ अर्वाचिन महाराष्ट्र.
नं. ४१ मेघदूत.

### मुलांकरितां.

नं. ५ ध्रुव चिलिया.
नं. ७ भाऊबिजेची ओवाळणी.
नं. १५ झोंपाळ्यावरची गीता.
नं. २० शिलंपरं भूषणं.
नं. ३२ साक्रेटीस चरित्र.

वरील सर्व बक्षिसांचा निकाल चिठ्ठ्या उचलून लावण्यांत आला.

## नवीं कोडीं.

### सर्वांकरितां.

चार अक्षरी शब्दांचा चौकोन करून दाखवा. चौकोनांतील शब्द दुर्बोध अगर कसे तरी जुळविलेले नसावेत. तीन अक्षरीं चौकोनाचें उदाहरण खालीं दिलें आहे. त्याचप्रमाणें चार अक्षरांचा चौकोन करा.

| | | |
|---|---|---|
| के | श | व |
| श | र | ण |
| व | ण | वा |

### मुलांकरितां.

त ब क

या शब्दांतील प्रत्येक अक्षर त्याचे जितके शब्द बनवितां येतील तितके बनवा.

उदाहरण.

नवखा

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | न | वी | न | |
| २ | न | र | क | इ |
| ३ | व | खा | र | |
| ४ | व | हा | ण. | इ. |
| ५ | खा | प | र | |
| ६ | खा | दा | ड | ई |

ज्याचे शब्द जास्त त्याला बक्षीस मिळेल.

**सूचना:**—उत्तरें पाठविणारांनीं आम्ही दिलेले नियम वाचून उत्तरें पाठवावीं.

## रशियाचा झार.

महायुद्धाचे दिवस होते. रशियाचे लोक राज्याच्या जुलमाला फार कंटाळले होते. गरिबांना अन्न-वस्त्र अगर घरहि राहवयाला मिळत नव्हतें. " परमेश्वरा ! हा राजा नामशेष होऊं दे " अशी लोक प्रार्थना करीत. राजाच्या जाचामुळें आपल्यावर ही सारी अनर्थपरंपरा कोसळते असें लोकांना वाटे. त्यामुळें लोकांनीं ठिकठिकाणीं गुप्त मंडळें स्थापिलीं, चोरून-मारून हत्यारें गोळा केलीं व प्रसंग केव्हां येतो व राजाला केव्हां उडवतो असें त्यांना झालें होतें. त्यांनीं राजाच्या सैन्याबरोबर लढण्यास स्वतःचें

मे १९२४.
कुपन.
सर्वांकरितां

मे १९२४.
कुपन.
मुलांकरितां

सैन्य तयार केलें. महायुद्ध सुरु झालें. या बंडखोर लोकांनीं बंडाचें निशाण उभारलें, राजधानी घेतली आणि राजाला कैद केलें. त्यांनीं राजा, राणी, त्यांचा मुलगा व ४ मुली यांना एके गांवीं नेऊन कैदेंत ठेवले. त्यांच्या बरोबर दास, दासी, डॉक्टर आचारी वगैरे नोकर ठेवले. त्या बंगल्याभोंवतीं अजस्त्र तोफांचा व सशस्त्र शिपायांचा रात्रंदिवस पहारा असे. राजाची बरदास्त ठेवण्याचें काम त्यांनीं युरोवस्की नांवाच्या मनुष्याकडे सोंपविलें.

बंड यशस्वी झाल्यावर बोलशेविक लोकांनीं आपली सत्ता तेथें सुरु केली. त्याबरोबर राजपक्षाच्या शिपायांनीं त्यांच्या बरोबर युद्धास सुरुवात केली.

या दोघा सैन्यांची झटापट चालू असतां त्यांपैकीं, एक तुकडी झार ज्या गांवीं होता, त्या गांवीं येऊं लागली. हें पाहून बोलशेविक लोकांना फार भीती वाटली. त्यांना वाटलें कीं, जर हा झार सुटेल व आपल्या लोकांत जाऊन मिसळेल तर आपली धडगत नाहीं. तेव्हां त्यांनीं झारला ठार करण्याचें ठरविलें. आणि युरोविस्कीला मुलांसहीत ठार मारण्याचा हुकूम सोडला.

एके दिवशीं रात्रीं युरोविस्की झार जवळ आला आणि त्यानें त्याला उठविलें, तो म्हणाला "! शत्रूचें सैन्य जवळ येऊं लागलें आहे. उद्यां सकाळीं घनघोर युद्ध होईल असें वाटतें. अशा स्थितींत आपण तेथें रहाणें चांगलें नाहीं. तेव्हां कपडे घाला आणि चला तेथून"

त्यांनीं कपडे चढविले व तो बायकामुलांसह तेथून निघाला. सर्वांच्या पुढें झार होता व आपल्या मुलीचा हात धरून त्याची बायको चालली होती. सर्वांच्या मागें युरोविस्की होता. त्याच्या हातांत रिव्हाल्वर होता आणि त्याच्यामागें हत्यारबंद पोलीस होते. हे सर्वजण खालीं उतरून गेले. झार व त्यांची मंडळी जेवण्याच्या खोलींत एका कोपऱ्यांत गपचूप उभी राहीली त्यांच्या विरूद्ध बाजूला युरोविस्कि व हत्यारबंद शिपाई होते. त्या खोलींत एका क्षणांत मोठी गडबड उडाली. युरोविस्किच्या सांथीदारांनीं आपले रिव्हाल्वर्स बाहेर काढले. हें पाहून राणी घाबरली. तिनें आपल्या हातांनीं आपले डोळे झांकून घेतले. झारला काय ठाऊक कीं, आपला अंतकाळ जवळ आला आहे. इतक्यांत युरोविस्कीनें आपल्या खीशांतून एक कागद काढला. तो बोलशेविक सरकारचा हुकूम होता. त्यांत झारच्या साऱ्या मंडळींना ठार मारावें असा हुकूम होता. तें ऐकतांच झारची सारी मंडळी धाडकन जमीनीवर पडली. झार कांहीं बोलणार इतक्यांत युरोविस्कीनें गोळी झाडली. ती गोळी त्याच्या डोक्याला लागली व तो मरण पावला. लागलाच दुसऱ्या शिपायांनीं फैर झाडून बाकीच्या मंडळींना ठार केलें.

हें दुष्ट कृत्य केल्यावर हीं सारीं प्रेतें कांबळ्यांत गुंडाळून मोटारींत ठेवलीं. युरोविस्की तेथून बारा कोसावर एका जंगलांत गेला त्या जंगलांत एका झाडाखालीं मोठी चिता रचली. त्या चितेवर यांना ठेवण्यांत येऊन अग्नी दिला गेला. ती चिता २४ तास जळत होती.

अशा प्रकारें जगांतील एका बलाढ्य राजाला देहदंडाची शिक्षा झाली. परंतु देशाच्या हिताकरितां कधीं कधीं असल्या राजांना वळी द्यावेंच लागतें.

---

# जोडाक्षर-विरहित वाचनपाठ.

हें पुस्तक नुकत्याच अक्षर ओळख झालेल्या मुलांमुलींकरितांच लिहिलेलें आहे. पुस्तकांत एकंदर १७ गोष्टी अगदीं सोप्या भाषेंत, व एकहि जोडाक्षर न येऊं देतां लिहिल्या आहेत. प्रत्येक गोष्टीचे आरंभीं कथानकाचें मूर्तिमंत चित्र दिलें असल्यामुळें गोष्ट वाचण्याचे अगोदरच त्यांतील सारांश मुलांचे सहज लक्षांत येतो. किं. अवघी चार आणे

# उजळणीचें पुस्तक.

ह्यांत सर्व मुळाक्षरें चित्रयुक्त दिलीं असून मोडी व बालबोध बाराखड्या तयार करण्याची समजूत थोडक्यांत करून दिली आहे. नंतर मोडी व बालबोध सोपे शब्द मुलांना सहज ओळखण्यासारखे दिले आहेत. पुढें १० अंक सचित्र दिले असून त्याबरोबर मुलांस बेरीज व वजाबाकीची समजूत टिंबांच्या आकृतींनीं व गोट्यांच्या चौकटीच्या सहाय्यानें घालून दिली आहे. नंतर पाढ्यांची समजूत दिली असून शेवटीं उजळणी दिली आहे. एकंदरींत हें पुस्तक नवीन तऱ्हेनें मुलांना शिकविण्यास फार उपयुक्त असें झालें आहे. कागद ग्लेज किं. ८१८६.

## लहान मुलांकरितां उपयुक्त अशीं पुस्तकें

# नवी आवृत्ति ] सचित्र अक्षरबोध. [ नवी आवृत्ति

या पुस्तकांत 'अ' पासून 'ज्ञ' पर्यंत स्वर आणि व्यंजनें हीं सर्व निरनिराळ्या भपकेदार रंगांत व तें अक्षर नांवांच्या प्रथम अक्षरानें दर्शविणाऱ्या चित्रांसह दाखविलेलीं असून १ पासून १० पर्यंत अंकहि नवीन पद्धतीनें दाखविलेले आहेत. पुस्तकाचा साईज क्राऊन चतुर्थांशाइतका मोठा ७×९ इंच ठेवला असल्यामुळें अक्षरें व चित्रें फारच सुबक व मोठीं अशी झालीं आहेत. एकंदर पुस्तक इंग्रजींतील सचित्र रंगीत ए बी सी डी शिकण्यास उपयोगी अशा पुस्तकाच्या धर्तीवर तयार केलें असल्यामुळें हें पुस्तक लहान मुलांस फारच आवडून त्यावरून तीं आपला धडा सहज शिकतात. किं. ८८.

# भाग १ ते ६ ] चिमुकल्या गोष्टी. [ भाग १ ते ६

ह्या गोष्टींत रोज व्यवहारांत घडणाऱ्या गोष्टी दिलेल्या आहेत, पण त्या इतक्या मोहक, मनोरंजक व मार्मिक लिहिल्या आहेत कीं, त्या गोष्टींतील तत्त्वबोध गोष्टी वाचतां वाचतांच मुलांच्या मनावर सहज ठसला जातो. पुस्तक बारीक टाइपांत सुंदर जाड व ग्लेज कागदावर छापिलेलें असून प्रत्येच गोष्टीचे प्रारंभीं कथानकाचें सुंदर चित्र दिलेलें आहे. एकंदर ह्या गोष्टीचे सहा भाग आहेत. प्रत्येक भागांत दहा गोष्टी सचित्र आहेत, प्रत्येक भागास किं. ८४.

मिळण्याचें ठिकाण—म्यानेजर-चित्रशाळा प्रेस, पुणें.

॥ ॐ नमः श्रीरामचंद्राय ॥

# आर्यमहौषधालय मु० पो० आंजर्लै.

**कोंकणप्रांतांतील अगदीं ताज्या व शुद्ध वनस्पतींचीं जगत्प्रसिद्ध निर्दोष व रामबाण औषधें.**

**कंदर्पमंजरी पाक—** हा अपूर्व पाक गरिबांपासून तों अमीरउमरावांपर्यंत सर्वांसही अत्यंत उपयोगी असून किंमत माफक ठेविली आहे. यांत मौक्तिक, प्रवाळ, लोह, माक्षिक, कस्तूरी, अंबर इ० अत्युच्च गुणकारक पदार्थ असून शिवाय बदाम, पिस्ते, अक्रोड चारोळी, केशर, वेलची, पंजाबी सालममिश्री, संफेतमुसळी, पत्री, गोक्षुर, शतावरी, आस्कंद, वंशलोचन वगैरे (८०) उपयुक्त वनस्पति घातल्या आहेत. यानें पथ्यावांचून गुण येतो. यापासून कोणत्याही कारणांनीं होणारा व कशाही प्रकारचा शुक्रस्राव, नपुंसकत्व, मूळव्याधि, रक्तदूषणामुळें स्वगूरोग, स्त्रियांची धुपणी व गर्भाशयस्थ दोष या भावना त्यांच्या एकंदर उपविकारांसह तत्काल बऱ्या होऊन धातुवृद्धि होते, व शरीर कणखर आणि तेजस्वी बनतें. २० तो० ड० २ रुपये. एकदम ३ डबे घेणारास ५ रुपये

**स्वर्णधात्री तेल—** हें चारोळी, बदाम, कंकोळ, एला, बहुविध वनस्पतींचीं सत्त्वें व उपयुक्त तेलें अशा अनेक पदार्थांनीं बनविलें असल्यानें याच्या मर्दनापासून अपस्मार, उन्माद, वेड, चक्कर इ० रोगांस जलद आराम पडतो केंसांस चोळल्यानें केंस काळे कुळकुळीत, तजेलदार, सडक लांब व मृदु होऊन मेंदु शांत आणि रोगरहित बनतो. यानें मस्तकाचें टक्कल जातें. हें अंगास चोळून स्नान करीत गेल्यानें शरीराचा दुर्गंध जातो. खरूज, गजकर्ण, शिवें, तसेंच तळपाय, तळहात, डोळे व मस्तक यांचा दाह हे विकार खास बरे होऊन निद्रा चांगली येते, आणि नेत्ररोग दुरुस्त होतात. बा० किं० १। रु०

**दंतरक्षक पूड—** ही दांत व हिरड्या यांचे सर्व विकार तत्काल दुरुस्त करून दांत स्वच्छ व मजबूत करण्यांत प्रतिज्ञेची आहे. ड. ६ आणे.

**सुरंगी, मालती, कल्हार, गुलबहार, दणाणा, लक्ष्मीविलास** इ० बादशाही अति उंची अत्तरें व त्याचप्रमाणें गुलाब, हिना, केवडा, चमेली, जाई वगैरे सुगंधी अत्तरें आणि केंसांस लावण्याचीं हरएक प्रकारचीं सुवासिक तेलें माफक दरानें पूर्ण खात्रीचीं मिळतील.

**सूचना:—** वरील औषधें व अत्तरें वगैरे पूर्ण खात्रीचीं असल्यामुळे आज चवीस वर्षांत त्यांचा लक्षावधि लोकांस उत्तम उपयोग झाला म्हणून त्यांचा नेहमीं फारच खप होत आहे. अनुभवानंतर पूर्ण खात्री पटेलच. औषधें माहितीचे खर्चासह रोखीनें अगर व्ही० पी० नें पाठवूं. प्याकिंग व टपाल खर्च वेगळा. घाऊक घेणारास कमिशन भरपूर. सर्व औषधांच्या आणि आरोग्यरक्षणाच्या माहितीचें सचित्र मोठें पुस्तक देऊं. आमचीं औषधें वगैरे मागविणें तीं खालील बिनचूक पत्त्यावर मागवावीं.

**कृष्णशास्त्री बिवलकर, वैद्य.**

REGISTERED. B. NO. 179




## अनुक्रमणिका.

**विषय.** **पृष्ठ.**


आगगाडीविषयीं प्रश्नोत्तरें. .... .... .... .... .... .... ८१
स्वराज्याचें तोरण. ( नाटक ) .... .... .... .... .... .... ८३
बुद्धीचा उपयोग कोणत्या कार्याकडे पहा. ! .... .... .... .... .... ८९
अमेरिकेंतील कोट्याधीश .... .... .... .... .... .... ९१
एका स्त्रीचें प्रसंगावधान. } .... .... .... .... .... .... ९३
धूर्त शेतकरी. .... .... .... .... ....
जशास तसें. .... .... .... .... .... ९४
माकडाचें प्रेम. .... .... .... .... .... ९५


मुद्रक व प्रकाशक—रा. रा. शंकर नरहर जोशी, चित्रशाळा प्रेस, १०२६ सदाशिव पेठ, पुणें सिटी.

# जोडाक्षर-विरहित वाचनपाठ.

हें पुस्तक नुकत्याच अक्षर ओळख आलेल्या मुलांमुलींकरितांच लिहिलेलें आहे. पुस्तकांत एकंदर १७ गोष्टी अगदीं सोप्या भाषेंत, व एकहि जोडाक्षर न येऊं देतां लिहिल्या आहेत. प्रत्येक गोष्टीचे आरंभीं कथानकाचें मूर्तिमंत चित्र दिलें असल्यामुळें गोष्ट वाचण्याचे अगोदरच त्यांतील सारांश मुलांचे सहज लक्षांत येतो. किं. अवघी चार आणे

# उजळणीचें पुस्तक.

यांत सर्व मुळाक्षरें चित्रयुक्त दिलीं असून मोडी व बालबोध बाराखड्या तयार करण्याची समजूत थोडक्यांत करून दिली आहे. नंतर मोडी व बालबोध सोपे शब्द मुलांना सहज ओळखण्यासारखे दिले आहेत पुढें १० अंक साङ्ग दिले असून त्याबरोबर मुलांस बेरीज व वजाबाकीची समजूत ठिबांच्या आकृतींनीं व गोट्यांच्या चौकटीच्या सहाय्यानें घालून दिली आहे. नंतर पाढ्यांची समजूत दिली असून शेवटीं उजळणी दिली आहे. एकंदरींत हें पुस्तक नवीन तऱ्हेनें मुलांना शिकविण्यास फार उपयुक्त असें झालें आहे. कागद ग्लेज किं ८।१८६

## लहान मुलांकरितां उपयुक्त अशीं पुस्तकें.

# नवी आवृत्ति ] सचित्र अक्षरबोध. [ नवी आवृत्ति

या पुस्तकांत 'अ' पासून 'ज्ञ' पर्यंत स्वर आणि व्यंजनें हीं सर्व निरनिराळ्या भपकेदार रंगांत व तें अक्षर नांवांच्या प्रथम अक्षरानें दर्शविणाऱ्या चित्रांसह दाखविलेलीं असून १ पासून १० पर्यंत अंकहि वरील पद्धतीनें दाखविलेले आहेत. पुस्तकाचा साइज फाऊल चतुर्थांशाइतका मोठा ७×९ इंच ठेवला असल्यामुळें अक्षरें व चित्रें फारच सुबक व मोठीं अशीं झालीं आहेत. एकंदर पुस्तक इंग्रजींतील अभिनव रंगीत ए बी सी डी शिकण्यास उपयोगी अशा पुस्तकाच्या धर्तीवर तयार केलें असल्यामुळें हें पुस्तक लहान मुलांस फारच आवडून त्यावरून तीं आपला धडा सहज शिकतात. किं. ८८.

# भाग १ ते ६ ] चिमुकल्या गोष्टी. [ भाग १ ते ६

ह्या गोष्टींत रोज व्यवहारांत घडणाऱ्या गोष्टी दिलेल्या आहेत, पण त्या इतक्या मोहक, मनोरंजक व मार्मिक लिहिल्या आहेत कीं, त्या गोष्टींतील तत्त्वबोध गोष्टी वाचतां वाचतांच मुलांच्या मनावर सहज ठसला जातो पुस्तक नवीन टाइपांत सुंदर जाड व ग्लेज कागदावर छापिलेलें असून प्रत्येक गोष्टीचे प्रारंभीं कथानकाचें सुंदर चित्र दिलेलें आहे. एकंदर ह्या गोष्टींचे सहा भाग आहेत. प्रत्येक भागांत दहा गोष्टी सचित्र आहेत, प्रत्येक भागास किं. ८४.

मिळण्याचें ठिकाण—म्यानेजर–चित्रशाळा प्रेस, पुणें.

मराठी
# बालपत्रक

येथें शब्द नाहीं शिष्यासीं । हें अवघें सद्गुरूपाशीं ।
सद्गुरु पालटी अवगुणांसी । नाना यत्नें करोनी ॥
जें कांहीं आपणास ठावें । तें हळु हळु शिकवावें ।
शहाणें करून सोडावें । सकळा जनां ॥ १ ॥

—रामदास.

पुस्तक ३५ मे सन १९२४ अंक ५

## आगगाडीविषयीं प्रश्नोत्तरें.

### सिग्नलवाल्यास गाडी आली हें कसें ओळखतां येतें ?

रात्रीच्या वेळीं एंजिनच्या तोंडावर झगझगीत दिवे चमकत असतात त्यांवरून. आणि दिवसा एंजिनच्या मुखभागावर एक वाटोळी किंवा चौकोनी चकचकीत ताटली डकविलेली असते, तीवरून तो ओळखतो.

### गाडीचा शेंपूटदिवा म्हणजे काय ?

गाडीच्या शेवटच्या डब्याच्या मागें एक दोन दिवे लागलेले असतात. पाठीमागून येणाऱ्या गाडीला पुढें गाडी आहे हें कळावें म्हणून यांची योजना असते, व यांनांच शेंपूट-दिवा म्हणतात.

### गाडी धांवत असतांना माल उतरून घेतात काय ?

फक्त पोस्टाच्या थैल्या गाडी वेगानें धांवत असतांना सुद्धा खालीं उतरून घेण्याची व्यवस्था असते.

### कित्येक गाड्यांना दोन एंजिनें कां लावतात ?

मालगाडीसारख्या अतिभारी वजनाच्या गाड्यांना एका एंजिनची शक्ति पुरेशी होत नाहीं, म्हणून आणि उतरणीवर चढणीवर गाडी असतांना पुढें मागें घसरूं नये म्हणून दोन एंजिनें लागतात.

### एंजिनला कोळसा किती लागतो ?

सर्व साधारणपणें दर ताशीं एक टन कोळसा एंजिनला लागतो.

### एंजिनला पाणी किती लागतें ?

दर ताशीं ३६ ग्यालन पाणी लागतें एका ग्यालनमध्यें फार तर ५० यार्ड लांब गाडी जाऊं शकेल.

**एंजिनच्या टांकीमध्यें किती पाणी राहतें ?**

१८ टन जड असलेल्या या टांकींत ४००० ग्यालन पाणी राहतें.

**पाणी घेतल्याशिवाय गाडी किती चालेल ?**

एकदां पाणी घेऊन पुढें १०० मैलांपर्यंत पाणी न मिळालें तरी चालूं शकतें.

**स्टेशनांत गाडी उभी असतांना एका लांब हातोडीनें एक मनुष्य चाकांवर मारीत मारीत जातो, तें कां ?**

गाडी लांबचा प्रवास करून आली असतांना एकादें चाक नादुरुस्त होण्याचा संभव असतो. तेव्हां हातोडीनें ठोठावल्यावर कांहीं विशिष्ट आवाजावरून चाकें धड किंवा नादुरुस्त ओळखतां येतात.

**एंजिनमध्यें दोन माणसें कशाला लागतात ?**

एक ड्रायव्हर आणि फायरमन् अशीं दोन माणसें एवढ्यासाठीं कीं, ड्रायव्हरनें गाडी चालवावी व फायरमननें भट्टी संभाळावी. अपघाताच्या वेळीं ड्रायव्हरचेंही काम फायरमनला करावें लागतें.

**सांध्यांचा उपयोग काय ?**

स्टेशनांत दहावीस लाइनींचें जाळें एकमेकांशीं जोडलेलें असतें. गाडी अमूक लाईनीवरून अमूक लाईनीवर यावी किंवा रहावी व कुठें टक्कर होऊंनये म्हणून सांधे केलेले असतात व ते सिग्नलवाल्याच्या व पाइंटसमनच्या ताब्यांत असतात.

**सिग्नल केबिनमध्यें काय असतें ?**

या केबिनमध्यें सांध्याचीं मुळें व तारायंत्रें असतात. त्यांवरून तो दुसऱ्या केबिनवाल्यांना गाड्यांची माहिती देतो.

**सिग्नल किती असतात ?**

होम सिग्नल, स्टार्टिंग सिग्नल व डिस्टंट सिग्नल असे तीन सिग्नल असतात. पहिला स्टेशनांत असतो, दुसरा स्टेशनाबाहेर व तिसरा स्टेशनापासून अर्ध्या मैलावर. पहिला गाडी हलण्याची सूचना देतो दुसरा वेग वाढविण्याची व तिसरा पूर्ण वेगानें धांवण्याची सूचना देतो.

**तांबडे आणि हिरवे दिवे कशासाठीं असतात ?**

तांबडा लाईनीवर धोका दाखवितो व हिरवा लाइन बिनधोक्याची दाखवितो.

**गाडीचे बोगदे स्वच्छ करतात काय ?**

जमिनीखालून जाणाऱ्या रेल्वेमध्यें हे बोगदे नेहमीं स्वच्छ ठेवावे लागतात. त्यासाठीं एक मोटार मशीन असते. त्याला एक ब्रश म्हणजे केरसुणी लागलेली असते, ती एक मनुष्य हातांत घेऊन त्या मोटारमशीनच्या सहाय्यानें सर्व बाजू झाडीत नेतो.

**लायनीच्या बाजूस खुणेचे दगड कसले असतात ?**

जमीनीची लेव्हल किंवा चढउतर दर्शविण्यासाठीं या दगडांच्या खुणा असतात. त्यावरील आकड्यांवरून जमीनीची स्थिति ओळखून ड्रायव्हर गाडी चालवितो.

**रेल्वेच्या बाजूस पांढरे खांब कसले असतात ?**

आपण टर्मिनस पासून किती लांब आलों हें समजण्यासाठीं या खांबांची योजना केलेली असते. तें पाहूनच गाडीचा वेग कमी जास्त करतात.

**मोठ्या एंजीनचें फनेल लहान कां ?**

बोगदे किंवा पूल यांची उंची ठरलेली असते तेव्हां एंजिनचें फनेल वर टेकूं नये म्हणून बॉयलर जेवढा मोठा असेल त्या मानानें फनेल लहान करतात.

**गाडीची किंमत काय असते ?**

सहा डबे मिळून गाडीची किंमत सुमारें अडीच लाख रुपये असते आणि एंजिनची किंमत सवा लाख रुपये असते.

**गाडीचें वजन काय असतें ?**

साधारणतः सर्व गाडीचें वजन ३०५ टन असतें. परंतु याहीपेक्षां वजनदार गाड्या असतात. मिचिगन सेंट्रल रेलवेचें एंजिन, गाड्या मिळून १२००० टन आहे म्हणजे एका चांगल्या जहाजाइतकें हें वजन आहे.

### डब्याखालीं सिलेंडर कां ठेवतात ?

गाडींतील ४ गॅसचे दिवे पेटविण्याकरतां व ग्यासचा पुरवठा करण्याकरितां यांची योजना असते.

### डब्याच्या खालीं डायल कशाला ठेवतात ?

ग्यास किती खर्च झाला व सिलेंडर केव्हां भरायला पाहिजे हें समजण्याकरतां हें मीटर आहे.

### डब्यांच्या पाठीवर वांकडया तिकडया पटया कशासाठीं असतात ?

पाऊस पडत असतांना पाणी डब्यांवरून ओघळून उतारूंच्या अंगावर चढतां उतरतां पडूं नये म्हणून या पट्या असतात. पाण्याची दिशा त्यामुळें बदलून तें डब्याच्या पाठीमागें जाऊन पडतें.

### रेल्वे प्लॅटफॉर्म दोन्हीकडे उतरते कां असतात ?

रेल्वेवरील कामगार धुकें असतांना किंवा अंधारांत ड्युटीवर असतांना अगदीं टोकांशीं येऊन पडूं झडूं नयेत म्हणून दोन्ही टोकांना ते उतरते असतात.

### एंजिनच्या पुढें आडवे पंखे कशासाठीं असतात ?

हे लोखंडी पंखे पुढच्या चाकांपुढें रुळांना लागल्यासारखे असतात. रुळांवर कांहीं केर, दगड किंवा असले अडथळे असल्यास या लोखंडी पंख्यानें किंवा सुपानें ते उडून एकीकडे पडतात.

### एका रुळावर गाडी चालू शकेल काय ?

होय. या गाडीला ' मोनो-रेल ' म्हणतात. हीं फारशी प्रचारांत नाहीं.

### इंग्लंडमध्यें सर्वांत मोठें स्टेशन कोणतें ?

वॉटर्लूचें स्टेशन सर्वांत मोठें आहे. १२०० गाड्या रोज येतात व जातात. येथें २१ प्लॅटफॉर्म आहेत व २५ एकर जमीन स्टेशननें व्यापिली आहे.

### एका ट्रेनमध्यें किती उतारू असतात ?

आमच्या हिंदुस्थानांत सांगायचें झाल्यास ' अगणित ' असेंच उत्तर द्यावें लागेल. परंतु इंग्लंडमध्यें जास्तींत जास्त फक्त ६०० उतारू असतात.

### गाडी चालू होण्यापूर्वी एंजिन थोडें मागें कां येतें ?

वाफेला गति देतांना ती सिलेंडरमध्यें येण्यापूर्वी मागें हटते व मग सिलेंडरमध्यें तिला प्रवेश मिळतो. तो मिळाला म्हणजे ती पुढें ढकलायला लागते व गाडी चालू होते.

### दोन रुळांमध्यें अंतर किति असतें ?

आपल्याकडे हें अंतर साडेपांच फूट असतें. लहान गाड्यांना थोडें असतें युरोपांत इथल्यापेक्षां कमी असतें.

---

# स्वराज्याचें तोरण

## अंक–दुसरा.

### प्रवेश–१ ला.

( शिवाजी व दादोजी प्र. करतात. )

शिवाजी०–आपण या बारा मावळांतील एकूण एक देशमुखांना पत्रें लिहिलीं होतीं त्यांपैकीं कोणाचीं कांहीं उत्तरें आलीं आहेत काय ?

दादोजी०–हो, बहुतेक सर्व देशमुखांकडून खालित्याचीं उत्तरें आलीं आहेत. तीं सरकारांना दाखविण्यासाठींच आणलीं आहेत. ( पत्रें पुढें करतो. )

शि०–( पत्रें घेत ) उत्तरें होकारार्थी आहेत का नकारार्थी ?

दा०–बहुतेक सर्वांकडून होकारार्थी उत्तरें आलीं

आहेत. आपल्या या हिंदवी स्वराज्याच्या कार्याला बहुतेक सर्व देशमुखांची संमती आहे. पण एक दोघांची उत्तरें मात्र चमत्कारीक आलीं आहेत.

शि०–तीं कोणाचीं ?

दा०–हिरडसचे बांदलें देशमूख व जावळीचे चंद्रराव मोरे हे ह्या आपल्या कार्याला विरुद्ध आहेत.

शि०–ऊं: ! जाऊंद्या. असे कांहीं राष्ट्रद्रोही निघायचेच. बरें त्यांचें काय म्हणणें आहे तें वाचून बघूं ( पत्रें देतो. )

दा०–( वाचतो. ) आपला खलिता पोंचला आपण हिंदवी स्वराज्य स्थापणार म्हणतां ! ही निव्वळ बढाई आहे. यवनी सत्ता इतकी बलाढ्य आहे कीं, त्या प्रतापरवीपुढें तुमच्या सारखे असंख्य काजवे दिपूनच जातील, यांत बिलकूल संशय नको. आमची या कार्याला अनुकूलता नाहीं इतकेंच नव्हे तर आमची वंशपरंपरा चालत आलेली जहागीर संभाळण्यासाठीं तुमच्यावर स्वारी करावी लागली तरी ती करण्यास आम्ही मागें पुढें पाहणार नाहीं यांतच कायतें समजा.

शि०–अस्सें काय ? बरें पाहूं आमच्यांत कांहीं तरी हिंमत असली तर दाखवूं. सामदामानें वश न होणाऱ्यास दंडाचाच उपाय योग्य असतो, ते ध्यानांत ठेवा म्हणावें ! ठीक आहे. आपल्या कार्याला अनुकूल असणाऱ्या देशमुखांकडून करार पत्रें लिहून घेतलीं पाहिजेत. त्यांनीं आपल्या पत्रांत अनूकूलता दर्शविलीच आहे, तरी त्या सर्वांना एकदा एकत्र जमविलें पाहिजे, व आपले सर्व उद्देश त्यांना स्पष्टपणें कळविले पाहिजेत आणि नंतरच त्यांच्या-कडून प्रतिज्ञेवर करार पत्रें लिहून घेतलीं पाहिजेत

दा०–जसा हुकूम होईल तशी आज्ञापत्रें लिहवितों.

शि०–येथें सर्वांना एकत्र जमविण्याचा दिवस कोणता मुकर करावा बरें ?

दा०–आणखी १०।१५ दिवसांतच दसरा आहे. त्या दिवशींच सीमोल्लंघनाच्या मुहूर्तावर हा दरबार भरवावा झालें.

शि०–ठीक आहे. हा दिवसच आपल्या कार्याला योग्य आहे, कारण साडेतीन मुहूर्तांपैकींच हा एक आहे.

दा०–हो, त्या दृष्टीनेंही हाच दिवस योग्य आहे.

शि०–सर्व देशमुखांना आणि हिंदवी स्वराज्याची आस्था बाळगणाऱ्या आपल्या देशबांधवांना जाहीर-नामा काढून या दिवशीं, या ठिकाणीं सर्वांनीं जमण्याबद्दल कळवा.

दा०–जाहिरनामा काढतोच आणि देशमुखांना निराळीं पत्रेंही लिहितों.

शि०–ठीक आहे त्या दिवशीं आपला सर्व कार्य-क्रम जाहीर करूं म्हणजे झालें. ( जातो. )

### प्रवेश २ रा.

( कल्याणचे सुभेदार साहेब विचार करीत बसले आहेत. )

सुभे०–( स्वगत ) या शिवाजीच्या पुंडा-व्याला काय बरें उपाय करावा ? याचा हा पुंडावा आतांच मोडला पाहिजे. जर कां त्याला असाच वाढूं दिला तर कांहीं आपली धडगत दिसत नाहीं, हा आपल्या बापास भेटायला विजापुरास गेला होता तिथें सुद्धां यानें आपला हात दाखविलाच. अहो, बादशहाला मुजरा न करणें म्हणजे केवढा गुन्हा आहे, पण या बहादरानें बिलकूल मुजराच नाहीं केला. तेव्हां लहान बच्चा आहे, घाबरला असेल म्हणून याला तसाच सोडून दिला ! आज, पहा, तोच बच्चा येथें कसा धुमाकूळ घालीत आहे, त्याचे गुन्हे एक ना दोन. आम्हां मुसलमानांना गाई मारूं देत नाहीं. आपल्या धर्म प्रसारासाठीं आम्ही हिंदूंना बाटवूं लागलों तर तसेंही करूं देत नाहीं. प्रत्येक बाबतींत हा शहाजीचा कारटा आम्हाला

आड येतो. हा कांटा कसा बरें काढावा ! अचानक जाऊन याच्यावर हल्ला करावा आणि याला गिरफदार करावें तर तेंही अशक्य ! कारण इथले चट सारे लोक आपली वरची भाकरी खाऊन त्याची चाकरी करायला तयार ? नुसती आमच्याकडे थोडीशी हालचाल होऊं द्या कीं त्याला ताबडतोब वर्दी पोंचलीच म्हणून समजा. याच्याकडे दुर्लक्ष्य करून बसावें तर तेंही शक्य नाहीं, कारण दररोज बादशहाकडून पत्रें येतात. शिवाजीचा बंदोबस्त करा, प्रसंग पडला तर त्याला कैदसुद्धां करा, आणि इकडे पाठवून द्या ! काय माझें डोंबलें देऊं ! तो हातीं सांपडेल तेव्हां ना सारे ! तो तर इतका खमंग आहे कीं नुसता दिसत सुद्धां नाहीं. मग हातीं सांपडण्याची बात कशाला हवी !! हें कांहीं लक्षण ठीक नव्हे काय बरें करावें ? ( डोकें खाजवीत विचार करीत बसतो व हुजऱ्या प्र. क. )

हुज०—( मु. क. )सरकार, बाहेर एक तमासगीर कां शाहीर आला आहे. तो सरकारापुढें दोन चिजा म्हणण्याची इच्छा आहे असें म्हणतो. परवानगी असल्यास—

सुभे०—कोण शाहीर कां ? चांगल्या चिजा म्हणतो का ?

हु०—होय त्याचा गळा चांगला आहे. आणि तो पोवाडे चांगले म्हणतो.

सु०—तर मग त्याला आंत घेऊन ये.

हु०—जी हुजूर ( जातो. )

सु०—( स्वगत ) या शिवाजीच्या विचारानें मन इतकें त्रासलें आहे कीं, आतां असाच बसलों तर हें विचारांचें काहूर किती माजेल हें समजत नाहीं. आयता हा शाहीर आला आहे. त्याचे पोवाडे तरी ऐकूं या. म्हणजे मनाची करमणूक होऊन मन शांत तरी होईल. ( शाहीर व हुजऱ्या प्र. क शाहीर मु. क. उभा राहतो. )

सु०—कारे, तुला पोवाडे चांगले म्हणतां येतात कां ?

शा०—होय सरकार. कांहीं तरी वेडेवांकडें म्हणतों झालें. गोड मानून घेण्यावर आहे सारें.

सु०—ठीक आहे. तर म्हण पाहूं एकादा चागलासा.

शा०—जी सरकार—

**महाराष्ट्र मावळा, शिवाजी, गुरु रामदास ॥ मातृजिजाई, देवी भवानी, करित क्लेश व्हास ॥ १ ॥ स्वातंत्र्याच्या गोड कल्पना उरासिं बाळगतां । हवें असें नें सत्य नित्य तर करि जागृत जनता ॥ २ ॥ गोमाताही पवित्र आपुली जननी सौख्याची । वांचविण्या ती द्या शिर आपुलें कीर्ती भाग्याची ॥ ३ ॥ देशबांधवां क्लेश न व्हावें तरि अविंध कापावें । त्यांविना तुमची माय भवानी तुम्हां कशी पावे ॥ ४ ॥ यवनी सत्ता हवनीं टाका करुनि आत्ममेध । म्लेंच्छ अश्व हा हनन धरुनी करा अश्वमेध ॥ ५ ॥ ईशश्रीकृपेनें शिवाजी राजा आम्हां लाभलाहो । गुण तयानें वर्णन करितां पातक हरलें हो ॥ ६ ॥**

सु०—बस्, बस्. पुरें कर. नको ऐकायला तुझें हें रडगाणें. शिवाजीच्या विचारानें आधींच माझें डोकें तापलें आहे आणि त्यांत शिंच्यानें पुन्हा आपलें त्याचेच गुणवर्णन चालविलें आहे. शिपाय ?

शिपा०—जी हुजूर.

सु०—याला बाहेर घेऊन जा.

शि०—चलरे हरामखोर. चल बाहेर.

शा०—सरकार, मला कांहीं बक्षीसी.

सु०—याला दोन धक्के द्या. चल गाढवा, पुरेना बक्षीसी. शिवाजीच्या रडगाण्यानें लेकानें माझें डोकें उठविलें, अन् म्हणे बक्षिसी द्या. जा तुला तसाच सोडून दिला हीच तुला बक्षिशी. जा, त्याला बाहेर हांकलून द्या.

शि०—चल, गद्धा; चल (ढकलूं लागतो.)

शा०—(जातांना) चांगला न्याय आहे बुवा, इथून तिथून सारे हरामजादे. (जातो.)

सु०—(स्व०) मनाची करमणूक व्हावी म्हणून शाहीर बोलाविला. त्यानें तर त्या विचाराग्नींत तेलच ओतलें. काय म्हणे तर शिवाजी आमचा राजा! वाहवा! मग आम्ही कोण? (दाढीवरून हात फिरवीत) आम्ही मुसलमान लोक हिंदुस्तानचे पिढीजाद राजे आहोंत, राजे. आणखी काय म्हणाला बरें? हं. 'आविंध कापावे' ऊं! या अविंधांना कोणी कधीं कापलें आहे ही भीतीच आमच्या मनाला कधीं शिवत नाहीं. आम्हीच मात्र उलट वाटेल त्याला वाटेल तेव्हां कापूं शकतों. मूर्ख आहे झाला बेटा. कांहीं तरी अचकट विचकट बडबड केली. झालें. (विचार करून) तो म्हणतो तें सर्वस्वीच कां खोटें आहे? (डोकें खाजवून) नाहीं. त्याच्या म्हणण्यांतही कांहीं थोडासा अर्थ आहे. असें म्हणणारा जर हा एकटाच असता तर याला वेडापीर सुद्धां ठरविला असता! पण, पण काय? असले लोक वेडे म्हणावे तर सबंध महाराष्ट्रच वेड्यांत काढावा लागेल! ही लाट उसळली आहे खरी. ही आतां थांबणार कशी? १०।२० वर्षांपूर्वी असा एकादा वेडापीर माझ्यापुढें हा पोवाडा म्हणायला आला असता तर त्याचे मी काय काय हाल केले असते कोण जाणें! पण आज स्थिती अशी आहे कीं, आम्हा सत्ताधाऱ्यांना शिव्या देणाऱ्या लोकांना शिक्षा करूं म्हटलें तर तें हास्यास्पद होईल. कारण असले गुन्हेगार हजारांनीं नव्हेतर लाखांनींसुद्धां मोजतां येतील. इतके सांपडतील. कालमहिमाच विचित्र आहे झालें शिवाजीला कैद करा असा बादशहाचा सारखा टुमणा सुरू आहे इथें माझ्या जागीं जर बादशहा असता तर कळलें असतें त्याला. कधींच पळून गेला असता. विजापूरला बसून नुसत्या हुकुमाचें एक चिठोरें खरडायला काय जातें? आपण तर बुवा, आतां स्पष्ट लिहून टाकणार! कोणी तरी एकादा सरदार पाठवा आणि शिवाजीला कैद करा. हो, असाच विचार. त्याशिवाय दुसरा इलाजच नाहीं. (जातो.)

### प्रवेश ३ रा.

(तोरणा किल्ल्याखालचें जंगल. शिवाजी, तानाजी, नेताजी प्र. क.)

शि०—पाहिलेंत कां गड्यांनो! हा डोंगरी किल्ला पहा. लांबून कसा सुंदर दिसतो तो. आणि उपयोगाचें दृष्टीनेंही तो तसाच महत्त्वाचा आहे. अहाहा! हा भोंवतालचा निसर्ग देवीचा सहज मनोहर देखावा पहा. मन कसें उचंबळून येतें. पण काय? या सर्वांवर त्या परकीय लोकांची सत्ता! कोण हा अन्याय!! या भूमींत आम्ही जन्मलों, आणि येथेंच वाढून मोठे झालों आणि मोठ्या अभिमानानें हा माझा देश असें आतांही म्हणत आहोंत. असें असूनही यांच्यावर सत्ता कोणाची? तर त्या परक्यांची!! हाय!!! तानाजी, पहा; त्या तोरण्यावरचें यवनांचें चंद्रांकित निशाण पहा. कसें वाऱ्याच्या जोरानें मोठ्या दिमाखानें डुलत आहे. तें पाहून तुम्हाला काय बरें वाटतें?

ता०—महाराज, त्या ठिकाणीं आपलें—या महाराष्ट्राचें—निशाण पाहिजे, असें मला वाटतें. (नेताजी वगैरे मान डोलवितात व संमती देतात)

शि०—असें जर आहे तर तो किल्ला नको कां आपल्या ताब्यांत यायला. तोच काय? हे आसपासचे सारे किल्ले आपलेच आहेत ते आपल्या ताब्यांत आले पाहिजेत.

ने०—होय सरकार यायला पाहिजेत.

शि०—नुसतें म्हटल्यानें ते येतील आपल्या ताब्यांत? काय केलें पाहिजे?

ता०—सरकार, काय करावें हें आम्हा सारख्या

अडाणी मावळ्यांना काय कळणार ? सरकारच्या हुकुमाचे आम्ही चाकर. सरकारचा शब्द निघायचा अवकाश, कीं तेथें आमचें शीर पडलेंच म्हणून समजा.

शि०—ठीक आहे. मी सांगतों काय करायला हवें तें. कोणाचाही किल्ला घेतांना त्यावरचा किल्लेदार खुषीनें तो देण्यास तयार असला तर तसा तो घ्यावा, अगर इतर कांहीं प्रकारांनीं तो वश होत असला तर तसाही त्याला वश करून घेतला पाहिजे. तो वश नच झाला तर मात्र शेवटीं त्यावर हल्ला करून घेतला पाहिजे.

ने०—तोरण्याच्या किल्लेदाराची व माझी थोडीशी ओळख आहे. त्याच्या बोलण्यावरून तो सुभेदारावर किंवा मुसलमानी बादशहावर खूष दिसत नाहीं. परवांच त्याची व सुभेदाराची थोडीशी घासाघीस झाली असें मीं ऐकीलें आहे.

शि०—तर मग ही संधी फार चांगली. त्याच्या मनांत त्यांच्याविषयीं राग असतांनाच तो आपल्याला वश होण्याचा संभव फार. उशीरां काय होईल याचा काय नेम? याकरितां पहा तुम्ही खटपट करून तो वश होतो का ?

ने०—मी खटपट करून त्याला वश करतोंच, पण त्यासाठीं कांहीं आमिष दाखवावें लागलें तर त्याला महाराजांची परवानगी असावी.

शि०—हो, त्याला काय हरकत ? त्याला त्याच किल्ल्यावर किल्लेदार ठेवूं. शिवाय बक्षीस म्हणून खालच्या मुलखाची देशमुखीही देऊं, मग तर झालें ?

ने०—इतकें आमीष मिळाल्यावर तो वश होण्यास नाहीं उशीर लागणार ?

शि०—तर मग तुम्ही जा. लागा त्या कामाला. एक एक कामें कशीं झटझट उरकलीं पाहिजेत.

ने०—आज्ञा सरकार. ( मु. क. जातो. )

शि०—चला तानाजी, आपण या पलीकडच्या दरींतून जाऊं या. अनायासानें तेवढ्या भागांची आपणास माहिती होईल.

ता०—जी सरकार. ( चालूं लागतात. )

शि०—या डोंगरांतल्या या चोरवाटा कितीतरी उपयोगी असतात. शत्रूला चुकवून यांनीं सहज निसटून जातां येतें. तसेंच या किल्ल्यांचा तरी किती उपयोग आहे पहा. यांच्यावर असणारे मूठभर लोक सुद्धां हजारों सैनिकाना भारी असतात. तटाआड बसून व बुरुजावरून शत्रूवर मारा करितां येतो. पण आपल्याला मात्र शत्रूचा एकही गोळा लागत नाहीं. असले किल्ले ताब्यांत असल्यावर मोठमोठे बादशहा सुद्धां शरण येतील; यांत शंका नाहीं. आतां प्रथम आपणांस याच उद्योगाला लागलें पाहिजे. चला तानाजी.

ता०—जी सरकार. ( जातात. )

---

## प्रवेश ४ था.

( शिवाजी महाराजांचा दरबार सर्व देशमूख व सरदार बसले आहेत. )

दा०—आज महाराजांच्या आज्ञेनें सर्व देशमूख सरदार व हिंदवी स्वराज्याची आस्था बाळगणारे अखिल मराठे याची ही सभा भरली आहे. यांत हिंदवी स्वराज्याच्या घटनेसंबंधी मुख्यत: विचार व्हावयाचा आहे. ( शिवाजी प्र. क.

शि०— आजच्या दरबारासाठीं ज्या ज्या मंडळींना निमंत्रणपत्रें पाठविलीं होतीं ते सर्व आले आहेत कीं नाहीं ?

दा०—होय सरकार सर्व आले आहेत.

शि०—मग, आजच्या दरबारचा उद्देश त्यांना कळविला काय?

दा०—होय

शि०—या हिंदवी स्वराज्याबद्दल आस्था बाळगणारे व त्याबद्दल खटपट करणारे सर्व देशमूख

मंडळींनीं आपण या हिंदवी स्वराज्याचे ताबेदार आहोंत असें अनुमतिपत्रक दिलेंच आहे. यापुढें आपल्या कामाला कशी सुरवात करावयाची याबद्दल मुख्यत: आपणास विचार केला पाहिजे.

**बांदल देशमुख:**—ज्यांना यांत कांहीं तथ्य वाटत नाहीं असे लोक कांहीं आहेत

शि०—आहेत. आम्ही जाणतों, तसें कांहीं निघणारच, यांतही कांहीं विशेष नाहीं. ज्यांना त्यांत कांहीं तथ्य वाटत नसेल तर त्यांनीं वाटेल तर आम्हास मदत करूं नये व शत्रूसही करूं नये. याला तरी कांहीं हरकत नाहीं ना!

**चंद्रराव मोरे:**—तसें कसें होईल! ज्या बादशहाच्या कृपेनें आम्हाला जहागीर उपभोगायला मिळते, त्याची चाकरी केल्यावांचून कसें चालेल? या चळवळीच्या वावटळींत सामील होऊन असलेली जहागीर गमावण्याइतके कांहीं आम्ही दुधखुळे नाहींत.

शि०—तुम्ही आम्हाला नाहीं मदत केली आणि शत्रूनांहीं नाहीं केली तर तुमची जहागीर कशी जाते तें नाहीं मला कळत. आणि तशी जर तुम्हाला भीति वाटत असली तर आम्ही हिंदवी स्वराज्याचे ताबेदार आहों असें कबूल करा. मग तुमची जहागीर तुमचेकडे राखण्याची जबाबदारी हिंदवी स्वराज्यावर राहील.

मोरे:—अहो सारें खरें. कुठें ती मुसलमानी सत्ता, आणि कुठें तें तुमचें हिंदवी स्वराज्य? मुसलमानी सत्तेच्या दुंदुभीपुढें तुमच्या हिंदवी स्वराज्याची टिमकी कशी ऐकूं येणार?

शि०—तुमचा हा निव्वळ भ्रम आहे. आम्ही सर्व मराठ्यांनीं मिळून खटपट केली तर खात्रीनें त्या अचाट शक्तीशींहि आपण टक्कर देऊं शकूं.

**मोरे**— यवनी बादशहाजवळ लाखांनीं मोजता येईल इतकें सैन्य बळ आहे. हिंदवी स्वराज्याचें बळ तितकें दिसत नाहीं.

शि०—नसलें दिसत तर दिसेल? आणि नुसत्या सैन्याच्या आंकड्यावर तुम्ही काय जातां? केवळ नौकरी बजावण्याकरितां लढण्यास आलेल्या शंभर शिपायांना, आपल्या देशाचा स्वातंत्र्याकरितां देहार्पण करण्यास तयार झालेले दहा शिपाई सुद्धां भारी आहेत हें विसरूं नका आणि आपला हा डोंगराळ मुलूख आणि त्यांतले किल्ले इतके सोईचे आहेत कीं, गनिमी काव्यानें लढून या प्रांतांत वाटेल त्या शक्तीसही नमवितां येईल.

मो०—मला यांत कांहीं खरें दिसत नाहीं.

शि०—ही तुमची खोटी समजूत आहे.

मो०—कांहीं असलें तरी आम्हाला कांहीं तुमचे ताबेदार होतां येणार नाहीं.

शि०—ठीक आहे. सामदामानें काम भागत नसल्यास तिसऱ्या अस्त्राचा उपयोग करावा लागतो हें पक्कें लक्षांत ठेवा.

मो०—पूर्ण लक्षांत आहे. आम्हींही त्याला तयार आहोंच.

शि०—तुम्ही स्वराज्यद्रोही समजून तुमचा बंदोबस्त आम्हाला तरवारीनेंच करावा लागेल.

मो०—( उठून ) आमच्याही तरवारी तयार आहेत. इकडे कोणी बांगड्या भरल्या नाहींत. असेल शक्ती, तर करा बंदोबस्त!

( जातो. मागून बांदल देशमूखही जातो. )

शि०—कांहीं हरकत नाहीं. यांचा बंदोबस्त कसा करावा तो आम्ही ठरवूं. मुख्य काम पुढें चालूं द्या.

दा०—महाराजांच्या आज्ञेवरून वाचून दाखवितों. १ पुढील कामांत लढावयाचे अनेक प्रसंग यावयाचे आहेत, तेव्हां सर्व देशमूख व सरदार यांनीं आपापलीं सैन्यें तयार ठेवावींत. त्यांनां लागणारा दारुगोळा व हत्यारें इकडून पुरविण्यांत येतील. २ ज्यांचेकडे डोंगरी किल्ले असतील त्यांनीं त्यांची

दुरुस्ती करून ठेवावी. ३ या प्रांतांतील मोठमोठे किल्ले यवनांचे ताब्यांत आहेत ते घेण्याचे प्रयत्न होतील. तर त्यास सर्वांनीं मदत करावी. ४ ज्यांचा यवनांशीं संबंध असेल त्यांनीं तो झुगारून द्यावा. ५ यवनी अंमलदारांना कोणत्याही द्वारां मदत होऊं देऊं नये. ( टाळ्या. खालीं बसतो. )

शि०—हे नियम लक्षांत ठेवून प्रत्येकानें तयारींत असावें. आपणास यवनीसत्तेशीं तोंड द्यावयाचें आहे.

( संमतीदर्शक टाळ्या होतात. )

दरबारचें काम संपलें आहे. पुन्हां जरूर लागेल तेव्हां दरबार बोलाविला जाईल.

(पडदा.)

**अंक दुसरा समाप्त.**

---

# बुद्धीचा उपयोग कोणत्या कार्याकडे पहा !

( लेे०—श्रीपाद बाळकृष्ण देशपांडे, मायणी–सातारा. )

" शिक्षण म्हणजे मनुष्याचा सर्व बाजूंनीं होणारा विकास."

—कॉमिनिअस.

" शिक्षणाचें यशापयश मनुष्याच्या ज्ञानापेक्षां त्याच्या कर्तृत्वावर व शीलावरच विशेषतः अवलंबून आहे."

—क्विक.

" ज्या शिक्षणाने मनुष्याच्या कोणत्याही अंगाची उपेक्षा होत नाहीं त्यासच उत्तम शिक्षण म्हणावें "

—स्पेन्सर.

" पठनशक्ती, सद्गुण आणि धर्मनिष्ठा यांचें बीजारोपण निसर्गानेंच आपल्या मनोभूमींत केलें आहे. त्या बीजांना पूर्णावस्थेंत आणणें हा शिक्षणाचा हेतु होय "

—कॉमिनिअस.

नाशिक गांवांत् गोविंदराव व मोरबा हे गृहस्थ राहत होते. दोघांचींहि घरें जवळ जवळ होतीं. गोविंदराव घरचा चांगला श्रीमंत होता, पण मोरबाच्या घरची सांपत्तिक स्थिति बेताचीच होती, तथापि तो चांगला बुद्धिमान् होता. 'लक्ष्मी व सरस्वती यांचें जुळतें नसतें असें बऱ्याच ठिकाणीं पाहण्यांत येतें.' गोविंदरावाच्या घरीं भुसार मालाचा व्यापार होता शेतकरी लोकांपासून स्वस्त दरानें माल घेऊन तो शहरांत नेऊन विकल्यानें गोविंदरावाला व्यापारांत चांगला फायदा होत असे. मोरबाला भांडवलाच्या अभावीं व्यापार करता येत नसे. तो गोविंदरावाला होणाऱ्या नफ्याकडे पाहून मनांत सारखा तळमळत असे. आपण कशा रीतीनें व्यवहार केला असतां तो आपल्याला फायदेशीर होईल अशाविषयीं मोरबा नेहमीं विचार करीत बसत असे.

गोविंदरावाला व्यापारांत फार फायदा होण्याचें कारण वर दर्शविलें आहेच, पण त्याच्यापेक्षांही महत्वाचें कारण असें होतें कीं, त्यानें आपल्या पदरीं पांच चाकर माणसें ठेविलीं होतीं; त्यांच्याकडून धान्य कोठें स्वस्त मिळतें वगैरे प्रकारची पूर्ण चौकशी करून मग तो धान्य खरेदी करीत असे. चाकरांना जरी पगार द्यावा लागत असे तरी अशा सवद्यांत त्याला फायदा होत असे.

इकडे मोरबाला विचार करतां करतां एक युक्ति सुचली. त्यानें आपल्या कार्यक्रमाला पसत असें बयाजी पवाराचें घर पाहिलें. या बयाजी शेतकऱ्याचे घरीं शेतकीचा चांगला फड असल्यामुळें बरेंच धान्य असे, तसेंच त्याला लोकांचें देणेंही पुष्कळ होतें ही वेळ सरकारी सारा देण्याची होती, त्यामुळें सात

असामी आपलें देणें घेण्याकरितां बयाजीच्या दारांत बसले होते. बयाजी पवार या लोकांचें देणें भागविणार तें अर्थात् धान्य विकूनच. मोरबानें त्या सात असामींच्या घरीं जाऊन त्यांच्यापाशीं गोष्टी बोलतां बोलतां सहज बयाजीच्या घरची गोष्ट काढिली. काय करावें हो, त्या बयाजीच्या मागें लागलों तरी तो धान्य घालीना मी बाजरी ६ शेरांप्रमाणें मागितली आणि तो म्हणतो कीं, ५ शेरांप्रमाणें घालीन. त्या सात असामींपैकीं एकजण म्हणाला, तुम्हाला धान्य किती घ्यावयाचें आहे ? मोरबा म्हणाला, ५०० रुपयांचें घ्यावयाचें आहे. हें ऐकून ते सातजण मनांत म्हणाले, याच्या पदरांत त्या बयाजीकडून धान्य घातलें म्हणजे आपले पैसे तरी एकदांचे निखळतील. मोरबाची स्वारी कांहीं वेळानें तेथून निघून गेली. सातहि जणांनीं विचार केला कीं, कसें तरी करून बयाजीकडून मोरबाला धान्य घालविलें पाहिजे. त्या सर्वांनीं विचार करून पुढें काय काय करावयाचें हें ठरवून आपल्यापैकीं एक इसम बयाजीच्या घरीं पाठविला. या इसमाचें नांव गेनु असें होतें गेनूनें बयाजीच्या घरीं जाऊन पैशाबद्दल फार निकड लाविली. बयाजी मनांत म्हणतो, धान्य विकून एकदांची भगभग सारिली पाहिजे; त्याशिवाय आपणास हे लोक चैन पडूं देणार नाहींत. बयाजी गेनूस म्हणतो, "कायरे गेनु, पैशाबद्दल बाजरी घेतोस काय" ? गेनु म्हणतो, "मला बाजरी घेऊन काय करावयाचें आहे ? चावडीबद्दल सारखा तगादा लागला आहे." बयाजी म्हणतो 'अरे, बाजरीचा भाव कसा आहेरे" ? "अरे, बाजरीला विचारतो कोण"? "विचारीत नसतील, पण भाव सांगशीलना" ? "असेल ६॥–७ शेरांचा, या भावानें उद्यां कोणी घेण्यास तयार होणार नाहीं. घ्या म्हणून मागें लागलें, कीं या भावाशिवाय गत्यंतरच नाहीं." असा दोघांचा संवाद चालला आहे तोंच त्या सातजणांपैकीं दुसरा हरी या नांवाचा इसम तेथें दाखल झाला. त्यानेंही गेनूचीच री ओढिली. याप्रमाणें क्रमाक्रमानें त्या सातजणांपैकीं बहुतेक लोक आले. ते काय काय बोलले असतील हें येथें लिहावयास पाहिजे असें नाहीं. सूज्ञ वाचकांना तें तेव्हांच समजेल. शेवटीं मोरबाला त्याच्या इच्छेप्रमाणें ६ शेरांप्रमाणें धान्य मिळालें हें सांगणें नकोच अशा प्रकारच्या एक का दोन अनेक गोष्टी करून मोरबानें आपला व्यापार वाढविला.

मोरबाचें स्थित्यंतर पाहून गोविंदरावानें त्याला विचारलें "कायहो मोरबा, तुमचा व्यापार इतका कसा वाढला ?" मोरबा आपली व्यापारी खुबी थोडीच सांगणार! "गोविंदराव म्हणाला, "आपण जातभाईच आहों, तेव्हां मला सांगण्याला काय हरकत आहे ?" त्या दोघांच्या आपसांत बऱ्याच अटी ठरून मग मोरबानें आपली खुबी सांगितली. तो म्हणाला "या खुबीनें तुमच्यावर किती ताण केली आहे पहा ! तुम्ही पांच माणसें पगार देऊन चाकरीस ठेविलीं तर मीं सात माणसें बिनपगारी कामावर लाविलीं. तुमचीं माणसें जितकया निकडीनें धान्य घेण्याची खटपट करतील त्यापेक्षां आमचीं माणसें जास्त खटपट करतील. शिवाय तुमच्यापेक्षां जास्त स्वस्त भावानें आम्हांला धान्य मिळतें."

वरील प्रकार पाहून कोणालाही वाटेल कीं, मोरबानें आपल्या बुद्धीचा वाममार्गांत उपयोग केला. अशा माणसापासून अज्ञ लोकांची फार छळणूक होते.

**विद्यासमन्वितहि दुष्ट परी त्यजावा ।**
**त्याशीं बुधें न सहवास कधीं करावा ॥**

वामन पंडित—नीतिशतक.

मोरबासारख्या माणसांना बुद्धि असून उपयोग काय ! अशा माणसाची बुद्धि जितकी जास्त तीव्र तितका त्याच्यापासून लोकांना जास्त त्रास. इंग्रजींत एक म्हण आहे Honesty is the best policy (प्रामाणिकपणा हाच सर्व गुणांत श्रेष्ठ आहे) नुसती बुद्धि असून उपयोगी नाहीं, तर तिच्याबरोबर प्रामाणिकपणाही पाहिजे. स्वार्थाकरितां मनुष्य वाटेल तें

करावयास तयार होतो, पण हें केव्हांही चांगलें नाहीं वाटलें. तें असलें तरी नीतिमार्गाबाहेर मनुष्यानें केव्हांही वागूं नये.

मनुष्यास नीतिशिक्षण नसेल तर फार अनर्थ होतील. शिक्षण म्हणजे बौद्धिक शिक्षणच नव्हे. शिक्षण शब्दाचा अर्थ किती व्यापक आहे हें प्रारंभीं जीं चार वचनें दिलीं आहेत त्यांवरून दिसून येईल. "मनुष्याची प्रत्येक कृति त्याच्या मनाच्या प्रेरणेनें होते. म्हणून प्रेरणा करितांना मन ज्या वृत्तीनें व्याप्त असेल, त्या वृत्तीशीं सदृश अशीच क्रिया त्याच्या हातानें घडणार. असा हा विचार तत्त्व दृष्टीनें केला असतां कृति हें मनःपटलावर तयार झालेल्या वृत्तिचित्राचें प्रतिबिंब आहे, हें सहज कळून येईल. म्हणून तें वृत्तिचित्र सुंदर असण्यास मन कमावून चांगलें तयार झालें पाहिजे, म्हणजे त्यास नीतिशिक्षण मिळालें पाहिजे." बौद्धिक शिक्षणास नीतिशिक्षणाची किती आवश्यकता आहे हें सूज्ञांस सांगणें नकोच. शिक्षण देणाऱ्यांनीं या विषयाकडे जास्त लक्ष देणें फार जरूरीचें आहे.

---

# अमेरिकेंतील कोट्याधीश.

एके दिवशीं अमेरिकेंतील वर्तमानपत्रांमध्यें हर्शे नांवाच्या एका गृहस्थानें २५ कोटी रुपये अमेरिकेंत पोरक्या मुलांच्याकरितां शाळा काढावी म्हणून ठेवले आहेत, अशी बातमी आली. ही सारी रक्कम एकदम शाळेकरितां खर्च होणार नसून त्यावर येणारें ३ कोटी व्याज या कार्याप्रीत्यर्थ खर्च होणार आहेत. या हर्शेची चाकोलेट कंपनी तेथें होती, व ती फारच भरभराटीस चालली आहे. या कंपनीच्या पुष्कळ शाखा आहेत.

हर्शेनें आपली कंपनी मोडून सारा पैसा या कार्याला दिला असें नाहीं. त्यांनीं कंपनीलाच पंच नेमून त्यांच्या ताब्यांत ही रक्कम दिली व तिची विल्हेवाट करण्यास सांगितलें.

हा माणूस प्रथम अगदीं दरिद्री होता. तो एका छापखान्यांत खिळे जुळविणारा होता. तेथें काम करीत असतां एके दिवशीं त्यांच्या हातून जुळविलेल्या खिळ्यांची गॅली पडली. त्याला पुष्कळ रागें भरण्यांत आलें. नंतर तो तेथून निघाला. तो बुद्धिमान् व कर्तृत्वशाली असल्यामुळें त्याला ही गोष्ट फार झोंबली. तो तेथून तसाच निघाला आणि एका मिठाईवाल्याकडे नोकरीस राहिला. त्याला या धंद्याची बिलकूल माहिती नव्हती. परंतु तो जात्या हुशार होता. त्यानें तेथें कॅरामेल नांवाचा एक जिन्नस तयार केला. तथापि पहिल्या प्रथम लोकांचें लक्ष या जिन्नसेकडे गेलें नाहीं. त्यांना त्याचें महत्त्व वाटेना; तथापि हर्शे नाउमेद झाला नाहीं. त्यानें न्यूयॉर्क शहर सोडलें आणि तो पेन्सीलव्हॅनी या येथें येऊन राहिला.

१८८६ सालीं पुनः त्यानीं कॅरामेल करण्यास सुरवात केली. हा जिन्नस आपल्याला सर्वांपेक्षां उत्तम करतां येतो असें तो म्हणे. या नव्या गांवीं त्याचा जम पहिल्यापासूनच बसला. ह्या कॅरामेलला इतक्या मागण्या येऊं लागल्या कीं, माल तयार होतांच खपून जाई.

हा जिन्नस त्या वेळीं कागदांत गुंडाळून विकीत. पुष्कळ मिठाईवाले हा तयार करीत, त्यांनीं हर्शेची

हात असलेली ही प्रसिद्धी पाहिली त्याला हाणून कसें पाडावें हें त्यांना समजेना. निरनिराळे उपाय करूनहि जेव्हां त्यांना यश आलें नाहीं, तेव्हां त्यांनी त्याला आपल्याला येऊन मिळण्याविषयीं विनंति केली. त्यानें ती विनंति अमान्य केली. तथापि एवढ्या आपल्या नैपुण्यावर पुष्कळ पैसा मिळत असला तर कां सोडा असा विचार करून त्यानें आपला धंदा विकून टाकण्याची तयारी दाखविली. त्याचें म्हणणें त्या धूर्त व्यापाऱ्यांनीं तात्काळ कबूल केलें. हर्शेला त्याबद्दल ३० लाख रुपये मिळाले. हर्षे आतां दुसरा धंदा शोधू लागला.

आपल्या कॅरामेलला मधुर सुवास यावा म्हणून तो चाकोलेट काढीत असे. तेव्हां तो चाकोलेटकडे वळला. त्या वेळीं गोड चाकोलेट म्हणून एक पदार्थ तेथें विकत असत. हर्शेनीं त्यांत सुधारणा केली. हा दुधाचा चाकोलेट व बदामाचा चाकोलेट करूं लागला.

त्या बरोबर त्याचा खप अतोनात वाढला. त्यानें या चाकोलेटचा आकार बदलला. तो चाकोलेटच्या लगडी करूं लागला. तो आकार फार लोकप्रिय झाला.

पुढें हेर्शेनें पेन्सील्व्हानिआंतील लॅंकेस्टर गांव आपल्या व्यापाराला योग्य ठिकाण नाहीं असें पाहून तो आपल्या घरीं गेला. त्यानें आपल्या गांवाचा कारखाना सुरु केला. तो गांव फार भरभराटीस आला आणि अखेर त्या गांवाचें जुनें नांव बदलून त्याला हर्शे असें नांव पडलें.

१९०३ सालीं हर्शे हा गांव अगदीं डोंगराळ खडकाळ होता. आतां त्याचें एक विस्तीर्ण शहर बनलें असून तेथें तीन चार रेल्वे कंपन्या झाल्या आहेत. हें सारें मोठें शहर एकट्या हर्शेच्या मालकीचें आहे.

हर्शे आपल्या हाताखालील नोकरांना फार चांगल्या रीतीनें वागवी. त्याच्या कारखान्यांत अद्याप एकहि संप झाला नाहीं. तेथें कामगारांचा संघ नाहीं. प्रत्येक तीन महिन्याला तेथील नोकरांनां कामाबद्दल पारितोषिक मिळतें. तें पारितोषिक नफ्याच्या मानानें वाटलें जातें. हें पारितोषिक पगाराच्या २६ टक्के पर्यंत मिळतें. नफ्याच्या तीन चतुर्थांश, हर्शे आपले उद्योगधंदे वाढविण्याकरितां खर्ची व बाकीचे कामकऱ्यांना वांटून देई. या तीन चतुर्थांश रकमेंतून बरेच पैसे तो शिक्षणाकरितां काढून ठेवी.

एवढे पैसे आपण शिक्षणाकरितां कसें राखून ठेवलेत असा प्रश्न त्यांना विचारला असतां ते म्हणाले, "मी आतां ६६ वर्षांचा झालों. मला आतां पैशाची जरूरी नाहीं. माझ्या अपेक्षेबाहेर माझा धंदा यशस्वी झाला. हा धंदा असाच चालू राहील. यामध्यें यांत रहाणारा फायदा व त्यावरील व्याज मी या शाळेकरितां खर्च करणार आहे. मला मूलबाळ नाहीं. तेव्हां राष्ट्रांतील मुलें हीं माझीच मुलें समजून मी हा सारा पैसा त्यांच्याकरितां खर्च करणार आहे."

या माणसाकडे पाहिलेंतर हा एवढा श्रीमंत असेल, अगर श्रीमंत होईल अशी कोणी कल्पना केली नसती. हा फार जुन्या चालीचा आहे. याच्या ऑफिसांत टेलिफोनहि नाहीं व तो टेलिफोन कधीं वापरीतहि नाहीं. तो स्वतः पत्रें कधींच लिहित नाहीं, मात्र तारा पुष्कळ पाठवितो. तो आपली सही कशावर करीत नाहीं. तो प्रत्येक व्यवहारांत अत्यंत जपून पाऊल टाकतो. त्याचा प्रत्येक मनुष्यावर विश्वास आहे व तो प्रत्येकाला प्रामाणिक समजतो. तो आपल्या कामगारावर कधींहि देखरेख ठेवीत नाहीं. तो म्हणतो, "उद्योग म्हणजे एक मनुष्याची सेवा होय." त्याचा स्वभाव फार गोड व वर्तणूक अत्यंत सरळ आहे. त्यामुळें तो लोकांना फार आवडतो. त्याला फार बोलण्याची संवय नाहीं. त्याचे धंदा करण्याचे कांहीं नियम ठरलेले आहेत, त्याप्रमाणें तो वागतो. या नियमामुळें व त्याच्या अंगांतील विशिष्ट गुणांमुळें तो एवढ्या योग्यतेस चढला.

## एका स्त्रीचें प्रसंगावधान.

### ( लहानमुलांसाठीं दोन गोष्टी. )

( लेखक—नागेश दत्तात्रय हर्डीकर. )

एक युरोपिअन स्त्री स्वित्झरलंड देशांत उन्हाळ्यांत हवा खाण्यासाठीं आपल्या दोन लहान मुलांसह येऊन राहिली होती. एके दिवशीं तिला पर्वतावरील वनश्रीची व दर्‍या-खोर्‍याची शोभा पहाण्याची इच्छा झाली. तिनें एक गाडी ठरविली व आपल्या दोन लहानमुलांसह एके दिवशीं सकाळीं गाडींत बसून फिरावयास गेली. त्या गाडीला पुढें एक व मागें दोन असे तीन घोडे होते. पर्वतावरील वाट अत्यंत अवघड होती व गाडीवान मोठ्या दक्षतेनें घोडे हांकीत होता, परंतु एक वळण फारच अवघड होतें व रस्ता फारच अरुंद होता. वर भयंकर तुटलेला कडा, रस्त्याचे एका बाजूस भयंकर खोल दरी, अशा ठिकाणीं पुढील घोडा बुजाला व पुढील दोन पाय उंच उभारून तो मागील दोन पायांवर उभा राहिला. आंत बसलेल्या लहान मुलांनीं जोरानें किंकाळी फोडली. गाडीवान तर अत्यंत भेदरून गेला व त्याला घोडे आपल्या ताब्यांत ठेवितां येईनात. अशावेळीं जर एका क्षणाचाच जर विलंब लागता तर सर्व गाडीच्या गाडी सर्वांसह खोल दरींत जाऊन सर्वांचा एका क्षणांत चकाचूर झाला असता. अशा आणिबाणीच्या प्रसंगीं आंत बसलेल्या स्त्रीच्या डोक्यांत सर्व प्रकार आला. तिनें निमिषमात्रांत गाडींतून उडी मारली व तडक पुढें जाऊन पुढील घोड्याचा लगाम हातांत धरिला व त्याचे डोळ्यावर हातरुमाल टाकून त्यास मृदु व गोड शब्दांनीं चुचकारिलें. थोडेसें चुचकारिल्यावर पुढील घोडा स्तब्ध झाला. तिला असें करितांना फार यातायात पडली; पण सरते शेवटीं देवाच्या दयेनें तिला यश मिळालें व अशा रीतीनें तिनें सर्वांचा प्राण वांचविला. बालमित्रांनो, तिच्या अंगीं जर प्रसंगावधान नसतें तर केवढा अनर्थ झाला असतां बरें !

**तात्पर्य:**—कोणतेंही संकट आलें असतां धैर्य सोडूं नये.

---

## धूर्त शेतकरी.

फार वर्षांमागील गोष्ट. एक गरीब शेतकरी होता. त्याच्या शेताच्या एका बाजूला एक अगदीं पडीक व पुष्कळ रान उगवलेला असा एका जमीनीचा पट्टा होता. त्या शेतकर्‍याच्या मनांत त्या जमिनीच्या पट्ट्याची मशागत करून तेथें पीक उत्पन्न करावें असा विचार आला. तो मेहनत घेऊन ती जमीन चांगली करूं लागला; परंतु त्या जमिनीच्या कडेला असलेल्या डोंगरांमध्यें एक झोटिंग राहत असे तो शेतकर्‍याला तेथें मेहनत करूं देईना व तेथें पीक उत्पन्न करण्यास हरकत घेऊं लागला. शेतकर्‍यानें पुष्कळ विनवण्या केल्या तरी तो झोटिंग ऐकेना. सरतें शेवटीं शेतकर्‍यानें त्याच्याशीं असा ठराव केला कीं, पहिल्या वर्षीं जमीनीवर जें पीक उगवेल तें शेतकर्‍यानें घ्यावें व जमिनीच्या आंत जें पीक येईल तें झोटिंगानें घ्यावें व दुसरें वर्षीं जें जमिनीच्या आंत पीक येईल तें शेतकर्‍यानें घ्यावें व जमीनीवर जें पीक उगवेल तें सर्व झोटिंगानें घ्यावें. ह्या ठरावानें झोटिंग खुष झाला व त्यानें शेतकर्‍याला पेरण्यास परवानगी दिली.

शेतकरी कांहीं कमी नव्हता. तो मोठा चाणाक्ष

होता. त्यानें पहिले वर्षी शेतांत जोंधळा लाविला व करारप्रमाणें त्यानें जोंधळ्याचीं कणसें घेतलीं व जमीनींत उगवलेलीं जीं कांहीं मुळें होतीं तीं त्यानें झोटिंगास दिलीं. पहिले वर्षी झोटिंग बिचारा फसला. त्याला वाटलें कीं, दुसरें वर्षी तरि आपणास जमीनीवरील पीक मिळून नफा होईल. शेतकरी कसला वस्ताद. त्यानें दुसरें वर्षी रताळीं लावलीं. ह्या वर्षी भुईत जें उगवेल तें सर्व शेतकऱ्यानें घ्यावें असें ठरलें होतें. त्याप्रमाणें त्यानें रताळीं घेतलीं व वरील पानें ( जमिनीवर उगवलेलीं ) करारप्रमाणें झोटिंगास दिलीं. बिचारा झोटिंग चुरमुरे खात स्वस्थ बसला.

## जशास तसं.

एकदां गुंड्यानें खंड्याला न्यायाधीशासमोर खेंचलें. गुंड्या होता आचारी आणि खंड्या होता मोठा चिक्कू.



महाराज ! या खंड्यानें मला लुटलें. हा आज सकाळीं माझ्या दुकानांत आला. मी चुलीवर लोणी कढवीत



होतों बेट्यानें आपली पोळी त्यावर धरली आणि खाली. त्याबद्दल त्यानें मला बिलकूल पैसे दिले नाहींत. तेव्हां महाराजांनीं दयाळू होऊन माझे पैसे द्यावेत.

होयरे! खंड्या, खरे कां हें ? होय महाराज ! किती पैसे झाले तुझे गुंड्या ? चार आण्याला एक पैसा कमी घेणार नाहीं. काय चार आणे ? आणरे खंड्या चार



आणे, नंतर त्यानें ते चार आणे खणखण वाजवले आणि खंड्याला परत दिले. तो म्हणाला, खंड्यानें



तुझ्या लोण्याचा जसा वास खाला, तसा तूं त्याच्या पैशाचा आवाज ऐकलास. जा मूर्खा! येथें थांबू नकोस

# माकडाचें प्रेम !

जीवनदास आपल्या ' मन्या ' माकडाच्या लीला दाखवून आपला चरितार्थ चालवीत असे. जीवनदासाचें आणि त्याच्या बायकोचें मन्यावर अतोनात प्रेम होतें. त्यांना मूलबाळ नसल्यानें मन्या त्या गरीब जोडप्यांच्या पुत्रस्थानींच बसून त्यांचा जीव कीं प्राण झाला होता. बरोबर जेवायला बसविणें, त्याला आपल्या हातीं भरविणें, पुत्राप्रमाणेंच बरोबर निजविणें वगैरे सर्व व्यवहार पोटच्या गोळयाप्रमाणें मन्याशीं होत असत. मन्यापेक्षां प्रिय वस्तु साऱ्या जगांत त्या जोडप्याला ठाऊक नव्हती. जीवनदासानें मन्याला एक चेंडू दिला होता. त्या चेंडूशीं मन्या सदां खेळत असायचा. एक मातीचें भांडें जेवायला व कांबळ्याचा तुकडा पांघरायला; तसेंच एक पोत्याचा तुकडा लोळाय बसायला; असा मन्याजीचा व्यवस्थेशीर थाट होता. मन्या आपल्या या सामानाला अतिशय जपत असे. पोत्याचा तुकडा व कांबळें यांची योग्यता मऊ गादी आणि शालजोडीपेक्षां तीं त्याला जास्त वाटे. सोन्याच्या भांड्यापेक्षां तें मातीचें भांडें त्याला अमोल वाटत असे. अशा रीतीनें त्याचे दिवस फार सुखांत जात होते. प्रातःकाळीं जीवनदासानें आपल्याबरोबर त्याला जेऊ घालून मग खेळ करण्यासाठीं गांवांत जाण्याचा क्रम ठेवला होता. नकला करण्यांत मन्या फारच पटाईत होता. हातांत काठी घेऊन टेंकत टेंकत वृद्ध माणसासारखें चालणें, आसन घालून पूजा करणें व गंधभस्म लावण्याचे आविर्भाव दाखविणें, पोथी बगलेंत मारून शाळेंत जाण्याची नक्कल करणें, ढोलकें वाजवून गाण्याचा आविर्भाव दाखविणें वगैरे त्याच्या बुद्धिमत्तादर्शक नकलांनीं प्रेक्षक गारीगार होऊन जात; व मन्यावर देणग्यांचा नुसता पाऊस पडे. कोणी कांहीं दिलें कीं त्याला सलाम करणें व देईपर्यंत त्या माणसाचे पाय धरून बसणें वगैरे गोष्टींनीं लोकांना मोठी गंमत वाटे. मन्याचा पेला पैशांनीं भरून जात असे. इतरही बक्षिसें मिळत. कोणी भाकरी देई, कोणी मिठाई देई. मुलांना तर त्याच्याकडे पाहून तृप्ति होत नसे. त्याची गंमत पाहण्यासाठीं घरीं धांऊन धांऊन भाकरी, बिस्किटें, मिठाई, फळें वगैरे आणून मन्याला खायला देणें ही पोरांची मोठी करमणूक झाली होती. वयस्कांना सुद्धां तो तितकाच प्रिय झाला होता. विन्हाडीं असतांना कोणीना कोणी त्याशीं खेळत असतांना दृष्टीस पडे. फेरीवाले जीवनदासाच्या घरावरून जातांना क्षणभर थांबून मन्यासमोर आपल्या जवळचें फळ वगैरे खाण्याचा जिन्नस थोडा तरी टाकल्याशिवाय कोणी पुढें चालत नसे. मन्या नेहमीं मोकळा असल्यानें कोणी त्याला खायला न देतां तसाच खिजवून गेला तर तो कांहीं देईपर्यंत त्याचे पाय सोडीत नसे. मात्र कुत्र्याची चीड मन्याला भयंकर होती. त्याच्या धाकानें एकही कुत्रा त्या आळींत राहिला नव्हता. एखादा आलाच तर मन्याजी त्याला धरून चांगलाच चोप देत असत. मन्याजी लोकप्रिय होण्याचें हेंही एक कारण होतें. जीवनदासाची बायको बुधिया उन्हांत लोळत पडली असतांना मन्याजी मोठ्या प्रेमानें तिच्या डोक्यांतील उवा काढीत असत. गाई मागें वासरूं किंवा आई मागें लेंकरूं त्याप्रमाणें मन्या बुधियाचे मागोमाग

असे. प्रत्यक्ष मातापुत्रांमध्येंही असें प्रेम क्वचित् दृष्टिस पडत असेल.

एक दिवस मन्याला फळें खाण्याची अनिवार इच्छा झाली. कुठें तरी बागेंत जाऊन झाडावर चढून कांहीं फळें खायचीं, कांहीं अर्धवट जमीनिवर टाकून द्यायचीं यांत मन्याला गंमत वाटे. माकडें स्वभावानें विनोदशील असतानच, परंतु मन्यामध्यें विनोदाची मात्रा जरा जास्तच होती आजपर्यंत धरपकड न झाल्यानें झाडांवरून फळें खाणें त्याला सहज वाटत असे. या सृष्टिनिर्मित वस्तूंवर सुद्धां कुणाचा ताबा असेल हें त्याला काय ठाऊक ? जल, वायु आणि प्रकाश यांवरही मानवी प्राण्यानें आपला अधिकार राखून ठेवला आहे हें त्या बिचाऱ्याला कसें समजणार ? खेळ करून घराकडे जाण्यास जेव्हां जीवनदास परतला, तेव्हां मन्याजी हळूंच पसार झाले असा तो नेहमीं पसार होऊन परत घरीं येत असे यामुळें जीवनदासाला त्याच्या पसार होण्याचें विशेष वाटलें नाहीं. इकडे हे राजश्री घरांवरून उड्या मारीत इकडे तिकडे बागडत बागडत एका बागेंत पोंहोंचले फळांनीं झाडें भरलेलीं पाहून मन्याजीस फार आनंद झाला. इथें आपणांस कोणी नको म्हणणार नाहीं असा निश्चय करून त्यानें बागेच्या कोटावरून उडी मारली ती नेमकी माळ्याच्या घरावर पडली. माळी घरांत नव्हता. मन्या भराभर झाडांवर चढून त्यानें फळांचा फन्ना पाडायला सुरवात केली झाडांवर खूब उड्या मारल्या. फळें अर्धवट खाऊन इकडे तिकडे फेंकलीं नंतर उंच डहाळीवर बसून मन्यानें फांद्या हलविण्यास सुरवात केली. त्यामुळें फळें खालीं पडून इकडे तिकडे पसरलीं. असा विध्वंस चालू असताना माळी आला माळीदादांनीं या खोड्या पाहून दगड मारून मन्यास दहशत घालण्याचा प्रयत्न केला, परंतु माळ्याचें आणि इतर तमासगीर मुलांचे दगड चुकविणें हा मन्यास एक खेळच वाटला. मधून मधून दगड फेंकणाऱ्यांवर दांत विचकून त्यांना भेवडाविण्याचाही प्रयत्न मन्या करीत होता. माळी त्याच्या भेवडावण्याला भिऊन पळत असे. हें पाहून तर मुलें खूप गिल्ला करीत. मन्याला या आरडा ओरडीची गंमत वाटून फांद्या हालवून पिकलेलीं फळें अधिकच खालीं फेंकावीं असा प्रकार चालू होता. आपल्याच्यानें या माकडाचा बंदोबस्त करवणार नाहीं हें पाहून माळीदादांनीं आपल्या मालकास तशी वर्दी दिली. हे बागेचे मालक पोलिस सुपरिंटेंडंट होते. त्यांनीं ही मर्कटलीला ऐकल्या बरोबर संतापानें बेफाम होऊन माळ्यास व मन्यास दोघांसही शिव्या देण्यास सुरवात केली. ' माझ्यासारख्या पोलिससुपरिंटेंडंटाच्या बागेंत सुद्धां माकडानें एवढा हिय्या करावा ? बंगल्याचें भाडें मी भरतों आहे, तें माकड कांहीं भरीत नाहीं. सगळे असहकारितावादी माझ्या रुबाबाचा अनुभव घेऊन चुकले आहेत 'सर्व वर्तमानपत्रकर्ते, मला थरथर कांपतात मग या माकडाची काय कथा' असें म्हणून पोलिसबहादुरांनीं तावडतोब बंदूक हातीं घेऊन ते बागेंत दाखल झाले. पहातात तों मन्या एका झाडावर बसून तें गदगदा हलवीत आहे. संतापानें लाल होऊन बहादुरांनीं मन्याकडे बंदुक रोंखिलीं बंदुक पाहिल्याबरोबर मन्याजीची पांचावर धारण बसली आजपर्यंत मन्यावर कोणीही बंदूक रोंखिली नव्हती तरी बंदुकीचा आवाज त्याला ठाऊक होता व कित्येक पक्षी या आवाजापासून मेलेले त्यानें पाहिले असल्यानें त्याचे पंचप्राण भयानें गोळा झाले, हातपाय इतके जड झाले कीं, तेथून हलण्याचीही त्याला शक्ती राहिली नाहीं मग उडी मारून पळून जाणें तर अशक्यच. भयानें गांगरून तो त्याच डहाळीला चिकटून केंविलवाणा बसला. पोलिसबहादुरांना त्याची ती केंविलवाणी मुद्रा व बैठक पाहून किंचित् दया आली व त्यांनीं माळ्याला झाडावर चढून माकडाला धरून आण म्हणून फर्माविलें. माळीदादा मन्याजीच्या हुलकावण्यांनीं आधींच गर्भगळीत झालेले होते, परंतु साहेब बहादुराचा गुस्सा चांगलाच माहीत असल्यानें बिचाऱ्यानें झाडा-

# रंगीत इसाप-नीति.

ह्यांत एकंदर इसापनीतींतील आठ अगदीं सोप्या गोष्टी मोठ्या व जाड टाइपांत दिलेल्या असून प्रत्येक गोष्टीसमोर त्यांतील रहस्य दाखविणारें रंगीत सुंदर चित्र दिलेलें आहे. चित्रें पाहूनच मुलांना गोष्टींतील तात्पर्य कळतें. किं० ८६ ट. ह. ८८६.

# सचित्र इसाप-नीति.

[ उत्तरार्ध. ]

[ नवीन भाषांतर भाग २ रा. ]

वरीलप्रमाणेंच हा दुसरा भाग विक्रीस तयार आहे ह्याचीं सुमारें ३०० पानें झालीं असून ह्यांत ३५० गोष्टी आहेत चित्रांची संख्या १५० पर्यंत आहे. किं० ८४.

दोन्ही भाग एके ठिकाणीं बांधलेलें सुंदर पुस्तक किं० रु० २

# विद्यार्थ्यांकरितां नाटिका.

शीलं परं भूषणम्

ही नाटिका प्रसिद्ध कवि-शिरोमणि नारायण वामन टिळक यांनीं केवळ लहान मुलांकरतांच लिहिलेला आहे यांत शृंगाररस मुळींच नाहीं. एवढेंच नव्हे, तर स्त्रीची भूमिका या नाटकांत आणलेलीच नाहीं शिवाय नाटकाचा विषय नैतिक विचारानें पूर्ण भरलेला असल्यामुळें शाळांतून वार्षिक संमेलनाचे वेळीं मुलांकडून ह्या नाटकाचा प्रयोग करविण्यास तें योग्य आहे. नाटकाचा विषय धनाची योग्यता जास्त किंवा ज्ञानाची योग्यता जास्त हा आहे. पुस्तकांत चार सुंदर चित्रें कथानकास अनुसरून दिलेलीं आहे. किं० ८४.

मॅनेजर--चित्रशाळा प्रेस, पुणें.

# चिमुकलें भारत व रामायण.

महाभारत व रामायण हे आपले राष्ट्रीय ग्रंथ आहेत. यांत आपला प्राचीन इतिहास असून प्रपंच साधून परमार्थ कसा जोडावा हे उत्तम दाखविलें आहे. व्यावहारिक बोधाचा ह्या केवळ खाणी आहेत, आबालवृद्ध स्त्री-पुरुषांना या ग्रंथांचें ज्ञान होणें अगत्याचें आहे, प्रौढांकरितां आमचीं लोकप्रिय 'भारती युद्ध' व 'रामचरित्र' हीं पुस्तकें आहेत. आतां बारातेरा वर्षांच्या मुलांमुलींकरितां 'चिमुकलें भारत व चिमुकलें रामायण' हीं दोन पुस्तकें अनुक्रमें आम्हीं रामकृष्णवाक्सुधेचे प्रसिद्ध लेखक रा. कृष्णाजी गोविंद किनरे व रा. विद्याधर वामन भिडे बी. ए. यांजकडून मुद्दाम लिहविलीं आहेत. पुस्तकाची भाषा फारच मार्मिक व सोपी आहे. वाचतां वाचतांच मुलांच्या मनावर त्यांतील रहस्य ठसावें म्हणून उपदेशपर वाक्यें जाड टाइपांत घातलीं आहेत, आणि कथानकांच्या अनुरोधानें हाफटोन प्रोसेसनें तयार केलेलीं भारतांत आठ व रामायणांत सात अशीं सुंदर चित्रें घातलीं आहेत भारताचीं पृष्ठें १७३ व रामायणाचीं पृष्ठें ८२. छपाई बांधणी सुबक. किं० ८६, व रामायण किं० ८४.

मॅनेजर---चित्रशाळा प्रेस, पुणें शहर.

॥ ॐ नमः श्रीरामचंद्राय ॥

# आर्यमहौषधालय मु० पो० आंजर्ले.

**कोंकणप्रांतांतील अगदीं ताज्या व शुद्ध वनस्पतींचीं जगत्प्रसिद्ध निर्दोष व रामबाण औषधें.**

**कंदर्पमंजरी पाक**—हा अपूर्व पाक गरिबांपासून तों अमीरउमरावांपर्यंत सर्वांसही अत्यंत उपयोगी असून किंमत माफक ठेविली आहे. यांत मौक्तिक, प्रवाळ, लोह, माक्षिक, कस्तूरी, अंबर इ० अत्युत्तम गुणकारक पदार्थ असून शिवाय बदाम, पिस्ते, अक्रोड चारोळी, केशर, वेलची, पंजाबी सालममिश्री, सफेतमुसळी, पत्री, गोक्षुर, शतावरी, आस्कंद, वंशलोचन वगैरे (८०) उपयुक्त वनस्पति घातल्या आहेत. यानें पथ्यावांचून गुण येतो. यापासून कोणत्याही कारणांनीं होणारा व कसाही प्रकारचा शुक्रस्राव, नपुंसकत्व, मूळव्याधि, रक्तदूषणामुळें त्वग्रोग, स्त्रियांची धुपणी व गर्भाशयस्थ दोष या भावना त्यांच्या एकंदर उपविकारांसह तत्काल बऱ्या होऊन धातुवृद्धि होते, व शरीर कणखर आणि तेजस्वी बनतें. २० तो० ड० २ रुपये. एकदम ३ डबे घेणारास ५ रुपये.

**स्वर्णधात्री तेल**—हें चारोळी, बदाम, कंकोळ, एला, बहुविध वनस्पतींचीं सत्त्वें व उपयुक्त तेलें अशा अनेक पदार्थांनीं बनविलें असल्यानें याच्या मर्दनापासून अपस्मार, उन्माद, वेड, चक्कर इ० रोगांस जलद आराम पडतो केसांस चोळल्यानें केस काळे कुळकुळीत, तजेलदार, सडक लांब व मृदु होऊन मेंदु शांत आणि रोगरहित बनतो. यानें मस्तकाचें टक्कल जातें. हें अंगास चोळून स्नान करीत गेल्यानें शरीराचा दुर्गंध जातो. खरूज, गजकर्ण, शिबें, तसेंच तळपाय, तळहात, डोळे व मस्तक यांचा दाह हे विकार खास बरे होऊन निद्रा चांगली येते, आणि नेत्ररोग दुरुस्त होतात. बा० किं० १। रु०

**दंतरक्षक पूड**—ही दांत व हिरड्या यांचे सर्व विकार तत्काल दुरुस्त करून दांत स्वच्छ व मजबूत करण्यांत प्रतिज्ञेची आहे. ड. ६ आणे.

मुरंगी, मालती, कल्हार, गुलबहार, दणाणा, लक्ष्मीविलास इ० बादशाही अति उंची अत्तरें व त्याचप्रमाणें गुलाब, हिना, केवडा, चमेली, जाई वगैरे सुगंधी अत्तरें आणि केसांस लावण्याचीं हरएक प्रकारचीं सुवासिक तेलें माफक दरानें पूर्ण खात्रीचीं मिळतील.

सूचना:—वरील औषधें व अत्तरें वगैरे पूर्ण खात्रीचीं असल्यामुळें आज वीस वर्षांत त्यांचा लक्षावधि लोकांस अप्रतिम उपयोग झाला म्हणून त्यांचा नेहमीं फारच खप होत आहे. अनुभवानंतर पूर्ण खात्री पटलव. औषधें माहितीचे स्वर्व्यालय गेलीनें अगर व्ही पी नें पाठवूं. प्याकिंग व टपाल खर्च वेगळा. घाऊक घेणारास कमिशन भरपूर. सर्व औषधांच्या आणि आरोग्यरक्षणाच्या माहितीचें सचित्र मोठें पुस्तक देऊं. आमचीं औषधें वगैरे मागविणें तीं खालील विनचूक पत्त्यावर मागवावीं.

**कृष्णशास्त्री बिवलकर, वैद्य.**

REGISTERED, B. NO. 179




## अनुक्रमणिका.

**विषय.** **पृष्ठ.**

| विषय. | पृष्ठ. |
|---|---|
| द्रव्य. | ९७ |
| स्वराज्याचें तोरण. ( नाटक ) | १०० |
| माकडाचें प्रेम ! | १०३ |
| सील | १०७ |
| उपदेशामृत बिंदू. | १०९ |
| दुधाचे प्रकार. ( चित्रें ) | १११ |
| नारळ कुठें गेले ! ( चित्रें ) | ११२ |
| ब्लेस पास्कॉल. | ११३ |
| कांट्यानें कांटा निघतो. | ११६ |
| शालापत्रकाची चढाओढ. | ११९ |
| खात्री झाली. | १२० |

मुद्रक व प्रकाशक—रा. रा. शंकर नरहर जोशी, चित्रशाळा प्रेस १०२६ सदाशिव पेठ, पुणे सिटी.

# रंगीत इसाप-नीति.

ह्यांत एकंदर इसापनीतींतील आठ अगदीं सोप्या गोष्टी मोठ्या व जाड टाइपांत दिलेल्या असून प्रत्येक गोष्टीसमोर त्यांतील रहस्य दाखविणारें रंगीत सुंदर चित्र दिलेलें आहे. चित्रें पाहूनच मुलांना गोष्टींतील तात्पर्य कळतें. किं० ८६ ट. ह. ८८६.

# सचित्र इसाप-नीति.

[ उत्तरार्ध. ]

[ नवीन भाषांतर भाग २ रा. ]

वरीलप्रमाणेंच हा दुसरा भाग विक्रीस तयार आहे. ह्याची सुमारें ३०० पानें झालीं असून ह्यांत ३५० गोष्टी आहेत चित्रांची संख्या १५० पर्यंत आहे. किं० १८४.

दोन्ही भाग एके ठिकाणीं बांधलेलें सुंदर पुस्तक किं० रु० २

# विद्यार्थ्यांकरितां नाटिका.

शीलं परं भूषणम्.

ही नाटिका प्रसिद्ध कवि–शिरोमणि नारायण वामन टिळक यांनीं केवळ लहान मुलांकरतांच लिहिलेली आहे यांत शृंगाररस मुळींच नाहीं. एवढेंच नव्हे, तर स्त्रीची भूमिका या नाटकांत आणलेलीच नाहीं शिवाय नाटकाचा विषय नैतिक विचारानें पूर्ण भरलेला असल्यामुळें शाळांतून वार्षिक संमेलनाचे वेळीं मुलांकडून ह्या नाटकाचा प्रयोग करविण्यास तें योग्य आहे. नाटकाचा विषय धनाची योग्यता जास्त किंवा ज्ञानाची योग्यता जास्त हा आहे. पुस्तकांत चार सुंदर चित्रें कथानकास अनुसरून दिलेलीं आहे. किं० ८४.

म्यानेजर--चित्रशाळा प्रेस, पुणें.

# चिमुकलें भारत व रामायण.

महाभारत व रामायण हे आपले राष्ट्रीय ग्रंथ आहेत. यांत आपला प्राचीन इतिहास असून प्रपंच साधून परमार्थ कसा जोडावा हे उत्तम दाखविलें आहे. व्यावहारिक बोधाचा ह्या केवळ खाणी आहेत, आबालवृद्ध स्त्री–पुरुषांना या ग्रंथांचें ज्ञान होणें अगत्याचें आहे, प्रौढांकरितां आमचीं लोकप्रिय ' भारती युद्ध ' व ' रामचरित्र ' हीं पुस्तकें आहेत. आतां बारातेरा वर्षांच्या मुलांमुलींकरितां ' चिमुकलें भारत व चिमुकलें रामायण ' हीं दोन पुस्तकें अनुक्रमें आम्हीं रामकृष्णवाक्सुधेचे प्रसिद्ध लेखक रा. कृष्णाजी गोविंद किनरे व रा. विद्याधर वामन भिडे बी. ए. यांजकडून मुद्दाम लिहविलीं आहेत. पुस्तकाची भाषा फारच माहक व सोपी आहे. वाचतां वाचतांच मुलांच्या मनावर त्यांतील रहस्य ठसावें म्हणून उपदेशपर वाक्यें जाड टाइपांत घातलीं आहेत, आणि कथानकांच्या अनुरोधानें हाफटोन प्रोसेसनें तयार केलेलीं भारतांत आठ व रामायणांत सात अशीं सुंदर चित्रें घातलीं आहेत. भारताचीं पृष्ठें १७३ व रामायणाचीं पृष्ठें ८२. छपाई बांधणी सुबक. किं० ८६, व रामायण किं० ८४.

म्यानेजर—चित्रशाळा प्रेस, पुणें शहर.

मराठी बालपत्रक

येथें शब्द नाहीं शिष्यासीं। हें अवघें सद्गुरूपाशीं।
सद्गुरु पालटा अवगुणांसी। नाना यत्नें करोना ॥
जें कांहीं आपणास ठावें। तें हळु हळु शिकवावें।
शहाणें करून सोडावें। सकळा जनां ॥ १ ॥

—रामदास.

पुस्तक ३५ जून सन १९२४ अंक ६

प्रश्नोत्तरें.

## द्रव्य.

### पृथ्वी कशाची बनली आहे ? द्रव्य कशाला म्हणतात ?

ज्याला स्पर्श करता येतो, जें हाताला लागूं शकतें, किंवा जें दिसतें त्याला द्रव्य म्हणतात. त्यांत पृथ्वी, आप, तेज, वायू आकाश वगैरे येतात.

### द्रव्य आस्तित्त्वांत आहे काय ?

जग ही सारी माया आहे, असें म्हणणाऱ्यांना द्रव्याचें अस्तित्त्व कबूल नाहीं. तें द्रव्य अनित्य मानतात, व त्याचे परमाणू नित्य मानतात. परंतु सामान्य लोकांना द्रव्याचें अस्तित्त्व कबूल करावेंच लागतें.

### त्याची उत्पत्ती कशी झाली ?

कांहीं तत्त्ववेत्ते या नित्य परिमाणूंच्या संयोगानें द्रव्य बनतें असें म्हणतात. परंतु आपल्याला द्रव्यें कोठून आलें व केव्हां आलें हें सांगतां येत नाहीं तें आहे एवढेंच कबूल करावें लागतें.

### द्रव्य सर्वत्र आहे काय ?

होय. तें सर्वत्र आहे. जेथपर्यंत आपली दृष्टी पोहोंचू शकतें, तेथपर्यंत द्रव्य आहे, असें कबूल करावें लागतें.

### साऱ्या पृथ्वी एकाच द्रव्याच्या बनलेल्या आ-तात काय ?

नाहीं. कांहीं ठिकाणीं पांचहि मूलभूत द्रव्य

सांपडतात कांहीं ठिकाणीं नुसतें पाणी सांपडतें, याप्रमाणें रचना आहे.

**द्रव्याचे प्रकार किती ?**

मूलभूत प्रकार ९२ आहेत असें म्हणतात. यांत बदल होत नाहीं किंवा त्यांचें अधिक पृथक्करणहि होत नाहीं. हायड्रोजन व ऑक्सीजन या दोन मूलभूत द्रव्यांपासून पाणी होतें अशाप्रकारें या द्रव्यांचें निरनिराळ्या प्रकारें मिश्रण करून निरनिराळीं द्रव्यें बनतात. त्यांना सीमाच नाहीं.

**द्रव्याच्या अवस्था किती ?**

द्रव्याच्या तीन अवस्था आहेत. एक घनरूप, दुसरी द्रवरूप व तिसरी वायुरूप प्रत्येक द्रव्याच्या तीनाहे अवस्था होऊं शकतात पाण्याचें बर्फ होतें. म्हणजे पाणी घनरूप होऊं शकतें. व बर्फाला उष्णता लावली म्हणजे त्याचें द्रवरूप होतें व जास्त उष्णता दिली म्हणजे त्याचीच वाफ होते हवेचींहि हीं रूपांतरें होतात.

**सूर्यांत किती द्रव्यें आहेत ?**

सूर्यांत वायुरूप द्रव्यें आहेत. त्या द्रव्याचें घन किंवा द्रवरूप आहे किंवा नाहीं हें सांगवत नाहीं.

**द्रव्याचें साधें स्वरूप कोणतें ?**

वायु हें सामान्य स्वरूप होय. हायड्रोजन व हेलीयम हे वायु अगदीं सामान्य होत.

**द्रव्याचा एखादा प्रकार नष्ट होऊं शकतो काय ?**

नष्ट होणें अशक्य नाहीं. सध्यांच्या माहितीप्रमाणें फक्त ९२ द्रव्येंच अस्तित्वांत आहेत. चुकलेलीं द्रव्यें कदाचित सांपडूं शकतील. कांहीं प्रकारचीं द्रव्यें विशिष्ट उष्णतामान अथवा दाब असलेल्या ठिकाणींच सांपडतात त्यांच्यावर असे प्रकार आहेत.

**द्रव्याच्या इतक्या जाती कां ?**

द्रव्याच्या प्रत्येक परिमाणूला गती आहे, आणि प्रत्येक परिमाणू दुसऱ्या परिमाणूला ओढीत असतो या दोन नियमांमुळें द्रव्याच्या इतक्या जाती आढळतात.

**अत्यंत कमी सांपडणारें द्रव्य कोणतें ?**

रेडीयम हें अत्यंत कमी सांपडणारें द्रव्य होय.

**सर्वांत मौल्यवान द्रव्य कोणते ?**

अनेक कारणांमुळें रेडियम हेंच अत्यंत मौल्यवान द्रव्य होय. सगळ्या जगांत हें द्रव्य एक पौंडभरहि नाहीं. त्याची किंमत अमोल आहे.

**द्रव्य अविनाशी आहे का ?**

सूक्ष्म स्वरूपांत तें अविनाशी आहे. द्रव्यांचें स्थूल स्वरूप परिस्थितीनुरूप बदलतें.

**द्रव्य स्थीर असतें काय ?**

फक्त काल्पनिक अवस्थेंत द्रव्य स्थीर राहील. सूर्य आणि पृथ्वी यांच्या मध्यावर असलेल्या द्रव्याचा अंश जर कोणत्याहि दिशेला हलणार नाहीं, तर अशी स्थिती संभवेल. परंतु सूर्य, पृथ्वी आणि तारे यांच्यावरील प्रत्येक अणू त्यांच्या गतीबरोबर हलत आहे.

**ह्या द्रव्यांना गती कोणी दिली ?**

ज्यांनीं त्यांना उत्पन्न केलें त्यांनीं. अर्थात् ईश्वरानें.

**द्रव्य सारखें बदलतें काय ?**

होय. हा बदल नेहमीं होतो. आपल्याला तो कळण्यास कदाचित् लाखो वर्षें लागत असतील.

**द्रव्य पृथ्वीपासून दूर जाऊं शकतें काय ?**

कांहीं हलक्या वायूंचे परिमाणू पृथ्वीच्या अगदीं वर असतात त्यांच्यावर गुरुत्वाकर्षणाचा परिणाम होत नाहीं. अशीं द्रव्येंच दूर जातात.

**द्रव्याचें हलकें स्वरूप कोणतें ?**

हायड्रोजन हा साऱ्या द्रव्यांत अगदीं हलका असतो. त्याचेच परिमाण धरून दुसरीं द्रव्यें मोजतात

**द्रव्याचें जड स्वरूप कोणतं ?**

युरोनियमचा अणू हायड्रोजनच्या अणूपेक्षां २३८ पट मोठा आहे. त्यामुळें तोच जड होय.

**द्रव्य खरखरीत अथवा गुळगुळीत कां असतें ?**

त्याच्या पृष्ठभागावरील रचनेमुळें तें गुळगुळीत अथवा खरखरीत असतें ही स्थिति सापेक्ष आहे.

गुळगुळीत दिसणारे पदार्थ दुर्बिणींतून पाहूं लागलों तर खरखरीत दिसतात.

### कांहीं पदार्थ पारदर्शक कां ?

कारण त्यांच्या अणूंचा रचना अशी असते कीं, त्यांतून सूर्याचीं किरणें थांबविल्याशिवाय अथवा परावृत्त केल्याशिवाय, अथवा शोषून घेतल्याशिवाय, पलीकडे जाऊं शकतात.

### वस्तु हलकी किंवा जड कां ?

वस्तुमध्यें जसे परिमाणु जास्त अथवा कमी असतील, त्या मानानें ती जड अथवा हलकी असते.

### द्रव्य कठीण अथवा मऊ कां ?

कांहीं पदार्थांचे अणु अगदीं घट्ट बसलेले असतात. त्यामुळें ते कठीण लागतात. कांहींचे घट्ट नसतात व ते द्रव स्थितींत जवळ असतात. उदाहरणार्थ, लोणी. रेशिमांत हवेचे परिमाणु मिसळलेले असतात, म्हणून रेशीम मऊ लागतें.

### द्रव्य अदृश्य असतें काय ?

होय सारे वायु अदृश्य असतात. द्रव्यामध्यें येऊन पडणारे सूर्य किरण जर परावृत्त झाले नाहींत, तर त्याला रंग नसतो, असें ठोकळ मानानें म्हणतां येईल.

### जीर्ण द्रव्याचें काय होतें ?

द्रव्याचें फक्त रूपच बदलतें किंवा जीर्ण होतें आणि मूळ द्रव्याला दुसरें रूप प्राप्त होतें. उदाहरणार्थ कुजलेल्या भाज्यांचे क्षार, पाणी वायू वगैरे होऊन तें मुळ स्वरूपाप्रत जातें.

### कांहीं द्रव्यें विषारी कां ?

त्या द्रव्यांची रचना अशी असते कीं, त्यांतील घटकावयव मनुष्याच्या शरीरांतील घटक द्रव्यांत मिसळत नाहींत, किंवा त्यांना आंतून बाहेर घालवितां येत नाहीं.

### कांहीं द्रव्यें कां जळत नाहींत ?

कारण तीं जळण्याइतकें उष्णतामान चढवितां येत नाहीं. सर्व द्रव्यें सूर्याच्या उष्णतेइतकी उष्णता झाल्यास जळतील.

### द्रव्य सारखें विभिन्न होत असतें काय ?

कांहीं द्रव्यांतील कांहीं वस्तु फार लवकर भिन्न होतात. कांहीं दिवसांच्या, कांहीं महिन्यांच्या, तर कांहीं वर्षांच्या अंतरानें अलग होतात. परंतु ही मोडतोड सारखी चालू असते.

### द्रव्य नष्ट होऊं शकतें काय ?

नाहीं. त्यांत फक्त बदल होतो.

### द्रव्य जळल्यावर काय होतें ?

फॉस्फरस सारखें द्रव्य ऑक्सीजनमध्यें जाळलें तर त्याचें ऑक्सीजन व फॉस्फरस असें जड घटक द्रव्य बनतें. आणि त्या स्थितींत फॉस्फरसचें मूळ स्वरूप अविच्छिन्न रहातें. त्याप्रमाणें प्रत्येक वस्तू जळली तरी तिचें मूळ स्वरूप नष्ट न होतां आसपासच्या वायूंत तें मिश्रीत होतें.

### मेणबत्ती विझवली म्हणजे काय होतें ?

ज्योत वातीपासून दूर केली जातें. ह्या वातीमध्यें मेण येत असतें. हें मेण आंता थंड होतें आणि त्याचा व ऑक्सीजनचा संयोग न झाल्यामुळें ज्वलन थांबतें.

### आगीनें द्रव्य जळतें काय ?

नाहीं. आगीनें त्याचें रूप फक्त बदलतें. द्रव्य कधींहि नष्ट होत नाहीं हें मागें सांगितलेंच आहे

### द्रव्याचा स्फोट कां होतो ?

द्रव्याला आंच लावली म्हणजे त्यांतील कण जोरानें वायुरूप होण्याचा प्रयत्न करतात. अशा प्रकारें पुष्कळ वायु उत्पन्न होऊं लागला, म्हणजे तो अधिक जागा व्यापू लागतो व ती जागा मिळाली नाहीं म्हणजे स्फोट होतो.

### द्रव्याचा वेग किती असतो ?

सर्वांत हलकें द्रव्य सेकंदाला १, ७० ००० मैल जातें. प्रकाश सेकंदाला १, ८६, ००० मैल

जातो, म्हणजे प्रकाशापेक्षां द्रव्याची गती थोडी कमी आहे.

**द्रव्याच्या प्रत्येक रूपाला निराळा रंग असतो काय ?**

नाहीं. निराळ्या द्रव्यांना एकच रंग असतो आणि कधीं कधीं सारख्या द्रव्यांना निराळा रंग असतो.

**रंग कोठून येतो ?**

प्रकाशापासून कांहीं प्रकाश किरणें शोषलीं जातात व कांहीं द्रव्याकडून परतवलीं जातात. त्यामळें द्रव्यांना रंग असतो

**मनुष्यामध्यें किती प्रकारचीं द्रव्यें आहेत ?**

अठरा ते वीस त्यांतीत मुख्य म्हणजे ऑक्सीजन, हैड्रोजन, नायट्रोजन, कार्बन होत.

**विचार हा द्रव्यांत येतो काय ?**

नाहीं. जें मोजतां येतें, किंवा मापतां येतें, त्यालाच द्रव्य म्हणतात.

**द्रव्याला जाणीव असते काय ?**

नाहीं. साऱ्या द्रव्यांना नसते. फक्त सजीव द्रव्यांना असतें.

**सारीं द्रव्यें सजीव असतात काय !**

नाहीं ज्यांना जाणिव असते तीच सजीव असतात.

—अपूर्ण—

# स्वराज्याचें तोरण.

## अंक—३ रा.

### प्रवेश—१ ला.

( किल्लेदार विचार करीत बसला आहे. )

किल्ल०—( स्व. ) या सुभेदारांना आतांशी जास्त जास्तच हांव सुटूं लागली आहे. खरें म्हणाल तर आम्हीं यांना यांच्या उपयोगाच्या सर्व वस्तू पुरवाव्या हा कुठचा न्याय ! वरचेवर पत्रें येतात कीं गाई पाठवून द्या, धान्य पाठवून द्या, वैरण पाठवून द्या. एकना दोन हजार मागण्या ! त्या पुरवितां पुरवितां नाकीं नऊ येतात बुवा ! परवांच पत्र आलें होतें कीं दोनशें बेगार पाठवा. कुठले आणावयाचे ! आम्हीं नकार लिहिला ! म्हणून त्यांना थोडा घुस्सा आला यईना

ने०—( प्र० क० ) रामराम किल्लेदारसाहेब.

किल्ले—( उठून ) या नेताजी बुवा. तुम्हीं इकडे कुणीकडे वाट चुकलांत ?

ने०—आलों होतों झालें सहज तुम्हाकडेच.

किल्ले०—या बसा. ( बसवून ) कसें काय बरें चाललें आहेना ?

ने०— हो चालायला काय झालें ? चाललें आहे तें ठीकच. आपली घरची भाकरी खायची, आणि वरती यांच्या लाथा खायच्या, आणि त्यांचा जुलूमही मुकाट्यानें सहन करावयाचा ! हें सारें ठीकच !

कि०—त्याला काय इलाज ? तें तर आपल्या कपाळीं लिहिलेंच आहे. मी तर बुवा यांच्या त्रासला अगदीं कंटाळलें आहे. पण—

ने०—काय करावें हें नाहीं सुचत ! होयना ?

कि०—न सुचावयाला काय झालें ? सारें सुचतें पण त्यांची ताबेदारी पडलीना ?

ने०— इतका त्यांचा जुलुम सहन करून तुम्हीं त्यांची ताबेदारी पतकरतां ?

कि०—न पत्करून काय करायाचें !

[stamp]

ने०—करावयाला लागल्यावर मार्ग पुष्कळ आहेत.

कि०—म्हणजे ?

ने०—त्यांची ताबेदारी तोडून टाकावयाची असली तर पुष्कळ मार्ग आहेत.

कि०—तुम्हीं काय म्हणतां हें ? असें कसें करतां येईल ?

ने०—सगळें करतां येतें. ( हळूंच ) तुम्ही यांची ताबेदारी सोडा व हिंदवी स्वराज्याची पतकरा कीं त्यांत तुम्हाला त्रास नाहीं, दुःख नाहीं, जांच नाहीं, कांहीं नाहीं. उलटें आपलेंच स्वराज्य स्थापण्याचें श्रेय मिळेल ?

कि०—( हळूंच ) पण तसें केलें तर ते मला तोफेच्या तोंडीं देतील ना ? त्याची काय वाट ?

ने०—त्याची नको तुम्हाला काळजी. आम्ही ते पाहून घेऊं. किल्ला आमचे हवालीं करा, कीं झालें काम !

कि०—आणि मी काय करूं ? किल्ला तुमचे हवालीं करून मी झोळी घेऊं कीं काय ?

ने०—तसें नव्हे हो. आज तुम्हीं त्यांचे ताबेदार अहां ! किल्ला आह्मांला दिल्यावर हिंदवी स्वराज्याचे व्हाल ! एवढाच फरक ! तुमची किल्लेदारी आहे ती कायमच.

कि०— त्यांच्याशीं बेइमान होऊन मिळविलें काय ? तर किल्लेदारीच ना ? मग ती आहेच त्यासाठीं बेइमानी तरी कां ? आणखी धोका तरी कशाला ?

ने०—तुम्हाला त्याचा मोबदला मिळेल? मी महाराजांना सांगून तुम्हाला कांहीं तरी मिळवून देईन !

कि०—किल्ल्याखालच्या खेड्यांची देशमुखी द्याल ?

ने०—हो, हो, ती सुद्धां देववीन ! झालें ?

कि०—हा म्हणतो तसें झालें तर किती बरें छान होईल ? ( उघड ) ही तुमची खात्री आहे ना ?

ने०—अगदीं खात्री. त्याबद्दल शंकाच नको. शिवाजी महाराजावर तुमचा विश्वास आहे ना ?

कि०—छे. छे. त्या अवतारी पुरुषाबद्दल कोण अविश्वास धरील ?

ने०—मग ठरला बेत !

कि०—हो, पण उघड उघड किल्ला देण्याची छाती होत नाहीं बुवा ?

ने०—मग आम्हाला चोरवाटा दाखवा व दरवाजे उघडून द्या. आम्ही हल्ला करून किल्ला घेऊं.

कि०—ही युक्ति छान. चला तुम्ही. चोरवाटा दाखवितों.

ने०—चला. आजपासून आठव्या दिवशीं आम्ही हल्ल्याला येऊं. आधीं तुम्हाला सूचना पाठवूंच.

कि०—ठीक आहे. चला. ( जातात. )

## प्रवेश—दुसरा.

स्थळ—तोरणा किल्ल्याजवळचा पायथा.

( शिवाजी, तानाजी, नेताजी मावळे उभे आहेत. )

शि०—नेताजी, तुह्मी ही तुमची दोनशेंची टोळी घेऊन त्या पलीकडच्या बाजूला जा. आम्ही ही बाजू संभाळतो. तोफेची इशारत होतांच तुह्मी त्याबाजूनें दरवाजावर एकदम हल्ला चढवा. त्या तोफेबरोबर दार उघडण्याची सूचना किल्लेदारास दिलीच आहेना ?

ने०—होय. तोफेचा आवाज होतांच दार उघडेल.

शि०—कांहीं हरकत नाहीं. चला. तुम्ही जा. ( नेताजी मावळ्यासह जातो. ) तानाजी, तुम्ही उरलेले लोक गोळा करा. चला आपण या मुख्य दरजावर हल्ला करूं ह्मणजे झालें.

ता०—( बिगुल वाजवितो. ) शिपायांनो नीट समोर चला. अंधार आहे. पाहून चला. ( शिपाई पुढें व मागून तानाजी, बाजी व शिवाजी जातात. ) ( पडद्यांत तोफेचे बार होतात. लढाईचा सीन. ) ( किल्ल्यावरचे गडकरी व मावळे यांची लढाई होते. मावळे त्यांना मागें हटवितात. )

ता०—मर्दहो, हाणा, मारा. व्हा पुढें. ( लढत जातो. शत्रू पळूं लागतात. )

शि०— वाहवा, वाहवा. माझ्या आवडत्या मावळ्यांनो चला. व्हा. पुढें (लढत जातो.)

ता०— ( किल्ल्याच्या दरवाजावर जातो. मुसलमानांचें निशाण काढून फेंकतो. ) हें निशाण येथें राहण्याला लायक नाहीं. ( निशाण लावून ) येथें हें आमचें निशाण हवें. मर्द शिपायांनो झालें काम. पहा ! आमचें निशाण ! पहा !! पराक्रमी व यशस्वी श्रीशिवाजी महाराजांचें निशाण पहा ! ! ! किल्ला आमचा झाला.

शि०—शूर शिपायांनो, आतां थांबा व आपल्या समशेरी म्यानांत घाला.( लढाई थांबते ) झालें काम. शत्रू गेले, येथें एकही मुसलमान दिसत नाहीं.

शिपाई०—महाराज, मुसलमान शिपाई पळून गेले. हवालदार मात्र मरून पडला आहे. किल्लेदार येथेंच आहेत. येतील आतां महाराजांपाशीं. (किल्लेदार येतो.)

कि०—(मु०क०) महाराज, मी आपल्या पायापाशीं आश्रयाला आलों आहें.

शि०—कांहीं हरकत नाहीं जा.

ने०— ( हळूच ) आतां तुम्ही घरीं जा. मागाहून येऊन भेटा. जा. ( किल्लेदार जातो. )

शि०— तानाजी, नेताजी, आणि माझ्या आवडत्या मावळ्यांनों, तुमच्या मर्दुमकीनें आज हा किल्ला तर मिळालाच. असाच आपल्याला नेट धरला पाहिजे. आपल्याला स्वराज्य स्थापावयाचें आहे व मुसलमानांचें राज्य नाहींसें करावयाचें आहे. त्याला चांगली कंबर कसली पाहिजे. आपण भवानी मातेच्या कृपेनें त्या कामास सुरवात केलीच आहे. आणि तिच्याच कृपेनें आजचें हें यशही मिळविलें आहे. आपण आज हा तोरणा किल्ला जिंकून घेऊन ' स्वराज्याचें तोरण ' च बांधलें आहे. कार्य तर सारें पुढेंच आहे आणि तेंही श्रीभवानी मातेच्या कृपेनें आपण शेवटास नेऊं. आजचा हा विजय ' स्वराज्याचें तोरण ' या नांवानेंच प्रसिद्ध राहील. या शुभप्रसंगीं आपण त्या दयाघन परमेश्वराची प्रार्थना करूं या.

**स्तवन.**

**ईशा, सुखकर, क्लेशा संहर, जगदीशा ॥ ध्रु० ॥**
**स्वराज्य धामा दावि आम्हा ॥**
**सुखसंपदयुत करि या दीना ॥**
**जयजगदीश्वर ॥ ईशा० ॥ १ ॥**
**अज्ञाना या हनन करी ॥**
**ज्ञानानंदा वर्धन या जगिं ॥**
**दे परमेश्वर ॥ ईशा० ॥ २ ॥**
**अंतःकलहा दूर करी ॥**
**ऐक्यवर्धना बंधुजनीं या ॥**
**दे सर्वेश्वर ॥ ईशा ० ॥ ३ ॥**
**गोब्राम्हण प्रतिपालक जे ॥**
**त्या सुयशा दे ॥**
**भार हरण कर ॥ ईशा० ॥ ४ ॥**
**" श्रीशिवाजी महाराज की जय "**

( पडदा. )

**समाप्त.**


मुलांकरितां ] **पंचतंत्र** [ सचित्र !

संस्कृत पंचतंत्रांतील सर्व गोष्टीचें मराठी सुबोध भाषांतर केलें असून प्रत्येक गोष्टीस सुबक चित्र जोडलें आहे. एकंदर गोष्टी ५० असून चित्रेंही ५० आहेत. इसापनीतिप्रमाणेंच पंचतंत्रांतील गोष्टीही विशेष मनोरंजक असून बोधप्रदही आहेत. टाईप ग्रेट, कागद ग्लेझ, पृष्ठसंख्या ३५०. बाईंडिंग जाड पुठ्याचें, किं १०४ ट. ह. ०४ शिवाय. **म्यानेजर—चित्रशाळा प्रेस, पुणें.**

# माकडाचें प्रेम !

[ मागील अंकावरून पुढें चालू. ]

वर चढून एका दोरीनें मन्याला बांधलें व खालीं घेऊन आला. साहेब बहादुरांच्या बंगल्यावर व्हरांड्यांत मन्याजी बांधले गेले. त्याची स्वतंत्रता नष्ट झाली. संध्याकाळपर्यंत तो तसाच करुण स्वरानें कूं कूं करीत पडला होता. रात्र झाली, तेव्हां एक नोकर आला व मूठभर चणे मन्यापुढें टाकून तो चालता झाला. आतां मन्याच्या ध्यानांत हें स्थित्यंतर आलें. प्याला नाहीं, कांबळें नाहीं, बसायला नाहीं, जमीनी वर पडून अशा स्थितींत रात्र काढावी लागली. चण्याला तो शिवला देखिल नाहीं. कुठून फळें खायची बुद्धि झाली व या संकटांत पडलों असा पश्चात्ताप त्याला होऊं लागला. जीवनदासाच्या व म्हातारीच्या प्रेमाची त्याला आठवण होऊं लागली. ते बिचारे मला शोधीत फिरत असतील, पेल्यांत दूध भाकरी कालवून ' मन्या , ' मन्या ' म्हणून म्हातारी ओरडत असेल, हाय रे दैवा ! कुठल्या संकटांत मला आणून टाकलेस ? अशा रीतीनें रात्रभर त्याला झोंप आली नाहीं व खांबाभोंवतीं प्रदक्षणा त्याच्या चालू होत्या. साहेबबाहादुरांचा टॉमी कुत्रा सारखा त्याच्यावर गुरगुरे आणि भोंके यामुळें साहेबबहादुरांचा निद्राभंग होई. मन्याला त्या कुत्र्याचा असा राग येई कीं, हातांत सांपडलातर दहावीस चडकणा देऊन खोड जिरवून टाकावी, परंतु टॉमी हें ओळखूनच दूरून शौर्य गाजवीत होता.

उजाडल्याबरोबर साहेब बहदुरांनीं बाहेर येऊन दोन चार लाथा मन्याजीच्या कमरेंत हाणल्या. ' बदमाश ' रात्रभर ओरडून ओरडून माझ्या झोंपेचा सत्यानाश केलास. आज तर असा दंगा कर म्हणजे पहा बंदुकीनेंच उडवून देतों. ' असें म्हणून साहेब चालते झाले. परंतु मन्याचें दुर्दैव एवढ्यानेंच संपलें नव्हतें. शेजारपाजारचीं पोरें तेथें जमा होऊन कोणी त्यास दगड मारूं लागला तर कोणी खोटीच मिठाईची लालूच त्यास दाखवूं लागला. त्याचा रक्षक तेथें कोणी नव्हता. कोणालाही त्याची दया आली नाहीं. आत्मरक्षणाच्या सर्व चेष्टा त्यानें केल्या, सलाम केले, पूजा केली व इतर नकला केल्या. परंतु या नकलांचें बक्षीस त्या मुलांनीं त्याला अधिक अधिक त्रासाच्या रूपानें दिलें. बक्षीस मिळालें की, सर्व मुलें त्यास अधिक अधिकच त्रास देऊं लागलीं आज कोणी त्यास चणेही घातले नाहींत. घातले असते तरी तो त्यास शिवला नसता, कारण दुःखानें त्याची तहान भूक नाहींशी केली होती.

संध्याकाळीं शोध काढीत काढीत जीवनदास साहेबांच्या बंगल्यावर आला. त्याला पाहिल्या बरोबरच मन्या इतका अधीर झाला कीं, जणूकाय सांखळी तोडूनच तो आतां जीवनदासाला बिलगणार होता. जीवनदासानें मन्यास पोटाशीं धरलें आणि साहेब बहादुरांना म्हणाला " सरकार मनुष्यही चुका करतात मग हा तर बिचारा पशु आहे. हवीतर मला आपण शिक्षा करा पण या प्राण्याला सोडून द्या. सरकार, आमच्या पोटाचा हाच केवळ आसरा आहे याच्याशिवाय आम्ही दोघे उपाशीं मरून जाऊं. याला आम्ही पोटच्या गोळ्यापेक्षांही जास्त पाळला आहे. हा घरांतून नाहींसा झाल्या दिवसापासून माझ्या बायकोनें अन्न सोडून दिलें आहे हो ! एवढी दया करा सरकार, आपली बढती होईल. चारी मुलखांत आपलें नांव गाजेल. आपले शत्रु नाहींसे होतील. आपली कलम विजयी होईल. आपण आहात सुपूत, सदा रहा मजबूत, आपल्या

वैऱ्यांस खावो भूत. सरकार, करा एवढी दया " परंतु साहेबांनीं दयेचा धडा केव्हांच शिकलेला नव्हता. तो ओरडून म्हणाला, "चुप रहा पाजी माणसा. टिर पिर टिर पिर करून माझें डोकें सतावून सोडलें हरामखोरानें ! माकडाला मोकळा सोडून माझ्या बागेचा सत्यानाश करविला आणि आतां आला खुशामत करायला इथें. जाऊन पहा एकदा कशीं फळें नासून टाकलीं आहेत. जर हें माकड तुला परत हवें असेल तर दहा रुपये टाक आणि घेऊन जा. नाहींतर हा इथल्या इथें असा बांधलेला मरून जाईल."

जीवनदास बिचारा निराश होऊन रडत रडत चालता झाला. दहा रुपये आणायचे कुठले ? घरीं जाऊन त्यानें बायकोस सर्व मजकूर सांगितला. दगडी हृदयालाही पाझर फोडूं शकेन अशी म्हातारीला खात्री असल्यानें ती चेष्टेनें पतीला झिटकारून म्हणाली, 'कळला तुमचा पराक्रम. जाऊन तिथें कांहींतरी अडाण्यासारखें बोलला असाल. अहो, अंमलदार लोकांशीं फार अदबीनें व युक्तीनें पडतें घेऊन बोलावें लागतें. चला माझ्या बरोबर. पहा कशी माझ्या मन्याला मी सोडवितें.' असें म्हणून म्हातारी मन्याचा पेला, कांबळें वगैरे घेऊन साहेबांच्या बंगल्यावर आली. यावेळीं मन्यानें इतक्या जोरानें तिच्याकडे उडी मारली कीं खांब सुद्धां किंचित हलला. म्हातारी म्हणाली 'मायबाप आम्हीं तुमच्या दारीं भिक्षा मागायला आलों आहों. आम्हाला या माकडाची भिक्षा घाला.'

साहेब—भिक्षा घालणें आम्हीं पाप समजतों.

म्हातारी—आम्ही गांवोगांव फिरतों, आपलें यश चहुंकडे गाऊं.

साहेब—आम्ही यशाची पर्वा करीत नाहीं.

म्हातारी—ईश्वर आपणास बक्षीस देईल.

साहेब—ईश्वर हें कल्पनेचें भूत आहे.

म्हातारी—सरकार क्षमेचा महिमा मोठा आहे.

साहेब—आमच्या इथें दंडाचा महिमा मोठा आहे.

म्हातारी—सरकार आपण मोठे अधिकारी आहांत. न्याय देणें हें अधिकाऱ्यांचें कर्तव्य आहे. फळांकरितां आम्हां तीन जीवांची ताटातूट करून आमची हत्या घेऊं नका. न्याय देण्यांतच मोठ्यांचा मोठेपणा आहे.

साहेब—क्षमेनें अथवा न्यायानें आमचा मोठेपणा वाढत नाहीं. न्याय देणें आमचें काम नाहीं. आमचें काम मौज करणें आहे.

म्हातारीची एकही युक्ति त्या अहंकार मूर्तिपुढें चालली नाहीं. शेवटीं निराश होऊन ती म्हणाली. 'एवढ्या जिनसा तरी या माकडाला देऊन जाण्याविषयीं आम्हाला परवानगी द्या. या वस्तु त्याच्या जिवप्राण आहेत.

साहेब:—माझ्या बंगल्यावर हा केरकचरा ठेवायला जागा नाहीं.

म्हातारी निराश होऊन दुःखी मनानें चालती झाली

टामी कुत्र्यानें बघितलें कीं आपण इकडे या माकडाल चिडवितों, पण हा कांहीं करीत नाहीं. तेव्हां टामी शेफारले अणि त्याच्या अगदीं जवळ जाऊन भेकूं लागले. मन्यानें संधि साधून टामीचे दोन्ही कान पकडून असे दहावीस रपाटे ठेऊन दिले कीं टाम्या टैं टैं करीतच तेथून पळाला. टाम्याच्या आरडाओरडीनें साहेब बहादूर चवताळून बाहेर आले व त्यांनीं बुटाच्या ठोकरीनें मन्याजीस यथेच्छ बडविलें. एवढ्यानेंही राग जाईना. तेव्हां नोकरास फर्माविण्यांत आलें कीं, या बदमाश माकडास तीन दिवस बिलकुल खायला देऊं नये.

कर्मधर्मसंयोगानें त्याच दिवशीं एक सर्कस त्या गांवांत आली व खेळ करण्याची परवानगी मिळविण्यासाठीं मॅनेजर या पोलिस साहेबांजवळ आला. त्यानें मन्याची मूर्ति दीन झालेली पाहून सहज त्याच्या

पाठीवरून हात फिरविला. मन्याला मोठी आशा वाटून त्यानें लगेच आपल्या नकला दाखवून मॅनेजरला खुष करून टाकलें. मॅनेजरनें भरपूर किंमत देऊन मन्यास सर्कशींत जमा केलें. तेथें मन्यास फारच जाच होऊं लागून आगींतून सुटून फुफाट्यांत पडलों असें मन्याला होऊन गेलें. जीवनदासानें आपणांस नकला शिकवितांना इतका कडकपणा दाखविला नव्हता आणि येथें तर जरा चुकलें कीं चाबकाचा मार बसतो असें मन्याला अनुभवाला येऊं लागलें. तेथून निसटून घरीं जाण्याची संधि तो रात्रंदिवस पहात होता. असे तीन महिने निघून गेले. एके दिवशीं कांहीं आकस्मिक कारणानें सर्कशीच्या तंबूस आग लागली. खेळासाठीं मोकळे असलेल्या पशूंमध्यें मन्याही पिंजऱ्याबाहेरच मोकळा होता. आगीमुळें सर्वांची धांदल उडून जो तो आपला जीव घेऊन पळत सुटला. त्यांत मन्याही पळाला. मन्यानें सर्कशीच्या तंबूचें काय झालें हें मागें वळून पाहिलें देखील नाहीं. व तो उड्या मारीत मारीत मोठ्या उत्कंठेनें जीवनदासाच्या खोपटींत आला. पण तिथें काय होतें ? तीं सताड उघडीं होतीं. घरांत जीवनदास नव्हता किंवा बुधिया म्हातारीही नव्हती. बिचारा मन्या आतां मात्र अगदींच उघडा पडला.

पेठेंतल्या मुलांनीं ताबडतोब मन्याला ओळखून 'मन्या आला' 'मन्या आला' म्हणून चहूंकडे डांगोरा पिटला. मन्या, रोज त्या घरांत येऊन रात्रभर राही व दिवसभर जीवनदासाच्या किंवा म्हातारीच्या शोधार्थ बाहेर हिंडे व त्याच अवधींत कोणी कांहीं खायला दिलें तर आपलें पोट भरीत असे, दांडगाई करून कोणालाही तो त्रास देत नसे जन्मभर ज्यांनीं आपलें लालन-पालन केलें ते न दिसल्यामुळें दिवसें दिवस मन्या दीन व कृश होत चालला होता. त्याचा सर्व खेळकर स्वभाव नाहींसा झाला होता. रात्रींच्या शांत वेळीं मन्याचें दुःख कण्हण्याच्या रूपानें सर्वांनां नीट ऐकायला जाई. त्याला पाहून सहृदय माणसाच्या डोळ्याला टचकन पाणी येई. याप्रमाणें कित्येक महिने निघून गेले. एक दिवस मन्या एका घरावर बसला असतांना एक म्हातारी एक फाटके तुकडे कमरेला गुंडाळलेली व बाकी सर्व अंग उघडें, केंस पिंजारलेले अशी एकाद्या पिशाचिनी सारखी पुढें येत असून पुष्कळ मुलें 'वेडी म्हातारी' 'वेडी म्हातारी' असें म्हणून तिला चिडवीत आहेत असें त्याच्या दृष्टीस पडलें. मधून मधून 'मी वेडी नाहीं' असें म्हणून म्हातारी पुढें चालूं लागे. थोड्याच वेळानें ती एका दगडावर बसली व मला वेडी कां म्हणतां सांगा ' असें ती त्या मुलांना उद्देशून म्हणाली. तिला मुलांचा राग अगदीं येत नव्हता. ती हंसतही नव्हती किंवा रडतही नव्हती. कोणी खडे मारले तरी सहन करीत होती.

एका मुलानें विचारलें 'तूं लुगडें कां नेसली नाहींस ?'

म्हातारी—लुगडें कशाला बेटा हवें ? आज काल तर उन्हाळा आहे.

मुलगा—तुला लाज नाहीं वाटत, तूं अशी नागडी उघडी फिरतेस ती ?

म्हातारी:—लाज कशाला म्हणतात बेटा ! इतके साधु परमहंस नागडे फिरतात मग त्यांना कां तुम्ही दगड मारीत नाहीं ?

मुलगा:— ते पुरुष आहेत.

म्हातारी:—मग लाजलज्जा बायकांनाच हवी ? पुरुषांनीं नको का बाळगायला ?

मुलगा:—तुला कोणी कांहीं दिलें तर तूं खाऊन टाकतेस मग तूं वेडी नाहीं तर काय म्हणायचें ?

म्हातारी:—यांत वेडेपण काय झालें बेटा ? भूक लागली म्हणजे पोट कसें तरी भरतें ?

मुलगा:—कोणाच्याही हातचें खातांना तुला किळस नाहीं येत !

म्हातारी:—बेटा किळस कशाला म्हणतात ? मी विसरलें.

मुलगा:—तुला कोणी पैसा दिला किंवा कपडा दिला तर तूं तसाच टाकून कां जातेस ? यालाच वेड म्हणतात.

म्हातारी:—पैसा, कापड घेऊन मला काय करायचें आहे ?

मुलगा:—पैसा–कपड्यांचा लोभ सगळ्यांनाच असतो.

म्हातारी:—लोभ कशाला म्हणतात बेटा ?

मुलगा:—म्हणूनच तुला वेडी म्हणतात. तुला लाज नाहीं, विचार नाहीं, किळस नाहीं, लोभ नाहीं, अशानांच वेडी म्हणतात,

म्हातारी:—असें आहे तर मला वेडीच म्हणा.

मुलगा:—तुला राग कां येत नाहीं ?

म्हातारी:—काय सांगूं बेटा ? राग कशाला म्हणतात हें मी विसरलें. काय राग मनुष्याला येतो !

म्हातारीच्या या बोलण्यावर मुलें पुन: ‘ वेडी वेडी’ म्हणून तिच्या पाठीस लागलीं व म्हातारी मुकाट्यानें पुढें चालूं लागली. म्हातारी मन्या बसला होता त्या जागे-जवळ आल्याबरोबर मन्यानें एकदम तिला ओळखून तिच्या पायाला मिठी मारली. म्हातारीनें अकस्मात् भेटलेल्या मन्याला पहातांच तिचें देहभान परत आलें व तिनें मन्याला उचलून पोटाशीं कवटाळलें.

म्हातारी बुधिया देहभानावर आली, तेव्हां अर्थात् तिला आपल्या नग्नत्वाबद्दल लाज वाटायला लागली. लाजेनें ओशाळून ती एका मुलाला म्हणाली, मुलांनो मला कांहीं पाघरायला देतां कां ?

मुलगा—तुला तर लाज नाहीं ना ?

म्हातारी—आतां वाटूं लागली बेटा, कां तें कळत नाहीं.

मुलांनीं पुन: ‘ वेडी वेडी ’ म्हणून हलकल्लोळ केला म्हातारी चिडून आतां उलट दगड मारायला लागली.

एक मुलगा—तुला राग येत नव्हता नी आतां कसा आला ?

म्हातारी:—काय जणें बाळ, आतां राग कां येतो ? पण आतां मला वेडी म्हणूं नका. म्हणाल तर या मन्याकडून तुम्हाला चाववीन.

एका मुलाला दया येऊन त्यानें घरांतून एक फाटकें वस्त्र आणून तिला दिलें. म्हातारीनें तें नीट गुंडाळलें केंस सावरले. चेहऱ्यावर जी एक अमानुष भीषणता होती ती पार जाऊन तिचें दारुण चिंतेचें पिंवळेंपण दिसूं लागलें ?

मन्याला उराशीं धरून हुंदके देत रडत ती मन्याला म्हणूं लागली—“ माझ्या मन्या, बाळा कुठें गेला होतास ? अरे इतके दिवस आमची आठवण तुला कशी नाहीं झाली ? तुझा म्हातारा पालक तुझ्या वियोगानें हाय खाऊन मला टाकून गेला. मी भिक्षा मागून आपलें पोट भरतें आहे घरदार सर्व नष्ट झालें, बेटा, तूं जवळ होतास तोंवर खाण्यापिण्याची घराची सर्वच गोष्टींची इच्छा होत असे, परंतु तूं आम्हांला टाकून नाहींसा झाल्यापासून आमची भूक, तहान, इच्छा सर्व सर्व हरवलीं. तुझा म्हातारा मला, पण माझ्या डोळ्यांत टिपूसही आलें नाहीं. ते हांथरुणावर विव्हळत पडत, पण मी त्यांच्याजवळ क्षणभरही गेलें नाहीं इतकें मन दगडासारखें झालें होतें. यावरून त्यांचे औषधपाण्याचे हाल कसे झाले असतील ते एक देवच जाणे. तुझ्या दुःखानें बेफाम झाल्यानें मला वाटे ‘ हे माझे कोण? यांना मी औषध कां द्यावें ? ’ परंतु तुझ्या स्पर्शा-बरोबर मी भानावर आलें आणि मला आतां सर्व आठवूं लागलें. हाय हाय खरोखरच मी वेडी झालें होतें व मुलांचें मला ‘ वेडी ’ म्हणून चिडविणें योग्यच होतें. ”

असें म्हणून म्हातारी मन्याला घेऊन गांवाबहेर आली. एका मोठ्या झाडाखालीं तिचें रहाणें असे. बिचाऱ्या मन्याला किती दुःख होत होतें हें बारीक दृष्टीनें पहाणाऱ्याला त्याच्या दीन डोळ्यांतून मधून मधून आंसवें गळत होतीं त्यावरून ओळखतां आलें असतें. मन्या बुधिया म्हातारीची माणसाप्रमाणेंच सेवा

करूं लागला. सकाळीं उठून तो गांवात जाई व जीवन-दासानें शिकविलेल्या नकला तसेंच सर्कशींत शिकलेल्या नव्या नकला करून तो भरपूर खाणें मिळवून आणी. प्रत्यक्ष मुलगाही इतकी सेवा करणार नाहीं इतकी मन्या माकड म्हातारीची करीत असे. त्याच्या नकलांवर खूष होऊन व त्याच्या मानवी व्यवहारावर विश्वासून लोक त्याला खाद्य,वस्तू बरोबर कधीं कधीं पैसेही देऊं लागले होते, यामुळें म्हातारीच्या सर्व गरजा चांगल्या रीतीनें भागूं लागल्या.

मन्या माकडाचें म्हातारीवर असलेलें हें कल्पनातीत प्रेम पाहून व तो मनुष्याप्रमाणें करीत असलेली म्हातारीची सेवा पाहून लोक म्हणत ' हा माकड नसून कोणी तरी वानरदेही देवता म्हातारीचें रक्षण करीत आहे. धन्य हें माकडाचें प्रेम ! '

---

# सील.

हिंदुस्थानांत रहाणाऱ्या लोकांना इतर प्रांतांत कोणते प्राणी रहातात, त्यांच्या संवयी काय असतात, त्यांचा उपयोग काय होतो वगैरेंबद्दल फारशी माहिति नसते. अशा एका प्राण्यासंबंधीं अल्पशी माहिती करून द्यावयाची आहे. सीलच्या दोन जाती आहेत पहिल्या जातीला कान असतात त्याला पाणअस्वल किंवा पाणसिंह म्हणतात. दुसऱ्या सिलला कान नसतात. हे बिन कानाचे सिलच खरे सील होत. हा प्राणी सरपटत चालतो. खरा सील हा पाण्याला सरावलेला असतो. लोक त्यांचा पाठलाग कातडीकरितां व तेलाकरितां करतात. त्याच्या कातडीचे बूट फार चांगले होतात. ह्या प्राण्याची वस्ती थंड व समशीतोष्ण प्रदेशांत असते. परंतु तो बहुत करून उत्तरेकडील प्रदेशांत सांपडतो. कांहीं सील



फार दूरवर प्रवास करतात. उत्तरेस थंडी पुष्कळ पडूं लागली म्हणजे हा दक्षिणेकडे जातो. ते मासे खातात. हे नरमांस भक्षकहि आहेत. त्याची लांबी पांच सहा फूट असते. बहुत करून हा प्राणी किनाऱ्यावर राहतो, हा समुद्रकांठीं वाळूंत उन खात पडतो. हा प्राणी फार बुद्धिमान असतो. त्यांतील एक जात फार लवकर माणसाळते. या दोन जातीशिवाय करडा, हत्ती, संन्याशी वगैरे जातीहि याच्या आहेत.





आपण माकडांची जशी चेष्टा करतो, तशीच चेष्टा तिकडे सीलची करितात. सील हा निरुपद्रवी प्राणी आहे तो अत्यंत लाजाळू आहे. एखादा माणूस त्याच्या जवळ गेला, तर तो ताबडतोब पाण्यांत बुडी मारतो.

एकदां एका सीलची खालील गमतीची हकीगत घडली एक जहाज समुद्र किनाऱ्यावर उभें होतें. त्या जहाजाचा पुढचा भाग अगदीं वाळू जवळ टेंकला होता नावाडी इकडे तिकडे सिलच्या चेष्टा करीत, त्यांना खेळवीत उभे होते. इतक्यांत एक लहान सील त्या जहाजावर जाऊन बसला. लोकांना याचें काय करावें हें समजेना. त्याला घालवून दिलें तरी पंचाईत आणि ठेवलें तरी पंचाईत; परंतु इतक्यांत जहाज हांकारण्याची एकदम सूचना झाली व सिल वर तसाच राहिला.

प्रथम तो तसाच गुपचुप होता पुढें जहाजाच्या हेलकाव्यामुळें, त्याला त्रास होऊं लागला. तो मोठमोठ्यानें ओरडूं लागला, व पळून जाण्याचा प्रयत्न करूं लागला. परंतु जहाज खोल समुद्रांत असल्यामुळें त्याला त्यांनीं सोडलें नाहीं. खलाशांनीं त्यांला बसण्याकरितां मऊ जागा वगैरे करून दिली आणि तो नंतर स्वस्थ पडून राहिला. पुढें जहाज सुरक्षितपणें किनाऱ्याला लागलें.

कांहीं दिवस गेल्यावर, खलाशांनीं त्याला सोडून देण्याचें ठरविलें. त्यांनीं ज्या ठिकाणीं तो जहाजावर चढला होता, त्याठिकाणीं त्याला नेऊन सोडावें म्हणून दुसऱ्या एका जहाजाबरोबर पाठवून दिलें. त्या खलाशांनीं त्याला बंधमुक्त केलें. सीलला मोठा

आनंद झाला. तो नाचू बागडू लागला व उड्या मारूं लागला. तो बराच वेळ पाण्यांत पोहोला, जमीनविर जाऊन पडला आणि पुनः जहाजावर येऊन बसला. एखाद्या कुत्र्याप्रमाणें तो माणसाळला. जहाजावर आल्यावर त्यानें आपली बैठक गांठली. त्याला पुढें जेवण देण्यांत आलें व तो झोपीं गेला.

त्या दिवसापासून तो खलाशांचें खेळणें बनला. तो त्यांच्याबरोबर पोहत असे व फिरावयास जात असे.

ही गोष्ट चहूंकडे फैलावली. सीलला पकडल्याचें वृत्त ऐकून एक प्राणीसंग्रहालयांतिल व्यवस्थापक यांच्याकडे आला व तो सील संग्रहालयांत ठेवण्यास मागूं लागला. असा सीलप्राणी जगांत अद्यापपर्यंत सांपडला नाहीं वगैरे हकिकत तो सांगूं लागला.

अखेरीस, मोठ्या नाखुषीनें खलाशांनीं तो सील देण्याचें कबूल केलें. परंतु ज्या दिवशीं त्याला न्यावयाचें, त्या दिवशींच तो मरण पावला. त्याला खलाशांनीं पुष्कळ खावयाला घातल्यामुळें तो मेला. त्याच्याबद्दल त्यांना फार हळ हळ वाटली. पुढें त्या सीलच्या शरीरांत भुसा भरून त्याला संग्रहालयांत ठेवण्यांत आलें.

---

## उपदेशामृत बिंदू

ले०—कृ० रा० केळकर भिलवडीकर, शेणोली (सातारा.)

जें कधीं घडणार नाहीं, तें खरोखरच होईल, असें समजून त्याची उगीच आशा किंवा भय बाळगणें व्यर्थ आहे.

असा कोणीही नाहीं कीं, ज्याच्या कल्पनेची सत्ता विवेचन शक्तीवर कधींच बसत नाहीं; व ज्याचे विचार स्वेच्छेप्रमाणें उत्पन्न होतात व जातात.

मनोराज्य प्रथमारंभीं असत्य भासतें पण तें वरचेवर मनांत आणल्यानें हळूहळू खरेंही भासूं लागतें; पण तें मनोराज्यच !

मातेला पुत्रकीर्ति, पत्नीला पतिप्रतिष्ठा, मित्राला मित्रोत्कर्ष, पित्याला आज्ञाधारक मुलें, यांपासून संतोष होतो.

तारुण्यांत पुढील सुखाची आशा व पुष्कळ दिवस वांचण्याचा भरंवसा असल्यामुळें स्वतःच्या प्रशंसेंत सुख वाटत असतें.

दुसऱ्यास ठकविण्याच्या दुर्गुणामुळें विश्वास उडून जातो, व परोपकारबुद्धि नाहींशी होते.

भूतपिशाच्चांची भीति बाळगणारा मनुष्य उजेडांत स्वस्थ असतांना, "अंधारांत भय कशाचें वाटतें ?" याचें आश्चर्य करीत बसतो. पण उजेड नाहींसा होतांच त्याला तींच भयें पुन्हा वाटूं लागतात.

बरें होण्यास कठीण अशा विकारांत कल्पनेसारखा दुसरा विकार नाहीं.

मनांत वेळोवेळीं उत्पन्न होणाऱ्या संशयाचें निरसन करण्यांत काळ न घालवितां तेंच मन दुसऱ्या कृत्यांत गुंतवावें, अगर खरें ज्ञान दृढ करीत असावें.

उदास मनुष्यास आपलीं दुःखें दुसऱ्यास सांगण्यास त्रास वाटतो. म्हणून तीं सांगण्याविषयीं त्याच्या मागें लागूं नये.

आहे त्या स्थितींत समाधान मानावें कारण एका

स्थितातून दुसऱ्या स्थितींत गेलें तरी तिसऱ्या स्थितीची इच्छा असतेच.

दारिद्र्यादि दुःखें आपोआप प्राप्त होत असतात, तीं दुसऱ्यांनीं देऊन येत नाहींत.

वेडगळ चालींचीं कारणें पाहूं जाण्यांत अर्थ नाहीं, कारण त्या चाली समजुतीनें काढलेल्या नसल्यामुळें त्यांचीं योग्य कारणें कशीं सांपडणार ?

योग्यरीतीनें वागत असतां त्याचे जे परिणाम आपणास भोगावे लागतात, त्याची जबाबदारी आपणावर नाहीं तर ती, ते नियम करणाराकडे आहे.

ईश्वरानें घालून दिलेल्या नियमांस सोडून सुख मिळविण्याचा प्रयत्न करणें म्हणजे ईश्वराच्या अगाध कर्तृत्वापुढें स्वतःच्या क्षुल्लक शहाणपणाचा दिमाख दाखविणें होय

मन हें नेहमीं भावी स्थितीच्या विचारांत किंवा भूतस्थितीच्या आठवणींत गुंग राहून उपयोगी नाहीं, तर त्यानें विद्यमान स्थितीची भूतस्थितीशीं तुलना करून भावी स्थितीचें अनुमान करीत जावें.

सृष्टिकर्त्यानें जें दिलें नाहीं, तें साध्य करण्याविषयीं जो झटतो, त्यास त्या यत्नांत यश कोठून येणार ?

उपभोगाची आसक्ति वाढविणें, याचेंच नांव व्यभिचार.

आपल्या माणसाची योग्यता आपणच ओळखली पाहिजे, त्याच्याकडे इतरांनीं लक्ष काय म्हणून द्यावें ?

देशाची सेवा करण्यास, लायक होण्यास आरंभीं मनाची एकाग्रता व बुद्धिमत्ता वाढविणें, हे दोन उपाय जरूर आहेत.

केवळ बुद्धीचा उत्कर्ष म्हणजे कांहीं मनुष्य स्वभावाचें पूर्णत्व नव्हे. तर मनोभावना व इच्छाशक्तियुक्त शील सुधारलें पाहिजे.

द्रव्य मिळाल्यास आनंद होईल हें खरें, पण त्यांपासून सुख होऊन भरभराट होईलच असें निश्चयानें सांगवत नाहीं.

असाधारण, स्वार्थत्याग व साधनसंपदा यांचा जेथें स्पृहणीय संगम झाला, तेथें यशःसिद्धिविषयीं काळजी मुळींच करावयास नको.

आपत्तीमुळें महत्त्वाकांक्षेचा संताप होऊन द्वेषाग्नि अधिक भडकतो.

स्वधर्माचा व स्वसंस्कृतीचा अपमृत्यू पाहणें नको असेल तर जुन्या समजुती सोडून संघटित प्रयत्न केला पाहिजे.

द्रव्याच्या लालचीनें परधर्मांत शिरून अर्थदास झालेले लोक मेले वा जगले काय सारखेंच. त्यांच्या बुद्धिचांचल्यानें मत्स्याइतकें धर्माचें जीवित चंचल नाहीं.

अज्ञान व अशिक्षित लोकांच्या बाजार-भरतीपेक्षां सुसंस्कृत व सुविद्य लोक थोडे असले तरी फार चांगलें समजावें.

केव्हातरी डळमळणारी अंधश्रद्धा कोणत्याही धर्माला आधार होऊन बसणें हें त्या धर्मांच्या अस्तित्वाला अत्यंत घातक आहे.

कार्यांत सवड उत्पन्न झाल्यानें मनुष्य टाळाटाळीच्या मार्गास लागून अखेरीस कांहींही न करण्याच्या स्थितींत येतो.

आपल्याकडून जो अविचार घडला तो प्रत्येकाकडून घडावा म्हणून प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष रीतीनें धडपड करणें हें अत्यंत वाईट आहे.

अमूक केलें कीं अमूक मिळतें ही कल्पना आंगीं पूर्ण खिळल्यानें निरपेक्ष रीतीनें एखादें सत्कृत्य करण्याची संवय अंगीं राहात नाहीं.

ज्याला स्वहित साधतां आलें तोच दुसऱ्याचें हित करूं शकेल ?

( अपूर्ण )

# दुधाचे २५ प्रकार.



१ गोंठलेलें दूध. २ दुधाची अकुटी. ३ लोणी. ४ खवा. ५ आईस्क्रीम. ६ दुधाची साखर. ७ रंग ८ सिमींट ९. चष्म्याचें घर. १० सुयांचा दांडा. ११ कागदी सुरी. १२ फणी. १३ पेन्सिलीचें घर. १४ आंकडे. १५ पंखा. १६ विणण्याच्या सुया १७ चष्म्याचें झांकण १८ कडक कॉलर, १९ पत्राचें झांकण. २० घंटेचें बटन. २१ बटनें. २२ टांक. २३ कागदी मलमपट्या. २४ डांक. २५ पॉवरची पेटी.

# नारळ कुठें गेले !




काय सुंदर नारळ हे !





चला काढूं या !



वर्तमानपत्रांत पावसाची बातमी.



आलेच पावसाचे थेंब



कुठें गेले सारे नारळ ?



बाबांनीं किती नारळ आणले हे, आतां चांगलो बर्फी होईल !

# ब्लेस पास्कॉल.

पास्कॉल हा मोठा शास्त्रज्ञ होता. याचा जन्म शेक्सपिअरच्या मृत्यूनंतर झाला. तो ज्या काळीं जन्मास आला, तो काळ अत्यंत उज्वल होता. मोठमोठे विद्वान त्या काळीं जन्मास येत होते. सृष्टीचें कोडें उलगडण्याचा प्रत्येक जण यथामती प्रयत्न करीत होता. याला आधुनिक शास्त्रांचा व फ्रान्सच्या तत्त्वज्ञानाचा पिता म्हणून संबोधितात.

त्याच्यां कांहीं चरीत्रामध्यें पास्कॉल हा जन्मतांच म्हातारा मनुष्य झाला असें वर्णन आहे. किंचित् श्रम झाले कीं, तो थकून जाई. सुंदर सुंदर फुलें त्यांनीं हातांत घेतलीं कीं, तीं सुकून जात. खेळाचें नांव काढलें कीं, तो भयानें गोंधळून जाई. प्रत्येक गोष्ट त्याला दुःखमय वाटत असे. तथापि या दुःखमय वाटणाऱ्या गोष्टींनींच त्याला संपूर्ण वैभवाला चढविलें. हा मुलगा प्रसिद्धीस कसा आला हें आपण पाहूं..



याचा जन्म १९ जून १६२३ सालीं झाला. त्याचा बाप मॅजिस्ट्रेट होता. त्याची आई दानधर्मांत मोठी शूर होती. ब्लेस पांच वर्षांचा असतांच त्याची आई मरण पावली. त्याला दोन बहिणी होत्या व त्याहि तितक्याच हुशार होत्या. त्याच्या बापाला आपल्या घराण्याचा मोठा अभिमान वाटे. त्यांनीं आपली नोकरी सोडली व तो पॅरिसला येऊन राहिला. तो आपल्या मुलांना स्वतःच शिक्षण देई. लहानपणीं हें मूल बापाला " हें असें कां?" वगैरे प्रश्न विचारून अगदीं भंडावून सोडी. एखादें भांडें जमीनीवर आपटलें तर त्याचा प्रतिध्वनी उमटे; परंतु भांड्याला हात लावतांच तो ध्वनी थांबे. एवढा आवाज कां होतो हें त्याला समजेना. त्यांनीं हा प्रयोग चालू ठेवला. त्यांनीं निरनिराळे आवाज उत्पन्न करून त्यांचें सूक्ष्म निरीक्षण केलें; आणि त्यावर एक मोठा निबंध लिहिला. त्या वेळीं त्यांचें वय अवघें १२ वर्षांचें होतें.

तो निबंध हरवला आहे. निबंध कितीहि कमी योग्यतेचा असला तरी त्याला निबंध लिहिण्याची इच्छा झाली, या एकाच गोष्टीवरून हा मोठा माणूस होणार या बद्दल संशय नव्हता. त्याच वेळीं त्यांनीं एका तीकोनाच्या कोनाची बेरीज किती होते हें शोधून काढले. परंतु आपला मुलगा एवढ्या वयातच गणितांत शिरला तर तो लॅटीन ग्रीक वगैरे भाषाकडे दुर्लक्ष करील, असें वाटून बापानें त्याला गणीताचा वासहि येऊं दिला नाहीं. परंतु त्यामुळेंच पास्कॉलची जिज्ञासा वाढली. तो बापाला म्हणे " पण बाबा गणीत म्हणजे काय, तें तर मला सांगा" त्यावर बाप म्हणाला " गणीत म्हणजे आकृत्या काढणें व त्यांच्यामधील अंतर मोजणें होय. पण तूं या बद्दल मला पुनः विचारूं नकोस."

गणित म्हणजे बिनचूक आकृत्या काढणें होय असें लहान्या पास्कॉलला कळतांच तो आपल्या खोलींत एकटा बसूं लागला. तो एक कोळसा घेई व जमीनीवर तीकोन, वर्तुळ व दुसऱ्या आकृत्या काढी. त्याल,

ह्या आकृत्यांना काय नांवें द्यावींत हें ठाऊक नसे. त्यामुळें तो वर्तुळाला कडें म्हणे व सरळ रेघेला गज म्हणे. नंतर त्यांनीं त्यावरून स्वयंसिद्ध गोष्टी बसविल्या व तो बिनचूक आकृत्या काढूं लागला.

भूमीतीमध्यें एक सिद्धान्त सुटला म्हणजे दुसरे सुटूं लागतात. त्यामुळें ह्या जिज्ञासु मुलानें भूमीतीमध्यें फारच पुढें उड्या मारल्या. त्याच्या बुद्धीमत्तेमुळें व दीर्घोद्योगामुळें बाराव्या वर्षींच त्यांनीं साऱ्या भूमतीचें पुनः संशोधन केलें. या काळांतच त्याचा बाप एकदां त्याच्या खोलींत आला. मुलगा आपल्या विचारांत इतका गढून गेला होता कीं, कोण आलें याची त्याला शुद्ध नव्हती.

मुलांनीं जेव्हां आपण काय करतो हें बापाला समजावून सांगितलें तेव्हां बाप आश्चर्यचकीतच झाला. मुलगा युक्लीडचा ३२ वा सिद्धांत मांडीत आहे हें बापाला कळतांच तो फार घाबरला. तो आपल्या मुलाच्या या अलौकिक बुद्धिमत्तेबद्दल रडत बसला.

युक्लीडचें पुस्तक त्याच्यापासून लपवून ठेऊन चालणार नाहीं, असें पाहून तें पुस्तक त्याला देण्यांत आलें. १६ व्या वर्षीं या पास्कालनें कॉनीक सेकशन्स वर एक निबंध लिहिला. कॉनीक सेकशन्स हा गणीतांतील कठीण भाग आहे, व तो वरिष्ट दर्जाचे गणितांत येतो. हा त्याचा निबंध पाहून सर्व गणितशास्त्रज्ञ घाबरून गेले. त्यावेळेपर्यंत या विषयावर कोणीं इतका शोध लावला नव्हता.

त्याच्या बापाला आपल्या पैशाची व्यवस्था नीट लावतां येत नव्हती. त्यामुळें तो दरिद्री झाला आणि पुनः नोकरी करूं लागला. १३ व्या लुईनें त्याला पुनः एक चांगली अधिकाराची जागा दिली व सारें कुटुंब रूनला गेलें.

रून शहरीं पास्कॉलच्या बुद्धिमत्तेला पुष्कळ वाव मिळाला. त्यानीं आपल्या बापाचें बेरजा करण्याचें काम सोपें व्हावें म्हणून एक यंत्र काढलें. ह्यांत त्याचें तीन महिने गेले आणि हें यंत्र फारच चांगलें काम देऊं लागलें. नंतर त्यांनीं बॅरोमिटर ( वायुमापक यंत्र) विषयीं ऐकलें. तो त्याचा अभ्यास करूं लागला. पहिल्या प्रयोगानंतर पारा चढण्याचा त्यांनीं हवेच्या दाबाशीं संबंध जोडला नाहीं. गॅलीलीओप्रमाणें पोकळीला सृष्टी अडथळा करते असें म्हणून त्यांनीं आपलें म्हणणें मांडलें. टोरीसेलो नांवाचा शास्त्रज्ञ त्याच्या पुढें गेला होता. त्यांनीं हवेच्या दाबामुळें पारा खालीं वर होतो असें शोधून काढलें होतें. परंतु शास्त्रज्ञांना तो काळ प्रतिकूळ असल्यामुळें त्यांनीं आपलें म्हणणें गुप्त ठेवलें. पास्कॉलनें टोरीसिलीची उपपत्ती ऐकली होती. परंतु त्याचा त्यावर विश्वास बसेना, म्हणून त्यांनीं नवा शोध लावण्याचा प्रयत्न केला. तो म्हणे आपण जस जसे वर जातों तस तसा हवेचा दाब कमी होतो. परंतु कांहीं जण म्हणूं लागले कीं, कांचेची नळी उघड्या हवेंत ज्या नियमांनीं बद्ध झालेली आहे, त्याच नियमांनीं बंद केलेल्या खोलींतली नळीहि बद्ध झालेली असते. परंतु खोलींतला हवेचा दाब तीवरच्या छतानें मर्यादीत केली असल्यामुळें कमी असतो. तेव्हां हा पास्कॉलचा सिद्धांत खरा कसा ? नंतर पास्कॉलनें नवा शोध लावला. तो म्हणाला "क्षीतीजाशीं समांतर असलेल्या भागांत दाबसर्वत्र सारखाच असतो, त्यामुळें माझा सिद्धांत बरोबर आहे."

यानंतर त्यांनीं दुसरा शोध लावला. तो पातळ पदार्थांचा त्यांच्या बाजूवर पडणाऱ्या दाबासंबंधीं होता. या सिद्धांतानें पास्कॉलची अजरामर किर्ती झाली.

पास्कॉल म्हणे एक पाणी भरलेलें भांडें घेतलें व त्याचें तोंड बंद केलें आणि त्याला दोन भोंकें पाडलीं असें समजा. एक भोंक दुसऱ्या भोंकापेक्षां शंभर पट मोठें असावें, आणि या प्रत्येक छिद्रांत एक एक दांडा असावा. नंतर जर त्या मोठ्या भोंकाजवळ शंभर माणसें काम करूं लागलीं व धाकट्या भोंकाजवळ एकच माणूस असला, तर तो एकटा माणूस या

शंभर माणसांइतकें काम करील. तेव्हां पास्कॉल म्हणाला "हें बंद केलेल्या पाण्याचें तत्त्व नवें आहे आणि या तत्त्वानें एका माणसाला वाटेल तेवढें पाणी वर काढतां येईल." मोकळी विहीर व बंद केलेला पंप या दोहोंतून वर पाणी काढावयाचे आहे असें समजा. एकटा माणूस जितकें पाणी वर काढूं शकेल तितकेंच पाणी पुष्कळ माणसें विहिरींतून पाणी काढतील. हें त्यांचेंच तत्त्व आहे. पास्कॉलच्या पूर्वी एक दांडा लावून पाणी काढीत असत. आपल्या इकडील खेडे-गांवांत असें पाणी काढतात. इजिप्शीअन लोकांनीं पास्कॉलच्या पूर्वींच हें तत्त्व शोधून काढलें होतें. परंतु पास्कॉलला त्यांचा शोध माहीत नव्हता. त्यामुळें त्यांच्या शोधांत नावीन्य आहे.

आतां त्याचें वय २८ वर्षांचें झालें. या वर्षीं त्याचा बाप वारला व बहीण जोगीण बनली. त्याच्यावरहि एक संकट आलें. एका गाडीच्या अपघातांतून त्याचा जीव बचावला. त्या दिवसापासून तो विरक्त बनला. आयुष्य किती क्षणभंगुर आहे याची त्याला कल्पना आली; आणि यापुढें आपणहि आपल्या बहिणीप्रमाणें ईश्वराकडे लक्ष वळवावें असें त्याला वाटूं लागलें. एकांत त्याला प्रिय झाला. तो कोणाला भेटेना व बायबल शिवाय कांहीं वाचीना. पुस्तकाची जरूर अशी त्याला कधीं नव्हतीच. या पुस्तककर्त्याला पुस्तकें काय शिकविणार? त्यांनीं कधींच पुस्तकें वाचलीं नाहींत. तो शोध लावी. त्यांनीं धर्मावर कांहीं ग्रंथ लिहिले. मधून मधून कंटाळा आला म्हणजे तो गणिताकडे वळे. परंतु तो अशक्त बनत चालला. डॉक्टर्सनीं त्याला मेंदूचें कोणतेंही काम करावयाचें नाहीं अशी सक्त ताकीद दिली. त्याची स्मरणशक्ती व बुद्धि मंदावूं लागली. तो एखाद्या साधूप्रमाणें राहूं लागला. कधीं कधीं आपण कांहीं लिहावें असें त्याला वाटे. तो कागदाच्या तुकड्यावर अगर सद्याच्या बाहीवर लिही. त्याला कांहींहि लिहावयाला चाले. परंतु त्याचें लिहिणें म्हणजे वेदवाक्याप्रमाणें असे. दोन वर्षांच्या विश्रांती-नंतर पास्कॉल पारिस शहरीं मरण पावला. त्याच्या मित्रांनीं त्यांनीं लिहिलेले सारें कागदपत्र एक करून त्यांचें पुस्तक बांधविलें. हें पुस्तक फ्रान्सच्या लाय-ब्ररींत अद्याप आहे, व त्याच्या अनेक आवृत्त्या छापून निघाल्या आहेत.

पास्कॉलचें नांव साऱ्या जगभर प्रसिद्ध आहे. शास्त्रवेत्ते, भाविक, तत्त्वज्ञानी वगैरे सर्व लोक पास्कॉ-लच्या बुद्धिमत्तेची सर्वत्र वाहवा करीत आहेत.

विद्याधर वामन भिडे यांचें

# अर्थालंकारांचें निरूपण.

किंमत १ रुपया. म्यानेजर—चित्रशाळा प्रेस, पुणें.

# कांट्यानें कांटा निघतो.

लेखक – श्री निवास विनायक गोरे.

यम्या, शिव्या आणि दगडू या नांवाचे तीन रामोशी चोर होते. चौर्यकर्मात यम्या पूर्णपणें निष्णात होता. शिव्या कदाचित् कांकणभर कमी असेल नसेल; दगडू चतुर होता. परंतु संधि असेल तेव्हांच त्याचें चातुर्य दिसत असे. यम्या व शिव्या-प्रमाणें तो धाडसी नव्हता. एके दिवशीं जंगलांत भटकत असतां एका बुलबुल पक्ष्याचें घरटें यम्याच्या दृष्टीस पडलें. त्यानें झाडावर चढून पाहिलें तों अंडीं फुटण्याच्या बेतांत आलेलीं दिसलीं. यम्याच्या मनांत एकाएकीं एक कल्पना येऊन तो आपल्या सोबत्याकडे वळून म्हणाला ‘ दोस्त, या पक्ष्याला नकळत घर-ट्यांतील अंडीं जो काढून आणील त्याला मी आपल्या कलेंत हुशार समजेन ’

‘ हें काम एकच इसम करूं जाणें !’ शिव्या म्हणाला:— ‘ आणि तो इसम तुमच्या डोळ्यांपुढेंच उभा आहे ’, असें म्हणून यम्या भराभरा झाडावर चढला. त्यानें मोठ्या चातुर्यानें घरट्याखालच्या भागांतून वर जाणारें भोंक शस्त्रानें पोखरून तयार केलें आणि त्या पक्ष्याला न कळत खालच्या खालींच तीं अंडीं यम्यानें काढून घेतलीं. यम्याचें तें चातुर्य पाहून त्याचे सोबती म्हणाले—‘ यमाजी, या कामांत तुमची बरोबरी कुठल्याही चोराला करतां येणार नाहीं अशी माझी खात्री आहे. परतु हें काम पुरें करून टाका. जशीं तीं अंडीं काढून आणलीत तशीं ती जागच्या-जागीं बुलबुलाला न कळत पुन: ठेऊन याल तरच काम सोळा आणे झालें असें आम्ही समजूं ’ हें ऐकून यम्या इर्षेला चढला व पुन: तो झाडावर चढूं लागला. शिव्याला वाटलें आपणही आपलें कौशल्य यम्याला दाखवावें म्हणून तो यम्याच्या मागोमाग झाडावर चढला. यम्याचें चित्त सारें आपल्या कामांत लागलें होतें. शिव्यानें छायेसारखा त्याचे मागून जाऊन यम्याला नकळत त्याच्या कमरेपासून रुपयांचा कसा काढून घेतला. इकडे यम्या तीं अंडीं जागच्याजागीं ठेऊन परत फिरण्याच्या आधींच शिव्या शांतपणें आपल्या जागीं येऊन उभा राहिला. यम्या मोठ्या डौलानें म्हणूं लागला ‘ कां, माझ्या सारख्या चतुर माणसाला जगांत कुठेंतरी कमी पडेल काय ? ’ ‘ अलबत पडणार नाहीं पण त्याला तें द्रव्य संभाळ-ण्याची अक्कल शिकावी लागेल ’ असें म्हणून शिव्यानें रुपयाचा कसा हातांत खेळवीत यम्याच्या भांबाव-लेल्या चेहऱ्याकडे पाहिलें.

या दोघा चोरांचे अद्‌भुत कौशल्य पाहून दगडू मनांत फार खट्टू झाला व तो त्या दोघांस म्हणाला ‘ गड्यांनो, जों जों मला अनुभव येत आहे तों तों मला वाटूं लागलें आहे कीं या धंद्यांत मला कधींच बरकत येणार नाहीं. त्यापेक्षां मी मोलमजूरी करून अथवा इतर साधनांनीं पण प्रामाणिकपणानें आपला

चरितार्थ चालविला तर मला त्यांत सुख होईल. तुमची परवानगी असल्यास मी आपला घरीं जातों कसा.'

दगडू आपल्या गांवीं आला. चोरीचा धंदा सोडल्याचें ऐकून त्याच्या बायकोस फार आनंद झाला. दगडूनें मेहनत करून आपला चरितार्थ तर चालविलाच पण त्या गांवांतील चार सुखी जोडप्यांमध्यें त्याची गणना होऊं लागली लवकरच दिवाळी आली. दिवाळीचे चार दिवस गोडधोड पक्वानें खाऊन आनंदानें साजरे करावे म्हणून दगडूनें व त्याच्या बायकोनें पुष्कळ पदार्थ तयार केले होते.

एके दिवशीं दगडू कामावरून संध्याकाळीं परत आला तों त्याची बायको किंचित् घाबरलेली त्याला दिसली. कारण विचारतां ती म्हणाली ' आज दोघेजण भिकारडे व हिडिस दिसणारे असे इसम आले होते व ते सारखे आपल्या झोंपडीच्या आसपास टेहळणी करीत होते. मग काय त्यांच्या मनांत होतें देव जाणें. मला भय वाटतें ' दगडूनें सर्व हकीकत समजून घेतल्यावर मनांशीं कयास बांधला कीं दिवाळीच्या दिवसांत आपणांसही यथेच्छ गोडधड खायला मिळावें या आशेनें यम्या आणि शिव्या गांवांत आले असून ते आपल्या घरावर टेहळणी करीत होते. करंज्या लाडवांचा डबा चोरून न्यायचा त्यांचा विचार आहे हें दगडूनें मनांत पक्कें ओळखून, ते कोण होते व कां आले होते हें आपल्या बायकोस सांगितलें. ' आपण तो डबा मुळीं शिंक्यावर न ठेवतां एकाद्या कपड्याप्रमाणें गाठोड्यांत गुंडाळून ठेवूं म्हणजे झालें ' असें दगडूची बायको म्हणाली. दगडूस तें पटून त्यांनीं तो लाडवांचा डबा कापडाच्या गाठोड्यांत दडवून झोंपीं जाण्याचा प्रयत्न केला. परंतु झोंप येईना. न जाणों गाठोडेंच नेलें तर, अशा शंका दगडूला येऊं लागल्या. म्हणून रात्रभर जागून त्यानें घरांतल्या प्रत्येक जिनसावर पहारा सुरू केला.

यम्या व शिव्या रात्रीं आले परंतु दिवसा पाहून गेलेल्या जागीं तो डबा नाहीं असें पाहून ते थोडे मनांत खट्टू झाले. तथापि यम्यानें धीर धरून प्रयत्न करून पहाण्याचें ठरविलें. घराच्या भिंतीला भोंक पाडून ते घरांत शिरले. इतक्यांत त्यांना चाहूल लागली. दगडू पहारा करीत करीत ह्या खोलींतून त्या खोलींत, खोलींतून बाहेर गोठ्यांत असे हेलपाटे घालीत होता यम्यानें याच गोष्टीचा फायदा घेण्याचें ठरवून त्यानें हळूच दगडूची बायको निजली होती त्या खोलींत प्रवेश केला व अगदीं दगडूसारखा स्वर काढून त्याच्या बायकोस जागी करून म्हणाला 'अग ऊठ, तो डबा कुठें नीट ठेवला आहेस तो मला डोळ्यांनीं पुनः नीट पाहूंदे. ' बायको अर्धवट झोंपेंत होती. तिनें पडल्यापडल्याच उत्तर केलें, ' उगीचें कां काळजी करतां ? तो डबा मी माझ्या लुगड्याच्या गाठोड्यांत चांगला बांधून ठेवला आहे. चोरांच्या बापास सुद्धां संशय येणार नाहीं. हवं तर जा पहा ' असें म्हणून पुनः डोक्यावर पांघरूण घेऊन ती घोरूं लागली. यम्या मनांतल्यामनांत हंसत हंसत सांगितल्याजागीं गेला व तें गाठोडें घेऊन शिव्यासह तेथून पसार झाला. इतक्यांतच दगडू गोठ्यांतून आंत आला. हंथरुणांत नवऱ्याची चाहूल ऐकून बायको पुनः जागी झाली व त्रासिक स्वरानें नवऱ्यास म्हणाली—' तुम्ही किनई भारीच संशयी दिसतां. अहो, आपणच डबा माझ्याकडून लुगड्याच्या गांठोड्यांत ठेवून उलट विचारतां कुठें ठेवला म्हणून '

दगडूला तें ऐकून धस्स झालें. त्यानें विचारलें, ' कोण आला तुला विचारायला ? मी कांहीं विचारलें नाहीं, घोटाळा केलास बहुतेक !' असें म्हणून दोघेंही शुद्धीवर येऊन ताडकन उभीं राहिलीं. दगडूनें वेळ न घालवितां तो तसाच त्या रात्रीं घराबाहेर पडला. यम्यानें गाठोडें शिव्याच्या डोक्यावर देऊन तो अंमळ पुढें चालत होता. ' चोराची वाट चोर ओळखतो ' या म्हणीप्रमाणें लवकरच दगडूनें शिव्यास गांठलें. तो हलकेंच त्याच्या कानांत म्हणाला ' शिवू-

दादा, थकला असलास तर जरा दे कीं मी घेतों तुझें ओझें. मीही कांहीं आणलें आहे. मुक्कामावर गेल्यावर तें दाखवीन तुला; यम्याजी सुद्धां खुश होतील.'

शिव्या थकलाच होता. त्यांतून दगडू पुनः आपल्या टोळींत आला असें वाटून पूर्वपरिचयानें अधिक चौकशी न करतां त्यानें मुकाट्यानें गाठोडें दगडूस दिलें. दगडूनें संधि साधून एका गडद अंधःकाराच्या जागेंत तो दिसेनासा झाला.

डबा घेऊन आलेला पाहून त्याची बायको आनंदून म्हणाली 'धन्य आहे आपल्या बहादुरीची! आतां तुम्ही जाऊन निजा. मी या डब्याची काळजी घेईन. ते चोर पुनः येतील अशी माझी खात्री आहे. आतां सकाळ होईपर्यंत मी कांहीं निजत नाहीं. जा, तुम्ही काळजी करूं नका!' बायकोनें आग्रह केला तरी दगडूस जावेंसें वाटेना. परंतु तिच्या समाधानासाठीं तो निजावयास गेला. जातांना तिला पुनः बजावून गेला. दगडू हंथरुणावर पडला तरी त्यास झोंप येईना. यम्या आणि शिव्या पुनः येतील व माझा सूड उगविण्यासाठीं नाना युक्त्या योजून बायकोला फसवून डबा घेऊन जातील. हें मनांत आणून तो खाटेवर जागत बसला. त्याच्या संशयाप्रमाणें यम्या व शिव्या संतापलेले पुनः परत आले. यावेळीं यम्यानें दुसरी युक्ति योजिली. एक लांब बांबू घेऊन त्यास लोखंडी आंकडा अडकविला व त्या आंकड्यांत गाठोडें अडकवून नेण्याचा त्यानें डाव रचला. दगडूची बायको मोठ्या हुषारीनें तासभर बसली परंतु पहांटेची गार झुळूक तिला लागूं लागल्यानें ती पुनः पेंगूं लागली. यम्यानें झोंपडीवर चढून एका भोंकांतून हें पाहिलें व वरतून झोंपडीस भोंक पाडून त्यानें पेंगत असलेल्या दगडूच्या बायकोसमोरील गाठोडें आंकड्यांत अडकवून वर ओढलें व आतां तें घेऊन खालीं उतरणार तोंच झोंपडीचें दार उघडून दगडू बाहेर आला व त्यानें दोघां चोरांस हांक मारली. 'यम्याजी, शिव्याजी दिवाळीच्या गोड फराळासाठींच जर तुम्ही आमची झोंपमोड करून एवढा अट्टाहास केला असाल तर त्याची जरूर नाहीं. मी तुम्हाला पुरून उरलों हें तुम्ही पाहिलें. आतां मुकाट्यानें खालीं उतरा. पहांट झालीच आहे. नरकचतुर्दशीचें स्नान करा. आणि मग तुम्ही आम्ही सर्व मिळून ज्या डब्यासाठीं एवढी धडपड केली त्यांतील पदार्थांवर ताव मारूं या. जें सरळपणानें जमणार होतें त्याला हा चोरीचा आडमार्ग कशाला? तुमची संगति सोडल्यापासून मी उजळमाथ्यानें व चैनीनें दिवस काढीत आहे. माझें ऐकाल तर तुम्हींही हा धंदा सोडा व माझ्यासारखे सचोटीनें उद्योग करून सुखी व अब्रूदार व्हा"

दगडूचें हें बोलणें यम्या व शिव्या या दोघांसही रुचलें व त्यांनीं देवास स्मरून चोरी न करण्याबद्दल शपथा वाहिल्या. पुढें त्यांनीं सर्वांनीं मिळून लाडवांनीं भरलेल्या त्या डब्याचा आनंदानें फडशा उडविला हें सांगावयास हवें काय?

---


# अभिनव काव्यमाला भाग २

या पुस्तकाची दुसरी आवृत्ति छापून विक्रीस तयार आहे. किं. १ रु. ट. ह. व व्ही. पी. खर्च निराळा

म्यानेजर—चित्रशाळा प्रेस, पुणें.

# शालापत्रकाची चढाओढ.

## बक्षीस मिळालेल्यांचीं नांवें.

| | | |
|---|---|---|
| १. वामन दाजी नांदेडकर. | ५ | चौकोन |
| २ ग० म० केळकर, | ४ | ,, |
| ३ गोपाळ कृष्ण इनामदार | २ | ,, |
| ४ अनंत विठ्ठल डाकवे. | १ | ,, |
| ५ नागेश त्रिंबक गोडबोले. | १ | ,, |

**टीप**—शेवटच्या दोघांचा निकाल चिठ्ठया टाकून करण्यांत आला.

### मुलांकरितां

| | | |
|---|---|---|
| १ पुंडलीक सुब्राय प्रभुलवंदे. | ४०५ | शब्द |
| २ शां० पु० नाईक | ४०० | ,, |
| ३ दि० शं० कुळकर्णी. | २०३ | ,, |
| ४ सुशिला जोशी. | १९३ | ,, |
| ५ अच्युत बाळकृष्ण परमानंद. | १८१ | ,, |

## बक्षिसें

### सर्वांकरितां

१ मुक्तामाला.
२ सुभाषित.
३ अर्वाचिन महाराष्ट्र.
४ विद्वत्त्व आणि कवित्त्व,
५ रासेलस.

### मुलांकरितां

१ करमणूक.
२ साक्रेटीस चरित्र.
३ शीलं परं भूषणं.
४ झोंपाळ्यावरील गीता.
५ ध्रुव व चिलिया.

## नवीं कोडी.

### सर्वांकरितां

( रा. ग. नी. पुराणिक यांजकडून )

एक सहा अक्षरीं शब्द आहे. पहिलें व दुसरें मिळून ईश्वरवाचक शब्द होतो.

पहिलीं तीन मिळून एका पतिव्रतेचें नांव होतें. दुसरें व पांचवें मिळून बोलणें या अर्थी शब्द होतो. दुसरें, पांचवें व सहावें मिळून तोंड या अर्थी शब्द होतो. शेवटचीं तीन मिळून मुलगा असा अर्थ होतो. व सहा अक्षरें मिळून दशावतारांतलि एक अवतार होतो. तर तो शब्द कोणता ?

### मुलांकरितां.

( रा. वामन दाजी नांदेडकर अलंपूर. )

एक चार अक्षरीं शब्द आहे, पहिलें व दुसरें मिळून शरीराचा एक अवयव होतो. पहिलें, तिसरें व चवथें मिळून सुवासिक पदार्थ होतो. चारहि अक्षरें मिळून एका शहराचें नांव होतें तर तो शब्द कोणता ?


---

कूपन
सर्वांकरितां
जून १९२४

कूपन
मुलांकरितां
जून १९२४

# खात्री झाली.

कोल्हा आणि वाघ एकत्र रहात होते. कोल्हा वाघाचा चाकर होता. दोघेजण दररोज शिकारीला जात; आणि वाघ मांस खाई व हाडें कोल्ह्याला देई. पण हा प्रकार कोल्ह्याला आवडेनासा झाला. तो म्हणे, 'मी शिकार



करावी, आणि या वाघ्यानें सारें मांस खावें, हें ठीक नाहीं. मला सारी हाडें अगदीं चाटून पुसून देतो." असें म्हणून तो वाघाकडे गेला आणि म्हणाला "महाराज!



आजपासून मी एकटाच शिकारीला जाईन. आपण मला परवानगी द्यावी. वाघोबा हंसले व त्यांनीं त्याला परवानगी दिली. कोल्हा जंगलांत आला. आणि माळा-वर पुष्कळ कळप पाहून त्याला हर्ष झाला. तो एका बैलाजवळ गेला आणि म्हणाला " चल त्या झाडींत चल, तुला दाखवितों माझा पराक्रम. " " अरे जा कोल्हुटल्या, तूं काय पराक्रम दाखविणार ? मीच माझ्या शिंगाचा प्रभाव तुला दाखवितों." असें म्हणून बैलानें त्याला उधळून लावलें. इतक्यांत गुराखी



खंड्या जवळ होताच. त्यांनीं जो दगडाचा मारा सुरु केला, तों, तो कोल्हा दूर पळाला. नंतर कोल्होबा वाघाजवळ आले. वाघ हंसून म्हणतो " काय कशी काय झाली शिकार ? "



कोल्हा म्हणाला " छे बुवा आतां नाहीं जाणार आपण शिकारीला. खरोखर तुमच्या शिकारीचीं हाडें माझ्या शिकारीच्या मांसापेक्षां चांगलीं आहेत. "

# जोडाक्षर-विरहित वाचनपाठ.

हें पुस्तक नुकत्याच अक्षर ओळख झालेल्या मुलांमुलींकरितांच लिहिलेलें आहे. पुस्तकांत एकंदर १७ गोष्टी अगदीं सोप्या भाषेत, व एकहि जोडाक्षर न येऊं देतां लिहिल्या आहेत. प्रत्येक गोष्टीचे आरंभीं कथानकाचें मुर्तिमंत चित्र दिलें असल्यामुळें गोष्ट वाचण्याचे अगोदरच त्यांतील सारांश मुलांचे सहज लक्षांत येतो. किं. अवघी चार आणे

# उजळणीचें पुस्तक.

ह्यांत सर्व मुळाक्षरें चित्रयुक्त दिलीं असून मोडी व बालबोध बाराखड्या तयार करण्याची समजूत थोडक्यांत करून दिली आहे. नंतर मोडी व बालबोध सोपे शब्द मुलांना सहज ओळखण्यासारखे दिले आहेत. पुढें १० अंक सांकेतिक दिले असून त्याबरोबर मुलांस बेरीज व वजाबाकीची समजूत टिंबांच्या आकृतींनी व गोट्यांच्या चौकटीच्या सहाय्यानें घालून दिली आहे. नंतर पाढ्यांची समजूत दिली असून शेवटीं उजळणी दिली आहे. एकंदरींत हें पुस्तक नवीन तऱ्हेनें मुलांना शिकविण्यास फार उपयुक्त असें झालें आहे. कागद ग्लेज किं. ०।-॥

लहान मुलांकरितां उपयुक्त अशीं पुस्तकें

## नवी आवृत्ति ] सचित्र अक्षरबोध. [ नवी आवृत्ति

या पुस्तकांत 'अ' पासून 'ज्ञ' पर्यंत स्वर आणि व्यंजनें हीं सर्व निरनिराळ्या भपकेदार रंगांत व तें अक्षर नांवांच्या प्रथम अक्षरानें दर्शविणाऱ्या चित्रांसह दाखविलेलीं असून १ पासून १० पर्यंत अंकहि वरील पद्धतीनें दाखविलेले आहेत. पुस्तकाचा साईज क्राऊन चतुर्थांशाइतका मोठा ७×९ इंच ठेवला असल्यामुळें अक्षरें व चित्रें फारच सुबक व मोठीं अशीं झालीं आहेत. एकंदर पुस्तक इंग्रजींतील सचित्र रंगीत ए बी सी डी शिकण्यास उपयोगी अशा पुस्तकाच्या धर्तीवर तयार केलें असल्यामुळें हें पुस्तक लहान मुलांस फारच आवडून त्यावरून तीं आपला धडा सहज शिकतात. किं. ०।-.

## भाग १ ते ६ ] चिमुकल्या गोष्टी. [ भाग १ ते ६

ह्या गोष्टींत रोज व्यवहारांत घडणाऱ्या गोष्टी दिलेल्या आहेत, पण त्या इतक्या मोहक, मनोरंजक व मार्मिक लिहिल्या आहेत कीं, त्या गोष्टींतील तत्त्वबोध गोष्टी वाचतां वाचतांच मुलांच्या मनावर सहज ठसला जातो. पुस्तक ठळक टाइपांत सुंदर जाड व ग्लेज कागदावर छापिलेलें असून प्रत्येक गोष्टीचे प्रारंभीं कथानकाचें सुंदर चित्र दिलेलें आहे. एकंदर ह्या गोष्टींचे सहा भाग आहेत. प्रत्येक भागांत दहा गोष्टी सचित्र आहेत. प्रत्येक भागास किं. ०४.

मिळण्याचें ठिकाण—म्यानेजर-चित्रशाळा प्रेस, पुणें.

॥ ॐ नमः श्रीरामचंद्राय ॥

# आर्यमहौषधालय मु० पो० आंजर्लें.

**कोंकणप्रांतांतील अगदीं ताज्या व शुद्ध वनस्पतींचीं जगत्प्रसिद्ध निर्दोष व रामबाण औषधें.**

**कंदर्पमंजरी पाक**—हा अपूर्व पाक गरिबांपासून तों अमीरउमरावांपर्यंत सर्वांसही अत्यंत उपयोगी असून किंमत माफक ठेविली आहे. यांत मौक्तिक, प्रवाळ, लोह, माक्षिक, कस्तूरी, अंबर इ० अत्युच्च गुणकारक पदार्थ असून शिवाय बदाम, पिस्ते, अक्रोड चारोळी, केशर, वेलची, पंजाबी सालममिश्री, सफेतमुसळी, पत्री, गोक्षुर, शतावरी, आस्कंद, वंशलोचन वगैरे (८०) उपयुक्त वनस्पति घातल्या आहेत. यानें पथ्यावांचून गुण येतो. यापासून कोणत्याही कारणांनीं होणारा व कशाही प्रकारचा शुक्रस्राव, नपुंसकत्व, मूळव्याधि, रक्तदूषणामुळें त्वग्रोग, स्त्रियांची धुपणी व गर्भाशयस्थ दोष या भावना त्यांच्या एकंदर उपविकारांसह तत्काल बऱ्या होऊन धातुवृद्धि होते, व शरीर कणखर आणि तेजस्वी बनतें. २० तो० ड० २ रुपये. एकदम ३ डबे घेणारास ५ रुपये.

**स्वर्णधात्री तेल**—हें चारोळी, बदाम, कंकोळ, एला, बहुविध वनस्पतींचीं सत्त्वें व उपयुक्त तेलें अशा अनेक पदार्थांनीं बनविलें असल्यानें याच्या मर्दनापासून अपस्मार, उन्माद, वेड, चक्कर इ० रोगांस जलद आराम पडतो. केंसांस चोळल्यानें केंस काळे कुळकुळीत, तजेलदार, सडक लांब व मृदु होऊन मेंदु शांत आणि रोगरहित बनतो. यानें मस्तकाचें टक्कल जातें. हें अंगास चोळून स्नान करीत गेल्यानें शरीराचा दुर्गंध जातो. खरूज, गजकर्ण, शिबें, तसेंच तळपाय, तळहात, डोळे व मस्तक यांचा दाह हे विकार खास बरे होऊन निद्रा चांगली येते, आणि नेत्ररोग दुरुस्त होतात. बा० किं० १। रु०

**दंतरक्षक पूड**—ही दांत व हिरड्या यांचे सर्व विकार तत्काल दुरुस्त करून दांत स्वच्छ व मजबूत करण्यांत प्रतिज्ञेची आहे. ड. ६ आणे.

सुरंगी, मालती, **कल्हार, गुलबहार, दणाणा, लक्ष्मीविलास** इ० बादशाही अति उंची अत्तरें व त्याचप्रमाणें गुलाब, हिना, केवडा, चमेली, जाई वगैरे सुगंधी अत्तरें आणि केंसांस लावण्याचीं हरएक प्रकारचीं सुवासिक तेलें माफक दरानें पूर्ण खात्रीचीं मिळतील.

**सूचनाः**—वरील औषधें व अत्तरें वगैरे पूर्ण खात्रीचीं असल्यामुळें आज तेवीस वर्षांत त्यांचा लक्षावधि लोकांस अप्रतिम उपयोग झाला म्हणून त्यांचा नेहमीं फारच खप होत आहे. अनुभवानंतर पूर्ण खात्री पटेल. औषधें माहितीचे खर्च्यासह गोष्टींनें अगर वही पो० नें पाठवूं. प्याकिंग व टपाल खर्च वेगळा. घाऊक घेणारांस कमिशन भरपूर. सर्व औषधांच्या आणि आरोग्यरक्षणाच्या माहितीचें सचित्र मोठें पुस्तक देऊं. आमचीं औषधें वगैरे मागविणें तीं खालील बिनचूक पत्त्यावर मागवावीं.

**कृष्णशास्त्री बिवलकर, वैद्य.**

REGISTERED. B. NO. 179




अनुक्रमणिका.


| विषय. | पृष्ठ. |
|---|---|
| पृथ्वी कशाची बनली आहे. | १२१ |
| प्रामाणिक जगन्नाथ. ( १ अंकी नाटक. ) | १२३ |
| भीष्मानें पितृभक्तिसाठीं केलेली हानि. | १२७ |
| उपदेशामृत बिंदु. | १२८ |
| चिमुकला गुप्त पोलीस. | १२९ |
| एक जपानी वीर. | १३२ |
| जग हें असें आहे. | १३३ |
| चुटके. | १३४ |
| टस्कीजी इन्स्टिटयूट. | १३५ |
| सेन्ट निहालसिंग. | १३८ |
| चांदोबाचें चित्र. | १३९ |
| [illegible] भांडण आणि तिसऱ्याचा लाभ. | १४० |


मुद्रक व प्रकाशक—रा. रा. शंकर नरहर जोशी, चित्रशाळा प्रेस, १०२६ सदाशिव पेठ पुणें सिटी.

# जोडाक्षर-विरहित वाचनपाठ.

हें पुस्तक नुकत्याच अक्षर ओळख झालेल्या मुलांमुलींकरितांच लिहिलेलें आहे. पुस्तकांत एकंदर १७ गोष्टी अगदीं सोप्या भाषेंत, व एकहि जोडाक्षर न येऊं देतां लिहिल्या आहेत. प्रत्येक गोष्टीचे आरंभीं कथानकाचें मुर्तिमंत चित्र दिलें असल्यामुळें गोष्ट वाचण्याचे अगोदरच त्यांतील सारांश मुलांचे सहज लक्षांत येतो. किं. अवघी चार आणे

# उजळणीचें पुस्तक.

यांत सर्व मुळाक्षरें चित्रयुक्त दिलीं असून मोडी व बालबोध बाराखड्या तयार करण्याची समजूत थोडक्यांत करून दिली आहे. नंतर मोडी व बालबोध सोपे शब्द मुलांना सहज ओळखण्यासारखे दिले आहेत. पुढें १० अंक सांचेत दिले असून त्याबरोबर मुलांस बेरीज व वजाबाकीची समजूत टिंबांच्या आकृतींनीं व गोट्यांच्या चौकटींच्या सहाय्यानें घालून दिली आहे. नंतर पाढ्यांची समजूत दिली असून शेवटीं उजळणी दिली आहे. एकंदरींत हें पुस्तक नवीन तऱ्हेनें मुलांना शिकविण्यास फार उपयुक्त असें झालें आहे. कागद ग्लेज किं. ०।१।६.

## लहान मुलांकरितां उपयुक्त अशीं पुस्तकें.

# नवी आवृत्ति ] सचित्र अक्षरबोध. [ नवी आवृत्ति

या पुस्तकांत 'अ' पासून 'ज्ञ' पर्यंत स्वर आणि व्यंजनें हीं सर्व निरनिराळ्या भपकेदार रंगांत व तें अक्षर नांवांच्या प्रथम अक्षरानें दर्शविणाऱ्या चित्रांसह दाखविलेलीं असून १ पासून १० पर्यंत अंकहि वरील पद्धतीनें दाखविलेले आहेत. पुस्तकाचा साईज क्राऊन चतुर्थांशाइतका मोठा ७×९ इंच ठेवला असल्यामुळें अक्षरें व चित्रें फारच ठळक व मोठीं अशीं झालीं आहेत. एकंदर पुस्तक इंग्रजींतील सचित्र रंगीत ए बी सी डी शिकण्यास उपयोगी अशा पुस्तकाच्या धर्तीवर तयार केलें असल्यामुळें हें पुस्तक लहान मुलांस फारच आवडून त्यापासून तीं आपला धडा सहज शिकतात. किं. ०।८.

# भाग १ ते ६ ] चिमुकल्या गोष्टी. [ भाग १ ते ६

ह्या गोष्टींत रोज व्यवहारांत घडणाऱ्या गोष्टी दिलेल्या आहेत, पण त्या इतक्या मोहक, मनोरंजक व मार्मिक लिहिल्या आहेत कीं, त्या बोधपर बालबोध गोष्टी वाचतां वाचतांच मुलांच्या मनावर सहज ठसा उमटतो. पुस्तक बालबोध टाइपांत सुंदर आहे व ग्लेज कागदावर छापिलें असून प्रत्येक गोष्टीचे प्रारंभीं कथानकाचें सुंदर चित्र दिलेलें आहे. एकंदर ह्या गोष्टींचे सहा भाग आहेत. प्रत्येक भागांत दहा गोष्टी सचित्र आहेत, प्रत्येक भागास किं. ०।४.

मिळण्याचें ठिकाण—म्यानेजर—चित्रशाळा प्रेस, पुणें.

# मराठी बालपत्रक


येथें शब्द नाहीं शिष्यासीं । हें अवघें सद्‌गुरूपाशीं ।
सद्‌गुरु पालटी अवगुणांसी । नाना यत्नें करोनी ॥
जें कांहीं आपणास ठावें । तें हळु हळु शिकवावें ।
शहाणें करून सोडावें । सकळा जनां ॥ १ ॥

—रामदास.


पुस्तक ३५ जुलै सन १९२४ अंक ७


## पृथ्वी कशाची बनली आहे !

### आपण द्रव्याचा श्वासोच्छ्वास करतो काय ?

आपण धूळ व धूर या बरोबर ऑक्सिजन, नैट्रोजन, कार्बन डाय ऑक्साईड वगैरेंचेंहि श्वसन व उच्छ्वसन करीत असतो.

### गुलाबाचा सुगंध हेंही द्रव्यच आहे काय ?

गुलाब जमिनीतून नैट्रोजन व कार्बन शोषून घेतो आणि प्रकाशाच्या मदतीनें त्याचा रस व अर्क बनतो. हा अर्क सुगंधाच्या रूपानें पसरत असतो, अर्क द्रव्याचाच बनलेला असतो.

### मातीचे प्रकार किती ?

सामान्यपणें चार प्रकार आहेत. वाळू, शाडू, खडू, व वनस्पतीच्या मुळाशीं असलेला काळा किंवा पिंवळसर रंग होय. यांच्या मिश्रणानें निरनिराळे प्रकार होतात. परंतु मूलभूत प्रकार वरील चारच आहेत.

### दगड कसा बनतो ?

वाऱ्यानें किंवा पाण्यानें निरनिराळे कण एकत्र होतात. त्यावर पाण्याचा किंवा इतर द्रव्याचा दाब बसतो. नंतर पृथ्वीच्या आंतील भागाची उष्णता लागून अखेरीस दगड बनतो.

### दगड कां बुडतो ?

कारण दगडाचे परिमाणू पाण्याच्या परिमाणूंपेक्षां अधिक जड असतात.

### साऱ्या धुळीचें काय होतें ?

धूळ समुद्रांत जाते ती वारा पृथ्वीवर पसरतो. धूळ मातींत मिसळते. पुढें पुष्कळ वर्षांनीं दोघांचें मिश्रण होऊन दगड बनतो.

### सोनें करणें शक्य आहे काय ?

अद्याप त्याचा शोध लागला नाहीं. परंतु प्रत्येक मूल-

भूत द्रव्याच्या परिमाणूंचें पृथक्ककरण करणें शक्य होईल, तर सोनें बनवितां येईल.

**जुन्या किमयाकारांचें म्हणणें बरोबर होतें काय ?**

एका पदार्थाचा दुसरा पदार्थ करतां येतो, हें त्यांचें म्हणणें बरोबर होतें; परंतु पदार्थावर रासायनिक क्रिया करून किंवा मनाला वाटेल तेवढें उष्णतामान देऊन पदार्थांत बदल होते ही त्यांची समजूत चुकीची होती.

**कांहीं वस्तु आवाज कां थांबवितात ?**

कारण ध्वनिलहरी ज्या पदार्थावर आपटतात तो पदार्थ त्यांना शोषून घेतो व मग पुढें जाण्याचें कांहींच शिल्लक उरत नाहीं. हा धर्म त्या पदार्थाचा जात्याच असतो.

**मिश्रण ( Compound ) कशाला म्हणतात ?**

जे दोन पदार्थ सहज वेगळे होऊं शकत नाहींत त्यांना मिश्रण म्हणतात. गंधकाची भुकटी व शिशाच्या गोळ्या एकत्र मिसळतां येतात व निराळ्याही होऊं शकतात; परंतु दोहोंनाही आच लावली तर तिसराच एक पदार्थ बनतो.

**मूलभूत द्रव्य कशाला म्हणतात ?**

ज्यांच्या मिश्रणानें इतर द्रव्यें बनतात त्यांना मूलभूत द्रव्यें म्हणतात. पाण्याचीं मूलभूत द्रव्यें हायड्रोजन व आक्सिजन हीं होत.

**हीं मूलभूत द्रव्यें बदलूं शकतात काय ?**

एकदां असें वाटत होतें कीं, हीं, द्रव्यें व त्यांचे परिमाणू बदलूं शकणार नाहींत आणि तें थोडेसें खरेंहि आहे. लोखंडाचे परिमाणू लाखों वर्षें मूलस्वरूपांतच आहेत. परंतु युरेनिअम, रेडिअम वगैरेना आपण जरी मूलभूत द्रव्यें समजत असलों, तरी त्यांचें रुपांतर होत आहे. अनंत कालानंतर कदाचित् साऱ्या मूलभूत द्रव्यांत रुपांतर होईल.

**कांहीं अज्ञात मूलभूत द्रव्यें आहेत काय ?**

होय. सध्यां फक्त ९२ द्रव्यें ज्ञात आहेत, पांचच फक्त सांपडत नाहींत असें शास्त्रज्ञ म्हणतात. या पांचापैकीं तीन ( प्रोटाफ्लयुओराईन, नेब्युलिअम व कोरोनिअम ) कोणत्या तरी ताऱ्यावर आहेत अशी समजूत आहे.

**अणू कशाला म्हणतात ?**

ज्या द्रव्याचें अधिक पृथःकरण करतां येत नाहीं, त्याला अणू म्हणतात. परंतु ही समज नुक्तीच खोटी ठरत आहे. हा अणू म्हणजे ग्रहमालिके प्रमाणें एक मालिका आहे असें म्हणतात. याच्या मध्यावर धनविद्युत असून त्याच्या सभोंवती ऋणविद्युत् भ्रमण करीत आहे असा नवा शोध लागला आहे.

**अणूची शक्ति केवढी आहे ?**

त्याची शक्ति गर्भितावस्थेंत असल्यामुळें ती मोजतां येत नाहीं. परंतु ही शक्ति जर मोकळी झाली, तर ती प्रचंड कार्य करूं शकेल. तिची गती दर सेकंदाला १ लक्ष मैल होईल; आणि मोठाल्या इमारती या अणूच्या शक्तीनें पाडल्या जातील.

**अणू एकमेकाला आकर्षण करतात काय ?**

सर्व अणूंना वजन असतें व वजन असणारा प्रत्येक पदार्थ दुसऱ्या पदार्थाला आकर्षित असतो.

**अणूचें वजन कसें काढतात !**

हायड्रोजनच्या अणूचें वजन सर्वांत कमी असतें, तें प्रमाण धरून इतर अणूंचें वजन ठरवितात.

**एक टन कोळसा सर्वत्र एक टनच भरतो काय ?**

नाहीं. त्याचें वजन म्हणजे पृथ्वी त्याला ज्या वेगानें खालीं ओढते त्याचें मापक होय. हें वजन पृथ्वीच्या निरनिराळ्या भागीं निरनिराळें असतें.

**अणूंचें भ्रमण कधींच थांबत नाहीं काय ?**

नाहीं. अणू सारखे फिरत असतात व त्यांची गतीहि पुष्कळ असते.

**आपल्याला अणू दिसतो काय ?**

अणूच्या एक हजारपट मोठा असलेला पदार्थच

फक्त आपल्याला दिसूं शकतो. त्यामुळें अणू दिसणें शक्य नाहीं.

### परिमाणू कशाला म्हणतात.

द्रव्याच्या अत्यंत सूक्ष्म विभागांना परिमाणू म्हणतात. परिमाणूंचे अणू बनतात.

### प्रकाशाला द्रव्य म्हणतां येईल काय ?

प्रकाशाला आघात किंवा शक्ति मानीत असत. प्रकाश कोणत्याहि वस्तूमधून जाऊं लागला म्हणजे त्याच्या किरणांचें वक्रीभवन होतें. जें वाकतें किंवा ज्याला विकार होतो तें द्रव्य होय. म्हणून प्रकाशाला द्रव्य मानण्यास हरकत नाहीं.

### प्रकाशाला वजन असतें काय ?

सूर्याचा प्रकाश पृथ्वीवर आला, म्हणजे त्याचें ७०,००० टन दडपण पडतें असें म्हणतात. म्हणजे प्रकाश हा एक प्रकारचा गोळाच आहे. त्याला वजन आहे याचा अर्थ, त्याच्या जवळील द्रव्य प्रकाश किरणांना आकर्षून घेतें एवढाच होतो.

### द्रव्य किती दूरच्या पदार्थांना आकर्षूं शकतें ?

वास्तविक द्रव्याची व्याप्ति सर्वत्र आहे. परंतु ही आकर्षक शक्ति सर्वत्र सारखी नसते. या शक्तीचा प्रभाव थोड्या अंतरावर दिसतो, दूर अंतरावर तो दिसत नाहीं.

### सर्व द्रव्यें विद्युन्मय आहेत काय ?

द्रव्याची उभारणी विद्युत्कणावर झाली आहे. हे कण धन व ऋण असे असतात. या सिद्धांतानें सर्व द्रव्यें विद्युन्मय असतात असें सिद्ध होतें.

---

# प्रामाणिक जगन्नाथ.

## एक अंकी नाटक.

( ले० मुरलीधर देवराव वैद्य, शिक्षक नू० म० विद्यालय पुणें. )

### प्रवेश १ ला.

**लक्ष्मीचंदः**—जगन्नाथा, तुझ्या वडिलांचा व आमचा ऋणानुबंध फार होता. त्यांची आठवण झाली असतां, अजूनही आमचें हृदय भरून येतें. त्यांच्यासारखा सच्चा माणूस सांपडणें विरळा ! त्यांच्या मृत्युमूळें तुमच्यावर मोठा वाईट प्रसंग आला आहे. अशावेळीं माझ्याकडून होईल तितकी मदत करण्यास मी तयार आहें. आजपासून तुला आमच्या पेढीवर मीं दिवाण नेमिलें आहें. पगारही चांगला मिळेल. मात्र व्यापारांत प्रामाणिकपणाची फार जरूर आहे, हें लक्षांत ठेव.

**जगन्नाथः**—महाराज, आमच्यावर हे आपले मोठे उपकार झाले. माझा आजपर्यंतचा काळ वडील व मातुश्री यांच्या सहवासांत गेला आहे. दुसऱ्याशीं वागण्याचा प्रसंग मला नाहीं. यामुळें माझ्या हातून कांहीं चुका होतील. प्रामाणिकपणाविषयीं म्हणाल तर जिवावरचा प्रसंग आला, तरी देखील मी खोटेंपणानें वागणार नाहीं.

**लक्ष्मीचंदः**—ठीक आहे. मला कांहीं जरुरीच्या कामासाठीं बाहेर जावयाचें आहे तर तूं दुकानावर बैस. नीट सांभाळ हो. [ जातो ]

**जगन्नाथः**—होय महाराज.

[ हिराचंद, ताराचंद प्र० क० ]

**हिराचंदः**—ताराचंद हा कोण नवीन मनुष्य ठेविला आहे, कोण जाणे! आम्ही दोघे असतां आणखी याची काय जरूर होती?

**ताराचंदः**—कोठची पीडा आली आहे, कोणाला ठाऊक! बरें. हा आपल्यासारखा वळतो कां बघूं! नमस्कार दिवाणजी!

**जगन्नाथः**—नमस्कार. या कसें काय ठीक चाललें आहे ना?

**हिराचंदः**—आमचें ठीक चाललें आहे. पण तुम्हाला या धंद्यांत पडण्याची बुद्धि कां झाली? एकादी चांगलीशी नोकरी पहावयाची होती, आणि मजेनें रहावयाचें होतें. तें सोडून येथें आलांत. आतां करा सगळा दिवसभर काम!

**जगन्नाथः**—हिराचंद, कामाबद्दल माझी कांहीं तक्रार नाहीं. कोठेंही गेलें तरी काम हें केलेंच पाहिजे. धन्याचें काम इमानें इतबारें करावयाचें, व प्रामाणिक पणाला बाध येऊं द्यावयाचा नाहीं हें ठरवूनच तर मी येथें राहिलों.

**ताराचंदः**—काय? प्रामाणिकपणा! जगन्नाथा, तुला खूळ लागलें आहे. अरे, प्रामाणिकपणा हा फक्त बाहेरून दाखवायला! लाभाची वेळ आली कीं, वाटेल तसें खरें खोटें करायला कांहीं हरकत नाहीं. हा तर व्यवहारांतली अगदीं साधी गोष्ट आहे

**हिराचंद**—जगन्नाथ हें प्रामाणिक पणाचें वेड सोडून दे, व आम्ही सांगतों त्याप्रमाणें वाग. म्हणजे तुझा चांगला फायदा होईल

**जगन्नाथ**—बरें तर आहे, नाहीं फायदा झाला तरी! ताराचंद. हिराचंद माफ करा. तुम्ही मला असें भलतेंच कांहीं एक सांगू नका.

**ताराचंदः**—हिराचंद जाऊं देईनास. अजून जरा नवीन आहे म्हणून असें चुरचुर बोलतो आहे. पण पुढें आपोआप ठिकाणावर येईल. पैसा दृष्टीस पडूं लागला, म्हणजे वेदांत आपोआप थंडावेल चला. आतां घरीं जाऊं. दुकानच्या किल्ल्या कोठें आहेत?

**जगन्नाथः**—शोधतों. या गादीखालीं असतील कदाचित्. ( गादी वर करतो, तों खालीं कंठा दृष्टीस पडतो. ) अरे, हें काय? शेटजी कंठा विसरून गेले वाटतें.

**हिराचंदः**—ओहो! लाभ! मोठा लाभ!! सगळ्या जन्मांत असा लाभ क्वचितच होतो मित्रांनो, आपण हा कंठा वाटून घेऊं. म्हणजे आपलें जन्माचें दारिद्र्य तरी दूर होईल!

**ताराचंदः**—वाहवा! फार छान शिकार! या ठिकाणीं आपणा तिघांशिवाय कोणीही नाहीं. तऱ्हां हा कंठा जर आपण वाटून घेतला, तर ही गोष्ट धन्याच्या कानावर जाणार नाहीं, कांहीं नाहीं. तेव्हां होऊं द्या झटकन वांटणी. जगन्नाथ, विचार कसला करीत आहेस? आण तो कंठा इकडे?

**जगन्नाथः**—नाहीं. मला हा तुमचा विचार मुळींच पसंत नाहीं. ज्यानें भरवंशानें आमच्यावर दुकान टाकलें, त्याच्याशीं आम्हीं असें खोटेपणानें वागावें काय? असें करण्यानें आम्ही धन्याला तर फसवितोंच पण देवालासुद्धां फसवीत आहोंत, ह्याचा विचार तुम्हीं केला आहे काय?

**ताराचंदः**—होय, सगळा विचार केला आहे वर चालून लाभ आला, तो हातचा गमवायचा आणि म्हण अमुक झालें न् तमुक झालें!

**हिराचंदः**—जगन्नाथ, काय हा तुझा अविचार! अरे, श्रीमंत होण्याची ही चांगली संधि आली आहे, ती आपण होऊन कां गमावतोस?

**जगन्नाथः**—मित्रांनो, मीं माझा निर्धार तुम्हांला सांगितला असतांही तुम्ही पुनः मला तेंच कां सांगतां! कां ' अप्रामाणिकपणानें वागून श्रीमंत बनावें, त्या पेक्षां प्रामाणिकपणानें वागून मी दरिद्रि राहिलों तरी

चालेल.' हा कंठा मला आतांचे आतां धन्याला नेऊन दिलाच पाहिजे.

**हिराचंद**:—जगन्नाथा, थांब ! थांब ! असा अगदीं बावळा होऊं नकोस. असा मोठा लाभ पुनः कधीं होणार नाहीं. म्हणून म्हणतों, एकदां नीट विचार कर. ( जगन्नाथ जातो )

( रागानें ) काय ? नाहीं ऐकत ? जगन्नाथा, प्रामाणिकपणाचें ढोंग माजविणाऱ्या जगन्नाथा ! आमचें न ऐकतां तूं निघून गेलास ? ठीक आहे बच्चाजी ! पाहून घेऊं !

**ताराचंद**:—या कृत्यानें जगन्नाथ आमचा वैरी झाला आहे. हरएक यत्न करून, याला येथून हकलून दिलाच पाहिजे. चला लागूंच त्या उद्योगाला. (जातात.)

## प्रवेश दुसरा.

**लक्ष्मीचंद**:—केवढा आजचा भयंकर प्रसंग ! दहाहजारांचा कंठा ! गेला असता तर मोठी ठोकर बसली असती. नवीन नोकरीला ठेवलेला मुलगा जगन्नाथ हा खराच प्रामाणिक दिसतो आज जर तो तेथें नसता, तर काय झालें असतें, कांहीं सांगतां येत नाहीं. वाहवारे जगन्नाथ ! शाबास !

[ हिराचंद, ताराचंद प्र० क० जयगोपाळ करून बस. ]

**ताराचंद**:—महाराजांना कंठा मिळाला ना ? आम्हीजवळ होतों, म्हणून बरें. नाहींतर जगन्नाथानें काय केलें असतें, तें कांहीं सांगतां येत नाहीं.

**हिराचंद**:—धन्याचें नशीब शिकंदर दुसरें काय ? महाराज, जगन्नाथाची खात्री कोणी द्यावी ? किती झालें तरी जुन्या नोकरांची सर येणार नाहीं.

**लक्ष्मीचंद**:—जगन्नाथानें तर स्वतः कंठा आणून दिला, असें असतां तुम्हांला त्याच्याबद्दल संशय कां वाटावा ? जुन्या नोकरांना मी वाईट समजत नाहीं. पण त्यावरून नवीन नोकर चांगले नसतात, असें समजावयाचें कीं काय ?

**हिराचंद**:—धन्यांनीं कांहींही समजावें. त्याबद्दल आमची कांहीं तक्रार नाहीं. पण—

**लक्ष्मीचंद**:—पण काय ? काय असेल तें सर्व सांगा.

**ताराचंद**:—आम्हीं कशाला सांगा. आपोआपच त्या गोष्टी धन्याच्या कानावर येतील.

**हिराचंद**:—महाराज, जगन्नाथ नवीन आहे, म्हणून त्याला आम्हीं कांहीं सांगावयास जावें, तर तो मुळींच ऐकत नाहीं. उलट रागावतो.

**ताराचंद**:—तो दुकानावर कधीं वेळेवर येत नाहीं.

**हिराचंद**:—दुकानावर आल्यावर तरी काय ? जमाखर्चाची त्याला माहिती नाहीं. कामांतही चुकार दिसतो.

**ताराचंद**:—परवांचीच गोष्ट. एक चांगलें गिऱ्हाईक आलें होतें. आम्ही दोघे लिहीत होतों म्हणून जगन्नाथाला सांगितलें कीं, त्या गृहस्थांना काय लागेल तो माल दाखव, पण जगन्नाथ जागचा देखील हलला नाहीं !

**लक्ष्मीचंद**:—ठीक आहे. तुम्ही आतां दुकानावर चला. टपाल आलें आहे, तें पाहून मीही येतोंच.

हिराचंद, ताराचंद—ठीक आहे. ( जातात )

**लक्ष्मीचंद**:—या दोघांनीं जगन्नाथासंबंधानें असें कां सांगावें बरें ? मला तर कधीं तसें दिसलें नाहीं. मग यांत लबाड कोण ? जगन्नाथाचें व यांचें जमत नाहीं खास. एकदां जगन्नाथाची कसोटी पाहिली पाहिजे. काय बरें युक्ति करावी ? हं, बरी आठवण झाली. कांचनपुरीला जरतारी मालाच्या खरेदीसाठीं कोणाला तरी पाठवावयाचें आहे तर जगन्नाथालाच पाठवावें. पल्लाही दूरचा आहे, व देवघेव मोठ्या रकमेची आहे, आपोआपच खरें कळेल. अरे, पण हें इकडे कोण येत आहे ? जगन्नाथच ! बरें झालें. जगन्नाथा, ये, जरतारी कापडाच्या खरेदीसाठीं तुला कांचनपुरीला पाठवावें, असा आमचा विचार ठरला आहे. पल्ला दूरचा असून सौदा १५ हजारांचा आहे तेव्हां बोल, तुझी तयारी आहे कीं नाहीं ?

**जगन्नाथ**:—होय महाराज, माझी तयारी आहे.

लक्ष्मीचंदः—ठीक आहे, जेवण खाण आटोपून दुकानावर ये, म्हणजे रक्कम व यादी देईन. [ जातो ]

जगन्नाथः—ठीक आहे. हें काम मोठें बिकट दिसतें. इतक्या दूर गांवीं जावयाचें व तेंही मोठी रक्कम घेऊन. द्रव्याचा मोह फार कठीण आहे. मोठमोठ्यांनाही तो आवरत नाहीं. कसेंही असलें, तरी धन्याचें हें काम आपल्याला चोख बजावलेंच पाहिजे. देवा, यावेळीं माझें प्रामाणिकपणाचें व्रत अभंग राहो, एवढेंच तुझ्याजवळ हात जोडून मागणें आहे.

प्रवेश ३ रा.

लक्ष्मीचंदः—शाबास जगन्नाथा ! धन्य तुझ्या मातापितरांची ! असा सच्चा मुलगा ज्यांच्या पोटीं जन्माला आला, त्या पुण्यवंतांना देवानें काय दिलें नाहीं ? १५ हजार रुपयांची रोकड हातांत असतां, ज्याच्या मनाला द्रव्याचा मोह पडला नाहीं, अशा या जगन्नाथाला यावेळीं मी बक्षीस तरी काय देऊं ? ही खर्चाची यादी इतकी चोख आहे कीं, हिच्यांत पैन् पैचा हिशेब दिलेला आहे. मी सचोटी पहाण्यासाठीं हें अवघड काम तुला सांगितलें होतें, पण तूं कसोटीला पूर्ण उतरला आहेस ! ज्या लबाड मनुष्यांच्या सांगण्यावरून माझ्या मनांत तुझ्याविषयीं संशय आला, त्यांना मी नोकरींतून दूर करतों. कोण आहे रे तिकडे ?

हिरा० तारा०:—महाराज, आम्हांला क्षमा करा. जगन्नाथाची योग्यता न ओळखतां आम्हीं त्याचा हेवा केला, त्याबद्दल आतां आम्हांला पश्चात्ताप झाला आहे.

जगन्नाथः—महाराज, या दोघांना पश्चात्ताप झाला आहे, तेव्हां यांना क्षमा करावी. हिराचंद, ताराचंद प्रामाणिकपणा हा बाहेरून दाखवायला, व लाभाची वेळ आली कीं, वाटेल तसें खरें खोटें करावें, असें तुमच्याप्रमाणें पुष्कळांना वाटतें. एकादेवेळीं अशा वागणुकीनें लाभ झाल्यासारखा वाटतो. पण एकदां गाडें फिरलें कीं. आपल्यासकट मिळविलेल्या ऐश्वर्याचा नाश होतो. उलट खरेपणानें वागणारा मनुष्य जरी दरिद्रि असला तरी त्याच्या मनाला समाधान असतें. ह्यासाठीं तात्कालिक लाभाकडे बघून कोणीही खोटेपणानें वागूं नये असें माझें सर्वांना प्रेमाचें सांगणें आहे.

हिरा० तारा०:—जगन्नाथ, हा तुझा उपदेश आम्ही जन्मभर विसरणार नाहीं.

लक्ष्मीचंदः—जगन्नाथा, तुझ्या सद्गुणांचें बक्षीस म्हणून आम्हीं तुला आजपासून आमच्या इष्टेटीचें वारस केलें आहे ! आम्हालाही मुलगा नाहीं तेव्हां आजपासून आम्ही तुला पुत्रच समजतों.

जगन्नाथः—महाराजांच्या इच्छेप्रमाणें होवो !

( भेटतात )

हिरा० तारा०:—प्रामाणिकपणाचा विजय असो!!

ईशस्तवन पद.

[ चाल—होईल कलह म्हणोनी ]

**वंदन तव चरणाला ॥ प्रभुजी मति दे तव-भजनाला ॥ ध्रु० ॥ अज्ञानें मी ग्रासुनि गेलों ॥ सत्संगातिला विन्मुख झालों ॥ तणें तवपद सेवा चुकलों॥दासावरि करि पूर्ण दयेला ॥ वंदन०॥१॥**

समाप्त.

---

विद्याधर वामन भिडे यांचें

**अर्थालंकारांचें निरूपण.**

किंमत १ रुपया म्यानेजर--चित्रशाळा प्रेस, पुणें.

# भीष्मानें पितृभक्तिसाठीं केलेली हानि.

( कु. चंपुताई शृंगारपुरे. )

मेच्या रजेंत सहज करमणुकीसाठीं मी पांडवप्रताप वाचला. त्यांत मला भीष्मपर्व फारच आवडल्यामुळें तें दोन चार वेळां वाचलें. त्यांवरून जे विचार सुचले तें मी पांडवप्रतापाच्या आधारें वाचकांच्यापुढें ठेवतें.

राजर्षि भीष्माचें नांव न ऐकणारा असा मनुष्य हिंदुस्थानांत कोठेंही सांपडणार नाहीं. यांचें आजन्म ब्रह्मचर्य, अलौकिक धैर्य, निस्सीमसत्यप्रियता, आजन्म अविवाहित राहण्याचा निश्चय, आणि कशींही संकटें येवो तीं पार पाडण्याची कसोटी हीं जगप्रसिद्ध आहे. आपल्या वृद्धपित्याचा धीवरकन्येशीं विवाह लावून आपण आजन्म अविवाहित राहण्याच्या घोर प्रतिज्ञेमुळें त्यांना भीष्म ही पदवी मिळाली. इच्छामरणाची शक्ति पितृवरानें मिळून यांचें नांव भारतांत अजरामर झालें. प्रतिज्ञा पाळणें चांगले खरें; पण ती प्रतिज्ञेच्या चांगुलपणावर अवलंबून असते. पण ती मुळची वाईट असेल तर त्या प्रतिज्ञेचा परिणाम वाईट होतो. ज्या प्रतिज्ञेमुळें बहुजन समाजाचें हित होईल, ती प्रतिज्ञा पाळणें चांगलें; व जी प्रतिज्ञा पाळली असतां समाजाचें अनहित होतें ती मोडण्यास कांहीं पाप लागत नाहीं. उदाहरणार्थ "न धरीं शस्त्र करीं मी, गोष्टी सांगेन युक्तिच्या चार" अशी श्रीकृष्णानीं युद्धाच्या वेळी प्रतिज्ञा केली असतां, भीष्माबरोबर अर्जुन लढत असतां, दुष्टांची सरशी होण्याचा रंग दिसूं लागतांच कृष्णानें प्रतिज्ञेकडे लक्ष न देतां भीष्मासाठीं त्याला सुदर्शन हातांत घ्यावें लागलें सारांश,ज्या प्रतिज्ञेमुळें अनर्थ घडतात, व जी मोडल्यानें समाजाचें हित होत असेल ती मोडण्यास कांहीं-एक हरकत नाहीं. ही प्रतिज्ञा करण्याचें कारण, शंतनुचें मन धीवर कन्येवर गेलें होतें, व ही इच्छा पूर्ण करण्यासाठीं त्यानीं घोर प्रतिज्ञा केली. केवढी ही पितृभक्ति! हल्लीं एखाद्या मुलानें, आपल्या वृद्ध पित्याचा विवाह एका बारा, चौदा वर्षांच्या मुलीबरोबर केला तर लोक त्याला काय म्हणतील ?

बरें असें करण्याला शतंनुनें अनुमति दिली होती कां ? कारण तो पूर्णपणें जाणून होता कीं, ह्याच्याशिवाय राज्याला योग्य पुत्र नाहीं. भीष्माच्या घोर प्रतिज्ञेमुळें परिणाम फार भयंकर झाला. चित्रांगद व विचित्रवीर्य हीं दोन मुलें होऊन शतंनु स्वर्गाला गेला. तेव्हां राज्यकारभार भीष्माला पाहावा लागला, म्हातारपणीं झालेली संतति बलवान कशी होणार ? चित्रांगद हा गंधर्वाच्या हातून मारला गेला. विचित्रवीर्याच्या विवाहाकरतां काशीराजाच्या अंबा, अंबिका व अंबालिका, ह्या युद्धकरून आणल्या, त्यांपैकीं अंबिका, व अंबालिका ह्यांच्या बरोबर विचित्रवीर्याचा विवाह करून दिला. परंतु त्यांना संतति होण्याच्या पूर्वीच विचित्रवीर्य मरण पावला. अंबेनें भीष्माला सांगितलें कीं, " ज्या अर्थी आपण मला हरण केली, त्याअर्थीं मी आपल्यांशीं विवाह करीन, " पण भीष्मानें तें नाकारल्यामुळें तिनें प्राण सोडला, आतां राज्य चालविण्यास सत्यवतीचा मुलगा किंवा नातवंड वगैरे कोणी नव्हतीं, म्हणून सत्यवतीनें लग्न करण्यास सांगितलें, व तें त्यांना मान्य झालेंहीं. आपली प्रतिज्ञा मोडण्यापेक्षां आपल्या विधवा भावजयीच्या ठिकाणीं, नियोगविधीनें दुसऱ्यापासून संतति उत्पन्न करण्याचें ठरविलें, व व्यासापासून संतति झाली, ती एक अंध, व दुसरा पंडुरोगी. त्यामुळें दोघेंहीं राज्यपदाला अयोग्यच ठरले. तरी सुद्धां पंडुराजाला गादीवर बसविलें. त्यामुळें कौरव पांडवांत द्वेष उत्पन्न होऊन भारत वर्षांतील शूर वीरांचा नायनाट झाला. भीष्मानीं जर उतावीळपणा केला नसतां तर आपण होऊन राजा आपल्या मुलीला मागत आहे असा विचार करून आडल्या गिऱ्हाइकापासून हवी ती किंमत उकळणाऱ्या दुकानदारांप्रमाणें वर्तन केलें असतें, भीष्माचा विवाह अंबेबरोबर झाला असतां, व जी संतति झाली असती, ती बलवान झाली असती. पण भीष्माच्या उतावीळपणाच्या चुकीमुळें वंश मुकला व कौरव कुलांची अवनति झाली.

# उपदेशामृत बिंदू.

ले०—कृ० रा० केळकर भिलवडीकर, शेणोली (सातारा.)

स्वोन्नतीच्या मार्गांतील अडचणी व अनुभव परोन्नती साधण्यास उपयोगीं पडतात, म्हणून स्वहितच अगोदर कळलें पाहिजे.

कामक्रोधादि षड्रिपूंचा नाश करावयाचा म्हणजे त्यांचा आपले ठिकाणीं पूर्ण अभाव करावयाचा असें नाहीं; तर त्यांना आपल्या ताब्यांत ठेवावयाचें.

मनुष्यानें धर्माचरण करतांना ऐहिक कर्तव्यास पारखें होऊन चालावयाचें नाहीं.

पापांचा नाश होण्यास केवळ भक्ति व धर्मकर्माचरण पुरें पडत नाहीं, तर त्याविषयीं पश्चात्ताप आणि तें पुन्हां न करण्याविषयीं निश्चय करणें, हीं आवश्य आहेत.

आळशीपणानें कच्चा माल दुसऱ्यास देऊन त्यापासून पक्का माल करून घेणें म्हणजे दुसऱ्यास खोबरें देऊन आपण करवंटी खात बसण्यासारखें आहे.

ज्यांच्यामध्ये स्पर्धा करावयाची ते बरोबरीचेच असावे लागतात.

दुसऱ्या लोकांनीं आपणांस जागें करून आपणांसाठीं सर्व तयारी करून ठेवण्यापेक्षां आपणच वेळेवर शुद्धीवर यावें आणि उद्योगास लागावें, हें शहाणपणाचें आहे

कोणताही उद्योग आरंभिला असतां त्याबद्दल हरकत करणारे असावयाचेच.

ज्या मानानें आपण दुसऱ्याची काळजी घेतों त्या मानानेंच दुसरा आपली काळजी घेत असतो.

मोहकवस्तूपासून अजी दूर राहणें विशेष योग्यतेचें नाहीं. पण त्या जवळ असून उपभोग घेण्याची इच्छा झाली नाहीं, तर विशेष मोठेपणाचें आहे.

खरोखरीनें पाहतां " आपण जन्मभर विद्यार्थी होतो." असें म्हणवून घेण्यांत खरा मान व खरें भूषण व खरा पुरुषार्थ आहे.

थोर पुरुषांच्या तसबिरी व अनुभव वचनें नेहमीं डोळ्यांसमोर असावींत.

सत्पुरूष परलोकीं शरीरानें जरी गेले, तरी त्यांचें मन, त्यांची कृति, व त्यांचा अनुभव इहलोकींच असतो.

कामाचें महत्त्व लहानपणींच जर मनावर बिंबलें, तर तें करतांना मोठेपणीं कंटाळा येत नाहीं.

जो चौकसपणा सुधारणेचें बीज आहे, व ज्याचे अभावीं ज्ञानाची वृद्धि होत नाहीं, तो गुण लहान मुलांचे अंगीं प्रथम आपोआप असतो, म्हणून तो वाढवीत असावें.

हल्लींचे काळीं शिक्षणाचा हावरेपणा हा अल्पायुषी करणारा मोठा दुर्गुणच उत्पन्न झालेला आहे.

सर्व गोष्टींची अनुकुलता असतां वचन पाळणें यांत विशेष पुरुषार्थ नाहीं. पण संकट ओढवलें असतांही जे आपल्या वचनास जागतात, त्यांची थोरवी विशेष समजावी.

ज्याला देशाची परिस्थिति होती काय, व हल्लीं आहे काय हें समजून खरें हित कोणत्या उपायांनीं

होईल हें जाणून निरपेक्ष बुद्धीनें ते उपाय योजणाऱ्यालाच देशाभिमानी समजावा.

हरएक बाबतींत काटकसरीनें वागण्याचा गुण आंगीं बाणल्यावांचून आपला तरणोपाय नाहीं.

( अपूर्ण )

# " चिमुकला गुप्त पोलीस. "

( ले. वामन दाजी नांदेडकर. अलंपूर )

जगू मोठा चौकस, व बुद्धिवान मुलगा होता. हल्लीं तो १०।११ वर्षांचाच होता. पण त्याला पुस्तकें वाचण्याचा भारी शोक; विनायकरावांनींही ( त्याचे वडिलांनी ) लहानशा जगूकरतां, पुष्कळ पुस्तकें -कांहीं गोष्टींची-तर कांहीं विविध विषयांवरचीं-आणलीं होतीं. त्यांत २।३ डिटेक्टिव्हांच्या गोष्टींचीही होतीं. जगूनें तीं पुस्तकें अगदीं मनःपूर्वक वाचलीं असून, त्या पुस्तकांच्या वाचण्यापासून, त्याला ' आपणही एकादें डिटेक्टिव्ह—कृत्य करून, डिटेक्टिव्ह व्हावें, याचे सारखें वेड लागलें होतें; व तो रोज त्यावर खूप विचार करीत असे. पण बिचाऱ्याला आपल्या मनाप्रमाणें करून दाखविण्याची संधी तरी कोठें मिळणार !

सोनापूर गांव बरेंच मोठें असून, तेथें इंग्रजी शाळा होती. शिवाय कोर्ट, वगैरे सर्व सरकारी कचेऱ्यांही होत्या. विनायकराव हे तेथें एका मोठ्या हुद्यावर कामगार होते. त्याचे घराशेजारीं त्या गांवचेच जीवनदास नांवाचे एक लक्षाधीश, श्रीमान् सावकार रहात होते. जगूची व जीवनदासाची खूप गट्टी असून, जीवनदासाचें जगूवर फार प्रेम होतें, व त्यांत त्याची अत्यंत चौकसबुद्धि पाहून ते त्याचे नेहमीं कौतुक करीत.

## २

रात्रीचे २॥ वाजण्याचा सुमार झाला होता. जीवनदास मंडळीसह नाटक पाहून, परत यावयास निघाले होते. घराजवळ येतांच, आंत कांहीं तरी धाडदिशी लावल्याचा त्यांना आवाज ऐकूं आला. त्याबरोबर त्यांनीं सर्व मंडळींस अगदीं चूप करून, हळूंच दाराचा ताळा उघडून, कडी उघडली; तोंच एक चोर तिजोरीचें झांकण बंद करीत असलेला त्यांना दिसला. अवसान न राहून ते, चोर ! चोर ! म्हणून मोठ्यानें ओरडले त्याबरोबर चोर सावध होऊन एकदम खिडकीकडे पळाला. जीवनदासही त्याचे मागोमाग धांवले; पण चोर कसला वस्ताद ! त्यानें धाडकन् खिडकीचे बाहेर उडी टाकली. चोर मात्र अगदीं अचुक, अंगणांतील कोटाचे बाहेर, रस्त्यावर जाऊन पडला; पण त्यानें डोक्यास फेट्यासारखें लपेटलेलें, एक फाटकें व जीर्ण वस्त्र, खिडकींतील पडदा लावण्यास ठोकलेल्या आंकड्यांना अटकून खालीं अंगणांत पडलें, तें घरांतील दिवा मंद केलेला असल्यानें, त्याचे मंद उजेडांत, जीवनदासांना दिसलें नाहीं.

इकडे, चोरानें तात्काळ उठून य:पलायन केलें, पण त्यास, त्याच्या बऱ्याच मोठ्या डल्ल्यापुढें,

स्वतःच्या फेऱ्याची मुळींच आठवण झाली नाहीं. नंतर जीवनदासानें, तिजोरी उघडून पाहतां, त्यांना कांहीं जवाहीर व कांहीं नोटा मिळून १ लाखाची चोरी झाल्याचें दिसून आलें. कांहीं रुपयांच्या थैल्याही बाहेर पडल्या होत्या, पण त्या बऱ्याच जड असल्यामुळें, त्यांसह पळण्यास चोरांस अवसर सांपडला नाहीं. जीवनदासानें लागलींच पोलीसांना वर्दी देऊन, व दोन हुशार डिटेक्टिवांनाही चोरास पकडण्यास सांगून, ते स्वस्थपणें घरीं येऊन निजले.

पोलीसांनीं आपलें कर्तव्य म्हणून व डिटेक्टिवांनीं बक्षिसाचे लालचीनें पुष्कळ बारीक तपासणी केली, पण मुळींच पत्ता लागला नाहीं. डिटेक्टिव्हांनीं घराची अगदीं पूर्णपणें तपासणी केली; चोर पळाला ती खिडकी देखील नीट पाहिली; खिडकींत वर ठोकलेले आंकडे सुद्धां पाहिले; व चोराचा पुष्कळ तपास केला, पण शेवटीं त्यांना बक्षिसाच्या ५०० रुपयांवर पाणीच सोडावें लागलें.

३

सृष्टिनियमाप्रमाणें दिवस मागून दिवस चाललेच होते. आज १० दिवस झाले, चोरांचा कांहीं पत्ता नाहीं! बिचारे जीवनदास दैवावर हवाला ठेवून स्वस्थ बसले होते. तो दिवस शनवारचा होता जगू दुपारीं २ वाजतां शाळा सुटतांच तडक घरीं आला. बरेच दिवसांपासून डोक्यांत डिटेक्टिव्हपणाचें भरलेलें वेड आज प्रयोगार्थ जीवनदासांचे घरांवर चालविण्याचा त्यानें विचार केला होता. तो घरीं येतांच, दप्तर घरांत फेंकून तसाच जीवनदासाकडे गेला. मध्यंतरीं ८–१० दिवसांतच त्याचा जाण्याचा विचार होता. पण डिटेक्टिव्ह साहेबांना मध्यंतरी शाळेमुळें मुळींच वेळ मिळाला नाहीं. नाहीं म्हणायला एक रविवार मध्यें गेला खरा! पण त्या दिवशीं स्वतः विनायकराव घरीं असल्यानें, स्वारी घरींच बसली होती.

जीवनदास एका आराम खुर्चीवर कांहीं वाचीत पडले होते आज बरेच दिवसांत त्यांची व जगूची गांठ पडली होती. जगूनें जरा भीत भीतच झालेल्या चोरीची हकीगत विचारली. पण जीवनदासानें, शांतपणें त्यास ती सर्व हकीकत सांगितली, व शेवटीं, 'पोलीस व डिटेक्टिव्ह यांनाही, त्या चोरीचा पत्ता लागत नाहीं,' हें ही सांगून टाकलें. जगू म्हणाला "शेटजी तुम्ही जर रागावणार नाहीं तर माझीही इच्छा या चोरीचे संबंधांत थोडीशी चौकशी करावी अशी आहे, मात्र त्याला आपली पूर्ण परवानगी हवी." जीवनदासालाहि लहानग्या जगूचें कौतुकास्पद भाषण ऐकून मोठें आश्चर्य वाटलें, व त्यांनी जगूला चौकशी करण्यास पूर्ण मुभा दिली.

४

आमच्या चिमुकल्या डिटेक्टिव्ह साहेबांनीं आपली पराकाष्ठा केली, पण घरांत कांहींच तपास लागेना; पुढें चोर पळाला त्या खिडकीचे निरीक्षण करतांना, स्वारीला, खिडकीचेवर, पडद्याकरितां ठोकलेले लोखंडी आंकडे दिसून आले. बस! आमच्या छोटेखानी डिटेक्टिव्ह साहेबांनीं, त्या खिडकींतून चोराप्रमाणें उडी टाकण्याचें ठरविलें. लागलींच खालीं जाऊन, अंगणांत एक जाडी गादी अंथरली, व खिडकींतून जोरानें त्या गादीवर उडी मारली. सर्व तर ठीक जमलें; पण डोक्याची टोपी आंकड्यास अडकून खालीं अंगणांत येऊन पडली. लागलींच जगोबाच्या सुपिक डोक्यांत एक कल्पना आली, व त्यांनी अंगणाचें नीट निरीक्षण करण्यास सुरवात केली. हेतू हाच कीं, आपली जशी टोपी पडली, तसाच चोराच्या डोक्याचा फेटा वगैरे पडला असल्यास तो सांपडावा, बस! हाच उद्देश!

चिमुकल्या डिटेक्टिव्ह साहेबांचें नशीब मोठें जोरांत होतें, यांत तिळमात्र शंका नाहीं. थोड्याच वेळांत त्यांना एका कर्दळीच झाडामागें एक लांब व फाटकें वस्त्र सांपडलें. पण त्यांत कांहीं जीव नाहीं, म्हणून जगू फेकून देणार, तोंच त्याच्या एका पदरास कांहीं तरी बांधलेलें दिसलें. जगूनें सोडून पाहिलें,

तों तो एक चिठ्ठी होती. त्या चिठ्ठींत खालील मजकूर होता!

" मित्रा दगडू,

आपण लहानपणीं चांगली विद्या संपादन करून सुद्धां या चौरकर्मांत पडलों, त्याबद्दल मला फार पश्चाताप होत आहे. मी आतां हा धंदा सोडून दिला असून, नोकरीचे खटपटींत आहे. तेव्हां मला येत्या अमावस्येस बोरघाटांत, महारुद्राचे मंदीराजवळ, जरूर संध्याकाळीं ७ वाजतां भेटावें, व आपण मागें एकदां कादरभाईचे येथें मारलेल्या डल्ल्यांतील तुझ्या वांट्याचे वीस हजार रुपये घेऊन जावे. जरूर भेटावें. पुन्हा भेट होणार नाहीं. आ. पिरु "

चिठ्ठी वाचून, तें वस्त्र चोराचेंच असलें पाहिजे, याबद्दल पूर्ण खात्री झाली, व आपलें कार्य त्या चिठ्ठीच्या अनुरोधानें करण्यास त्यानें तात्काळ सुरवात केली

तो लागलीच जीवनदासाकडे आला व मोठ्यानें म्हणाला " चोर सांपडवून दिला, तर बक्षिस काय ? " जीवनदासला त्याच्या आवेशयुक्त भाषणाचें खूप हसूं आलें, व ते तितक्याच जोरानें म्हणाले " एक सायकल व २०० रु. ची १ आंगठी बक्षीस ! " ' ठीक आहे " असें म्हणून जगू घरीं गेला. जीवनदासाला मात्र जगूच्या भाषणाचें कांहींच वाटलें नाहीं.

५

दोन दिवसांनीं अमावास्या होती. जगूनें त्या चोराला पकडण्याचा निश्चय करून तो तयारीसही लागला. त्यांत आपणांस सायकल व आंगठी बक्षिस मिळणार यामुळें तर डिटेक्टिव्हसाहेबांना दुप्पट उत्साह आला होता, व हे दोन दिवस कधीं जातात असें त्याला होऊन गेलें होतें. शेवटीं तो दिवस उगवला. नित्याप्रमाणें जगू ४॥ वाजतां शाळेतून घरीं येतांच तडक जीवनदासाकडे गेला. व " माझे बरोबर ४ शिपाई द्या म्हणजे तुमचा चोर, तुमच्या समोर ४ तासांत उभा करतो " असें आवेशानें म्हणाला. पण जीवनदासानें, जगू कांहीं तरी वात्रटपणा करीत आहे, असें समजून कांहींच उत्तर दिलें नाहीं. पुन्हा जगू म्हणाला " शेटजी पाहिजे तर तुम्ही मजबरोबर चला, मी तुम्हांस चोर दाखवितों " शेटजीलाही या ८।१० दिवसांत, चोर सांपडण्याकरितां, जो कोणी कांहीं युक्ति सांगे, ती करून पाहण्याचे अगदीं वेड्च लागून गेलें होतें. तेव्हां जगूचें म्हणण्याकरतां जास्त आढेवेढे न घेतां, पोलिस चौकींतून ४ शिपाई बरोबर घेऊन, ते जगू बरोबर जंगलांत चलण्यास तयार झाले.

बोर घाटांतील महारुद्राचें मंदीर, त्यांचे घरापासून जवळ जवळ २ मैल होते जगूनें तर आज अगदीं कंबरच बांधली होती. हो ना करतां करतां जवळ जवळ ६ वाजतां तें सर्व त्या ठिकाणीं जाऊन पोहोंचले.

मंदिराजवळच एक मोठा वट वृक्ष होता. त्यावर ही सारी मंडळी पानांचे आड जाऊन, चुपचाप बसली. आसपास किर्र झाडी असून, सर्वत्र अगदीं गंभीर भीषणता पसरली होती. जगू झाडावर बसल्या बसल्या सारखी ' पिरु व दगडूची ' वाट पहात होता. जर ते न आले, तर आपली फट फजिती होईल, व आपली डिटेक्टिव्ह पणाची हौस पार मावळून, सर्व मुलें हि आपणांस नांवें ठेवतील, म्हणून तो सारखा त्यांचे वाटेकडे डोळे लावून बसला होता. जीवनदास अगदीं चूपचाप बसून पुढें ७ वाजतां जगन्नाथराव डिटेक्टिव्ह कोणांस दाखविणार त्याचा विचार करीत बसले होते; पोलीस काय बिचारे ! मालका प्रमाणेंच स्वस्थ बसून पुढें घडणाऱ्या गोष्टींची वाट पहात होते !

शेवटीं पिरू तर एकदाचा आला. त्यानें बरोबर एक रुपयांची थैली आणलेली दिसत होती थोड्याच वेळांत दगडोपंतही आले. पिरूनें दगडोबाचे २० हजार रुपये तात्काळ त्यास देऊन, व आपण इतःपर

चोरी न करण्याची शपथ घेतली आहे म्हणून सांगितलें. दगडोबानें मात्र ' आपण हाच धंदा पुढें चालवणार ' असें सांगून, थोडक्यांत, जीवनदासाचे येथें केलेल्या चोरीचें वर्णन केलें यावर आणखीन थोडेसें औपचारिक भाषण होऊन त्यांचा जाण्याचा रंग दिसतांच, वरून चौघा पोलिसांनीं एकदम उड्या टाकून, दगडोबास लागलीच चतुर्भुज केलें. दगडोपंताची पांचावर धारण बसली, व पिरु तर बिचारा घाबरून, सर्वांच्या पाया पडूं लागला. शेवटीं आमच्या चिमकुल्या डिटेक्टिव्ह साहेबांस, त्यांची दया येऊन, पिरूस सोडून देण्याबद्दल त्यानें जीवनदासास सांगितलें, व त्यांनीही पोलिसांकडून त्यास सोडून दिलें. पुढें कोर्टांत खूप मार खाल्यावर दगडूनें सर्व जवाहीर व नोटा वगैरे माल, गाडलेल्या जागेंतून आणून जीवनदासांचे स्वाधीन केला. अशा तऱ्हेनें जीवनदासांस आपला माल परत मिळाला व दगडूस कोर्टातर्फे बरीच मोठी शिक्षा सुनावण्यांत आली. असो !

जीवनदासास, आपला सर्व माल जसाच्या तसा परत मिळाला या बद्दल खूप आनंद झाला, व त्यांनीं कबूल केल्याप्रमाणें आमच्या चिमकुल्या डिटेक्टिवांस एक चांगली सायकल व २०० रुपयाची आंगठी बक्षिस दिली. आमच्या चिमुकल्या डिटेक्टिवांनीं मात्र, दुसरेच दिवशीं शाळेंतील सर्व सोबत्यांना, आपली सायकल दाखवून, व ती कशी मिळवली, याबद्दल आपल्या धैर्याची गोष्ट सांगून, आपल्या चातुर्याबद्दल सर्वांकडून वाहवा मिळविली.

---

# एक जपानी वीर

( लेखक—पु. शि. रेगे )

" तीं पहा तिकडे किती धूळ उसळत आहे ती! शत्रु तर आले नाहींत ना ? अरे हे तर आपले जपानी वीर ! " जपानी सैन्याचा कॅप्टन किनो म्हणाला

" जपानचा विजय असो. " दुरून एक आरोळी ऐकूं आली. किनो कृतकृत्य झाला.

" ते पहा शत्रु आले " एक सैनिक उद्गारला.

" थाड् थाड्, थाड्, " रशियन सैन्यांतील घोड्यांच्या टापा ऐकूं येऊं लागल्या. रशियन जवळ आले भयंकर रण माजून राहिलें.

अरे, हा कोण वीर एकटाच लढत आहे ! अरे, हा तर किनो, शाबास !

जपानी सैन्य आतां सर्व खलास झालें. किनोच काय तो एकटा उरला.

किनो आतां रशियनांचा कैदी झाला. रशियन सेनापतीला त्याची फार चीड आली होती. तो रागीट मुद्रेनें म्हणाला—

" तुम्हीं आतां आमचे कैदी आहांत. मुकाट्यानें शरण या. "

" आमचा प्रभु आणि आमचा राजा यांशिवाय कोणापुढेंही आमची मान वांकत नसते. मी जरी तुमचा कैदी असलों तरी मी तुम्हांला कधींही शरण येणार नाहीं " किनो गर्जना करित म्हणाला.

" तुम्ही व्यर्थ आपले प्राण गमावित आहां, पुन्हां एकवार विचार करून पहा. "

" माझा विचार ठाम आहे. तुम्हीं आपलें काम करा. "

" शिपाईहो, उपसा तरवारी ! " रशियन सेनापति क्रोधाविष्ट होऊन म्हणाला.

" जपानचा विजय असो. " एक अस्पष्ट किंकाळी ऐकूं आली आणि जिकडे तिकडे सामसूम झालें.

---

# जग हें असें आहे.

आमचा शिवा एक गरीब शेतकरी होता. तो आपल्या झोंपडींत सकाळच्या प्रहरीं चिलीम ओढीत बसला असतां तिकडून एक छाकटा पोषाख केलेले गृहस्थ आले, त्यांचें नांव वसंतराव होतें.

वसंतराव:—कां शिवाजीराव, आज तुम्ही असें खिन्न कां दिसतां ?

शिवा:—काय सांगू बाबा! ही समोर जमीन दिसती आहे ना तींत मी एक कांकडीचा वेल लावला होता.

वसंत:—कां नाहीं लावणार ? जमीन रिकामी पडून काय करावयाचें! वेल लावलेच पाहिजेत.

शिवा:—तो वेल वाढूं लागला.

वसंत:—वेल तर वाढणारच, त्यांनीं कां वाढूं नये! तुम्ही किती खटपटीनें तो वेल लावलात त्याला पाणी किती घातलेंत, खत किती घातलेंत, वेलांनीं कां वाढूं नये!

शिवा:—वेल वाढल्यावर त्याला तीन कांकड्या लागल्या.

वसंत:—कां नाहीं लागणार ? हो कांकड्या तर आल्याच पाहिजेत, नाहीं तर वेलाचा काय उपयोग! तीनच काय पण आणखीहि कांकड्या येतील.

शिवा:—त्यांतली एक कांकडी मी घरीं ठेवली आणि दोन विकावयास नेल्या.

वसंत:—कां नाहीं विकणार ? कांकड्या विकल्याच पाहिजेत. घरीं ठेवून काय फायदा! एक तर तुम्ही गरीब आणि दुसरे तुम्ही तीन कांकड्या खाल्ल्या असत्या तर श्रीमंत दिसला असलात आणि तुम्हांला थंडी झाली असती. बरं केलेंत दोन कांकड्या विकल्यात ते.

शिवा:—मी बाजारांत गेलों तों एक सरकारी माणूस आला आणि मजजवळ एक कांकडी, कर म्हणून मागूं लागला.

वसंत:—कां नाहीं मागणार ? हो तो तर मागणारच, अवश्य मागणार, त्यांनीं कां मागूं नये ? तो सरकारी नोकर आणि त्याला तसा हुकूम झालेला.

शिवा:—पण मी त्याला कर देण्याचें नाकारलें.

वसंत:—कां नाहीं नाकारणार ? वा! फार छान केलेत. असेंच करावयास पाहिजे त्या लोकांचे तुम्ही काय घेतलें होतेंत. असेल सरकारी नोकर म्हणून कर काय म्हणून घ्यावा ? तुम्ही इतकी मेहेनत करून कांकडीचा वेल लावला आणि त्याला म्हणे कांकडी द्या. आणि त्याला एक कांकडी देऊन तुमच्याजवळ हो काय रहाणार ? बरं केलेंत नाहीं दिलीत ती.

शिवा:—पण मी कांकडी देत नाहीं असें पाहून तो माझ्या बरोबर दंगा करूं लागला व कांकडी घेऊं लागला.

वसंत:- कां नाहीं घेणार ? मग त्यांनीं काय करावें! तो पडला सरकारी नोकर, आणि तुम्ही कर देत नव्हता मग तो कांकडी घेणारच.

शिवा:—कांकडीची हिसका फासक चालली असतां तिचा टवका उडाला, हें पाहून मला राग आला आणि मी त्याला चांगल्या शिव्या दिल्या.

वसंत:—कां नाहीं देणार ? अहो तुम्ही मेहेनत करून लावलेली कांकडी अशा रीतीनें खराब झालेली पाहून तुम्ही शिव्या देणार नाहीं तर काय करणार ?

शिवा:—मग तो मला शिव्या देऊं लागला.

वसंत:—कां नाहीं देणार ? त्याने तरी काय करावें ? एक तर तुम्ही त्याला कर दिला नाहींत आणि वर शिव्या देऊं लागलात. त्यांनीं काय करावें!

शिवा:—त्या शिव्या ऐकून मी रागावलों व मी त्याला शिवीगाळ करूं लागलों.

वसंत:—कां नाहीं करूं लागणार? वाहवा! वाहवा! फार छान केलेंन. त्यानें तुम्हाला शिव्या दिल्या, मग तुम्ही काय स्वस्थ बसणार?

शिवा:—मग त्यानें माझी मान धरली आणि चार दोन बुक्के मारले.

वसंत:—कां नाहीं मारणार? तुम्ही त्याला कर दिला नाहींत. आणि वर त्याला शिव्या दिल्यात मग तो काय गप्प बसणार?

शिवा:—त्यानें मला मारलें आणि कांकडी घेऊन गेला.

वसंत:—कां नाहीं नेणार? इतकी मारामारी शिवीगाळ करूनहि त्यानें नेऊं नये?

शिवा:—मग मला राग आला आणि मी दुसरी कांकडीहि गटारांत फेंकून दिली आणि घर गांठलें.

वसंत:—कां नाहीं फेंकणार? ज्या कांकडीकरितां इतका मार खाला, ती काकडी ठेवून काय करायची?

शिवा:—मग मी घरीं येऊन तो वेलहि उपटून टाकला आणि जाळून टाकला.

वसंत:—कां नाहीं जाळणार? ज्या कांकडीकरितां इतका अपमान झाला, त्या कांकडीचा वेल ठेवून काय करायचें?

शिवा:—मग त्या वेलाकरितां माझें मन हळहळूं लागलें.

वसंत:—कां नाहीं हळहळणार? ज्या वेलाकरितां तुम्ही इतके हाल सोसलेत, तो वेल उपटतांना तुम्हांला काय सुख होणार?

शिवा:—पण आतां तुमच्याजवळ सारें ओकून टाकल्यामुळें मला बरें वाटत आहे.

वसंत:—कां नाहीं वाटणार? लोकांना दुःख सांगितलें म्हणजे हलकें होतें?

नंतर वसंतरावनीं चिलीम ओढली आणि घरचा रस्ता सुधारला. जग हें असें आहे.

---

## चुटके

एक गृहस्थ.—काय रे! तुमच्या शिक्षकांना शिक्षणाची कोणती शाखा आवडते?

मुलगा:—छे बुवा, आमच्या शिक्षकांना शाखा बिखा कांहीं आवडत नाहीं. ते आम्हाला रुळानेंच मारतात.

× × ×

कामांत गुंतलेले मास्तर:—"अरे गणू घरीं जा आणि तिला सांग कीं, कामाच्या गडबडींत मी पुन: घड्याळ आणावयाचें विसरलों तेवढें तूं घेऊन ये" घड्याळ काढून "हें पहा आतां बारा वाजले आहेत. एक वाजतां परत ये."

× × ×

बाप:—बाबू, माझें तुझ्यावर किती प्रेम आहे हें दाखविण्याकरितां मी तुला शिक्षा करतों.

मुलगा:—बाबा मी जर थोडा मोठा असतो, तर मी आपलें प्रेम परत केलें असतें.

× × ×

मास्तर:—कां रे तूं शाळेंत कां येत नाहींस?

मुलगा:—मी इतिहासांत वाचलें आहे कीं, मोठीं माणसें शिक्षणाशिवाय मोठीं होतात आणि मी इतर मुलांपेक्षां अधिक महत्त्वाकांक्षी आहे.

× × ×

सरदार भोसले:—डॉक्टर मला काय झालें आहे?

डॉ.:—मला वाटतें तुमचें रक्त शुद्ध नाहीं. मी तें शुद्ध करावयास औषध देतों


सरदार (रागानें) काय म्हणतां डॉक्टर? अहो मी महाराष्ट्रांतील स्वराज्य संस्थापक शिवाजीचा वंशज ना!

× × ×

# टस्कीजी इन्स्टिटयूट.

बुकर टी. वॉशिंग्टनचें नांव ज्याला ठाऊक नाहीं असा मनुष्य विरळा. बुकर टी. वॉशिंग्टन हा अमेरिकेंत मोठा पुरुष होऊन गेला. निग्रो लोकांचें नांव उच्चारलें कीं, सुधारलेल्या लोकांना त्यांच्याविषयीं तिरस्कार वाटतो. हे निग्रो लोक दक्षिण अमेरिकेंत होते व त्यांना गुलामाप्रमाणें वागवीत. त्यांच्या हळू निग्रो लोकांच्या दुःखाची कल्पना येऊं लागली. अमेरिकेचे प्रेसिडेंट रुझवेल्ट यांनीं वॉशिंग्टनला सरकारी वाड्यांत मेजवानीस बोलावलें. दिवसेंदिवस निग्रो लोकांची गुलामगिरींतून सुटका होऊं लागली.

१८६७–६८ सालीं त्यांना नागरिकत्त्वाचे हक्क अमेरिकेंत मिळाले. परंतु शिक्षण नसल्यामुळें त्यांना



टस्कीजी इन्स्टिटयूटची एक इमारत.

छळाची व त्यांना लाथा बुक्या मारून त्यांचे प्राण घेतल्याचीं अनेक उदाहरणें आहेत. आपल्याकडे अस्पृश्यांना ज्याप्रमाणें जवळ येऊं देत नाहींत, त्याप्रमाणें निग्रो लोकांची स्थिति होती; ही स्थिति पाहून वॉशिंग्टननें आपल्या साऱ्या आयुष्यभर आपल्या ज्ञातिबांधवांची स्थिति सुधारण्याचे प्रयत्न केले. अमेरिकन लोकांना हळू हक्कांचा फायदा घेतां आला नाहीं. तेव्हां आपल्या लोकांना शिक्षण दिलें पाहिजे ही गोष्ट बुकर टी. वॉशिंग्टनला पटली. त्यानें टस्कीजी इन्स्टिटयूट नांवाची संस्था काढली. या संस्थेमार्फत आपल्या लोकांना शिक्षण देण्याचें काम त्यानें सुरू केलें.

अमेरिकेंत सुमारें १॥ कोटी निग्रो लोक आहेत

आणि त्यांची ही संख्या झपाट्यानें वाढत आहे. हे लोक प्रथम अगदीं रानटी होते. त्यांना धर्म वगैरे कांहीं नव्हता. त्यामुळें त्यांना खिश्चन करण्यांत आलें. ते काबाडकष्ट करून, मजुरी करून आपलें पोट भरीत असत. टस्कीजी इन्स्टिट्यूटमध्यें निग्रो लोकांना धंदेशिक्षण व इतर शिक्षण देण्याकरितां देशभक्त तयार केले जातात. ही संस्था प्रथम अगदीं लहान होती. एका झोंपडीमध्यें ही संस्था सुरू झाली. निग्रो लोक

निग्रो लोकांना आपण निग्रो आहों म्हणून लाज वाटत असे. परंतु वॉशिंग्टननें त्यांची ही विचार परंपरा खोडून काढली. आपण आपल्या जातीबद्दल अभिमान बाळगला पाहिजे असें तो म्हणे. परक्यांचें अनुकरण न करतां आपण आपली सुधारणा केली पाहिजे असें त्याचें सांगणें होतें.

निग्रो लोक शिकले, ते कॉंग्रेसचे सभासद झाले, ते कर्तबगार बनले, व त्यांनीं आपल्या ज्ञातिबांधवांची



टस्कीजी औद्योगिक शाळा.

फार मागासलेले आहेत, तेव्हां त्यांना शिक्षण देऊन हि कांहीं फायदा होणार नाहीं, अशा अडचणी गोरे लोक वॉशिंग्टनच्या मार्गात आणू लागले. परंतु वॉशिंग्टन कच्चा नव्हता. त्यानें त्यांना जुमानलें नाहीं.

वॉशिंग्टनच्या प्रयत्नाला यश येऊं लागलें. लोक शिक्षण घेऊं लागले. त्यांनीं स्वतःच्या कपड्यांत, स्वतःच्या रहाणींत, स्वतःच्या वागण्यांत फारच क्रांती घडवून आणली.

उन्नती केली. जेथें जेथें शेतें रिकामीं पडलीं होतीं, तेथली तेथली शेतकी त्यांनीं सुधारली. कोणत्याही राष्ट्राचा उदय होण्यास त्याचे उद्योगधंदे सुधारले पाहिजेत ही गोष्ट त्यानें संस्थेंतील विद्यार्थ्यांना पटवून दिली. आपल्या संस्थेंतील विद्यार्थ्यांनीं नुसत्या नोकऱ्या पहात हिंडूं नये, तर त्यांनीं कोठें उद्योग धंदे निघण्यासारखे आहेत कीं काय याची चवकशी करावी, लोकांना उद्योगधंदे काढून द्यावेत आणि

आपल्या ज्ञातिबांधवांची उन्नति करावी असे वॉशिंग्टन सांगे.



बुकर टी. वाशिंग्टन.

या त्याच्या उपदेशानें निग्रो लोक सुधारले व ते स्वतः चांगल्या स्थितींत राहूं लागले. निग्रो लोकांच्या व आपल्या ध्येयांत फरक असला तरी त्यांच्या उदाहरणावरून आपण पुष्कळ गोष्टी शिकल्या पाहिजेत.

आपल्या देशांत उद्योगधंद्याकडे लोकांचें जावें तसें लक्ष जात नाहीं. आपली शेतकी कशी सुधारतां येईल हेंहि आपण पहात नाहीं. शाळेंतून विद्यार्थी सुटला कीं तो नोकरीच्या मागें लागतो. त्यामुळें प्रत्येकजण परावपलंबी बनतो, व राष्ट्रामध्यें बाहेरून पैसा येईनासा होतो. राष्ट्रीय शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांनीं या गोष्टी लक्षांत ठेवल्या पाहिजेत व आपली स्थिति सुधारली पाहिजे. आपली संस्कृति आपला धर्म, आपला इतिहास निग्रो लोकांपेक्षां फार उज्वल असल्यामुळें आपल्याला आपली उन्नति करून घेतां येईल यांत बिलकुल संशय नाहीं.


मुलांकरितां ] **पंचतंत्र** [ सचित्र !

संस्कृत् पंचतंत्रांतील सर्व गोष्टींचें मराठी सुबोध भाषांतर केलें असून प्रत्येक गोष्टीस सुबक चित्र जोडलें आहे. एकंदर गोष्टी ५० असून चित्रेंही ५० आहेत. इसापनीतिप्रमाणेंच पंचतंत्रांतील गोष्टीही विशेष मनोरंजक असून बोधप्रदही आहेत. टाईप ग्रेट, कागद ग्लेझ, पृष्ठसंख्या ३५०. बाईंडिंग जाड पुठ्याचें, किं. १८४ ट. ह. ८४ शिवाय.

म्यानेजर—चित्रशाळा प्रेस, पुणें.

# सेन्ट निहालसिंग.

सेन्ट निहालसिंग यांची माहिती अद्याप हिंदुस्थानांतील लोकांस नाहीं; कारण ते लहानपणीं विद्यार्थीदशेंत असतांनाच परदेशांत गेले. हे जातीनें अस्सल शीख आहेत. आपल्या हातून मोठमोठ्या देशकार्याच्या गोष्टी घडाव्या हा ध्यास सारखा त्यांचे मनास लागून राहिला होता. देशपर्यटणानें ज्ञानसंपादन होऊन वरील गोष्ट साध्य होण्यासारखी आहे असें त्यांना वाटून ते एक दिवस आपल्या आईबापांसही न विचारतां घरांतून निघून गेले. निघतांना फक्त एक रुपया त्यांचे जवळ होता. परंतु त्यांची लेखनशक्ति दांडगी असल्यानें त्यांनीं लेख लिहून आपला खर्च भागविला. यांची लेखनशक्ति इतकी अप्रतिम आहे कीं, तिच्या जोरावर यांनीं सर्व जगाचा प्रवास केला. अमेरिकेंत असतांना त्यांचें लेखनकौशल्य इतकें गाजलें कीं एका प्रसिद्ध वर्तमानपत्रकर्तीचें मन त्यांच्यावर या कलेमुळें जमलें व लवकरच त्यांचा विवाह झाला. वर्तमानपत्रकारांचे मुकुटमणि मि. डब्ल्यू. टी स्टेड—ज्यांनीं ४० वर्षें हा लेखकांचा धंदा सतत चालविला होता, त्यांनीं आपले 'रिव्ह्यू ऑफ रिव्ह्यूज' या पत्रांत सेन्ट निहालसिंग यांचे संबंधीं असे उद्गार काढले आहेत कीं मी या चाळीस वर्षांत न्याहालसिंगासारखा बुद्धिवान् लेखक पाहिलाच नाहीं. यावरून सेन्ट न्याहालसिंगाची योग्यता किती मोठी आहे, याची साक्ष सहज पटण्यासारखी आहे. हे प्रख्यात देशभक्त आहेत. व्हांकुव्हर बेटांत हे गेले असतांना तेथील हिंदी रहिवाशांचा अतोनात छळ होत आहे हें त्यांच्या नजरेस आल्याबरोबर आपल्या लेखणीच्या व कर्तृत्वाच्या पराक्रमानें सर्व अमेरिका दणाणून सोडली. त्यामुळें लोकांचें व अधिकाऱ्यांचें लक्ष त्या प्रश्नाकडे खेंचलें जाऊन हिंदी रहिवाशांच्या दुःखाचें प्राय निवारण झालें. अमेरिकेंत त्यांनीं लेखनकलेंत इतकें मोठें प्राविण्य मिळविलें कीं, असा नामांकित लेखक अमेरिकेंत पूर्वीं कधीं झाला नाहीं असें अमेरिकन लोक म्हणूं लागले. इतकेंच नव्हे तर तेथील बोहेमियन मॅगेझिन या प्रसिद्ध मासिकाचे संपादक नेमण्यांत आलें, हा मान अपूर्व होता.

आजपर्यंत कोणाही हिंदू विद्वानाला हा संपादकत्वाचा मान इंग्लंड किंवा अमेरिकेंत मिळालेला नाहीं.




निहालसिंग सन १९१० सालीं अमेरिकेहून आले. तेथें थोडेच दिवस राहून परत हिंदुस्थानांत येण्याचा त्यांचा विचार होता. परंतु अमेरिकेची त्यांची कीर्ति इंग्लंडास केव्हांच पोहोंचली होती, त्यामुळें शेंकडों विद्वानांच्या आणि वर्तमानपत्रांच्या लेख लिहून देण्यासाठीं त्यांच्यावर उड्या पडल्या. यामुळें पांच सहा दिवसांऐवजीं त्यांना पांच सहा महिने इंग्लंडांत काढावे लागले. पुढें ते पत्नीसह हिंदुस्थानांत परत आले. निहालसिंगांचे पार्लमेन्टमध्येंही उत्तम वजन आहे, हें अनेक वेळां दिसून आलें आहे.

# चांदोबाचें चित्र.



१ थांब, मी तुझें चित्र काढतों.

२ मला वाटतें थोडें वर गेलें पाहिजे.



३ अजून मी पुरेसा वर आलों नाहीं.

४ हंसतोस काय ?



५ अरे लुच्चा ! पकडला तुला.

६ पुनः हा खालींच.

# दोघांचें भांडण आणि तिसऱ्याचा लाभ.

एका बेडकानें एक उंदीर तांदुळाचा दाणा खात असलेला पाहिला. बेडूक म्हणाला, "हा माझा तांदूळ आहे." उंदीर म्हणाला, " छे तूं खोटें बोलतोस." " बेडूक कधीं तांदूळ खातात कां ?"




असें म्हणून ते दोघे लढूं लागले. या लढाईत पुष्कळ मारामारी झाल्यावर उंदराचा जय झाला.



बेडकानें ही गोष्ट लक्षांत ठेवली. व एके दिवशीं तो उंदराकडे गेला आणि म्हणाला, ' उंदीरदादा आपलें भांडण झालेलें पाहून मला फार वाईट वाटतें." आपण आजपासून मित्र बनू या. ही मैत्री दाखविण्याकरितां तुझा पाय माझ्या पायांत आडकव आणि या गवताच्या काडीनें बांध आणि मग आपण सगळ्या रानभर हिंडूं आणि लोकांना मित्र झालोंत असें दाखवूं

उंदरानें तसें केलें. बेडूक लुच्चा होता. तो तळ्याच्या कांठीं पोंहोचतांच त्यानें आंत उडी मारली.



बिचारा उंदीरहि आंत पडला आणि बुडाला. पण त्याचें धड पाण्यावर तरंगत आहे, इतक्यांत तिकडून



एक घार आली. तिनें उंदराला चोचींत पकडलें. पण बेडकाचा पायहि उंदराच्या पायाला बांधला होता. त्यामुळें दोघेजण घारीच्या तोंडांत पडले.

---

सूचना:--कोड्याचीं उत्तरें पुढील अंकीं देण्यांत येतील.

# रंगीत इसाप-नीति.

ह्यांत एकंदर इसापनीतींतील आठ अगदीं सोप्या गोष्टी मोठ्या व जाड टाइपांत दिलेल्या असून प्रत्येक गोष्टीसमोर त्यांतील रहस्य दाखविणारें रंगीत सुंदर चित्र दिलेलें आहे. चित्रें पाहूनच मुलांना गोष्टींतील तात्पर्य कळतें. किं० ८६ ट. ह. ८८६.

# सचित्र इसाप-नीति.

[ उत्तरार्ध. ]

[ नवीन भाषांतर भाग २ रा. ]

वरीलप्रमाणेंच हा दुसरा भाग विक्रीस तयार आहे. ह्याची सुमारें ३०० पानें झालीं असून ह्यांत १५० गोष्टी आहेत चित्रांची संख्या १५० पर्यंत आहे. किं० ।८४.

दोन्ही भाग एके ठिकाणीं बांधलेलें सुंदर पुस्तक किं० रु० २

# विद्यार्थ्यांकरितां नाटिका.

शीलं परं भूषणम्.

ही नाटिका प्रसिद्ध कवि-शिरोमणि नारायण वामन टिळक यांनीं केवळ लहान मुलांकरतांच लिहिलेली आहे यांत शृंगाररस मुळींच नाहीं. एवढेंच नव्हे, तर स्त्रीची भूमिका या नाटकांत आणलेलीच नाहीं शिवाय नाटकाचा विषय नैतिक विचारानें पूर्ण भरलेला असल्यामुळें शाळांतून वार्षिक संमेलनाचे वेळीं मुलांकडून ह्या नाटकाचा प्रयोग करविण्यास तें योग्य आहे. नाटकाचा विषय धनाची योग्यता जास्त किंवा ज्ञानाची योग्यता जास्त हा आहे. पुस्तकांत चार सुंदर चित्रें कथानकास अनुसरून दिलेलीं आहे. किं० ८४.

म्यानेजर—चित्रशाळा प्रेस, पुणें.

# चिमुकलें भारत व रामायण.

महाभारत व रामायण हे आपले राष्ट्रीय ग्रंथ आहेत. यांत आपला प्राचीन इतिहास असून प्रपंच साधून परमार्थ कसा जोडावा हे उत्तम दाखविलें आहे. व्यावहारिक बोधाचा ह्या केवळ खाणी आहेत, आबालवृद्ध स्त्री-पुरुषांना या ग्रंथांचें ज्ञान होणें अगत्याचें आहे, प्रौढांकरितां आमचीं लोकप्रिय ' भारती युद्ध ' व ' रामचरित्र ' हीं पुस्तकें आहेत. आतां बारातेरा वर्षांच्या मुलांमुलींकरितां चिमुकलें भारत व चिमुकलें रामायण ' हीं दोन पुस्तकें अनुक्रमें आम्हीं रामकृष्णबाबुंचे प्रसिद्ध लेखक रा. कृष्णाजी गोविंद किनरे व रा. विद्याधर वामन भिडे बी. ए. यांजकडून मुद्दाम लिहविलीं आहेत. पुस्तकाची भाषा फारच मोहक व सोपी आहे. वाचतां वाचतांच मुलांच्या मनावर त्यांतील रहस्य ठसावें म्हणून उपदेशपर वाक्यें जाड टाइपांत घातलीं आहेत, आणि कथानकांच्या अनुरोधानें हाफटोन प्रोसेसनें तयार केलेलीं भारतांत आठ व रामायणांत सात अशीं सुंदर चित्रें घातलीं आहेत. भारताचीं पृष्ठें १७२ व रामायणाचीं पृष्ठें ८२. छपाई बांधणी सुबक. किं० ८६, व रामायण किं० ८४.

म्यानेजर—चित्रशाळा प्रेस, पुणें शहर.

॥ ॐ नमः श्रीरामचंद्राय ॥

# आर्यमहौषधालय मु० पो० आंजर्ले.

**कोंकणप्रांतांतील अगदीं ताज्या व शुद्ध वनस्पतींचीं जगत्प्रसिद्ध निर्दोष व रामबाण औषधें.**

**कंदर्पमंजरी पाक**—हा अपूर्व पाक गरिबांपासून तों अमीरउमरावांपर्यंत सर्वांसही अत्यंत उपयोगी असूनें किंमत माफक ठेविली आहे. यांत मौक्तिक, प्रवाळ, लोह, माक्षिक, कस्तूरी, अंबर इ० अत्युच्च गुणकारक पदार्थ असून शिवाय बदाम, पिस्ते, अक्रोड चारोळी, केशर, वेलची, पंजाबी सालममिश्री, सफेतमुसळी, पत्री, गोक्षुर, शतावरी, आस्कंद, वंशलोचन वगैरे (८०) उपयुक्त वनस्पति घातल्या आहेत. यानें पथ्यावांचून गुण येतो. यापासून कोणत्याही कारणांनीं होणारा व कशाही प्रकारचा शुक्रस्राव, नपुंसकत्व, मूळव्याधि, रक्तदूषणामुळें त्वगूरोग, स्त्रियांची धुपणी व गर्भाशयस्थ दोष या भावना त्यांच्या एकंदर उपविकारांसह तत्काल बऱ्या होऊन धातुवृद्धि होते, व शरीर कणखर आणि तेजस्वी बनतें. २० तो० ड० २ रुपये. एकदम ३ डबे घेणारास ५ रुपये.

**स्वर्णधात्री तेल**—हें चारोळी, बदाम, कंकोळ, एला, बहुविध वनस्पतींचीं सत्त्वें व उपयुक्त तेलें अशा अनेक पदार्थांनीं बनविलें असल्यानें याच्या मर्दनापासून अपस्मार, उन्माद, वेड, चक्कर इ० रोगांस जलद आराम पडतो. केंसांस चोळल्यानें केंस काळे कुळकुळीत, तजेलदार, सडक लांब व मृदु होऊंन मेंदु शांत आणि रोगरहित बनतो. यानें मस्तकाचें टक्कल जातें. हें अंगास चोळून स्नान करीत गेल्यानें शरीराचा दुर्गंध जातो. खरूज, गजकर्ण, शिबें, तसेंच तळपाय, तळहात, डोळे व मस्तक यांचा दाह हे विकार खास बरे होऊन निद्रा चांगली येते, आणि नेत्ररोग दुरुस्त होतात. बा० किं० १। रु०

**दंतरक्षक पूड**—ही दांत व हिरड्या यांचे सर्व विकार तत्काल दुरुस्त करून दांत स्वच्छ व मजबूत करण्यांत प्रतिज्ञेची आहे. ड. ६ आणे.

**सुरंगी, मालती, कल्हार, गुलबहार, दणाणा, लक्ष्मीविलास** इ० बादशाही अति उंची अत्तरें व त्याचप्रमाणें गुलाब, हिना, केवडा, चमेली, जाई वगैरे सुगंधी अत्तरें आणि केंसांस लावण्याचीं हरएक प्रकारचीं सुवासिक तेलें माफक दरानें पूर्ण खात्रीचीं मिळतील.

**सूचना:**—वरील औषधें व अत्तरें वगैरे पूर्ण खात्रीचीं असल्यामुळें आज चवीस वर्षांत त्यांचा लक्षावधि लोकांस अप्रतिम उपयोग झाला म्हणून त्यांचा मेहमीं फारच खप होत आहे. अनुभवानंतर पूर्ण खात्री पटेलच. औषधें माहितीचे सर्ट्यासह रोखीनें अगर व्ही. पी. नें पाठवूं. प्यांकिंग व टपाल खर्च वेगळा. घाऊक घेणारास कमिशन भरपूर. सर्व औषधांच्या आणि आरोग्यरक्षणाच्या माहितीचें सचित्र मोठें पुस्तक देऊं. आमचीं औषधें वगैरे मागविणें तीं खालील बिनचूक पत्त्यावर मागवावीं

**कृष्णशास्त्री बिवलकर, वैद्य.**

REGISTERED. B. NO. 179




## अनुक्रमणिका.


| विषय. | पृष्ठ. |
|---|---|
| जपान व शिक्षण. | १४१ |
| प्रतापी प्रतापसिंह ( नाटक. ) | १४[illegible] |
| उपयुक्त माहिती. | १४८ |
| चुटके. | १४९ |
| एक अद्भुत गोष्ट. | १५० |
| तंबाखू. | १५३ |
| शिवाजी महाराजांचा उदारपणा. | १५४ |
| प्राण्यांचा शिकवण. | १५५ |
| गाढव कोण ! | १५६ |
| मधमाशांचें पोळें व मांजर. ( चित्रें ) | १५७ |
| शालापत्रकाची चढाओढ. | १५८ |
| पाणिनी.. | १६० |


मुद्रक व प्रकाशक—रा. रा. शंकर नरहर जोशी, चित्रशाळा प्रेस, १०२६ सदाशिव पेठ पुणें सिटी.

# जोडाक्षर-विरहित वाचनपाठ.

हें पुस्तक नुकत्याच अक्षर ओळख झालेल्या मुलांमुलींकरितांच लिहिलेलें आहे. पुस्तकांत एकंदर १७ गोष्टी अगदीं सोप्या मार्गानें, व एकहि जोडाक्षर न येऊं देतां लिहिल्या आहेत. प्रत्येक गोष्टीचे आरंभीं कथानकाचें मूर्तिमंत चित्र दिलें असल्यामुळें गोष्ट वाचण्याचे अगोदरच त्यांतील सारांश मुलांचे सहज लक्षांत येतो. किं. अवघी चार आणे

# उजळणीचें पुस्तक.

यांत सर्व मुळाक्षरें चित्रयुक्त दिलीं असून मोडी व बालबोध बाराखड्या तयार करण्याची समजूत थोडक्यांत करून दिली आहे. नंतर मोडी व बालबोध सोपे शब्द मुलांना सहज ओळखण्यासारखे दिले आहेत. पुढें १० अंक साचित्र दिले असून त्याबरोबर मुलांस बेरीज व वजाबाकीची समजूत टिंबांच्या आकृतींनीं व गोट्यांच्या चौकटीच्या सहाय्यानें घालून दिली आहे. नंतर पाढ्यांची समजूत दिली असून शेवटीं उजळणी दिली आहे, एकंदरींत हें पुस्तक नवीन तऱ्हेनें मुलांना शिकविण्यास फार उपयुक्त असें झालें आहे. कागद ग्लेज किं. ०।८६.

## लहान मुलांकरितां उपयुक्त अशीं पुस्तकें.

## नवी आवृत्ति ] सचित्र अक्षरबोध. [ नवी आवृत्ति

या पुस्तकांत ' अ ' पासून ' ज्ञ ' पर्यंत स्वर आणि व्यंजनें हीं सर्व निरनिराळ्या भपकेदार रंगांत व तें अक्षर नांवांच्या प्रथम अक्षरानें दर्शविणाऱ्या चित्रांसह दाखविलेलीं असून १ पासून १० पर्यंत अंकहि त्याच पद्धतीनें दाखविलेले आहेत. पुस्तकाचा साईझ क्राऊन चतुर्थांशाइतका मोठा ७×९ इंच ठेवला असल्यामुळें अक्षरें व चित्रें फारच ठळक व मोठीं अशीं झालीं आहेत. एकंदर पुस्तक इंग्रजींतील सचित्र रंगीत ए बी सी डी शिकण्यास उपयोगी अशा पुस्तकाच्या धर्तीवर तयार केलें असल्यामुळें हें पुस्तक लहान मुलांस फारच आवडून त्यावरून तीं आपला वर्ग सहज शिकतात. किं. ०।८.

## भाग १ ते ६ ] शिशुकल्याण गोष्टी. [ भाग १ ते ६

ह्या गोष्टींत रोज व्यवहारांत घडणाऱ्या गोष्टी दिलेल्या आहेत, पण त्या इतक्या मोहक, मनोरंजक व मार्मिक लिहिल्या आहेत कीं, त्या गोष्टींतील तत्त्वबोध गोष्टी वाचतां वाचतांच मुलांच्या मनावर सहज ठसून जातो. पुस्तक बरीक टाइपांत सुंदर जाड व ग्लेज कागदावर छापिलेलें असून प्रत्येक गोष्टीचे प्रारंभीं कथानकाचें सुंदर चित्र दिलेलें आहे. एकंदर ह्या गोष्टीचे सहा भाग आहेत. प्रत्येक भागांत दहा गोष्टी सचित्र आहेत, प्रत्येक भागास किं. ०४.

मिळण्याचें ठिकाण—म्यानेजर-चित्रशाळा प्रेस, पुणें.

मराठी शालापत्रक

येथें शब्द नाहीं शिष्यासीं । हें अवघें सद्गुरूपाशीं ।
सद्गुरु पालटी अवगुणांसी । नाना यत्नें करोनी ॥
जें कांहीं आपणास ठावें । तें हळु हळु शिकवावें ।
शहाणें करून सोडावें । सकळा जनां ॥ १ ॥

—रामदास.

पुस्तक ३५ आगस्ट सन १९२४ अंक ८

९२ ९
१२।८।२४

## जपान व शिक्षण.

सध्याचें युग शिक्षणाचें आहे. शिक्षणाशिवाय जगांत जिवंत रहाणेंहि कठीण आहे. शिक्षणाचा आणि स्वराज्याचा फारच जवळचा संबंध आहे. जगांतील सुधारलेलीं राष्ट्रें सुशिक्षीत आहेत. आणि त्यांचे प्रयत्न शिक्षणांत सुधारणा कशी करतां येईल याबद्दल अहर्निश चालू आहेत. परक्या देशांत सार्वत्रिक शिक्षण मिळण्याबद्दल फारशा अडचणी नाहींत. त्यांना शिक्षणाच्या निरनिराळ्या अंग उपांगामध्यें सुधारणा कशा घडवून आणतां येतील, विशेषत: लहान मुलांना सुलभ रीतीनें शिक्षण कसें देतां येईल हें पहावयाचें आहे. आमचा देश अत्यंत मागासलेला व सरकार अत्यंत बेपर्वा असल्यामुळें शिक्षण मिळण्याचीच मारामार भासत आहे, मग त्यांत सुधारणा करण्याचें दूरच. तेव्हां सांप्रत आपल्या हातीं सुधारणा घडवून आणण्याचें कांहीं साधन नसलें, तरी इतर देशाकडे पाहून स्वतःच्या शिक्षणांत सुधारणा कशी घडवून आणतां येईल, याचा कयास मनाशीं बांधणें कठीण नाहीं. त्यामुळेंच कोठें जपानकडे पहा, कोठें जर्मनीकडे पहा, कोठें अमेरिकेकडे पहा अशी आपली स्थिती झाली आहे. असो; आम्ही शालापत्रकाच्या पुढील कांहीं अंकांत जपानच्या शिक्षण पद्धतीचें विवरण करणार आहों. तत्पूर्वी जपानी मुलांच्या मनाची ठेवण कशी असते हें आपण पाहूं म्हणजे पुढील विषय समजणें सोपें जाईल. ज्या मुलांच्या मनावर शिक्षणविषयक संस्कार करावयाचे तीं मुलें त्या संस्कारांस योग्य आहेत किंवा नाहींत हा मुख्य प्रश्न असतो. या

दृष्टीनें विचार केला तर जपानी मुलांच्या मनाचें पृथक्करण करणें अनाठायीं होणार नाहीं. आपण स्वाभिमानाची गोष्ट घेऊं. जपानी मुलांचा स्वाभिमान फार दांडगा असतो. त्यांची देशावरील प्रीती व राजावरील प्रेम इंग्लंडसारख्या देशालाही खालीं मान घालावयास लावील. जपानची जी इतकी उन्नती झाली व जपान आज जें साऱ्या जगांत अत्यंत वैभवशाली राष्ट्र बनलें त्याला वरील गोष्टीच कारणीभूत झाल्या. जपानमधील कोणत्याहि लहान मुलाला विचारलें कीं बाळ, तुला या आयुष्यांत काय करावयाचें आहे, तर तो हटकून असें उत्तर देतो कीं, मला माझ्या देशाकरितां व राजाकरितां मरावयाचें आहे. त्यांना राजा म्हणजे देव वाटतो. राजाचा अपमान झाला अगर त्याच्याविषयीं कोणी अनादरपूर्वक बोलले तर जपानी मुलाला खपत नाहीं. तो तेथल्या तेथें त्याचा समाचार घेतो. जपानी माणसाला राजाविषयीं इतका आदर वाटतो कीं, राजाचा ठसा पोस्टाच्या तिकीटावर किंवा नाण्यावर असलेलाहि त्यांना खपत नाहीं. याचें कारण उघड आहे. पोस्टाचीं तिकीटें निरुपयोगी झालीं म्हणजे तीं फाटतात, त्यावर पाय पडतात. या कारणानें त्यांना पोस्टाच्या तिकिटांवर राजाचा छाप नसावा असें वाटतें.

एके काळीं राजाचीं चित्रें विक्रीस ठेवणें म्हणजे मोठें पाप समजत असत. परंतु आतां चित्रें विकण्यास हरकत घेतली जात नाहीं. तथापि राजाचें तोंड नेहमीं झाकलेलें असावें असें ठरलें आहे. एकदां एका शाळेस आग लागली असतां एक मुलगा शाळेच्या ऑफिसांत गेला. तेथें राजाचें चित्र होतें. आग लागली तर हें चित्र जळून जाईल ही भीति त्या मुलाला वाटली. म्हणून त्यानीं आपलें पोट फाडलें आणि तें चित्र आपल्या पोटांत लपवलें. पुढें आगीच्या ज्वाळांनीं तो मुलगा मरण पावला. मेल्यावर लोकांना तें चित्र जसेंचें तसेंच त्याच्या पोटांत सांपडलें. इतकें त्या लोकांना राजाविषयीं प्रेम वाटतें.

दुसरें राजनिष्ठेचें उदाहरण असेंच आहे. राजाची मिरवणूक रस्त्यानीं जात असली, तर कोणीहि तो जितक्या उंचीवर असेल तितक्या उंची पेक्षां अधिक उंचीवरून त्याची मिरवणूक पाहूं नये, सर्व लोकांनीं खालीं रस्त्यांवरच आलें पाहिजे, असा कायदा आहे. त्यामुळें राजाची मिरवणूक जात असली म्हणजे घराची दारें खिडक्या वगैरे साऱ्या लावलेल्या दिसतात. युरोपिअन अगर अमेरिकन लोकांना हा कायदा माहित नसतो त्यामुळें त्यांच्यावर खटले होतात व त्यांना शिक्षा होते.

राजाचें नांव दुसऱ्यां एखाद्यानीं आपल्या मुलाला ठेवलें तर तोहि तसाच भयंकर अपराध समजला जातो. एकदां एका मनुष्यानें चुकीनें आपल्या मुलाला राजाचें नांव ठेवलें. ही गोष्ट पुढें उघडकीस आली. त्यामुळें तो माणूस इतका घाबरून गेला कीं त्यांनीं आपणहून स्वतःची हत्या केली. जपानी मनुष्य जरी नेहमीं अत्यंत गंभीरपणें आयुष्याकडे पहात असला तरी तो आनंदी असतो. जपानी विद्यार्थी अत्यंत कष्ट व हाल सोसून स्वतःचा विद्याभ्यास करतो. त्याला दुसऱ्याची मदत आपल्या विद्याभ्यासास घेणें अत्यंत अपमानकारक वाटते.

जपानी स्त्रियाहि तितक्याच कठोर व कणखर मनोवृत्तींच्या असतात. जपान व रशियाचें युद्ध सुरुं झालें होतें. जपानमध्यें सैन्यभरती होत होती. विधवा स्त्रीयांना जर एकच मुलगा असलातर त्याला युद्धावर पाठवूं नयें असा तेथें कायदा आहे. ही अडचण लक्षांत घेऊन जपानी स्त्रीयांनीं आत्महत्या केल्या व मुलांनां देशसेवेचा मार्ग खुलाकरून दिला.

जपानी इतिहासांत अत्यंत शौर्याच्या व देशभक्तीच्या अनेक गोष्टी आहेत. आणि सध्यांचे लोकाहि आपल्या पूर्वजापेक्षां कांकणभर कमी नाहींत. असो

जपानी युद्धाच्या वेळची एकच गोष्ट त्यांची देशप्रीति दर्शविण्यास पुरेशी आहे. पोर्टऑर्थर बंदर बंदकरावयाचें होतें व त्याकरीतां फक्त ७५ माणसें पाहिजे होती. परंतु २००० लोकांनीं या कार्याकरितां आपलीं नांवें कळविलीं आणि कांहीं जणानीं या कार्याकरितां आपण किति तयार आहों हें दाखविण्याकरितां आपले अर्ज आपल्या रक्तानीं लिहिले ! मनुष्यानीं आपल्या हितापेक्षां राष्ट्रांच्या हिताकडे अधिक पाहावें अशी जपानी मनाची ठेवण आहे. युद्धामध्यें पराभव झाला असतां कोणताहि मनुष्य आपलें काळें तोंड लोकांना दाखवित नाहीं. तो जेथल्या तेथें आत्महत्या करतो. हाराकिरि म्हणजे आत्महत्या हा शब्द तिकडे फार प्रचारांत आहे. स्वतःचे पोट फाडणें व आंतडीं बाहेर काढून प्राण सोडणें हा प्रकार तिकडे अगदीं प्रचारांतला आहे.

जपानी लोकांच्या अपमानाच्या कल्पना अगदीं चमत्कारिक आहेत असें आपणांस वाटेल. अपमानाचा सूड दुसऱ्याचा खून करून किंवा स्वतःचा प्राण देऊन घेतां असें ते म्हणतात. आणि जपानी लोकाचा स्वभाव अत्यंत नाजुक असल्यामुळें आपला अपमान झाला असें त्यांना केव्हां वाटेल याचा नेम नाहीं. एखाद्या भिकाऱ्याकडे एखादें नाणें टाकणें म्हणजे त्या भिकाऱ्याला अपमान झाला असें वाटतें. तेव्हां जपानी लोकाबरोबर वागणें फार कठीण असतें.

जपानी लोकांची मानापमानाची कल्पना अशी चमत्कारिक असल्यामुळें ते दुसऱ्याशीं अत्यंत सभ्यतेनीं वागतात. राष्ट्राबद्दल त्याना किति आदर वाटतो हें वर आलेंच आहे. त्याविषयीं आणखी एक गोष्ट आहे ती अशी. एकदां एक इंग्रज बिशप एका रेल्वे स्टेशनवर उतरला. त्याचें सामान चुकून कोठें तरी गेलें. त्यावर रेल्वे नोकर तरी त्या इंग्रज बिशपजवळ आले व म्हणाले कीं, सामान घरीं पोहोंचविण्याचे पैसे व पत्ता येथें ठेवा म्हणजे सामान घरीं येईल. हें बोलणें त्या बिशपला रुचलें नाहीं. तो म्हणाला इंग्लंड मध्यें असा प्रकार नसतो. सामान चुकलें तर रेल्वे आपल्या खर्चानें तें घरीं पोहोंचतें करते. ही गोष्ट त्या नोकरांना लागली. ते जरा बाजूला गेले व आपसांत कांहीं ठरवून परत आले, आणि त्या बिशपला तुझें सामान बिन खर्चानें परत येईल असें म्हणाले. ते नोकर अत्यंत गरीब होते, तथापि त्यानीं आपसांत वर्गणीकरून त्या सामानाचे पैसे भरले. त्यांना त्याबिशपनें केलेली इंग्लडची स्तुती आवडली नाहीं. त्यांचा देशाभीमान जागृत झाला व त्यानीं पुढील व्यवस्था आपल्या खर्चानें केली.

जपानच्या स्त्रिया सगळ्या जगांत अत्यंत सुधारलेल्या आहेत. सौंदर्यशास्त्रांत व कला कौशल्यांत जपानी स्त्रीया फ्रान्स मधील स्त्रीयापेक्षां ११० वर्षें पुढें आहेत त्या-शरीरानें सुदृढ, अत्यंत विनयशील, गृहकृत्यांत दक्ष, राष्ट्राकरीतां प्राण देणाऱ्या, कष्टाळू धिम्म्या अशा आहेत. स्वतःचा मुलगा मेला असला तरी रडत बसून दुसऱ्याला त्रास देऊ नयें असा तिकडे नियम आहे.

जपानीलोक स्वच्छतेंत सगळ्या जगांत अत्यंत पुढारलेले आहेत. त्यांच्या इतकें स्वच्छ राष्ट्र दुसरें नाहीं.

शारिरिक कष्ट सोसण्यास जपानी लोक किति तयार असतात हें पुढील अंकीं पाहूं.

हा लेख सय्यद रॉस मसूद यांच्या पुस्तकावर व दुसऱ्या अनेक पुस्तकांच्या मदतीनें लिहिला आहे.

---

विद्याधर वामन भिडे यांचें

अर्थालंकारांचें निरूपण.

किंमत १ रुपया

# प्रतापी प्रतापसिंह.

( लेखकः—हणमंत कृष्ण कुलकर्णी. )

## अंक—१ ला

### प्रवेश १ ला.

[ स्थळः—अरण्यांतील प्रतापसिंहाचा तंबू प्रतापसिंह विचार करीत बसला आहे. ]

**प्रतापसिंहः**—(उसासा टाकून) दैवगति किती विचित्र आहे पहा! अजून, मला अशा अरण्यवासांत किती दिवस घालवावे लागणार! हळदीघाटची लढाई झाली, रजपुताच्या आंगचें शौर्य अकबराच्या पूर्ण अनुभवास आलें; पण त्या लढाईनें युद्धाचा शेवट मात्र झाला नाहीं! शत्रूचे छातीस छाती भिडवून लढण्यांत आम्हां रजपुतांना नेहमीं आनंदच वाटतो या अकबरानें तसें लढण्याचें सोडून देऊन मी बेसावध असतांना मला पकडण्याचा प्रयत्न चालविला आहे. हा प्रताप आपल्या हातीं सांपडेल असें त्या मूर्ख अकबरास वाटलें तरी कसें? त्याच्या लोकांच्या हातीं सांपडूं नये म्हणून मला रात्रंदिवस या अशा गिरिकंदरांत भटकावें लागतें. या क्षणीं मी या ठिकाणीं आहे, तर पुढल्या क्षणीं मला कुठें जावें लागणार याचा नेमच नाहीं. या असल्या माझ्या राहणीमुळें माझ्या मुलाबाळांचे तर अतोनात हाल होतात. धड त्यांना पोटभर खायला वेळही मिळत नाहीं. भुकेनें व्याकूळ होऊन रडत असलेल्या त्या बाळांकडे पाहिलें म्हणजे माझें पाषाणासारखें हृदयसुद्धां दुभंग होऊन जातें, आणि मनांत असा विचार येतो कीं, मी उदेपूरचा राणा, सिसोदिया कुळांतला कट्टा रजपूत आणि नांवचा 'राणा प्रतापसिंहना'? मग माझ्या मुलाबाळांना पोटभर खायला अन्नही मिळूं नये काय! कसला मी राणा! आणि कसलें माझें राज्य! (पडद्यांत रडण्याचा आवाज) कोण बरें रडत असेल? रायसिंग, अरे रायसिंग?

**रायसिंग**—( प्रवेश करून व मुजरा करून ) जी सरकार.

**प्रता०**—तिकडं कोण रडत आहे रे?

**राय०**—म्हाराज, धाकलं सरकार रडत्याती.

**प्रता०**—कां?

**राय०**—धाकलं सरकार भाकर खात व्हतं, त्या रानबोक्यांन त्येंच्या हातांतली भाकर इसकून नेलंया पगा. म्हनूनशनी रडत्याती सरकार.

**प्रता०**—अरेरे! काय ही माझी दशा!! मी प्रतापसिंह, मेवाडदेशचा राणाना? मग माझ्या मुलांनीं भाकरीचा तुकड्याकरितां रडत बसावें का? अशा दरिद्रीपणानें वनवासांत राहून महाराणा म्हणवून घेण्यांत काय बरें अर्थ आहे? राजस्थानांतले पुष्कळ रजपूत राजे अकबराला शरण गेले, आणि त्यांनीं आपल्या लेकी व बहिणी अकबराच्या गोषांत खेंचल्या. अब्रू विकून त्या मोबदला त्यांनीं राज्यवैभव मिळविलें. राज्यवैभवाच्या प्राप्तीसाठीं त्यांनीं आपल्या सुनालेकींना विकणें हा त्यांचा नादानपणा नव्हे काय? खरा रजपूत असलें नीच कृत्य करण्यास केव्हांहि तयार होणार नाहीं. पण कालमहिमाच विचित्र त्याला कोण काय करणार? जाऊद्या तो विचारही नको. मला आपलासा करून घेण्यासाठीं या अकबरानें आजपर्यंत पुष्कळच प्रयत्न केले पण ते साधले नाहींत. मी कसलींही संकटें भोगीन आणि आजन्म अरण्यवास सुद्धां पत्करीन् पण या यवनाला शरण म्हणून जाणार नाहीं. (विचार क.) या माझ्या हट्टामुळें माझ्या मुलामाणसांचे किती बरें हाल होतात? त्यांचे हाल असेच होऊं देणें योग्य आहे का? त्यांना सुख देणें हें माझेंच कर्तव्य नव्हे काय? मी जर असाच अकबराचा शत्रू राहिलों तर हा अरण्यवास

कसा चुकणार आणि मुलाबाळांना सुख कुठून मिळणार? त्यांना सुख देण्याचा मार्ग एकच; तो म्हणजे अकबराचें सार्वभौमत्व कबूल करणें हाच होय. सिसे दया कुळींतल्या महाराण्यांच्यावर आजपर्यंत कोणाचीच सत्ता चालली नाहीं. यापुढें तसा प्रसंग येणें योग्य आहे का? आजपर्यंत मी ज्या अकबराबरोबर शत्रुत्वानें वागलों त्याचाच मांडलीक होण्याची पाळी मजवर यावी कां? (विचार करून) छे, छे; प्रतापसिंहा आजपर्यंत जें कठीण व्रत तूं आचरत आलास तेंच तुला यापुढेंही चालवावें लागणार. परवां अकबराचा वकील तहाचें बोलणें करण्यासाठीं आला होता, पण त्याला 'तह होणें शक्य नाहीं' असें सांगून परत पाठवून दिला. आज मला या अरवलीच्या दरीं कोंडल्या-सारखें करून अकबरानें माझा कसा कोंडमारा चालविला आहे. माझ्या प्रियजनांकडून सुद्धा मला मदत मिळ-ण्याची आतां फारशी आशा उरली नाहीं. या वेळीं त्याला थोडेसें युक्तीनेंच फसविला पाहिजे (विचार क.) हं, रायबा तूं विजयसिंहजींकडे जा आणि त्यांना मजकडे घेऊन ये.

**राय०**—हां जी सरकार; (मुजरा करून जातो.)

**प्रता०**—आतांपासूनच आपण अकबराशीं लीन-तेचें वर्तन करीत आहोंत असा थोडासा आव आणला पाहिजे. चला, विजयसिंह येईपर्यंत अकबराकडे पाठवा-वयाचा खलिता आपणास तयार करून ठेविला पाहिजे. आणि अकबराशीं काय काय बोलावयाचें य चीही पण त्याला माहिती करून दिली पाहिजे. (जातो.)

---

## प्रवेश २ रा.

[ **स्थळ**—विजयसिंहाचा तंबू. विजयसिंह व रायबा बोलत प्रवेश करितात ]

**विज०**—राणाजींनीं मला जरूरीनें बोलावलें आहे म्हणतोस! कशासाठीं रे?

**राय०**—म्हाराजांनीं तुमासनी हाळी मारायला मला सांगितलंन मी हकडं आलोंया. कशापायीं बोलावलंया याची पंचाईत हामा चाकरासनीं हवी कशाला? हो, जा म्हटलं कीं जावं अन् ये म्हटलं कीं यावं अन् कर म्हटलं कीं करावं; हें हामा चाकरांचं काम. बोलव म्हटलं, कीं कशाला म्हून इचारनं रास्त हाय का? हो, तुमीच सांगा पगू.

**विज०**—बरोबर आहे. रायसिंगा, तूं इमानी नोकर खरा. तसाच मोठा गमत्या दिसतोसरे! बरं, तूं आलास तेव्हां महाराणाजी काय करीत होते तें सांग बघूं!

**राय०**—पगा, म्हाराज इचार करीत बसलं व्हतं. इकल्यांत धाकलं म्हाराजाचं रडनं त्यांनीं ऐकलं तवा म्हाराजास्नी पगा लई लई वाईट वाटलं.

**विज०**—ठीक. पण त्या वेळेस महाराज आपल्या-शींच कांहीं बोललें? तूं ऐकलंस कां?

**राय०**—व्हय. ऐकलं. पन तें लई गुपित.

**विज०**—अरे तें तुझें गुपित मला सांगशील तर खरं?

**राय०**—आपून आमचं सरदारसाब. आपल्याजवळ सांगायला काय हरकत न्हे म्हना पन—

**विज०**—अरे पण काय?

**राय०**—गुपित भाएर फोडनं आमा चाकराचं बिरुद हाय कां? तुमीच सांगा पगू.

**विज०**—खरं. पण मी का परका आहें? सांग लवकर, काय असेल तें.

**राय०**—बर बुवा. कानवायचं हकडं करा. (हळूंच त्याच्या कानांत सांगतो.)

**विज०**—(आश्चर्यानें) होय कां? राणाजींचा तह करण्याचा विचार आहे?

**राय०**—व्हय.

**विज०**—मला नाहीं हें खरें वाटत.

**राय०**—नसलं खरं वाटत तर बसा ख्वाटं म्हनत. माझ्या बाचं काय जातंया

**विज०**—तहाचे उद्गार तूं राणाजींच्या तोंडून ऐकलेस? खरें? अगदीं खरें?

**राय०**—खरं. अगदीं खरं. मी तुमापाशीं खोटं कशाला बोलूं ?

**विज०**—फारच आश्चर्याची गोष्ट ! महाराणा प्रतापसिंहजी त्या मुसलमानांशीं तह करणार ! हें नाहीं मला खरं वाटत. यांत राणाजींचा कांहीं तरी कावा असेल. ( विचार ) हो असलाच पाहिजे. नुकत्याच झालेल्या त्या हळदीघाटच्या लढाईंत मुसलमानांची रग जिरविणारा हा राजस्थानचा सिंह त्या जंबुकाला शरण जाईल ? अन् त्यांच्याशीं तह करील ! अशक्य ! अगदीं अशक्य ! ! चला, आपल्याला समक्ष महाराणाजींची गांठच घेतली पाहिजे. म्हणजे सर्व गोष्टींचा उलगडा लौंच होईल. चला, आतां तिकडंच जावं म्हणजे झालं. रायसिंगा चल बाबा-

**राय०**—हो, चला कीं. ( जातात. )

---

## प्रवेश—३ रा.

( पृथ्वीराज प्रवेश करितो. )

[ स्थळ—पृथ्वीराजाचा दिवाणखाना. ]

पृथ्वी०—(स्व०) आम्ही नुसते नांवचेच रजपूत खरे! अहो, आमच्या पूर्वजांनीं या यवनांच्या बरोबर वर केलें. आणि त्यांना अगदीं त्राहि त्राहि करून सोडलें. त्यांचेच आम्ही वंशज ना ? आतां आमची स्थिती पहा. आम्ही त्याच यवनांच्या दरबारांत त्यांचे गुलाम बनून राहिलों. आमच्या रणधुरंधर पूर्वजांनीं स्वपराक्रमानें राज्यवैभव मिळविलें. आणि या यवनांना सळो कीं पळो करून सोडलें. तसेंच, त्यांनीं आपल्या बायकांचीं नखेंसुद्धां त्या दुष्ट राक्षसांच्या दृष्टीस पडूं दिलीं नाहींत. पण तेच आम्ही त्यांचे वंशज पहा. या मुसलमानांची सेवा करण्यांत आनंद मानूं लागलों व त्यांची हांजी हांजी करून वैभव मिळविण्याचा प्रयत्न करूं लागलों, पण एवढ्या श्वानवृत्तीनेंच आमची अधोगती थांबली नाहीं. आम्ही त्याच्याही पुढें जाऊन रजपुतांच्या तोंडाला काळोखी फांसली. हर ! हर ! कोण ही आमची शोचनीय स्थिती !! त्या गोष्टीची त्या अकबराच्या खुष रोझाची आठवण झाली म्हणजे काय करूं, आणि काय न करूं, असें होऊन जातें. या नीच अकबरानें आपल्या वाईट विषयवासनेनें रजपूत स्त्रियांच्या पातिव्रत्यावर हल्ला घालावा काय ? या त्याच्या घोर पातकाबद्दल त्याला घोर शिक्षाच झाली पाहिजे. ( विचार ) याचा दोष खरोखरी त्याच्याकडे तरी काय आहे ? आमचेच जातभाई आपला स्वार्थ साधण्यासाठीं आपली अब्रू विकतात. त्याला त्यानें काय करावें ? या पातकी प्रकारापासून अद्यापपर्यंत अपवित्र न झालेलें एकच घराणें या सर्व राजस्थानांत राहिलें आहे. तें महाराणा प्रतापसिंहाचें घराणें ! वारे प्रताप ! तूं मात्र आपल्या कुलाचें ब्रीद राखिलेंस ! आणि आपल्या पराक्रमानें व स्वदेशप्रीतीनें बाप्पा रावळालाही स्वर्गांत आनंदानें डोलायला लाविलेंस ! धन्य तूं ! आणि तुला पसवणारी धन्य ती वीरमाता !! या प्रतापसिंहाला आपलासा करून घेण्यासाठीं या अकबरानें किती अटोकाट प्रयत्न चालविले आहेत ! पण व्यर्थ !! ज्या महाराण्याला राष्ट्रसेवा करितांना स्वतांच्या प्राणाचीसुद्धां पर्वा वाटत नाहीं तो महाराणा राष्ट्रद्रोह करून अकबराच्या ताब्यांत येईल ! अं: हें मुळींच शक्य नाहीं. अकबरा, तुझ्या गोड बोलण्याला आणि आमिषाला भुलून तुला वश व्हायला महाराणाजी कांहीं कच्चा गुरूचे शिष्य नाहींत समजलास. वरं आहे तें जाऊं द्या. आज बादशहाचा बडा दरबार आहे म्हणे. चला आपणालाही तिकडे गेलेंच पाहिजे.

( जातो. )

---

## प्रवेश:—४ था.

[स्थळ:—राणाजींचा दिवाणखाना महाराणा बसला आहे.]

**प्रता०**—रायसिंगाला पाठवून बराच वेळ झाला. अजून विजयसिंह कां बरें येत नाहींत ? यायची वेळ झालीच. ( निरखून ) हे आलेच वाटतें.

( विजयसिंह प्रवेश करितो. )

**वि०**–( मुजरा करून ) महाराणाजींची काय आज्ञा आहे ?

**प्रता०**–बसा विजयसिंहजी, तुम्हांला एका महत्त्वाच्या कामगिरीवर पाठवावयाचें आहे. तें काम कसें अगदीं बिनमोल वठलें पाहिजे.

**विज०**–महाराज, आज्ञा व्हावी. आज्ञेप्रमाणें वाटेल तें काम करायला हा दास तयारच आहे.

**प्रता०**–हळदीघाटचं युद्ध संपल्यापासून यवनांनीं जरा जास्त जोर केला आहे. आणि त्यांचें सैन्यही या आरवलीच्या भोंवतीं जणूं ठाणेंच देऊन बसलें आहे. ही त्यांची पक्कड थोडीशी ढिली केली पाहिजे. तसें व्हायला शक्तीचा विशेष उपयोग होईल असें मला वाटत नाहीं. या ठिकाणीं युक्तीचाच अवलंब केला पाहिजे. म्हणून मी एक बेत ठरविला आहे.

**विज०**–(उत्कंठेनें) तो काय महाराज ?

**प्रता०**–प्रथम त्या अकबराबरोबर तह करावयाचा.

**विज०**–(आश्चर्यानें) काय ? यवनांशीं तह ? आणि तो महाराणाजी करणार? मग सारंच अ.टपलं म्हणायचें !

**प्रता०**–(हंसून) तसें नव्हे. पुढें ऐकून तर घ्यालं. ( विजयसिंहाच्या कानांत हळूच कांहीं सांगतो. )

**विज०**–( आनंदून ) वा ! अशानें तर त्याची खूपच खोड मोडली जाईल म्हणावयाची.

**प्रता०**–याकरितां अकबराकडे तुम्ही माझा वकील म्हणून जा. आणि हा माझा खलीता त्याला द्या. ( खलीता देतो. ) तहाचीं कलमें काय असावींत, या संबंधींचा सर्व खुलासा मी आपल्या या खलि यांत केलेलाच आहे. आणि त्याप्रम.णें बहुतेक तो कबूल करीलच.

**विज०**–हो न कबूल करावयाला काय झालं ? त्याची तह करण्याची धडपड आज किती दिवस तरी चाललेली अ हे. आज्ञेप्रमाणें मी दिल्लीला जात आहें, मला आज्ञा असावी.

**प्रता०**–ठीक आहे, जा तुम्ही वकिली कशी बेमालूम केली पाहिजे अं!

**विज०**–महाराणाजींनीं बेफिकीर असावें.

( मुजरा करून जातो )

**प्रता०**–( स्व० ) एकंदरींत या तहाच्या प्रकारामुळें पुष्कळांना आश्चर्य वाटेल.आणि अकबराला तर फारच आनंद होईल. होऊं द्या. कोणतेंही मोठें कार्य आधीं थोडेंसें पडतें घेऊन मग चढाईनेंच केलें पाहिजे. या तहाच्या वाटाघाटीच्या अवधींत माझ्या पुढच्या सर्व तयारीला बराचसा वेळ मिळेल. आतां वेळ गमावून उपयोगीं नाहीं. पुढच्या कार्याला लागलेंच पाहिजे.

( जातो. )

( पडदा पडतो. )

**अंक पहिला समाप्त.**


मुलांकरितां ] **पंचतंत्र** [ सचित्र !

संस्कृत पंचतंत्रांतील सर्व गोष्टींचें मराठी सुबोध भाषांतर केलें असून प्रत्येक गोष्टीस सुबक चित्र जोडलें आहे. एकंदर गोष्टी ५० असून चित्रेंही ५० आहेत. इसापनीतिप्रमाणेंच पंचतंत्रांतील गोष्टीही विशेष मनोरंजक असून बोधप्रदही आहेत. टाईप ग्रेट, कागद ग्लेझ, पृष्ठसंख्या ३५०. बाईंडिंग जाड पुठ्याचें, किं. १८४ ट. ह. ८४ शिवाय.

**म्यानेजर—चित्रशाळा प्रेस, पुणें.**

# उपयुक्त माहिती.

( ले०–श्रीपाद बालकृष्ण देशपांडे, मायणी–सातारा. )

## लेखांक १

१ एकनाथाच्या ग्रंथांचीं नांवें—(१) भागवत ( दशमस्कंधावर टीका ) (२) भावार्थ रामायण, (३) रुक्मिणी स्वयंवर (४) चतुःश्लोक भागवत, (५) चिरंजीवपद, (६) अनुभवानंद, (७) हस्तामलक, (८) स्वात्मबोध.

**२ नवविधा भक्ति**—१ श्रवण, २ कीर्तन, ३ स्मरण, ४ पादसेवन, ५ पूजन, ६ वंदन, ७ दास्य, ८ सख्य, व ९ आत्मनिवेदन.

३ शरीरांतील सप्त धातु व त्यांचे प्रमाण—रक्त, मांस, मज्जा, मेद, रस, आस्थि, व शुक्र, एकूण ३०½.
८ १० २ ३ ४ ३ ½

**४ चौदा विद्या**—चार वेद ( ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद व अथर्वणवेद,) **सहा वेदांगें**–(शिक्षा, कल्प, व्याकरण, निघंट, छंद व ज्योतिष, ) चार उपांगें–( मीमांसा, न्याय, पुराण आणि धर्मशास्त्र. )

**५ सहा शास्त्रें**—सांख्य, योग, न्याय, वैशेषिक, पूर्वमीमांसा व वेदान्त.

**६ अठरापुराणें**—(१) ब्रह्म, (२) पद्म, (३) विष्णु, (४) शिव, (५) लिंग, (६) गरुड, (७) नारद, (८) भागवत, (९) अग्नि, (१०) स्कंद, (११) ब्रह्मवैवर्तक, (१२) भविष्य, (१३) मार्कंडेय, (१४) वामन, (१५) वराह, (१६) मत्स्य, (१७) कूर्म, (१८) ब्रह्मांड.

**७ दशावतार**—१ मत्स्य, २ कूर्म, ३ वराह, ४ नारसिंह, ५ वामन, ६ परशुराम, ७ राम, ८ कृष्ण, ९ बौद्ध व १० कलि.

**८ नऊ रत्नें**—१ हिरा, २ इंद्रनील, ३ माणिक, ४ पुष्पराग, ५ गोमेद, ६ पाच, ७ वैदूर्य, ८ मोती व ९ पोंवळें.

**९ नवरस**—(हे रस भाषेंतील होत) १ शृंगार, २ वीर, ३ करुण, ४ अद्भुत, ५ हास्य, ६ भयानक, ७ बीभत्स, ८ रौद्र व ९ शांत या रसांत अनुक्रमें १ प्रेम, २ उत्साह, ३ शोक ४ विस्मय, ५ हास्य, ६ भय, ७ जुगुप्सा ( किळस ) ८ क्रोध व ९ निर्वेद ( वीट ) ह्या मनोवृत्ति ( स्थायीभाव ) उद्दीपित होतात.

कोणी या ९ रसाशिवाय भक्ति, वत्सल आणि प्रेयान् असे आणखी तीन रस मानितात.

१० अर्जुनाचीं दहा नांवें—१ अर्जुन, २ फाल्गुन, ३ जिष्णु, ४ किरीटी, ५ श्वेतवाहान, ६ बीभत्सु, ७ विजय, ८ कृष्ण, ९ सव्यसाची व १० धनंजय,

**११ सात चिरंजीव**—अश्वत्थामा, बलि, व्यास, हनुमान, बिभीषण, कृप व परशुराम.

**१२. दत्तानें केलेले २४ गुरु**—१ पृथ्वी, २ वायु, ३ आकाश, ४ अग्नि, ५ उदक, ६ चंद्र, ७ सूर्य, ८ कपोत, ९ अजगर, १० समुद्र, ११ पतंग, १२ मधुमक्षिका, १३ हत्ती, १४ मध हरण करणारा पुरुष, १५ हरिण, १६ मत्स्य, १७ पिंगलानामक वेश्या, १८ टिटवी नांवाचा पक्षी, १९ बालक, २० कुमारी. २१ शरकर्ता, २२ सर्प. २३ कोळी, २४ कुंभारीणमाशी.

**१३. हवेचें वजन**—एक चौरस इंच जागेवर हवेचें वजन १५ पौंडांचें म्हणजे ७½ शेरांचें आहे. मध्यम आकाराच्या माणसाच्या अंगावरील हवेचें वजन ३० हजार पौंड म्हणजे १८¾ खंडी होतें. साधारण आकाराच्या तीन हत्तींचें वजन सुद्धां इतकेंच असतें.

**१४. आर्या**—कसुनी कास किरीटी कीटकसम कुरुकूल उद्धवा गणुनी ॥ केले कैक दळासह कोपे कौरव कंठ छेदनासरणी ॥ १ ॥

१५. साठ संवत्सरें— १ प्रभव, २ विभव. ३शुक्ल. ४ प्रमोद, ५प्रजापति, ६ अंगिरा, ७श्रीमुख, ८ भाव, ९ युवा. १० धाता, ११ ईश्वर, १२बहु-धान्य,० १३ प्रमाथी, १४ विक्रम, १५ वृष, १६चित्रभानु, १७सुभानु, १८तारण, १९ पार्थिव, २० व्यय, २१सर्वजित, २२ सर्वधारी, २३ विरोधी, २४ विकृति, २५ खर, २६ नंदन, २७ विजय, २८ जय, २९ मन्मथ, ३० दुर्मुख, ३१ हेमलंबी, ३२ विलंबी, ३३ विकारी, ३४ शार्वरी; ३५ प्लव, ३६ शुभकृत, ३७ शोभन, ३८ क्रोधी, ३९ विश्वावसु, ४० पराभव, ४१प्लवंग, ४२ कीलक, ४३सौम्य, ४४ साधारण, ४५ विरोधकृत्, ४६ परिधावी, ४७ प्रमादी, ४८ आनंद, ४९ राक्षस, ५० अनल, ५१ पिंगल, ५२ कालयुक्त, ५३ सिद्धार्थी, ५४रौद्र, ५५ दुर्मती, ५६ दुंदुभि, ५७ रुधिरोद्गारी, ५८ रक्ताक्षी, ५९ क्रोधन, ६० क्षय.

१६ षोडशोपचार—१ आवाहन, २ आसन, ३ पाद्य, ४ अर्घ्य, ५ आचमन, ६ स्नान, ७ वस्त्र, ८ यज्ञोपवीत, ९ गंध, १० पुष्प, ११ धूप, १२ दीप १३ नैवेद्य, १४दक्षिणा, १५ प्रदक्षिणा व १६ मंत्रपुष्प.

१७ साष्टांग—पाय दोन, गुडघे दोन, हात दोन, छाती व नाक, हीं आठ अंगेंच जमिनीला टेकावीं; पोट टेंकू नये.

१८. संक्रांतीचीं किंवा राशींचीं नांवें—१ मेष, २ वृषभ, ३ मिथुन, ४ कर्क, ५ सिंह, ६ कन्या, ७ तूळ, ८ वृश्चिक, ९ धन, १० मकर, ११ कुंभ आणि १२ मीन.

---

## चुटके

आई ( रागावून ) कार्टी कारे तूं गंगीला कां मारलेस ?

मुलगा:—आई तीनें मला कां फसविलें !

आई:—तुला तिनें कसें फसविलें ?

मुलगा:—अग आई, आम्ही चोर चोर खेळत होतों आणि तिनें आपल्या जवळील अंजीर मला चोरून दिला नाहीं.

× × ×

एक पत्नी आपल्या नवऱ्याला घरीं रात्रीं तीन तीन वाजेपर्यंत न येण्याबद्दल खूप बोलत होती. तो म्हणाला " तूं कांहीं तरी सांगतेस. मी एकवाजतांच परत आलों "

ती:—मी भलते कसें सांगेन. मी दोन वाजेपर्यंत आपली वाट पाहिली आणि मग झोंपी गेले.

तो:—तुला नीट स्मरत नाहीं. मी घरीं आलो तेव्हां तें घड्याळ पुनः पुनः एक ठोका वाजवून एक वाजला आहे असें सांगत होतें.

× × ×

शिक्षक:—" मुलांनो सूर्य स्थीर आहे आणि पृथ्वी फिरत आहे हें तुम्हाला ठाऊक आहे ना ! असें पहा:—

इतक्यांत एक विद्यार्थी उठून:—" मास्तर आतां कांहीं बोलूं नका. पृथ्वी फिरत असल्यामुळें मला चक्कर आली आहे.

---


# अभिनव काव्यमाला भाग ३

या पुस्तकाची दुसरी आवृत्ति छापून विक्रीस तयार आहे. किं. १ रु. ट. ह. व व्ही. पी. खर्च निराळा.

म्यानेजर—चित्रशाळा प्रेस, पुणें.

# एक अद्भुत गोष्ट.

एक राजपुत्र व प्रधानपुत्र घोड्यावर बसून शिकारीला निघाले. शिकार करतां करतां रात्र झाली व ते एका जंगलांत उतरले. त्यांनीं घोडे झाडाला बांधले व आपण झाडावर बसले. मध्यरात्र उलटून गेल्यावर जवळच्या तळ्यांतून एक साप निघाला. त्या सापाजवळ एक मणी होता. तो मणी त्या सापानें खालीं ठेवला व त्याच्या प्रकाशांत तो इकडे तिकडे हिंडूं लागला. बाहेर आल्यावर त्यांनीं त्या घोड्यांना दंश केला व खाऊन टाकले. नंतर तो पुढें गेला. साप गेलेला पाहून प्रधानाचा मुलगा म्हणाला—सापाचा मणी मौल्यवान असतो. त्या मण्यावर लीद टाकली तर त्या मण्याचें तेज नाहींसें होतें असें मीं ऐकलें आहे. असें म्हणून तो खालीं उतरला व त्यानें थोडी लीद त्या मण्यावर टाकली आणि पळत पळत येऊन पुनः झाड गांठलें.

मण्याचा प्रकाश नष्ट झाल्यावर सापाचा जीव घाबरा झाला. तो फिर फिरला आणि मरण पावला. सकाळ झाल्यावर दोघेहि खालीं आले. ते त्या पडलेल्या मण्याजवळ गेले व तो मणी धुण्याकरितां त्यांनीं तलावाजवळ नेला. तो मणी धूत असतां त्यांना तलावाच्या खालीं जाण्यास एक शिडी दिसली. तावडतोब दोघेजण त्या शिडीवरून खालीं गेले. कांहीं दूर गेल्यावर त्यांना एक सुंदर घर दिसलें. त्या घरांत एक सुस्वरूप राजकन्या बसली होती.

यांना पाहून राजकन्या घाबरून म्हणते:—'हें सर्पराजाचें घर आहे, तुम्ही येथें कसें आलांत ? तो तुम्हाला ठार करील.' त्यांवर प्रधानपुत्रानें सारी हकीगत सांगितली. ती ऐकून राजकन्या फार आनंदी झाली. तिनें राजपुत्राबरोबर लग्न लावलें. नंतर दोघेजण तेथें पुष्कळ दिवस राहिले. शेवटीं राजपुत्राच्या मनांत घरीं जाण्याची इच्छा झाली. तेव्हां त्यांनीं प्रधानपुत्राला घरीं पाठविलें व येतांना फौजफांटा आणण्यास सांगितलें. नंतर दोघे वर आले. तेथून निघण्याचा दिवस ठरवून प्रधानपुत्र घरीं गेला.

एक दिवस राजपुत्र निजला असतां त्याच्याजवळ पडलेला मणी घेऊन राजकन्या तलावावर आली. ती इकडे तिकडे फिरली व पुन्हा: आंत गेली; अशाप्रकारें दर चारपांच दिवसांनीं ती वर येई. ही गोष्ट राजपुत्राला ठाऊक नव्हती. एकदां एक राजपुत्र त्या तलावावर शिकार करून थकल्यामुळें बसला होता. जवळच एक म्हातारी लांकडें गोळा करीत होती, इतक्यांत ती राजकन्या वर आली. परंतु राजपुत्राला पहातांच ती आंत गेली. तिला पाहून राजपुत्र वेडा झाला. तो राजकन्या कोठें गेली असें भ्रमिष्टासारखे बडबडूं लागला, हें पाहून त्याच्या नोकरांनीं त्यास घरीं नेले. त्या दिवसापासून तो राजपुत्र नेहमीं खिन्न दिसे. राजानें पुष्कळ औषधोपचार केले परंतु गुण येईना, अखेरीस राजानें एक दवंडी पिटली व जो राजपुत्राला बरें करील त्याला अर्धराज्य देईन असें जाहीर केलें. परंतु त्याला बरें करण्यास कोणी पुढें येईना. अखेरीस ती म्हातारी राजवाड्यांत आली व म्हणाली 'मी राजपुत्राला बरें करतें. मला त्या तलावाजवळ एक झोंपडी बांधून द्या व ५।६ नोकर द्या म्हणजे झालें. राजानें सारी व्यवस्था तावडतोब केली. ती म्हातारी त्या झोंपडींत राहूं लागली.

एके दिवशीं नित्यक्रमाप्रमाणें राजकन्या वर सहल करावयास आली. म्हातारीनें तिला पाहिलें. तावडतोब

म्हातारी तिजजवळ गेली व गोड गोड गोष्टी बोलूं लागली. राजकन्या भोळी पोर होती. म्हातारी म्हणाली 'ये बाळ मी तुझे केंस सारखे करत्यें, किती खराब झालेत हे!' बुचडा बांधतां बांधतां म्हातारीनें तिच्याजवळचा मणी पाहिला. म्हातारी म्हणाली 'आण तो इकडे, कुठें तरी हरवशील.' भोळ्या राजकन्येनें तो मणी दिला. मणी हातीं येतांच म्हातारीनें नोकरांना खुण केली व त्यांनीं राजकन्येला बांधून घरीं नेलें. राजकन्येला पहातांच राजपुत्राचा सारा आजार बरा झाला. राजपुत्र तिला मजबरोबर लग्न कर असें म्हणूं लागला, पण तिनें वर्षभर मी लग्न करणार नाहीं असें सांगितलें. राजपुत्राला तें पटलें. नंतर ती राजकन्या म्हातारीच्या देखरेखी-खालीं राजवाड्यांत राहूं लागली. राजकन्येला आपल्या मूर्खपणाबद्दल फार वाईट वाटे व पश्चाताप होई.

इकडे ठरलेल्या दिवशीं प्रधानपुत्र सैन्य घेऊन आला. त्यानें राजपुत्र आज बाहेर येईल, उद्यां बाहेर येईल, असें म्हणून त्याची बरेच दिवस वाट पाहिली. पुढें त्याला अत्यंत काळजी वाटूं लागली. एके दिवशीं त्याला वाजंत्रीं वाजत असलेलीं ऐकूं आलीं. तो एका मनुष्याला हीं वाजंत्रीं कसलीं वाजत आहेत, असें विचारूं लागला. तो म्हणाला कीं, 'या तलावांत एक अप्सरा होती तिचा विवाह आमच्या राजपुत्राबरोबर व्हावयाचा आहे, त्याचीं हीं वाजंत्रीं वाजत आहे, प्रधानपुत्राच्या लक्षांत सारा प्रकार आला. तो तसाच तिकडे निघाला. वाटेंत एक ब्राह्मणाचें घर होतें. त्या घरीं तो उतरला. त्यानें सगळी हकीगत विचारली. बोलतां बोलतां म्हातारीला एक वेडसर मुलगा आहे व तो मुलगा फाटके कपडे घालून इकडे तिकडे नाचतो अशी त्याला खबर मिळाली.

त्यांनीं लागलाच त्या वेडसर मुलाचें सोंग घेतलें. तो त्या म्हातारीच्या घरीं आला, म्हातारीनें आपला मुलगा आला असें समजून त्याला आंत घेतलें. तिनें त्याला तो मणी दाखविला आणि विचारलें 'तुला पाहिजे, कां हा?' त्यानें हात पुढें केला आणि मणी घेतला. नंतर म्हातारी त्याला राजवाड्यांत घेऊन गेली. तिनें त्याला राजकन्या दाखविली. त्यानें तिला ओळखलें. तो तेथें राहिला. म्हातारीनें आपल्या वेडगळ मुलाला सांभाळा असें पाहारेकऱ्यांना बजावलें व ती घरीं गेली.

रात्र झाल्यावर तो वेडा फार वेळ आंतबाहेर करूं लागला. परंतु त्याच्यावर देखरेख ठेवणें कठिण असें ओळखून पाहारेकरी झोपीं गेले. ते निजलेले पाहून प्रधानपुत्रानें आपला वेष टाकून दिला. त्यानें राजकन्येला जागें केलें. तो म्हणाला "चल, तुला मी न्यावयास आलों आहें, बैस माझ्या खांद्यावर." ती गुपचुप त्याच्या खांद्यावर बसली व दोघेजण राजवाड्याबाहेर पडले. नंतर लवकरच ते तळ्याजवळ पोहोचले. मणी, प्रधानाच्या मुलानें आपल्याजवळ ठेऊन घेतलाच होता. त्याच्या सहाय्यानें दोघेजण आंत गेले. त्यांना पाहून राजकुमाराला जो आनंद झाला तो सांगतां येत नाहीं. इतक्या दिवसांच्या दुःखानें तो वेडा बनला होता. सारी हकीगत ऐकून त्यानें प्रधानपुत्राचे आभार मानले. तेथें राहून राजपुत्र अगदीं कंटाळला होता. म्हणून त्यानें तत्काळ घरीं जाण्याच ठरविलें. फौज-फांटा निघून गेला होता. त्यामुळें ते तसेंच निघाले. रस्त्यांत जातांना एके दिवशीं रात्रीं ते एका झाडा-खालीं निजले. प्रधानपुत्र पहारा करीत होता. ज्या झाडाखालीं ते निजले होते, त्या झाडावर एक कबुतराचें जोडपें होतें. ते आपसांत बोलत होतें. प्रधान-पुत्राला त्यांची भाषा येत होती.

कबुतराची स्त्री:—रात्र जात नाहीं, एकादी गोष्ट सांगा.

कबुतर:—आपली सांगू, कीं दुसऱ्याची?

क. स्त्री:—दुसऱ्याची.

क.—हा प्रधानाचा मुलगा राजपुत्रावर फार प्रेम करतो. पण राजपुत्र लवकरच मरणार आहे.

क. स्त्री:—तो कसा?

क.—ऐक. हे आतां पुढील मुक्काम एका वडाच्या झाडाखालीं करतील, आणि तें झाड एकदम कडाडून

मोडेल आणि हा राजपुत्र त्या झाडाखालीं सांपडून मरेल.

त्यांतून जर सुटला, तर राजा जो घोडा याच्या करितां पाठवील, त्या घोड्यावर हा बसला म्हणजे तो घोडा याला फेंकून देईल आणि त्यामुळें हा मरेल. आणि त्यांतूनहि वांचला, तर राजवाड्यांत शिरतांना फाटक कोसळून हा मरण पावेल. आणि त्यांतूनहि निसटला तर राजपुत्र राजवाड्यांत या राणी-जवळ निजला असतां एक कालसर्प येऊन त्याला दंश करील. या चारांपैकीं कशानें तरी हा मेलाच पाहिजे.

क. स्त्री:—बरं यांतून जर याला कोणीं सोडविलें तर ?

क.—तर हा सुटेल. परंतु त्याला सोडविणाऱ्यानें जर आपलें भाषण त्याला सांगितलें तर तो दगड होईल.

क. स्त्री:—मग त्याला मनुष्यदेह प्राप्त होणार नाहीं काय ?

क०:—त्या दगडावर राजपुत्रानें आपल्या मुलाचें रक्त शिंपडलें तर तो उठेल.

हें त्यांचें भाषण प्रधान-पुत्रानें ऐकलें. सकाळ होतांच ते आपला मार्ग आक्रमूं लागले. कबूतरानें सांगितलेला प्रत्येक अनुभव प्रधान-पुत्राला आला; परंतु सर्वांतून त्यानें त्याला वांचविलें. राजपुत्राला महालांत सोडून तो घरीं जातो असें म्हणाला; पण तो तेथेंच लपून राहिला. रात्रीं राजा-राणी तेथें निजावयास आलीं. प्रधान-पुत्र हातीं तलवार घेऊन पहारा करीत बसला. मध्यरात्रीला तो कालसर्प ठरल्याप्रमाणें आला. प्रधान-पुत्रानें तावडतोब आपल्या तरवारीनें त्याचे तुकडेतुकडे केले. परंतु इतक्यांत त्या सापाच्या रक्ताचा एक थेंब राजकन्येच्या गालावर उडाला. प्रधान-पुत्रानें विचार केला कीं, हा थेंब विषारी असल्यामुळें राजकन्येला अपाय करील. म्हणून त्यानें आपले डोळे बांधले, व जिभेनें तो थेंब चाटण्यास सुरवात केली. इतक्यांत राजपुत्र जागा झाला. त्याला प्रधान-पुत्र आपल्या बायकोच्या अंगावर वांकला आहे असें पाहून भयंकर राग आला, व तो तलवार घेऊन त्याला मारण्यास तयार झाला. प्रधान-पुत्र म्हणाला: "बाबारे ! आतांपर्यंत मीं जें जें केलें तें तुझ्या कल्याणाकरितां केलें." पण राजपुत्राचा त्यावर विश्वास बसेना. म्हणून तो कबुतराची हकीकत सांगूं लागला. जसजशी त्यानें हकीकत सांगण्यास सुरवात केली, तसतशी त्याची शरीरयष्टी दगडाची होऊं लागली. त्याची गोष्ट संपली तेव्हां तो पुरा दगड बनला. हें पाहून राजपुत्राला अत्यंत वाईट वाटलें. त्यानें तो दगड एका चांगल्या सुरक्षित ठिकाणीं ठेवला. पुढें नऊ महिन्यांनीं त्याला एक सुंदर मुलगा झाला. त्यानें तो मुलगा आपल्या राणीपुढून आणला आणि त्याला मारून तें रक्त त्या दगडावर शिंपलें. प्रधान-पुत्र उठला, परंतु राजपुत्रानें आपल्या मुलाला मारलें हें पाहून त्याला अत्यंत दुःख झालें. राजपुत्रानें आपल्या मुलाचें शव राणीच्या ताब्यांत दिलें; परंतु राणीला देवीनें एक वर दिला होता. त्या वरानें तें मृत बालक जिवंत झालें. पुढें ते सर्वजण मोठ्या आनंदानें राहूं लागले.

---


मुलांकरितां ] **पंचतंत्र** [ सचित्र !

संस्कृत पंचतंत्रांतील सर्व गोष्टींचें मराठी सुबोध भाषांतर केलें असून प्रत्येक गोष्टीस सुबक चित्र जोडलें आहे. एकंदर गोष्टी ५० असून चित्रेंही ५० आहेत. इसापनीतिप्रमाणेंच पंचतंत्रांतील गोष्टीही विशेष मनोरंजक असून बोधप्रदही आहेत. टाईप ग्रेट, कागद ग्लेझ, पृष्ठसंख्या ३५०. बाईंडिंग जाड पुठ्याचें, किं. १८४ ट. ह. ८४ शिवाय.

**म्यानेजर—चित्रशाळा प्रेस, पुणें.**

# तंबाखू

(लेखक—वि. य. मोकाशी)

मूलतः कोणत्याहि देशांतील तंबाखूमध्यें थोडया बहुत प्रमाणांत विषारी द्रव्यें आहेतच, पण पाश्चात्त्य देशांतून अनेक 'असिडां'च्या संयोगानें बनविलेल्या सिगारेट्स व चिरूटांमध्यें हीं विषारी द्रव्यें भरपूर आहेत; तीं, निकोटाईन, कोलोडाईन, प्रूझिक ॲसीड. ऑक्झाईड ऑफ कारबन व फुरफुरल ह्या प्रतिष्ठित पांच नांवांखालीं मोडतात. आतां क्रमशः त्यांच्या गुणधर्माकडे वळूं.

**१ निकोटाईनः**—विडी, सिगारेट् चिरूट अथवा चिलीम ओढतांना कित्येक वेळीं तात्कालिक किंवा २।४ मिनिटांनंतर ओढणाऱ्याच्या उजव्या किंवा डाव्या हातावर जो पिंवळसर डाग पडतो, तोच निकोटाईनचा होय. सिगारेट्, विडी, चिरूट अथवा चिलीम ओढतांक्षणींच धुम्रमिश्रित श्वास, अथवा धूर श्वासनलिकेंत शिरतो. तत्क्षणींच, शरीरांतील रक्तप्रवाह उन्नत होऊन कळत न कळत ओढणाऱ्यांस हुषारी आल्याचा भास होतो; पण ५।१० मिनिटांनंतर ही स्वप्नमय सृष्टि विलयास जाऊन ओढणाऱ्यास थोडी ग्लानी येऊं लागते. ज्यांचा खाण्यापिण्याचा दररोजचा बेत—दूध, तूप लोणी अथवा प्रोटीनस् फूडपैकीं म्ह० भक्ष्याभक्षणांपैकीं असेल त्यांच्यावर त्याचा विषारी परिणाम बराच काळपर्यंत होत नाहीं; पण शेवटीं शेवटीं म्हणजे वयाच्या पस्तीस नंतर कफ, क्षय, आणि अग्निमांद्य हे विकार त्यांना निःसंशय जडतात.

**२ कोलोडाईनः**—ह्या द्रव पदार्थाचा सिगारेट्स किंवा चिरूट सुवासिक करण्याकडे प्राधान्यतः उपयोग करितात. हा ओढण्याचा शोक करीत असतांना नस्येंद्रिय लुब्ध होऊन प्रथमतः चित्त डोलूं लागतें, मन प्रसन्न होतें. सुमारें वीस मिनिटांनीं ही सर्व मनःस्थिति नाहींशी होऊन वयातीत म्ह० पस्तीस नंतरच्या मनुष्याचे छातींत एकदम धडकी बसल्यासारखा भास होतो व चारपांच वर्षांच्या ह्या संवयीनें डोळ्याला झापड लागल्यासारखी मधून मधून होते आणि पुढें पुढें तर चांगलीच भोंवळ येते.

**३ प्रूझिक ॲसिडः**—ह्या द्रव पदार्थाचा तंबाखूवर पाश्चात्त्य व्यापारी बहुशा सिंचिन करतात. ह्याचा परिणाम ओढणाऱ्याच्या मस्तकावर प्रथम थोडा थोडा पण पुढें शाश्वतीचा होऊन दुपारचें उन्ह मावळूं लागतांच अर्ध्या अर्ध्या तासानें डोक्यांत एकदम चमक मारूं लागते; आणि पुढें पुढें सतत डोकें दुखण्याचा कायमचा विकार जडतो.

**४ ऑक्झाईड ऑफ कारबनः**—ह्या द्रवपदार्थाचा परिणाम वय—१५ ते २५ क्वचित् प्रसंगीं पस्तीस म्हटलें तरी चालेल, कांहीं झालेला दिसून येत नाहीं. पण थोडा शक्तिपात होतांच किंवा विषमनवज्वरांपैकीं एखादा जालीम ताप येतांच राजयक्ष्मासारखा (रक्तक्षय झाल्यानें डोळे काळे होणें) असा दुर्धर रोग शरिरास जडतो.

आतां राहतां राहिला शेवटचा द्रवपदार्थ; तो तो म्हणजे 'फुरफुरल' नांवाचा होय.

**५ फुरफुरलः**—शोकाखातर मळलेल्या तंबाखूंत ह्याचें १-२९ प्रमाण आहे. त्याच्या संवयीचा परिणाम दृष्टिमांद्य, "सर्लीव्हा" अथवा तोंडांतील लाळ दूषित करणें, सुग्रास अन्नास विषमय करणें हा होय.

अशी ही तंबाखू वस्तु अत्यंत घातुक आहे. ती किती, कोणत्या स्थितींत कशी ओढावयाची हें कोडें ज्याचें त्यानें सोडवावें. गजांत लक्ष्मी ज्यांच्या घरीं आहे, अशा पाश्चिमात्त्य देशांतील थंडगार हवेंत

राहणाऱ्या चैनी लोकांनीं चैन केली तर कदाचित् चालेल, पण सद्यःस्थितींत अन्नास मोताद झालेल्या आपण हिंदवासियांनीं ह्या व्यसनाचा प्रतिकारच केला पाहिजे. ह्या व्यसनाचे दुष्परिणाम अमेरिकेस फारच भोगावयास लागत आहेत. तेथील व्यापाऱ्यांना नोकराकरितां जाहिरात द्यावयाची झाल्यास "No Smokers should apply "–'विडी ओढणाऱ्यांनीं अर्जा पाठवूं नयेत.' अशा प्रकारच्या ठळक टाईपांत जाहिराती द्याव्या लागतात. ह्या उष्णदेशांत राहणाऱ्या लोकांनीं स्वतःला ह्या व्यसनापासून दूर ठेवावें. त्यांनीं आपल्या मुलाबाळांवर वय १५ ते २५ सक्त नजर ठेवून त्यांना व्यसनाधीन होऊं देऊं नये, अशी खबरदारी घ्यावी.

---

## शिवाजी महाराजांचा उदारपणा.

( लेखकः–ज. शि. रेगे, मुंबई. )

शिवाजी महाराजांच्या उदारपणाविषयीं पुष्कळ गोष्टी आहेत. ते आपल्या प्रजेवर स्वतःच्या मुलांप्रमाणें प्रेम करीत. प्रजा दुःखित पाहिली म्हणजे त्यांना फार वाईट वाटत असे. त्यामुळें प्रजाही त्यांना थोर मानीत असे. प्रजेला कोणी तरी त्रास वगैरे कांहीं देतो आहे कीं काय हें पाहण्यासाठीं ते आपल्या राज्यांत कसला तरी वेष घेऊन फिरत असत. अशा एक प्रसंगीं एक गोष्ट घडली ती अशीः–

एके दिवशीं शिवाजी महाराज मावळ्याच्या वेषांत आपल्या राज्यांत फिरत होते. फिरतां फिरतां वाटेंत त्यांनीं एक गुराखी गाई वळवीत असलेला पाहिला. त्यांतील एक गाय मस्तखोर होती. ती कांहीं केल्या वळेना, व ती एका शेतांत शिरली व शेत खाऊं लागली. शेताचा मालक त्या गुराख्याला शिवीगाळ करूं लागला. तेव्हां गुराखी मुलगा गाईला वळविण्याकरितां शेतांत धांवत गेला. धांवतां धांवतां तो एका दगडाला अडखळला व पडला. त्याचें ढोंपर फुटलें व रक्त वाहूं लागलें. त्याबरोबर त्या गुराखी मुलानें मावळ्याच्या वेषांत असलेल्या शिवाजीस हांक मारली. तेव्हां शिवाजी महाराज शेतांत गेले. त्या मुलाची ती स्थिति पाहून त्यांस फार वाईट वाटलें. त्यांनीं ताबडतोब आपल्या डोक्यास बांधलेला रुमाल फाडला व याच्या पायाला तो फडका बांधला. नंतर त्यांनीं त्याची गाय वळवून दिली व त्याचा हात धरून त्याला उठविलें व त्याला गाईसह त्याच्या घरीं नेऊन पोंचविलें.

घरीं आल्यावर त्या मुलास हे शिवाजी महाराज आहेत असें कळल्याबरोबर त्या मुलानें त्यांचे पाय धरले व तो रडूं लागला. तेव्हां शिवाजीनें विचारिलें, "तूं कां रडतोस !" तेव्हां तो मुलगा म्हणाला, "महाराज मी आपल्याला माझा हात धरून माझ्या घरीं आणविलें, तेव्हां मला मारूं नका. मी तुमची क्षमा मागतों. मी बापाचा एकुलता एक मुलगा आहें."

शिवाजी महाराज म्हणाले, "मुला भिऊं नको. तूंही माझा मुलगा आहेस. मी तुला कसा मारीन !" असें म्हणून ते आपल्या घरीं गेले. घरीं गेल्यानंतर पहिल्यानें त्यांनीं त्याला एक इनाम देवविलें.

# प्राण्यांची शिकवण.

(ले. गणेश महादेव केळकर)

ह्या जगामध्यें ईश्वरानें अनेक प्रकारचे प्राणी निर्माण केले आहेत. आणि प्रत्येकांत अनेक गुण आहेत. त्यांत मनुष्याला ज्ञान हें अधिक आहे; म्हणून त्यानें ज्ञानाच्या योगानें ह्या प्राण्यापासून जे गुण असतील ते ज्ञानबलानें घेऊन त्याप्रमाणें वागल्यास मनुष्यमात्राचें कल्याण आहे. तरी मुलांनो, मी जे तुम्हांस ज्या प्राण्याचे गुण सांगणार ते जरी क्षुद्र असेल, तरी त्याकडे लक्ष न देतां त्याच्या अंगचे गुण घेऊन त्या-प्रमाणें वागण्याचा प्रयत्न करा, म्हणजे तुमचें कल्याण होईल. प्रथम आपण मुंग्याच घेऊं. हे प्राणी अगदींच लहान आहेत, परंतु त्यांच्यांत अनेक गुण आहेत ते असेः—

एकदां मी अंगणांत संध्याकाळच्या वेळीं बसलों असतां एक मुंग्याची लांबची लांब रांग जातांना पाहिली. त्या वेळीं त्या आपलें भक्ष घेऊन आपल्या वारुळांत जात होत्या. त्यावरून मला त्यांची ती रांग पाहून त्यांच्या व्यवस्थितपणाचें मला मोठें कौतुक आणि नवल वाटलें आणि ह्या प्राण्याप्रमाणें मुलांनों तुम्ही जर शिस्तीनें वागण्यास शिकाल तर तुम्हांलाही शाळेंत जातानां पुस्तक शोध, जोडा पहा, ह्याखालीं जो वेळ जातो, तसा घालविण्याची बहुतेक वेळ येणार नाहीं. दुसरा गुण त्यांची ती रांग पाहून आणि एकाच वारुळांत इतक्या मुंग्या एकोप्यानें रहतात, हा गुण तर पाहून मला फारच नवल वाटलें कारण मोठमोठ्या शाहाण्या-शाहाण्या माणसांसही एकोपा राखतां येत नाहीं. तरी मुलांनों, हा गुण तुम्ही आपल्या मनांत नेहमीं बाळगा. आपलीं भावंडें व सोबती यांचेपाशीं अत्यंत प्रेमानें व एकोप्यानें वागल्यास त्यांत तुमचें कल्याण आहे. त्या एवढ्याशा मुंग्यांनीं तें एवढें मोठें वारूळ बांधलेलें पाहून मनाला फार संतोष वाटला. कारण त्यावरून त्यांची उद्योगप्रियता दिसून आली. आणि इतक्या लहान प्राण्याच्या हातून हीं केवढालीं कामें होतात पहा; म्हणून तुम्हीही त्याप्रमाणें सतत उद्योग करण्याची आपणास संवय लावून घ्यावा. त्या पावसाळ्याकरितां अन्नाची तरतूद करून ठेवितात यावरून त्यांची दूरदृष्टि दिसून आली.

कोळी हा प्राणीसुद्धां कांहीं मोठा नाहीं. परंतु त्यानेंही आपल्या घरांत ( जाळ्यांत ) शिरण्यासाठीं कसे प्रयत्न केले तें सर्वांस माहित आहे. जरी तो जाळ्यांत शिरतांना अनेक वेळ पडला, तरी त्यानें आपला धीर न सोडतां तसेंच नेटानें काम चालविलें हें पाहून त्याची चिकाटी व आस्था दिसून आली.

घोडा-हा प्राणी धन्यावर अत्यंत प्रेम करणारा आहे. त्याच्यासारखेंच तुम्ही आपलीं वडील भावंडें, आईबाप, यांजवर प्रेम करावें. दुसरा मोठा गुण, तो अत्यंत इमानी आहे. प्रामाणीकपणा हा गुण अंगीं आणण्या-विषयींही तुम्ही खटपट करा.

आणखीही अनेक प्राण्यांचे गुण सांगतां येतील. परंतु हा क्रम तुम्हांस आवडल्यास पुढें केव्हां तरी आणखी सांगेन. परंतु आज सांगितलें एवढेंच लक्षांत धरून त्याप्रमाणें वागण्याचा प्रयत्न कराल अशी मला उमेद आहे.

# गाढव कोण ?

एक बडे शेटजी होते. त्यांना प्रवासाला जावयाचें होतें. म्हणून त्यांनीं एक गाढव भाड्यानें घेतलें. त्या



गाढवाचा मालकहि मूर्खच होता. तो मालक शेटजींना घेऊन गाढव हांकण्याकरितां म्हणून त्यांच्याबरोबर निघाला. दुपारच्या वेळीं ऊन कडक पडलें होतें. शेटजी त्या मालकाला म्हणाले, "मी या गाढवाच्या सावलींत थोडा वेळ विश्रांती घेतों तोंवर तूंही थोडी



विश्रांती घे." मालक म्हणाला "छे मीं त्याच्या सावलींत निजणार. मी तुम्हाला गाढव भाड्यानें दिलें, मी त्याची सावली भाड्यानें दिली नाहीं, ती माझी आहे." शेटजी म्हणाले "मूर्खा! गाढव आणि त्याची सावली




निरनिराळी असते काय? तूं कधीं गाढवाशिवाय सावली पाहिली आहेस काय! मूर्खा! मी तुझें गाढव भाड्यानें घेतलें याचा अर्थ त्याचा मी केंसन केंस भाड्यानें घेतला असा होतो." असें सांगून तो त्याला बुक्के लगाऊ लागला, पण गाढव या दोघांपेक्षां शहाणें



होतें, त्यानें हें भांडण पाहून धूम ठोकली. या तिघांपैकीं कोण खरें गाढव होतें तें सांगा पाहूं?


# मधमाशीचें पोळें व मांजर.



हें काय बरं असावं !



बरं आपण खेळूंया त्याजबरोबर.



आँ ! अग आई ग !

# शालापत्रकाची चढाओढ

## जून महिन्यांतील कोड्यांचीं उत्तरें.

### सर्वांकरितां

देवकीनंदन

### मुलांकरितां

कानपूर.

बरोबर उत्तरें पाठविणारांचीं नांवें.

१ महादेव वासुदेव सातारकर *
२ एम. के. कुळकर्णी
३ रा. श्री. केणेकर
४ शंकर कृष्णा तावरे
५ प्रल्हाद विष्णु पिटके
६ नारायण विष्णु जोशी
७ सिताराम विष्णु कुरणे
८ आप्पाजी सखाराम तेंडोलकर
९ गणेश कृष्णा नेणुद्रीकर
१० एन. बी. भावे
११ गोविंद गोपाळ पेंढारकर *
१२ सदाशिव रामकृष्ण देशपांडे
१३ हरी रामचंद्र पै.
१४ पं. रा.आलेगांवकर
**१५ शंकर दत्तात्रय कालेलकर***
१६ नारायण गणपतराव म्हात्रे
१७ सुंदरलाल अंबालाल *
१८ रामचंद्र विठ्ठल कामत
१९ वसंत वासुदेव वाचासुंदर *
२० गणेश भगवंत लेले *
२१ दमयंती कुळकर्णी.
२२ वा. त्रि. केणेकर
२३ नामदेव कृष्णा परिट
२४ लक्ष्मण सिताराम तेंडोलकर
२५ भोगेश्वर वासुदेव कुलकर्णी
२६ मोतीराम रतन पाटील
२७ वसंत दत्तात्रय
२८ दिगंबर शंकर कुलकर्णी
**२९ विनायक गणपतराव म्हात्रे**
३० जयवंत पु. गूळगूळ
३१ रामचंद्र गणपत कंटक
**३२ सय्यद महेबूब अली**
३३ गणपत नथू पाटील
३४ किसनलाल तुळशीराम आगरवाले
३५ वा. वि. कोटस्थाने *
३६ सेक्रेटरी बालमित्रसमाज
३७ जगन्नाथ शिवराम रेगे *
३८ महादेव रामचंद्र माटे
३९ कृष्णा बापू संकपाळ
**४० भगवंत दत्तात्रय गरवारे ***
४१ शंकर केशव देशपांडे
**४२ तुकाराम जयराम लांझेवार**
४३ विष्णु गंगाधर चंद्रात्रे
४४ गणेश महादेव केळकर
**४५ वामन विठ्ठल अभ्यंकर ***
४६ दामोदर अच्युत कारे
४७ शां. पु. नाईक
४८ शंकर खंडेराव पुरंधरे
४९ मंजानाथ जर्नादन भट्ट
५० गणेश आप्पाजी गोडबोले
५१ राजाराम बावाजी पोतदार
५२ केशव श्रीपती राऊत
५३ शिवराम गोविंद कुलकर्णी
५४ लक्ष्मण यशवंत पागनीस
५५ अच्युत बाळकृष्ण परमानंद
५६ सदाशिव धोंडदेव सबनीस
५७ कृष्ण वैकुंठ कुळयेकर
**५८ तुकाराम पैंके**
५९ फकीरा बाळाजी सुतार
६० डी. जी. कुलकर्णी
६१ विष्णु रामचंद्र माटे
६२ रामकृष्ण गोविंद धावळे
६३ दिगंबर तुकाराम लांझेवार
६४ कौतुक भिवसन पाटील
**६५ अनंत रघुनाथ केळकर**
६६ तुकाराम गोपाळ सबनीस
६७ राजाराम दत्तात्रय गोडबोले
६८ सदाशिव त्रिंबक पुरंधरे
**६९ गंगुताई गोडबोले**
७० गोविंद शिवराम कुळकर्णी
७१ पांडुरंग यशवंत पागनीस
**७२ रामचंद्र अनंत बाळे**
७३ तुळशीराम सोनू
७४ त्र्यंबक गोपाळ जोशी
७५ नागेश त्रिंबक गोडबोले
७६ चंद्रभागा पाटील

ज्यांचीं दोन्हीं उत्तरें बरोबर आहेत, त्यांच्या नांवापुढें फुली आहे. बक्षिसें मिळालेल्यांचीं नांवें जाड टाइपांत दिलीं आहेत. त्यांना खालील अनुक्रमानें बक्षिसें देण्यांत आलीं आहेत.

१ सुभाषित
२ ध्रुव व चिलीया
३ रुमेला जुमेला
४ विनोद महदाख्यायिका
५ वाङ्मय विषयक निबंध
६ रासेलस
७ वाक्यमिमांसा
८ भाऊबीजेची आठवण
९ भातुकली
१० भारतांतील गोष्टी

## नवीं कोडीं

### सर्वांकरितां

चौदा मुलें अशी उभी करा कीं, प्रत्येक ओळींत चार चार येतील. ओळी सात असाव्यात.

### मुलांकरितां

रामभा उंचाचार्य बाडीचींबू सभा ज्युत्त मत यारकर तो. या वाक्याचा सरळ अर्थ करा.

दोन्हीं कोडीं रा. कृष्णाजी रामचंद्र केळकर, शेणोली, यांजकडून आलीं आहेत.

### उत्तरें पाठविणारांकरितां सामान्य नियम.

शालापत्रकांत सर्वांकरितां व मुलांकरितां कोडीं येतात. सर्वांकरितां जीं कोडीं असतात तीं कोणीहि सोडवावीं. परंतु मुलांकरितां जीं कोडीं दिलीं जातात तीं फक्त १५ वर्षांचे आंतील मुलांकरितां असतात. मुलांनीं आपण १५ वर्षांचे आंतील आहों, अशाबद्दल पालकाचा किंवा शिक्षकाचा शेरा घ्यावा. आम्हाला एखाद्या मुलाबद्दल संशय आला तर त्याला बक्षीस मिळणार नाहीं. कोड्याबरोबर **कुपन** असल्याशिवाय कोणाच्याही उत्तराचा विचार केला जाणार नाहीं. उत्तर पाठवितांना वाचकवर्ग विनाकारण एक आण्याचा खर्च करतात. त्या ऐवजीं अर्ध्या आण्याचें कार्ड घेऊन त्यावर उत्तर पाठवावें. कार्डावरच कुपन चिकटवावें.

एका कार्डावर दोन कुपनेंहि चिकटवतां येतात. ज्यांना पाकीट पाठवावयाचे असेल त्यांनीं कुपन पत्राला चिकटवून पाठवावें. कुपन लहान असल्यामुळें हरवण्याचा संभव असतो आणि हें हरवलें तर त्याची जबाबदारी आमचेवर नाहीं. कुपनावर आपलें नांव लिहिणें चांगलें. पुष्कळ उत्तरें बरोबर असली तर आम्ही बक्षीसाचा निकाल चिठ्या उचलून करतो.

---

| कूपन सर्वांकरितां आगष्ट १९२४ | कूपन मुलांकरितां आगष्ट १९२४ |
|---|---|

# पाणिनी.

ले. पु. शि. रेगे

" पाणिनी, अगदींच कसा रे तूं मठ्ठ गाढवा, उद्यांपासून जर अभ्यास केला नाहींस तर मी तुझें तोंड देखील पाहणार नाहीं. "

" पण गुरुजी— "

" चुप बैस गाढवा. मठ्ठ तो मठ्ठ आणि परत बोलायला लाज सुद्धां वाटत नाहीं. "

पाणिनीला हे शब्द ऐकून फारच दुःख झाले. तो स्फुंदुन स्फुंदुन रडूं लागला. त्याच्या इतर मित्रांनाही तेंपाहून फार वाईट वाटलें. अखेरीस तो खिन्न अंतःकरणानें तेथून उठला व गेला. गुरुजींनाही त्या वेळीं जरा वाईट वाटलें.

पाणिनी तेथून जो निघाला तो आश्रम सोडून अरण्यांत गेला. थोडेसें पुढें गेल्यावर त्याला एक रम्य मंदीर लागलें. तो आतां फार थकला होता. त्यानें मनांतल्यामनांत पूर्वींचा सगळा अभ्यास केल्याशिवाय गुरुजींना तोंड दाखवायचें नाहीं असा निश्चय केला होता.

तो मंदगतिनें देऊळांत शिरला. त्या देवळासमोर एक सुंदर, संगमरवरी दगडाचें कारंजें होतें. दोन बाजूला दोन पुष्करण्या होत्या. आणि तें देऊळ संगमरवरी दगडानें बांधलेलें होतें. आंत गाभाऱ्यांत एक सुंदर शंकराची पिंडी होती.

तें रम्य स्थळ पाहिल्याबरोबर पाणिनीच्या बालमनाला फार आल्हाद झाला. तो आंत गेला व बसला. थोड्या वेळानें जवळील ओढ्यांत जाऊन त्यानें आंघोळ केली व शुचिर्भूत होऊन ध्यान करण्यासाठीं देवळांत येऊन उभा राहिला व तपश्चर्येस प्रारंभ केला.

होतां होतां एक दिवस गेला, दुसरा दिवस गेला. तिसऱ्या दिवशीं त्याला ग्लानि आली आणि तो पडणार—

—इतक्यांत श्रीशंकर त्यास प्रसन्न झाले आणि त्यांनीं त्यास सावरून धरलें व म्हणाले, " पाणिनी माझ्या वरील तुझ्या अढळ निष्ठेबद्दल मी तुझ्यावर संतुष्ट झालों. आतां डोळे उघड आणि तुला काय पाहिजे तें माग " असें म्हणून त्यांनीं त्याच्या डोक्यावर वरदहस्त ठेविला.

पाणिनीनें डोळे उघडले व म्हणाला " मला संस्कृत भाषा चांगली येऊं दे. "

शंकरांनीं आपले डमरू वाजवले, त्यांतून असे शब्द निघाले—

(१) अइउण्. (२) ऋलक्. (३) एओङ्. (४) ऐऔच्. (५) हयवरट्. (६) लण्. (७) ञमङणनम्. (८) झभञ्. (९) घढधष्. (१०) जबगडदश्. (११) खफछठथचटतव्. (१२) कपय्. (१३) शषसर. (१४) हल्.

नंतर शंकर अदृश्य झाले. पाणिनीला ताबडतोब सर्व संस्कृत भाषा येऊं लागली. तेव्हां तो परत आश्रमाकडे जाण्यास निघाला.

पाणिनी आश्रमांत गेल्यावर त्यानें सर्व वर्तमान गुरुजींस सांगितलें. तें ऐकून गुरुजींस परमानंद झाला व त्यांनीं त्यास शाबासकी दिली. त्या दिवसांपासून पाणिनीवर गुरुजींची मर्जी बसली. पुढें पाणिनीनें संस्कृत भाषेचीं सूत्रें लिहिलीं.

मुलांनो, सततोद्योग व दीर्घ परिश्रम ह्यामुळें जसें पाणिनीला यश मिळालें तसें तुम्हालाही मिळेल पण तुम्ही उद्योग केला पाहिजे.

येनाक्षरसमाम्नायमधिगम्य महेश्वरात् ।
कृत्स्नं व्याकरणं प्रोक्तं तस्मै पाणिनये नमः
येन धौता गिरः पुंसां विमलैः शब्दवारिभिः ।
तमश्चाज्ञानजं भिन्नं तस्मै पाणिनये नमः ॥

# रंगीत इसाप-नीति.

ह्यांत एकंदर इसापनीतींतील आठ अगदीं सोप्या गोष्टी मोठ्या व जाड टाइपांत दिलेल्या असून प्रत्येक गोष्टीसमोर त्यांतील रहस्य दाखविणारें रंगीत सुंदर चित्र दिलेलें आहे. चित्रें पाहूनच मुलांना गोष्टींतील तात्पर्य कळतें. किं० ८६ ट. ह. ८८६.

# सचित्र इसाप-नीति.

[ उत्तरार्ध. ]

[ नवीन भाषांतर भाग २ रा. ]

वरीलप्रमाणेंच हा दुसरा भाग विक्रीस तयार आहे. ह्याचीं सुमारें ३०० पानें झालीं असून यांत ३५० गोष्टी आहेत चित्रांची संख्या १५० पर्यंत आहे. किं० १८४.

दोन्ही भाग एके ठिकाणीं बांधलेलें सुंदर पुस्तक किं० रु० २

# विद्यार्थ्यांकरितां नाटिका.

शीलं परं भूषणम्.

ही नाटिका प्रसिद्ध कवि-शिरोमणि नारायण वामन टिळक यांनीं केवळ लहान मुलांकरतांच लिहिलेली आहे यांत शृंगाररस मुळींच नाहीं. एवढेंच नव्हे, तर स्त्रीची भूमिका या नाटकांत आणलेलीच नाहीं शिवाय नाटकाचा विषय नैतिक विचारानें पूर्ण भरलेला असल्यामुळें शाळांतून वार्षिक संमेलनाचे वेळीं मुलांकडून ह्या नाटकाचा प्रयोग करविण्यास तें योग्य आहे. नाटकाचा विषय धनाची योग्यता जास्त किंवा ज्ञानाची योग्यता जास्त हा आहे. पुस्तकांत चार सुंदर चित्रें कथानकास अनुसरून दिलेलीं आहेत. किं० ८४.

म्यानेजर--चित्रशाळा प्रेस, पुणें.

# चिमुकलें भारत व रामायण.

महाभारत व रामायण हे आपले राष्ट्रीय ग्रंथ आहेत. यांत आपला प्राचीन इतिहास असून प्रपंच साधून परमार्थ कसा जोडावा हें उत्तम दाखविलें आहे. व्यावहारिक बोधाचा ह्या केवळ खाणी आहेत, आबालवृद्ध स्त्री-पुरुषांना या ग्रंथांचें ज्ञान होणें अगत्याचें आहे, प्रौढांकरितां आमचीं लोकप्रिय 'भारती युद्ध' व 'रामचरित्र' हीं पुस्तकें आहेत. आतां बारातेरा वर्षांच्या मुलांमुलींकरितां 'चिमुकलें भारत व चिमुकलें रामायण' हीं दोन पुस्तकें अनुक्रमें आम्हीं रामकृष्णकथासुधेचे प्रसिद्ध लेखक रा. कृष्णाजी गोविंद फिनरे व रा. विद्याधर वामन भिडे बी. ए. यांजकडून मुद्दाम लिहविलीं आहेत. पुस्तकाची भाषा फारच मोहक व सोपी आहे. वाचतां वाचतांच मुलांच्या मनावर त्यांतील रहस्य ठसावें म्हणून उपदेशपर वाक्यें जाड टाइपांत घातलीं आहेत, आणि कथानकांच्या अनुरोधानें ह्यापटोन प्रोसेसनें तयार केलेलीं भारतांत आठ व रामायणांत सात अशीं सुंदर चित्रें घातलीं आहेत. भारताचीं पृष्ठें १७२ व रामायणाचीं पृष्ठें ८२. छपाई बांधणी सुबक. किं० ८६, व रामायण किं० ८४.

म्यानेजर---चित्रशाळा प्रेस, पुणें शहर.

॥ ॐ नमः श्रीरामचंद्राय ॥

# आर्यमहौषधालय मु० पो० आंजर्ले.

**कोंकणप्रांतांतील अगदीं ताज्या व शुद्ध वनस्पतींचीं जगत्प्रसिद्ध निर्दोष व रामबाण औषधें.**

**कंदर्पमंजरी पाक**—हा अपूर्व पाक गरिबांपासून तों अमीरउमरावांपर्यंत सर्वांसही अत्यंत उपयोगी असून किंमत माफक ठेविली आहे. यांत मौक्तिक, प्रवाळ, लोह, माक्षिक, कस्तूरी, अंबर इ० अत्युच्च गुणकारक पदार्थ असून शिवाय बदाम, पिस्ते, अक्रोड चारोळी, केशर, वेलची, पंजाबी सालममिश्री, सफेतमुसळी, पत्री, गोक्षुर, शतावरी, आस्कंद, वंश-लोचन वगैरे (८०) उपयुक्त वनस्पति घातल्या आहेत. यानें पथ्यावांचून गुण येतो. यापासून कोण-त्याही कारणांनीं होणारा व कशाही प्रकारचा शुक्रस्राव, नपुंसकत्व, मूळव्याधि, रक्तदूषणामुळें स्वगूरोग, स्त्रियांची धुपणी व गर्भाशयस्थ दोष या भावना त्यांच्या एकंदर उपविकारांसह तत्काल बन्या होऊन धातुवृद्धि होते, व शरीर कणखर आणि तेजस्वी बनतें. २० तो० ड० २ रुपये. एकदम ३ डबे घेणारास ५ रुपये.

**स्वर्णधात्री तेल**—हें चारोळी, बदाम, कंकोळ, एला, बहुविध वनस्पतींचीं सत्त्वें व उपयुक्त तेलें अशा अनेक पदार्थांनीं बनविलें असल्यानें याच्या मर्द-नापासून अपस्मार, उन्माद, वेड, चक्कर इ० रोगांस जलद आराम पडतो. केंसांस चोळल्यानें-केंस काळे कुळकुळीत, तजेलदार, सडक लांब व मृदु होऊन मेंदु शांत आणि रोगरहित बनतो. यानें मुस्तकाचें टक्कल जातें. हें अंगास चोळून स्नान करीत गेल्यानें शरीराचा दुर्गंध जातो. खरूज, गजकर्ण, शिबें, तसेंच तळपाय, तळहात, डोळे व मस्तक यांचा दाह हे विकार खास बरे होऊन निद्रा चांगली येते, आणि नेत्ररोग दुरुस्त होतात. बा० किं० १। रु०

**दंतरक्षक पूड**—ही दांत व हिरड्या यांचे सर्व विकार तत्काल दुरुस्त करून दांत स्वच्छ व मजबूत करण्यांत प्रतिज्ञेची आहे. ड. ६ आणे.

सुरंगी, मालती, कल्हार, गुलबहार, दणाणा, लक्ष्मीविलास इ० बादशाही अति उंची अत्तरें व त्याचप्रमाणें गुलाब, हिना, केवडा, चमेली, जाई वगैरे सुगंधी अत्तरें आणि केंसांस लाव-ण्याचीं हरएक प्रकारचीं सुवासिक तेलें माफक दरानें पूर्ण खात्रीचीं मिळतील.

**सूचना**:—वरील औषधें व अत्तरें वगैरे पूर्ण खात्रीचीं असल्यामुळें आज पंचवीस वर्षांत त्यांचा लक्षावधि लोकांस अप्रतिम उपयोग झाला! म्हणून त्यांचा मेहमीं फारच खप होत आहे. अनुभवानंतर पूर्ण खात्री पटेलच. औषधें माहितीचे खर्चासह रोखीनें अगर व्ही. पी. नें पाठवूं. प्याकिंग व टपाल खर्च वेगळा. घाऊक घेणारास कमिशन भरपूर. सर्व औष-धांच्या आणि आरोग्यरक्षणाच्या माहितीचें सचित्र मोठें पुस्तक देऊं. आमचीं औषधें वगैरे मागविणें तीं खालील बिनचूक पत्त्यावर मागवावीं.

**कृष्णशास्त्री बिवलकर, वैद्य.**

REGISTERED. B. NO. 179




# अनुक्रमणिका.


| विषय. | पृष्ठ. |
|---|---|
| जपान व शिक्षण. | १६१ |
| कोल्हा आणि घुबड. | १६३ |
| दुर्व्यसनांचा त्याग. | १६४ |
| उपयुक्त माहिती. | १६५ |
| प्रतापी प्रतापसिंह ( नाटक. ) | १६७ |
| पतंग. | १७२ |
| मूर्ख ठ. | १७३ |
| पुरलेल्या शहराची गोष्ट. | १७५ |
| अस्वलाची खोड मोडली. / विविध माहिती. | १७७ |
| शिट्याचाले कबूतर. | १७८ |
| शालापत्रकाची चढाओढ. | १७९ |
| अचानक लागलेला शोध. / चुटके. | १८० |


मुद्रक व प्रकाशक—रा. रा. शंकर नरहर जोशी, चित्रशाळा प्रेस, १०२६ सदाशिव पेठ, पुणें सिटी.

# रंगीत इसाप-नीति.

ह्यांत एकंदर इसापनीतींतील आठ अगदीं सोप्या गोष्टी मोठ्या व जाड टाइपांत दिलेल्या असून प्रत्येक गोष्टीसमोर त्यांतील रहस्य दाखविणारें रंगीत सुंदर चित्र दिलेलें आहे. चित्रें पाहूनच मुलांना गोष्टींतील तात्पर्य कळतें. किं० ८६ ट. इ. ८८६.

# सचित्र इसाप-नीति.

[ उत्तरार्ध. ]

[ नवीन भाषांतर भाग २ रा. ]

वरीलप्रमाणेंच हा दुसरा भाग विक्रीस तयार आहे. ह्याचीं सुमारें २०० पानें झालीं असून यांत १५० गोष्टी आहेत चित्रांची संख्या १५० पर्यंत आहे. किं० ८४.

दोन्ही भाग एके ठिकाणीं बांधलेलें सुंदर पुस्तक किं० रु० २

# विद्यार्थ्यांकरितां नाटिका.

शीलं परं भूषणम्.

ही नाटिका प्रसिद्ध कवि-शिरोमणि नारायण वामन टिळक यांनीं केवळ लहान मुलांकरतांच लिहिलेली आहे यांत शृंगाररस मुळींच नाहीं. एवढेंच नव्हे, तर स्त्रीची भूमिका या नाटकांत आणलेलीच नाहीं शिवाय नाटकाचा विषय नैतिक विचारानें पूर्ण भरलेला असल्यामुळें शाळांतून वार्षिक संमेलनाचे वेळीं मुलांकडून ह्या नाटकाचा प्रयोग करविण्यास तें योग्य आहे. नाटकाचा विषय धनाची योग्यता जास्त किंवा ज्ञानाची योग्यता जास्त हा आहे. पुस्तकांत चार सुंदर चित्रें कथानकास अनुसरून दिलेलीं आहेत. किं० ८४.

म्यानेजर--चित्रशाळा प्रेस, पुणें.

# चिमुकलें भारत व रामायण.

महाभारत व रामायण हे आपले राष्ट्रीय ग्रंथ आहेत. यांत आपला प्राचीन इतिहास असून प्रपंच साधून परमार्थ कसा जोडावा हे उत्तम दाखविलें आहे. व्यावहारिक बोधाचा ह्या केवळ खाणी आहेत, आबालवृद्ध स्त्री-पुरुषांना या ग्रंथांचें ज्ञान होणें अगत्याचें आहे, प्रौढांकरितां आमचीं लोकप्रिय ' भारती युद्ध ' व ' रामचरित्र ' हीं पुस्तकें आहेत. आतां बारातेरा वर्षांच्या मुलांमुलींकरितां चिमुकलें भारत व चिमुकलें रामायण ' हीं दोन पुस्तकें अनुक्रमें आम्हीं रामकृष्णबावसुधेचे प्रसिद्ध लेखक रा. कृष्णाजी गोविंद फिनरे व रा. विद्याधर वामन भिडे बी. ए. यांजकडून मुद्दाम लिहविलीं आहेत. पुस्तकाची भाषा फारच मोहक व सोपी आहे. वाचतां वाचतांच मुलांच्या मनावर त्यांतील रहस्य ठसावें म्हणून उपदेशपर वाक्यें जाड टाइपांत घातलीं आहेत, आणि कथानकांच्या अनुरोधानें हाफटोन प्रोसेसनें तयार केलेलीं भारतांत आठ व रामायणांत सात अशीं सुंदर चित्रें घातलीं आहेत. भारताचीं पृष्ठें १७२ व रामायणाचीं पृष्ठें ८२. छपाई बांधणी सुबक. किं० ८६, व रामायण किं० ८४.

म्यानेजर--चित्रशाळा प्रेस, पुणें शहर.

मराठी
बालपत्रक

येथें शब्द नाहीं शिष्यासीं । हें अवघें सद्‌गुरूपाशीं ।
सद्‌गुरु पालटा अवगुणांसी । नाना यत्नें करोनी ॥
जें कांहीं आपणास ठावें । तें हळु हळु शिकवावें ।
शहाणें करून सोडावें । सकळा जनां ॥ १ ॥

—रामदास.

पुस्तक ३५ सप्टेंबर सन १९२४ अंक ९

१२-९
११।०।२८

## जपान व शिक्षण.

( ले० २ रा. )

जपानांत सामुरी नांवाचा वर्ग आहे. हा वर्ग आपल्याकडील पांढरपेशा वर्गासारखा असून शिक्षणांत पुढारलेला आहे. जपानमध्यें पाश्चात्त्य शिक्षणाचा प्रभाव पडण्यापूर्वी या सामुरी लोकांची रहाणी फारच कडक होती. आपल्याकडे गुरुगृहीं रहाणाऱ्या विद्यार्थ्याला अधिक कष्ट भोगावे लागतता हें सर्वांना ठाऊक आहेच. परंतु सामुरी लोकांच्या मुलांवर जें एक शिस्तीचें दडपण घातलें जात होतें, तें मात्र फार निष्ठुरपणाचें होतें. लहानपणीं आई, मुलाचें कोडकौतुक करते, त्याचे लाड पुरविते असा सामान्यपणें नियम आहे परंतु जपानमध्यें मात्र हे लाड बिलकूल चालू देत नसत. आईच्या अंगावर पिण्याचे दिवस फार लवकर संपत. एखादा मुलगा आईबरोबर चालला तर इतर मुलें त्याला चिडवून "अं, अजून तुला दूध लागतें काय?" असें विचारींत. एकूण त्यांचें लहानपण फारच थोडें असे, असें म्हणावें लागतें. मुलगा बोलूं लागला म्हणजे त्या वेळेपासूनच त्याजवर निरनिराळीं बंधनें घालण्यांत येत व त्याजपुढें उच्च ध्येयें ठेवलीं जात. त्याला आपलें कर्तव्यकर्म हेंच ध्येय असें शिकवीत, आत्मसंयमन हें व्यवहाराला अत्यंत अवश्यक असतें असें सांगत आणि मृत्यु, दुःख ह्या गोष्टींची बिलकूल पर्वा धरूं नये असें सांगत. लहान मुलांना मृत्यूचें भय वाटूं नये म्हणून रक्ताची त्यांना संवय करीत. फांशीच्या ठिकाणीं त्यांना नेत व त्यांनीं आपल्याला कोणत्याहि प्रकारें वाईट वाटत आहे असें दाखविता कामा नये असा निर्बंध त्यांच्यावर घातलेला असे. मनें

निगरगट्ट करण्याचा हा प्रयत्न होता. फांशीच्या ठिकाणाहून परत आल्यावर मनांत कोणतीहि भीति राहूं नये म्हणून त्यांना रक्ताच्या रंगाचा भात पुष्कळ खारट करून व त्यावर आंबट रस ओतून खावयाला देत.

याहिपेक्षां कठीण अशा गोष्टी लहान मुलाला कराव्या लागत. मध्यरात्रीच्या सुमारास त्याला स्मशानांत पाठवीत व आपण तेथें जाऊन आलों आहों हें दाखविण्याकरितां मृताची कवटी आणण्यास सांगत. मृतमनुष्य व जीवंत मनुष्य यांच्यामध्यें कोणत्या प्रकारचा फरक करूं नये अशी त्यांना सक्त ताकीद असे.

मुलगा जसजसा वाढे तसतसा त्याला कणखर असा शारीरिक व्यायाम करण्यास लावित घोड-दौड, निशाणबाजी, कुस्ती वगैरे हे खेळ असत. त्याचप्रमाणें प्रत्येक मुलास पोहणें, बोटी हांकारणें वगैरे करावें लागे.

जपानी मुलास भरपूर खायला घालीत. परंतु अन्न मात्र सात्विक अथवा नाजुक नसे. त्याचे कपडे खरबरीत व पातळ असत. जपानांत थंडीचा कडका अतिशय असला तरी त्याला हेच कपडे घालावे लागत. शरीरास ऊब यावी म्हणून त्याला विस्तवाजवळहि वसूं दिलें जात नसे. थंडी अतिशय वाजत असतां, हात कांपत असतां, त्यावर उपाय म्हणजे बर्फाच्या गार पाण्यांत हात बुडविणें व रक्तप्रवाह सुरू करणें हा होय. हातपाय गारठून गेले तर त्याला उबदार कपडे न देतां बर्फ पडलेल्या डोंगरांवर पळण्यास लावीत. लष्करी शिक्षणांत याहिपेक्षां कडक शिस्त पाळावी लागे मुलगा लहान असला तरी त्याच्या कमरेला तरवार लटकलेली असे. व त्या तलवारीचा उपयोग कसा करावा हें शिकविलें जाई. तरवार कशी वापरावी, आपला प्राण विशेषप्रसंगीं कसा घ्यावा, वगैरे गोष्टी त्याला शिकविल्या जात.

एका सात वर्षांच्या मुलाच्या धैर्याची गोष्ट जपानांत फार प्रचलीत आहे त्या मुलापुढें राजानें नुकतेंच कापून आणलेलें एक शीर ठेवलें व विचारलें कीं, हें तुझ्याच बापाचें शीर आहे काय? तें शीर त्याच्या बापाचें नव्हतें. तथापी त्याला सारा प्रकार ताबडतोब समजला. यावेळीं जर आपण आपल्या बापाचें हें शिर नाहीं असें कृतीनें दाखविलें, तर बापाला पुन: पकडण्यांत येईल ही गोष्ट त्याच्या लक्षांत आली. तो राजा फसला होता व त्याला पुरा फसविणें इष्ट होतें. मुलांनीं बापाकरितां अश्रू ढाळले, नमस्कार केला व आपल्याला अत्यंत दुःख झालें आहे हें दाखविण्याकरितां आपलीं आंतडीं फाडलीं. हें पाहून राजाला तें याच्या बापाचेंच शीर असलें पाहिजे याविषयीं संशय उरला नाहीं. परंतु त्यामुळें त्या मुलाचा बाप मात्र पळून गेला. त्या मुलाची आठवण साऱ्या जपानांत अद्याप कायम आहे, हा कणखरपणा व शिस्त अद्यापी जपानी मुलांत दिसून येते. कालपरत्वें तिचें स्वरूप पालटलें आहे एवढेंच.

१८६८ पर्यंत पाश्चात्य राष्ट्रांचा व जपानचा संबध नव्हता. १८६८ पासून तरतरीत बुद्धीच्या जपानी लोकांनीं आपल्या शिक्षणपद्धतींत फरक केला. आज हिंदुस्थानांत आपल्याला पाश्चात्त्य राष्ट्रांचें ज्ञानभांडार खुलें झालें आहे, परंतु त्या भांडाराशीं परिचय होण्यास आपल्याला इंग्रजी भाषा यावी लागते. तशी स्थिति जपानांत नाहीं. जपानी लोकांनीं पाश्चात्त्यांचें ज्ञानभांडार स्वतःच्या लोकांना खुलें व्हावें म्हणून इंग्रजी पुस्तकांचीं भाषांतरें भराभर आपल्या भाषेंत केलीं व इंग्रजी शिकण्याचे साऱ्या लोकांचे कष्ट वांचविले. जपानमध्यें कोठल्याहि पुस्तकालयांत गेलें तर इंग्लंडमध्यें विद्यमान असलेल्या व होऊन गेलेल्या सर्व ग्रंथकारांच्या ग्रंथांचीं भाषांतरें तेथें सांपडतात. त्यामुळें तेथील लोकांना जरी इंग्रजी, फ्रेंच, जर्मन वगैरे भाषा येत नसल्या तरी येथील ज्ञान व विचार त्यांना देशी भाषेंतून कळूं शकतात. पाश्चात्त्य राष्ट्रांची जपानला माहिति होऊ लागल्यापासून त्यांनीं शिक्षण सार्वत्रिक केलें

जपाननें नुसतें शिक्षण सार्वत्रिक केलें एवढेंच

नव्हे, तर पाश्चात्त्य व इतर राष्ट्रामध्यें प्रचलित असलेल्या कल्पना, शिक्षणपद्धती, वगैरेंचें ज्ञान करून घेतलें व त्याचा उपयोग स्वतःचे देशाच्या परिस्थितीप्रमाणें केला. याचें एक उदाहरण घेऊं. जपानी लोकांनीं साहेबाची टोपी उन्हापासून संरक्षण होण्यास उपयोगीं पडते असें पाहिलें आणि ती टोपी आपल्या पोषाखांत घेतली. परंतु इतर पोषाखांत मात्र बिलकूल बदल केला नाहीं, ही गोष्ट अंध अनुकरणप्रिय हिंदुस्थाननें लक्षांत बाळगावी. जपाननें वीज, टेलीफोन, ट्रॅम्वे, आगगाड्या वगैरेंचा प्रचार आपल्या देशांत केला आहे. परंतु घरगुती बाबतींत मात्र त्यांनीं कांहीं फरक केलेला नाहीं. आमच्याकडे अनुकरणाची मर्यादा फारच पुढें जाते. आम्ही आचारविचारांत व रहाणींत पाश्चात्त्य धर्तीवर जातों; पण जपान अवश्यक असा बदलच करीत असतो.

शिक्षणांतहि त्यांनीं असाच बदल केला आहे. त्यांनीं आपले लोक निरनिराळ्या देशांत पाठविले व त्या देशांत शिक्षणाची पद्धती काय आहे हें समजून घेतलें. एवढें झाल्यावर त्यांनीं आपले स्वतःचें वैशिष्ठ्य राखून स्वतःची शिक्षण योजना बनविली आणि त्या योजनेंप्रमाणें शिक्षण देण्यास सुरुवात केली. पुढील लेखांत त्यांच्या शिक्षणयोजनेचा विचार आपण करूं.

# कोल्हा आणि घुबड.

## लहान मुलांकरितां.

( लेखकः—शांताराम पुडलीक नाईक. )

एकदां एक कोल्हा आपलें भक्ष शोधित एका अरण्यांत भटकत होता. तो सर्व अरण्यभर फिरला, परंतु भक्ष कांहीं मिळेना. थोड्या वेळानें त्यास एका घुबडाचें रडणें ऐकूं आलें व तो आपल्या मनाशीं म्हणाला "मला आतां चांगलें जेवण मिळालें आहे." आणि मोठ्या युक्तीनें व गुप्तपणें जाऊन त्यानें त्यास पकडलें. घुबडानें आतां आपणास अंगबळानें निसटून जातां येत नाहीं असें पाहून, अकलेच्या बळानें निसटून जावें असें मनांत आणिलें व त्यास म्हणाला' 'हे शहाण्या, कीर्तिवान्, शूर अशा कोल्ह्या, तूं मला आतां खाणारच हें निश्चित आहे. परंतु हें सर्व लोकांस समजलें पाहिजे; यास्तव तूं "मी घुबडास खाल्लें" असें ओरड. कोल्ह्यास ह्या मोठमोठ्या विशेषणांनीं संबोधिल्यामुळें गर्व झाला व त्यासरशीं तो तसें ओरडला. बिचारा घुबड आपल्या अकलेच्या बळानें निसटून गेला. अंगबळापेक्षां अकलेचें बळ अधिक हें खरें आहे.

---


विद्याधर वामन भिडे यांचें

**अर्थालंकारांचें निरूपण.**

किंमत १ रुपया

# दुर्व्यसनांचा त्याग.

[ लेखक—व्ही. जी. आठवले ]

मनुष्याच्या हातून हरहमेष ज्या अनेक गोष्टी घडत असतात, त्यांतील कांहीं तो स्वतःच्या बुद्धीनें करतो व कांहीं इतरांच्या—आपल्या हितचिंतकांच्या, मित्रांच्या—सल्यानें करतो. स्नेह्यांच्या किंवा परिचितांच्या सांगण्यावरून तो ज्या गोष्टी करतो, त्या करितांना त्यानें कार्याच्या योग्यायोग्यतेबद्दल विचार केलेला असतोच असा नियम नाहीं. आणि म्हणूनच एखाद्या वेळीं तो दुर्व्यसनांत सांपडण्याचा संभव असतो. याचा अर्थ मनुष्य स्वतःला दुर्व्यसनें लावून घेऊं शकत नाहीं असा नव्हे तर तीं बहुधा दुसऱ्याच्या संगतीनें लागतात

पहिल्यानें मित्राच्या आग्रहावरून सहज दारूचा किंवा चहाचा एखादा पेला मनुष्य घेतो. मग अशा तऱ्हेनें चारदोनदां आग्रह जाहला, म्हणजे त्याला स्वतःलाच एखाद्या वेळीं घ्यावासा वाटतो, व मग ती संवय होते; आणि शेवटीं तिचें रूपांतर व्यसनांत होतें. मग दारू प्याल्याशिवाय चैन पडत नाहीं, डोकें स्थिर राहात नाहीं, व हुषारी वाटत नाहीं असें त्याला वाटूं लागतें. सर्व तऱ्हेचीं व्यसनें हीं अशींच लागत असतात. अर्थात् तीं लागलीं असल्यास त्यांचा त्याग एकदम केला पाहिजे पण ज्यांना एकदम सोडून देण्याचें धैर्य नसेल त्यांना पुढें लिहिलेल्या गोष्टीवरून बराच बोध घेतां येईल.

एका गृहस्थाला अफू खाण्याचें व्यसन फार लागलेलें होतें. त्याला कोणी 'एकदम हें व्यसन सोडून दे' असें सांगितलें तर अशक्य वाटे. शेवटीं त्याच्या एका मित्रानें विचार करून त्याला एक उपाय सुचविला. तो म्हणाला, 'मित्रा तूं अफू खातोस हें कांहीं वाईट नाहीं; पण ती हवी तितकी, आणि पाहिजे तेव्हां खातोस हें मात्र अपायकारक आहे. म्हणून तूं फक्त दिवसांतून एक वेळच खात जा. तुला प्रत्येक वेळीं किती लागेल तें मला सांग' त्यावर त्या गृहस्थानें किती पाहिजे तें सांगितल्यावर मित्रानें तेवढा एक खडूचा तुकडा त्याजपाशीं दिला, आणि सांगितलें कीं हा खडूचा तुकडा घे व त्याच्या इतकी वजन करून दररोज ठरलेल्या वेळीं तूं बिनधोक घेत जा. मात्र घेतल्याबरोबर याच खडूनें एका फळ्यावर, आपण किती वाजतां घेतली, त्याची दर दिवशीं मिती लिहून नोंद करीत जा."

कांहीं दिवसांनीं त्या गृहस्थाच्या घरीं कामाकरितां तो मित्र आला असतां, त्याला असें समजलें कीं आपण दिलेला खडू संपला आहे. व तो गृहस्थही आपल्या व्यसनांतून मुक्त झाला आहे. त्या गृहस्थानें आपल्या मित्राचे अत्यंत आभार मानिले हें लिहिण्याची गरज नाहीं!

सारांश, ज्या माणसांना दुर्व्यसनांपासून एकदम परावृत्त होण्याची धमक नसेल, त्यांनीं क्रमाक्रमानें तीं सोडण्याचा प्रयत्न करावा; ज्यांना आळसाचें व्यसन असेल त्यांनीं क्रमानें उद्योगशील बनण्याचा अभ्यास करावा. ज्यांना दारूबाजी, चहापान किंवा धूम्रपान यांसारखीं दुष्ट व्यसनें लागलीं असतील त्यांनींहि शक्य तितक्या लवकर त्यांजपासून एकदम दूर व्हावें. परंतु तें ज्यांना व्यसनांच्या फार दिवसांच्या साहचर्यामुळें शक्य नसेल, त्यांनीं नियमितपणानें वागून क्रमाक्रमानें तीं सोडण्याचा प्रयत्न करावा. त्यांतच त्यांचें स्वतःचें त्यांच्या समाजाचें, व राष्ट्राचेंही कल्याण आहे.

# उपयुक्त माहिती.

(ले. श्रीपाद बालकृष्ण देशपांडे, मायणी-सातारा)

## लेखक २.

( मागील अंकावरून चालू )

**१९. चौदा विद्या**—मागील लेखांत म्हणजे लेखांक नंबर १मध्यें चौदा विद्या दिलेल्या आहेत; पण त्यांहून भिन्न अशा शांतिपंचीकरण प्रकरण आठमध्यें आहेत, त्या अशाः—१ वेदपाठ, २ ज्योतिष, ३ गायनकला, ४ वैद्य ५ मल्लयुद्ध, ६ परीक्षा, ७ धनुर्वेद, ८ अक्षर लिहिणें ९ शास्त्रपठण, १० पोहणें, ११ पाठांतर, १२ अश्वारोहण, १३ वैदिक, १४ लौकिक.

**२० सूर्याचीं द्वादश नांवें**:—मित्र, रवि, सूर्य, भानु, खग, पूष्णव, हिरण्यगर्भ, मरिचि, आदित्य, सवितृ, अर्क व भास्कर.

**२१ चार प्रकारचे भक्त**—१ आर्त ( पीडित, भगवत्प्राप्तीची इच्छा करणारा ), २ अर्थार्थी ( धनप्राप्तीची इच्छा करणारा ), ३ जिज्ञासु (ज्ञानप्राप्तीची इच्छा करणारा ), ४ ज्ञानी ( ज्ञान झालेला ).

**२२ मानवी इंद्रियें**:—

| कर्मेंद्रियें | | ज्ञानेंद्रियें | |
|---|---|---|---|
| १ हात. | ४।५ उत्सर्ग. द्वारें. | १ नाक. | ४ जीभ. |
| २ पाय. | | २ कान. | ५ त्वचा. |
| ३ दांत. | | ३ डोळा. | |

**२३ रस**:—१ आम्ल, २ तिक्त, ३ कटु, ४ मधुर ५ क्षार व ६ कषाय.

**२४ देवतरु**:—१ मंदार, २ पारिजात, ३ संतान ४ कल्पवृक्ष व ५ हरिचंदन.

**२५ रिपु**:—१ काम, २ क्रोध, ३ लोभ, ४ मोह ५ मत्सर व ६ मद.

**२६ प्रमाणें**:—१ शाब्द, २ अनुमान ३ उपमान, ४ प्रत्यक्ष, ५ अर्थापत्ति व ६ अनुपलब्धि.

**२७ चार वर्ण व चार आश्रम**:—ब्राह्मण, क्षत्रिय वैश्य, व शूद्र हे चार वर्ण व ब्रह्मचर्य, गार्हस्थ्य, वानप्रस्थ व संन्यास हे चार आश्रम होत.

**२८ पंचप्राण**:-प्राण, अपान, व्यान, उदान व समान.

**२९ उपप्राणः**—१. नाग—तोंड वासणें ( जांभई ) २. कूर्म-शिंक ३. कृकर-भूक उत्पन्न करणें ( ढेकर ) ४. देवदत्त-उचकी उत्पन्न करणें ५ धनंजय-सर्व शरीरास व्यापून राहणें. ( शरीर फुगविणें )

**३० मराठी महिने व ऋतु**:—

| ऋतु | महिने |
|---|---|
| शरद. | आश्विन, कार्तिक |
| हेमंत. | मार्गशीर्ष, पौष |
| शिशिर. | माघ, फाल्गुन |
| वसंत. | चैत्र, वैशाख |
| ग्रीष्म. | ज्येष्ठ, आषाढ |
| वर्षा. | श्रावण, भाद्रपद |

३१ **चार पुरुषार्थः**—धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष.

३२ **चौऱ्यायशी लक्ष योनींची विभागणीः**—९ लक्ष जलचर, १० लक्ष पक्षी, ३० लक्ष पशु, २० लक्ष तरु, ११ लक्ष कीटक, व ४ लक्ष मनुष्य.

३३ **कपिलाषष्ठीः**—हें वर्ष बहुधां ६० वर्षांनीं एकदां येतें. हें वर्ष येण्यास महिना भाद्रपद, पक्ष कृष्ण, तिथी षष्ठी, वार मंगळवार, नक्षत्र रोहिणी, योग व्यतीपात आणि महानक्षत्र हस्त इतके योग यावे लागतात.

३४ **योगाचीं आठ अंगें**:—यम, नियम, आसन प्राणायाम, प्रत्याहार, धारणा, ध्यान व समाधि.

३५ **पांच अवस्था**:—जागृति, स्वप्न, सुषुप्ति, तुर्या व उन्मनी.

३६ **चौऱ्यायशी आसनांतील मुख्य आसनें**:—सिद्ध, पद्म, वीर, भद्र व वज्र.

३७ **चक्रें**:—आधार ( गुद ), लिंग नाभी, हृदय तालुमूल ( कंठ ) व ललाट.

३८ **छंदः**—१ गायत्री, २ उष्णिक्, ३ अनुष्टुप् ४ बृहती, ५ पंक्ती, ६ त्रिष्टुप् व ७ जगती.

३९ **शूरः**—रतिशूर श्रीकृष्ण, रणशूर पार्थ, दानशूर कर्ण, स्वधर्मशूर वशिष्ठ, प्रस्थशूर श्रीयाळ, सभाशूर वाचस्पति, भक्तिशूर प्रल्हाद, इच्छाशूर धर्मराणा, सत्त्वशूर हरिश्चंद्र, कलहशूर दुर्योधन व क्षमाशूर क्षमा.

४० **योगः**—१ विष्कंभ, २ प्रीति, ३ आयुष्मान् ४ सौभाग्य, ५ शोभन, ६ अतिगंड, ७ सुकर्मा, ८ धृति, ९ शूल, १० गंड ११ वृद्धि, १२ ध्रुव, १३ व्याघात, १४ हर्षण, १५ वज्र, १६ सिद्धि, १७ व्यतीपात, १८ वरीयान्, १९ परीघ २० शिव २१ सिद्धि, २२ साध्य, २३ शुभ, २४ शुक्ल, २५ ब्रह्मा, २६ ऐंद्र, २७ वैधिति.

४१ **म्हणी**:—जर्मनभाषेंत एक लाख, स्पॅनिशभाषेंत तीस हजार व मराठींत सुमारें पांच हजार म्हणी आहेत.

४२ **नक्षत्रें**:—१ अश्विनी, २ भरणी, ३ कृत्तिका ४ रोहिणी ५ मृग, ६ आर्द्रा, ७ पुनर्वसु, ८ पुष्य, ९ आश्लेषा, १० मघा, ११ पूर्वा, १२ उत्तरा, १३ हस्त, १४ चित्रा, १५ स्वाती, १६ विशाखा, १७ अनुराधा, १८ ज्येष्ठा, १९ मूळ, २० पूर्वाषाढा, २१ उत्तराषाढा, २२ श्रवण, २३ धनिष्ठा, २४ शततारका २५ पूर्वाभाद्रपदा, २६ उत्तराभाद्रपदा व २७ रेवती कोणी अभिजित म्हणून २८ वें नक्षत्र मानितात.

४३ **सप्तस्वरः**—षड्ज, ऋषभ ( रिषभ ), गंधार मध्यम, पंचम, धैवत व निषाद यांना अनुक्रमें सा, री, ग, म, प ध नी असे आहेत.


# अभिनव काव्यमाला भाग २

या पुस्तकाची दुसरी आवृत्ति छापून विक्रीस तयार आहे. किं. १ रु. ट. ह. व व्ही. पी. खर्च निराळा.

म्यानेजर—चित्रशाळा प्रेस, पुणें.

# प्रतापी प्रतापसिंह.

( लेखकः—हणमंत कृष्ण कुलकर्णी. )

## अंक २ रा.

### प्रवेश १ ला.

[ स्थळः—पृथ्वीराजाचा दिवाणखाना.]

( पृथ्वीराज व विजयसिंह बसले आहेत. )

**पृथ्वी०**—महाराणाजींची तहाची विनंती ऐकून बादशहाला तर अत्यंत आनंद झाला आहे. त्या भरांत तो वाटेल तशा अभिमानाच्या गप्पा मारूं लागला आहे. महाराणाजींचें पत्र हातीं पडल्याबरोबर त्यानें लगेंच एक बडा दरबार भरविला. आणि मोठ्या आनंदानें ' महाराणा प्रतापसिंह मला शरण आला आहे ' म्हणून गप्पा मारुं लागला आहे. आणि जी गोष्ट कधींच शक्य झाली नसती; ती होणार असें वाटून त्याला धन्यता वाटूं लागली आहे. जाऊं द्या. राणाजी अशाप्रकारें शरण येणें शक्य नाहीं ' हा खलिता चुकून आपणाकडे आला असेल अथवा त्यांत कांहीं लबाडीचा प्रकारही असूं शकेल. याकरितां प्रथम त्याबद्दल खरा तपास झाला पाहिजे. ' असें जेव्हां मीं त्यांना सांगितलें तेव्हां बादशहाला तें पटलें. अन् तुम्हीच तपास करा असा त्यानें मला हुकूम केला. विजयसिंहजी, खरोखरच कां राणाजी तह करणार आहेत ? कां हा एक त्यांचा युद्धाचा डाव आहे ?

**विज०**—ठाकुरजी काय सांगूं ? राजस्थानची दैवगतीच फिरली यांत कांहीं शंका नाहीं ! नाहीं तर महाराणाजींसारखा वीरशिरोमणी हा तहाचा विचार मनांत सुद्धां आणतांना ? पण प्रारब्धापुढें कोण काय करणार ! राणाजींचें मन दारिद्र्यामुळें होरपाळून जाऊन केलेली प्रतिज्ञा पुरी न करितां मधेंच हा अधोगतीचा मार्ग स्वीकारण्यास तयार झालें ! !

**पृथ्वी०**—काय ? राजस्थानचा वीरशिरोमणी महाराणा प्रतापसिंह दारिद्र्यामुळें यवनांचें दास्य करण्यास तयार झाला ? हें झालें तरी कसें ? हम्मीरवंशाला उज्वल करणाऱ्या महाप्रतापी राणाजींचें आजपर्यंतचें तपश्चरण माहीत असणाऱ्या मनुष्याला हें खरें तरी वाटेल काय ? या असल्या कठीण प्रसंगीं स्वदेशाचा उद्धार करण्याचें अती कठीण असें कार्य करीत असणाऱ्या राणाजीला द्रव्य सहाय्य करणारा एकदा तरी लक्ष्मीपुत्र नसेल का? ज्या राजस्थानांत पूर्वीं सोन्याचा धूर निघत होता त्याच राजस्थानांत हल्लीं संपत्ती नाहीं असें कसें म्हणतां येईल ! पण संपत्ती असणाऱ्याला ती सन्मार्गीं खर्च करण्याची बुद्धी तरी झाली पाहिजेना ? हें दुर्दैवी राजस्थाना, जोंपर्यंत असले लक्ष्मीपुत्र तुझ्यापोटीं जन्मास येतील तोंपर्यंत तुझी हीन दशा कायमच राहणार !! कांहीं झालें तरी राणाजींनीं तह करण्यास तयार होणें हें अगदींच निंद्य आहे. आमच्यासारख्या कमकुवत मनाच्या निर्बल रजपुतांना यवनांचें दास्य स्वीकारण्यावांचून गत्यंतरच नाहीं. पण प्रतापसिंहजींसारख्या नरकेसरीनें स्वतंत्रपणें सार्वभौमसत्ताच गाजविणें योग्य आहे. ठाकुरजी, मी राणाजींना एक पत्र देतों तें आपण त्यांना पोंचवा व सांगा कीं, प्रतापि प्रतापसिंहजींनीं यवनी बादशहाला शरण येणें म्हणजे सिंहानें जंबुकाला शरण जाण्याइतकेंच हास्यास्पद आहे. आणखी असेंही सांगा कीं, जर कोणाकडून या राजस्थानचा उद्धार व्हावयाचा असेल आणि जर यवनांची खोड कोणाकडून मोडली जावयाची असेल तर ती एका महाप्रतापी प्रतापसिंहजींकडूनच. हें पक्कें लक्षांत ठेवा.

**विज०**—(स्व.) राणाजी कुठें खरोखरी तह करायला तयार झाले आहेत. ( उघड ) ठाकुरजी, आपल्या पत्रानें राणाजींचा विचार खास बदलेल यांत शंका नाहीं.

**पृथ्वी०**—विजयसिंहजी, खुषरोझाची हकीकत वाचतांच महाराणाजी रागानें लाल होतील आणि त्यांचे हात यवनांचें पारिपत्य करण्यास धांवतील.

विज०— ठीक आहे. या पत्रानें तरी महाराणाजींचा हा विचार बदलो म्हणजे झालें. म्हणजे हें राजस्थानावर आलेलें संकटही आपोआप टळेल. बरें मी येतों तर. (जाऊं लागतो.)

पृथ्वी०—ठीक आहे. राणाजींना माझ्या पत्राचें उत्तर मात्र जरूरीनें पाठविण्याविषयीं विनंती कळवा.

विज० —अलबत कळवीन. ( जातात. )

प्रवेश २ रा.

[ स्थळः—राणाजींच्या तंबूपुढील भाग. नूरमहंमद रजपूत वेषांत प्रवेश करितो. ]

नूर०—माझा वेष किती पण बरोबर साधला आहे, मी मुसलमान आहें असें ओळखण्याची कोणाची छाती आहे. अरे हाच प्रतापाचा तंबू वाटतं. चला आंत तर जाऊं या. पण जावं कसं ? कुणीं विचारलें तर काय बरें सांगावें ? ( डोके खाजवून ) हं असंच. कोणी विचारिलें तर सांगावें झालें मी रायसिंगाकडे आलोंय म्हणून. रायसिंग काळा आहे का गोरा आहे, हें कुणा लेकाला माहीत आहे म्हणा. त्याची गांठ पडलीच तर बघतां येईल. काय बोलायचें तें. ( थोडेसें पुढें जातों. समोरून रायसिंग चिलीम फुंकीत प्रवेश करितो. )

राय०—( झुरका मारून ) काय ब्याद आहे पगा ही मुसलमानाची. लेकाचा छाती ठोकून लढाईबी करना. अन् गप्पबी बसना. लढायला तर भीतूया. कारण आमचे महाराज भीमापरमान खंबीर. तंवा समद कोल्हं असंच भ्यायचं. ( झुरका ओढून खोकतो. ) हे कोन बाबा हकडच येतुया. वायचं पुढं होऊन हटकावंच त्याला. ( पुढें होऊन झुरका ओढत ) काय पावनं हकडं कुनाकडं चाललायसा ?

नु०—( पुढें होऊन ) राम राम पावनं. इथं रायसिंग म्हणून कोणी आहेत का ?

राय०—हो असल. मग त्येच्याशीं काय करायचं हाय ?

नु०—कांहीं नाहीं थोडेसें काम होतें झालें.

राय०—अव पन काय काम व्हत तें तर सांगाल.

नु०—कांहीं नाहीं, त्याच्या बहिणीचा त्याला निरोप सांगायचा होता.

रा०—काय निरुप ? अन् त्याच्या भैनीचा ?

नु०—होय.

रा०—सांगावं पावनं काय निरुप हया. ( चिलीम पुढें करून ) हवी का ही बया ? तुमास्नी याचं कांहीं आंग हाय का न्हाई ?

नु०—नाहीं रे बाबा. मी असलें कधीं ओढीत नसतों.

राय०—( पाठीवर थाप मारून ) काय राव तुमी तरी लई मिस्कील दिसताया. अव इचा एक झुरका घेऊन तरी पगा.

नू०—नको, नको.

राय०—अव पगा तरी. इचा एक झुरका वोढा कीं तुमाला स्वर्ग दिसायला लागल स्वर्ग. ( झुरका ओढतो. )

नू०—चिलीम ओढल्यानें स्वर्ग दिसतो ? तें कसें काय बुवा ?

रा०— अव ओढून पगा तरी स्वर्ग दिसतुया कीं न्हैं. ( झुरका ओढून व वर बोट करून ) तें पगा तें पगा स्वर्ग.

नू०—सगळें झूट आहे झालें. कांहींतरी तुम्ही बोलतां राव. चिलीम ओढल्यानें स्वर्ग कसचें दिसतेंन् काय ?

रा०—बरं बुवा. नाई तर नाई. पन तो निरुप. रायसिंगाच्या भयनीचा निरुप काय सांगा कीं !

नू०—अहो रायसिंगाची भेट तरी घालून द्या म्हणजे सर्व कांहीं सांगतों.

राय०—( स्व. ) मी कोन है हें या गब्बाला म्हाईत न्हैसं दिसतंया. याची थोडी गंमत तरी करूंया कीं. ( उघड ) अव मीच रायसिंग असं समजा. अन् सांगा.

नू०—अहो समजा कसं ? खऱ्या रायसिंगाला भेटवाल तर खरं.

राय०--रायसिंग कसा काय आहे हें तुमास्नी ठाव हाय का ?

नु०--मला कांहीं त्याची माहिती नाहीं बुवा. मीं त्याला कधीं पाहिलासुद्धां नाहीं.

रा०--मंग, मी रायसिंग न्हवं ? असं कसं म्हणताया राव. रायसिंग मीच; ( मिशीवर पीळ देऊन ) रायसिंग हाच. दुसरा कुठला येतुया.

नूं०--तुम्हीच रायसिंग ना ? मग तुमच्या बहिणीचें नांव काय सांगा बघूं.

रा०--माझ्या भयनीचं नांव, गिरजा. अन् ती जोधपूरला राहतीया. तुमी जोदपुरास्न आलाया व्हय ?

नू०--( स्व. ) मोठी पंचाईत आली बुवा. याची बहीण कोण, अन् कुठली, हें मला तरी कुठं माहीत आहे. होय म्हणून ठोकून द्यावं झालं. ( उघड ) होय, मी जोधपूरचा, तुमच्या बहिणीची आणि माझी चांगली ओळख आहे.

रा०--( स्व. ) अरे लेका लबाडा, मला फसवितोस व्हय ? माजी भयन जयपूरला हया, अन् तिचं नांव बी कमला. अन् हा गाढीचा, मी काय बी रुवाट सांगितलं तरी व्हय म्हणतूया. ह्यो कोनीतरी लबाड मानूस दिसतुया. ( उघड ) अव पावनं, आतां खरं खरं सांगा. पगू. अगदीं खरं सांगा.

नू०--( स्व० ) अरेच्या आपलें बिंग आतां बाहेर पडणार वाटतं. ( उ० ) अहो खरें कसलें ? मी काय खोटं सांगतोंय' तुम्हाला ?

रा०--अव, माजी भन गिरजा न्हवं.

नू०--( चपापून ) नव्हे तर कोण ?

रा०--अव तिचं नांव कमला. अन् ती जयपूरला व्हातीया.

नू०--( आश्चर्यानें ) काय? ती जयपूरला राहती?

रा०--व्हय. तुमी कोन? अन् असं लबाडीनें हत कां आलाया ?

नू०--मी लबाडीनें कशाला येऊं

रा०--अस्सं ( त्याचा हात धरून ) चोरा, तूं त्या अकबराचा हेर नव्हेस? खरं बोल.

नू०--नाहींरे बाबा. अकबर कसला तो मुला माहीतसुद्धां नाहीं. मग मी त्याचा हेर कुठला?

रा०--( एक गुद्दा लगावून ) बच्चाजी खरं बोल. नाईतर तुजी हाडंच नरम करतुया पग.

नू०--( स्व० ) आतां मोठी पंचाईत आली बुवा. आपलं खरं स्वरूप याला सांगितल्याशिवाय हा धटिंगण मला सोडीलसं वाटत नाहीं ( उ० ) हें पहा रायसिंग आतां मेहेरबानी करून मला सोडा, जाऊं द्या.

रा०--कुठं जातुयसा ? चल म्हाराजांकडं. हकडची बातमी तकडं न्यायला पाहिजे न्हाई कां?

नू०--हें एवढें घे. ( हात पुढें करतो ) अन् मला सोडून दे.

रा०--( गुद्दे गावून ) चोरा, लांच देऊन पळून जावं म्हनतुयसा, हा रायसिंग लांचबीच घेणार न्हवं बरं! चल म्होर. ( आणखी एक गुद्दा मारतो. ) चल भामट्या पुढं हो. ( गुद्दा मारतो. )

नू०--आयायी. मारूं नकोस रे. मी मरतोंयकीं.

रा०--मरनास, तूं मेलास तर मला थोडंच सुतक लागतंया. चल. ( पुढें घालून जाऊं लागतो. समोरून विजयसिंह येतो. )

विज०--काय रायबा, हें काय लचांड आहे ?

रा०--ह्यो अकबराचा हेर ह्या या लेकाला तळघरंच दावायला हवं.

विज०--होय कां ? सोडून दे त्याला.

राय०--काय ? सरदारसाव, याला सोडूं म्हनताया?

वि०--हो. सोडून दे. आपल्या महाराजांचा तसा हुकूम नाहीं कां? शत्रूकडल्या माणसास कोणी त्रास द्यायचा नाहीं.

रा०--बरं बुवा. तुमा सरदारांपुढं माझं काय चालतंया ( सोडून देतो. ) जा. ( नूर जातो. )

वि०--महाराणाजी आंत आहेत कां ?

रा०--व्हय. हायती. चला. ( जातात. )

### प्रवेश ३ रा

[ स्थळ:—राणाजींचा दिवाणखाना. प्रतापसिंह व सूक्तसिंह बसले आहेत. ]

**प्रता०**—दिल्लीस बादशाहाकडे तह करण्याला विजयसिंहास पाठविल्यापासून मला कशांतच गोडी वाटत नाहीं. उद्विग्नतेच्या भरांत मी अकबराकडे खलीता पाठवून चुकलों. अकबर तह करण्यास तर एका पायावर तयारच आहे. विजयसिंह काय उत्तर घेऊन येणार हेंही पण ठरल्यासारखेंच आहे. त्याची आज परत येण्याची वाट आहे. तो आल्यावर कायतें समजेलच.

**सूक्त०**—महाराज, अकबराबरोबर तह करणें हें केव्हांही योग्य नाहीं. आपण तह केला असें ऐकून कोणाला खरें सुद्धां वाटावयाचें नाहीं. आणि ज्या गरीब प्रजेचा यवनांकडून छळ चालला आहे त्यांची तर या गोष्टीनें पार निराशा होईल. त्यांना निराश करणें आपल्यासारख्या पूज्य विभूतींना योग्य दिसणार नाहीं.

**प्रता०**—हें सारें खरें. पण दैवाच्या पुढें माझा काय इलाज चालणार ? ( उसासा टाकून ) परमेश्वरानें बुद्धी दिली आणि मी खलीता पाठवून चुकलों.

**सूक्त०**—कां ? अद्याप तह झाला नाहींना ? ग इतका विचार कसला ? अद्याप तह करणें न करणें आपल्या हातीं आहे. आपल्यास तह नाकारितां येईल.

**प्रता०**—माझ्या सर्व अटी त्यानें कबूल केल्यावर कसें नाकारतां येईल ? त्याला जर आमच्या अटीच मान्य झाल्या नाहींत तर तो प्रश्न निराळा.

**सूक्त०**—विजयसिंह आल्यावर कायतें समजेलच.

( विजयसिंह प्रवेश करितो. )

**विज०**—(मु. क.) महाराणाजींचा विजय असो.

**प्रता०**—( आतुरतेनें ) तहाचें काय झालें ? प्रथम सांगा.

**विज०**—तहाचें सध्यां लांबणीवर पडलें.

**प्रता०**—वा फारच नामी गोष्ट झाली.

**सूक्त०**—चांगलें झालें ! ! महाराज, श्रीएकलिंग जीच्या मनांतून हा राजस्थान परदास्यांत जावा असें नाहीं

**प्रता०**—( पत्र पुढें करून ) आणि हें बिकानीरच्या पृथ्वीराजांचें पत्र.

**प्रता०**—पृथ्वीराजाचें पत्र ? आणा पाहूं. ( पत्र फोडून वाचतो. ) पृथ्वीराजानेंही तुमच्यासारखेंच तह न करण्याबद्दल लिहिलें आहे. पृथ्वीराजा, तूं मला चांगला मार्ग दाखविलास. मी चुकून केवळ मनस्तापाच्या भरांत पारतंत्र्याच्या खोल दरींत पडण्यास तयार झालों असतां तूं मला त्यापासून परावृत्त केलेंस हे तुझे मजवर फार उपकार झाले आहेत.

**विज०**- महाराणाजींच्या पत्रानें अकबराला फारच आनंद झाला. आणि त्यानें लागलाच दरबार भरविला. आणि त्यांत त्यानें स्वतःची प्रतिष्ठा व शौर्यहीं खूपच वर्णन केली. पण पृथ्वीराजांना तें सहन न होऊन त्यांनीं बादशहाला असें बजाविलें कीं, महाराणा प्रतापसिंहजी आपणांस केव्हांहि शरण येणार नाहींत, आणि तह करणें हेंही पण केव्हांही शक्य नाहीं.

**सूक्त०**—वा ! पृथ्वीराजानें आम्हा रजपुतांची बाजू चांगलीच सांवरून धरली.

**प्रता०**—बस्स, यापुढें यवनांशीं तह करण्याचें मनांत देखील आणायचें नाहीं. जीवांत जीव आहे तोंपर्यंत त्यांच्यांशीं टक्करच मारीत रहावयाचें. पृथ्वीराजानें आपल्या पत्रांत ‘ आमचा मान व अब्रू हीं आम्ही अकबरास विकलीं ’ असें म्हटलें आहे. खरेंच आहे. कोणत्या रजपुताची अब्रू त्या दुष्ट अकबरानें घेतली नाहीं. फक्त माझा हम्मीरवंश या त्याच्या निर्लज्ज प्रकारापासून मोठ्या शौर्यानें बचावला आहे. या प्रतापसिंहाचा हम्मीरवंश या प्रतापी प्रतापाचे पंचप्राण शरीरांत आहेत तोंपर्यंत तरी त्या दुष्ट अकबरास शरण जाणार नाहीं. यावेळीं सर्व जगाची दृष्टी माझ्याकडे लागून राहणें अगदीं साहजीक आहे. मी यवनाबरोबर तह केला तर सर्वांची फार निराशा होईल. हें पृथ्वीराजाचें म्हणणेंहा अगदीं खरें आहे. म्हणून या सर्व लोकांची आशा पूर्ण करण्याकरितां व आपल्या राष्ट्राचा त्या दुष्टापासून बचाव करण्याकरितां मी

आजपर्यंत ज्याप्रमाणें वागत आलों त्याचप्रमाणें मला यापुढेंही वागलें पाहिजे. तसें जर मी न वागेन तर सर्व जगाच्या निंदेस व ईश्वराच्या घरीं शिक्षेसही मी पात्र होईन.

**सूक्त०**—महाराज, आम्हा सर्वांची व राष्ट्राची अशीच इच्छा आहे. आपण स्वीकारलेल्या महत्कार्यांत परमेश्वर व आपलें राष्ट्रही आपणांस मदत करण्यास तयार आहे.

**प्रता०**—यापुढें अकबराबरोबर लढाई करण्याच्या तयारीस लागलें पाहिजे. प्रधानजी, तुम्ही आपले सर्व सैन्य गोळा करा व आपलें निशाण या टेंकडीवर फडकवा. व सर्व रजपूत सरदारांना व राजेरजवाड्यांना आपल्या सैन्यासह या निशाणाभोंवतीं गोळा होण्याबद्दल हुकूम पाठवा. उदेपूरसह सर्व मेवाड व चितोड शहरही मुसलमानांपासून घेतल्यावांचून ही लढाई बंद होणार नाहीं. या प्रतापी प्रतापानें ( तलवार उपसून ) ही तलवार आज म्यानांतून बाहेर काढिली आहे. हिनें हजारों आविंधांचे जीव यमसदनीं जातील. आणि हिनें अकबराला त्यानें केलेल्या दुष्टपणाबद्दल शिक्षा मिळून पुनः आपलें गेलेलें राज्य आपणांस परत मिळेल. इतक्या सर्व गोष्टी साध्य होईपर्यंत ही म्यानांतून बाहेर काढलेली तलवार मी पुनः म्यानांत घालणार नाहीं.

**सूक्त०**—महाराज, युद्धखर्चासाठीं रक्कम कोणीकडून घ्यावयाची याबद्दल हुकूम व्हावा.

**प्रता०**—सध्यां खास तिजोरींत जी शिल्लक असेल ती घ्यां. पुढें पहातां येईल.

**सूक्त०**—आज्ञा सरकार. (रायसिंग प्रवेश करितो.)

**राय०**—(मु० क०) म्हाराजास्नी भेटायला म्हून आपलं जुनं परदानजी आल्याती सरकार.

**प्रता०**—( आश्चर्यानें ) जुने प्रधान भामशा आले आहेत कां ? त्यांना आमच्या खास दिवाणखान्यांत घेऊन चल. मीही तिकडे आलोंच. ( जातो. सर्व उभे रा०

**सूक्त०**—कसं काय विजयसिंहजी, महाराज पुनः तयार झाले कीं नाहीं लढायला ?

**वि०**—न व्हायला काय झालें हो. पृथ्वीराजांनीं पत्रही पण तसेंच लिहिलें होतें. दिल्लीच्या निर्लज्ज कारभारांत खरोखर कांहींच अर्थ नाही.

**सूक्त०**--बरें चला. हें एक ठीक झालें. आतां आमच्या देशाचा उदयकाल जवळच आला असें म्हणायला कांहीं हरकत नाहीं.

**विज०**—चला. आपणांस पुढच्या तयारीस लागलें पाहिजे.

**सू०**—चला. ( जातात. )

( अपूर्ण )

चौथ्या इयत्तेकारितां ! केवळ चौथ्या इयत्तेकरितां ! !

## सुधारून वाढविलेली दुसरी आवृत्ति.

एकाच प्रतीस ८४८६ चीं तिकिटें पाठवावीं. ] **प्रश्नगुच्छ** [ घाऊक मागणीस ट. व्ही. पी. खर्च माफ, शिवाय कमिशन.


या पुस्तकांत चौथ्या इयत्तेच्या—अंकगणित विषयक—वार्षिक परिक्षेचे ( ५ जिल्ह्यांचे, १६ वर्षांचे ) प्रश्न; त्यांचें सुलभ पृथक्करण आणि भूत्वर्णनात्मक परिशिष्ट असल्यानें त्वरित मागणी करून तुमच्या विद्यार्थ्यांची या दोन विषयांत कितपत तयारी झाली आहे हें वार्षिक परीक्षपूर्वीच पहा. कागद छपाई व बांधणी उत्तम आहे. लिहाच पत्र.

**पांडुरंग रामचंद्र चांडवले, शा. नं. १ बेळगांव.**

# पतंग.

चित्रविचित्र आणि हव्या त्या आकाराचे पतंग तयार करून उडविण्यांत चिनी लोकांचा हातखंडा आहे. या कलेंत त्यांनीं सर्व जगास मागें टाकलें आहे. कांहीं विशिष्ट सणांच्या दिवशीं हे पतंग उडविण्याचा चिनी लोकांचा प्रघात आहे. आकाशोड्डान या नांवानें प्रसिद्ध असलेल्या सणाच्या दिवशीं तर हे पतंग उडविण्याची मारे गर्दी होऊन जाते. अनेक सांप्रदाय व धर्ममतें यांचीं निदर्शक चिन्हें म्हणून हे पतंग तयार करण्यांत येत असतात व त्याकरतां ठरलेल्या आकृति व रंग त्यांना देण्यांत येतात. मनोरंजन आणि धार्मिक भावना यांचें सुरेख मिश्रण या पतंगांत झालेलें असल्यामुळें हजारों चीनी लोक हा समारंभ साजरा करण्यासाठीं मैदानांत जमतात.

नाना प्रकारचे रंग आणि आकृत्या देण्यांत पतंगवाले आपल्या कलेची पराकाष्ठा करतात. खालीं दिलेल्या चित्रांत असाच एक पतंग दाखविला आहे. चिनी पुराणांत वर्णन केलेल्या एका सहस्रपाद गोमेच्या आकृतीचा हा एक पतंग आहे. हा आकाशांत उडत असतांना मोठा मजेदार दिसतो. ते मोठमोठाले भयंकर डोळे, उघडलेलें विक्राळ तोंड आणि रोंखलेलीं शिंगें व वरचि मोठी लांबी यामुळें एक अजस्र गोम आकाशांत उडते आहे असा भास होतो.



बांबूच्या काठ्या लांबवर एकमेकांवर आडव्या बांधून मग त्यांवर निरनिराळ्या भडक रंगाचे कागद चिकटवून हा पतंग तयार करतात. आपल्याकडील ताबुतांच्या रचनेप्रमाणेंच ही कृति आहे. या चिनी पतंगांप्रमाणेंच रंगारंगाचे व अजस्र पतंग उत्तर हिंदुस्थानांतील श्रीमंत लोक मौजेखातर उडवीत असतात.

हे पतंग आकाशांत वर गेले म्हणजे त्यांना आवरण्यासाठीं बारीक दोर्‍यांचा उपयोग होत नाहीं. वरील चिनी पतंगाला ठिकठिकाणीं बळकट दोर्‍या बांधून कित्येक जण मिळून धरून ठेवतात, तेव्हां तो आकाशांत स्थिर रहातो. एकटा मनुष्य त्याच्या प्रचंड ओढीनें आकाशांत सहज ओढला जाईल.

प्राचीन काळीं पतंगांचा उपयोग सैन्याच्या हालचाली किंवा बातम्या कळविण्याकडे केला जात असे. चिनी लोकांना ही कला इ. स. पू. ३०० वर्षांपासून अवगत झालेली आहे आणि भरतखंडानेंच त्यांना ती शिकविली.

# मूर्ख ठक.

## फार प्राचिन काळची गोष्ट.

एक शेटजी आपल्या जवळचे सारे पैसे घेऊन एका रानांतून आपल्या घरीं चालले होते. त्याचा रस्ता एका दाट झाडींतून होता. त्या झाडींत पुष्कळ चोर, दरवडेखोर वगैरे लोक असत. त्यांचें गांव फार दूर होतें, म्हणून त्यांनीं बसण्याकरितां एक घोडें घेतलें. वेळ रात्रीची होती. शेटजी मोठे हुशार माणूस होते. त्यांनीं दुरून चोर आलेले पाहिले. तेव्हां या चोरांच्या हातावर तुरी देऊन जावें असें त्यांनीं ठरविलें. शेटजीच्या कंबरेला २००।२५० रुपयांचा कसा होता. त्यांनीं त्यांतून २५ रुपये काढले व ते रुपये घोड्याच्या गळ्याजवळ बांधून ठेवले. इतक्यांत ते चोर जवळ आले. त्यांनीं शेटजींना चांगला धाक धपटशा घातला व त्याच्या जवळचे सारे पैसे लांबवले. शेटजींनीं चोरांना जातांना पाहून मोठमोठ्यानें ओरडण्यास सुरवात केली; आणि अखेरीस त्यांनीं घोड्याच्या गळ्यावर मोठ्या जोरानें थाप मारली. त्या बरोबर सारे रुपये खळकन् खालीं पडले. त्या बरोबर त्या चोरांची मोठी गडबड उडाली. जो तो त्याला शिव्या देऊं लागला व चोरा हे पैसे कोठून आणलेस म्हणून विचारूं लागला. तो म्हणाला, “ हा माझा घोडा दररोज २५ रुपये देतो. ” हें ऐकून ते चोर एकत्र झाले व आपसांत कुजबुजूं लागले. ते आपल्या टोळीच्या नायकाकडे गेले व म्हणाले “ हा धोडा आपल्याला मिळाला पाहिजे. ” शेटजी तिकडे ओरडत होतेच. नंतर तो नायक त्या शेटजीला म्हणाला “हा घोडा आम्ही नेणार, तुला पाहिजे तर त्याचे पैसे घे ” असें म्हणून त्यांनीं आपल्या चाकराला त्याला १००० रुपये द्यावयास सांगितलें. शेटजी मनांतल्या मनांत खूप हंसले व बाहेर आपला २५ रुपये रोज देणारा घोडा गेला म्हणून रडूं लागले व आपला मार्ग चालूं लागले.

पुढें हे चोर आपल्या घरीं आले व त्यांनीं लुटीची वांटणी आपसांत केली. तो घोडा प्रत्येक दिवस एकेकाच्या घरीं रहावा असा त्यांनीं करार केला. प्रथम घोडा नायकांच्या घरीं गेला. नाईक साहेब मोठे आतुर झाले होते. सकाळ होतांच ते घोड्याजवळ आले व त्याला थापटूं लागले; पण त्यांतून पैसा बाहेर पडेना. अखेरीस थापटून थापटून त्यांचे हात दुखूं लागले. कदाचित् आपली कांहीं चुकी झाली असेल असें समजून ते गप्प राहीले. दुसरे दिवशींची पाळी दुसऱ्याची होती. तो नायकाकडे आला व रुपये मिळाले का म्हणून विचारूं लागला. नायकानें ‘हो’ असें उत्तर दिलें. याप्रमाणें प्रत्येकांच्या घरीं घोडा फिरून आला. परंतु कोणचि आपल्याला पैसे मिळाले नाहींत असें म्हणेना. अखेरीस ती गोष्ट फुटली व सर्वांनीं शेटजींचा समाचार घ्यायचें ठरविलें.

इकडे शेटजींना या चोरांची भीति होतीच. त्या चोराकरितां त्यांनीं योजना करून ठेवली होती. त्यांनीं आपल्या बायकोला म्हटलें कीं, “ जेव्हां चोर येतील तेव्हां मी तुजजवळ रुपये मागीन, तूं देत नाहीं असें म्हण, मी तुझ्या अंगावर धांवून येईन. मी धांवून आलों म्हणजे तूं बेशुद्ध होऊन पड व अंगावर तांबड्या शाईची बाटली ओतून घे. नंतर मी एकतारी वाजवीन, आणि एकतारीचा आवाज ऐकलास म्हणजे पुनः उठ ” याप्रमाणें शेटजींनीं योजना केली.

पुढें ते चोर आले. ते हात पाय आपटीत व दांतओंठ खात त्याच्या अंगावर धांवून गेले. पण शेटजी वस्ताद होते. त्यांनीं “ काय झालें ? ” म्हणून शांतपणें

विचारलें. चोर म्हणाला " काय झालें? अरे, आम्हाला घोडा २५ रुपये रोज देतो असें सांगून आमच्या जवळून पैसे उपटलेस आणि तो घोडा तर कांहींच देत नाहीं. " त्यावर शेटजी म्हणतात " बरं तर आमचा आपला घोडा परत द्या. " नंतर त्यांनीं बायकोला हांक मारली व " त्यांना १००० रुपये देऊन टाक " असें म्हटलें. त्यावर बायकोनें " जात नाहीं " असें उत्तर दिलें. शेटजी रागावले व त्यांनीं बायकोवर शस्त्र उपसलें, बायको बेशुद्ध झाली, तिनें अंगावर शाई ओतून घेतली. या चोरांना वाटलें कीं, या शेटजीनें तिचा खून केला व त्यामुळें रक्त बाहेर आलें. नंतर शेटजींनीं आपली एकतारी काढली व त्यावर गाणें गाण्यास सुरवात केली. थोड्या वेळानीं त्याची बायको झोंपेंतून मनुष्य उठावें त्याप्रमाणें जागी झाली. हा चमत्कार पाहून त्या नायकाला आश्चर्य वाटलें. घोड्याबद्दलचा त्याचा राग कुठल्याकुठें मावळून गेला. तो म्हणाला " ही एकतारी मला दे. मी तुला हिचें १०० रुपये देतों. " शेटजींनीं बरेच आढे वेढे घेतले; परंतु अखेरीस त्यांनीं ती एकतारी नेलीच. त्यांचें हें मूर्खपणाचें कृत्य पाहून शेटजींना व त्यांच्या बायकोला फार हंसूं आलें.

इकडे नाईक साहेब घरीं आले व त्या एकतारीचा प्रयोग करावा म्हणून त्यांनीं आपल्या बायकोला ठार केलें. नंतर त्यांनीं एकतारी वाजविण्यास सुरवात केली; परंतु त्याची बायको हूं का चूं करीना. तो, ती एकतारी वाजवून अगदीं थकून गेला; तेव्हां त्याला वाटलें कीं, शेटजींनीं पुनः आपल्याला फसविलें. परंतु ही गोष्ट बाहेर फुटली तर आपले इतर सांथीदार आपल्याला हंसतील असें वाटून त्यांनीं या आपल्या फजीतीचा सुगावा कोणाला लागूं दिला नाहीं. उलट सर्वांना एकतारी फार चांगली आहे, मेलेला मनुष्य उठविते असा चहुंकडे पुकारा केला. दुसऱ्या दिवशीं, दुसऱ्या चोरानें असाच आपल्या बायकोचा खून केला व असाच पुकारा केला. अशा प्रकारें सर्वांनीं आपल्या बायका मारून टाकल्या. अखेरीस ते सर्व एके ठिकाणीं जमले व झालेला खरा प्रकार एकमेकाला सांगूं लागले. तेव्हां अखेरीस सर्वांनीं पुनः एकवार शेटजींना मारण्याचा निश्चय केला.

शेटजी ह्या थरावर गोष्ट येणार हें जाणूनच होता. त्या चोरांनीं शेटजीला गांठलें व त्याला खूप चोपलें. नंतर त्यांनीं एक पोतें आणलें व त्या पोत्यांत शेटजीला कोंबून नदीकडे चालविलें. परंतु त्याची बायको स्वस्थ बसली नव्हती. ते चोर त्याचें गाठोडें बांधून खाण्यापिण्यास व झोंपण्यास गेले. इतक्यांत त्याची बायको आली व तिनें त्याला त्यांतून सोडविलें. पुढें त्या दोघांनीं एक मेलेलें वासरूं त्या पोत्यांत नीट जपून भरलें व पोत्याचें तोंड पूर्वीप्रमाणें बंद केलें.

रागानें बेहोष झालेले ते चोर पोत्यांत कोण आहे याचा विचार न करतां नदीमध्यें गेले व पोतें बुडवून मोकळे झाले. नंतर ते गांवांत गेले व तेथें दोन दिवस विश्रांतीकरितां राहिले. विश्रांती घेऊन ते जेव्हां घरीं परतूं लागले, तेव्हां त्यांच्या उलट दिशेनें शेटजी एक गाय घेऊन येतांना दिसले. चोरांना आश्चर्य वाटलें व त्यांनीं तूं वर कसा आलास असें विचारलें. शेटजी म्हणाले " मी जेव्हां नदींत गेलों तेव्हां आप्सरांनीं, देवकन्यांनीं व नागकन्यांनीं माझें स्वागत केलें. तें सारें बायकांचें राज्य आहे, तेथें पुरुष कोणी नाहीं. मी दोन दिवस तेथें घालविल्यावर त्यांनीं मला ही गाय कामधेनु म्हणून बक्षीस दिली, तिला घेऊन मी घरीं जात आहे."

चोरांना ही सारी गोष्ट खरी आहे असें वाटलें व ते आम्हांला त्या स्त्रीराज्यांत घेऊन चल असें म्हणूं लागले. शेटजीनें त्यांचें म्हणणें कबूल केलें. तो म्हणाला " चला प्रत्येकजण गळ्याला एक मोठा धोंडा बांधा आणि चला माझ्या बरोबर. " असें म्हणून त्यांनीं त्यांना नदीच्या मध्यावर नेलें व बुडी घेण्यास सांगितलें. गळ्याला धोंडे बांधले असल्यामुळें ते सारेजण पाण्यांत मरण पावले. त्या दिवसांपासून शेटजी आनंदानें राहूं लागले.

# पुरलेल्या शहराची गोष्ट.

फार प्राचीन काळची गोष्ट सुमारें दोन हजार वर्षांपूर्वीं इटलीमध्यें पांपी नांवाचें शहर होतें. या शहरांत स्नानगृहें, पानगृहें, बागबगीचे, नाटकगृहें, वगैरे सर्व चैनीच्या सोई होत्या. लोक रंगेल व आनंदी होते. या शहरापासून एक मैलावर व्हेस्युव्हिअस नांवाचा ज्वालामुखी पर्वत होता. या पर्वताच्या उतरणीवर द्राक्षाचे वेल लावलेले होते व गुरेंहि हिरवळ चाटत हिंडत असत. सायंकाळच्या रम्य वेळीं तरुण युवक-युवती या पर्वतावर सहल करावयास जात, व अस्तंगत होणाऱ्या दिनराजाची मजा पहात.



बाह्यतः सौंदर्य पूर्ण असणाऱ्या वस्तूंआंत निराळ्याप्रकारच्या असतात, ही गोष्ट तेथील लोकांना माहीत नव्हती. म्हातारीं माणसें आपल्या नातवंडांना भिवविण्याकरितां त्या ज्वालामुखीच्या भयंकर गोष्टी सांगत. इ. स ६३ सालची गोष्ट. पांपीच्या लोकांना आपल्या वृद्ध आजोबांच्या गोष्टींचा खरोखरच अनुभव आला. पांपीची सारी जमीन हदरूं लागली. मोठालीं देवळें, घरें, काडकाड मोडून पडूं लागलीं, जमीनीमध्यें खोल गर्जना होऊं लागली, आणि साऱ्या शहराचा विध्वंस झाला. भूकंपाचा धक्का बेताचा होता म्हणून लोकांचे प्राण तरी वांचले. त्यानंतर पांपीची सुधारणा झाली व अधिक बळकट घरें बांधण्यांत आलीं.

पुनः पांपीशहर पूर्ववत् आनंदी झालें. लोकांचे आहार-विहार पुनः पूर्वीसारखे सुरु झाले. कांहीं काळपर्यंत व्हेस्युव्हिअस एकाद्या गंभीर संन्याशाप्रमाणें शांत-मुद्रा धारण करून बसला होता. परंतु त्याचा खळबळाट चालू होताच. अखेरीस भूकंपाचे धक्के बसण्यास सुरवात झाली. जमीन हदरूं लागली, रस्त्यावरून जाणाऱ्या गाड्या कोलमडूं लागल्या, समुद्राचें पाणी किनाऱ्यापासून बरेंच दूर हटलें, त्या ज्वालामुखीच्या तोंडांतून आगीचे व धूराचे लोट निघूं लागले, शेजारचा भाग राखेनें व कोळशानें भरून गेला. झालें, ज्या पांपीची एवढ्या काळजीनें घटना केली होती, तें पांपीशहर व दुसरीं दोन शहरें पुरलीं गेलीं. सांप्रत हें पांपी शहर खणून काढीत आहेत, व त्यावर तीन थर आहेत. पहिला थर काळ्या राखेचा, दुसरा दगडाचा व तिसरा पुनः राखेचा असे हे थर होत.

तीन दिवसपर्यंत सारखे आगीचे लोट निघत होते. व काळे धुळीचे कण इकडे तिकडे फिरत होते. बाहेर पडण्याची सोय नसल्यामुळें लोक आपल्या तळघरांत जाऊन लपले व त्याच स्थितींत त्यांचा शेवट झाला.

अशा प्रकारची ही पांपीची दुःखकारक कहाणी आहे.

दुःखाचें हरण सर्वसामर्थ्यवान् काळ करीत असतो. वर्षांमागून वर्षें लोटलीं. मातीचे थर त्या शहरावर येऊन बसले. शहराचा मागमूसहि दिसेना. पांपीवर गवत उगवूं लागलें. इटलींत राजांमागून राजे आले. युद्धामागून शांतता व शांततेमागून युद्ध असा काळ जाऊं लागला. तथापि पांपीची आठवण कोणालाच झाली नाहीं. असें एक शहर आहे, एवढीच दंतकथा लोकांना ठाऊक होती.

त्यानंतर बरींच वर्षें पांपी शहर पूर्ण अज्ञानांत राहिलें. सुमारें १७० वर्षांपूर्वी कांहीं मजूर द्राक्षांचे वेल उकरीत असतां त्यांच्यापैकीं एकाला एक भिंत लागली. त्यानीं अधिक खोल खणलें व त्याला राख दिसली. त्यांनीं आपलें काम तसेंच चालू ठेवलें व अखेरीस हेंच पांपी शहर होय, असा चहूंकडे पुकारा झाला.

त्या वेळेपासून खणण्याचें काम चालूच आहे. अद्याप हें काम संपलें नाहीं. गेल्या १०।१२ वर्षांत मात्र या कामाकडे जास्त लक्ष लागलें असून इटलीनें हें काम प्रो. स्पिनॉनझोला यांजकडे सोंपविलें आहे. प्रोफेसर साहेब आपलें काम अत्यंत काळजीपूर्वक करीत असून त्यांनीं आतांपर्यंत मूळच्या स्वरूपांत व मूळच्या सामानसुमानांनीं दहा इमारती बांधल्या आहेत. त्यामुळें २००० वर्षांपूर्वींच्या इमारती, दुकानें आपल्याला अगदीं मूळच्या स्वरूपांत पाहावयास मिळतात.

पांपी शहरांतील तांब्याचे व संगमरवरी दगडाचे पुतळे तसेंच घरांना लावलेले उत्कृष्ट रंग आपणास या संशोधनामुळें पाहावयास सांपडतात. श्रीकृष्णाच्या मुरलीनीं स्तंभित होऊन जशा गोप-गोपी आहेत तशाच उभ्या रहात; तसेंच पांपीचें झालें. शहर एकदम पुरलें गेल्यामुळें कोणी स्वयंपाक करतांना, कोणी पाणी आणतांना, कोणी कांहीं करतांना असें पुरले गेले आहेत.

आज जशा वस्तू आहेत तशाच २००० वर्षांपूर्वी होत्या. त्यांचीं भांडीकुंडीं, आंघोळीचे बंब, इतर सामानसुमान अगदीं आजच्या सारखें होतें. त्या काळचे रंग इतके उत्तम होते कीं, अजूनहि त्यांच्यातील झांक गेलेली दिसत नाहीं. या पांपी शहरांतून हिंडलें म्हणजे आपल्याला त्या काळची स्मृती होते व तेव्हांचें वैभव लक्षांत येतें.

---


१४ वैद्यक पुस्तकांचा लाट.

# आर्य--वैद्यकलानिधी.

संशोधनकर्ते — वैद्यपंचानन **कृष्णशास्त्री कवडे**, बी. ए. व वैद्यपंचानन **गंगाधरशास्त्री गुणे.**


हा सर्वांगपूर्ण वैद्यकग्रंथ वरील विद्वान वैद्यांचे साहाय्यानें तपासून व शुद्ध करून छापला आहे. पूर्वी तीन वेळां हा ग्रंथ आम्ही छापला होता. पण त्या सर्व प्रती संपल्यामुळें ही नवी आवृत्ति छापली आहे. ग्रंथ फारच उपयुक्त आहे. पृष्ठें ६६० किं. ६ रु. ( २ ) **सुबोध वैद्यक भाग १ ला** ८ ( ३ ) **सुबोध वैद्यक भाग २ रा** १ रु. ( ४ ) **स्त्रीरोग-चिकित्सासार** १ रु. ( ५ ) **बालरोगचिकित्सा** ॥२. ( ६ ) **औषधी कोश** १॥८ ( ७ ) **अंजननिदान** ॥८. ( ८ ) **रसवैद्य** ॥२. ( ९ ) **गर्भारपण—बाळंतपण** १ रु. ( १० ) **औषधी क्रिया** ॥८. ( ११ ) **वैद्यजीवन** ॥८. ( १२ ) **मंत्रतंत्रवैद्यक** ॥४. ( १३ ) **प्राणिज औषधी** ॥२. ( १४ ) **गोवैद्यक** ॥२.

हा **वैद्यकलानिधीसह** १४ पुस्तकांचा लाट सर्वांस घेतां यावा म्हणून तूर्त **५ रु.** ला देणार आहोंत ट. ख. १॥३ निराळा पडेल.


पत्ता—**यज्ञेश्वर गोपाळ दीक्षित, बुकसेलर, बुधवार चौक, पुणें सिटी.**

# अस्वलाची खोड मोडली.

एकदां एक अस्वल जंगलांतून चाललें होतें. इतक्यांत तें एका फुलाच्या झाडींत आलें. तेथें एक मध-




माशी मध गोळा करीत होती. ती त्याला डसली. अस्वलबुवांचा राग वाढला. तें तसेंच मधमाशीच्या



पोळ्याकडे गेलें. त्यानें त्या पोळयावर आपला पंजा मारला. त्याक्षणीं आंतून हजारों मधमाशा बाहेर आल्या आणि मग काय विचारतां, त्यांची चांगलीच खोड मोडली तें मग एका तळयांत जाऊन बसलें आणि



म्हणालें " नाहीं रे बाबा, एखाद्यानें आपला लहान



अपराध केला तर तो विसरावा; पण त्याकरितां असा प्रसंग आणवूं नये."

---

## विविध माहिती.

—कावळे व घारी ६००० फूटांपर्यंत उडूं शकतात.

—व्हेनेझुएलामध्यें एका रानटी वनस्पतीचा शोध लागला असून तिचा उपयोग कॉफीचे ऐवजीं होतो. आणि कॉफींतील विषारी द्रव्य त्यांत नसल्यामुळें ती वनस्पती फारच उपयुक्त आहे.

—न्यूयॉर्कमध्यें २१००० माणसें टेलीफोनवर काम करीत आहेत, व त्यांतील बहुतेक स्त्रीया आहेत.

—लंडन शहराचें शत्रूपासून संरक्षण व्हावें म्हणून ३०००० फुटांचा टापू त्याकरितां व्यापण्यांत आला आहे. या टापूंत जाळीं पसरलीं जातील, व दुसऱ्या अनेक संरक्षक गोष्टी केल्या जातील.

—जगामध्यें ७५०००० मैलांचे रेल्वे रस्ते आहेत; परंतु हे जर सर्व एका रेषेंत ठेवले तर ते चंद्राकडे जाऊन येतील व पृथ्वीभोंवतीं ११ वेळ प्रदक्षिणा घालतील. यांपैकीं १/३ रस्ते गेल्या २५ वर्षांत बांधण्यांत आले.

# शिट्यावाले कबूतर.

चिनी लोकांना कबूतरें पाळण्याचा मोठा शोक असतो. कबूतराला एका बांबूच्या काठीवर बसविलेलें असून, त्याचा एक पाय त्यानें उडून जाऊं नये म्हणून लांब दोरीनें बांधलेला असतो. अशी काठी हातांत धरून चिनी-कबूतरबाज मोठ्या हौसेनें हिंडत असतो. बिचाऱ्या कबूतराला नेहमींच पिंजऱ्यांत कोंडून बसावें लागत नाहीं. ही दोरी इतकी लांब असते कीं, त्या पक्ष्याला बरेंच इकडे तिकडे उडतां यावें.



चिनी लोकांच्या भावनाप्रधान कालक्रमणेंत अनेक गमती आहेत. त्यापैकींच या कबूतरांच्या शेपटीला शिट्या बांधणें ही एक होय. या शिट्या फार हलक्या असून तांब्याच्या बारीक तारेनें कबूतराच्या शेपटीस बांधलेल्या असतात. कबूतर इकडे तिकडे उडूं लागलें म्हणजे या शिट्यांतून वायुलहरींमुळें फार मधुर असे स्वर निघून ते कानाला गोड लागतात. बिन गडबडीच्या शांत दिवाणखान्यांतून हें वायुगान चांगली करमणूक करतें. असे निरनिराळ्या प्रकारच्या शिट्या बांधलेले दहापांच पक्षी उडूं लागले म्हणजे तर अनेक सुमधुर सुरांचा मिलाफ होऊन मोठी गंमत वाटते.

या शिट्या फार कारागीरीनें तयार करतात. या दोन प्रकारच्या असतात. बांबूच्या नळ्या एकत्र जोडून किंवा पोकळ लांकडी गोळ्यांच्या अशा दोन प्रकारच्या त्या असतात. हवापाण्यानें त्या खराब होऊं नयेत म्हणून त्यांना निरनिराळे रंग दिलेले असतात. नळीदार शिटींत चार पांच नळ्या जोडलेल्या असतात. लांकडी गोळ्यांच्या शिट्यांना एक तोंडांत धरण्याची नळी असून तींत आठ दहा भोंकें केलेलीं असतात. या भोंकांमुळें या शिट्यांचीं नांवें ‘ दशनेत्री ’ ‘ अष्टनेत्री ’ अशीं पडलेलीं आहेत. शिटी जितकी लहान तितकी ती करण्यास कठिण, कारण काम तितकेंच बारीक आणि संभाळून करावें लागतें.

---


# फळा.

शाळेंतील फळ्याचे ऐवजीं कापड, रुंदी ३० इंच दर वारास १ रु. हें कापड खरखरीत असून त्याजवर खडूनें उत्तम प्रकारें लिहितां येतें, पाण्यानें पुसलें असतां कापड ओलें होत नाहीं.

म्यानेजर—चित्रशाळा प्रेस, पुणें.

# शालापत्रकाची चढाओढ

ऑगस्ट महिन्यांतील कोड्याचें उत्तर.

**सर्वांकरितां.**

या कोड्याच्या पुष्कळांनीं पुष्कळ आकृत्या काढून उत्तरें पाठविलीं आहेत. परंतु त्यांतील बहुतेक चूक आहेत. मा सात ओळी जर हात न सोडतां काढल्या म्हणजे १४ मुलें बसवितां येतात. बाकीच्या उत्तरांत निरनिराळे दोष आहेत.

**उत्तरें बरोबर पाठविणारांचीं नांवें.**

१ **वि. गं. चंद्रात्रे.**
२ लक्ष्मण यशवंत पागनीस.
३ **विष्णु गणेश कामत.**
४ त्र्यंबक शिवराम देशपांडे.
५ **दत्तात्रय रामकृष्ण मेंगळे.**
६ य. वि. देशपांडे.
७ राजाराम बाबाजी पोतदार.
८ **सेक्रेटरी बालमित्रसमाज.**
९ वामन गणेश आठवले.
१० द. गो. थोरात.

**मुलांकरितां**

**उत्तर.**

रामभाऊंचा आचारी अंबाडीची अंबूस भाजी उत्तम तयार करतो.

**बरोबर उत्तर पाठविणारांचीं नांवें.**

१ भगवंत दत्तात्रय गरवारे.
२ सेक्रेटरी बालमित्र समाज.
३ मोडक डी. एन्.
४ **धोंडीराम मारुती पोफळे.**
५ नारायणदास देवराव देशपांडे.
६ **य. वि. देशपांडे.**
७. बाळासाहेब यशवंतराव फडतरे.
८ सीताराम विष्णू कुरणे.
९ वसंत वासुदेव वाचासुंदर.
१० पांडुरंग यशवंत पागनीस.
११ शंकर दत्तात्रय कालेलकर.
१२ **नारायण दामोदर पालकर.**
१३ ज. पु. गुळगुळे.
१४ **चंपूताई देशपांडे**
१५ **डी. एन. मोडक**
१६ नारायण यशवंत खांबेकर.
१७ कौतुक भिवसन पाटील.
१८ नारायण रंगनाथ कुळकर्णी.

जाड टायपांत नांवें असलेल्यांना बक्षीसें मिळालीं आहेत.

**बक्षीसें**

१ सुभाषित
२माझा आफ्रिकेचा प्रवास.
३ करमणूक.
४ अर्वाचीन महाराष्ट्र.
५ विद्वत्त्व कवित्व व वक्तृत्व.
६ साक्रेटीस.
७ रुमेला जुमेला.
८ चिमुकलें रामायण.
९ झोंपाळ्यावरील गीता.
१० भाऊबीजेची ओंवाळणी.

**नवीं कोडीं**

**सर्वांकरितां**

( पाठविणार—धुंडिराज नारायण हळबे वांई )

असा एक चौरस मांडा कीं, त्याच्या उभ्या, आडव्या व तिरक्या ओळींची बेरीज केली असतां ती ६५ येईल.

**मुलांकरितां**

( पाठविणार—शंकर दत्तात्रय कालेलकर )

असा कोणता प्राणी आहे कीं, जो आधीं ४ पायानें मग २ पायानें व शेवटीं ३ पायानें चालतो !

---

कूपन
**सर्वांकरितां**
**सप्टेंबर १९२४**

कूपन
**मुलांकरितां**
**सप्टेंबर १९२४**

# " अचानक लागलेला शोध "

लेखक—रामचंद्र विठ्ठलराव वडपल्लीकर.

एके दिवशीं, ऐन बारा वाजण्याचे सुमारास, ३०।३५ खंड्या सरकी ठेविलेल्या एका कोठारास आग लागून त्याचा धुवा उडाला. पण कांहीं वेळांनीं पाण्याचा भयंकर आघात पडून बराच अर्धवट जळलेला माल कायम राहिला. तेव्हां हंगामाच्या वेळीं मुद्दाम होऊन जी अर्धवट जळलेली व वाफारलेली सरकी ती पेरली असतां, झाडें होतात किंवा नाहीं, या उद्देशांनीं फारच थोड्या प्रमाणांत पेरण्यांत आली. पुढें त्यापासून मोठ मोठीं झाडें होऊन त्याला बोंडेंहि अतिशय आलीं. आणि त्यापासून जो कापूस फुटला, त्याचा रंग मोत्याप्रमाणें फारच मजेदार होता. कापूस थोडा असल्या कारणांनीं घरींच रहाटांवर सूत काढण्यांत आलें. आणि लगेच हात हातमागावर कापड विणून तयार करण्यांत आलें. त्याचा रंग मोहक असल्यामुळें, त्या कापडाचें कोट, शर्टस् शिंप्याजवळून तयार करून अंगांत घालावें, ही कल्पना साहजिक मनांत येऊन, त्याप्रमाणें त्याचा उपयोगहि करण्यांत आला. जेव्हां त्याला धुण्याचा प्रसंग येई ! ! तेव्हां तो अधिकाधिक आपल्या रंगाचा प्रभाव आम्हास दाखवी !! त्यामुळें तो बऱ्याच लोकांत लोकमान्य होऊन, त्याच्या रंगाला " मोत्याचा रंग " हें नांव दिलें. या मोत्यांच्या रंगाच्या कापसाचा अनुभव, माझे शेतकरी बांधव घेऊन त्याचा आपल्या देशांत फैलाव करितील, अशी मी त्यांना विनंती करितों.

## चुटके

एकजण—कायरे हा इतका उंच मनोरा कसा बांधला असेल ? मला वाटतें कीं, हा प्रथम थोडा थोडा बांधून ते तुकडे एकावर एक ठेविले असतील.

दुसरा—छे छे तसें नव्हे, तो प्रथम आडवा बांधला व नंतर सगळ्यांनीं मिळून उभा केला असें असेल.

तिसरा—तुम्ही दोघेही खुळे आहांत ही आधीं एखादी विहीर असेल, ती उलटी करून ठेवली आहे झालें.

× × ×

( पक्ष्यांची माहिती देऊन झाल्यानंतर मनुष्याला उडतां येत नाहीं हें सिद्ध करण्याकरितां ) मास्तर म्हणाले—तुम्हाला मी एक अगदीं सोपा प्रश्न विचारतों चिमणी करूं शकते व मी करूं शकत नाहीं अशी कोणती गोष्ट आहे ?

चाणाक्ष मुलगा:-सर! तुम्ही अंडीं घालू शकत नाहीं.

( ह्या उत्तराबद्दल त्या मुलाला चांगलेंच बक्षीस मिळालें )

× × ×

# जोडाक्षर-विरहित वाचनपाठ.

हें पुस्तक नुकत्याच अक्षर ओळख झालेल्या मुलांमुलींकरितांच लिहिलेलें आहे. पुस्तकांत एकंदर १७ गोष्टी अगदीं सोप्या भाषेंत, व एकहि जोडाक्षर न येऊं देतां लिहिल्या आहेत. प्रत्येक गोष्टीचे आरंभीं कथानकाचें मूर्तिमंत चित्र दिलें असल्यामुळें गोष्ट वाचण्याचे अगोदरच त्यांतील सारांश मुलांचे सहज लक्षांत येतो. किं. अवघी चार आणे

# उजळणीचें पुस्तक.

यांत सर्व मुळाक्षरें चित्रयुक्त दिलीं असून मोडी व बाळबोध बाराखड्या तयार करण्याची समजूत थोडक्यांत करून दिली आहे. नंतर मोडी व बाळबोध सोपे शब्द मुलांना सहज ओळखण्यासारखे दिले आहेत. पुढें १० अंक सचित्र दिले असून त्याबरोबर मुलांस बेरीज व वजाबाकीची समजूत टिंबांच्या आकृतींनी व गोट्यांच्या चौकटीच्या साहाय्यानें करून दिली आहे. नंतर पाढ्यांची समजूत दिली असून शेवटीं उजळणी दिली आहे. एकंदरीत हें पुस्तक नवीन तऱ्हेनें मुलांना शिकविण्यास फार उपयुक्त असें झालें आहे. कागद ग्लेज किं. ०।१०॥.

## ल्हान मुलांकरितां उपयुक्त अशीं पुस्तकें.

# नवी आवृत्ति ] सचित्र अक्षरबोध. [ नवी आवृत्ति

या पुस्तकांत 'अ' पासून 'ज्ञ' पर्यंत स्वर आणि व्यंजनें हीं सर्व निरनिराळ्या भपकेदार रंगांत व तें अक्षर नांवाच्या प्रथम अक्षरानें दर्शविणाऱ्या चित्रांसह दाखविलेलीं असून १ पासून १० पर्यंत आंकडे वरील पद्धतीनें दाखविलेले आहेत. पुस्तकाचा साईज क्राऊन चतुर्थांशाइतका मोठा ७×९ इंच ठेवला असल्यामुळें अक्षरें व चित्रें फारच सुबक व मोठीं अशीं झालीं आहेत. एकंदर पुस्तक इंग्रजींतील सचित्र रीतीनें ए बी सी डी शिकण्यास उपयोगी अशा पुस्तकाच्या धर्तीवर तयार केलें असल्यामुळें हें पुस्तक लहान मुलांस फारच आवडून त्यापासून तीं आपली धडा सहज शिकतात. किं. ०।८.

# भाग १ ते ६ ] चिमुकल्या गोष्टी. [ भाग १ ते ६

या गोष्टींत रोज व्यवहारांत घडणाऱ्या गोष्टी दिलेल्या आहेत, पण त्या इतक्या मोहक, मनोरंजक व मार्मिक लिहिल्या आहेत कीं, त्या गोष्टींतील तत्त्वबोध गोष्टी वाचतां वाचतांच मुलांच्या मनावर सहज ठसून जातो. पुस्तक नवीन टाइपांत सुंदर छापलें व ग्लेज कागदावर छापिलेलें असून प्रत्येक गोष्टीचे प्रारंभीं कथानकाचें सुंदर चित्र दिलेलें आहे. एकंदर या गोष्टीचे सहा भाग आहेत. प्रत्येक भागांत दहा गोष्टी सचित्र आहेत, प्रत्येक भागास किं. ०।४.

मिळण्याचें ठिकाण—म्यानेजर–चित्रशाळा प्रेस, पुणें.

॥ ॐ नमः श्रीधन्वंतराय ॥

# आर्यमहौषधालय मु० पो० आंजर्ले.

**कोंकणप्रांतांतील अगदीं ताज्या व शुद्ध वनस्पतींचीं जगत्प्रसिद्ध निर्दोष व रामबाण औषधें.**

**कंदर्पमंजरी पाक**—हा अपूर्व पाक गरिबांपासून तों अमीरउमरावांपर्यंत सर्वांसही अत्यंत उपयोगी असून किंमत माफक ठेविली आहे. यांत मौक्तिक, प्रवाळ, लोह, माक्षिक, कस्तूरी, अंबर इ० अत्युच्च गुणकारक पदार्थ असून शिवाय बदाम, पिस्ते, अक्रोड चारोळी, केशर, वेलची, पंजाबी सालममिश्री, सफेतमुसळी, पत्री, गोक्षुर, शतावरी, आस्कंद, वंशलोचन वगैरे (८०) उपयुक्त वनस्पति घातल्या आहेत. यानें पथ्यावांचून गुण येतो. यापासून कोणत्याही कारणांनीं होणारा व कशाही प्रकारचा शुक्रस्राव, नपुंसकत्व, मूळव्याधि, रक्तदूषणामुळें त्वग्रोग, स्त्रियांची धुपणी व गर्भाशयस्थ दोष या भावना त्यांच्या एकंदर उपविकारांसह तत्काल बंद्या होऊन धातुवृद्धि होते, व शरीर कणखर आणि तेजस्वी बनतें. २० तो० ड० २ रुपये. एकदम ३ डबे घेणारास ५ रुपये.

**स्वर्णधात्री तेल**—हें चारोळी, बदाम, कंकोळ, एला, बहुविध वनस्पतींचीं सत्त्वें व उपयुक्त तेलें अशा अनेक पदार्थांनीं बनविलें असल्यानें याच्या मर्दनापासून अपस्मार, उन्माद, वेड, चक्कर इ० रोगांस जलद आराम पडतो. केंसांस चोळल्यानें केंस काळे कुळकुळीत, तजेलदार, सडक लांब व मृदु होऊन मेंदु शांत आणि रोगरहित बनतो. यानें मस्तकाचें ठक्कल जातें. हें अंगास चोळून स्नान करीत गेल्यानें शरीराचा दुर्गंध जातो. खरूज, गजकर्ण, शिबें, तसेंच तळपाय, तळहात, डोळे व मस्तक यांचा दाह हे विकार खास बरे होऊन निद्रा चांगली येते, आणि नेत्ररोग दुरुस्त होतात. बा० किं० १। रु०

**दंतरक्षक पूड**—ही दांत व हिरड्या यांचे सर्व विकार तत्काल दुरुस्त करून दांत स्वच्छ व मजबूत करण्यांत प्रतिष्ठेची आहे. ड. ६ आणे.

**सुरंगी, मालती, कल्हार, गुलबहार, दणाणा, लक्ष्मीविलास** इ० बादशाही अति उंची अत्तरें व त्याचप्रमाणें गुलाब, हिना, केवडा, चमेली, जाई वगैरे सुगंधी अत्तरें आणि केंसांस लावण्याचीं हरएक प्रकारचीं सुवासिक तेलें माफक दरानें पूर्ण खात्रीचीं मिळतील.

**सूचना:**—वरील औषधें व अत्तरें वगैरे पूर्ण खात्रीचीं असल्यामुळे आज पंचवीस वर्षांत त्यांचा लक्षावधि लोकांस अप्रतिम उपयोग झाला म्हणून त्यांचा नेहमीं फारच खप होत आहे. अनुभवानंतर पूर्ण खात्री पटेलच. औषधें माहितीचे खर्च्यासह रोखीनें अगर व्ही पी. नें पाठवूं. प्याकिंग व टपाल खर्च वेगळा. घाऊक घेणारास कमिशन भरपूर. सर्व औषधांच्या आणि आरोग्यरक्षणाच्या माहितीचें सचित्र मोठें पुस्तक देऊं. आमचीं औषधें वगैरे मागविणें तीं खालील बिनचूक पत्त्यावर मागवावीं.

**कृष्णशास्त्री बिवलकर, वैद्य.**

REGISTERED. B. NO. 179




## अनुक्रमणिका.


| विषय. | पृष्ठ. |
|---|---|
| जपान व शिक्षण .... .... .... .... .... .... | १८१ |
| प्रतापी प्रतापसिंह .... .... .... .... .... .... | १८४ |
| वाघ .... .... .... .... .... .... | १८८ |
| करकोच्यांनीं वांचविलें ( चित्रें ) .... .... .... ... | १९० |
| पारव्याचें कृत्य .... ... .... .... .... | १९१ |
| निरनिराळ्या देशांतील घोड्यांचे उपयोग .... .... .... .... | १९३ |
| कोजागिरी अथवा को जाग्रती ? .... .... .... .... .... | १८४ |
| हरिणी—अन्योक्ति ( कविता ) .... .... .... .... .... | १९६ |
| मूर्ख बेटे ( चित्रें ) .... .... .... .... .... .... | १९७ |
| अचानक पकडलें .... .... .... .... .... .... | १९८ |
| कोड्यांचीं उत्तरें .... .... .... .... .... .... | १९९ |
| चुटके .... .... .... .... .... .... | २०० |


मुद्रक व प्रकाशक—रा. रा. शंकर नरहर जोशी, चित्रशाळा प्रेस, १०२६ सदाशिव पेठ, पुणें सिटी.

# रंगीत इसाप-नीति.

ह्यांत एकंदर इसापनीतींतील आठ अगदीं सोप्या गोष्टी मोठ्या व जाड टाइपांत दिलेल्या असून प्रत्येक गोष्टीसमोर त्यांतील रहस्य दाखविणारें रंगीत सुंदर चित्र दिलेलें आहे. चित्रें पाहूनच मुलांना गोष्टींतील तात्पर्य कळतें. किं० ८६ ट. ह. ८८६.

# सचित्र इसाप-नीति.

[ उत्तरार्ध. ]

[ नवीन भाषांतर भाग २ रा. ]

वरीलप्रमाणेंच हा दुसरा भाग विक्रीस तयार आहे. ह्याची सुमारें २०० पानें झालीं असून ह्यांत ३५० गोष्टी आहेत चित्रांची संख्या १५० पर्यंत आहे. किं० ८४.

दोन्ही भाग एके ठिकाणीं बांधलेलें सुंदर पुस्तक किं० रु० २

# विद्यार्थ्यांकरितां नाटिका.

शीलं परं भूषणम्.

ही नाटिका प्रसिद्ध कवि-शिरोमणि नारायण वामन टिळक यांनीं केवळ लहान मुलांकरतांच लिहिलेली आहे यांत शृंगाररस मुळींच नाहीं. एवढेंच नव्हे, तर स्त्रीची भूमिका या नाटकांत आणलेलीच नाहीं शिवाय नाटकाचा विषय नैतिक विचारानें पूर्ण भरलेला असल्यामुळें शाळांतून वार्षिक संमेलनाचे वेळीं मुलांकडून ह्या नाटकाचा प्रयोग करविण्यास तें योग्य आहे. नाटकाचा विषय धनाची योग्यता जास्त किंवा ज्ञानाची योग्यता जास्त हा आहे पुस्तकांत चार सुंदर चित्रें कथानकास अनुसरून दिलेलीं आहे. किं० ८४.

म्यानेजर--चित्रशाळा प्रेस, पुणें.

# चिमुकलें भारत व रामायण.

महाभारत व रामायण हे आपले राष्ट्रीय ग्रंथ आहेत. यांत आपला प्राचीन इतिहास असून प्रपंच साधून परमार्थ कसा जोडावा हें उत्तम दाखविलें आहे. व्यावहारिक बोधाचा ह्या केवळ खाणी आहेत, आबालवृद्ध स्त्री-पुरुषांना या ग्रंथांचें ज्ञान होणें अगत्याचें आहे, प्रौढांकरितां आमचीं लोकप्रिय ' भारती युद्ध ' व ' रामचरित्र ' हीं पुस्तकें आहेत. आतां बारातेरा वर्षांच्या मुलांमुलींकरितां चिमुकलें भारत व चिमुकलें रामायण ' हीं दोन पुस्तकें अनुक्रमें आम्हीं रामकृष्णवाक्सुधेचे प्रसिद्ध लेखक रा. कृष्णाजी गोविंद किनरे व रा. विद्याधर वामन भिडे बी. ए. यांजकडून मुद्दाम लिहविलीं आहेत. पुस्तकाची भाषा फारच माहक व सोपी आहे. वाचतां वाचतांच मुलांच्या मनावर त्यांतील रहस्य ठसावें म्हणून उपदेशपर वाक्यें जाड टाइपांत घातलीं आहेत, आणि कथानकांच्या अनुरोधानें हाफटोन प्रोसेसनें तयार केलेलीं भारतांत आठ व रामायणांत सात अशीं सुंदर चित्रें घातलीं आहेत. भारताचीं पृष्ठें १७२ व रामायणाचीं पृष्ठें ८२. छपाई बांधणी सुबक. किं० ८६, व रामायण किं० ८५.

म्यानेजर—चित्रशाळा प्रेस, पुणें शहर.

मराठी

# शालापत्रक

येथें शब्द नाहीं शिष्यासीं । हें अवघें सद्गुरूपाशीं ।
सद्गुरु पालटा अवगुणांसी । नाना यत्नें करोनी ॥
जें कांहीं आपणास ठावें । तें हळु हळु शिकवावें ।
शहाणें करून सोडावें । सकळा जनां ॥ १ ॥

—रामदास.

पुस्तक ३५ आक्टोबर सन १९२४ अंक १०

## जपान व शिक्षण.

लेखांक ३ रा.

या लेखांत जपानमध्यें शिक्षण खातीं किती आहेत व त्यांच्या कक्षेंत शिक्षणाच्या कोण कोणत्या शाखा येतात, याचा विचार करूं.

जपानांत शिक्षण खात्याचा एक प्रधान असतो, या प्रधानाच्या ताब्यांत सारीं शिक्षण खातीं असतात. हीं शिक्षण खातीं ६ आहेत.

१ खातें उच्चशिक्षणाचें.
२ खातें सामान्य शिक्षणाचें.
३ खातें औद्योगिक शिक्षणाचें.
४ खातें क्रमिक पुस्तकांचें.
५ खातें धार्मिक शिक्षणाचें.
६ खातें व्यवस्था करण्याचें.

यांपैकीं एकेक खातें काय काय करतें याचा आपण विचार करूं.

पहिल्या खात्याचे तीन विभाग आहेत.

पहिला विभाग, राजकीय विश्वविद्यालयांचा विचार करतो; पदव्या देतो; हायस्कूलसवर व शिक्षकांवर ताबा ठेवतो; बाहेरच्या प्रांतीं प्रोफेसर्स पाठवितो; व वेधगृहावर देखरेख ठेवतो.

दुसरा विभाग, खासगी विश्वविद्यालयांची देखरेख ठेवतो, कॉलेजें पहातो व प्रदर्शनें भरवितो.

तिसरा विभाग, डॉक्टर्स, दंतवैद्य वगैरेंची नोंद करतो; शास्त्रीय शिक्षणाला उत्तेजन देतो; जमिनीची पहाणी करतो.

**दुसरें खातें**–सामान्य शिक्षणाचें असतें. यांत चार विभाग असतात. पहिला विभाग किंडरगार्टन, प्राथमिक शाळा, नॉर्मल स्कूल्स वगैरेंचा असतो. दुसरा विभाग मध्यम शाळा व शिक्षकांचा असतो.

तिसरा विभाग, इतर कोणत्याहि भागांत न येणाऱ्या अशा किरकोळ गोष्टी करतो.

चवथा विभाग सामाजिक शिक्षण, सार्वजनिक व्याख्यानें; वाचनालयें; मुक्या-बहिऱ्या आंधळ्यांकरितां असलेल्या शिक्षणाचा असतो.

**औद्योगिक खातें**–याचेहि चार विभाग असतात. पहिला विभाग धंदे-शिक्षणाच्या शाळा व कॉलेजाबद्दल असतो.

दुसरा, शेतकी शाळा, कॉलेजें याचा असतो.

तिसरा व्यापारी शाळा, व्यापारी कॉलेजें, आरमारी शाळा कॉलेजें यांचा असतो.

चवथा विभाग विश्वविद्यालयांतील शिक्षणानंतरच्या शिक्षणाचा असतो.

**क्रमिक पुस्तकांचें खातें**:—यांत दोन विभाग असतात. पहिला विभाग क्रमिक पुस्तकें तयार करतो व जपानी भाषेच्या फैलावाचा विचार करतो.

दुसरा विभाग हीं क्रमिक पुस्तकें छापतो, व त्यांची तपासणी करितो.

**धार्मिक खातें**:—याचा पहिला विभाग देवळें, चर्चेस वगैरेंची व्यवस्था करतो व धर्मोपदेशकांना मार्ग दाखवितो.

दुसरा विभाग जुनीं देवळें कायम ठेवण्याकरितां झटतो.

**व्यवस्था खातें**:—हें खातें सर्वांत मोठें आहे याचे पांच विभाग आहेत.

पहिला विभाग राजाचीं चित्रें सर्व शाळांत वाटतो; नोकऱ्यांवर ताबा ठेवतो; पगार पेन्शन वगैरे ठरवितो

दुसरा विभाग:—रिपोर्टस तयार करतो, व पत्रांचीं उत्तरें वगैरे पाठवितो.

तिसरा विभाग आर्थिक बाबींचा असतो. हा विभाग बजेट तयार करतो, पगार वाटतो, सर्व खात्यांची मालमत्ता सांभाळतो; व हिशेब ठेवतो.

चवथा विभाग सर्व दुरुस्तीचें काम करतो.

पांचवा विभाग:—शाळेच्या आरोग्याकडे पहातो; डॉक्टर्सची योजना करतो, व खेळाचे सामने करवितो.

अशा प्रकारची जपानमधील शिक्षणखात्याची रूपरेषा आहे. या शिवाय आपल्याकडे जसे इन्स्पेक्टर्स असतात तसे जपानमध्येंहि असतात. त्यांचें काम इकडील इन्स्पेक्टर्स सारखेंच असतें.

जपानमध्यें कायदे कौन्सिलें आहेत; परंतु या कायदेकौन्सिलांचा संबंध शाळाखात्याशीं येत नाहीं. शाळेंत दुरुस्ती करावयाची झाल्यास अथवा नवीन गोष्टींचा उपक्रम करावयाचा असल्यास त्यांची व्यवस्था राजाकडून होते. राजा आपल्या नांवानें सारे हुकूम सोडतो.

जपानमध्यें प्रत्येक शाळेवर एक अधिकारी असतो. त्याला डायरेक्टर म्हणतात. ह्या डायरेक्टरचा दर्जा आपले कडील हेडमास्तर सारखा असतो. परंतु जपान मधील हेडमास्तर शिकवण्याचें काम बिलकूल करीत नाहीं. तो निवळ देखरेख ठेवतो. त्यामुळें जपानांत शाळांची व्यवस्था फार चांगली असते. जपानमध्यें शाळा तपासणीसांची फार गर्दी असते. निरनिराळ्या संस्थांचे इन्स्पेक्टर्स असतात व ते नेहमीं शाळा हिंडतात. त्यांच्याकडे मुलांना शिक्षण कसें दिलें जातें याकडे इन्स्पेक्टर्स मुकाट्यानें पहात असतात. ते शिक्षकांच्या कामाकडे नजर देतात. या इन्स्पेक्टर्सचा पगार १५० पासून ५५० पर्यंत असतो. इतर इन्स्पेक्टर्सचा पगार याहिपेक्षां कमी असतो.

जपानमध्यें तीन प्रकारच्या शाळा असतात. सरकारी, सार्वजनिक व खाजगी. सरकारी शाळा, सरकारी खर्चानें चालतात. सार्वजनिक शाळा शहरें, गांवें, खेडीगावें वगैरेंकडून चालविल्या जातात. तेथें प्राथमिक शिक्षण व इंग्रजी तीन इयत्तांपर्यंत शिक्षण मिळतें. खाजगी शाळा खाजगी व्यक्तीकडून चालविल्या जातात.

जपानमध्यें शाळाकरितां इमारती भाड्यानें घेऊन

चालत नाहीं. त्या मालकीच्या लागतात. कांहीं शाळांतून मुलांकडून शेतकी करवितात व त्यांचें उत्पन्न शेतकी सुधारण्याकरितां खर्च करण्यास भाग पाडतात.

जपानमध्यें सार्वत्रिक शिक्षण आहे हें सांगावयास नकोच. लहान खेडेगांवांत ४०। ४२ लोकवस्तीच्या ठिकाणीं सुद्धां एक शाळा असते.

शहरें, गांवें किंवा खेडींगांवें यांच्या हद्दींत असणाऱ्या शाळांवर सरकारची प्रत्यक्ष देखरेख असते.

शिक्षणाच्या बाबतींत जपानमध्यें कोणत्याहि प्रकारची हयगय चालत नाहीं.

जपानमध्यें शिक्षण खात्यांतील अधिकाऱ्यांचे पगार आपल्या इकडील अधिकाऱ्यांच्या पगाराप्रमाणें उधळेपणाचे नसतात. तथापि ते पगार अपुरे असतात असेंहि नाहीं. ज्या शिक्षकाच्या हातीं भावी पिढी तयार करण्याची जबाबदारी असते, त्याला पोटाला पोटभर मिळू देणें हें सरकार आपलें मुख्य कर्तव्य समजतें. त्यामुळें जपानमध्यें शिक्षणाची सर्वांगिण प्रगती होत आहे. आपल्याकडे शिक्षणाचा कोंडमारा किती होतो, शिक्षकांना अपुऱ्या पगारामुळें किती हालअपेष्टा भोगाव्या लागतात वगैरेंची कल्पना सर्वांना आहेच. तेव्हां त्यासंबंधी जास्त लिहावयास नकोच. याखेरीज आपल्या देशांत शिक्षणाचें क्षेत्रहि फार अकुंचीत आहे आणि शिक्षण घेतल्यानंतर उपाशी मरण्याची स्थिति सर्वांच्या परीचयाची आहे. जपानदेश स्वतंत्र असल्यामुळें उद्योगधंद्याचे, दर्यावरील आरमाराचें, विमानांचें, लष्कराचें निरनिराळ्या कलाकौशल्याचें शिक्षण घेण्यास त्यांना पुरेशी वाव आहे. त्यामुळेंच जपाननें इतक्या थोडक्या अवकाशांत इतकी प्रगती केली आहे. परंतु आपल्यामागें पारतंत्र्य लागलें असल्यामुळें इकडील शिक्षण म्हणजे निवळ पुस्तकी शिक्षणच होय.


१४ वैद्यक पुस्तकांचा लाट.

# आर्य-वैद्यकलानिधी.

संशोधनकर्ते—वैद्यपंचानन **कृष्णशास्त्री कवडे**, बी. ए. व वैद्यपंचानन **गंगाधरशास्त्री गुणे.**

हा सर्वांगपूर्ण वैद्यकग्रंथ वरील विद्वान वैद्यांचे साहाय्यानें तपासून व शुद्ध करून छापला आहे. पूर्वीं तीन वेळां हा ग्रंथ आम्ही छापला होता. पण त्या सर्व प्रती संपल्यामुळें ही नवी आवृत्ति छापली आहे. ग्रंथ फारच उपयुक्त आहे. पृष्ठें ६६० किं. ६ रु. ( २ ) **सुबोध वैद्यक भाग १ ला** ॳ८ ( ३ ) **सुबोध वैद्यक भाग २ रा** १ रु. ( ४ ) **स्त्रीरोग चिकित्सासार** १ रु. ( ५ ) **बालरोगचिकित्सा** ॳ१२. ( ६ ) **औषधी कोश** १ॳ८ ( ७ ) **अंजननिदान** ॳ८. ( ८ ) **रसवैद्य** ॳ१२. ( ९ ) **गर्भारपण—बाळंतपण** १ रु. ( १० ) **औषधी क्रिया** ॳ८. ( ११ ) **वैद्यजीवन** ॳ८. ( १२ ) **मंत्रतंत्रवैद्यक** ॳ४. ( १३ ) **प्राणिज औषधी** ॳ२. ( १४ ) **गोवैद्यक** ॳ२.

हा **वैद्यकलानिधीसह** १४ पुस्तकांचा लाट सर्वांस घेतां यावा म्हणून तूर्त ५ रु. ला देणार आहोंत ट. ख. १ॳ३ निराळा पडेल.

पत्ता—**यज्ञेश्वर गोपाळ दीक्षित, बुकसेलर, बुधवार चौक, पुणें सिटी.**

# प्रतापी प्रतापसिंह.

( लेखकः—हणमंत कृष्ण कुलकर्णी. )

प्रवेशः—४ था.

[ स्थळः—राणाजींचा खास दिवाणखाना. प्रतापसिंह व भामशा बसले आहेत. ]

**भामशा०**—महाराजांनीं पुनः अकबराबरोबर लढाई करावयाचें जाहीर केलेलें ऐकून मला फार आनंद झाला. मधली ही तहाची बातमी ऐकून मला तरी फार आश्चर्य वाटलं !! कारण महाराजांनीं यवनांशीं तह करणें अगदींच अशक्य ! !

**प्रता०**—तुम्ही ऐकलेली बातमी कांहीं खोटी नव्हे. माझें मन दारिद्र्यामुळें फारच त्रासले गेलें तेव्हां मी अकबराकडे तसा खलिता पाठविला होता. पण बिकानीरचे ठाकूर पृथ्वीराज यांनीं 'तो खलिता खोटा असावा. कारण राणाजींनीं तह करणें शक्य नाहीं;' असें बादशहास सांगितलें, आणि इकडे मला तह न करणेंबद्दल पत्र लिहिलें. माझ्या मनांतूनही खरोखरी तह करावयाचा नव्हताच. यामुळें पृथ्वीराजाचें करणें एकाप्रकारें माझ्या पथ्यावरच पडलें. तेव्हां पुन्हां एकवार युद्ध करण्याचें आम्ही ठरविलें आणि तशी तयारीही केली.

**भा०**—ठीक झालें. महाराजांना द्रव्याची अडचण असलेली वार्ता मी ऐकली. आणि माझ्याजवळ जें थोडेसें द्रव्य होतें त्याचा उपयोग इकडे करावा असें माझ्या मनांत आलें. म्हणून मी तें द्रव्य घेऊन इकडे आलों. तें महाराजांच्या चरणीं सादर करीत आहें. त्याचा उपयोग महाराजांनीं या देशकार्यीं करावा अशी माझी नम्र विनंती आहे.

**प्रता०**—यावेळीं मी द्रव्याच्या अडचणींत आहे हें उघडच आहे. अशा वेळीं तुम्ही द्रव्य देण्यास तयार झाला हें पाहून मला फारच आनंद वाटतो. आणि आपल्यासारखे राष्ट्रभक्त माझ्या राज्यांत आहेत याबद्दल मला फार फार अभिमान वाटतो.

**भाम०**—महाराज, मी ज्या देशांत राहतों तो देश संकटांत असतांना त्याला मुक्त करण्याकरितां कोणत्या ना कोणत्या तरी रीतीनें प्रयत्न करणें अगदीं जरूर आहे. या कार्यास ज्या रीतीनें आपणास मदत करणें शक्य असेल त्यारीतीनें करणें हें राष्ट्रांतील प्रत्येक व्यक्तीचें कर्तव्य आहे. राष्ट्रांतील प्रत्येक व्यक्ती म्हणजे राष्ट्रमातेचा घटक होय. त्या प्रत्येक घटकानें हें माझें राष्ट्र अशा अभिमानानें कोणत्याना कोणत्यातरी कार्यास मदत केली पाहिजे. जो मनुष्य राष्ट्रहित न करितां राष्ट्राचा विध्वंस करण्याचा आत्मघातकी प्रयत्न करितो, तो परमेश्वराच्या दरबारीं घातकी ठरतो व लोकनिंदेलाही पात्र होतो. राष्ट्रावर परचक्र आलें किंवा एखाद्या जुलमी बादशहाकडून राष्ट्राला त्रास होऊं लागला तर तो त्रास राष्ट्रांतील प्रत्येक व्यक्तीलाच भोगावा लागतो. हें जर उघड आहे, तर राष्ट्राच्या वतीनें परचक्रापासून तिचें संरक्षण करण्यास म्हणजे पर्यायानें स्वसंरक्षणच करण्यास प्रत्येक व्यक्तीनें तयार असलें पाहिजे. आपल्या प्रिय राजस्थानावर सांप्रत अशाच प्रकारचें संकट गुदरलें आहे त्याचें निवारण करण्याकरितां महाराणाजी सारखी पूज्य विभूती रात्रंदिवस खटपट करीत आहे. अशावेळीं आम्ही प्रजाजनांनीं त्या कार्यास हातभार लावणें हें आमचें प्रमुख कर्तव्यच आहे. मज जवळ परमेश्वर कृपेनें थोडेसें द्रव्य आहे. त्याचा उपयोग अशा वेळीं राष्ट्रकार्यास होत आहे म्हणून माझ्या मनाला फार समाधान वाटत आहे. माझे घरीं उगीच पडून

राहिलेलें द्रव्य अशाप्रकारानें राष्ट्रकार्यास उपयोगीं पडलेलें पाहून माझ्या मनाला फार फार धन्यता वाटत आहे. आणि महाराजांनींही माझी ही विनंती मान्य करून माझा गौरव केला हा माझ्यावर महाराजांचा फार मोठा अनुग्रहच झाला असें मी समजतों.

प्रता०—प्रधानजी, तुम्ही आपल्या या कृतीनें जगाला एक प्रकारचें निराळें वळणच लावून दिलें आणि सर्व लोकांना तर थक्क करून सोडिलेंत. तुमच्यासारखीं नररत्नें ज्या राष्ट्रमातेच्या पोटीं जन्मास येतात ती राष्ट्रमाता धन्य होय. ज्या राष्ट्रामध्यें असे राष्ट्रभक्त जन्मास येतात आणि राष्ट्रकार्य हेंच आपलें कार्य आणि राष्ट्राचें हिताहित तेंच आपलें हिताहित असें समजणारे राष्ट्रधुरीण जन्मास येतात, तें राष्ट्र खात्रीनें भरभराटीला येणार यांत बिलकूल शंका नाहीं.

भा०—राष्ट्राची भरभराट व तिचा लौकिक हा आपणासारख्या दैवीशक्तीच्या परमपूज्य विभूतींवर अवलंबून असतो. राष्ट्राचा मालक जो राजा तो परमेश्वरी अंश आहे म्हणून राजेलोक हे भूलोकावरचे परमेश्वरच आहेत असें समजून त्यांचे आज्ञेप्रमाणें वागणें आणि प्रसंग पडल्यास त्यांस मदत करणें एवढेंच आम्हा प्रजाजनांचें कर्तव्य आहे. तें कर्तव्य मी केलें यांत विशेष तें काय केलें ? राष्ट्राला वैभवाच्या उत्तुंग शिखरावर नेऊन बसविणें किंवा अवनतीच्या खोल दरींत फेंकून देणें हें राष्ट्राचे मालक जे राजे त्यांचेच स्वाधीन असतें. महाराजांसारखे पराक्रमशाली राजाधिराजे आमच्या या राजस्थानावर असतांना हा राजस्थान हां हां म्हणतां वैभवाच्या उत्तुंग शिखरावर जाऊन नाहीं कां बसणार !

प्रता०—आमच्या राष्ट्राची भरभराट व्हावी असाच परमेश्वरी संकेत आज दिसत आहे. केवळ द्रव्यसहाय्य नसल्यामुळें लढाई बंद करून मी राष्ट्राचा विघात करण्यास तयार झालों होतों; पण तुम्ही द्रव्यसहाय्य केलें म्हणून आतां दुप्पट जोर आला आहे. आतां पुनः अकबराबरोबर लढाई करून गेलेलें वैभव मला परत मिळविलेंच पाहिजे. युद्धाची सर्व तयारी तर झालीच आहे. आणि अकबराचा फरीदखान सरदारही आपल्या सैन्यासह जवळच तळ देऊन बसला आहे. आतां, आपणास एकदम त्याच्यावर अचानक हल्ला केला पाहिजे आणि त्याची चांगली धूळधाण उडवून दिली पाहिजे. अकबरा, तूं पक्कें लक्षांत ठेव, कीं तुझ्याकडून आपलें गेलेलें राज्य परत घेण्याकरितां आणि राजस्थानांतील रजपुतांचा आजपर्यंत तूं जो छळ केलास त्याबद्दल तुला शासन करण्याकरितां हा 'प्रतापी प्रतापसिंह' तुझ्यावर पिसाळलेल्या वाघाप्रमाणें धांवून येत आहे. ( धांवत जातो. ) ( पडदा. )

अंक दुसरा समाप्त.

---

# अंक तिसरा.

## प्रवेश—१ ला.

[ स्थळ-रणमैदान. रजपूत व मुसलमान यांची लढाई चालू आहे. ]

( प्रतापसिंह व विजयसिंह गडबडीनें प्रवेश करितात; समोरून दोन मुसलमान सरदारही प्रवेश करितात. )

प्रता०—विजयसिंह, हे पहा गनीम आले. पहातां काय ? चला.

( दोघेहि त्यांच्यावर तुटून पडतात. दोघादोघांची चकमक सुरूं होते. एकमेकांचे वार एकमेकांवर होतात. प्रतापसिंह जोराचा एक वार करून शत्रूला पाडतो. विजयसिंहही वार करून शत्रूस पाडतो. )

विज०—महाराज, शत्रू तर पार पळाले.

प्रता०—श्रीएकलिंगजीच्या कृपेनें आज आमचा जय झाला.

विज०—( दूर पाहून ) आमच्या लोकांनीं त्यांचा पाठलाग चालविला आहे. तें पहा, आमचें निशाण उदेपुरावर आमच्या लोकांनीं लाविलें.

प्रता०—चला तर आपणही तिकडेच जाऊं.

( जातात. )

## प्रवेश २ रा.

( रायसिंग व विजयसिंह प्रवेश करितात. )

राय०—सरदारसाब, लढाईचा रंग कसा काय ह्या! तुमचा चेरा अक्शी लई खूस दिसतुया ( डोळे मिचकवून ) लढाई तुमी जिकलींत असं दिसतंया. काय झालं तें तरी आम्हांस्नी सांगा कीं.

वि०—( आनंदानें ) रायबा, श्री एकलिंगजींच्या कृपेनें आमचा जय झाला. आमच्या सैन्यानें मोंगलाच्या सैन्याला पार मागें सारलें, आमचा जोर ओळखून मोंगलाच्या फरीदखानानें तर पळच काढिला. आणि आम्ही थेट उदेपुरावर आमचें निशाण लावलें. गेलेले उदेपूर पुन:आमच्या ताब्यांत आलेलें पाहून महाराजांना तर फारच आनंद वाटला; तसाच आम्हांलाही आनंद झाला.

राय०—होय का !( उड्या मारून ) छान, लई नामी गोष्ट झाली पगा. उदेपूर मोंगल्यांनीं घेतल्या पासनं म्हाराजास्नीपगा अक्शी अन्नबी ग्वाड लागत नव्हतं. अन् झ्वापबी येत नव्हती. उदेपूर गेल्याचं म्हाराजाच्या मनाला लई लागून राह्यलं होतं पगा.

विज०-आतां महाराजांच्या मनासारखें झालें आणि महाराजांना त्यामुळें दुप्पट जोर आला. आतां हां ह म्हणतां चितोड घेऊन महाराज आपली प्रतिज्ञा पुरी करितील.

राय०—आतां चितुड ध्यायला काय वेळ लागनार? हां हां म्हनतां आमचं म्हाराज चितूड घेत्याल अन् ह्या समद्यास्नीं आपल्या जातागोतांत जाऊन पडत येईल. ह्ये रानांतलं राहनं लई तरासाचं हाया पगा.

वि०—होईल, परमेश्वर कृपेनें सर्व गोष्टी आपल्या मना सारख्या होतील. आज महाराणाजींचा बड दरबार आहे, तिकडं आपणास लवकरच गेलं पाहीजे.

( जातो.

रा०—चला, आपुनबी तकडंच जाऊंया. (जातो.

## [ प्रवेश ३ रा. ]

(राणाजींचा दरबार. सर्व आपापल्या स्थानीं बसले आहेत. )

प्रता०—सरदारहो, परमेश्वरानें आपणा सर्वांना आजचा हा आनंदाचा दिवस दाखविला आहे. काल याच वेळीं आपण लढाई करण्यांत गुंतलों होतों. तर आज श्रीएकलिंगजीच्या कृपेनें आपलें गेलेलें राज्य आपणांस परत मिळून आपण या उदेपूरच्या राजवाड्यांत आनंदानें जमलों आहोंत. मन उदास होऊन अकब्बरा बरोबर तह करण्यास मी तयार झालों होतों. त्या वेळीं मला ही गोष्ट अशक्यच वाटली. पण ईश्वरी संकेतानें आपणा सर्वांमध्यें पुन्हा प्रेरणा उत्पन्न होऊन त्या यवनाबरोबर लढण्याचें सामर्थ्य आपणामध्यें उत्पन्न झालें आणि त्या जोरावर आपण उदेपूर तर ताब्यांत घेतलंच-आतां चितोड घेऊन आपल्या पूर्वजांच्या पुण्य नगरींत प्रवेश करण्याचें तेवढें बाकी राहिलें आहे. तेही आतां लवकरच सिद्धीस जाईल असें आपणांस आतां खात्रीनें वाटूं लागलें आहे.

सूक्त०—महाराज, आणि सरदारहो, आजच्या शुभप्रसंगीं सर्वांना आनंद झाला आहे. त्या भरांत भविष्यकाळातल्या गोष्टी न विसरतां तिकडेही लक्ष देणें आमचें कर्तव्य आहे. मिळालें तितकें पुष्कळच मिळालें असें समजून आपण स्वस्थ बसतां कामा नये. कारण राष्ट्रकार्य करणाऱ्या लोकांत अल्पसंतुष्ट असे जे लोक असतात, ते राष्ट्राच्या अहिताला कारण होतात. असें आपल्या पूर्वजांचें सांगणें आहे. याकरितां आपण या शुभप्रसंगीं चितोड घेऊन प्रतिज्ञासमाप्ती करणें-बद्दल पुन: निश्चय केला पाहिजे. आणि याच शुभ-मुहूर्तावर पुढील कार्यास जोरानें आरंभही केला पाहिजे. आजचा जय म्हणजे स्वीकृत कार्यांतील एक मुहूर्तमेढच असें आपण मानलें पाहिजे.

सरदार०—महाराजांची आज्ञा आम्हां सर्वांस शिरसामान्य आहे.

( ' महाराणा प्रतापसिंह महाराज की जय ' असा जयजयकार होतो. )

**प्रता०**—सरदारहो, तुमचा हा उत्साह पाहून पुढील कार्य शेवटास जाणार असल्याची आज मला खात्रीचं वाटत आहे. आपल्या या उत्साहानें व आजच्या या शुभ समारंभानें सर्व राजस्थानांतील स्त्री-पुरुषांना अत्यंत आनंद झाला आहे. आणि आपल्या पराक्रमाबद्दल स्वर्गांतून आपले पूर्वज आपणांस शाबासकी देत आहेत. कालच्या तुमच्या पराक्रमानें मोंगल तर गर्भगलीतच झाला आहे. आणि तुमचा नांवलौकीक मात्र दाहीं दिशांत दुमदुमत राहिला आहे. आपल्या भूमातेच्या उदयकाळीं आपण मोठ्या आनंदानें भूमातेचा जयघोष केला पाहिजे. तो ऐकून मोंगलांचे काळीज तर फाटूनच गेलें पाहिजे. बोला 'भूमाता की जय ' ( भूमाता की जय असा घोष होतो.

**सूक्त०**—सरदारहो, आजचा हा सुदीन महाराजांच्या पराक्रमानेंच उगवला हें तुम्हांस माहीतच आहे. महाराजांचा मी भाऊ आहे, म्हणून मी मोठ्या अभिमानानें महाराजांना ' महाप्रतापी प्रतापसिंह ' असें म्हणतों. आणि यापुढेंही महाराजांचा नांवलौकिक सर्व जगांत होऊन सर्व लोक म्हणतील कीं राजस्थानचा वीर शिरोमणी, हम्मीरवंशातला पराक्रमशाली धैर्यमेरू ' महाप्रतापी प्रतापसिंहच ' होय ! हा नांवलौकिक जगाच्या अंतापर्यंत कायम राहणार—बोला ' प्रतापी प्रतापसिंह महाराज की जय '

( जय घोष होतो. )

**प्रता०**—ज्या परमेश्वराच्या कृपेनें हा सुदीन आम्हांस लाभला त्याची प्रार्थना आपण करूं या.

**प्रार्थना**

॥ या हिंद वीर प्रभूस देई यशा सदोदित ईश्वरा ॥ ध्रु ॥
॥ समरिं धैर्यधर, वश हो त्याला । अखंड शांती देई महिला ॥
॥ अरिखल हतबल करुनी टाकी । मंगलदायक ईश्वरा ॥ १ ॥
॥ पूर्वजकृतवच सत्यचि करण्या। संतत झटि त्या सहाय होण्या ॥
॥ विनती आमुची, पुरवी साची । सुखकारी भो शुभंकरा ॥ २ ॥
॥ भूवरी सांप्रत कहर गुदरला । यावनि जाचाचि दुःसह झाला ॥
॥ त्वरिं करि मुक्तचि त्यांतुनि आम्हा ॥ श्रेष्ठ दयाघन शंकरा ॥ ३ ॥

समाप्त. (पडदा. )

---


**चौथ्या इयत्तेकरितां !** **केवळ चौथ्या इयत्तेकरितां ! !**

## सुधारून वाढविलेली दुसरी आवृत्ति.

एकाच प्रतीस ८४८६ चीं तिकिटें पाठवावीं. ] **प्रश्नगुच्छ** [ घाऊक मागणीस ट. व्ही. पी. खर्च माफ, शिवाय कमिशन.

या पुस्तकांत चौथ्या इयत्तेच्या—अंकगणित विषयक—वार्षिक परिक्षेचे ( ५ जिल्ह्यांचे, १६ वर्षांचे ) प्रश्न; त्यांचें सुलभ पृथक्करण आणि भूत्रर्णनात्मक परिशिष्ट असल्यानें त्वरित मागणी करून तुमच्या विद्यार्थ्यांची या दोन विषयांत कितपत तयारी झाली आहे हें वार्षिक परीक्षपूर्वीच पहा. कागद छपाई व बांधणी उत्तम आहे. लिहाच पत्र.


**पांडुरंग रामचंद्र चोंडवले**, शा. नं. १ बेळगांव.

# वाघ.

( ले. घा. वि. भावे. सुडकोली. )

वाघ हें क्रूर श्वापद सर्वांस माहीत आहे. वाघास बाग, शेर, व्याघ्र असें भाषापरत्वें निरनिराळे शब्द आहेत. वाघांच्या मुख्य तीन जाती आहेत. पट्ट्या, ( बंगाली ) बिबट्या व काळा. बिबट्या वाघांत चित्ता ( खर्डा ) म्हणून एक पोटजात आहे. खरडा वाघ, मोठीं गुरें मारीत नाहीं. कुत्रीं, बकरीं, मांजरें वगैरे लहान जीव मारतो.

ज्या रानांत मनुष्यांची वर्दळ कमी असते, जाळी झुडपें फार, दगडांच्या घवी ( गुहा ) असतात अशा ठिकाणांचे फार करून वाघ रहातात. वाघ सात फुटांपासून पंधरा फूटांपर्यंत लांब असतो ( शेपटी सहीत ) दीड फुटापासून अडीच फुटांपर्यंत उंच असतो. वाघीण व्याली म्हणजे दोन किंवा तीन पिलें घालते कुत्र्याचे पोराप्रमाणेंच वाघाचे पोरांचे डोळे बरेच दिवस मिटलेले असतात. वाघीण व्याल्याबरोबर तिचीं पोरें कुत्र्याचे पोराइतकीच असतात. तीं मोठ्या बोक्या प्रमाणें म्यांव म्यांव शब्द करतात. मांजराचे पोराप्रमाणेंच वागडतात. डोळे उघडल्यानंतर पण त्यांचे तोंडीं मास लागण्यापूर्वी जर पोरें धरून बाळगिलीं तर तीं मांजरांप्रमाणें भात–भाकरी खाण्यास शिकतील असें वाटतें. आमचे घरीं मोठ्या बोक्याएवढालीं पिलें धरून आणलीं होतीं. त्यांचे पुढें भाकरीचे तुकडे टाकल्यावर तीं चघळीत पण थुंकून टाकीत. कारण त्यांचे तोंडीं मांस लागलें होतें. तीं ज्या ठिकाणीं धरलीं त्या जागेवर मांसाचे तुकडे पडलेले होते. आम्हीं त्यांना अर्धे दूध व अर्धें पाणी मिश्र करून पाजीत होतों. पोरांचे डोळे उघडल्यावर वाघीण मारलेल्या जनावराचें मांस खाऊन पोटांत निराळें सांठवून ठेविते व पिलांजवळ येतांच ते वमन करून टाकते व त्यास खावयास शिकविते. पोरें एक वर्षाची झाल्यावर त्याचा आवाज बदलतो व ती मोठ्या वाघा प्रमाणें भुरकू, भुरकू–भुरकू शब्द करूं लागतात. वाघ ओरडतांना जमीनीशीं तोंड लावून ओरडतो. पोरें मोठीं झालीं म्हणजे स्वतंत्रपणें वावरूं लागतात. नर व मादी कधीं कधीं जोडीनें राहतात. वाघ, डुक्कर, भेकरी, चितळ, ससा, गुरें, कुत्रें वगैरे सर्व प्राणी मारून खातो. तो जें ढोर मारतो, तें चांगलें सशक्त पाहून धरतो. मारतांना प्रथम मान धरतो. नंतर त्यांस ढुंगणीवर बसवतो. ( पुढल्या दोन पायांनीं धरून ) व त्याचे अंगांतील सर्व रक्त शोषून पितो. नंतर ढोर अडवें टाकून खावयास आरंभ करतो. मांस खातांना ढोराचे कान व शेंपटी हालतात; तेव्हां तें ढोर जिवंत असावें अशा समजूतीनें हे दोनही अवयव उपटून टाकून मग यथेच्छ ताव मारूं लागतो. गाभणी गाय मारली तर गर्भ बाहेर काढून टाकतो. व्यायलेली गाय असेल तर प्रथम ओटीचा भाग खातो, ( दुधाकरितां कीं काय कोणास कळे. ) नंतर कुल्यावरचें मांस खातो. एकदां एक ढोर मारलें म्हणजे तें तीन चार दिवसही खात असतो. ढोर मारल्यावर तें कोणास न दिसेल अशा अडचणीचे जागीं अगर ढोर लहान असेल तर एकादें सरळ झाड पाहून झाडावर दोन फांद्यांचे बेचकांत अडवून ठेवतो. कधीं कधीं मारलेलें जनावर अर्धे मैल लांबपर्यंतही उचलून अगर ओढीत नेतो ! एकादें गुरूं सशक्त असल्यास वाघास चांगलाच हात दाखवितें !



अशा गुरावर टेहळणी करून जाळी–झुडपाच्या आड लपून बसतो व गुराचे मागील पायाचे टांचेवर पंजा मारून शिरा तोडतो. मग त्या ढोरास फार पळतां येत नाहीं. नंतर त्याचे पाठीवर उडी मारून मानेचे वरच्या बाजूस चावा घेतो. उलट अशींही उदाहरणें आहेत कीं, गायीचे वासरावर जर वाघानें उडी घातली तर गाय ही वाघावर धडक उडी घालून आपलें वासरूं सोडवितें. तसेंच डुकरेंही जर एक मिलाफानें चरत असलीं व मध्यें वाघानें उडी टाकली तर त्याला हैराण करितात मोठा डुक्कर असेल तर त्याला समोरून घरण्याची या वाघाची छाती होत नाहीं. वाघ गुरांचे पाठीस लागला तर इकडील गुराखी त्यास दगड मारून गुरें सोडवितात. ढोर मारितोंपर्यंत वाघ मनुष्याकडे पहातही नाहीं. एकदां ढोर त्यानें मारलें म्हणजे मग मात्र तो एकादे माणसाला भीत नाहीं. कारण मारलेला माल त्याच्या मालकीचा झाला !! वाघ जरी क्रूर आहे तरी तो मनुष्यालाही फार भितो. मोठा वाघ कधीं सहसां खेड्यांत येत नाहीं. लहान (खर्डा) वाघ मात्र कुईतारू घरांचें कूड फाडून सुद्धां वासरें, बकरीं, कुत्रीं, पळवितो. सरळ झाडावर वाघ चढतो. आडव्या खांद्यावर चढता येत नाहीं; कारण तोल जातो. शिकारी लोक दुपारीं ११ ते ३ वाजेपर्यंत रानांत शिरून अगर ढोर मारलें असेल तेथे बसून वाघाची शिकार करितात, किंवा बंदुका डांबून अगर सांपळे करून वाघास मारतात. वाघ मारून आणल्यावर जो लोकांचा थवा जमतो त्यांत कांहीं पार्श्वशूर मंडळींचे बोल मनाची बरीच करमणूक करितात. एखादे वेळीं माकडें व वाघ यांचीं बरीच मजा बघावयास सापडते. माकडाचा जमाव असेल अशा ठिकाणीं जर वाघ आला तर माकडे एकच हलकल्लोळ करून सोडतात. च्याक च्याक टूर्रर्रर्र टूर्रर्रर्र, असे शब्द करितात व या झाडावरून त्या झाडावर उड्या मारतात. वाघ मध्येंच ओरडतो. पुन्हा माकडे दांत काढतात. हा खालीं हातपाय आपटीत असतोंच, मध्यें एकादें झाडावर उडी मारतो कीं माकडें दुसरीकडे पळतात. !! हा देखावा मोठ्या गमतीचा असतो. क्वचित् एखादे वेळीं. झाडावर माकडे निजलेलीं असलीं तर वाघ झाडाखालीं जाऊन एकदम ओरडतो. त्यावेळीं एखादे माकड दचकून खालीं पडतें, पण फार करून वाघास मिळत नाहीं !

श्रीमंत लोक वाघ मारून घेतात व कातडीं कमावून बसावयास घेतात. बैरागी लोक वाघाची कातडीं वापरतात. हें सर्वांस माहित आहेच.

वाघांना कांहीं रोगही होतात. लूत रोगानें पछाडलेला वाघ आम्ही पाहिला आहे. एक वाघ त्याचे छातीवर गांठ येऊन ती फुटून मेलेला सांपडला होता. ज्याप्रमाणें बायका अडून मरतात त्याप्रमाणें एका रानांत एक वाघीण व दोन पोरें मरून पडलेलीं सांपडलीं होतीं.

वाघास ऊन्ह सहन होत नाहीं. वाघ मारल्यावर त्याचे निरनिराळे भाग औषधास उपयोगी पडतात. वाघाचें मांस सुकवून ठेवितात. तें गुरांना कांहीं रोगावर खावयास देतात. मनुष्यांसही देवीचे सांथींत उपयोग करितात. चरबी मनुष्याचें हातापायांचे सांधे दुखतात त्यावर चोळून लावितात. कुत्रा अगर कोल्हा चावल्यास वाघाचा सुळा उगाळून पितात वाघाचे पोटांतील पित्तही लवंगा घालून बाटलींत ठेवतात. याचा उपयोग मला माहित नाहीं, तो कुणास ठाऊक असल्यास प्रसिद्ध करावें. वाघाचीं नखें सोन्यांत मढवून लहान मुलांचे गळ्यांत बांधतात. वाघाचे मिशीचा केंस विषारी आहे. मनुष्याचे पोटांत गेल्यास मनुष्य खैण लागून मरतो. ढोरास वाघानें केलेल्या जखमेंत जर त्याचा केंस गेला तर ती जखम लवकर बरी होत नाहीं. पिशाच्च बाधा होऊं नये म्हणून कोणी वाघाचे केंस ताईतांत भरून गळ्यांत अगर हातांत बांधतात.

---

# करकोच्यांनें वांचविलें.



अखेर वर तर आलों.



अरे बापरे! केवढी ही पावसाची सर!



मित्रा, ये रे ! मदत करतास कां ?



काय मजा आहे गुड्या !

# पारध्याचें कृत्य.

एक राजा होता. त्याचें राज्य फार मोठें होतें. राजा फार दुष्ट असल्यामुळें त्या राज्यांत लोक रहावयास भीत असत. त्याचा स्वभाव फार चंचल असे, आणि तो अत्यंत भयंकर असा असे. कोणाचा कोणत्या वेळीं प्राण घेण्यांत येईल याचा त्या राज्यांत नेम नव्हता.

त्याच्या वजिरांचेंहि असेंच होतें. कोणताहि वजीर त्या राज्यांत फार दिवस टिकत नसे. थोडे दिवस गेले म्हणजे त्याची कांहीं तरी चूक काढून त्याला फांसावर लटकाविलें जाई. प्रथम त्या वजीराचा मोठा सन्मान करण्यांत येई व नंतर त्याचा धिःक्कार करून त्याला यमसदनास पाठविलें जाई.

एकदां राजाचा एक दूरचा नातेवाईक तेथें आला. तो फार हुशार होता. त्यामुळें राजानें त्याचा चांगला आदरसत्कार करून त्याला वजीराची जागा दिली. त्याच्या अंगीं झटून काम करण्याची शक्ती असल्यामुळें कांहीं दिवस राजाचें व त्याचें चांगलें सख्य जमलें. राजा त्याची तीन वर्षांची नोकरी पाहून त्याजवर खूप झाला व त्यानें आपल्या बहिणीचें लग्न त्याच्याबरोबर लावून दिलें. तिचें नांव केशवती असें होतें हें नांव तिला तिच्या काळेभोर व लांब केसावरून पडलें होतें. ती मोठ्या आनंदांत व सौख्यांत दिवस घालवीत होती. अशा प्रकारें चैनींत व विलासांत दिवस घालवीत असतां वजीराचें दैव फिरलें त्याला वाटे कीं, आपल्याला आतां या राज्यांत कोणत्याहि प्रकारची भीति नाहीं. आपण करूं तें प्रमाण, परंतु दुष्ट राजाचा दुष्टपणा गेला नसल्यामुळें वजीराचें बेफिकीरपणें रहाणें त्याला नडल्याशिवाय राहिलें नाहीं. त्या वजीराच्या हातून एक चूक झाली व शेवटीं शीघ्र कोपी राजानें त्याला एकदम फांशीची शिक्षा फर्मावली. परंतु या शिक्षेंत राजानें एक खबरदारी घेतली. त्यानें आपली बहिण दुःखानें आक्रोश करील व साऱ्या राज्यांत धुमाकूळ माजवील या भीतीनें वजीरास गांवच्या बाहेर दूर नेऊन ठेवण्यास व एका बुरजावर अन्न पाण्यावांचून मरूं देण्यास फर्माविलें. राजाच्या हुकमाप्रमाणें वजीराची रवानगी झाली. वजीर साहेब त्या उंच बुरजावर एकटे बसले होते व त्यांच्या पुढें भाकरीचे कांहीं तुकडे व एक कांबळें पडलें होतें. तो बुरुज फार उंचावर होता. खालीं खोलच खोल व वर निरभ्र आकाश, व त्या आकाशांत फिरणाऱ्या लहान टिपक्या एवढ्या घारी दिसत. बुरजावर कांहीं घारी नेहमीं बसलेल्या असत.

एकदां तो वजीर एकटाच बसला असतां त्याच्याकडे खालून एक दगड आला. त्या क्षणीं तेथें बसलेल्या घारी उडून गेल्या. त्यामुळें वजीराचें लक्ष खालीं गेलें. वजीरानें खालीं पाहिलें तों त्यास आपली अत्यंत आवडती पत्नी खालीं उभी असलेली दिसली. तीचे पाय चालून चालून दमले होते व तिचे कपडेहि फाटले होते. ज्या स्त्रीची योग्यता पालखींतून मिरवावयाची होती तिजवर रानोमाळ अनवाणी फिरण्याचा दुःखद प्रसंग आलेला पाहून त्या वजीराचें अंतःकरण दुःखानें भरून आलें. तो तिला म्हणाला, "माझ्या लाडके केशवती! तुझ्या स्थितीकडे पाहून मला अत्यंत दुःख होत आहे. पण या वेळीं तूं इकडे कां? माझ्या मरणकाळीं मला पहाण्यास आली आहेस काय? लाडके राजा तुझ्यावरहि माझ्याप्रमाणेंच रागावेल व तुलाहि मृत्युची शिक्षा देईल. तेव्हां जा, परत राज्यांत जा, आणि स्वस्थ बैस." त्यावर ती म्हणाली, "मी सर्वस्वाचा त्याग करून तुमच्या भेटीस आलें आहे. माझा भाऊ, मी

मेली आहें असें समजेल; पण नाथ, मी तुम्हाला सोडविण्याकरितां आलें आहे."

"आतां कसला मी सुटतों ? मरणच एकटें मला या दुःखांतून सोडवील."

"हं, खबरदार ! असले विचार मनांत आणूं नका. तुमच्याजवळ खाण्याचे पदार्थ काय आहेत ?"

"थोडी मध, भाकरीचा एक तुकडा, व घोटभर पाणी."

"त्यांतली भाकर खा व पाणी प्या. खालीं येतांना तुम्हाला दम धरवला पाहिजे. भाकरीच्या एका लहान तुकड्याला थोडा मध लावून तो तुकडा खालीं टाकून द्या." वजीरानें तिनें सांगितल्याप्रमाणें सारें केलें. मध लावलेला भाकरीचा तुकडा हातीं आल्यावर तिनें आपल्या लुगड्यांतून एक पारवा बाहेर काढला, व त्या पारव्याला मधेचा वास दिला. केशवतीनें त्या पारव्याच्या पायाला आपला लांब केस बांधला होता. त्या केंसाला रेशमाचा दोरा बांधला. पारवा शिकवलेला असल्यामुळें तो वरच्या मधाकडे जाऊं लागला. वजीरानें थोडीशी मध बुरजाच्या कठड्याला लावली असल्यामुळें, तो पारवा कठड्यावर जाऊन बसला. त्यानें त्या पारव्याला पकडलें व त्याच्या पायांतील केंस धरला. त्या केंसामागून रेशमी धागा त्याला मिळाला. त्या धाग्याला बारीक दोरी होती, ती त्यानें हातीं घेतली. नंतर सुतळी व मोठा दोर असें त्याच्या हातांत आलें त्यामुळें त्याच्या मनांत आशा उत्पन्न झाली. तो मनापासून काम करूं लागला. त्यानीं कठड्याला तो दोर भक्कम बांधला व खालीं उतरावयास सुरवात केली. मधेच्या वासानें पारवा अगोदरच खालीं गेला होता थोडा वेळ गेल्यावर वजीर जमीनीवर सुरक्षीत पोहोंचला. दोघांचा आनंद वर्णन करणें आम्हास शक्य नाहीं. नंतर केशवतीनें आपल्या कृत्याचा मागमूसहि राहूं नये म्हणून दोराला आग लावून दिली. पुढें दोघेजण त्या राज्यांतून निघून गेले व दुसरीकडे जाऊन आनंदांत राहिले.


मुलांकरितां ] पंचतंत्र [ सचित्र !

संस्कृत पंचतंत्रांतील सर्व गोष्टींचें मराठी सुबोध भाषांतर केलें असून प्रत्येक गोष्टीस सुबक चित्र जोडलें आहे. एकंदर गोष्टी ५० असून चित्रेंही ५० आहेत. इसापनीतीप्रमाणेंच पंचतंत्रांतील गोष्टीही विशेष मनोरंजक असून बोधप्रदही आहेत. टाईप मेट, कागद ग्लेज, पृष्ठसंख्या २५० बाईंडिंग जाड पुठ्याचें कि. १०४ ट. ह. ०४ शिवाय.

म्यानेजर—चित्रशाळा प्रेस, पुणें.

# निरानिराळ्या देशांतील घोड्यांचे २० उपयोग.



खडी बसविणें. वाटोळा फिरविणें. ओझें लादणें. बर्फावरून गाड्या ओढणें.



गाडी ओढणें. सर्कस. दळणें. बाटाचा दोर लपेटणें.



यंत्र चालविणें. वाटोळें कडें फिरविणें. झाडें पाडणें. शिकार करणें.



पोलीसांकरितां धान्य तुडविणें. पडाव ओढणें. लांकडें वहाणें.



# कोजागिरी अथवा कोजाग्रती ?

( ले०—वि. य. मोकाशी. )

पश्येम शरदः शतम् ।
जीवेम शरदः शतम् ।
-ऋग्वेद.

मंत्र जागराचे वेळीं शेवटीं, किंवा यजमानास आशीर्वाद देण्याचे वेळीं, 'तू शंभर शरद् पहाशील—तुझें' 'आयुर्मान शंभर शरद्पर्यंत राहील' — असा उपाध्याय आशीर्वाद देत असतो. इष्टदेवतेच्या पूजन-अर्चेच्या वेळीं असे मंत्र म्हणण्याची पूर्वापार रूढी पडून गेलेली आहे; पण ह्या सूत्रांत ओतप्रोत अर्थ भरलेला आहे, त्याची अतिपरिचयामुळें सामान्य जनतेस फारशी कल्पना येत नाहीं. ऋग्वेद कालापासून तों आतांपर्यंत शरद् ऋतूचें वर्णन यथामती कवींनीं प्रसंगोपात्त केलेलें आहे. ज्या रसिकाला ह्या काव्यामृताचा लाभ घ्यावयाचा असेल त्यानें महाकवी कालिदासाचें ऋतुवर्णन आणि त्यांतहि विशेषतः किरातार्जुन काव्याचा ४ था सर्ग अवश्य वाचावा म्हणजे मी म्हणतों ह्याची खात्री पटेल. हीं काव्यें फार सरस आहेत, त्यांची खुमारी प्रत्यक्ष वाचनावांचून कळणें कठीण आहे; किंवा संस्कृत वाचण्याची ज्यास तितकी गोडी वाटत नसेल त्यानें Thomson कवीची ह्या वर्णनावरील छोटीशी कविता वाचावी. असो; आज मला ह्या ऋतुवर्णनाच्या खोल प्रसंगांत शिरावयाचें नसून ह्या ऋतूंत, आश्विन शुद्ध० १५ मे चे दिवशीं रात्रौ शारदा देवीचा म्ह० श्री सरस्वती देवीचा जो उत्सव करितात आणि ज्या उत्सवास **कोजागिरी** असें बहुधा म्हणण्याचा प्रघात पडला आहे, त्यासंबंधीं पूर्वापार काय माहिती आहे व ह्या नामाभिधानाखालीं ह्याला कां संज्ञितात ह्याविषयीं मी विचार करण्याचें योजीत आहे. ह्या विषयावर विचार करीत असतांना प्रामुख्यानें तीन गोष्टींचा विचार करावा लागेल, त्या ह्याः—१ शरद् ऋतूचें कार्य अथवा वैशिष्ट्य. २ दुग्धपान व तदनुषंगिक गोष्टी. ३ आणि उपसंहार.

आतां क्रमाक्रमानें ह्या तीन मुद्यांकडे वळूं. मनुष्य उत्सवप्रिय आहे ही गोष्ट एकदां कबूल केल्यावर पुढील सर्व गोष्टी आपोआप सुटतात. उत्सव प्रिय मनुष्य त्याच्या रुचिप्रमाणें शारीरिक खेळांत दंग होऊन लेजीम खेळणें, पहाटेस उठून जोर बैठकादि मेहनत करून अंग कसणें, तें पिळदार बनविणें, नदी, विहिरी वगैरे जलाशयांत जाऊन डुंबणें इ. इ. खेळ व मेहनत करील ह्या ऋतूच्या मध्यकालापासून कार्तिक स्नानास भक्तिमान लोक प्रारंभ करतात. अर्थात् उषःकालांतील जलपानाबरोबर गंगास्नान झाल्यामुळें शरीरास व तेणें करून मनास आल्हाद वाटतो. आणि अशा क्रमामुळें शरीरयष्टि मजबूत बनत जाते. संयुक्त प्रांतांतील गुरुकुलसंस्था आपणांतील एखादा दक्षिणी जाऊन पाहील, तर तेथील विद्यार्थ्यांचा उषःकालचा दिनक्रम पाहून तो थक्क होऊन जाईल. ह्या संस्थेचे चालक पहाटेस चार वाजतां उठून विद्यार्थी वर्गांना उठण्यास घंटारवानें सांगतात. त्या वेळीं त्यांचें तें झपझप उठणें, स्नान करून भस्मचर्चित होणें, संध्या व प्राणायाम करून कमींत कमी १०८ नमस्कार—ज्याच्या त्याच्या शक्तीचा मगदुराप्रमाणें घालणें, नंतर एक दुधाचा प्याला घेऊन अभ्यासासाठीं स्वस्थानापन्न होणें, आणि ह्या सर्व उत्तेजक गोष्टींवर गुरु-उपगुरूंचे आस्थेवाईक बुद्धीनें लक्ष असणें ह्या गोष्टी किती प्रशंसनीय, किती आल्हादकारक आणि शेवटीं सर्व अर्थ साधणाऱ्या, अतएव श्रेयस्कर असतात हें कांहीं सांगण्याचें कारण

नाहीं. शरद्‌ऋतूंत, ह्या आश्रमांत, शरीरसामर्थ्य कसें वाढवावें ह्यावर ते विशेषतः लक्ष ठेवितात हें मीं प्रत्यक्ष. पाहिलें आहे. अद्यापहि महाराष्ट्रांतील व मध्यप्रांतांतील अनेक क्षेत्रीं उषःकालापूर्वीं उठण्याची प्रातःस्नानाची व तदनुषंगिक मंगल गोष्टी करण्याची वहिवाट आहे. महाभारतांत यक्षानें धर्मराजास ‘ कच्चित् प्रश्नाध्यायांत ’ वारंवार सूचना प्रश्न करून सुचविलें आहे कीं, धर्मराजा, तुझी प्रजा दिनमणी उगवण्यापूर्वीं ३॥ घटिका उठून प्रातःकालीं स्नानादि विधी करून मनःसंयमनांत अल्पकाळ गुंतलेली असतेना ? अशा प्रकारें तूं जनहिताची चिंता वाहतोस ना ! ” योगवाशिष्ठांत व भागवताच्या दशम आणि एकादशस्कंदांत प्रातःस्नानाचा व त्या वेळेस यथोचित कृत्यें करण्याचा वारंवार उपदेश केलेला आहे. तात्पर्य काय, कीं अशा सुसमयीं उठल्यानें शरीरास दार्ढ्य येऊन मनःप्रवृत्ती नेहमीं आल्हादित व त्यामुळें सात्विक राहून ज्याच्या त्याच्या धर्माचीं कार्यें अबाधित पार पडून अंतीं श्रेयस्कर अशा गोष्टी घडून येतात. अशा प्रकारची दिनचर्या ठेवणें हेंच शरद्-ऋतूचें वैशिष्ट्य आहे आणि तें साधावें म्हणून निसर्गाची मांडणी असावी असें जें आजपर्यंतच्या कविश्रेष्ठांना वाटलें तें योग्यच वाटलें असावें. असो:

आतां दुग्धपानें ह्या विषयाकडे वळूं. शरद् ऋतूचे प्रारंभीं नुक्ताच वर्षाऋतु संपत आला असल्या मुळें नदी-नाले, विहिरी, तलाव आदि जलाशयें पाण्यानें तुडुंब भरून गेलेलीं असतात, जागोजाग दाट हिरवळ उगवून चतुष्पादांना यथेच्छ चरणाची व जलप्राशनाची निसर्गानें मुबलक तरतूद करून ठेवलेली असते. अशा रमणीय स्थलावर मनसोक्त विहार करण्यानें गोवृंद अथवा महिषीवृंद सहाजिक रीतीनेंच पुष्ट होऊन जणूंकाय आपल्या धन्यास दुवा देण्यासाठींच कीं गाय आपल्या स्तनांतून हवे तितकें दूध लुटूं देत असेल, आणि असें झाल्यास त्यांत नवल तें काय ! अशी ही स्थिती शरद् कालीं असल्यामुळें दुधाचा तुटवडा निदान ह्या अल्प काळांत कोठें भासत नाहीं. आतां राजकीय परिस्थितीमुळें किंवा राजाश्रयाच्या अभावामुळें देशांत रहावीं तितकीं गुरें ढोरें रहात नाहींत हें देशाचें दुर्दैव खरें! पण ह्या काळांत निसर्गाकडून चतुष्पादांची शक्य तेवढी काळजी घेतली जाते ही गोष्ट वैदिक काळापासून आतांपर्यंत कायम आहे. वर्षाऋतु कमी झाल्यानें वरचेवर अवर्षणें पडतात ही गोष्ट कांहीं अन्यथा नाहीं, हें कोणासही कबूल करावें लागेल; पण त्या ऋतूचें उत्तेजक कार्य त्या वेळचा काळ करितो ही गोष्ट कांहीं खोटी नाहीं. प्राप्त झालेल्या परिस्थितीशीं झगडून त्यांतूनच इष्ट कार्यें पार पाडून न्यावयाचीं असतात ही गोष्ट जर कोणी सुजाण मनुष्य विसरणार नाहीं तर आपत्तींतून सुसंधि साधून घेण्यास त्याला सत्कृत्य करावयास किती तर वाव सांपडेल. असो; तेव्हां कोजागिरीच्या दिवशीं दुग्धपान हा एक महत्त्वाचा प्रसंग मानला गेला आहे हें त्या कालानुसार उचित होय.

ह्या दुग्धपानाचें म्हणजेच गोमातेचें महत्त्व अनेक काव्यांतून अनेक प्रसंगीं कवींनीं उत्तम प्रकारें गाइलें आहे. त्यांतील फक्त उदाहरणाकरितां म्हणून धेनु-हरणांतील एकच प्रसंग घेऊन हा मुद्दा पुरा करूं. अशाच शरद् ऋतुप्रसंगीं एकदां सहजी क्रीडा करीत असतांना विश्वामित्रराजा वशिष्ठ मुनींच्या आश्रमाजवळ आला. तों त्याला असें दृश्य दिसलें, कीं अगणित पांथस्थ त्या आश्रमांत येऊन भुक्तिसुखाचा लाभ घेऊन त्या मुनिश्रेष्ठास आशीर्वाद देत जात आहेत. विश्वामित्रानें ह्या वेळीं मनांत विचार केला कीं, इतके लोक प्रमुदित अंतः-करणानें वशिष्ठास दुवा देऊन जात आहेत ह्या सर्व गोष्टींस असें काय साधन त्या मुनीजवळ आहे, कीं ज्या योगानें आबालवृद्ध इतके पुष्ट होऊन जावें ! ह्या समयास अनुसरून पंत म्हणतात “ करितां शोध कळे कीं, उटजीं सुरधेनु नंदिनी आहे । पाहे तसि नृप म्हणे मग मुनिला गाय मागतों द्या हे । ” ह्यानंतर विश्वा-

मित्रानेंच पुनः वशिष्ठांना प्रश्न करून मोठ्या मिनतवारीनें याचना केली कीं, ' अर्बुद गायी देतों अथवा देतों स्वराज्य भोगाया । दे गाय, काय विनिमय हा भवदर्थों न मान्य हो गाया ' । ह्यावर मुनिश्रेष्ठ वशिष्ठांनीं मोठ्या विनयानें उत्तर दिलें: " मुनिवर म्हणे नृपा हें वचन तुझें मन्मनासि कंपा दे । ह्या धेनुबळें माझा हा आश्रमधर्म सांग संपादे " ॥

असो; ह्या कथनकाचा आपणांस विस्तार करावयाचा नाहीं. येथें मुद्द्याची गोष्ट ही कीं, त्या काळीं, गृहीं, धेनूंचा समुदाय असला म्हणजे अनेक अर्थ साधत असत, असें गायींचें महत्त्व आहे. तिची जोपासना करण्यापासून मानवी जातीचें अत्यंत कल्याण आहे. घरोघरीं हीच गोष्ट आपणांस ध्यानांत ठेवावयाची आहे. विश्वामित्रासारख्या राजाला ( अर्बुद म्ह० १ कोटी गायी ) सहजासहजीं मिळत असत, ही एकच गोष्ट त्या वेळच्या जनसमूहाचें निरीक्षण केल्यानंतर साहजिकपणें कळतें. सांप्रत शक्य असल्यास प्रत्येक भरतपुत्रानें निदान एका तरी गायीची जोपासना करावी, म्हणजे कोजागिरीच्या दिवशींचा दुग्धपान करण्याचा इष्ट हेतु विशेष काळजी न करितां पार पडेल.

शेवटीं, उपसंहारासंबंधानें मला एवढेंच सांगावयाचें आहे कीं, पूर्वींच्या काळची परिस्थिती फार निराळी होती. आज साधें पण पोटभर अन्न मिळण्याचीहि मारामार पडली आहे, मग दुग्धपानाची—आणि तीहि यथेच्छ—ही गोष्टच बोलावयास नको.

कोजागिरीच्या दिवशीं एकटा माणूस रात्रौ आपल्या घरीं बसून दुग्धप्राशनाचा प्रसंग आणूं म्हणेल, तर तें सहजासहजीं होण्यासारखें आहे. पण असे एकट्याचे प्रसंग जनतेस उत्साहक कार्यास प्रवृत्त करण्यास कितपत उपयोगी पडतील हें उघडच दिसत आहे. अशा प्रसंगीं शारदेचें म्ह० सरस्वतीचें पूजन होऊन तिची अनन्यभावानें आराधना अनेक शारदोपासकांस एकत्र जमण्यास व वाङ्मयात्मक विचारविनिमय होण्यास जरूर अवसर मिळाला पाहिजे. कोजागिरीच्या दिवशीं महाभारत काळीं द्यूतप्रसंग होत असत. आतां तशा प्रकारच्या प्रसंगाचें कारण उरलें नाहीं. तेव्हां परिस्थित्यनुरूप विचार करण्यासाठींच सर्वांनीं एकत्र जमावयास पाहिजे. असे विचारविनिमय चालले आहेत कीं नाहींत, निदान ह्या दिवशीं रात्रौ १२ वाजेपर्यंत कोण जागत आहे, हें ती सरस्वती देवता खास पहात बसली असली पाहिजे; अर्थात् तिची अनुज्ञा पाळणें प्रसंगानुसार आपलें कर्तव्य होय.

---

## हरिणी–अन्योक्ति ❀

( शिखरिणी–वृत्त. )

( ले० सौ० गीताबाई काळे. असोदें मु० नसिराबाद )


फिरे आनंदानें हरिणि रमत्री पाडस यदा ।
पडे, पाडी, धांवे अतिसुखभरें खेळवि तदा ॥
अहा ! वेगें आला प्रखर शर तां पाडस मरे !!!
सुखाचा ठेवा हा कधिंहि चिरकालीं नच थरे ॥

उभीं होतीं दुःख विकल-हृदया तीं क्षणभरी । [१]
बघे जो बाळातें थरथरुनि पडे तों क्षितिवरीं ! ॥
दुरात्मे गेलेही प्रमुदितपणें घेउनि तयां ।
अहा ! नाहीं नाहीं खचित उपमा मातृ-हृदया ॥


१ पाडस आणि हरिणी यांना.

# मूर्ख बेटे;

एका जंगलांत एक बोरीचें झाड होतें. त्या झाडाला दरवर्षीं चांगलीं बोरें येत. त्या जंगलांत उंदीर रहात



होतें. ते झाडावर चढत आणि दंगामस्ती करीत व



बोरें खात. पण ही वर चढण्याची दगदग कांहीं उंदरांना होईना. ते म्हणत त्यापेक्षां कुरतडून कुरतडून आपण हें झाडच पाडूं म्हणजे आपल्याला बोरेंच बोरेंच मिळतील. ही युक्ती सर्वांना पटली व सर्वजण



आनंदानें नाचूं बागडूं लागले. पण त्यांतला एक म्हातारा उंदीर त्यांना थांबवून म्हणाला मूर्खांनो,



तुम्हीं झाड पाडलेत म्हणजे पुढच्या वर्षीं त्याला बोरें कशीं येतील ?


## अभिनव काव्यमाला भाग ३

या पुस्तकाची दुसरी आवृत्ति छापून विक्रीस तयार आहे. किं. १ रु. ट. ह. व व्ही. पी. खर्च निराळा.

म्यानेजर—चित्रशाळा प्रेस, पुणें.

# अचानक पकडलें.

एक श्रीमान मारवाडी होता. तो आपल्या पैशाला फार जपत असे व पैशाचा खर्च अगदीं थोडा करीत असे. एकदां तो व त्याची बायको असे दोघेजण निजले होते. इतक्यांत एक चोर आला. त्या श्रीमान मारवाड्याला मूलबाळ नव्हतें, त्यामुळें त्याच्या इस्टेटीला कोणीच वारस नव्हतें.

चोर येत आहे असें पाहून तो गृहस्थ फार घाबरला तो तसाच गडबड न करतां बसला. परंतु मारवाडी बुद्धिमान माणूस होता. जी गोष्ट शक्तीनें होण्यासारखी नसते, ती गोष्ट मनुष्य युक्तीनें करीत असतो. त्याला एक नामी युक्ती सुचली. तो आपल्या बायकोला म्हणाला, "मी आतां म्हातारा होत चाललों, जीवाचा भरंवसा नाहीं; कोणत्या वेळीं प्राण जाईल तें सांगवत नाहीं. ही एवढी इस्टेट आहे हिचें काय करावें तेंहि कळत नाहीं. आपल्याला मूलबाळ तर नाहींच. तेव्हां आतां मी दत्तक घेणार आहें. दत्तकाकरितां पुष्कळ दिवस प्रयत्न केला; पण मनासारखा मुलगा कांहीं मिळत नाहीं. त्याकरितां मी असें ठरविलें आहे कीं, उद्यां सकाळीं उठल्याबरोबर जो मुलगा प्रथम दृष्टीस पडले त्याला दत्तक घ्यावें."

त्यावर त्याची स्त्री मोठ्या दुःखानें म्हणते "आपल्या दैवांतच जर मुलगा होण्याचें नाहीं, तर काय करावयाचें! आपण म्हणतां तें मला अगदीं कबूल आहे." हें त्यांचें संभाषण चोरानें अगदीं शांतपणें ऐकलें. त्यानें मनांत विचार केला कीं, उद्यां आपला मुलगा सकाळच्या प्रहरीं येथें आणूं म्हणजे कटकट मिटली. कशाला चोरी करा. असें मनाशीं ठरवून चोर निघून गेला. मारवाड्याला आपली युक्ति सफळ झालेली पाहून मनांत अत्यंत आनंद झाला. दुसऱ्या दिवशीं सकाळीं तो चोर आपल्या मुलाला घेऊन त्या मारवाड्याच्या दाराशीं आला. परंतु मारवाड्यानें रात्रींच पोलीसाला वर्दी दिली असल्यामुळें चोर आयता पकडला गेला. अशा प्रकारें मारवाड्यानें आपलें द्रव्यहि वांचविलें व चोरहि पकडला.

---


## नवीन तयार केलेलें !

# हिंदुदेवी क्यालेंडर

[ सन १९२५ ]

प्रतीस ८४. पो. सह ८६ आणे. घाऊक खरेदीदारास २५ प्रतींस ४॥८, ५० प्रतींस ८ रु १०० प्रतींस १५ रु.

चित्रशाळा प्रेस, पुणें.

# ❀ शालापत्रकाची चढाओढ ❀

## कोड्याचीं उत्तरें.

### सर्वांकरितां.

कोडें देणाऱ्यांनीं अपुरें कोडें दिलें, असें लक्षांत आल्यावरून तेंच कोडें पुनः देत आहोंत. असा एक चौरस करा कीं, त्याच्या उभ्या, आडव्या व तिरक्या ओळीकडून बेरीज केली असतां ती ६५ येईल. चौकोनांत प्रत्येक बाजूला ५ घरें असावींत व एक आंकडा पुनः येऊं नये. ज्यांनीं उत्तरें बरोबर पाठविलीं आहेत, त्यांनीं पुनः पाठवूं नयेत.

### मुलांकरितां.

उत्तर "मनुष्य"

**बरोबर उत्तरें पाठविणारांचीं नांवें**

१ मोडक डी. एन,
२ कुळकर्णी नारायण रंगनाथ
३ कु. दुर्गा देशपांडे
४ भीसे द. र
५ कुरणे सीताराम विष्णु.
६ बदामी गो. भी.
७ आगवेकर रामचंद्र यशवंत
८ कंगळे धनंजय बळवंत
९ नागवेकर व्यंकट माधवराव
१० भागवत द. ग.
११ गुळगुळे जयवंत पुरुषोत्तम
१२ मुसळे श्रीधर यशवंत
१३ सुभेदार श्रीधर गोविंद
१४ कुळकर्णी भास्कर शिवराम
१५ साने काशिनाथ दत्तात्रय
१६ बाळे पांडुरंग गणेश
१७ माळी तुळशीराम सोनाजी
१८ परमानंद अच्युत बाळकृष्ण
१९ साटम प्रतापराव सदाशिव
२० जाधव गोविंदा बाबू
२१ देशपांडे यशवंत विष्णु
२२ कवसाळ रुस्तुम नामदेव
२३ नाईक शांताराम पुंडलीक
२४ पवार वामन खुशालराव

**बक्षीसें**

नं. ४।१३।१७।१९।२२ ह्यांना खालील बक्षीसें मिळालीं आहेत.

४ लक्ष्मी पूजन
१३ शीलं परं भूषणं
१७ ध्रुव व चिलिया
१९ चिमुकलें रामायण
२२ भारतांतील गोष्टी

## नवें कोडें,

### मुलांकरितां.

× × × चें, पुणें, × ह ×, हें, × ति × × क, × × नें, × ×, प्र × ×, × ह ×, × हें, ×, × ह × त, × × × न, क × × × र, × × न ×, लोक, × × ता ×

ह्या दोन वाक्यांत कोणते शब्द सोडले आहेत, तें बरोबर वाक्यें लिहून सांगा. प्रत्येक शब्दापुढें स्वल्पविराम आहे.

| आक्टोबर<br>कूपन<br>सर्वांकरितां | आक्टोबर<br>कूपन<br>मुलांकरितां |
|---|---|

# चुटके.

गवई ( शेजाऱ्यास ):—कां हो, माझें गाणें तुम्हाला कसें काय आवडतें.

शेजारी:—वा ? महाराज, आपल्या गाण्याची तारीफ काय करावी! आपलें गाणें सारखें चालू राहील तर आम्हाला या गड्याला ठेवण्याची जरूरी रहाणार नाहीं. हें पहा तुमचें गाणें सुरूं झालें म्हणजे आमच्या या दुकानांत एक कावळा अगर चिमणीहि येत नाहीं. सारे उडून जातात!

× × ×

फिर्यादी ( खटला गमावलेला ):—कोर्टाचे कान लांब आहेत व कोर्टाला कांहीं अक्कल नाहीं असें मीं म्हटलें तर कोर्टाची बेअदबी होईल काय ?

कोर्ट:—अर्थात्!

फिर्यादी:—तर मग मी म्हणत नाहीं.

× × ×

तुरुंग तपासण्यास आलेले सद्गृहस्थ ( कैद्यांस):—आणि तूं रे का येथें ?

कैदी:—काय सांगूं महाराज. या तुरंगाच्या भिंती इतक्या जाड आहेत व गज इतके लांब आहेत म्हणून.

× × ×

मालक ( नव्या नोकरास ):—अरे तूं काय काम करावयाचें, हें त्या कारकुनांनीं सांगितलें काय ?

नोकर:—होय महाराज ! आपण जेव्हां याल तेव्हां त्यानीं मला उठवावयास सांगितलें आहे.

× × +

श्रीमंत आजोबा:—माझे सारे नातलग पलीकडल्या खोलींत बसून आतांच इस्टेटीबद्दल भांडत आहेत.

नातः—नाहीं आजोबा, तुमच्या अंत्यविधीस लागणाऱ्या पैशाचा हिशेब करीत आहेत.

× × ×

मास्तर ( रागावून ):—कायरे कारट्यांनो, हीं फुलें येथें कोणी ठेवायला सांगितलीं ?

मुलगा:—हेडमास्तरनीं, मास्तर.

मास्तर:—काय सुंदर फुलें आहेत हीं !

× × ×

"अरे, जर तुला पैसे उसने घ्यावयाचे असले तर एखाद्या निराशावाद्याकडून घे.

"कां हो?"

"अरे! कारण पैसे परत मिळण्याची तो आशा करणार नाहीं.

× × ×

रोगी:—डॉक्टर, मी बरा होईन असें तुम्हाला वाटतें कां ?

डॉक्टर:—हो, काय हरकत आहे! या रोगानें दहापैकीं नऊ लोक मरतात. माझ्या हातून आतांपर्यंत नऊच रोगी मेले आहेत.

बाप:—माधव, तूं जोडे फार लवकर फाडतोस. अरे, अजून दोन महिनेहि झाले नाहींत.

माधव:—म्हणूनच बाबा, मी म्हणतों कीं मला सायकल घ्या म्हणून.

× × ×

मुलगा:—आजोबा, माझें तोंड धुवूं नका.

आजोबा:—कारे बाळ, मी जेव्हां तुझ्या ऐवढा होतों, तेव्हां दिवसांतून तीनदां तोंड धूत असे.

मुलगा:—म्हणूनच आजोबा, तुमच्या तोंडावर सुरकुत्या पडल्या आहेत.

# जोडाक्षर-विरहित वाचनपाठ.

हें पुस्तक नुकत्याच अक्षर ओळख झालेल्या मुलांमुलींकरितांच लिहिलेलें आहे. पुस्तकांत एकंदर १७ गोष्टी अगदीं सोप्या भाषेंत, व एकहि जोडाक्षर न येऊं देतां लिहिल्या आहेत. प्रत्येक गोष्टीचे आरंभीं कथानकाचें मुर्तिमंत चित्र दिलें असल्यामुळें गोष्ट वाचण्याचे अगोदरच त्यांतील सारांश मुलांचे सहज लक्षांत येतो. किं. अवघी चार आणे

# उजळणीचें पुस्तक.

यांत सर्व मुळाक्षरें चित्रयुक्त दिलीं असून मोडी व बालबोध बाराखड्या तयार करण्याची समजूत थोडक्यांत करून दिली आहे. नंतर मोडी व बालबोध सोपे शब्द मुलांना सहज ओळखण्यासारखे दिले आहेत. पुढें १० अंक सचित्र दिले असून त्याबरोबर मुलांस बेरीज व वजाबाकीची समजूत टिंबांच्या आकृतींनी व गोट्यांच्या चौकटीच्या सहाय्यानें घालून दिली आहे. नंतर पाढ्यांची समजूत दिली असून शेवटीं उजळणी दिली आहे. एकंदरींत हें पुस्तक नवीन तऱ्हेनें मुलांना शिकविण्यास फार उपयुक्त असें झालें आहे. कागद ग्लेज किं. ०।०।६.

## लहान मुलांकरितां उपयुक्त अशीं पुस्तकें

# नवी आवृत्ति ] सचित्र अक्षरबोध. [ नवी आवृत्ति

या पुस्तकांत ' अ ' पासून ' ज्ञ ' पर्यंत स्वर आणि व्यंजनें हीं सर्व निरनिराळ्या भपकेदार रंगांत व हें अक्षर नांवांच्या प्रथम अक्षरांस दर्शविणाऱ्या चित्रांसह दाखविलेलीं असून १ पासून १० पर्यंत अंकहि नवीन पद्धतीनें दाखविलेले आहेत. पुस्तकाचा साइज क्राऊन चतुर्थांशापेक्षा मोठा ७×९ इंच ठेवला असल्यामुळें अक्षरें व चित्रें फारच सुबक व मोठीं अशी छापलीं आहेत. एकंदर पुस्तक इंग्रजींतील सचित्र रंगीत ए बी सी डी शिकण्यास उपयोगी अशा पुस्तकाच्या धर्तीवर तयार केलें असल्यामुळें हें पुस्तक लहान मुलांस फारच आवडून त्यावरून तीं आपला धडा सहज शिकतात. किं. ०।८.

# भाग १ ते ६ ] चिमुकल्या गोष्टी. [ भाग १ ते ६

ह्या गोष्टींत रोज व्यवहारांत घडणाऱ्या गोष्टी दिलेल्या आहेत, पण त्या इतक्या मोहक, मनोरंजक व मार्मिक लिहिल्या आहेत कीं, त्या गोष्टींतील तत्त्वबोध गोष्टी वाचतां वाचतांच मुलांच्या मनावर सहज ठसला जातो. पुस्तक नवीन टाइपांत सुंदर जाड व ग्लेज कागदावर छापिलेलें असून प्रत्येक गोष्टीचे प्रारंभीं कथानकाचें सुंदर चित्र दिलेलें आहे. एकंदर ह्या गोष्टीचे सहा भाग आहेत. प्रत्येक भागांत दहा गोष्टी सचित्र आहेत, प्रत्येक भागास किं. ०।४.

मिळण्याचें ठिकाण—म्यानेजर—चित्रशाळा प्रेस, पुणें.

॥ ॐ नमः श्रीरामचंद्राय ॥

# आर्य्यमहौषधालय मु० पो० आंजर्ले.

**कोंकणप्रांतांतील अगदीं ताज्या व शुद्ध वनस्पतींचीं जगत्प्रसिद्ध निर्दोष व रामबाण औषधें.**

**कंदर्पमंजरी पाक**—हा अपूर्व पाक गरिबांपासून तों अमीरउमरावांपर्यंत सर्वांसही अत्यंत उपयोगी असून किंमत माफक ठेविली आहे. यांत मौक्तिक, प्रवाळ, लोह, माक्षिक, कस्तूरी, अंबर इ० अत्युच्च गुणकारक पदार्थ असून शिवाय बदाम, पिस्ते, अक्रोड चारोळी, केशर, वेलची, पंजाबी सालममिश्री, सफेतमुसळी, पत्री, गोक्षुर, शतावरी, आस्कंद, वंशलोचन वगैरे ( ८० ) उपयुक्त वनस्पति घातल्या आहेत. यानें पथ्यावांचून गुण येतो. यापासून कोणत्याही कारणांनीं होणारा व कशाही प्रकारचा शुक्रस्राव, नपुंसकत्व, मूळव्याधि, रक्तदूषणामुळें त्वग्रोग, स्त्रियांची धुपणी व गर्भाशयस्थ दोष या भावना त्यांच्या एकंदर उपविकारांसह तत्काल बऱ्या होऊन धातुवृद्धि होते, व शरीर कणखर आणि तेजस्वी बनतें. २० तो० डबी २ रुपये. एकदम ३ डबे घेणारास ५ रुपये.

**स्वर्णधात्री तेल**—हें चारोळी, बदाम, कंकोळ, एला, बहुविध वनस्पतींचीं सत्त्वें व उपयुक्त तेलें अशा अनेक पदार्थांनीं बनविलें असल्यानें याच्या मर्दनापासून अपस्मार, उन्माद, वेड, चक्कर इ० रोगांस जलद आराम पडतो. केंसांस चोळल्यानें केंस काळे कुळकुळीत, तजेलदार, सडक लांब व मृदु होऊन मेंदु शांत आणि रोगरहित बनतो. यानें मस्तकाचें टक्कल जातें. हें अंगास चोळून स्नान करीत गेल्यानें शरीराचा दुर्गंध जातो. खरूज, गजकर्ण, शिबें, तसेंच तळपाय, तळहात, डोळे व मस्तक यांचा दाह हे विकार खास बरे होऊन निद्रा चांगली येते, आणि नेत्ररोग दुरुस्त होतात. बा० किं० १। रु०

**दंतरक्षक पूड**—ही दांत व हिरड्या यांचे सर्व विकार तत्काल दुरुस्त करून दांत स्वच्छ व मजबूत करण्यांत प्रतिज्ञेची आहे. ड. ६ आणे.

सुरंगी, मालती, कल्हार, गुलबहार, दणाणा, लक्ष्मीविलास इ० बादशाही अति उंची अत्तरें व त्याचप्रमाणें गुलाब, हिना, केवडा, चमेली, जाई वगैरे सुगंधी अत्तरें आणि केंसांस लावण्याचीं हरएक प्रकारचीं सुवासिक तेलें माफक दरानें पूर्ण खात्रीचीं मिळतील.

**सूचना:**—वरील औषधें व अत्तरें वगैरे पूर्ण खात्रीचीं असल्यामुळें आज तिसीस वर्षांत त्यांचा लक्षावधि लोकांस अप्रतिम उपयोग झाला म्हणून त्यांचा नेहमीं फारच खप होत आहे. अनुभवानंतर पूर्ण खात्री पटेलच. औषधें माहितीचे खर्च्यासह रोखीनें अगर व्ही. पी. नें पाठवूं. प्याकिंग व टपाल खर्च वेगळा. घाऊक घेणारास कमिशन भरपूर. सर्व औषधांच्या आणि आरोग्यरक्षणाच्या माहितीचें सचित्र मोठें पुस्तक देऊं. आमचीं औषधें वगैरे मागविणें तीं खालील बिनचूक पत्त्यावर मागवावीं.

कृष्णशास्त्री बिवलकर, वैद्य.

REGISTERED. B NO. 179




## अनुक्रमणिका


| विषय. | पृष्ठ. |
|---|---|
| जपान व शिक्षण | २०१ |
| सवतीचा गोंधा ( नाटक ) | २०४ |
| प्रामाणिक मुलगा | २०८ |
| समुद्राच्या गमती | २११ |
| झोंपडींत वाढलेला मुलगा | २१३ |
| सिंहान्योक्ति ( कविता ) | २१५ |
| हाँगकाँग | २१६ |
| जगांतील प्रवासाचे बारा प्रकार | २१७ |
| प्रश्नांची उलटापालट | २१८ |
| शालापत्रकाची चढाओढ | २१९ |
| गाढव ( चित्रें ) | २२० |


मुद्रक व प्रकाशक — रा. रा. शंकर नरहर जोशी चित्रशाळा प्रेस, १०२६ सदाशिव पेठ, पुणें सिटी.

# जोडाक्षर विरहित वाचनपाठ.

हें पुस्तक नुकत्याच अक्षर ओळख झालेल्या मुलांमुलींकरितांच लिहिलेलें आहे. पुस्तकांत एकंदर १७ गोष्टी अगदीं सोप्या भाषेंत, व एकहि जोडाक्षर न येऊं देतां लिहिल्या आहेत. प्रत्येक गोष्टीचे आरंभीं कथानकाचें मूर्तिमंत चित्र दिलें असल्यामुळें गोष्ट वाचण्याचे अगोदरच त्यांतील सारांश मुलांचें सहज लक्षांत येतो. किं. अवघी चार आणे.

# उजळणीचें पुस्तक.

ह्यांत सर्व मुळाक्षरें चित्रयुक्त दिलीं असून मोडी व बालबोध बाराखड्या तयार करण्याची समजूत थोडक्यांत करून दिली आहे. नंतर मोडी व बालबोध सोपे शब्द मुलांना सहज ओळखण्यासारखे दिले आहेत. पुढें १० अंक सचित्र दिले असून त्याबरोबर मुलांस बेरीज व वजाबाकीची समजूत टिंबांच्या आकृतींनी व गोट्यांच्या चौकटीच्या सहाय्यानें घालून दिली आहे. नंतर पाढ्यांची समजूत दिली असून शेवटीं उजळणी दिली आहे. एकंदरींत हें पुस्तक नवीन तऱ्हेनें मुलांना शिकविण्यास फार उपयुक्त असें झालें आहे. कागद ग्लेज किं ०१ ०६.

### लहान मुलांकरितां उपयुक्त अशीं पुस्तकें

# नवी आवृत्ति ] सचित्र अक्षरबोध. [ नवी आवृत्ति

या पुस्तकांत 'अ' पासून 'ज्ञ' पर्यंत स्वर आणि व्यंजनें हीं सर्व निरनिराळ्या भपकेदार रंगांत व तें अक्षर नांवांच्या प्रथम अक्षरानें दर्शविणाऱ्या चित्रांसह दाखविलेलीं असून १ पासून १० पर्यंत अंकहि वरील पद्धतीनें दाखविलेले आहेत. पुस्तकाचा साईज क्राऊन चतुर्थांशाइतका मोठा ७×९ इंच ठेवला असल्यामुळें अक्षरें व चित्रें फारच मुबक व मोठीं अशीं झालीं आहेत. एकंदर पुस्तक इंग्रजींतील सचित्र रंगीत ए बी सी डी शिकण्यांस उपयोगी अशा पुस्तकाच्या धर्तीवर तयार केलें असल्यामुळें हें पुस्तक लहान मुलांस फारच आवडून त्यावरून तीं आपला धडा सहज शिकतात. किं ०८.

# भाग १ ते ६ ] चिमुकल्या गोष्टी [ भाग १ ते ६

ह्या गोष्टींत रोज व्यवहारांत घडणाऱ्या गोष्टी दिलेल्या आहेत, पण त्या इतक्या मोहक मनोरंजक व धार्मिक लिहिल्या आहेत कीं त्या गोष्टींतील तत्वबोध गोष्टी वाचतां वाचतांच मुलांच्या मनावर सहज ठसला जातो. पुस्तक वळीक टाइपांत सुंदर जाड व ग्लेज कागदावर छापिलेलें असून प्रत्येक गोष्टीचे प्रारंभीं कथानकाचें सुंदर चित्र दिलेलें आहे. एकंदर ह्या गोष्टींचे सहा भाग आहेत. प्रत्येक भागांत दहा गोष्टी सचित्र आहेत, प्रत्येक भागास किं. ०४.

**मिळण्याचें ठिकाण**—म्यानेजर चित्रशाळा प्रेस, पुणें.

मराठी
# शालापत्रक

येथें शब्द नाहीं शिष्यासीं । हें अवघें सद्गुरूपाशीं ।
सद्गुरु पालटी अवगुणांसी । नाना यत्नें करोनी ॥
जें कांहीं आपणास ठावें । तें हळु हळु शिकवावें ।
शहाणें करून सोडावें । सकळा जनां ॥ १ ॥

—रामदास.

पुस्तक ३५ नोव्हेंबर सन १९२४ अंक ११

## जपान व शिक्षण.

### ( प्राथमिक शाळा. )

जपानमध्यें शिक्षण सक्तीचें आहे व त्याकरितां सरकारचे प्रयत्न कसून चाललेले असतात. मुलगा तीन वर्षांचा झाला म्हणजे तेव्हांपासून त्याच्या शिक्षणाला सुरवात होते. तिसऱ्या वर्षापासून तों १४ वे वर्षापर्यंत प्राथमिक शिक्षणाची मर्यादा असते. तिसऱ्या वर्षी मुलगा शाळेंत आला म्हणजे त्याला आपल्याकडे जशी क्रमिक शिक्षण देण्यास सुरवात होते, तशी तिकडे, होत असेल असें कोणास वाटत असेल तर तें चूक आहे. लहान मुलाला या क्रमिक शिक्षणापासून अगदीं अलिप्त ठेवतात. शाळेंतील कटकटीची व शिस्तीची त्याला बाधाहि होऊं देत नाहींत. पहिलीं तीन वर्षें त्याला किंडरगार्टनचे शाळेंत घालवावीं लागतात. नंतर त्याची प्राथमिक शाळेत रवानगी होते. जपानमध्यें ६००-६५० किंडरगार्टनच्या शाळा आहेत. या शाळांतून मुलांना अत्यंत ममतेनें वागवितात. तेथील वातावरण अगदीं घरासारखें असतें. मुलाला आपण घरींच आहोंत असें वाटावें म्हणून शक्य तों काळजी घेतली जाते. त्यामुळें अशा शाळांत जाण्यास मुलें फार राजी असतात.

जपानमध्यें प्राथमिक शिक्षणाच्या २६००० शाळा आहेत. यापैकीं सरकारी व खाजगी शाळा फारच थोड्या आहेत. बहुतेक सार्वजनिकच शाळा आहेत. जपानमध्यें प्राथमिक शाळांचे तीन विभाग आहेत. कांहीं शाळा साधारण प्रतीच्या असतात. कांहीं विशेष पुढारलेल्या असतात व कांहींमध्यें दोहोंचेंहि मिश्रण असतें. पहिल्या प्रकारच्या ११००० आहेत, दुसऱ्या

प्रकारच्या ३०० आहेत व तिसऱ्या प्रकारच्या बाकीच्या शाळा आहेत.

जपानमधील प्राथमिक शिक्षणाचें ध्येय किती उच्च प्रकारचें आहे, हें त्यांनीं प्रसिद्ध केलेल्या ध्येयावरून समजतें.

जपानी सरकार म्हणतें "मुलांच्या मनांत नैतिक व राष्ट्रीय भावनांचें बीज रुजावें, आयुष्यामध्यें त्यांनीं स्वावलंबी व्हावें म्हणून लागणाऱ्या ज्ञानाची व कर्तबगारीची प्राप्ती करवून द्यावी, व हे उद्देश साध्य करीत असतां त्यांच्या शरीराची योग्य काळजी घेतली जावी, हें प्राथमिक शिक्षणाचें ध्येय आहे."

प्राथमिक शाळांच्या सामान्य क्रमास सहा वर्षें लागतात व प्रत्येकाला हीं सहा वर्षें अवश्यमेव शिक्षणांत घालवावीं लागतात. पुढारलेल्या शिक्षणक्रमास दोनपासून तीन वर्षें लागतात व तो शिक्षणक्रम ऐच्छिक आहे. मुलाच्या वयाला सहावें वर्ष सुरु झालें म्हणजे त्यांनीं शिकण्याला सुरवात केली पाहिजेच व हें शिक्षण १४ व्या वर्षापर्यंत घेतलेंच पाहिजे अशी सक्ति असते. हा आठ वर्षांचा काळ शिक्षणाचा काळ समजण्यांत येतो. मुलांवर वडिलांनीं शिक्षणाचें ओझें ६ व्या वर्षाचे अगोदर टाकूं नये म्हणून विशेष खबरदारी घेतली जाते.

जपानमध्यें शाळेंत शिक्षण घेणारे शेंकडा ९८।९९ विद्यार्थी सांपडतात.

कोणताहि विद्यार्थी सक्तीच्या शिक्षणांतून सुटूं नये म्हणून सरकाराजवळ प्रत्येक मुलाचें नांव, वय वगैरे असतें व त्याला शाळेंत जाण्यास भाग पाडलें जातें. तसेंच प्रत्येक गांवावर मुलांच्या शिक्षणाची सोय करण्याची सक्ति असते व त्या गांवाला ही सोय करावी लागते.

जपानमध्यें सकाळीं ९ वाजतां शाळा सुरु होतात व ३ वाजतां बंद होतात. ही वेळ शेतकीच्या हंगामाचे वेळीं कमीजास्त होते. यावेळीं मुलांना कांहीं आठवडे सुट्टीहि देण्यांत येते. साधारणपणें मुलांना वर्षांतून दोन महिने सुट्टी मिळते.

जपानमध्यें कोणते विषय शिकवितात व प्रत्येक विषयाला किती वेळ दिला जातो हें आपण पाहूं. नैतिक शिक्षणाकडे जपानचें लक्ष विशेष असतें व त्याकरितां आठवड्यांतून २ तासांचा वेळ देतात. जपानी भाषेच्या शिक्षणाला १० तास देतात. गणिताला ५ तास असतात. जपानच्या इतिहासाला पांचव्या वर्षीं सुरवात होते व त्याकरितां फक्त दोनच तास ठेवतात. भूगोलहि पांचव्या वर्षींच सुरू होतो व त्यालाहि तितकाच वेळ असतो. शास्त्रीयविषय ४ थ्या वर्षीं सुरु होतो व त्यालाहि २ तासच असतात. ड्राइंग प्रथमपासून सुरू असतें व त्याकरितां एक तास असतो. गायन व व्यायाम यांना अनुक्रमें २ व ३ तास असतात. हे विषय प्रथमपासून अखेरपर्यंत शिकवितात. मुलींना शिवण काम शिकवितात व त्याकरितां २ किंवा ३ तास देतात. याखेरीज इंग्रजीसारखा विषय किंवा सुतारकाम, लोहारकाम वगैरे विषय असतात. ते ऐच्छिक असतात. शास्त्रीय शिक्षणाचे विषय निरनिराळे असतात. त्याकरितां पुस्तकांतून प्राणिशास्त्र, वनस्पतीशास्त्र, भूगर्भशास्त्र, पदार्थविज्ञानशास्त्र, रसायनशास्त्र, वगैरे धडे असतात. हे शास्त्रीय विषय उपयुक्ततेच्या दृष्टीनें शिकविण्यांत येतात. नुसत्या तात्त्विक भागाकडे ते लक्ष पुरवीत नाहींत.

प्रत्येक शाळेंत सहा वर्ग असतात. आणि प्रत्येक वर्गांत ७० मुलें असतात. ही संख्या अधिकाऱ्यांकडून विशेषप्रसंगीं १० नीं वाढवितां येते. एका शिक्षकाला या ७० मुलांना शिक्षण द्यावें लागतें. मुलांमुलींना एकत्र शिक्षण मिळतें. पहिल्या वर्गाला २१, दुसऱ्या वर्गाला २३, तिसऱ्याला २५, चवथ्याला २७, पांचव्याला २८ व सहाव्याला २८ तास, एका आठवड्यांतून शिक्षण मिळतें. मुलींना ४ थ्या वर्गापासून दोन तास अधिक बसावें लागतें.

जपानमध्यें शिक्षकांचे दोन वर्ग आहेत. एका वर्गाला ॲसिस्टंट टीचर व दुसऱ्या वर्गाला रेग्युलर टीचर म्हणतात. या दोघांनाहि ठराविक परीक्षा पास व्हाव्या लागतात. याशिवाय कांहीं बदली शिक्षक असतात. यांची नेमणूक प्रत्येक शाळेंतील मुख्य करतो. यांच्या पगाराचें ठराविक प्रमाण नसतें.

जपानमधील ॲसिस्टंट शिक्षकाला कमींत कमी ४५ रुपयें पगार असतो व जास्तींत जास्त ९० रुपये असतो. रेग्युलर टीचरला ६० पासून २७० पर्यंत असतो. योंच्यापैकीं कांहींचा पगार ३६० पर्यंतहि वाढवितात. शिक्षक ६० वे वर्षी नोकरींतून सुटतात. स्त्री शिक्षकांचाहि पगार, वर्गवारी वगैरे पुरुषांप्रमाणेंच असते.

पुढारलेल्या प्राथमिक शाळांचेहि दोन प्रकार आहेत. कांहींचा अभ्यासक्रम दोन वर्षांचा असतो व कांहींचा तीन वर्षांचा असतो. या अभ्यासक्रमास सुरवात करावयास मुलाला सामान्य प्राथमिक क्रम पुरा करावा लागतो.

या अभ्यासक्रमांतील विषय तेच असले तरी त्यांत विशेष प्राविण्य दाखवावें लागतें. ज्या शाळांचा अभ्यासक्रम तीन वर्षांचा असतो, तेथें तेंच विषय पूर्णपणें शिकविण्यांत येतात. परंतु अशा शाळा जपानमध्यें फार थोड्या आहेत. या शाळांचे दोन किंवा तीन वर्ग असतात. प्रत्येक वर्गात ६० मुलांचे वर मुलें असत नाहींत. हिंदुस्तानांत मात्र या बाबतींत आधिक पुढें पाऊल आहे यांत शंका नाहीं. येथील प्राथमिक शाळांत इतके विद्यार्थी नसतात. त्यामुळें इकडे विद्यार्थ्यांचें शिक्षण चांगलें होतें. असो. या शाळेंत विद्यार्थ्यांना व शिक्षकांना आठवड्यांतून २४ तासांचे वर काम नसतें. खालच्या शाळेंतील शिक्षकांना या वरील शाळेंत शिक्षकाचें काम करूं देत नाहींत. मात्र या शिक्षकांना खालीं काम करूं देतात. येथील शिक्षकांचे पगार खालच्या शिक्षकापेक्षां थोडे आधिक असतात. या शाळांत खर्चहि आधिक येतो.

अशी एकंदर जपानमधील प्राथमिक शिक्षणाची हकीकत आहे. तुलनात्मक दृष्टीनें कांहीं गुण व कांहीं दोष या पद्धतींत आहेत. परंतु आपलेकडील प्राथमिक शाळांपेक्षां या शाळांची स्थिति अत्यंत समाधानकारक आहे असेंच यावरून दिसून येतें.

चौथ्या इयत्तेकरितां ! केवळ चौथ्या इयत्तेकरितां ! !

## सुधारून वाढविलेली दुसरी आवृत्ति.

एकाच प्रतीस ८४८६ चीं तिकिटें पाठवावीं. ] **प्रश्नगुच्छ** [ घाऊक मागणीस ट. खर्ची. पी. खर्च माफ, शिवाय कमिशन.

या पुस्तकांत चौथ्या इयत्तेच्या—अंकगणित विषयक—वार्षिक परिक्षेचे ( ५ जिल्ह्यांचे, १६ वर्षांचे ) प्रश्न; त्यांचें सुलभ पृथक्करण आणि भूवर्णनात्मक परिशिष्ट असल्यानें त्वरित मागणी करून तुमच्या विद्यार्थ्यांची या दोन विषयांत कितपत तयारी झाली आहे हें वार्षिक परीक्षेपूर्वींच पहा. कागद छपाई व बांधणी उत्तम आहे. लिहाच पत्र !

पांडुरंग रामचंद्र चांडवले, शा. नं. १ बेळगांव.

# सवतीचा गोंद्या.

## दोन अंकी नाटक.

( लेखकः—एक समाजनिरीक्षक. )

( स्थळ—दादासाहेब पो. इन्स्पेक्टर ह्यांचें घर )

त्यांच्या पत्नी बाईसाहेब वय वर्षे २२ व त्यांचा सावत्र मुलगा गोंद्या वय वर्षे १६

**बाईसाहेब**—( अत्यंत संतापानें ) थांब मेल्या, तिकडचं येणं होऊं दे म्हणजे चांगली तुझी हड्डी नरम करवतें. कांहीं मेल्याला धाकच नाहीं. केवढा एरंड वाढला आहे, पण कांहीं अक्कल असेल तर शपथ! आतांशा कोठें ४।५ बुकं इंग्रजी का फिंग्रजी कायसं शिकूं लागला, तों लागला दाखवायाला बडेजाव. पण माझ्या पुढें नाहीं हो, अशा गमजा चालायच्या; सांगून ठेवतें. तिकडचा लाडका असलास म्हणून मला नाहीं खपायचे असले वेडचार. काय म्हणे आई मेली म्हणून करून ठेवलं लाडकं! मेली असेल, जगांत जसं कांहीं आईवांचून पोरं नाहींतच. जन्माला पुरेल आई! मेलं माझी आई मरून १२ वर्षे झालीं, पण आम्हांला नाहीं ठाऊक असे भिकार लाड! मागें हें सुगुणी बाळ ठेवून गेल्या! लोकांभोंवती जंजाळ! त्यापेक्षां नसतं तर काय जहागीर बुडणार होती! ऐकतो पहा कसा मेला, कान देऊन.

**गोविंद** ( डोळ्यांत आंसवे आणून )—आई, काग एवढी रागावतेस! मी काय केलं बरं! आज पर्वणी म्हणून स्नानाला गेलों होतों, तों तेथें खरे ह्यांचा बाळू बुडत होता, त्या गर्दीमुळें थोडा उशीर झाला एवढेंच.

**बाईसाहेब**—आणखी बोलतो कसा मेला चरचर! म्हणे बाळू बुडत होता. अन् तूं कशाला राहिलास, तिकडंच नाहीं काळं केलेंस! आज चार दिवस झाले फिरतीवर जाणं झालं नाहीं, तोंच जसं मेल्यानं भंडावून सोडलं! ढोंग काय करतोन् सबबी काय सांगतोय, कमाल आहे लबाडीची.

( इतक्यांत दादासाहेब खेड्यावरून उन्हांतून आले व घोड्यावरून खालीं उतरून आंत येतात, त्यांस पाहून रडत रडत म्हणतात )

उलटा जबाब काय देतोन् टाकून काय बोलतोन् दांत ओठ काय खातोन्, नाहीं त्या तऱ्हा करतो. इतकेंही सोसलं तरी पुनः सावत्र तो सावत्रच कीं नाहीं!

**दादासाहेब** ( त्रासून व संतापून )—अग, काय झालं तरी काय? त्रास आला बोवा तुमचा ह्या कटकटीचा! घरांत पाऊल टाकलं ना टाकलं तों तुमची आपली ही रोज कटकट आहेच.

**बाईसाहेब**—कशाला ठेवतां कटकट. मला ह्या एकदांची लावून म्हणजे सुटलं. आपल्या गोंद्याचे गुण थोडेच दिसणार! समक्ष तर कसा साळसूद दिसतो. पुढें पुढें लोचटपणा करतो, तो गोड वाटतो. मागें आईला लाथा मारतो हें कुठं दिसतय्. पुनः सांगायाची चोरी! स्वतःच्या डोक्यावर मिरीं वाटील तेव्हां कळतील बाळ्याचे गुण. अशी कशी मेली नोकरी, महिन्यांतून ४ दिवस देखील घरीं राहणं नाहीं. मग कोठून दिसणार त्याचे गुण? मला तर अगदीं विट्ट आला आहे.

**दादासाहेब**—अग, पण काय झालं तरी काय इतकं तोंड करायला?

**बाईसाहेब**—वेड लागलं मला. बोललं म्हणजे तोंड दिसतं! इकडचं जाणं झालं—पाठ फिरावयाचा अवकाश होता—तों घातलं अंथरूण, काय म्हणे ताप येतो, डोकं दुखतें, ढोंग नी दुसरं काय? चार दिवस सखू मोलकरीण विचारून गेली, म्हणून म्हटलं तेवढं उष्ट

सावर, तर तें झालं नाहीं. धोतराचा एक पिळा तो काय? पण तो पिळायला जसा हात मोडतो! तापामुळें म्हणे अन्न धकत नाहीं, अन् मेल्याला त्या यमूचा घरचा चहा न् बिस्किटं कशीं गोड लागतात! घटकाभर छबीला झोंका लोट म्हटलं तर रिकामपण नाहीं. असं किती सांगू? बोललं म्हणजे तोंड दिसतं, पण ह्या बाळ्याच्या कृती कोठें दिसतात!

**दादासाहेब** ( संतापून ):—कायरे, ए, कारट्या, तुला सांगावं तरी किती! हिच्या अर्ध्या वचनांत रहा म्हणून हजारदां सांगितलं. मरतेवेळीं, 'अंतर देणार नाहीं' असं वचन दिलं. तशांत पोर, लोक म्हणतील 'पहा, दुसऱ्या बायकोच्या नादानं पोराचा छळ करतात म्हणून कानाडोळा करीत आलों. तों जास्तच, पण कमी नाहीं ( एक थोबाडींत मारून— ) सांगितलेलें ऐकलें असतं तर मेला असतास काय? बोल ( पुनः मारून ) बोलत कां नाहींस?

**गोंदू**—दादा, नका हो मारूं. मी कांहीं नाहीं केलं बरं! ( पायां पडूं लागतो ) आईला काय वाटतं न कळे. मी कधीं उलटून बोलत नाहीं कीं अवज्ञा करीत नाहीं ( रडूं लागतो. )

**बाईसाहेब**:—झालं, असं पायां पडलं आणि गया-वया केलं म्हणजे झालं. इकडे काय? सांभाचा अवतार! काय म्हणे 'आईला काय वाटतं न कळे' आईला वाटतं तूं मरावं असंच नाहीं रे? सांग, सांग दोनचे चार करून—रडून तर जिरवलं आजपर्यंत. आणखी सांगूं का आपण काय गुण उधळले ते?

(गोंदू आश्चर्ययुक्त व भीतिग्रस्त होऊन पाहूं लागतो.)

**दादासा०**—काय, आणखी काय आहे? सांग पाहूं?

**बाईसाहेब**:—कशाला सांग. इकडे खरं वाटेल तर किनई? मेली घरामध्यें अब्रू जायची वेळ आली तरी कानाडोळाच करावा!

**दादासाहेब**:—( आश्चर्यानें )—म्हणजे!

**बाईसाहेब**:—अहो हें मेलं कालचें पोरना? नुकतीं कुठं मिसरूटही फुटली नाहीं, तोंच पोरीची चेष्टा करतो कीं! आपली रंगू ( बाई साहेबांची भाची १२।१३ वर्षांची पोर ) नाहीं का? तिला नाहीं नाहीं तेंच विचारूं लागला! ( रंगूकडे डोळे वटारून बोलूं नकोस म्हणून खुणावतात )

**दादासाहेब**:—अरेरे! ह्या कार्ट्यानें तर ताळच सोडला! ( असें म्हणून मारूं लागतात )

**गोंदु**:—दादा, नाहीं हो नाहीं. अगदीं खोटें, हें निव्वळ कुभांड आहे. ( रडत रडत ) ही कांहीं तरी सांगते, मी असं कधीं स्वप्नांत करणार नाहीं.

**दादासाहेब**:—नीच—हरामखोरा, तूं खरान् ती खोटी काय! आजपर्यंत तुझे शेंकडों अपराध पोटांत घातले. पण आतां तूं कळस केलास. उद्यां तूं माझ्या तोंडास काळोखी लावणार. चल नीघ, आतां नीघ, क्षणभर माझ्या डोळ्यांसमोर उभा राहूं नकोस. कर काळं एथून. ( असें म्हणून धक्के मारून हांकून देतात)

## प्रवेश २

( बापूसाहेब परांजपे ह्यांचा वाडा बापूसाहेब, त्यांच्या पत्नी सावित्रीबाई, मुलगी यमूताई, गोंदूचा सहाध्यायी विनू बसले आहेत. )

**बापूसाहेब**:—कायरे विनू, गोंदू कांहीं २।४ दिवसांत दिसला नाहीं!

**विनू**:—बापू, आतांच यमूताई म्हणत होती कीं, तो आजारी आहे म्हणून.

**यमू**:—होय, पण तो आज सकाळीं शाळेंत होता. बापू, त्याचे फार हाल होतात कीं हो. आईनें सांगितलें म्हणून मी परवां त्याच्या समाचारास गेलें होतें. तापानें पडला होता. दादासाहेब कोठें कामगिरीवर गेले होते. त्याला ना औषध; ना पाणी. ताजें खाणं देखील नाहीं!!

**बापू**:—मग त्याला आपल्याकडे आणावं किनई?

**सावित्रीबाई**—परवां तर कांहीं त्याला येववेना पण काल दोन वेळां आला होता. कोयनेलच्या गोळ्या वगैरे दिल्या व फराळाचंही घातलं.

**बापूसाहेबः**—ठीक. आज सुट्टी आहे, तो कदाचित् येईलही.

( इतक्यांत गोंदूला घेऊन त्याचे १।२ सोबती येतात. )

**बापूसाहेबः**—ये, गोंदू, तुझी आतांच आठवण केली होती. पण आतां तुला बरं वाटतं ना? ( तोंडाकडे पाहून ) अरे, पण तूं असा खिन्न का? अरे, रडतोस कां पण ? आई कांहीं बोलली वाटतं !

**हरीः**—( गोंदूचा सोबती ) आज काय, अखेरीच झाली ! दादासाहेबांनीं बाईसाहेबांचें ऐकून गोंदूला यथेच्छ बडवून हांकून कीं दिलें ! !

**सावित्रीबाईः**—काय हो, मेली द्वाड ती ! पाहूं बाळ, कांहीं लागलं का कोठें ?

( अंग उघडें करून पाहतात तों वळ उठलेले दिसतात. )

**बापूसाहेबः**—अरे, इतकं झालं तरी काय ? तूं कांहीं कमजास्त करणार नाहींस, अशी खात्री आहे.

**त्र्यंबकः**—( दुसरा सोबती )—स्नानाहून घरीं जाण्यास थोडा उशीर झाला; त्या निमित्तानें झाला बाईसाहेबांचा पट्टा सुरू ! तितक्यांत दादासाहेब उन्हांतून खेड्यावरून उपाशींच आले; तों घरांत ही कटकट ! बाईसाहेबांनीं सांगितलें एकाचे दोन-मग काय ? आज गोंदूच घरं सुटलं ! !

**गोंदूः**—घर सुटल्याचं कांहीं दुःख नाहीं. ते केव्हां तरी सुटणारंच होतं; पण शेवट कांहीं बरा झाला नाहीं ! नसतं कुभांड रचून मला दोष लावला ह्याचं फार वाईट वाटतं दुसरं कांहीं नाहीं.

**बापूसाहेबः**—कसं काय ! कशाचा दोष ?

**हरीः**—तें न बोलावं हेंच बरं

**सावित्रीबाईः**—का बरं ! अशी काय त्यानें कोणाची चोरी केली कीं काय ?

**त्र्यंबकः**—अहो, ती बाईसाहेबांची भाची नाहीं का रंगू, कां कोण ती ? तिच्याजवळ कोठें गोंदूनें, बाईसाहेब नाहींत असें पाहून कांहीं खायला मागितलं होतं. तें कोठें त्यांनीं आडून पाहिलं वाटतं आणि त्यावर दिलं वेडंवाकडं कुभांड रचून !

**यमूः**—काय बाई, नाहीं तेंच.

**सावित्रीबाईः**—किती पण हा नीचपणा. असो; गोंदू, तूं आतां आमच्याकडेच रहा. तुझी सगळी व्यवस्था आम्ही ठेवूं.

**गोंदूः**—नको, नको. माझ्याकरितां तुम्हांला त्रास नको. आमच्या आईसाहेब नसतीं कुलंगडीं काढतील व तुम्हांस त्रास होईल.

**बापूसा०**—मग तूं जाणार तरी कोठें ?

**गोंदूः**—मला देखील मोठा विचार पडला आहे. मामाकडे जावं म्हणतों, तर आगींतून निघून फोफाट्यांत पडायचा ! मावशीकडे सगळी सोय उत्तम आहे, पण तेथें इंग्लिश शाळा नाहीं ! माझ्या मनांत पुण्यास कोठें आश्रय मिळाला तर पहावा, असें आहे. तेथें माझ्या ओळखीचे एक शिक्षक आहेत; ते एथें पूर्वी होते. त्यांचा मजवर फार लोभ आहे. राहण्याची, पुस्तकें वगैरेंची सोय लागेल पण—

**बापूसाहेबः**—बरं, जरा थांब. पुण्यास एक माझे स्नेही आहेत. त्यांना मी पत्र पाठवून पाहतों. म्हणजे तुझी व्यवस्था लागेल.

### प्रवेश ३ रा.

[ पुणें—हायस्कूल. हेड्मास्तर, गोंदू व एक सभ्य-गृहस्थ ( कृष्णराव वकील. ) ]

**गोंदूः**—( नमस्कार करून ) सर, कृपा करून मला वर्गांत दाखल करावें. मी निराश्रित आहें. ५ व्या इयत्तेंत नुकताच गेलों होतों. शिकण्याची फार इच्छा आहे. कसेंही करून—

**हेडमास्तर**—( अधिकारयुक्त वाणीनें ) गरीब मुलांकरितां इंग्लिश शाळा नाहींत. जा, कोठें तरी १०।५ रु. ची चाकरी पहा. कोणा कोणा गरीब मुलांची सोय लावावी.

**कृष्णराव वकीलः**—मध्येंच बोलतों, ह्याची माफी असावी. मुलगा होतकरू पण गरीब आहे, कृपा करून दाखल करावा. जन्मभर नांव घेईल.

**हेडमास्तर**—अहो, पण सवडच कोठें आहे ?

मुलांची संख्या लिमिट केलेली, पूर्ण भरती होऊन गेली आहे. आम्ही तरी काय करावें! त्यांतून ब्राह्मणाचा मुलगा! तूर्त तर कांहीं उपाय नाहीं, परीक्षेनंतर पाहूं.

**गोंदू** ( हेडमास्तरांचे पाय धरून )—सर, असं करूं नका. मी चांगला अभ्यास करीन, सांगाल तसं वागेन ( डोळ्यांत पाणी आणतो हें पाहून हेड मास्तरांसही वाईट वाटतें. )

**हेडमास्तर**—आपण कोण? कोठें असतां? ह्या मुलाचें आणि आपलं काय नातं?

**कृष्णराव**—मी एथें एक वकील आहें. आपण एथें नुकतेंच आला असल्यानें परिचय नाहीं.

**हेडमास्तर**—( गोंदूस म्हणतात ) मुला, ह्यांची ओळख करून दे पाहूं.

**गोंदू**:—हे कृष्णराव आपटे वकील——पेठेंत हौदा-जवळ असतात. म्युनिसिपालिटींत कौन्सिलर आहेत.

**हेडमास्तर**—ठीक, ठीक; आलं लक्षांत. ( कृष्ण-रावकडे पाहून ) आपला ह्याचा काय संबंध?

**कृष्णराव**—कांहीं नाहीं. अनाथ पण हुषार मुलगा म्हणून स्नेहाच्या शिफारशीवरून त्यास आश्रय देण्याचें ठरविलें आहे. कृपा करून फ्री घ्याल तर—

**हेडमास्तर** ( सौजन्यपूर्वक )—फ्री तर कांहीं घेता येणार नाहीं, पण परीक्षेनंतर हॉफ्-फ्री घेण्याची व्यवस्था ——अभ्यास व वर्तन पाहून—करूं. ( इतक्यांत शिपाई टेबलावर कागद ठेवून सलाम करून उभा राहतो. )

**हेडमास्तर**—मिस्टर कृष्णराव, मुलाचा योग बरा दिसतो. आतांच हीं २।३ लीव्हिंग सर्टिफिकीटें जात आहेत. येत्या १ त्या तारखेस दाखल करतां येईल. ( गोंदूस म्हणतात )—अभ्यास चांगला करीत जा हो. वेड्या वांकड्या संगतींत राहूं नकोस. कृष्णरावांचा आश्रय कायम राहील व त्यांना यश मिळेल असें कर. ( कृष्णरावाकडे पाहून म्हणतात. ) मुलाचे पालक म्हणून, आपण शिस्तीच्या नियमांच्या कागदावर सही करतां काय?

**कृष्णराव**:—होय.

**हेडमास्तर**—मुलास वडील नाहींत काय?

**कृष्णराव**—( रागाचा आविर्भाव झांकून ) आहेत. पण फार दूर आहेत! मुलावर लक्ष असावें. एवढीच विनंती. बरें, तर येतों आतां!

( नमस्कार करून जातात. )

### प्रवेश ४

[ बापूसाहेब परांजपे ह्यांचें घर. ]

**बापू**—ऐकलंस का? गोंदू प्रवेश-परीक्षेंत पास होऊन त्यास जगन्नाथ शंकरशेटची स्कालरशिप मिळाली म्हणतात.

**सावित्रीबाई**—खरं काय? चांगलं झालं. मुलगा हुषार खरा. ती मेली मोठी द्वाड, तिला पाहवलं नाहीं!

**बापू**—एकदां कॉलेज-कोर्स झाला म्हणजे उमेच्या वचनांतून मुक्त झालों "गोंदूकडे लक्ष असूं द्या बरं. तिकडे दुसरं लग्न केलं म्हणजे माझ्या गोंदूचे हाल होतील. तुमच्या अंगीं लावला आहे असं म्हणून तिनं देह ठेवला" काय घडेल तें खरं.

**सावित्रीबाई**—होईल. मूल गुणी आहे. पण—इकडे कळलंच असेल! दादासाहेबांवर कांहीं बालंट आलं आहे म्हणतात खुनाच्या खटल्यांत—

**बापू**—अग, ह्या गोष्टी सध्यां बोलूं नयेत. मला माहित नाहीं, असं नाहीं. त्यांचं कुटुंब सत्यभामाबाई काल आल्या होत्या. खटला चालविण्यास पैसा नाहीं, जामीन मिळत नाहीं. तुम्ही धर्माचे भाऊ आहांत, वगैरे वगैरे कांहीं म्हणत होत्या; असो. आपल्याकडून मुका-ट्यानें कांहीं झालं तर पहावं, पण बोलायची वेळ नाहीं.

**सावित्रीबाई**—आतां आठवतील धर्माचे भाऊ! असो. पण आतां पुढं आपल्या यमूचं कसं काय? तिचं मराठी शिक्षण पुरं होऊन इंग्रजी ३ यत्ता झाल्या. परवांच तिची परीक्षा झाली, म्हणते.

**बापू**—मला वाटतं, आतां तिचं शाळेतलं शिक्षण पुरं करावं. पुढं आतां घरींच त्या विनायकरावाकडून

शिक्षण द्यावं म्हणतों. बरा आहे सभ्य व कुटुंबवत्सल गृहस्थ.

**सावित्रीबाई**—कांहीं वाईट नाहीं. पुरं झालं कामा पुरतं. तसं तिला लिहितां वाचतां चांगलं येतं. सैपाक चांगला करते. कामांत स्वच्छता, टापटीप वरी असते. घरच्या घरींच कांहीं होईल तर होईल. पुढें सासरीं गेल्यावर वाढेल, झाली सवड तर.

**बापू**—त्याचं आज काय ? मनासारखं स्थळ मिळेपर्यंत कांहीं तिचं लग्न करायचं नाहीं; एवढं खरं.

**सावित्रीबाई**:—स्थळ कांहीं लांब शोधायला नको. पण--असो. येईल ओघा--ओघानें तेव्हां सांगेन. मी जातें आतां तिकडे पाटपाणी कांहीं पाहतें. ( असें म्हणून जातात. )

**अंक पहिला समाप्त.**

---

# प्रामाणिक मुलगा.

आमची शाळा एका खेडेगांवांत होती. हें खेडेगांव ऊंच व हवाशीर अशा एका डोंगरावर होतें. आमच्या गांवचें पाणी फार उत्तम म्हणून चहूंकडे ख्याति होती. भर उन्हाळ्याचे दिवसांत इतर ठिकाणीं कितीहि उकडत असलें तरी आमचे गांवीं अगदीं थंड वाटत असे. त्यामुळें या गांवीं पुष्कळ श्रीमंत राजेरजवाड्यांची व अधिकाऱ्यांची उन्हाळ्यांत गर्दी होई. आमची शाळा जरी खेडेगांवांत होती, तरी त्या शाळेंत पुष्कळ श्रीमंतांचीं मुलें येऊन रहात असत व शिकत असत. कारण आमच्या शाळेंत राहण्याचीही व्यवस्था होती. ही शाळा खेडेगांवची असली, तरी तिची व्यवस्था, शाळेची इमारत वगैरे शहरालाही लाजवील अशी होती. आमच्या शाळेची वेळ सकाळीं ९ वाजण्याची होती. शाळा ज्या गांवीं होती तें गांव जरी वर्षांतून ९ महिने खेड्यासारखें भासलें, तरी बाकीचे ३ महिने तेथें अतोनात गर्दी होई. त्यामुळें ते तीन महिने आमचे गांव शहरांसारखें भासे. या गांवांत एक मुंबईचे प्रसिद्ध व्यापारी हवा खावयास येऊन राहिले होते. ते व्यापारी असल्यामुळें त्यांची नेहमीं उलाढाल चालू असे. त्यांची दररोज हजारोंची घडामोड होई. त्या शाळेच्या इमारतीवरून त्यांची चौचाकी गाडी दररोज जाई. त्यामुळें शाळेंतील विद्यार्थ्यांना या गृहस्थांची चांगलीच माहिती होती आणि चौकस बुद्धीच्या विद्यार्थ्यांना कोणाची माहिती नसते ! मुलांचा स्वभाव जात्याच जिज्ञासू असल्यामुळें ते सर्वांना ओळखत. असो; तेव्हां वरील शेटजी नित्याप्रमाणें आपल्या बंगल्यांतून बरोबर ५०००० रुपयांच्या नोटा घेऊन बँकेंत जावयास निघाले. त्यांना या नोटा बँकेंत टाकावयाच्या होत्या. ते आपल्या गाडींतून निघून बँकेजवळ जाऊन उभे राहिले. बँकेच्या मॅनेजरची व त्यांची ओळख असल्यामुळें मॅनेजरनें त्यांचें आगतस्वागत करून त्यांना खुर्ची बसावयास दिली. शेटजी म्हणाले, मला आज ५०००० रुपये बँकेंत ठेवावयाचे आहेत म्हणून मी आलों आहें. मॅनेजरनें पुस्तक वगैरे काढून पैसे जमा करण्याकरितां त्यांच्याजवळ पैसे मागितले. परंतु शेटजींनीं खिशांत हात घातला तों काय, त्यांना पैसे बिलकूल आढळले नाहींत. त्यामुळें त्यांच्या काळजांत धस्स झालें. मनुष्य श्रीमंत झाला

म्हणून त्याला पैशाची किंमत नसते असें थोडेंच आहे. उलट श्रीमंत माणसालाच पैशाचें अधिक वेड असतें. त्यांनीं खिसा तपासला, गाडी तपासली, गाडीवानाला विचारलें, तरी नोटांचा पत्ता लागेना. शेवटीं त्यांनीं झालेली हकीगत मॅनेजरला सांगून त्याचा निरोप घेतला. बिचाऱ्या मॅनेजरलाहि या प्रकारानें फार वाईट वाटलें.

शेटजी घरीं आले व त्यांनीं सारें घर शोधलें. दिवाणजीला विचारलें, गड्यामाणसाजवळ विचारपूस केली; पण पैशाचा पत्ता नाहीं. त्यांनीं तावडतोब पोलीसाकडे वर्दी दिली आणि कांहीं चाकरांना रस्त्यांत नोटा पडल्या कीं काय, हें पहावयास पाठविलें.

त्या दिवसापासून शेटजींना अन्नपाणी गोड लागेना. सकाळ, दुपार, संध्याकाळ सारखा त्या नोटांचा विचार चालू असे. त्यांची दिवसभर सारखी चहूंकडे ये जा सुरू झाली. अशी स्थिति इकडे चालू असतां दुसरीकडे काय प्रकार चालला होता, तो आपण पाहूं.

शरदचें वय १४ वर्षांचें होतें. तो नुकताच इंग्रजी ५ वींत गेला होता. शरद घरचा अगदीं गरीब मुलगा होता. त्याची आई विधवा असून ती कोठें तरी कामधंदा करून पोटाला मिळवून खाई व मुलाला शिक्षणहि देई. शरद फार हुशार विद्यार्थी असल्यामुळें त्याच्यावर साऱ्या शिक्षकांची वहाल मर्जी असे. त्यामुळें त्याच्या आईला समाधान वाटे. शरदला शिष्यवृत्ति बक्षिसें वगैरे वारंवार मिळत; आणि अशा रीतीनें त्याच्या आईवरचा शिक्षणाचाहि बोजा थोडा हलका होई.

आज शरद सकाळीं नित्याप्रमाणें शाळेंत जात असतां त्याला निवडुंगाच्या फडामध्यें एका रुमालांत गुंडाळलेलें लहानसें गांठोडें सांपडलें. त्यानें तें गांठोडें मोठ्या औत्सुक्यानें उचललें व शाळेची वेळ होत आली असल्यामुळें गांठोडें सोडून न पहातां तसेंच दप्तरांत बांधून शाळेचा रस्ता सुधारला. पण शाळेंत गेल्यावर त्याचें लक्ष अभ्यासाकडे बिलकूल लागलें नाहीं. त्या गाठोड्यांत काय आहे हें आपण केव्हां पाहूं असें त्याला होऊन गेलें. मास्तरांच्या लक्षांत त्याची ही चलबिचल आल्याशिवाय राहिली नाहीं. तथापि त्यांनीं त्याच्याकडे फारसें लक्ष दिलें नाहीं. शाळा सुटतां क्षणींच शरद घरीं गेला. त्याची आई त्या वेळीं बाहेर कामधंद्याला जात असल्यामुळें घरांत कोणीच नव्हतें. त्यानें दार लावून घेतलें आणि दप्तर सोडून तें गांठोडें बाहेर काढलें. गांठोडें सोडतांच त्याला नोटा दिसल्या. त्या नोटा पांच दहा रुपयांच्या नोटांपेक्षां फार वेगळ्या असल्यामुळें या कशाच्या नोटा आहेत हें त्याला समजेना. त्यामुळें त्यानें त्यावरील अक्षरें वाचलीं, व त्याला प्रत्येक नोट हजाराची आहे असें आढळलें. त्यानें साऱ्या नोटा मोजल्या. नोटा पन्नास होत्या. पन्नास हजारांच्या नोटा आपल्याजवळ आल्यामुळें शरदचा आनंद गगनांत मावेना. आपण आजपासून आपल्या दारिद्र्यांतून कायमचे सुटूं व आपल्या आईचें पांग फेडूं असें त्याला वाटलें. पण लागलाच या नोटा आपल्या हातीं आल्या असल्या तरी आपल्या नाहींत हें त्याच्या लक्षांत आलें. ज्याच्या ह्या नोटा गमावल्या असतील त्याला या योगानें किती वाईट वाटलें असेल याचा तो विचार करूं लागला. दारिद्र्याचा विचार मनांत आला कीं, त्याला वाटे ठेवून घ्याव्यात या नोटा. पण आपल्याजवळ या कोठून आल्या, असें एखाद्यानें विचारलें तर लोक आपल्याला चोर म्हणतील, आपली तुरुंगांत रवानगी होईल, आपण आपल्या कुटुंबाला काळीमा फासूं इत्यादि विचार पुनः त्याच्या मनांत येऊं लागले. आई जवळ, किंवा कोणाजवळ नोटा ठेवल्या तर? छे, पण असें करणें ठीक नाहीं, असें तो स्वतःला, पुनः पुनः बजावूं लागला. त्या रात्रीं त्याला जेवण गेलें नाहीं. विचाराचा सारखा मारा त्याच्यावर होत होता. रात्रीच्या दोन वाजतां तो पुनः उठला आणि विचार करूं लागला. त्याच्या मनांत सारखा झगडा चालू होता. काय करावें, आणि काय करूं नये. हें त्याला समजेना. त्याचें डोकें भयंकर दुखूं लागलें सारी रात

त्याच्या डोळ्याला डोळा नव्हता. सकाळीं तोच विचार पुनः चालूं. त्या दिवशीं तो शाळेंत जाऊं शकला नाहीं. त्याला ताप आला. आईहि घाबरली. अखेर चार वाजण्याच्या सुमारास त्यानें निश्चय केला. ज्याच्या नोटा त्याला देऊन टाकण्याचें त्यांनीं ठरविलें. त्याबरोबर त्याचा ताप उतरला. त्याला घाम सुटला. त्याच्या तोंडावर विलक्षण तेज चमकूं लागलें. सत्याचा विजय झाला व पापाचा पराभव झाला.

त्यानें नोटाचें पुडकें सोडलें. नोटावर त्या शेटजींचें नांव होतें. शरदनीं दुसऱ्या दिवशीं नोटा परत करण्याचा निश्चय केला.

नोटा गेलेल्याला आज दोन दिवस झाले होते. शेटजींना जवळजवळ वेड लागल्यामुळें ते त्या रस्त्यानें सारखे जात येत. तिसऱ्या दिवशीं शरद त्यांच्या गाडीची वाट पहात होता. गाडी येतांच त्यानें चटकन् गाडींत उडी मारली व ' शेटजी, घ्या तुमच्या या नोटा,' असें म्हणून त्यानें त्याच पावलीं धूम ठोकली. एकाएकीं नोटा हातीं आल्यामुळें शेटजी अत्यंत आश्चर्यचकित झाले या गडबडींत त्यांना कोणी नोटा आणून दिल्या वगैरे भान राहिलें नाहीं. बऱ्याच अंतरावर गेल्यावर ते शुद्धीवर आले व गाडीवाल्याला गाडी थांबविण्यास सांगूं लागले. परंतु गाडी थांबली तरी त्यांना कोणीच दिसेना. त्यामुळें त्यांची निराशा झाली. एका मुलानें या नोटा आणून दिल्या एवढी मात्र अंधुक स्मृति त्यांना होती. मुलानें नोटा आणून दिलेल्या पहातांच त्यांना आपल्याच चुकीनें नोटा बाहेर पडल्या असें वाटूं लागले.

तसेच ते शाळेंत गेले. हेडमास्तरला भेटले व त्यांना झालेला प्रकार सांगितला. ज्या मुलानें आपल्याला या नोटा आणून दिल्या त्याला आपण एक हजार रुपये देऊं इच्छितों, असें ते म्हणावयास विसरले नाहींत. मास्तरनीं नोटीस लिहून साऱ्या शाळेंत फिरवली; परंतु कोणी मुलगा पुढें आला नाहीं. परंतु शेटजींना त्या नोटा आणून देणारा विद्यार्थी या शाळेंतलाच असावा असें खात्रीनें वाटत होतें. त्यामुळें ते हेडमास्तर बरोबर साऱ्या शाळेंत हिंडावयास निघाले. त्यांनीं प्रत्येकाजवळ जाऊन विचारपूस केली. ते जेव्हां शरदजवळ आले तेव्हां त्याची स्थिति फारच चमत्कारिक झाली. त्यानें नाहीं म्हटलें परंतु त्याचा चेहरा गोरामोरा झाला. त्याबरोबर हेडमास्तरांनीं व शेटजींनीं याच मुलानें ह्या नोटा आणून दिल्या असाव्यात असा तर्क केला. मास्तरनांहि असेंच वाटलें. कारण शरद प्रामाणिक मुलगा होता आणि त्याची पहिल्या दिवसाची चलबिचल व दुसऱ्या दिवसाचे घरीं रहाणें यावरून मास्तरनींहि तोच तर्क बांधला. शरदला ऑफिसमध्यें बोलावलें व तुला बक्षीस देऊं, खरें सांग असें अभय देण्यांत आलें. शरदला आतां खोटें बोलवेना. त्यानें झालेली हकीगत प्रथमपासून सांगितली. आपल्या मनाची झालेली स्थिति सांगावयास तो विसरला नाहीं. ही सगळी हकीगत ऐकून शेटजींना त्या मुलाबद्दल धन्यता वाटली व त्याच्या प्रामाणिकपणाबद्दल त्यांनीं त्याला एक हजाराच्या ऐवजीं दहा हजार रुपये दिले व आईला बोलावून आणून ती रक्कम मुलाच्या नावानें बँकेंत ठेऊन दिली. शेटजी, त्या वेळीं ज्या शाळेंत अशी मुलें निर्माण होतात, त्या शाळेला देणगी द्यावयास विसरले नाहींत. त्यांनीं हेडमास्तरच्या स्वाधीन दहा हजार रुपये करून त्या शाळेबद्दल अत्यंत अभिमान प्रगट केला. ही बातमी दुसरे दिवशीं साऱ्या वर्तमान पत्रांत प्रसिद्ध होऊन शरदची, शेटजींची व शाळेची जिकडे तिकडे वहावा झाली. प्रामाणिक मुलगा अशा रीतीनें स्वतःला, शाळेला व देशाला भूषण होत असतो.

---


# अभिनव काव्यमाला भाग ३

या पुस्तकाची दुसरी आवृत्ति छापून विक्रीस तयार आहे, किं. १ रु. ट. ह. व व्ही. पी. खर्च निराळा.

म्यानेजर-चित्रशाळा प्रेस, पुणें.

# झोंपडींत वाढलेला मुलगा.

गरीब मुलें नेहमीं झोंपडींतच वाढतात व झोपडींतच मरतात, त्यांची कोणी काळजी बाळगत नाहीं. ज्या झोंपडींत वाढलेल्या मुलांविषयीं आम्ही लिहीणार आहों, तो मुलगा अलौकिक बुद्धिमान व



अलेक्झांडर पेटोफी.

कर्तृत्ववान होता. त्या मुलाची आज साऱ्या युरोपभर वहावा होते. या मुलाचें नांव ॲलेक्झांडर पेटोफी असें होतें. या मुलानें २६ वर्षांच्या आंत आपला अवतार आटोपला; परंतु एवढ्या अवधींत त्यानें आपली कीर्ति चहूंकडे फैलावली.

पेटोफीचा जन्म हंगेरीमध्यें झाला. याचा बाप खाटिक होता. त्याच्या बापाला स्वतःच्या धंद्याबद्दल अत्यंत अभिमान वाटत असे. आपल्या मुलानें आपला पिढीजात धंदा चालू ठेवावा अशी त्याची इच्छा होती. परंतु चिरंजीवांनीं मात्र वडिलांची इच्छा तृप्त केली नाहीं.

लहानपणीं पेटोफी अगदीं हडकुळा होता, आणि त्याची शरीरयष्टी अखेरपर्यंत तशीच राहिली. लहानपणीं त्याला शाळेंत घातलें गेलें. तो शाळेच्या अभ्यासाकडे फारसें लक्ष देत नसे. त्यानें वाचना-



पेटोफी जन्मलेली झोंपडी.

करितां स्वतः पुस्तकें निवडावीं आणि निरनिराळ्या प्रकारचें वाचन चालू ठेवावें.

त्याचा बाप कांहींसा तिरसट असे; परंतु मुलगाहि अगदीं गरीब होता असें नाहीं. बुद्धिमान माणसांच्या अंगीं कांहीं तरी खोडी असतात, तशाच याच्याहि अंगीं असत. हा लहान असतांना आईनें त्याला कपडे करण्याकरितां एका दुकानीं नेलें. आईनें त्याच्याकरितां करड्या रंगाचें कापड पसंत केलें. पण चिरंजीव पडले कवि. ते म्हणाले, "आई मला नको हें कापड" "कां बाबा! याला काय झालें?" असें आईनें

विचारलें. चिरंजीव म्हणाले, "गाढवाचा रंग करडा असतो. तेव्हां मी नाहीं घेणार हें कापड."

पेटोफीचें वय लहान असतांनाच त्यानें लॅटिनभाषेचा अभ्यास सुरु केला. लॅटिन कविता तो फार आनंदानें वाची. जर्मन व फ्रेंच भाषांहि त्याला चांगल्या येत. लहानपणीं शाळेंतील प्रत्येक बाबीबद्दल त्याच्या कल्पना ठराविक असत. एकदां शाळेंत साऱ्या मुलांनीं वर्गांत फार गोंधळ माजविला, त्यामुळें शिक्षकानें त्या सर्वांना गुढघे टेंकण्याची शिक्षा फर्मावली. परंतु पेटोफीनीं ती शिक्षा जुमानली नाहीं. तो म्हणाला, "मी गुडघ टेकणार नाहीं. त्या ऐवजीं मी १०० लॅटीन म्हणी पाठ करीन." शिक्षकालाहि ही गोष्ट पटली व त्यानें त्याचें म्हणणें मान्य केलें.

लहानपणापासून पेटोफीला आपण नट व्हावें असें वाटे. त्यामुळें राजश्री आपल्या गांवाहून वडिलांची नजर चुकवून शहरांत येत, आणि नाटकगृहाभोंवतीं हिंडत. एकदां ही स्वारी अशीच हिंडत असतां, शिक्षकांनीं त्यांना पाहिलें व ही गोष्ट वडिलांच्या कानावर घातली. वडील हातांत काठी घेऊन शहरांत आले व चिरंजीवांना गांठून काठीचा चांगलाच प्रताप दाखविला. परंतु पेटोफीची खोड या शिक्षेनें बिलकूल गेली नाहीं. वडिलांना ही बातमी पुनः जेव्हां समजली, तेव्हां त्यांनीं या मुलाचा व माझा इतःपर संबंध नाहीं, असें सर्वांना सांगून त्याला घरांतून घालवून दिलें. पेटोफीनें वडिलांच्या रागाची पर्वा न बाळगतां नाटक-कंपनींत नोकरी मिळविली. परंतु या नोकरींत त्याचें पोट भरेना, म्हणून त्यानें सैन्यांत नोकरी धरली. परंतु शिपायाला लागणारा काटकपणा त्याच्या अंगीं नसल्यामुळें त्याची लवकरच इस्पितळांत रवानगी झाली.

या विविध उद्योगांत त्याचा कविता लिहिण्याचा उपक्रम चालूच होता. त्याच्या कविता उत्तम असत. इस्पितळांतील डॉक्टरला त्याची योग्यता लवकरच कळून आली. त्यानें त्याला मोकळा केला. पेटोफीच्या नातलगांनीं त्याला पुनः शाळेंत घातलें. शाळेंत त्यांनीं शेक्सपीअरच्या नाटकांचें अध्ययन केलें. तो आपल्या कविता निरनिराळ्या मासिकांत प्रसिद्ध करूं लागला. तथापि नट होण्याची अनिवार इच्छा त्याला स्वस्थ बसूं देईना. तो एका कंपनींत पुनः गेला. कंपनींत पुरा पैसा मिळत नसल्यामुळें त्याचे दिवस हालांत जात. नाटकामध्यें तो विदुषकाचें काम करी.

अखेरीस हिंडतां हिंडतां १८४४ सालीं तो पेस्ट नांवाच्या शहरीं आला आणि त्यानें आपल्या कविता प्रसिद्ध केल्या. त्याबद्दल त्याला ७५ रुपये मिळाले. या कवितांमुळें त्याची चहूंकडे प्रसिद्धि झाली व प्रत्येकजण त्याला जवळ करूं लागला. त्याचें नष्टचर्य संपलें. त्यानें आपल्या लेखनाचा व्यवसाय तसाच चालू ठेवला. तीन वर्षांनंतर त्यानें आपल्या कविता पुनः प्रसिद्ध केल्या. त्याबद्दल त्याला ५०० रुपये मिळाले. तो आतां आपल्या आईबापांकडे जाऊं लागला व त्यांचा समाचार घेऊं लागला. वृद्धापकाळीं बापाला ही मुलाची मदत अत्यंत अमोल अशी वाटली. बापाचें प्रेम पुनः मुलावर बसलें व कवीचा व्यवसाय इतका वाईट नाहीं अशी त्याची खात्री झाली.

या वेळीं पेटोफीचें वय २५ हि पुरें नव्हतें, तथापि साऱ्या हंगेरीमध्यें त्यालाच मुख्य कवि म्हणून समजण्यांत आलें व तो अत्यंत लोकप्रिय झाला. त्याचें वजन तरुण पिढीवर फार होतें. त्याच्या कवितेचें गुणवर्णन करण्याची ही जागा नसल्यामुळें आम्ही त्याबद्दल लिहीत नाहीं.

२३ वें वर्षीं पेटोफीचें प्रेम एका तरुणीबरोबर जडलें व दोघांचें लग्न झालें. तिचें वय १८ वर्षांचें होतें. पुढें दोघेजण सुखानें कालक्रमणा करूं लागलीं. परंतु दोन वर्षांपेक्षां अधिक दिवस एकमेकांच्या संगतींत घालविण्याचें त्यांचें भाग्य नव्हतें.

१८४८ त युरोपमध्यें बंडाला सुरवात झाली. हंगेरीमध्यें स्वातंत्र्याचें वारें वाहूं लागलें. हंगेरीच्या

# समुद्राच्या गंमती.

भूगोलाचे ४ भाग केले, तर त्यांतले तीन भाग पाणी असून एक भाग जमीन आहे, असें आपण लहानपणापासून शिकतों. समुद्राच्या आंत काय उलथापालथ चालू आहे याची आपणांस पुरेशी माहितीहि नसते. ती माहिती या लेखांत देण्याचें योजिलें आहे.

जमीनीवरील सर्व डोंगरांची व पर्वतांची सरासरी उंची काढली तर ती ३ मैलापेक्षां जास्त नाहीं. पण समुद्राची सरासरी खोली काढली तर ती त्याच्या पांचपट म्हणजे अडीच मैल भरते.

पृथ्वीवरील सारी जमीन, डोंगर, पर्वत वगैरे जर समुद्रांत टाकले तर समुद्राची खोली पावणेदोन मैलापेक्षां कमी होणार नाहीं.

समुद्राच्या तळाशीं जाण्याचा प्रयत्न अद्याप यशस्वी झाला नाहीं व होणेंहि शक्य नाहीं कारण खालीं गेल्यावर वरील पाण्याचा दाब मनुष्याला सहन करवणार नाहीं. तथापि समुद्रशास्त्र नांवाच्या नवीन शास्त्रानें समुद्राच्या तळाशीं काय चाललें आहे हें समजूं शकतें.

समुद्राचा तळ सपाट आहे. परंतु त्या सपाटीवर जगाच्या आरंभीं मेलेल्या प्राण्यांचे सांगाडे असल्यामुळें ती सपाटी कमी अधिक झाली आहे. समुद्राच्या तळाशीं वाळू, माती, गाळ, खडकांचीं शकलें वगैरे पडलेलीं असतात. तळच्या भागीं खोल खड्डे असतात, तेथील भाग डोंगराप्रमाणें उतरता नसतो. हे खड्डे ज्या ठिकाणीं भूकंप झालेला असतो, त्या भागीं विशेष आढळतात. जमीनीवर जसे डोंगर असतात, तसेच समुद्रांतहि असतात. जेव्हां हे पर्वत फार उंच होतात, तेव्हां ते जमीनीवर दिसूं लागतात व त्यांना आपण बेटें म्हणतों. न्यूफौंडलंडपासून ब्रिटिश आईल्सपर्यंत असाच एक खडक पसरला आहे, त्याला टेलिग्राफ-प्लेटो असें म्हणतात. या उंचवट्याचा उपयोग तारेचे दोर टाकण्याचे कामीं फार झाला, त्यामुळें त्याला वरील नांव मिळालें.

समुद्राचा रंग निळा दिसतो व तो पारदर्शकहि असतो. हा रंग असा कां, हें शास्त्रज्ञांना सुद्धां सांगतां येत नाहीं. कदाचित् आकाशाची पडच्छाया त्यावर पडली असल्यामुळें त्याचा असा रंग असावा. कांहीं ठिकाणच्या पाण्याचा रंग हिरवा असतो. पाण्याच्या खालीं असणाऱ्या वनस्पतींचा रंगावर परिणाम होत असावा. तांबड्या समुद्रालावरील कारणामुळेंच हें नांव पडलें आहे. इतर ठिकाणीं मातीचा व इतर खनीज द्रव्यांचा पाण्यावर परिणाम होऊन पाण्याचा रंग पालटतो. ३००० फुटांचे खालीं सूर्यप्रकाश जाऊं शकत नाहीं, त्यामुळें समुद्रांतील साऱ्या वनस्पती या खोलीच्या वर असतात. १५०० फुटांखालीं सूर्याची उष्णता जाऊं शकत नाहीं. त्यामुळें १५०० फुटांवरील पाणी ऊबदार असतें व त्या खालचें पाणी थंडगार असतें.

समुद्राचें सारें पाणी खारट असतें. तथापि पाण्याचा कांहीं भाग अधिक खारट असतो. हा खारटपणा हवेवर अवलंबून असतो. ज्या ठिकाणीं सूर्याचें उष्णतेमुळें बाष्पीभवन अधिक होतें तेथें पाण्याला खारटपणा अधिक असतो. तांबड्या समुद्रांतील पाणी अधिक खारट असतें.

१००० पौंड समुद्राचें पाणी घेतलें, तर त्यांत ३५ पौंड मीठ असतें. समुद्रामध्यें नुसतें मीठ सांपडतें अशी आपली चुकीची समज आहे. समुद्रांत पुष्कळ क्षार असतात. समुद्र हा एक संपत्तीचा खजीना आहे. त्यांत सोनें, रुपें इत्यादि द्रव्यें सांपडतात. ९२ मूलभूत द्रव्यांपैकीं, ३२ द्रव्यें समुद्रांत आढळतात. अधिक द्रव्यें समुद्रांत आहेत, अशी शास्त्रज्ञांची खात्री आहे व त्याकरितां त्यांचे प्रयत्न चालू आहेत. हीं द्रव्यें

पावसाच्या पाण्याबरोबर जमीनीवरून वहात येतात.

समुद्राचें पाणी सारखें फिरत असतें. समुद्राचेहि समुद्र, नद्या, तळीं इत्यादि भाग असतात. सूर्याच्या उष्णतेमळें असे विभाग पडतात.

समुद्रांतील नदीचें उत्कृष्ट उदाहरण म्हणजे उष्ण पाण्याचा झरा होय. हा झरा मेक्झीकोच्या अखातापासून निघतो, व बऱ्याच मोठ्या भागाला वेढतो. हा ओघ निळ्या रंगाचा असतो व इतर रंगाच्या पाण्यापेक्षां वेगळा असतो. या ओघाचे परिणाम हवेवर होतात. एकाच अंशामधील दोन देशांत हा झरा निरनिराळ परिणाम दाखवितो.

अॅटलांटिक महासागराचे उत्तरेस सारगासो नांवाचा समुद्र आहे; याचें पाणी अगदीं शांत असतें. त्या पाण्यांत कांहीं वनस्पती आढळतात. या वनस्पती इतर ठिकाणीं वाढतात, व त्या समुद्रांतील नद्यांकडून या ठिकाणीं आणल्या जातात. अशा प्रकारचे चार संथ पाण्याचे समुद्र आहेत असें म्हणतात.

रासायनिकदृष्ट्या समुद्राच्या पाण्याचें पृथक्करण केल्यास, त्या पाण्यांत मनुष्याच्या रक्ताचें घटकावयव दिसतात. यावरून मनुष्य हा समुद्रांतच निर्माण झालेला प्राणी आहे असें म्हणतात. समुद्रामध्यें रहाणाऱ्या मनुष्याच्या आद्य पूर्वजांनीं आपल्या पोटांत जें समुद्राचें पाणी नेलें त्याचें रूपांतर रक्तांत होऊन तें रक्त पिढयान् पिढया मनुष्याच्या अंगांत खेळत आहे.

समुद्राच्या पाण्याचा दाब अत्यंत भयंकर असल्यामुळें मनुष्याला फार खालीं जाववत नाहीं. २०० फूट खोल जाणें म्हणजे फार होय. एका चौरस इंचावर समुद्राच्या पाण्याचा २½ टन दाब असतो. पाण्याच्या खालीं खोल गेलें म्हणजे हा दाब ५ टन होतो.

एक रिकामी बाटली घ्यावी. तिला बूच लावावें व ती बाटली पाण्यांत खोल सोडावी. बाटली वर काढल्यावर बाटलीचें बूच पाण्याच्या दाबानें निघालेलें व बाटलींत पाणी शिरलेलें दिसेल. पोकळ कांचेचा फुगा या दाबानें फुटून जातो.

कोणतेंहि बंद केलेलें भांडें जर फार खोल सोडलें तर तें फुटतें. परंतु हा फुटण्याचा प्रकार इतर प्रकारापेक्षां अगदीं निराळा असतो. इतर वस्तू बाहेरील बाजूंनीं फुटतात; परंतु समुद्रांत सोडलेल्या वस्तू दाबामुळें चेपल्या जाऊन आंतील बाजूंनीं फुटतात. पाण्यांत फिरणाऱ्या माशांवर सुद्धां हाच परिणाम घडतो. कांहीं मासे अगदीं वरील पाण्यावर पोहूं शंकतात. ते मासे जर खोल तळाशीं गेले तर वरच्या दाबानें मरतात. त्याचप्रमाणें ज्या माशांना खालीं पोहतां येतें, ते जर वर आले तर मरतात. त्या माशांचें शरीर छिद्रमय असतें, त्यामुळें त्यांतून पाणी निघून जातें आणि त्यांच्यावर दाबाचा परिणाम होत नाहीं.

समुद्रांत असंख्य जीव आहे. ते आपली उपजीविका एकमेकांवर करितात. या माशांचीं शरीरें फारच लवचीक असल्यामुळें त्यांना सबंध मासेचे मासे गिळतां येतात. माशांना डोळे असतात; परंतु त्यांचा उपयोग होत नाहीं. कांहीं माशांच्या डोक्यावर एक प्रकारच्या प्रकाशाची वस्तु असते, त्या योगानें त्यांना आंतील भाग दिसतो.

एके काळीं समुद्र नव्हता. जेव्हां पृथ्वी बनली तेव्हां हायड्रोजन व ऑक्सीजन हे वायु पृथ्वीच्या तप्त भागांत होते. पृथ्वी जसजशी थंड झाली, तसतसे हे वायु मोकळे झाले आणि त्याचा संयोग होऊन जिकडे तिकडे पाणीच पाणी झालें.

अशा प्रकारें समुद्र झाल्यावर, त्याचा उपयोग मनुष्याच्या वस्तीकरितां होऊं लागला. समद्राचा उपयोग सूर्याची उष्णता पसरविण्यास होतो. समद्राचा उपयोग शेतकीकडे होतो. समुद्रानें हवा शुद्ध होते. असे समुद्राचे निरनिराळे उपयोग आहेत.

स्वातंत्र्यविषयक दहा मागण्या होत्या. या मागण्यांचें स्वरूप आपल्याकडील मागण्यांप्रमाणेंच होतें परंतु ऑस्ट्रिया इंग्लंडाप्रमाणेंच धूर्त असल्यामुळें त्यांनीं हंगेरीमध्यें आपसांत यादवी सुरू केली. ऑस्ट्रियानें निरनिराळे पक्ष हंगेरींत निर्माण केले व स्वत:चें वर्चस्व या सर्व पक्षांवर बसविलें. या यादवीचें अखेर बंडांत रूपांतर झालें. पेटोफीचें वजन तरुण पिढीवर अत्यंत असल्यामुळें तो स्फूर्तीदायक व तेजस्वी लेख लिहूं लागला आणि अखेरीस त्यालाच राष्ट्रीय पुढारी समजण्यांत आलें. त्याचीं गाणीं सर्वांच्या तोंडीं झालीं आणि त्याचा विलक्षण परिणाम होऊं लागला स्वातंत्र्याकरितां मरणें ही प्रत्येक मनुष्याच्या आयुष्यांतली अत्यंत वैभवशाली गोष्ट आहे असें तो लिहूं लागला. हंगरीनें शस्त्र उपसतांच हा त्यांचा पुढारी झाला. या वेळीं त्याचे आईबाप दोघेहि मरण पावले होते. त्यांच्या मृत्यूवर कविता लिहितांना तो परमेश्वराला मला रणांगणावर मरण येऊं दे, असें विनवूं लागला.

ही त्याची इच्छा लवकरच परिपूर्ण झाली. रशिया व ऑस्ट्रिया या दोन देशांनीं हंगेरीचें बंड मोडण्याकरितां आपसांत एकी केली. हंगेरीच्या ३०००शूर देशभक्तांची १६००० रशियाच्या शिपायाबरोबर लवकरच गांठ पडली. पेटोफी अर्थातच हंगेरीचा सेनापती होता. पेटोफीची योग्यता लक्षांत घेऊन सरसेनापतींनीं त्याला पिछाडीला राहण्याचा उपदेश केला. परंतु पेटोफीवर त्याचा बिलकूल परिणाम न होऊन तो या लढाईत मरण पावला आणि इतर पुढाऱ्यांबरोबर पुरला गेला.

अशाप्रकारें ह्या शूर देशभक्ताचें व प्रतिभासंपन्न कवीचें २६ वें वर्षीं देहावसान झालें. आज याच देशभक्ताचें नांव साऱ्या हंगेरींत दुमदुमत आहे व त्याची पुण्यतिथि १०० वर्षांनंतर साजरी केली जात आहे.

---

## ❀ सिंहान्योक्ति. ❀

( कवयित्री सौ० गीताबाई काळे, असोदें मु० नशिराबाद. )

( स्रग्धरा-वृत्त )

दावावें शौर्य ज्याला अनुचित गमलें आपुलें जंबुकांत ।
होता तेव्हां सुखानें मृगपति निजला आपुल्या कंदरांत ॥
त्याच्या प्रांतांत यांनीं करुनि गलबला जागवीलें तयाला ।
पाहूं तो कोण आतां बलनिधि धजतो यापुढें जावयाला ॥ १ ॥

१

( वृत्त शार्दूल विक्रीडित. )

नाहीं ठाउक पारतंत्र्य तुजला, ना नीच वृत्ती तुझी ।
"हांजी हांजी" तुला न माहित असे स्वातंत्र्य-वृत्ती अती ॥
गेले प्राणहि वीर्य-वृत्ति अपुली केव्हांहि ना सोडिसी ।
धन्य प्राणि जगांत तेच अपुल्या 'स्वत्वास' जे रक्षिती ॥२॥

---

१ इतर पशूंनीं

# हाँगकाँग.


हाँगकाँग बंदर चीनच्या दक्षिणेस पॅसिफिक महासागरांत आहे. येथें पूर्वी रानटी लोक रहात असत. त्यांचा धंदा मासे धरण्याचा होता. त्यांना घरें नसत; ते जहाजांतच रहात असत. १७८१ सालीं इंग्रजांची दृष्टि या बंदराकडे वळली. इंग्रजांनीं या बंदरांचा उपयोग फक्त माल सांठविण्याकडे करण्याचें योजिलें. १८५६ पर्यंत इंग्रज व्यापारी कँटोन शहरीं व्यापार करीत, व उरलेला माल हाँगकाँगमध्यें सांठवीत. १८५६ मध्यें चिनी लोकांनीं इंग्रजांचा कँटोनमधील व्यापार व कारखाने मोडून टाकले, त्यामुळें इंग्रजांचें हाँगकाँग हेंच मुख्य व्यापाराचें क्षेत्र झालें. हळुहळू इंग्रज लोक आपले हातपाय आंत मध्यें पसरूं लागले. त्यांनीं एक शहर वसविलें व त्याला व्हिक्टोरिया असें नांव दिलें. या शहराभोंवतीं डोंगर आहेत.

१८८८ सालीं येथें रेल्वे बांधण्यांत आली; आणि सर्व सोयींच्या अशा जागा उभारण्यांत आल्या. हल्लीं हाँगकाँग म्हणजे एक अत्यंत उपयुक्त असें बंदर झालें आहे. हाँगकाँग हें पूर्वेकडील व्यापाराचें मुख्य केंद्र आहे. या ठिकाणीं खुला व्यापार चालतो. हाँगकाँगमध्यें येणाऱ्या व जाणाऱ्या मालावर कोणत्याहि प्रकारचे कर अगर देखरेख नाहीं. त्यामुळें या बंदराची व्यापारदृष्ट्या अतिशय भरभराट झाली. हाँगकाँगमध्यें कोणत्याहि प्रकारचीं बंधनें नसल्यामुळें तेथें किती व्यापार चालतो याची मोजदाद नाहीं. तथापि ठोकळ मानानें शांघायच्या निम्म्यानें येथें व्यापार चालतो असें म्हणतात.


येथें चिनी व्यापारी पुष्कळ आहेत. बराचसा किरकोळ व्यापार त्यांनीं बळकावला आहे. पूर्वी जे भाग ओसाड पडले होते तेथें हल्लीं चिनी लोकांनीं गर्दी करून सोडली आहे. या बेटांत शेंकडा ९६ चिनी, शेंकडा ३ हिंदी व १ युरोपिअन व्यापारी आहेत. तथापि सारा व्यापार याच युरोपिअन लोकांच्या हातीं आहे. तेथें चिनी व्यापारी आपलें रेशिम विकतो व मँचेस्टरचें कापड विकत घेतो. चिनी लोक स्वदेशच्या लहान सहान जिनसा आणून येथें खपवितो. वाण्या-उदम्यांचीं दुकानें चिनी लोकांच्या ताब्यांत आहेत. चिनी माणूस नोकरा-चाकराचीं हलकीं कामेंहि करीत असतो. हाँगकाँगमध्यें सिमेंट तयार होतें. तेथें पुष्कळ जहाजें बांधलीं जातात. जावा व फिलिपाईन्स मधून येणारी साखर येथें शुद्ध केली जाते व चीनमध्यें पाठविली जाते. कापूस कातण्याच्या गिरण्या येथें आहेत. याशिवाय तेथें लांकडाचा, पिठाचा, कांचेचा, साबणाचा, आगपेट्याचा कारखाना आहे. अशा प्रकारचा हाँगकाँग बंदरांत व्यापार चालत आहे.

---


# जगांतील प्रवासाचे बारा प्रकार.



आगगाडी


चालणें



विमान


घोड्यावरून जाणें



मोटार



होडी


सायकल


घोड्याची गाडी


लहान होडकें


वाफेचे जहाज


पडाव


मोटार सायकल

# ' प्रश्नांची उलटापालट '

**लेखक-शंकर भाऊ कुलकर्णी-बेनाडीकर.**

रशियाचा राजा फ्रेडरिक हा सर्वांना विशेषतः सैन्यांतील शिपायांना फार दयाळूपणानें वागवी. कधीं कधीं सैन्याची पाहणी करून नवीन भरती झालेल्या शिपायांस पुढील ठराविक तीन प्रश्न विचारीत असे. (१) तुझें वय काय? (२) या सैन्यांत भरती होऊन किती दिवस झाले? (३) तूं जी नौकरी पतकरली आहेस आणि तुला दर महिन्यास जो पगार मिळतो या उभय गोष्टींस तूं खूष आहेस काय?

एके दिवशीं परकी देशांतील एक तरुण रशियाच्या मुख्य सैन्यांत भरती होण्याकरितां आला. तो उंच असून त्याची छातीही चांगली भरदार होती, पण त्यास रशियन भाषा येत नव्हती. त्याचा सुंदर व भव्य देह पाहून सेनापतीनें विचार केला कीं, असा मनुष्य सैन्यांत असणें योग्य आहे, फक्त भाषा येत नाहीं म्हणून यास सोडून उपयोगी नाहीं. तेव्हां तो त्या तरुणास फ्रेंच भाषेंत म्हणाला,' अहो! सम्राट् फ्रेडरिक जेव्हां सैन्य पाहण्यास येईल, तेव्हां तो तुम्हाला तीन प्रश्न विचारील; त्यांचीं उत्तरें तुम्ही पुढीलप्रमाणें द्या. पहिल्या प्रश्नाचें उत्तर ' एकवीस वर्षें, ' दुसऱ्या प्रश्नाचें उत्तर ' एक वर्ष ' व तिसऱ्या प्रश्नाचें उत्तर ' उभयहि '

त्याच दिवशीं, सम्राट् सैन्याची तपासणी करण्याकरितां आला. पाहणी करितां करितां त्याची नजर नवीन भरती झालेल्या शिपायाकडे सहजच गेली, तेव्हां सम्राट त्याच्याजवळ आला व त्याच्या खांद्यावर हात ठेवून प्रथम त्यानें दुसरा प्रश्न विचारिला; तुला या सैन्यांत भरती होऊन किती दिवस झाले? शिपाई म्हणाला 'एकवीस वर्षें.' सम्राट् आश्चर्य पावून म्हणाला,' एकवीस वर्षें! तर मग तुझें वय किती? शिपायानें उत्तर दिलें, ' एक वर्ष.' सम्राटास वाटलें कीं, हा माझी थट्टा तर करित नाहीं ना? तेव्हां त्यानें उदास होऊन पुन्हां म्हटलें,' अरे! तूं असें भलतेंसलतेंच काय सांगतोस? असें चमत्कारिक उत्तर देणारा तूं वेडसर, कीं असें उत्तर ऐकून घेऊन स्वस्थ बसणारा मी वेडसर! हें ऐकून शिपायास चमत्कारिक वाटलें. राजानें तिसरा प्रश्न विचारिला, तेव्हां तो लगेच म्हणाला' उभयही.'

तत्क्षणींच सेनापतीनें सैन्यास सुटी देऊन त्या शिपायासंबंधाची आरंभापासूनची सर्व हकीगत सम्राटास सांगितली; ती ऐकून त्यास फारच हसूं लोटलें. अशा प्रकारें 'प्रश्नाची उलटापालट' झाल्यानें खूब मौज उडाली!

---

# ❀ शालापत्रकाची चढाओढ ❀

## मागील कोड्यांचीं उत्तरें.

### मुलांकरितां.

पेशव्यांचें पुणें शहर हें ऐतिहासिक दृष्टीनें फार प्रसिद्ध शहर आहे. या शहरांत बुद्धिमान, कर्तबगार मेहनती लोक राहतात.

### बरोबर उत्तरें.

१ बसंत वासुदेव वाचासुंदर ( १ )
२ कु. इंदिरा शिरवैकर ( १ )
३ व्यंकट माधव नागवेकर ( १ )
४ दत्तात्रय रामकृष्ण मेंगळे. ( १ )
५ श्री. ना. कुलकर्णी ( १ )
६ सिताराम विष्णु कुरणे ( १ )

टिप—कंसातील आंकडा चूक दाखवितो

### सर्वांकरितां

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १७ | ६ | २५ | १४ | ३ |
| २४ | १३ | २ | १६ | १० |
| १ | २० | ९ | २३ | १२ |
| ८ | २० | ११ | ५ | १९ |
| १५ | ४ | १८ | ७ | २१ |

१ सौ. सुशिलाबाई पै.
२ लक्ष्मीकांत गणपतराव गुळगुळे
३ वि. दा. सरदेशमुख
४ सदाशिव रामकृष्ण देशपांडे
५ त्र्यंबक शिवराम देशपांडे
६ शिवराम गोविंद कुळकर्णी
७ कृष्णाजी रामचंद्र केळकर
८ नारायण यशवंत खांबेकर
९ वि. ना. नवांगुळ.
१० सिताराम विष्णु कुरणे.
११ दत्तात्रय रामकृष्ण मेंगळे
१२ शंकरराव खंडेराव पुरंदरे
१३ शांताराम पुंडलीक नाईक
१४ प्र. नी. पुराणिक
१५ गोविंद गोपाळ पेंढरकर
१६ वामन व्यंकटेश कारे
१७ रंगनाथ गोविंदराव
१८ अच्युत बाळकृष्ण परमानंद
१९ किसन जानजी बहादरे

## बक्षीस मिळालेलीं पुस्तकें व नांवें.

### मुलांकरितां.

१ चिमुकलें रामायण
२ गोपाळ्यावरील गीता
४ ध्रुव व चिलया
५ लक्ष्मीपूजन
६ भारतांतील गोष्टी

### सर्वांकरितां.

१ समर्थांचें बाळबोध चरित्र.
२६ विद्वत्व कवित्व व वक्तृत्व.
८ अर्वाचिन महाराष्ट्र
१६ अमरसार
१७ निबंधलेखन आणि अनुवाद

### मुलांकरितां.

[ पाठविणार—का. दा. साने. ]

तीन अक्षरांचे तीन शब्द घेऊन एक चौरस करा. यांतील अक्षरें आडवी व उभी वाचलीं असतां तेच शब्द आले पाहिजेत. त्यांतील एक शब्द फळाविषयीं. दुसरा पौराणिक पुरुषांपैकीं व तिसरा सोन्या, चांदीच्या व्यापाऱ्याविषयीं आहे.

### सर्वांकरितां

खालील अक्षरांत एक प्रसिद्ध म्हण आहे ती ओळखा:—


पृ भा ण र्ढी
वु या बो बो क
ला त् या ला
त चि रु को
ला ये नी चि से
ञा

| नोव्हेंबर कुपन सर्वांकरितां |
|---|


| नोव्हेंबर कुपन मुलांकरितां |
|---|

# गाढव गाढव.


मागील एका गोष्टींत शहाण्या गाढवाची गोष्ट सांगितली होती. या खेपेस वेड्या गाढवाची गोष्ट सांगणार आहों.




एक गाढव अंगणांत उभें होतें. तिकडून एक सिंह आला. सिंहाला फार भूक लागली होती. सिंहानें



भिंतीवरून गाढवावर झडप घातली. गाढवाची गाळण तर उडालीच, पण जवळ कोंबडा होता म्हणून तो सिंहाकडून खाल्ला गेला नाहीं. कोंबडा खूप जोरानें ओरडला; आणि सिंह पळून गेला. मी होतों म्हणून तुझा जीव वांचला असें कोंबडा सांगूं लागला. पण गाढव, खरें गाढव होतें. तें म्हणालें, " बेट्या, तुला



काय कळतें ! सिंह माझ्या दांताकडे व खुराकडे पाहून पळाला. मी शूर वीर आहें. मी आतां जातों आणि सिंहाला पकडतों. " असें म्हणून गाढव निघालें.



गाढव सिंहाला ओरडून म्हणालें " अहारे भागूबाई काय पण पळून गेली ! ये आणि लढ. " हें ऐकून सिंह मागें फिरला आणि त्यानें गाढवाला खाऊन टाकलें.

# रंगीत इसाप-नीति.

ह्यांत एकंदर इसापनीतींतील आठ अगदीं सोप्या गोष्टी मोठ्या व जाड टाइपांत दिलेल्या असून प्रत्येक गोष्टीसमोर त्यांतील रहस्य दाखविणारें रंगीत सुंदर चित्र दिलेलें आहे. चित्रें पाहूनच मुलांना गोष्टींतील तात्पर्य कळतें. किं० ८६ ट. ह. ८८६

# सचित्र इसाप-नीति.

[ उत्तरार्ध ]

[ नवीन भाषांतर भाग २ रा. ]

वरीलप्रमाणेंच हा दुसरा भाग विक्रीस तयार आहे. ह्याची सुमारें ३०० पानें झालीं असून ह्यांत ३५० गोष्टी आहेत. चित्रांची संख्या १५० पर्यंत आहे. किं० १८४.

दोन्ही भाग एके ठिकाणीं बांधलेलें सुंदर पुस्तक किं० रु० २

# विद्यार्थ्यांकरितां नाटिका.

शीलं परं भूषणम्.

ही नाटिका प्रसिद्ध कवि—शिरोमणि नारायण वामन टिळक यांनीं केवळ लहान मुलांकरतांच लिहिलेली आहे. यांत शृंगाररस मुळींच नाहीं. एवढेंच नव्हे, तर स्त्रीची भूमिका या नाटकांत आणलेलीच नाहीं. शिवाय नाटकाचा विषय नैतिक विचारानें पूर्ण भरलेला असल्यामुळें शाळांतून वार्षिक संमेलनाचे वेळीं मुलांकडून ह्या नाटकाचा प्रयोग करविण्यास तें योग्य आहे. नाटकाचा विषय धनाची योग्यता जास्त किंवा ज्ञानाची योग्यता जास्त हा आहे. पुस्तकांत चार सुंदर चित्रें कथानकास अनुसरून दिलेलीं आहे. किं० ८४.

म्यानेजर—चित्रशाळा प्रेस, पुणें.

# चिमुकलें भारत व रामायण.

महाभारत व रामायण हे आपले राष्ट्रीय ग्रंथ आहेत. यांत आपला प्राचीन इतिहास असून प्रपंच साधून परमार्थ कसा जोडावा हें उत्तम दाखविलें आहे. व्यवहारिक बोधाचा ह्या केवळ खाणी आहेत, आबालवृद्ध स्त्री—पुरुषांना या ग्रंथांचें ज्ञान होणें अगत्याचें आहे, प्रौढांकरितां आमचीं लोकप्रिय ‘ भारती युद्ध ’ व ‘ रामचरित्र ’हीं पुस्तकें आहेत. आतां बारातेरा वर्षांच्या मुलांमुलींकरितां चिमुकलें भारत व चिमुकलें रामायण ’ हीं दोन पुस्तकें अनुक्रमें आम्हीं रामकृष्णवाक्सुधेचे प्रसिद्ध लेखक रा. कृष्णाजी गोविंद किनेर व रा. विद्याधर वामन भिडे बी. ए. यांजकडून मुद्दाम लिहविलीं आहेत. पुस्तकाची भाषा फारच मोहक व सोपी आहे. वाचतां वाचतांच मुलांच्या मनांवर त्यांतील रहस्य ठसावें म्हणून उपदेशपर वाक्यें जाड टाइपांत घातलीं आहेत, आणि कथानकांच्या अनुरोधानें हाफटोन प्रोसेसनें तयार केलेलीं भारतांत आठ व रामायणांत सात अशीं सुंदर चित्रें घातलीं आहेत. भारताचीं पृष्ठें १७३ व रामायणाचीं पृष्ठें ८२. छपाई बांधणी सुबक. किं० ८६, व रामायण किं० ८४.

म्यानेजर—चित्रशाळा प्रेस, पुणें शहर.

॥ ॐ नमः श्रीरामचंद्राय ॥

# आर्यमहौषधालय मु० पो० आंजर्ले

**कोंकणप्रांतांतील अगदीं ताज्या व शुद्ध वनस्पतींचीं जगत्प्रसिद्ध निर्दोष व रामबाण औषधें.**

**कंदर्पमंजरी पाक—** हा अपूर्व पाक गरिबापासून तों अमीरउमरावापर्यंत सर्वांसही अत्यंत उपयोगी असून किंमत माफक ठेविली आहे. यांत मौक्तिक, प्रवाळ, लोह, माक्षिक, कस्तूरी, अंबर इ० अत्युच्च गुणकारक पदार्थ असून शिवाय बदाम, पिस्ते, अक्रोड चारोळी, केशर, वेलची, पंजाबी सालममिश्री, सफेतमुसळी, पत्री, गोक्षुर, शतावरी, आस्कंद, वंशलोचन वगैरे (८०) उपयुक्त वनस्पति घातल्या आहेत. यानें पथ्यावांचून गुण येतो. यापासून कोणत्याही कारणांनीं होणारा व कशाही प्रकारचा शुक्रस्राव, नपुंसकत्व, मूत्रव्याधि, रक्तदूषणामुळें त्वग्रोग, स्त्रियांची धुपणी व गर्भाशयस्थ दोष या भावना त्यांच्या एकंदर उपविकारांसह तत्काल बऱ्या होऊन धातुवृद्धि होते, व शरीर कणखर आणि तेजस्वी बनतें. २० तो० ड० २ रुपये. एकदम ३ डबे घेणारास ५ रुपये.

**स्वर्णधात्री तेल—** हें चारोळी. बदाम, कंकोळ, एला, बहुविध वनस्पतींचीं सत्त्वें व उपयुक्त तेलें अशा अनेक पदार्थांनीं बनविलें असल्यानें याच्या मर्दनापासून अपस्मार, उन्माद, वेड, चक्कर इ० रोगांस जलद आराम पडतो. केंसांस चोळल्यानें केंस काळे कुळकुळीत, तजेलदार, सडक लांब व मृदु होऊन मेंदु शांत आणि रोगरहित बनतो. यानें मस्तकाचें टक्कल जातें. हें अंगास चोळून स्नान करीत गेल्यानें शरीराचा दुर्गंध जातो. खरूज, गजकर्ण, शिबें, तसेंच तळपाय, तळहात, डोळे व मस्तक यांचा दाह हे विकार खास बरे होऊन निद्रा चांगली येते, आणि नेत्ररोग दुरुस्त होतात बा० किं० १। रु०

**दंतरक्षक पूड—** ही दांत व हिरड्या यांचे सर्व विकार तत्काल दुरुस्त करून दांत स्वच्छ व मजबूत करण्यांत प्रतिज्ञेची आहे. ड. ६ आणे.

**सुरंगी, मालती, कल्हार, गुलबहार, दणाणा, लक्ष्मीविलास** इ० बादशाही अति उंची अत्तरें व त्याचप्रमाणें गुलाब, हिना, केवडा, चमेली, जाई वगैरे सुगंधी अत्तरें आणि केंसांस लावण्याचीं हरएक प्रकारचीं सुवासिक तेलें माफक दरानें पूर्ण खात्रीचीं मिळतील.

**सूचना:—**वरील औषधें व अत्तरें वगैरे पूर्ण खात्रीचीं असल्यामुळें आज पंचवीस वर्षांत त्यांचा लक्षावधि लोकांस अप्रतिम उपयोग झाला म्हणून त्यांचा नेहमीं फारच खप होत आहे. अनुभवानंतर पूर्ण खात्री पटेलच. औषधें माहितीचे खर्च्यासह रोखीनें अगर व्ही. पी. नें पाठवूं. प्याकिंग व टपाल खर्च वेगळा. घाऊक घेणारांस कमिशन भरपूर. सर्व औषधांच्या आणि आरोग्यरक्षणाच्या माहितीचें सचित्र मोठें पुस्तक देऊं. आमचीं औषधें वगैरे मागविणें ती खालील बिनचूक पत्त्यावर मागवावी.

**कृष्णशास्त्री बिवलकर, वैद्य.**

REGISTERED. B. NO. 179




## अनुक्रमणिका


| विषय. | पृष्ठ. |
|---|---|
| जपान व शिक्षण | २२१ |
| बेंजामिन फ्रँकलिन | २२४ |
| सवतीचा गोंधा | २२६ |
| श्रीदत्त जन्मकथा | २२९ |
| न्यायाधीशाचें चातुर्य | २३० |
| शालापत्रकाच्या वाचकांशीं हितगुज | २३३ |
| सरकी | २३४ |
| राजा व चहाडखोर | २३६ |
| शालापत्रकाची चढाओढ | २३७ |
| विनोद व लहरी | २३९ |
| मोळीविक्या | २४० |



मुद्रक व प्रकाशक—रा. रा. शंकर नरहर जोशी, चित्रशाळा प्रेस, १०२६ सदाशिव पेठ, पुणें सिटी.

# रंगीत इसाप-नीति.

ह्यांत एकंदर इसापनीतींतील आठ अगदीं सोप्या गोष्टी मोठ्या व जाड टाइपांत दिलेल्या असून प्रत्येक गोष्टीसमोर त्यांतील रहस्य दाखविणारें रंगीत सुंदर चित्र दिलेलें आहे. चित्रें पाहूनच मुलांना गोष्टींतील तात्पर्य कळतें. किं० ८६ ट. ह. ८८६

# सचित्र इसाप-नीति.

[ उत्तरार्ध ]

[ नवीन भाषांतर भाग २ रा. ]

वरीलप्रमाणेंच हा दुसरा भाग विक्रीस तयार आहे. ह्याचीं सुमारें ३०० पानें झालीं असून ह्यांत ३५० गोष्टी आहेत. चित्रांची संख्या १५० पर्यंत आहे. किं० १८४.

**दोन्ही भाग एके ठिकाणीं बांधलेलें सुंदर पुस्तक किं० रु० २**

# विद्यार्थ्यांकरितां नाटिका.

**शीलं परं भूषणम्.**

ही नाटिका प्रसिद्ध कवि–शिरोमणि **नारायण वामन टिळक** यांनीं केवळ लहान मुलांकरतांच लिहिलेली आहे. यांत शृंगाररस मुळींच नाहीं. एवढेंच नव्हे, तर स्त्रीची भूमिका या नाटकांत आणलेलीच नाहीं. शिवाय नाटकाचा विषय नैतिक विचारानें पूर्ण भरलेला असल्यामुळें शाळांतून वार्षिक संमेलनाचे वेळीं मुलांकडून ह्या नाटकाचा प्रयोग करविण्यास तें योग्य आहे. नाटकाचा विषय धनाची योग्यता जास्त किंवा ज्ञानाची योग्यता जास्त हा आहे. पुस्तकांत चार सुंदर चित्रें कथानकास अनुसरून दिलेलीं आहेत. किं० ८४.

म्यानेजर—चित्रशाळा प्रेस, पुणें.

# चिमुकलें भारत व रामायण.

महाभारत व रामायण हे आपले राष्ट्रीय ग्रंथ आहेत. यांत आपला प्राचीन इतिहास असून प्रपंच साधून परमार्थ कसा जोडावा हें उत्तम दाखविलें आहे. व्यवहारिक बोधाचा ह्या केवळ खाणी आहेत, आबालवृद्ध स्त्री—पुरुषांना या ग्रंथांचें ज्ञान होणें अगत्याचें आहे, प्रौढांकरितां आमचीं लोकप्रिय ' भारती युद्ध ' व ' रामचरित्र ' हीं पुस्तकें आहेत. आतां बारातेरा वर्षांच्या मुलांमुलींकरितां चिमुकलें भारत व चिमुकलें रामायण ' हीं दोन पुस्तकें अनुक्रमें आम्हीं रामकृष्णवाक्सुधेचे प्रसिद्ध लेखक रा. कृष्णाजी गोविंद किनरे व रा. विद्याधर वामन भिडे बी. ए. यांजकडून मुद्दाम लिहविलीं आहेत. पुस्तकाची भाषा फारच मोहक व सोपी आहे. वाचतां वाचतांच मुलांच्या मनावर त्यांतील रहस्य ठसावें म्हणून उपदेशपर वाक्यें जाड टाइपांत घातलीं आहेत, आणि कथानकांच्या अनुरोधानें हाफटोन प्रोसेसनें तयार केलेलीं भारतांत आठ व रामायणांत सात अशीं सुंदर चित्रें घातलीं आहेत. भारताचीं पृष्ठें १७३ व रामायणाचीं पृष्ठें ८२. छपाई बांधणी सुबक किं० ८६, व रामायण किं० ८४.

म्यानेजर—चित्रशाळा प्रेस, पुणें शहर.

मराठी
# शालापत्रक

येथें शब्द नाहीं शिष्यासीं । हें अवघें सद्गुरूपाशीं ।
सद्गुरु पालटी अवगुणांसी । नाना यत्नें करोनी ॥
जें कांहीं आपणास ठावें । तें हळु हळु शिकवावें ।
शहाणें करून सोडावें । सकळा जनां ॥ १ ॥

—रामदास.

पुस्तक ३५ डिसेंबर सन १९२५ अंक १२

## जपान व शिक्षण.

( धंदेविषयक शिक्षण. )

मागील लेखांत प्राथमिक शिक्षणाची रूपरेषा कशी काय असते, याचा परिचय वाचकांना करून दिला आहे. प्राथमिक शिक्षणानंतर दुय्यम प्रतीच्या शिक्षणास सुरवात होते आणि नंतर कॉलेजांतील उच्च शिक्षण दिलें जातें. आपल्याकडे दुय्यम शिक्षण जें देतात, तें अगदीं कमी दर्जाचें असतें. जपानमध्यें दिल्या जात असलेल्या शिक्षणाच्या यादीकडे पाहिलें म्हणजे आपण फार मागासलेले आहोंत असें आपल्या लक्षांत येईल. त्यांना पदार्थविज्ञानशास्त्र, रसायनशास्त्र वगैरेची माहिती दिली जातेच; शिवाय या अभ्यासक्रमांत शेतकीचें शिक्षण व औद्योगिक शिक्षण यांचाहि अन्तर्भाव करण्यांत येतो. हा अभ्यासक्रम पांच वर्षांचा असतो. यापुढील शिक्षण हायस्कूलचें व नंतर कॉलेजचें. कॉलेजच्या शिक्षणांत वैमानिक व आरमारी शिक्षण इतर अभ्यासाबरोबर दिलें जातें. हायस्कूलचा शिक्षणक्रम ३ वर्षांचा व कालेजचा अभ्यासक्रमहि तीन वर्षांचाच असतो. परंतु प्रत्येक मुलाला ठराविक काळ शाळेंत काढलाच पाहिजे असें नाहीं. एखादा बुद्धिवान मुलगा हा अभ्यासक्रम अल्पावधींत आटपू शकला तर त्याला पुढें जाण्यास प्रतिबंध करण्यांत येत नाहीं.

जपानमध्यें या ठराविक शिक्षणक्रमाशिवाय, इतर पुष्कळ शिक्षणक्रम आहेत व ते जो तो मुलगा स्वतःच्या लायकीप्रमाणें घेत असतो. एक परक्या भाषांची शाळा आहे. या शाळेंत १४ भाषांचें शिक्षण दिलें जातें, त्यांत हिंदी भाषा एक आहे. शिवाय संगीत शाळा, चित्रकलेची शाळा वगैरे अनेक शाळा आहेत.

जपानमध्यें जर कोणतें वैशिष्ट्य असेल तर तें या बौद्धिक शाळांविषयींचें नसून धंदेशाळांचें होय. जपान देश हा मागासलेला देश होता. परंतु या देशानें मधील अंतर कमी करून एकदम उडी मारली व अमेरिका इंग्लंडसारख्या देशांच्या पंक्तीला जाऊन बसण्याचा मान मिळविला, ही लहान सहान गोष्ट नव्हे. १८७१ पर्यंत जपानमध्यें धंद्याला बऱ्याच अडचणी असत. कांहीं कांहीं कुटुंबांनीं ठराविक धंद्यांचे मक्ते जवळ जवळ स्वतःकडेच घेतले होते असें म्हणण्यास हरकत नाहीं. हे धंदे ते इतरांना शिकवीत नसत; एवढेंच नव्हे तर आपण तयार केलेल्या वस्तु ठराविक मर्यादेच्या बाहेर विकीतहि नसत. परंतु १८७१ नंतर ही स्थिति पालटली. परक्या देशांतून जेव्हां विदेशी मालाचे पूर जपानांत लोटूं लागले, तेव्हां जपानी लोकांचे डोळे उघडले व स्वतःच्या उद्योगधंद्याची वाढ कशी करावी याचा ते विचार करूं लागले. परक्या देशांतील व्यापाऱ्यांबरोबर टक्कर देतां यावी म्हणून स्वतःचे उद्योगधंदे सुधारण्याचें त्यांनीं ठरविलें. परंतु नुसते स्वतःचे उद्योग धंदे सुधारून लष्करी व आरमारी खर्चाची तोंडमिळवणी करणें आपल्याला शक्य नाहीं, असें जपानच्या अधिकारी मंडळींना कळून चुकलें. जपानचीं लहान लहान कलाकुसरीचीं कामें सर्व जगात वाखाणलीं जात होतीं हें खरें; परंतु त्यांचा उपयोग वाढत्या खर्चाला तोंड देण्यास नव्हता,- तेव्हां लोखंड आणि पोलाद हातीं घेतल्याशिवाय आपली उत्क्रांती होणार नाहीं हें कळून आल्यामुळें सरकारनें व्यापार धंदे सुधारण्याचें विस्तृत प्रमाणावर धोरण आंखलें. या सरकारच्या धोरणामुळेंच आजकाल जपानची उन्नती झाली आहे. जपानचें धोरण खालील प्रकारचें आहे.

( १ ) जपाननें आपल्या देशांतील बुद्धिमान लोकांना यूरोपमध्यें पाठवून तेथील उद्योगधंद्यांचें निरीक्षण करण्यास व रिपोर्ट करण्यास सांगितलें. ह्या निरीक्षणांत जे धंदे जपानला करतां येतील तेवढ्यांचाच समावेश करण्याची त्यांना ताकीद देण्यांत आली होती.

( २ ) स्वतःच्या लोकांना हे धंदे शिकतां यावेत म्हणून परके तज्ञ पुष्कळ पगार देऊन जपानांत आणले व त्यांच्याकडून कारखाने उभारण्यांत आले.

( ३ ) औद्योगिक शिक्षणाचा सर्वत्र प्रसार करण्यांत आला.

( ४ ) प्रथम सारे उद्योगधंदे स्वतःच्या ताब्यांत घेऊन नंतर ते खासगी व्यापाऱ्यांकडे सोंपविण्यांत आले.

( ५ ) खासगी जुन्या धंद्यांना भरपूर पैसे पुरविले.

( ६ ) उद्योगधंद्यांचा उत्कर्ष व्हावा, म्हणून बँकेची व चलनी नाण्यांची योजना करण्यांत आली.

अशा प्रकारची योजना तयार केल्यावर १८७३ सालीं व्हीएन्ना शहरीं भरलेल्या प्रदर्शनांत जपाननें आपल्या देशांत तयार झालेल्या सुंदर वस्तु पाठविल्या व ७० लोक स्वतःच्या खर्चानें पाठविले. या लोकांवर डॉ. वॅग्नर नांवाच्या जर्मन गृहस्थाला मुख्य म्हणून पाठविण्यांत आलें. या ७० गृहस्थांनीं परत आल्यावर उद्योगधंदे वाढविण्याकरितां सर्व योजना केली.

यानंतर जपाननें प्रत्येक प्रदर्शनांत आपला माल पाठविण्याची संधि दवडली नाहीं. जपाननें या प्रदर्शनांत आपल्याकडील कलावतूंच्या, धातूंच्या व जरीच्या मालाला पुष्कळ मागणी होते असें पाहिल्यावर, या मालाची प्रसिद्धि करण्याकरितां एक मंडळ स्थापन केलें. या प्रयत्नांत सरकारनें व्यापाऱ्याचा पेशा पत्करला व लोकांना वळण लाऊन दिलें म्हणूनच त्यांना यश आलें.

सरकारनें प्रथम सिमेंट, कागद, पोलाद, काड्याच्यापेट्या, कागद, रेशीम वगैरेचे कारखाने सुरु केले. त्यांत सरकारला पुष्कळ यश आलेलें पाहून लोकांच्या तोंडाला पाणी सुटलें. सरकारला हीच गोष्ट पाहिजे होती.

व्यापाऱ्यांना कारखान्यांची अशी जरूरी भासूं लागलेली पाहून सरकारहि एक एक कारखाना त्यांच्या ताब्यांत देण्याचा विचार करूं लागलें. सरकारच्या या प्रोत्साहनानें व मदतीनें अनेक कारखाने निघूं लागले. वाफेचीं जहाजें हीं याच प्रोत्साहनाचें फळ होय जगांत प्रसिद्ध असलेल्या निपोनयुसेन कैशा, ओसाका शोसेन कैशा, टोयो किसेन कैशा, ह्या कंपन्या अस्तित्वांत आल्या. १८७७ सालीं जपानमध्यें १२० इंग्रजी इंजिनियर्स होते, परंतु १८८० सालीं म्हणजे फक्त ३ च वर्षांनंतर ३ इंजिनीअर्स जपानमध्यें शिल्लक उरले. जहाजांच्या बाबतींत जपाननें इतकी विलक्षण प्रगती केली कीं, जगांत जपानचा तिसरा नंबर लागला.

जपानची ही प्रगती, धंदेशिक्षण सर्व लोकांना दिल्यामुळें झाली. तेथील मुलांना धंदेशिक्षण अत्यंत कळकळीनें देतात. या मुलांना इतर शाळेचा अभ्यास यावा लागतोच असें नाहीं. थोडेंसें गणित, थोडेंसें वाचन व लेखन आलें म्हणजे काम भागतें. ही औद्योगिक क्रांती झाल्यामुळें जपानमध्यें निरनिराळ्या संस्था अस्तित्वांत येऊं लागल्या, १८७४ मध्यें शेतकी शाळा १८७७ जंगलविषयक शाळा, १८७५ मध्यें व्यापारी शाळा, १८८१ मध्यें कारागिरांची शाळा वगैरे संस्था स्थापण्यांत आल्या.

जपानांतील धंदेशिक्षणाच्या शाळांचा आपण आतां विचार करूं. धंदेशिक्षणाचा आपल्याकडे जसा कोता अर्थ करतात, तसा तेथें करीत नाहींत. धंदेशिक्षणांत शेतकी, व्यापार, जनावरांच्या रोगांची माहिती, नौकानयन, उद्योगाच्या शाखांची सारी माहिती, इंजिनिअरिंग इत्यादि विषय येतात. या धंदेशिक्षणाचे चार विभाग आहेत; पहिला विभाग विश्वविद्यालयाचा, दुसरा हायस्कूलचा, तिसरा मिडलस्कूलचा व चवथा प्राथमिक शाळांचा होय. या शाळांचे पुनः निरनिराळे विभाग आहेत व त्यांत निरनिराळ्या विषयांचें शिक्षण दिलें जातें.

जपानमध्यें विशिष्ट धंदेशिक्षण देणाऱ्या, वरील सामान्य शिक्षण देणाऱ्या शाळांपेक्षां निराळ्या शाळा आहेत. त्यांची संख्या १२२२५ आहे. या शाळांत दहा लाख विद्यार्थी शिक्षण घेतात. वरील शाळांपैकीं १४६ शाळांत इंजिनिअरिंगचें, विणण्याचें व कातण्याचें शिक्षण देतात. ८८२७ शेतकी शिकवितात. १५० समुद्राच्या संबंधींचें शिक्षण देतात. २७२ शाळांत व्यापारविषयक शिक्षण देतात व बाकीच्या शाळांत धुण्याचें, शिवण्याचें, स्वयंपाकाचें शिक्षण देतात.

ज्यांना पुढील बौद्धिक शिक्षण घ्यावयाचें नाहीं, त्यांच्याकरितां या शाळांची योजना आहे. या शाळांत येणारे विद्यार्थी द्रव्यार्जन कसें करतां येईल याकडे विशेष लक्ष पुरवितात, तथापि याहि शाळांतून राष्ट्रीयत्वाची वाढ व देशाभिमान कसा उत्पन्न होईल याकडे लक्ष नसतें असें नाहीं. या वर दिलेल्या शाळांचे दोन विभाग आहेत, पहिला प्रौढ विभाग व दुसरा प्राथमिक विभाग होय.

प्राथमिक-विभागांत खालील शिक्षण मिळतें.

१ नीतिपाठ.
२ जपानी भाषा.
३ गणीत.
४ शास्त्र.
५ मुख्य धंद्यांचे विषय.

**प्रौढविभाग.**

१ नीतिपाठ.
२ जपानी भाषा.
३ गणीत.
४ धंद्यांचे विषय.

याशिवाय प्रत्येक शाळेंत जरूरीप्रमाणें अधिक विषयही शिकविण्यांत येतात. प्राथमिक विभाग २ वर्षांत संपतो व प्रौढ विभाग ३ वर्षांचा असतो.

हें धंदेशिक्षण देतांना मुलांच्या आरोग्याकडे विशेष लक्ष पुरविलें जातें. कोणत्याहि मुलानें धंदेशिक्षणाच्या

मागें लागून स्वतःची प्रकृति खराब करतां कामा नये असा तिकडे सक्त नियम असतो. धंदेशिक्षणाबरोबर नीतिपाठाची योजना केलेली पाहून जपानी लोकांच्या बुद्धीचें कौतुक करावेंसें वाटतें. धंदेशिक्षणाच्या मागें लागलेलीं मुलें आधिभौतिक विचारापलीकडे जात नाहींत, असा जगाचा अनुभव असल्यामुळें, त्या शिक्षणाबरोबर अध्यात्मिक शिक्षणाची जोड अवश्य असावी हें तत्त्व जपानला चांगलें पटलें आहे.

आमच्या देशांत धंदे शिक्षणाची काय सोय आहे याचा विचार केला म्हणजे मनाला उद्विग्नता येते. येथील सरकार आम्हांला धंदेशिक्षण देण्याऐवजीं आम्हांला त्यांचा आयता माल घेणारें उत्तम गिऱ्हाइक बनवित असून दर वर्षी आमचे पासून कोटयावधी रुपये नेत आहे. आम्हांला जें धंदेशिक्षण देण्यांत येतें तें काय किंमतीचें असतें हें सांगावयास नकोच. तेव्हां आम्ही आमच्या उन्नतीकरितां सरकारवर अवलंबून न राहतां स्वावलंबी बनलें पाहिजे, व स्वतःच आपल्या उन्नतीचा मार्ग शोधला पाहिजे. या लेखमालेपासून स्वावलंबी जपानमध्यें व परावलंबी हिंदुस्थानमध्यें जमीन-अस्मानाचें अंतर कसें आहे हें वाचकांच्या लक्षांत येईलच. तेव्हां आम्ही जागृत होऊन धंदे-शिक्षणाकडे वळलें पाहिजे; व शाळेंतील बौद्धिक शिक्षणाला रजा दिली पाहिजे, म्हणजे आपणहि जपानच्या पावलांवर पावलें टाकूं लागूं.

---

# बेंजामिन फ्रँकलिन.

( ले० ज. शि. रेगे. )

बेंजामिन फ्रँकलिन याचा जन्म इ. स. १७०६ मध्यें उत्तर अमेरिकेंत बोस्टन या शहरीं झाला. त्याचा बाप गरीब होता. तो साबू व मेणबत्त्या करीत असे. बेंजामिन फ्रँकलिन जेव्हां ८ वर्षांचा झाला तेव्हां त्याच्या बापानें त्याला शाळेंत घातलें. शाळेंत गेल्यावर थोड्यांच दिवसांत त्यानें पहिला नंबर पटकाविला. परंतु दोन वर्षांनीं त्याच्या बापानें त्याला शाळेंतून काढलें व त्याला आपल्या कारखान्यांत काम करावयास ठेवलें

बेंजामिनला मेणबत्त्या करण्याचा कंटाळा येत असे व त्याला वाचनाची फार आवड होती म्हणून एक दोन वर्षांनंतर, त्याच्या बापानें त्याला त्याच्या वडील भावाच्या छापखान्यांत ठेवलें. तो लवकरच त्या धंद्यांत प्रवीण झाला आणि स्वभावतःच काम करण्यांत चलाख आणि तत्पर असल्यामुळें त्याच्या भावाला त्याचा धंद्यांत फार उपयोग होऊं लागला. परंतु तो तेथेंही वेळांत वेळ काढून कांहीं तरी वाचीत असे. त्यानें आपल्या शक्तीप्रमाणें पुष्कळशीं पुस्तकें खरेदी केलीं व कांहीं लोकांकडून उसनीं घेतलीं. कांहीं काळानंतर तो आपले विचार कधीं कधीं गद्यांत व पद्यांत लिहूं लागला. इ. स. १७२० मध्यें त्याच्या भावानें अमेरिकेंत एक वर्तमानपत्र सुरू केलें. पहिल्यांदा बेंजामिन आपलें नांव न कळवितां कांहीं लेख त्या वर्तमानपत्रांत लिहूं लागला. ते लेख लोकांना फारच आवडूं लागले.

जेव्हां तो सत्रा वर्षांचा झाला तेव्हां कोठेंतरी छापखान्यांत नोकरी मिळेल या आशेनें फिलाडेल्फिया येथें गेला. त्यानें जातांना आपल्याबरोबर अंगांत घातलेल्या कपड्यांखेरीज करून थोडेसे पायमोजे व शर्ट आणि फक्त ६ शिलिंगच कायते बरोबर घेतले होते. इ. स. १७२४ त तो लंडनला गेला. तेथें त्यानें पुष्कळ छापखान्यावाल्यांबरोबर काम केलें व त्या धंद्यांत

प्राविण्य संपादिलें. त्याची रहाणी साधी होती. तो कधींही पैसे उधळीत नसे व आपल्या प्राप्तींतून दरवेळीं कांहीं तरी शिल्लक ठेवीत असे.

वयाच्या विसाव्या वर्षीं फ्रँकलिन छापखान्याच्या कलेंत प्राविण्य संपादून फिलाडेलफियाला परत आला. तेथें त्यानें एक छापखाना काढला. तो आपलें काम चोख बजावित असे, व आपल्या गिऱ्हाइकांशीं चांगल्या तऱ्हेनें वागत असे, त्यामुळें त्याचे शेजारी पाजारी आपलीं सर्व छापखान्याचीं कामें त्याजवळ देत. कांहीं दिवसांनीं त्यानें एक वर्तमानपत्र काढलें. तें तो इतक्या चांगल्या रीतीनें चालवीत असे कीं, लवकरच त्याचा खप जारीनें होऊं लागला व त्यांत त्याला पुष्कळ नफाही झाला. तो मुळींच गर्विष्ठ नव्हता. जरी तो इतका श्रीमंत झाला होता तरी आपल्या छापखान्या-साठीं विकत घेतलेले कागद तो स्वतः हातगाडीनें घरीं आणत असे.

फ्रँकलीन नेहमीं सकाळीं पांच वाजतां उठत असे. त्यानें दिवसाचे कांहीं ठराविक भाग पाडले होते व त्या वेळीं तो ठराविक कामें करीत असे. ह्याप्रमाणें दर-रोज त्याचा कांहीं वेळ वाचनांत जात असे आणि त्यामुळें लवकरच त्यानें फ्रेंच, इटालियन आणि स्पॅनिश या भाषेंत प्राविण्य मिळविलें. तो जितकी आपली बुद्धि-मत्ता वाढविण्याविषयीं जपत असे, तितकाच तो आपल्या नैतिक वागणुकीविषयीं जपत असे. त्यानें एक पत्रक केलें होतें व त्यांत त्यानें निरनिराळ्या गुणांचीं नांवें लिहिलीं होतीं. तीं नांवें पुढीलप्रमाणें होतः—न्याय, उद्योग, काटकसर, नेमस्तपणा, टापटीप आणि वेळेचा व्यय यांतील प्रत्येकाला त्यानें एकेक धर्मग्रंथांतील आज्ञेचा आधार घेतला, व प्रत्येक गुणावर तो एकेक आठवडा विचार करी. त्यानें हा क्रम, ते गुण आपल्या अंगीं येईपर्यंत पुष्कळ वर्षें चालविला होता.

वयाच्या तिसाव्या वर्षीं सर्व लोक त्याला इतका मान देऊं लागले कीं, त्यांनीं त्याला त्या प्रांताचा हाऊस ऑफ असेम्ब्लीचा क्लार्क निवडिलें त्याबद्दल कांहीं लोक त्याचा द्वेष करूं लागले. परंतु त्यानें आपला स्वभाव कधींही सोडला नाहीं. त्याचा जे द्वेष करीत असत त्यांना आपले मित्र बनविण्याची त्यानें पुष्कळ खटपट केली. आपल्या अंगीं असलेल्या गुणांचा उपयोग आपल्या बांधवांचें कांहीं तरी कर्तव्य करण्याकरितां आहे हें तो कधींही विसरला नाहीं. त्यानें शहराचें पोलीस-खातें सुधारलें. त्यानें माणसाकरितां एक हॉस्पिटल स्थापन केलें, तरुणांकरितां त्यानें एक हायस्कूल उघ-डलें. वाङ्मय आणि शास्त्र हीं वाढावीं म्हणून एक सोसायटी त्यानें उभारली.

इ. स. १७५२ त फ्रँकलिननें पतंगाच्या साहाय्यानें गडगडणाऱ्या ढगांतून वीज काढली. त्यामुळें त्यानें असा शोध लावला कीं वीज ( lightening ) आणि विजेचें द्रव्य ( Electric fluid ) हीं एकच होत. नंतर त्यानें असा शोध लावला कीं, लोखंडाचे दांडे घराला लाविले असतां त्यांचें विजेपासून रक्षण करतां येईल. ह्या शोधामुळें फ्रँकलिनचें नांव सर्व युरोप खंडांत प्रसिद्ध झालें आणि त्यामुळें प्राणी आणि मालमत्ता यांचें विजेपासून रक्षण होऊं लागलें.

फ्रँकलिन सामाजिक कार्यांत भाग घेत असे. युनायटेड स्टेट्स इंग्लंडपासून निराळें झाल्यानंतर त्यानें कित्येक वर्षें युनायटेड स्टेट्सचा फ्रान्सचा वकील या नात्यानें काम केलें. त्याच्या बापानें त्याला एक सॉलोमनची म्हण शिकविली होती ती अशीः— " जो मनुष्य आपल्या धंद्यांत तत्पर असतो, तो एखाद्या हलक्या माणसापुढें उभा न राहतां राजापुढेंच उभा राहील " ह्या म्हणीचा तो स्वतःच एक उदाहरण होता.

इ. स. १७९० त फ्रँकलिन वयाच्या ८५ व्या वर्षीं आपल्या देशाला व मनुष्यजातीला उपयोगी पडून वारला. त्यानें आपल्या लेखनांत आपली उन्नती कशी झाली हें सांगितलें आहे. त्यात तो लिहितो, ' श्रीमंत होण्याचीं दोन मुख्य कारणें म्हणजे, उद्योग व काटकसर हीं होत, म्हणजे वेळेचा व पैशाचा

दुरुपयोग न करतां दोघांचाही सदुपयोग करणें हें होय. ह्या जगांत उद्योग आणि काटकसरीनंतर एखाद्या तरुणाच्या उन्नतीचीं दुसरीं कारणें म्हणजे आपलें काम वेळच्या वेळीं व न्यायानें करणें हें होय.

जरी उद्योग, काटकसर आणि शहाणपण ह्या चांगल्या गोष्टी आहेत, तरी नुसतें त्यांच्या वरतींच अवलंबून चालणार नाहीं. कारण ईश्वराच्या आशिर्वादाशिवाय आपले सर्व प्रयत्न निष्फल होतील. म्हणून नम्रतेनें ईश्वराची करुणा भाकून त्याचा आपल्या प्रत्येक कार्याविषयीं आशिर्वाद मागावा.

## सवतीचा गोंधा.

### दोन अंकी नाटक.

( लेखकः—एक समाजनिरीक्षक. )

अंक २ रा

प्रवेश १ ला

(कॉलेजच्या बोर्डींगांतील खोली सहाध्यायी बसले आहेत.)

**एक म्हणतो**—कायरे, गोविंद कोठें गेला!

**दुसरा**—आज सेशनमध्यें त्याच्या तर्थिरूपाच्या खटल्याची चौकशी होती, तिकडे गेला असेल.

**तिसरा**—काय पहा, मजा आहे! बापानें आज ४ वर्षांत मुलगा जिवंत कीं मेला--ह्याची पूसतपास देखील केली नाहीं! पण मुलाला केवढी काळजी पहा. आज महिना झाला सारखा ह्याच्या त्याच्या पायां पडत हिंडतो आहे.

**पहिला**—खरोखरीच, मोठा सुशील बरं कां! गर्व तर त्याला बिलकूल नाहीं. परवां त्याच्या प्रामाणिकपणाबद्दल प्रो. गुणज्ञ ह्यांनीं त्याची फार स्तुति केली. तो पहा आलाच.

[ गोविंद येतो ]

**दुसरा**--कायरे बुवा! गोविंदा, काय झालें?

**गोविंद**—कांहीं समजलें नाहीं. पुढच्या तारखेला निकाल सांगणार म्हणतात. काय बापूसाहेबांच्या प्रयत्नाला यश येईल तें खरं! ( डोळ्यांतून पाणी आणतो ) आपल्या आईसाहेबांचें दुःख पाहवत नाहीं! काय करावं!

**हरी**—मरेना ती तिकडे, तुला काय करायचं आहे! द्वाड कोठली! अरे तुला आजपर्यंत तिनें कमी कां छळलं!

**गोविंद**—( रागानें व खिन्नतेनें ) म्हणतो—अरे, असें काय म्हणतोस! तुला कांहीं वाटत नाहींरे. होतं माणसाकडून, त्यांतून स्त्रीजात. दूर दृष्टि कमी. म्हणून काय आपणही आपला पुत्रधर्म पाळूं नये काय!

**त्र्यंबक**—पाळा, पाळा तर! तुम्ही पडलांत रामावतार. त्या तुमचं लग्न करणार होत्याना, म्हणून आली असेल कींव!

**माधव**—खरं कायरे गोंदू!

**गोंदू**—होय एकदा मला विचारलं होतं खरं. पण मीच तें नाकारलें. म्हटलं कशाला आपल्याबरोबर आणखी दुसऱ्या माणसाला संकट...आपल्यालाच तर त्यांच्या मनासारखं वागतां आलं नाहीं.

**हरी**—घरांत राबावयाला एखादी पोर पाहिजे होती ना? शिवाय बाहेरून नांवलौकिकाची जोड.

**गोविंद**—कोणास माहीत? असेल कांहीं, तुला काय करायचं आहे, ह्या चर्चेशीं?

( इतक्यांत घंटा होते सगळे उठतात )

प्रवेश २

( दादासाहेबांचें घर—दादासाहेब व बाईसाहेब साचिंत बसले आहेत. इतक्यांत बापूसाहेब येतात, त्यांस पाहून बाईसाहेब आंत जातात. थोड्याच वेळांत सावित्रीबाई येतात. )

**दादा**—या, बापूसाहेब, या.

**बापू**—काय चाललं आहे ?

**दादा**—कांहीं नाहीं. बसलों होतों पस्तावा करीत गोंदूनें आपल्या सद्वर्तनानें आम्हांस लाज आणली, पण आम्ही मात्र जन्म देऊन कांहीं केलें नाहीं !! रडूं लागतात.

**बापू**—चालूच आहे. इतकं कांहीं वाटायला नको. प्रपंचांत अशा चुका होतातच. कोणी परका कां आहे? त्याला आपलेसं करायला किती वेळ लागणार ? असो. पण आज आम्ही उभयतां आपणाकडे आलों आहों; तें अशाकरितां कीं, दादा काय, बोला. काय आज्ञा असेल तसं—

**बापू**—छे छे आज्ञा कसली ! विनंति आहे कीं, कृपाकरून आमच्या यमूताईला आपल्या पदरांत

**दादा**—म्हणजे काय बापू, ( इतक्यांत दारांतून मध्येंच )

**बाईसाहेब**—सावित्री बाईनीं तर आमची थट्टाच मांडली आहे. काय म्हणे तुमच्या **गोविंदाला** जांवई करायचा विचार आहे.

**दादा**—बापू, तुमच्याच कृपेनें हे दिवस पाहिले, फार उपकार झाले, तें काय बोलावं. आंता आमची स्थिति तुम्ही पाहतांच आहां. कसें तरी शेतीवाडीच्या शें दोनशें उत्पनांतून दिवस काढतों. होतं नव्हतं तें गेलं ! ! त्यांतून आमच्या घरीं तुमच्या यमूला सुख लागणार नाहीं. दुसरं एखादं सुस्थळ—

**सावित्रीबाई** ( दारांतून )—तसं कांहीं नाहीं. बाईसाहेब तर मला बहिणीसारख्या आहेत.

**बाईसाहेबः**—नाहीं, नाहीं, तुम्ही आपल्या सद्वर्तनानं आणि उपकारानं मला आपलं करून घेतलं केवळ गोंदूच्या गुणाकडे पाहून मानलेल्या बहिणीच्या पश्चात् सख्या बहिणीपेक्षां जास्त मानानं ठेवलं. बाकी दुसरं कोणी कोणाचं नव्हतं. सगळा अनुभव आला ह्या प्रसंगांत ! !

**दादासाहेबः**—बापू, गोंदू सर्वस्वी आपलाच आहे, आम्हांला नसतां मोठेपणा द्यावयाचा असेल, तर द्या बापडा ! आम्ही कांहीं त्या मानाला योग्य नाहीं, त्यालाच काय तें विचारा आणि ठरवा.

**बापूः**—गोंदूचं पत्र आलं आहे कीं,—"वडिलांच्या आज्ञेशिवाय मला कांहीं करतां येत नाहीं."

( दादासाहेबांस गहिंवर येतो. )

**बाईसाहेबः**—आमचा गोंदू किनई फारच मर्यादशील व शहाणा हो.

**सावित्रीबाईः**—भावोजी, पैशाकरितां का दुसरं स्थळ पाहायचं? गोदूपासून माझ्या यमूला चांगलं सुखं मिळेल व आम्ही निष्काळजी होऊं. आम्हांला तरी यमूशिवाय दुसरं कोण आहे ? आपण व बाईनीं तिला आपली म्हणावी, एवढंच मागणं आहे.

**दादासाहेब** ( पत्नीकडे पाहून )—कसं कायग ! तूंच काय तें सांग. सून वागवायची तुला ! आम्हांला काय !

**बाईसाहेब**—सांगायचं काय ! यमूला कांहीं वागवायला नको. तीच चार माणसं वागवील अशी सुलक्षण पोर आहे.

**दादासाहेब**—बापू, जशी आपली इच्छा. आम्ही आपल्या विचाराबाहेर नाहीं.

**बापू**—बरें, तर येतों.

( दोघेही निघून जातात )

**दादासाहेब**—( पत्नीस म्हणतात ) पाहिलंसना ! कशीं घरंदाज माणसं आहेत तीं ! !

प्रवेश ३

( गोविंदराव ऊर्फ बाबासाहेब मामलेदार ह्यांचा माडीवरील बंगला. )

( **त्र्यंबकराव** येतात त्यास पाहून—थोड्या वेळानें ओळख पटल्यावर— )

**बाबासाहेब**—या, हो त्र्यंबकराव या. असे असे इकडे खुर्चीवर या.

**त्र्यंबकराव**:—नको, नको मी आपला एथेंच बरा, ( गोविंदरावच्या तोंडाकडे निरखून पाहतात, पण चांगलीशी ओळख पटत नाहीं. )

**गोविंदराव**:—कां ! ओळख विसरलां वाटतें ?

**त्र्यंबकराव**:—( आश्चर्यानें व संकोचानें ) नाहीं बुवा,माफ करा. चांगलीशी ओळख पटली नाहीं. आपण फर्ग्युसनच्या बोर्डिंगमध्यें—

**गोविंदराव**:—अरे, भल्या गृहस्था इतक्या लवकर ओळख टाकलीस ? अरे, हा ' सवतीचा गोंद्या ' ना! साहजिक आहे. बरींच १०।११ वर्षे झालीं.

**त्र्यंबकराव**:—हो ! हो ! पण तुझ्यांत सर्वच स्थितींत बदल झाला बुवा ! चेहरान् शरीरन् काय, कशाला पहिलें स्वरूप पार बदललं, त्यामुळं ओळख पटली नाहीं.

**गोविंदराव**:—बरं पण आतां दूर कां ? ( हातानें धरून खुर्चीवर बसतात. ) कसं काय आतां कोठें ? काय चाललं आहे ? इकडे कोणीकडे ? सगळं कांहीं सांग.

**त्र्यंबकराव**—आतां उज्जनीस माधव-कॉलेजमध्यें असतों. २५० रु. मिळतात. इकडे उन्हाळ्याच्या सुटींत घरीं जायचं आहे. काल स्टेशनवर उतरलों, बाहेर घटकाभर गाडी सोडली. गांवांत आलों होतों कांहीं सामान घ्यावयाला, तों गाडीवान धांवत आला. म्हणतो कीं, " गाडी शिपायानें बिगारीस धरली. "

**गोविंदराव**—वहिनी आहेत काय बरोबर ?

**त्र्यंबकराव**—होय, मुलं ती—तेथेंच असतील.

**गोविंदराव**—शिपाय्, जा लवकर, अड्डयावर जाऊन ह्यांचं सामान नि माणसं घेऊन ये. उज्जनीचे पाहुणे म्हणून विचार. ( शिपाई जातो. )

**त्र्यंबकराव**—कसं काय गोंदू, आतां तर बरं आहे ना ? कॉलेज सुटल्यापासून कांहीं भेट नाहीं. आम्ही लागलों ह्या उद्योगात त्यांनून दूर गेलों आज योगायोगानें गांठ पडली. तूं मात्र प्रतिकूल परिस्थितींतून बरेंच नांव काढलेंस.

**गोविंदराव**—बापूसाहेबांची कृपा. नुसती कृपाच काय, सर्वस्वी ऋणी आहें. कृष्णरावाचे उपकार फार. कितीकांचे तरी आभार माझ्या डोक्यावर आहेत. हेडमास्तर किती उत्तम माणूस. मला वेळोवेळीं पुस्तकांची, पैशाची, कपड्यांची हस्तें परहस्तें किती मंदत केली म्हणून सांगू. आतां पेन्शन घेऊन आहेत. सगळ्यांची कृपा म्हणून हे दिवस.

**त्र्यंबक**—बरं असो तें. आपल्या मातुःश्री कोठें आहेत ? वहिनी, मुलं-बाळं ?

**गोविंदराव**—सगळं समजेल. आई एथेंच मजजवळ आहेत. वडील मात्र मागेंच वारले ! ४।५ वर्षे झालीं असतील. त्यांची मात्र कांहीं सेवा घडली नाहीं ! नाहीं म्हणायला काशीयात्रा मात्र करवली.

( इतक्यांत यमूताई नव्हे, सौ. यशोदाबाई, स्वतः फराळाचें घेऊन वर येतात. यजमानाजवळ परकं मनुष्य पाहून जरा चपापतात व लागलींच जाऊं पहातात. )

**गोविंदराव**—अहो, थांबा. अशा लाजता काय ? हा कोणी परका नाहीं. मोकाशांचा त्र्यंबक आठवतो काय ? तोच हा.

**यशोदाबाई**—होय का ? कुठं हिंदुस्तानांत असतात, म्हणून फार दिवसांपूर्वी ऐकलं होतं.

**त्र्यंबकराव**:—(निरखून पाहून अजमासानं भीतभीत म्हणतात. ) बापू साहेबांच्या यमूताई का आ—!

**गोविंदराव**—होय, होय. आमची मात्र ओळख पटली नव्हती अं ! ठीकच आहे.

( फार आनंद व आश्चर्य वाटून )

**त्र्यंबकराव**:—अरे वा! मोठाच योगायोग. गोविंदराव, तुम्ही भाग्यवान् खरे बुवा ! खूप भुलवलंस बापूसाहेबांना ?

**यशोदाबाई**—स्वार्थाचं का कोणाला सांगावं लागतं आणि तुम्हीच लहानपणीं म्हणत होतांना, लहानपणीं स्वभाव मोठा भोळसर म्हणून.

**त्र्यंबकराव**—ठीक, ठीक, ताई, तें असो; पण चांगलं झालं. आतां बापूसाहेब कोठें आहेत ?

**यशोदाबाई**—घरींच आहेत. शेतीबाडी, सावकारी करून. नुकतेच जपानहून आले आहेत. ( इतक्यांत बाईसाहेब जिन्यांतून हांक मारतात )—यमू, अग यमू ही खालीं कोणं मंडळी आली आहे, बघ कीं.

**गोविंदराव**:—त्र्यंबकची मंडळी आली असतील जा, बघ खालीं.

**यशोदाबाई**:—( तातडीनें जात जात ) भावोजी, आतां ८।४ दिवस मुक्काम बरं का. जायचं नाहीं अं ?

**गोविंदराव**:—आतां कुठं जातो इतक्यांत, चला. आपणही खालीं जाऊं.

( समाप्त. )

---

# श्रीदत्त जन्मकथा.

**( स्वागता-वृत्त. )**—( **कवयित्री**, सौ. गीताबाई काळे, असोदे. मु. नसिराबाद. )

१

तीर्थ उत्तम म्हणों जगतीं तें ।
रूप घेउनि वसे प्रभु जेथें ॥
पद्मजा बसुनिया चरणासी ।
रक्त तें निशिदिनीं चुरण्यासी ॥ १ ॥

२

मग्न जे तनु तया स्वरुपांत ।
पूज्य जे मुळिं न संशय यांत ॥
गंड अल्प न शिवे कधिं जीसी ।
गाणगापुरिं करी वसतीसी ॥ २ ॥

३

भार्जे सत्व-रत अत्रिमुनींची ।
गीर्णे जी बहुत पुत्रवतींची ॥
रम्य सांखळ धरी स्वपदांत ।
थीर्तें जींत प्रतिमा दिसतात ॥ ३ ॥

४

भीमकी, गिरिसुतादि तयांत ।
मान्य त्या, बघुनि नारद जात ॥
बागडा ! कलह थोर रचाया ।
ईश-विष्णु-रमणी खिजवाया ॥ ४ ॥

५

गर्व का तुम्हि ? तुम्हां पदिं घाली ।
रक्षितीं पति न का निज-वाली ॥
गेहिनी अधिक का अनुसूया ? ।
यापुढें कुणि न वंदिल जाया ॥ ५ ॥

६

नारदीय वचनें खिजलेल्या । कि शा...
श्रीमती , किमपि तुष्ट कराया ॥
दत्त-ताप, सति-सत्व हराया ।
चक्रपाणि नटला यति-काया ॥ ६ ॥

७

रिक्त-चित्त विधि शंकरही ते ।
ग्रस्त जाति मुनिच्या सदनातें ॥
अत्रि-पत्नि नमुनी यतिरायां ।
तिष्ठली, वदति सत्व हराया ॥ ७ ॥

८

शक्त होसि तरी दे सति भिक्षा ।
यत्नतः करि महद्व्रत-रक्षा ॥
रुद्र विष्णु विधि आठव चित्तीं ।
चोखेळे ! " वसन-हीन " च हस्तीं ॥८॥

९

लाजली परि करी वसनांत ।
दूर, ' घ्या यति ' म्हणे जंव त्यातें ॥
तों लगेच यति बालक झाले ।
दत्तरूप जगतांतरिं आले ॥ ९ ॥

---

१ गर्व २ भार्या, पत्नि ३ प्रसिद्ध ठाकुक असलेली ४ शांत ५ खिळाड ६ निंद्य ७ साध्वी स्त्री, पवित्र स्त्री ८ लक्ष्मी, उमा, सावित्री ९ सात्विक स्त्रिये !

# न्यायाधीशाचें चातुर्य.

गोविंदराव नांवाचे एक गृहस्थ मुंबईस रहात होते. त्यांची बायकामुलें व आईबाप सातान्यास घरीं रहात. गोविंदराव, हे मुंबईस एक लहानसे व्यापारी होते. त्यांची मिळकत जरी फार नव्हती, तरी थोडीहि नव्हती. त्यांना धंद्यांत महिन्याला दोन तीनशें रुपयांची प्राप्ती होई. ते आपल्या गांवाहून नुक्तेच आले होते; आणि आपल्या बायका-मुलांना लवकरच मुंबईस आणण्याच्या बेतांत होते. एके दिवशीं गोविंदराव संध्याकाळच्या वेळीं दुकानावरून घरीं आले. घरीं आल्यावर थोड्याच वेळानें त्यांना एक तार आली. त्या तारेंत " मुलगा प्लेगनें लागला आहे, तावडतोब निघून यावें " असा मजकूर होता. हा मजकूर वाचतांच गोविंदरावांच्या तोंडचें पाणी पळालें. काय करावें, हें त्यांना सुचेना. त्यांनीं लागलाच सातारला जावयाचा बेत केला. त्यांच्याजवळ एक हजारांवर कांहीं रुपये होते. त्यापैकीं त्यांनीं ५०।६० रुपये घेऊन एक हजार रुपये कोणातरी मित्राच्या घरीं सुरक्षितपणें ठेवावे असें ठरविलें. बरोबर रुपये नेण्याची सोय नव्हती, अगर मुंबईसारख्या ठिकाणीं घरींहि एवढा ऐवज ठेवण्याची सोय नव्हती. म्हणून ते आपला जिवलग मित्र जो सदाशिवराव त्याजकडे गेले. सदाशिवराव जवळच रहात होते. गोविंदराव जेव्हां सदाशिवरावांच्या घरीं गेले, तेव्हां ते व त्यांची बहीण शालिनी दिवाणखान्यांत गोष्टी सांगत बसले होते. शालिनीच्या दुर्दैवामुळें तिचे पती परलोकवासी झाले असल्यामुळें ती आपल्या भावाजवळच राहिली होती. शालिनीचें वय २०।२१ वर्षांचें होतें. ती फार चांगल्या स्वभावाची व शीलाची होती. सदाशिवरावहि बोलून चालून चांगले गृहस्थ होते. एकंदर त्यांचा व गोविंदरावांचा चांगला घरोबा असल्यामुळें सदाशिवरावाकडे गोविंदराव गेले.

सदाशिवरावांनें गोविंदरावाना आलेले पाहतांच त्यांचें चांगलें आगत स्वागत केलें, व कमी जास्त बातमी काय आहे वगैरे चवकशी केली. गोविंदराव घाबऱ्या घाबऱ्या आल्यामुळें शालिनीबाईहि घाबरून गेल्या. गोविंदरावांना अगदीं थोडा वेळ असल्यामुळें त्यांनीं थोडक्यांत सारी हकीकत कळविली. मजजवळ असलेले हजार रुपये मी गांवाहून येईपर्यंत संभाळून ठेवा, म्हणून सांगितलें. सदाशिवरावांनीं घर तुमचेंच आहे, वाटेल तेव्हां घेऊन जा, कांहीं हरकत नाहीं, तुमच्या तिजोरींतच पैसे आहेत असें समजा, इत्यादि सांगून पैसे ठेऊन घेतले. सदाशिवरावांनीं आतां जेऊन जा म्हणून त्यांना आग्रह केला, परंतु त्यांचें सारें लक्ष गाडीकडे लागलें असल्यामुळें त्यांना कांहींच सुचेना. शालिनीबाईनींहि त्यांना चहाचा आग्रह चालविला; परंतु त्यांनीं चहाहि न घेतां आपला रस्ता सुधारला. जातांना शालिनीबाई म्हणाल्या, 'कांहीं काळजी करूं नका परमेश्वरकृपेनें तुमच्या मुलाला आराम वाटेल.' नंतर गोविंदराव आपल्या घरीं गेले व सामानसुमान घेऊन स्टेशनकडे वळले.

गोविंदराव गेल्यावर सदाशिवराव शालिनीला म्हणतात " काय वेडा आहे माणूस, एकहजार रुपये मजजवळ ठेवले; पण त्याची बोटभर पावतीहि मागितली नाहीं. " त्यावर शालिनी म्हणाली, " आपला त्यांना चांगला विश्वास आहे म्हणून त्यांना पावतीची जरुरी वाटली नाहीं. अशा जर विश्वासांतलीं माणसें एकमेकांजवळ पावती मागूं लागलीं, तर जग कसें चालेल ? " नंतर सदाशिवरावांनीं शालिनीला ते पैसे

पेटींत नीट ठेऊन देण्यास सांगितलें. पुढें त्यांचें बराच वेळ इकडचें तिकडचें संभाषण झालें.

गोविंदराव दुसरे दिवशीं दोनप्रहरीं साताऱ्यास येऊन पोहोंचले. गोविंदरावांची घरीं पोहचेपर्यंत सारखी छाती धडकत होती. कदाचित् आपण जाण्यापूर्वीच मुलगा वारला असला तर कसें होईल, इत्यादि विचार त्यांच्या मनांत चालू होते. परंतु परमेश्वरकृपेनें तसें कांहीं झालें नाहीं. उलट त्यांच्या मुलाला उतार पडूं लागला होता, त्यामुळें घरीं पोहोंचल्यानंतर थोडें बरें वाटलें. दोन तीन दिवस मोठ्या काळजींत गेल्यावर त्यांच्या मुलाला चांगलाच आराम वाटला. त्यामुळें गोविंदरावांना व त्यांच्या कुटुंबाला कोण आनंद झाला असेल याचा विचार वाचकांनींच करावा.

देवाचे नवस वगैरे फेडणें झाल्यावर १५ दिवसांनीं गोविंदरावांनीं सगळ्या मंडळींना मुंबईस नेण्याचा बेत केला. त्याप्रमाणें तयारी होऊन योग्य वेळीं मंडळी मुंबईस पोहोंचली.

मुंबईस आल्यावर दोन चार दिवसांनीं गोविंदराव आपले मित्र सदाशिवराव यांजकडे ठेवलेले पैसे मागण्यास गेले. परंतु सदाशिवरावांनीं 'कसले पैसे, कोणाचे पैसे, कोणी ठेवले होते,' वगैरे प्रश्न विचारून त्यांना वेड्याच्या कोटींत काढलें. सदाशिवराव म्हणाले, 'अहो, तुमच्या मुलासंबंधाची तार आलेली वाचून तुमचें डोकें कदाचित थाऱ्यावर नसेल आणि तुम्ही कोणाकडे तरी पैसे ठेवले असतील. तेव्हां नीट विचार करून मग काय तें बोला,' हें उत्तर ऐकून गोविंदराव अगदीं आश्चर्यानें थक्क होऊन गेले. ते म्हणाले, 'सदाशिवराव, अहो, त्या दिवशीं शालिनीताई व तुम्ही येथें बसले असतांना मी तुमच्याजवळ पैसे आणून दिले आणि आतां असें बोलतां याला काय म्हणावें. विचारा, पाहिजे तर तुमच्या बहिणीला विचारा, ती तुम्हांला चांगली आठवण करून देईल. सदाशिवराव मी तुम्हांला चांगला माणूस समजत होतों, माझा तुमच्यावर पूर्ण विश्वास होता, म्हणून मी तुमच्याकडे पैसे आणून दिले. पण आतां तुम्ही मला चांगलेंच प्रायश्चित्त दिलेंत. अजूनहि विचार करा, शीलभ्रष्ट होऊं नका, शालिनीताईला विचारा.' यावर सदाशिवरावानें पहिल्याच प्रकारचें उत्तर दिलें. नंतर जास्त बोलण्यांत अर्थ नाहीं असें पाहून गोविंदराव तेथून निघून गेले. इकडे शालिनीला हें भावाचें कृत्य पसंत पडलें नाहीं, हें सांगावयास नकोच. तिनें त्यांची चांगली कानउघाडणी केली, परंतु ती कितीं केलें तरी अबला, आणि त्यांतून विधवा, मग तिला कोण विचारतो.

दुसरे दिवशीं गोविंदरावानें एका वकीलाचा सला घेऊन कोर्टांत फिर्याद दाखल केली. कांहीं दिवस लोटल्यावर त्यांची फिर्याद सुनावणीस निघाली. न्यायाधीशांच्या व गोविंदरावांच्यामध्यें खालील प्रश्नोत्तरें झालीं.

गोविंद—मी शुक्रवार ता. १७ रोजीं रात्रीं आठ वाजण्याच्या सुमारास घरून तार आल्यामुळें गांवीं जाण्यास निघालों. परंतु त्या वेळीं मजजवळ असलेले हजार रुपये इतर कोठें ठेवणें शक्य नसल्यामुळें मी माझे मित्र सदाशिवराव यांजकडे गेलों व त्यांच्या बहिणीसमक्ष त्यांच्या जवळ हजार रुपये ठेवले व मीं परत आल्यावर पैसे नेईन असें म्हटलें, परत आल्यावर, पैसे मागण्यास गेलों असतां त्यांनीं मला वेडें म्हटलें व दुसरीकडे कोठें तरी मी पैसे ठेवले असतील असें म्हणूं लागले. तेव्हां माझे पैसे मला परत मिळावेत.

न्यायाधीश—तुम्ही पैसे ठेवले याबद्दल पावती घेतली होती का?

गोविंदराव—छे, मी पावती घेतली नाहीं. ते माझे मित्र असल्यामळें मला पावती घेण्याची अवश्य कता वाटली नाहीं.

न्यायाधीश—बरें, तसे पैसे ठेवतांना दुसरें कोण जवळ होतें?

गोविंदराव—त्यांच्या बहिणीशिवाय तेथें कोणीच नव्हतें.

नंतर न्यायाधीशांनीं थोडा वेळ विचार केला. कांहीं वेळ विचार केल्यावर त्यांनीं पोलिसला बोलावलें, व त्याजजवळ एक चिठ्ठी देऊन सदाशिवरावांना तावडतोब पकडून आणण्यास सांगितलें. गोविंदराव तेथेंच बसले होते. सदाशिवरावांना कांहीं वेळानें पोलिसांनीं पकडून आणिलें व न्यायाधीशापुढें उभें केलें.

न्यायाधीश—हे गोविंदराव तुमच्या ओळखीचे आहेत ?

सदा०—हो, आहेत.

न्याया०—यांची व तुमची मैत्री आहे ?

सदा०—हो, हे माझे मित्र आहेत.

न्याया०—यांचा मुलगा आजारी आहे अशी तार आल्याची तुम्हांला माहिती आहे ?

सदा०—हो मला माहीत आहे.

न्याया०—हे गांवाला जाण्यापूर्वी तुमच्याकडे आले होते.

सदा०—नाहीं, हे माझ्याकडे आले नव्हते.

न्याया०—यांनीं तुमच्याकडे हजार रुपये ठेवले काय ?

सदा०—नाहीं; यांनीं मजजवळ कांहींच ठेवलें नाहीं.

न्याया०—तुमच्या घरीं आणखी कोण आहे ?

सदा०—माझी बहीण शालिनी.

न्याया०—त्यांच्याकडे यांनीं पैसे ठेवले काय ?

सदा०—नाहीं.

न्याया०—हे तुमच्याकडे अलीकडे केव्हां आले होते ?

सदा०—काल माझ्याकडे हे हजार रुपये मागण्याकरितां आले होते. त्यांचें म्हणणें असें कीं, त्यांनीं मजजवळ जाण्यापूर्वी हजार रुपये ठेवले असून ते मी त्यांना परत द्यावेत. मी त्यांना म्हटलें कीं, तुम्ही मजकडे पैसे ठेवले नसून दुसऱ्या कोणाकडे पैसे ठेवले असतील, त्याची नीट आठवण करा. आणि मजजवळ जर यांनीं पैसे ठेवले असतील, तर त्यांनीं पावती हजर करावी.

न्याया०—( गोविंदरावास ) तुमच्याजवळ पावती आहे काय ?

गोविंद०—नाहीं, हे माझे मित्र असल्यामुळें मला पावतीची गरज भासली नाहीं. मीं पैसे यांच्या बहिणीसमक्ष ठेवले.

न्याया०—तुम्ही पावती घेतली नाहींत हें चांगलें केलें नाहींत; असो. तेव्हां सदाशिवराव, मी सांगतों असें करा. तुमच्या बहिणीला वाचता येतें ना ?

सदा०—होय.

न्याया०—त्यांना एक चिठ्ठी लिहा, व तींत "गोविंदरावांजवळून घेतलेले हजार रुपये तावडतोब पाठवून दे" असा मजकूर लिहा.

हा न्यायाधीशाचा हुकूम ऐकून सदाशिवरावांची घाबरगुंडी वळली.

ते म्हणाले—साहेब, मी जर पैसेच घेतले नाहींत, तर असा मजकूर कसा लिहूं ?

न्याया०—तुम्ही जर पैसे घेतले नसतील तर तुमची बहीण तसें कळवील.

नंतर सदाशिवरावांचा नाइलाज झाला. त्यांनीं चिठ्ठी लिहिली. पोलीस घरीं चिठ्ठी घेऊन गेले. सरळस्वभावाच्या शालिनीनें आपला भाऊ अडचणींत सांपडला असेल व त्यांनींच खरोखर पैसे मागितले असतील अशी स्वतःची समजूत करून घेऊन, पैसे पोलिसच्या हवालीं केले.

पोलिस पैसे घेऊन आलेले पाहून सदाशिवरावांनीं सारा अपराध कबूल केला व न्यायाधीशाची क्षमा मागितली. न्यायाधीशांनीं "गोविंदराव काय करतील तें" असें म्हटलें. थोर मनाच्या गोविंदरावांनीं सदाशिवरावांना सोडून द्यावें अशी विनंति केली, व ती त्यांनीं मान्य केली.

अशा प्रकारें न्यायाधीशाच्या बुद्धिचातुर्यानें गोविंदरावांचे पैसे गोविंदरावांना मिळाले.

---

# शालापत्रकाच्या वाचकांशीं हितगुज.

शालापत्रक येत्या जानेवारीला नव्या वर्षांत प्रविष्ठ होणार. गतवर्षी शालापत्रकानें आपल्या-कडून शक्य तितकी मेहनत घेऊन वाचकांना निरनिराळ्या विषयांचा परिचय करून दिला. शालापत्र-कानें वाचकांकरितां शिक्षणविषयक लेख, प्रवासपर वर्णनें, चरित्रें, गोष्टी, सचित्र गोष्टी, कोडीं, पाश्चात्य देशांतील शास्त्रीय माहिती, चुटके, कविता, खेळ, नाटकें वगैरे अनेक प्रकारचे करमणूकीचे, विचारपरिपूर्ण व स्फूर्तिदायक असे लेख लिहिले. गतवर्षी वाचकांना १००।१२५ पुस्तकेंहि कोड्यांना बक्षीसें म्हणून वाटलीं. यंदाहि आम्ही हाच उपक्रम सुरू ठेवणार आहोंत. शालापत्रकाची वर्गणी फारच थोडी म्हणजे ट. ह. सह १८३ आहे. म्हणजे शालापत्रकाला फक्त १ च रुपया मिळतो. एवढ्या थोड्या पैशांत उपयुक्त माहितीनें भरलेलें असें एकच मासिक आहे. त्यांतल्या त्यांत आम्ही बक्षीसें देण्याचें जें धाडस केलें त्याकडे पाहिलें म्हणजे शालापत्रक न घेणारा मनुष्य कमनशीबी होय असें म्हणावें लागतें. या मासिकाची दिवसें-दिवस होत असलेली भरभराट व लोकप्रियता याकडे लक्ष दिलें म्हणजे आमच्या म्हणण्याची सत्यता पटेल. शालापत्रक यंदाच्या सालापासून अधिक उपयुक्त व अधिक सुंदर करण्याकडे विशेष लक्ष दिलें जाईल. या वाढत्या लोकादराकडे पाहून आम्ही यंदाच्या वर्षी जानेवारीचा खास अंक काढणार आहों व एक सुंदर ऐतिहासिक रंगीत चित्र वाचकांना भेटीस देणार आहों. हा अंक नेहमींच्या दीडपट म्हणजे ३० पानांचा निघेल. तेव्हां आमच्या आश्रयदात्यांनीं गतवर्षीप्रमाणें यंदाहि आम्हाला आश्रय द्यावा अशी विनंति आहे. प्रत्येकानें शालापत्रक आपलें मासिक आहे असें समजून लेखनद्वारांहि मदत करावी. लहान मुलांना लेखक होण्याची मोठी हौस असते. त्यांची हौस आम्ही पुरवितों हें आतांपर्यंत वाचकांच्या नजरेस आलें असेलच. तेव्हां खास अंकाकरितां वाचकांनीं सुंदर लेख पाठविल्यास त्याचाहि विचार केला जाईल. तेव्हां कोणीहि वर्गणीदार होण्याची संधी आतां दवडूं नये अशी सर्वांना आग्रहाची विनंति आहे.



# अभिनव काव्यमाला भाग ३

या पुस्तकाची दुसरी आवृत्ति छापून विक्रीस तयार आहे, किं. १ रु. ट. ह. व व्ही. पी. खर्च निराळा.

म्यानेजर-चित्रशाळा प्रेस, पुणें.

# सरकी.

१०० वर्षांपूर्वी कापूस निवडण्याच्या यंत्राचा शोध लागला त्यामुळें कापूस चांगला निघूं लागला. परंतु कापूस निघाल्यानंतर उरलेल्या सरकीचें काय करावें हें कोणाला समजेना. ही सरकी त्या वेळीं कोठें तरी नदींत टाकून देत, किंवा जाळून टाकीत. परंतु गेल्या वीस वर्षांत जो तो या सरकीकरितां नुसता जीव टाकूं लागला आहे. आणि ही सरकी म्हणजे साऱ्या व्यापाराची राणी बनली आहे. या सरकीच्या



एंजिनची खोली.

प्रत्येक भागाचा उपयोग होतो. हीच सरकी आपण खातों, तिच्या निरनिराळ्या वस्तू करतों व तिच्या योगानें हजारों लोकांची करमणूक होते.

अमेरिकेंत या सरकीचे उपयोग करण्याकरितां मोठाल्या ७०० गिरण्या आहेत. या गिरण्यांत सरकीचे तुकडे पाडतात. गिरण्यांमध्यें सरकीच्या मोठाल्या राशि पडलेल्या असतात. या सरक्यासंबंधीं पहिली गोष्ट म्हणजे त्या स्वच्छ करणें होय. सरकी फार घाणेरडी असते. ही स्वच्छ करण्याकरितां छिद्रें पाडलेलीं दोन लांबट भांडीं असतात. हीं भांडीं सारखीं फिरत असतात. एक भांडें सरकी निसटून जाऊं नये अशा हेतूनें बनविलेलें असतें, व दुसरें, सरकी गळून पडावी म्हणून बनविलेलें असतें. ही सरकी यंत्रामध्यें आपोआप जाते. त्यांतील घाण खालीं असलेल्या दुसऱ्या भांड्यांत पडते. यंत्रांत सरकी गेल्यावर त्यावर चिकटलेला कापूस काढून टाकण्यांत येतो. या कापसाचा उपयोग विणण्याकरितां होत नाहीं. त्याचा चटयांमध्यें भरण्याकरितां उपयोग करतात. आणि ज्याला गन् कॉटन म्हणतात, त्याकडे उपयोग करतात. गन् कॉटन ज्वालाग्राही असल्यामुळें युद्धाचे दिवसांत त्याला फार मागणी असते.


या कापसापासून चष्म्याचे सांगाडे, नकली हस्तिदंताच्या वस्तू, सिनेमाच्या चित्रपटांकरितां लागणारे सेल्युलाइड, व बिन धुराची युद्धाला लागणारी दारु करतात. हे त्याचे कांहीं उपयोग आहेत.

सरकी स्वच्छ धुतल्यावर चांगली दिसूं लागते. त्याच्यावर काळ्या रंगाचें टरफल असतें. हें टरफल यंत्रानें फोडण्यांत येतें व सरकीचीं दोन छकलें करतात. दोन छकलें झाल्यावर वरचें टरफल आपोआप दूर केलें जातें व आंतला गीर दूर केला जातो. अशा प्रकारें दोन भागांची नीट विभागणी झाल्यावर आंतला गीर दाबाच्या खोलीकडे नेला जातो. त्यापूर्वी टरफलाला कांहीं गीर चिकटून राहिला असल्यास तो पुनः काढण्यांत येतो.

सरकीच्या वरच्या टरफलाचा व्हावा तसा उपयोग होत नाहीं. याचा उपयोग घोड्याच्या चामड्याच्या

पेट्यांत भरण्याकरितां किंवा चेंडू करण्याकरितां करतात. याला मागणी नसली म्हणजे याचें जळण करतात.

दाबाच्या खोलींत सरकीचा गीर दाबून त्याचें तेल काढतात. या खोलींत मोठाले पाण्याचे दाब असतात. त्यांचें वजन ५०० टन असतें. या दाबांचे निरनिराळे कप्पे किंवा पेट्या केलेल्या असतात. अशा प्रकारची व्यवस्था असल्यामुळें त्या गीराचा गोळा न केलेली असतात व प्रत्येक भांड्यांतून थोडी थोडी उष्णता मिळत तो वर जातो. प्रत्येक भांड्यांत ढवळण्याकरितां योजना केलेली असते, त्यामुळें गीर करपत नाहीं. शिजवण्याची क्रिया अत्यंत महत्त्वाची असते. जर ही क्रिया चुकली तर तेल कमी निघतें. अमुक एका मर्यादेपर्यंत त्याला उष्णता मिळाली तरच तेल चांगलें उतरतें व त्याकरितां फार काळजी घ्यावी लागते. त्याकरितां अतिशय हुशार लोकांची जरूरी



दाबाची खोली–आंत सांच्या शिजविण्याचीं भांडीं व दाब हीं असतात.

होतां पातळ पातळ थर होतात व त्यांतून अगदीं पिळून तेल निघतें. दाबाच्या खोलींत दाबाशिवाय, एक यंत्र असतें, त्याला सांचा म्हणतात, सांच्याशिवाय भट्या व रोलर्स तेथें असतात. रोलर्सच्या योगानें गीर चिरडतात. नंतर हा चिरडलेला गीर शिजवतात. शिजवण्याकरितां हा गीर मोठाल्या भांड्यांत टाकतात व त्याला वाफ देतात. हीं भांडीं एकावर एक रचलेलीं असतात... असते.

गीर शिजल्यावर तो सांच्यांत टाकतात. हा गीर दहा शेरांच्या वर नसतो. तेथें खालीं वर फडकें घालून त्याच्या पोळ्या लाटतात. हें फडकें उंटाच्या किंवा माणसांच्या केंसाचें विणलेलें असतें. नंतर या पोळ्या दाबण्याकरितां दाबाखालीं ठेवतात. एका वेळीं पंधरा पोळ्या दाबांत ठेवतात. पोळ्या कढत

आहेत तोंपर्यंतच तेल चांगलें निघतें, म्हणून हें सारें काम झटपट करतात. पोळ्या ठेवल्यावर पाण्याचा दाब येऊन आदळतो व तेल गळूं लागतें.

दाबाखालीं ठेवण्यांत येणाऱ्या सांच्याची कृती म्हणजे एक महत्त्वाची बाब असते. ह्या सांचाच्या तळाशीं पत्रा असतो व त्यावर पोळी ठेवतात, नंतर पुनः पत्रा ठेवून, पुनः त्यावर पत्रा ठेवतात अशी एकंदर व्यवस्था असते या पत्र्यांखालून तेल वाहत जातें. या पोळ्या अर्धा तास दाबाखालीं ठेवतात व नंतर यंत्रांनीं फडकें काढून घेतात.

या पोळ्या पुढें बारीक करून किंवा तशाच विक्रीकरतां पाठवतात. या गुरांना फार पौष्टिक असतात. यांचा खताकडे उपयोग करितात. या तेलाचा उपयोग काय असतो हें सर्वांना ठाऊक आहेच. ह्या तेलाचा तुपासारखा उपयोग सध्यां करतात व हें तेल आहे असें ओळखतांहि येत नाहीं.

कांहीं वर्षांपूर्वीं पाश्चात्त्य देशांत सरकी म्हणजे एक कटकट वाटत होती. कापूस काढून झाला म्हणजे ही सरकी नदींत फेंकून देत. अखेरीस नद्या इतक्या भरल्या कीं, पाण्याचा ओघ थांबण्याची वेळ आली. तेव्हां गिरणीवाल्यांनीं शेतकऱ्यांना तुम्ही सरकीची विल्हेवाट लावीत असाल तर आम्ही कापूस काढून देतों असें म्हणूं लागले. परंतु तो काळ गेला आणि आज जिकडे तिकडे सरकी म्हणजे जीव कीं प्राण झाली आहे. आमच्या देशांत मात्र दुर्दैवानें या धंद्याकडे लोकांचें लक्ष अद्याप गेलें नाहीं अशी शोचनीय स्थिति आहे.

---

## राजा व चहाडीखोर.

एका मनुष्याला चहाडी करण्याची फार सवंय असे. तो नेहमीं ह्याची गोष्ट त्याला सांगून त्या दोघांचें भांडण लाऊन देत असे. ह्याबद्दल राजानें त्याला पुष्कळ शिक्षा करून पाहिल्या; परंतु त्याची सवंय म्हणून जाईना. तेव्हां राजानें त्याला आपल्या खोलींत बसवून ठेविलें. तेथें त्यानें राजा व राणी यांचें भांडण लावून देण्याचा बेत केला. त्यानें राजाला सांगितलें कीं, तुझी बायको कुत्री आहे. ती नेहमीं रात्रीं तुझें आंग चाटते, पाहिजे तर आज रात्रीं झोंपलल्याचें सोंग घेऊन रहा व अनुभव घेऊन पहा. नंतर हळूंच त्यानें राणीला सांगितलें कीं, तुझा नवरा मिठकर गावडा ( मीठवाला गावडा ) आहे. पाहिजे तर आज रात्रीं राजा झोंपल्यावर त्याचें आंग चाटून पहा, तें राणीला खरें वाटून त्याच रात्रीं तिनें आपला नवरा झोंपल्यावर त्याचें आंग चाटून पाहिलें. त्याबरोबर राजा उठून कुत्री म्हणूं लागला व माणसाचें आंग जरा खारट असतें तेव्हां राणी राजाला मिठकर गावडा म्हणूं लागली; याप्रमाणें त्या मनुष्यानें राजा व राणी यांचें भांडण लाऊन दिलें.

इटुकली मिटुकली, गोष्ट सरो, तुमचें आमचे पोट भरो.

# शालापत्रकाची चढाओढ.

## कोड्यांचीं उत्तरें.

मुलांकरितां

स रा फ
रा व ण
फ ण स.

सर्वांकरितां.

बोलाचिये भात । बोलाचिये कढी ।
सेवुनिया तृप्त कोण झाला.

बरोबर उत्तरें.

१ सदाशीव अण्णाजी रानडे ( जळगांव )
२ श्रीपाद विश्वंभर शेणवी, पणजी गोंवा .
३ गुलाब दामोधर मेंगळे, मुंबई.
४ कुमारी ललीताबाई देशपांडे, अफजलपूर.
५ आत्माराम संतुशेट त्रिभुवन, केळ्ये.
६ नारायण यशवंत खांबेकर, मुंबई.
७ सौ. सुशीलाबाई पै, कराची.
८ शीवाप्पा नाना माळी, किर्लोस्करवाडी.
९ दत्तात्रय त्रिंबक घाटपांडे, वर्धा.
१० रामचंद्र शंकर जोशी, धुळें.
११ माधव व्यं. कारे, मडगांव गोंवा.
१२ वि. रा. माटे, सोलापूर.
१३ श्रीधर यशवंत मुसळे, कहा, रत्नागिरी.
१४ यशवंत शिवा पै, पणजी गोंवा.
१५ नारायण तुकाराम ठाकूर, खेड रत्नागिरी.
१६ गंगा देवराम कोल्हे, बायणोद पूर्वखानदेश.
१७ नारायण त्रिंबक गोडबोले, चिकोडी.
१८ कु. गंगु गोडबोले, भतगुणकी.
१९ नरहरी केशव कुलकर्णी अंमळनेर.
२० शांताराम पुंडलीक नाईक मडगांव गोवा.
२१ रामचंद्र दत्तात्रय कानडे, पाल.
२२ वसंत वासुदेव वाचासुंदर, जेऊर.

सर्वांकरितां.

१ रामचंद्र गणपत कंटक, रेवदंडा.
२ प्रो. वसंतलाल एम्. शहा, किर्लोस्करवाडी.
३ यशवंत विष्णु देशपांडे, तुर्केवाडी
४ रामचंद्र दत्तात्रय कानडे, पाल

## बक्षीस मिळालेलीं पुस्तकें.

नं. ४ झोंपाळ्यावरील गीता
नं. ५ लक्ष्मी पूजन
नं. ९ चिमुकलें रामायण
नं. १५ ध्रुव चिलया
नं. १६ भारतांतल्या गोष्टी

सर्वांकरितां.

१ निबंधलेखन आणि अनुवाद
२ अर्वाचिन महाराष्ट्र
३ समर्थांचें बाळबोध चरित्र
४ विद्वत्त्व कवित्त्व व वक्तृत्त्व.

या खेपेस पुष्कळांनीं कूपनें न पाठवितां कोडीं धाडलीं. त्यांचा अर्थातच विचार करतां येणें शक्य नाहीं. कित्येकांना कूपन म्हणजे काय हें ठाऊक नसतें. कोड्यांच्या शेवटीं चौकटींत " कूपन " अशीं अक्षरें लिहीलेला जो भाग असतो, तो कापून कोड्याबरोबर पाठविला तरच त्यांच्या कोड्यांचा विचार करणें शक्य होईल.

**सूचनाः**—आमच्या ऑफीसांतून कोड्यांचा निकाल लागल्याबरोबर बक्षीसें रवाना होतात; परंतु कित्येकां-

डिसेंबर
कुपन
सर्वांकरितां

डिसेंबर
कुपन
मुलांकरितां

करून बक्षीसें मिळालीं नाहींत अशा तक्रारी आल्या आहेत. तेव्हां आमच्यावर कोणत्याहि प्रकारचा दोष राहूं नये म्हणून ज्यांना बक्षिसें मिळालीं असतील त्यांनीं निकाल जाहीर होतांच तीन आण्याचीं तिकिटें पाठवावींत म्हणजे त्यांचें बक्षीस त्यांना पोस्टांत गहाळ न होतां मिळेल. ज्यांना स्वतःच्या जबाबदारीवर रजिस्टर केल्याशिवाय बक्षिसें पाहिजे असतील, त्यांनीं तसें कळवावें म्हणजे आमच्यावर कोणत्याच प्रकारची जबाबदारी राहणार नाहीं.

## नवी कोडीं.

### सर्वांकरितां.

मी चिमटयासारखा आहें. मी दोन्ही बाजूंनीं केसांनीं वेढलेला आहें. आणि हे केस काढून टाकले तर मग मला कोणी विचारणाराहि नाहीं. परंतु मी कशापैकीं आहें, हें सांगितल्याबरोबर तुम्ही मला ओळखूं शकाल. तेव्हां मी कोण तें सांगा.

### मुलांकरितां.

**श्रीशिवाजी महाराज.**

यांपैकीं, एकेक अक्षर घेऊन देशभक्तीपर आठ वाक्यें लिहा. ज्यांचीं सर्वांत उत्तम वाक्यें असतील त्यांचींच वाक्यें प्रसिद्ध केलीं जातील.

---

# फळा.

शाळेंतील फळ्याचे ऐवजीं कापड, रुंदी ३० इंच दर वारास १ रु. हें कापड खरखरीत असून त्याजवर खडूनें उत्तम प्रकारें लिहितां येतें; पाण्यानें पुसलें असतां कापड ओलें होत नाहीं.

म्यानेजर—चित्रशाळा प्रेस, पुणें.

# " विनोद लहरी. "

( लेखक, रा. केशवाचार्य साहोत्री, उस्मानाबाद. )

नाटकाचा मालकः–अरे तूं मरतो आहेस असा सीन आहे, आणि त्यावेळीं तूं आनंदाचा चेहरा कसा करतोस!

नाटकीः–आपण मला पगार देतां त्यावर जगण्यापेक्षां मरणें अधीक आनंदाचें आहे म्हणून.

* * *

सावकारः–( चिरंजीवास ) मुला, तूं आतां मोठा झाला आहेस. मी तुझ्या हातांत आतां व्यापाराची गुरुकिल्ली देतों.

मुलगाः–हो, पण आधीं तिजोरीची किल्ली द्या; मग गुरुकिल्ली.

* * *

शिक्षकः–रामू, पांढऱ्या रंगाचे पदार्थ कोण कोणते सांग पाहूं !

रामूः–दूध, कापूस, खडू, कागद इ.

शिक्षकः–विठू, तूं आणखी कांहीं उदाहरणें सांग पाहूं.

विठूः–आपल्या मिशा, सर.

* * *

प्रोफेसरः–मानवी स्वभाव फार विचित्र आहे. मनुष्यस्वभावास प्रत्येक गोष्टीची हाव फार असते. त्यास थोडें दिलें कीं आणखी हवेंसें वाटतें.

साधाभोळाः–प्रोफेसरसाहेब, आपण म्हणतां तें सर्व खरें आहे; पण मला असें वाटतें कीं, पोलिस, कोर्टांतून एकाद्यास बक्षिस मिळालें असतां तो आणखी बक्षिसाची हाव करीत नाहीं, हें मोठें आश्चर्य आहे.

* * *

बळवंतरावः–वा ! नमस्कार आपण येथें कधीं आलांत!

वामनरावः–मला येऊन बरेच दिवस झाले.

बळवंतरावः–अहो, बरेच म्हणजे किती.

वामनरावः–( जरा विचार करून ) आज वार शनिवार, मला आल्यास चौथ्या शनिवारीं महिना होईल.

* * *

नारायणरावः–काय बाबूराव, काल भेटलेला मनुष्य कोण होता !

बाबूरावः–अहो तो केवढा थोर, त्याचें वजन काय! त्याचा या गांवांत सर्वांच्या डोक्यावर हात असतो.

ना०:–मग का तो गांवचा पाटील आहे!

बा०:–नाहीं हो.

ना०:–मग कुलकर्णी !

बा०:–छे.

ना०:–मग कोणी अधिकारी !

बा०:–छे हो.

ना०:–मग आहे तरी कोण!

बा०:–अहो, न्हावी आहे तो !

* * *

कविः–ह्या सहज जातां जातां सुचलेल्या चार कविता आणल्या आहेत.

एडिटरः–अहो. जातां जातां सुचलेल्या इकडे कशास आणल्यांत! जाऊं द्यावयाच्या होत्या कुठें जात होत्या त्या!

# मोळीविक्या.

दुपारच्या वेळीं एक मोळीविक्या अगदीं दमून आणि थकून गेला होता. तो फार म्हातारा झाला होता व दुःखी होता. तो म्हणाला, " मला पोटाला पोटभर अन्नहि मिळत नाहीं आणि कष्ट मात्र व्यर्थ पडतात. आतां या गोळा केलेल्या काटक्या मी घरीं



कशा नेऊं. मला एक काटकीहि उचलवत नाहीं. आणि घरीं नेऊन तरी काय करणार ? नुसतें लांकूड कांहीं खातां येत नाहीं. तें बाजारांत नेलें पाहिजे, विकलें पाहिजे त्याचें धान्य आणलें पाहिजे आणि मग शिज-



वून तें खाल्लें पाहिजे. आणि लांकडें विकलीं गेलीं नाहींत तर उद्यां उपास ! इतकी दगदग करण्यापेक्षां मेलेलें बरें ! देवा, ये, आणि मला तुझ्या घरीं घेऊन जा. नको हा जीव. त्याचें हें बोलणें ऐकून देवी प्रगट झाली आणि म्हणाली, " काय पाहिजे तुला " त्यावर म्हातारा घाबरून म्हणतो, "अं अं, कांहीं नको, एवढें हें ओझें मला उचलवत नाहीं, जरा हात लावा, मी अगदीं म्हातारा झालों आहें. हें ऐकून देवी हंसली




व म्हणाली " म्हाताऱ्या धीर धर " नंतर तिनें लांकडें उचललीं. ती म्हणाली, " जा, यांपैकीं प्रत्येक लांकडाचा



एकेक रुपया येईल " आणि दुसऱ्या दिवशीं तसेंच झालें.




शालापत्रकाचें कुपन.




वरील शालापत्रकाचें कुपन कापून त्याबरोबर ६ आण्याची तिकिटें पाठविल्यास वीस-जणांत एकाला शालापत्रकाचा अंक वर्षभर मोफत चालू राहील. व शिवाय प्रत्येकी हिंददेवी क्यालेंडर ६ आणे किंमतीने मिळेलच.

पत्ता:—R. V Joshi. 1028 Sadashiv, Poona.

मुलांकारितां ] **पंचतंत्र** [ सचित्र !

संस्कृत पंचतंत्रांतील सर्व गोष्टींचें मराठी सुबोध भाषांतर केलें असून प्रत्येक गोष्टीस सुबक चित्र जोडलें आहे. एकंदर गोष्टी ५० असून चित्रेंही ५० आहेत. इसापनीतीप्रमाणेंच पंचतंत्रांतील गोष्टीही विशेष मनोरंजक असून बोधप्रदही आहेत. टाईप ग्रेट, कागद ग्लेज, पृष्ठसंख्या ३५० बाईंडिंग जाड पुठ्याचें, किं. १०४ ट. ह. ०४ शिवाय. म्यानेजर—चित्रशाळा प्रेस, पुणें.

॥ ॐ नमः श्रीरामचंद्राय ॥

# आर्यमहौषधालय मु० पो० आंजर्ले

**कोंकणप्रांतांतील अगदीं ताज्या व शुद्ध वनस्पतींचीं जगत्प्रसिद्ध निर्दोष व रामबाण औषधें.**

**कंदर्पमंजरी पाक**—हा अपूर्व पाक गरिबापासून तों अमीरउमरावापर्यंत सर्वांसही अत्यंत उपयोगी असून किंमत माफक ठेविली आहे. यांत मौक्तिक, प्रवाळ, लोह, माक्षिक, कस्तूरी, अंबर इ० अत्युच्च गुणकारक पदार्थ असून शिवाय बदाम, पिस्ते, अक्रोड चारोळी, केशर, वेलची, पंजाबी सालममिश्री, सफेतमुसळी, पत्री, गोक्षुर, शतावरी, आस्कंद, वंश-लोचन वगैरे (८०) उपयुक्त वनस्पति घातल्या आहेत. यानें पथ्यावांचून गुण येतो. यापासून कोण-त्याही कारणांनीं होणारा व कशाही प्रकारचा शुक्रस्राव, नपुंसकत्व, मूळव्याधि, रक्तदूषणामुळें त्वग्रोग, स्त्रियांची धुपणी व गर्भाशयस्थ दोष या भावना त्यांच्या एकंदर उपविकारांसह तत्काल बऱ्या होऊन धातुशुद्धि होते, व शरीर कणखर आणि तेजस्वी बनतें. २० तो० द० २ रुपये. एकदम ३ डबे घेणारास ५ रुपये.

**स्वर्णधात्री तेल**—हें चारोळी, बदाम, कंकोळ, एला, बहुविध वनस्पतींचीं सत्त्वें व उपयुक्त तेलें अशा अनेक पदार्थांनीं बनविलें असल्यानें याच्या मर्द-नापासून अपस्मार, उन्माद, वेड, चक्कर इ० रोगांस जलद आराम पडतो. केंसांस चोळल्यानें केंस काळे कुळकुळीत, तजेलदार, सडक लांब व मृदु होऊन मेंदु शांत आणि रोगरहित बनतो. यानें मस्तकाचें टकल जातें. हें अंगास चोळून स्नान करीत गेल्यानें शरीराचा दुर्गंध जातो. खरूज, गजकर्ण, शिबें, तसेंच तळपाय, तळहात, डोळे व मस्तक यांचा दाह हे विकार खास बरे होऊन निद्रा चांगली येते, आणि नेत्ररोग दुरुस्त होतात. बा० किं० १। रु०

**दंतरक्षक पूड**—ही दांत व हिरड्या यांचे सर्व विकार तत्काल दुरुस्त करून दांत स्वच्छ व मजबूत करण्यांत प्रतिज्ञेची आहे. ड. ६ आणे.

**सुरंगी, मालती, कल्हार, गुलबहार, दणाणा, लक्ष्मीविलास** इ० बादशाही अति उंची अत्तरें व त्याचप्रमाणें गुलाब, हिना, केवडा, चमेली, जाई वगैरे सुगंधी अत्तरें आणि केंसांस लाव-ण्याचीं हरएक प्रकारचीं सुवासिक तेलें माफक दरानें पूर्ण खात्रीचीं मिळतील.

**सूचना.**—वरील औषधें व अत्तरें वगैरे पूर्ण खात्रीचीं असल्यामुळें आज पंचवीस वर्षांत त्यांचा लक्षावधि लोकांस अप्रतिम उपयोग झाला म्हणून त्यांचा नेहमी फार खप होत आहे. अनुभवानंतर पूर्ण खात्री पटेलच. औषधें माहितीचे सत्यांसह रोखीनें अगर व्हा. पी. नें पाठवूं. प्याकिंग व टपाल खर्च वेगळा. घाऊक घेणारांस कमिशन भरपूर. सर्व औष-धांच्या आणि आरोग्यरक्षणाच्या माहितीचें सचित्र मोठें पुस्तक देऊं. आमचीं औषधें वगैरे मागविणें ती खालील बिनचूक पत्त्यावर मागवावीं.

**कृष्णशास्त्री विवलकर, वैद्य.**